



# लोकसत्तेला दण्डसत्तेचें आव्हान

पु. ग. सहस्रबुद्धे

# लोकसतेला दण्डसत्तेचें आव्हान

डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे
एम्.ए., पीएच्. डी.

कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पुणे

प्रकाशक
ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे – ४११ ०३०

■

मुद्रक
जंगम ऑफसेट प्रा. लि.

■

लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान

■

सर्व हक्क सुरक्षित

■

प्रथमावृत्ती : १९६२
द्वितीयावृत्ती : २०१०

■

किंमत २०० रुपये

# प्रस्तावना

१००१ सालीं गझनीच्या महंमदानें अटक नदी ओलांडून भरतभूमीवर आक्रमण केलें, आणि तेव्हांपासून आजपर्यंत सर्व भरतभूमि स्वतंत्र आहे असा एक क्षणहि इतिहासांत उगवलेला नाही. १९४७ सालीं भारताला स्वातंत्र्य मिळालें; पण तें खंडित भारताला, सर्व भूमीला नव्हे. जवळ जवळ एक तृतीयांश भारत अजूनहि दास्यांतच आहे. पण हें मर्यादित स्वातंत्र्यहि आपण पुरतीं सात वर्षे सुद्धा टिकवूं शकलों नाहीं. १९५४ सालींच शत्रूने भारताचा एक मोठा विभाग तोडून घेतला.

या भरतभूमीचे सुपुत्र तिच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास समर्थ आहेत असें या इतिहासावरून म्हणतां येईल काय ? अफगाण, तुर्क, मोगल, शिद्दी, डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज—कोणीहि यावें, या भूमीवर आक्रमण करावें आणि येथे शतकानुशतक सुखानें राज्य करावें अशी आपली स्थिति आहे. या लूटमारींत, आपणच मागे कां राहावें, असा विचार मनाशीं करून चीनहि आता तींत सामील झाला आहे. दुर्दैव असें की, आपण मात्र आहों तसेच आहों. असंघटित, अराष्ट्रीय, देशद्रोही, धर्महीन, चारित्र्यहीन, बेसावध, असाक्षेपी, अवास्तववादी, अकार्यक्षम, वाचीवीर, कृतिशून्य आणि म्हणूनच दरिद्री, करंटे, असमर्थ, दुर्बल, दीन !

असें कां व्हावें याचा अगदी मूलगामी विचार भारतीयांनी केला पाहिजे. त्याच दृष्टीने या ग्रंथांत विवेचन केलें आहे.

सोव्हिएट रशिया व नवचीन या सध्याच्या जगांतल्या दोन प्रबळ अशा दण्डसत्ता आहेत. त्यांचा सर्व इतिहास ४०-५० वर्षांचा आहे. चीनचा तर दहा-पंधरा वर्षांचाच आहे. तरी अमेरिकेसारख्या अत्यंत बलाढ्य व प्रौढ लोकसत्तेला व इंग्लंड, फ्रान्स, पश्चिम जर्मनी यांच्या संघटित सामर्थ्याला आव्हान द्यावें इतकें सामर्थ्य त्यांना कसें प्राप्त करून घेतां आलें, कोणत्या तत्त्वांची व शक्तींची उपासना त्यांनी केली याचें विवेचन पहिल्या प्रकरणांत केलें आहे. हें आव्हान अमेरिकेला स्वीकारतां येईल काय आणि आलें तर

कोणत्या वळावर, कशाच्या आधाराने येईल, याचा विचार दुसऱ्या प्रकरणांत केला आहे. तिसऱ्या प्रकरणापासून शेवटच्या आठव्या प्रकरणाच्या अखेर-पर्यंत भारतीय लोकसत्तेच्या सामर्थ्याचें मूल्यमापन केलें आहे.

तिसऱ्या व चौथ्या प्रकरणांत भारतांतील चारित्र्यहीनता व अकार्यक्षमता यांचें स्वरूप दर्शवून भारताला जडलेल्या या दुर्धर रोगांची चिकित्सा केली आहे; आणि भारताने आखलेल्या योजना व डोळ्यांपुढे ठेवलेलीं उद्दिष्टें यांत जें अपयश येत आहे तें याच दोन अवगुणांमुळे येत आहे हें सरकारने नेमलेल्या ज्या अनेक समित्या, त्यांनी केलेल्या मूल्यमापनाच्या आधारेंच दाखवून दिलें आहे.

पण येथे असा प्रश्न निर्माण होतो की, भारताला हे दुर्धर रोग तरी कां जडावे ? या संबंधांतच कांही मूलगामी तात्त्विक विवेचन पांच, सहा व सात या प्रकरणांत केलें आहे. राष्ट्रनिष्ठा व धर्मनिष्ठा या महाशक्तींच्या आश्रयानेच सध्या सर्व राष्ट्रें आपापला उत्कर्ष साधीत आहेत. इंग्लंड अमेरिकेसारखीं लोकसत्ताक राष्ट्रें व रशिया, चीन यांसारखीं दण्डायत्त राष्ट्रें याच दोन शक्तींचा अवलंब करीत आहेत. दुर्दैवाने भारताने मात्र या महाप्रेरणांची अवहेलना, विटंबना चालविली आहे. याला महत्त्वाचें कारण म्हणजे आपला सत्तालोभ, स्वार्थ, अदूरदृष्टि आणि हीन अशी निवडणूक-निष्ठा हें होय. पांचव्या व सहाव्या प्रकरणांत हा विषय मांडला आहे. सातव्या प्रकरणांत आपल्या परराष्ट्रकारणाचा विचार केला आहे. त्यांतहि परराष्ट्रकारणाची चर्चा करावी हा उद्देश नाही. भारतीयांच्या प्रकृतींतल्या एका जुनाट रोगाचें स्वरूप वर्णावें हा त्यांत उद्देश आहे. धर्माचें स्वरूप निरपेक्ष असावें कीं (समाजाचा उत्कर्ष करील तो धर्म असें) उत्कर्षसापेक्ष असावें हा वाद फार प्राचीन आहे. दुर्दैवाने धर्माचें स्वरूप निरपेक्ष असावें असें तत्त्वज्ञान भारतांत पुनःपुन्हा प्रबळ होत असतें. युधिष्ठिर, गौतमबुद्ध, मध्ययुगीन संत, महात्माजी हे या पंथाचे उपासक आहेत. धर्मासाठी धर्म, सत्यासाठी सत्य, अहिंसेसाठी अहिंसा अशी त्यांची धारणा आहे. याचा अतिरेक झाला की समाजाचा अधःपात होतो. सध्याच्या आपल्या परराष्ट्रकारणांत सत्यासाठी सत्य, पंचशीलासाठी पंचशील हें तत्त्व प्रबळ झालें आहे; आणि यामुळे जगांत आपल्याला कीर्ति मिळत

आहे, पण यश मिळत नाही. अंतर्गत राष्ट्रीय प्रपंचांत अत्यंत हीन, अधम असा स्वार्थ आणि परराष्ट्रकारणांत अतिरेकी, बेगडी उदात्तता या दोन घातक प्रवृत्तींमुळे आपला नाश होत आहे.

आणि यामुळेच भारताची लोकसत्ता यशस्वी होईल काय, अशी दारुण शंका मनांत उभी राहते. प्रारंभापासून राष्ट्रनिष्ठा (पूर्वपरंपरेची पूजा व भारताच्या शत्रूंचा प्रखर द्वेष) व विज्ञानपूत, समाजोन्मुख धर्मनिष्ठा यांची आपण जनतेंत जोपासना केली असती तर भारताची लोकसत्ता निश्चित यशस्वी झाली असती. पण दुर्दैवाने आपल्या राज्यकर्त्यांनी अत्यंत विपरीत व अराष्ट्रीय तत्त्वज्ञान स्वीकारल्यामुळे सर्व राज्ययंत्रणाच कर्तृत्व-हीन, चारित्र्यहीन झाली आहे. तीच गोष्ट कायद्याच्या बजावणीची. कायद्याचें राज्य म्हणजेच लोकसत्ता. प्रारंभापासून काँग्रेस सरकारने अत्यंत काटेकोर-पणें प्रस्थापित कायद्याची बजावणी केली असती, तरी भारताची लोकसत्ता अभंग राहिली असती. पण कायद्याची बजावणी हे दिसायला दोनच शब्द असले तरी त्याच्या मागे अखिल राष्ट्राचें चारित्र्य उभें असतें. त्याचाच येथे अभाव आहे. सध्या भांडवलवाले, कारखानदार, काळाबाजारवाले, करचुकवे, सरकारी अधिकारी आणि पांढरी टोपी घालणारे दादा यांनी कायदा विकत घेतला आहे. मग भारताची लोकशाही टिकणार कशी ?

भारताचें स्वातंत्र्य टिकविण्याचेंहि सामर्थ्य आपल्या ठायीं नाही; मग लोकशाही टिकविणें कसें शक्य आहे ? रशिया, चीन यांनी लोकशाही स्वीकारली नाही, पण आपलें स्वातंत्र्य अबाधित राखलें आहे. त्यांच्या सरहद्दीचा भंग करूं शकेल अशी एकहि शक्ति जगांत नाही; आणि भारताच्या हद्दींत घुसण्यास भीति वाटेल असा एकहि देश जगांत नाही. हीं सर्व आपल्या गेल्या चौदा वर्षांच्या चारित्र्याचींच फळें आहेत. सत्ता हातीं येतांच लोक-शिक्षणाची प्रचंड मोहीम आपण हातीं घेतली असती, स्वातंत्र्यपूर्व काळा-प्रमाणे लक्षावधि त्यागी, निःस्वार्थी तरुण भारताच्या शहराशहरांतून, खेड्याखेड्यांतून, डोंगरदऱ्यांतून, गिरिकंदरांतून, राष्ट्रनिष्ठा, धर्मनिष्ठा, विज्ञाननिष्ठा यांचे संदेश देत, संस्कार करीत अहोरात्र विचरत राहिले असते, तर आज आपल्या लोकशाहीचा पाया भक्कम झाला असता आणि मग वरच्या मंदिराला तडे गेले नसते. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर

लोकशिक्षणाची आठवणच कोणाला झाली नाही. पूर्वजांनी सरंजाम मिळविले, आपण ते भोगावयाचे आहेत हीच वृत्ति सर्वत्र बळावली. शेवटच्या प्रकरणांत हाच विचार मांडला आहे.

भारताच्या आजच्या राज्यकर्त्यांचीं, इतर पक्षांची व एकंदर समाजाचीं लक्षणें पाहतां भारताची लोकशाही यशस्वी होणें शक्य नाही असें वाटतें. याचा अर्थ असा नव्हे की, येथे दण्डसत्ता यशस्वी होईल. दण्डसत्तेलाहि लोकशिक्षणाची गरज असते आणि त्यासाठी निःस्वार्थी व चारित्र्यसंपन्न असे लक्षावधि तरुण देशाला हवे असतात. अशा तरुणांची अगदी दुर्भेद्य पोलादी संघटनाच दण्डसत्ता यशस्वी करूं शकते. दुर्दैवाने भारतांत अशीहि संघटना नाही. तेव्हा लोकसत्ता फसली तर दण्डसत्तेचा अवलंब करतां येईल अशा भ्रमांत कोणी राहूं नये. अशा स्थितींत लोकजागृतीसाठी नवी संघटना उभारणें हा एकच उपाय आहे. या संघटनेने पायाभरणीपासून कामाला प्रारंभ केला पाहिजे. भारतीय तरुणांनी आठआठ दहादहांच्या गटाने खेड्यांत राहून तेथील सार्वजनिक प्रपंचाची धुरा खांद्यावर घेतली पाहिजे. ग्रामीण भागांत राहणाऱ्या जनतेच्या योगक्षेमाची, आरोग्याची, शिक्षणाची, शेतीची, पाटबंधाऱ्यांची अखंड चिंता या तरुणांनी वाहिली पाहिजे आणि ही सेवा करीत असतांनाच त्यांना लोकशाही, विवेकनिष्ठा, राष्ट्रभक्ति, धर्मनिष्ठा यांचे संदेश दिले पाहिजेत. लोकशाहीसाठी प्रथम 'लोक' निर्माण केले पाहिजेत. वरील संस्कार जनतेवर झाले, व वर सांगितलेल्या पद्धतीने झाले, तरच भारतीय जनतेंतून 'लोक' निर्माण होतील व लोकशाहीचा पाया घातला जाईल. यासाठीच नवी संघटना अवश्य आहे. ती एकदम मोठ्या राष्ट्रव्यापी स्वरूपांत अवतीर्ण होईल असें नाही, पण ज्या तरुणांच्या ठायीं ही बुद्धि जागृत होईल त्यांनी जवळच्या परिसरांत कामाला प्रारंभ केला, तर त्यांतूनच पुढे अशी राष्ट्रव्यापी संघटना निर्माण होईल.

पण अशी एखादी राष्ट्रव्यापी संघटना सुदैवाने भारतांत उभी राहिली तरी तिला लोकशाही मार्गांनी भारताचा उत्कर्ष साधतां येईल, असें मला वाटत नाही. आपल्या भिन्न प्रांतांतले भाषाभेद हे कमालीचे चिघळून त्यांना विषारी रूप आलें आहे. दोन प्रांत म्हणजे दोन शत्रुराष्ट्रें आहेत, असाच भास व्हावा असे पवित्रे सध्या ते घेत आहेत. द्रवीड कळहमने निर्माण केलेला

दक्षिणोत्तर भेद, आर्य-अनार्य भेद असाच आहे. हिंदु-मुसलमान हा भेद किती हिडीस स्वरूपांत दर वेळीं प्रकट होत असतो हें सर्वश्रुत आहे. कम्युनिझमचा रोग तर इतका असाध्य आहे की, अमेरिकेंतील लोकवादी पंडितहि तेथील कम्युनिस्ट पक्षावर बंदी घालावी अशी मागणी करूं लागले आहेत. भारतांतील लोकसंख्यावाढीचें प्रमाण इतकें भयानक आहे की, आपल्या सर्व पंचवार्षिक योजना अपेक्षेबाहेर सफल झाल्या तरी एवढ्या लोकांना अन्न-धान्य पुरवितां येणार नाही असें आजचे अर्थवेत्ते म्हणत आहेत. औद्योगीकरणाचा प्रश्न फारच बिकट आहे. लोकशाही मार्गांनी औद्योगिक विकास अजून कोणत्याहि देशाने साधलेला नाही, हें आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे. सोळा सोळा तास रोज प्रत्येकाने काम केलें, तरच लोकशाहीला अवश्य तें धन भारतांत निर्माण होणें शक्य आहे. यापुढच्या काळांत एखाद्या देशांत दण्डाच्या भीतीवांचून माणसें सोळा तास काम करतील हें खरें वाटत नाही. असे हे सर्व प्रश्न, या सर्व समस्या लोकशाही मार्गाने सुटतील असा विश्वास वाटत नाही. भारताची उन्नति साधावयाची असेल तर कोणत्याहि शासनाला दण्डसत्तेचा आश्रय करावा लागेल असें वाटतें.

पण तो प्रश्न फार पुढचा आहे. लोकशाही असो, दण्डसत्ता असो, प्रथम वर सांगितल्याप्रमाणे भारतीय जनतेची मानसिक क्रान्ति होऊन येथे युग-परिवर्तन झालें पाहिजे. तें व्हावयाचें तर चारित्र्यसंपन्न, राष्ट्रनिष्ठ, धर्म-निष्ठ, निःस्वार्थी व विज्ञाननिष्ठ अशा लाखो तरुणांची संघटना उभी राहून तिने लोकशिक्षणाचें कार्य शिरावर घेतलें पाहिजे. भारतीय तरुणांना काळाचें आव्हान आहे तें हें आहे. तें आव्हान त्यांनी स्वीकारलें तर लोकसत्ता कीं दण्डसत्ता हा प्रश्न पुढे त्यांनाच सोडवितां येईल. नाही तर भारताचें स्वातंत्र्यहि आपल्याला टिकवितां येणार नाही.

* * *

'लोकसत्तेला दण्डसत्तेचें आव्हान' ही लेखमाला जुलै १९५९ ते ऑक्टोबर १९६० या वर्ष सव्वा वर्षांत प्रथम 'वसंत' मासिकांत प्रसिद्ध झाली. भारताच्या परराष्ट्रकारणाविषयीचा लेख १९५९ च्या 'केसरी'च्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाला होता. हे सर्व लेख मिळून एक प्रबंध होतो. तो आता ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत आहे.

ग्रंथाचें लेखन वर सांगितलेल्या काळांत झालें असल्यामुळे समकालीन म्हणून केलेले उल्लेख अर्थातच त्या वेळचे आहेत. विवेचनाचे धागे दोरे उस्तरूं नयेत व अनुसंधान बिघडूं नये म्हणून ते तसेच ठेविले आहेत. सातव्या प्रकरणांत थोडी भर नव्याने घातली आहे. इतर प्रकरणांत क्वचित् कांही वाक्यांत फिरवाफिरव केली आहे. मूळ लेखनाच्या नंतरच्या वर्ष दीड वर्षांतले कांही उल्लेख त्यांत आले आहेत. संदर्भावरून तें सहज ध्यानांत येईल.

कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे मालक व माझे विद्यार्थि-मित्र श्री. अनंतराव कुलकर्णी यांचें जुलैच्या महापुरांत फार प्रचंड नुकसान झालें आहे. पूर्व-योजनेप्रमाणे हा ग्रंथ प्रसिद्ध होणें आता अशक्य आहे असेंच मी समजून चाललों होतों. त्यांच्याजवळ मीं हा विषय काढला तो भीतभीतच. पण त्यांनी ग्रंथप्रकाशनाची योजना तारखांसकट कागदावर लिहून काढली, आणि पूर्वीच्याच धडाडीने ती पार पाडली. त्यांचे पुरेसे आभार मानणें मला जमेल असें वाटत नाही. त्यांनी हें जें केलें त्यांत अशीं पुस्तकें प्रसिद्ध झालींच पाहिजेत या त्यांच्या आग्रहाचाहि भाग आहे, हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

ग्रंथाचीं पहिलीं एक दोन प्रकरणें प्रसिद्ध होतांच अनेक वाचकांनी, मित्रांनी, विद्यार्थ्यांनी हा विषय ग्रंथरूपाने प्रसिद्ध व्हावा अशा सूचना केल्या, आग्रह धरला. कित्येक विद्यार्थ्यांनी त्या लेखांचें सामुदायिक वाचन व अभ्यासहि केल्याचें मला कळविलें. यामुळे अशी एक अंधुक आशा मनांत वाटते की, लोकशिक्षणासाठी अवश्य असलेली तरुणांची संघटना भारतांत निर्माण व्हावी हें स्वप्न कदाचित् साकार होईलहि.

लेखक

# अ नु क्र म


| प्रकरणाचें नांव | पृष्ठांक |
|---|---|
| १. सोव्हिएट रशिया व नवचीन यांनी दिलेल्या आव्हानाचें स्वरूप | १ |
| २. अमेरिकन लोकसत्ता आणि दण्डसत्तेचें आव्हान | २७ |
| ३. दण्डसत्तांचें भारताला आव्हान | ६४ |
| ४. भारताचें राष्ट्रीय चारित्र्य | ९६ |
| ५. राष्ट्रीय स्वार्थाची उपासना | १३३ |
| ६. धर्मात् अर्थश्च कामश्च | १६८ |
| ७. भारताचें अध्यात्मनिष्ठ परराष्ट्रकारण | २०० |
| ८. मध्यम मार्ग | २२६ |

# प्रकरण : १

## सोव्हिएट रशिया व नवचीन यांनी दिलेल्या आव्हानाचें स्वरूप

रशियामध्ये दण्डसत्ता स्थापन झाल्याला आता चाळीस वर्षे होऊन गेलीं. अगदी प्रारंभीं साम्यवादाचा म्हणजेच मानवजातीच्या प्रगतीचा एक नवा प्रयोग म्हणून जग तिच्याकडे कुतूहलाने व बऱ्याचशा औत्सुक्याने पाहात होतें. हा नवा प्रयोग चिरडून टाकण्याचा प्रयत्न प्रारंभीं भांडवली राष्ट्रांनी केला होता. तरीसुद्धा त्या संकटाला तोंड देऊन रशियाने मार्गक्रमण केलें म्हणून या भांडवली राष्ट्रांतले कर्तबगार लोकहि त्याचें कांहीसें कौतुक करूं लागले होते. पण पुढे लेनिन मृत्यु पावला व स्टॅलिनच्या हातीं सत्ता गेली, आणि त्यानंतर या साम्यवादाच्या प्रयोगाला जें ओंगळ स्वरूप येऊं लागलें त्याने जगांतील विचारवंतांचीं मनें विटून गेलीं. हा साम्यवादाचा प्रयोग नसून ही एक नवी आसुरी साम्राज्यशाही आहे, झारशाहीपेक्षाहि ती शतपट क्रूर, हिंस्र व हिडीस आहे अशी टीका रशियन शासनावर होऊं लागली. सर्व बाजूंनी त्याची निर्भर्त्सना होऊं लागली. त्याच्यावर निंदेचा भडिमार होऊं लागला आणि हा साम्यवाद म्हणजे जगाची प्रगति नसून हिंस्र, नरभक्षक रानटीपणाचा तो अवतार आहे असें पाश्चात्त्य उदारमतवादी जगाने आपलें मत त्याविषयी नमूद करून ठेविलें.

### स्पुटनिकपूर्वी

पण इतकें झालें तरी सोव्हिएट रशियांत स्थापित झालेल्या या साम्यवादी सत्तेची पाश्चात्त्य राष्ट्रांना अजून भीति वाटली नव्हती. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या बलाढ्य राष्ट्रांना आपल्या प्रबल सत्तांना ही साम्यवादी

सत्ता म्हणजे एक आव्हान आहे असें कधी वाटलें नव्हतें. आव्हानाचा अंतिम अर्थ एकच असतो. लष्करी सामर्थ्यांत आम्ही तुमची चितपट करूं हाच तो अर्थ होय. तेव्हा आपल्यापेक्षा श्रेष्ठ लष्करी सामर्थ्य किंवा निदान तुल्यबल तरी लष्करी सामर्थ्य सोव्हिएट रशिया निर्माण करूं शकेल असें पाश्चात्त्य लोकसत्तांच्या मनांतहि कधी आलें नव्हतें. याचें कारण अगदी उघड होतें. लष्करी सामर्थ्य, युद्धसामर्थ्य याचा अर्थ पूर्वीपेक्षा हल्ली फार निराळा होतो. रणांगणांतील शौर्यधैर्य, कांही लष्करी डावपेच, निष्ठावंत सैनिक एवढें मागे रणांगणांतील विजयांना पुरेसें असे. हल्ली तसें नाही. हल्ली लष्करी सामर्थ्य याचा अर्थ फार व्यापक असा झालेला आहे. सध्या युद्धाला पहिली अवश्य गोष्ट म्हणजे तोफा, विमानें, रणगाडे, अणुबाँब, प्रक्षेपणास्त्रें इ. अगदी अद्ययावत् शस्त्रसंभार आणि त्याने समृद्ध अशी यंत्रचलित सेना; पण हा शस्त्रसंभार सिद्ध करावयाचा म्हणजे राष्ट्राचें प्रचंड प्रमाणांत औद्योगीकरण झालेलें असणें अवश्य असतें. पोलाद, कोळसा, पेट्रोल, वीज, तांबें, रबर इ. अनंत पदार्थ, नाना रसायनें, नाना उपकरणें व हें सर्व निर्माण करणारीं महायंत्रें हे औद्योगीकरणावांचून प्राप्त होणें अशक्य आहे. हे अनंत पदार्थ, हीं रसायनें विज्ञानावांचून, शास्त्रज्ञानावांचून कशीं प्राप्त होणार ? म्हणजे या औद्योगीकरणासाठी रसायन, पदार्थविज्ञान, गणित, भूगोल, खगोल, प्राणिशास्त्र इ. सर्व अर्वाचीन शास्त्रांचें अद्ययावत् ज्ञान असलेले विज्ञानवेत्ते राष्ट्राजवळ असले पाहिजेत. हें विज्ञानबळ सिद्ध व्हायचें तर त्या त्या शास्त्राच्या अध्ययन-अध्यापनाची उत्कृष्ट व्यवस्था असलेलीं, कार्यक्षम विद्यापीठें उभारलीं पाहिजेत. आइन्स्टाइन् किंवा एडवर्ड टेलरसारखा एखादा नामांकित शास्त्रज्ञ शिखरावर यायचा म्हणजे त्याच्या हाताखाली त्या शास्त्राचें ज्ञान असलेले हजारो दुय्यम शास्त्रज्ञ, अध्यापक व विद्यार्थी असणें अवश्य आहे. ते सर्व या विद्यापीठांतून तयार व्हावयाचे असतात. म्हणून विज्ञानाच्या अध्ययनाची उत्तम व्यवस्था युद्धसामर्थ्याला औद्योगीकरणाइतकीच आवश्यक असते. हा झाला प्रत्यक्ष साधनसामग्रीचा विचार. पण या साधनसामग्रीमागे सुसंघटित असें अखिल राष्ट्र उभें पाहिजे. अर्वाचीन युद्ध हें सर्वगामी, सर्वव्यापी युद्ध असतें. राष्ट्रीय प्रपंचाचें एकहि अंग त्यांतून सुटूं शकत नाही. राष्ट्रांतला प्रत्येक नागरिक स्त्रीपुरुष — बाल, तरुण, वृद्ध, सर्व — हा जणू युद्धांतला सैनिक

असतो. तेव्हा राजकीय दृष्टीने प्रबुद्ध व राष्ट्रनिष्ठेने प्रेरित झालेला असा अखिल समाज या साधनसंभाराच्या मागे उभा असला तरच रणांगणांत विजय प्राप्त होण्याची शक्यता असते; आणि तो साधनसंभार व हा प्रबुद्ध समाज यांच्यामागे सर्व क्षेत्रांतले प्रभावी नेते ही अंतिम आवश्यकता असते. तत्त्ववेत्ते, राजकारणी, मुत्सद्दी, रणपंडित, अर्थवेत्ते, इतिहासपंडित, नियोजक, संघटक असे सर्व प्रकारचे; सर्व क्षेत्रांतले कर्ते पुरुष हेच या सर्व सामर्थ्यांचा उत्कृष्ट विनियोग करून राष्ट्राला विजय प्राप्त करून देत असतात. हल्लीच्या युद्धांतलें यश हें इतक्या विविध प्रकारच्या बलावर, या सर्वांगीण संपन्नतेवर अवलंबून असतें. सोव्हिएट रशिया किंवा नवचीन यांसारख्या मानवी व्यक्तित्वाचें निर्दाळण करण्यांतच भूषण मानणाऱ्या, यमदण्डाने राज्य करणाऱ्या, अघोरी, जुलमी सत्तांना हीं विविध बलें, ही सर्वांगीण संपन्नता निर्माण करतां येईल अशी पाश्चात्त्य लोकसत्तांना कल्पना नव्हती. कारण या सर्व संपन्नतेचें मूळ कारण व्यक्तिस्वातंत्र्य हें आहे; सर्व बंधनांतून मुक्त होऊन वाटेल त्या विषयांत अनिर्बंधपणें संचार करणाऱ्या मनालाच सृष्टीचीं गूढें उकलतात, अशी अकुंठित बुद्धिच विज्ञानरहस्य आकळूं शकते असा त्यांचा बुद्धिनिश्चय होता; आणि तें व्यक्तिस्वातंत्र्य सोव्हिएट रशियांत केवळ अभावानेच असल्यामुळे वर सांगितलेलीं षडंग बलें तेथे निर्माण होऊं शकतील असें कोणालाच वाटत नव्हतें.

दुसऱ्या महायुद्धांत सोव्हिएट रशियाचा जय झाला तरी वरील मतांत फारसा बदल करण्याचें कारण नाही असेंच पश्चिमेचें मत कायम होतें. एक तर ज्या जर्मनीवर रशियाने विजय मिळविला तो अनेक राष्ट्रांशीं एकदम लढत होता. तेव्हा त्याचा पराभव झाला यांत कसलेंच नवल नव्हतें. उलट त्याने इतकीं वर्षें जगाची दमछाट केली हीच नवलाची गोष्ट होती. आणि दुसरें म्हणजे सोव्हिएट रशियाला विजय मिळाला तो पाश्चात्त्य राष्ट्रांनी त्याला जें अपरिमित साह्य केलें त्यामुळे मिळाला हें जगजाहीर होतें. अफाट शस्त्रसामग्री, विमानें, तोफा, रणगाडे, त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रांतले शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ अमेरिकेने रशियाला पुरविले होते. आपल्या घरचें कुबेराचें भांडार खुलें करून अन्नधान्य, कपडालत्ता, वैद्यकीय उपकरणें, औषधें इ. अनेक प्रकारचें साहित्य अमेरिकेने रशियाकडून लुटविलें होतें. त्यामुळे

जर्मनीवर त्याने विजय मिळविला हें त्याच्या सामर्थ्याचें द्योतक असें केव्हाच मानणें शक्य नव्हतें आणि म्हणूनच ही दण्डसत्ता म्हणजे आपल्या लोकसत्तेला एक आव्हान आहे, तिच्याविषयी आपण चिंता बाळगली पाहिजे असें पश्चिमेकडच्या भांडवली राष्ट्रांना कधीच वाटलें नाही. जर्मनीविषयी जो धसका त्यांच्या मनांत त्या काळांत होता, जी भीति होती आणि त्या राष्ट्रांतील मुत्सद्द्यांच्या भाषणांतून हिटलरच्या अंमलाखालीं जर्मनीच्या लष्करी बळाचा होत चाललेला विकास पाहून जी चिंता त्या वेळीं व्यक्त होत असे तशा तऱ्हेची चिंता रशियाविषयी त्यांना कधी वाटली नव्हती. जर्मनी हा जरी दण्डांकित होता तरी आधीच्या शंभर वर्षांत तेथे हिटलर-सारखी सर्वगामी दण्डसत्ता नव्हती. एक राजकरण सोडलें तर इतर क्षेत्रांत तेथे व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य होतें. त्यामुळे तेथे अद्ययावत् शस्त्रास्त्रें, औद्योगी-करण, शास्त्रज्ञान, शिक्षण, संघटित समाज व कर्तें नेतृत्व हें पडंग बल सुसज्ज होणें सहज शक्य आहे हें पाश्चात्त्य लोकसत्तांना दिसत होतें; पण तसा संभव सोव्हिएट रशियांत नसल्यामुळे त्या त्याच्याविषयी निश्चिंत होत्या.

## आव्हान

१९५० नंतर पाश्चात्त्य राष्ट्रांच्या या मताला हळूहळू धक्का बसूं लागला; आणि १९५७ सालीं रशियाने आकाशांत बालचंद्र सोडण्यांत यश मिळविलें तेव्हा मात्र पाश्चात्त्य देश खडबडून जागे झाले, व सोव्हिएट रशिया व नवोदित चीन या सत्तांची दखल आपण घेतली पाहिजे, या सत्ता म्हणजे जगांतल्या लोकशाहीवर मोठें संकट आहे, यांची आपण उपेक्षा केली तर हळूहळू साम्यवादी तत्त्वज्ञान व तज्जन्य रानटी संस्कृति ही जगभर पसरेल व समता, बंधुता, स्वातंत्र्य या थोर तत्त्वांचा जगांतून लोप होईल हा विचार, ही चिंता लोकसत्तांच्या मनांत बळावूं लागली. आज त्या देशांतील कर्त्या पुरुषांच्या ध्यानीं मनीं स्वप्नीं हा एकच विचार घुमत राहिलेला आपणांस दिसतो. या देशांतील विचारवंत, शास्त्रज्ञ, मुत्सद्दी, तत्त्ववेत्ते यांचे लेख, त्यांचीं भाषणें, त्यांचे उद्योग हें पाहिलें तर या चिंतेची कृष्णछाया पाश्चात्त्य जीवनावर पडून तें झाकोळून गेलें आहे हें पदोपदीं प्रत्ययास येतें.

आज अमेरिका सर्व दृष्टींनी अत्यंत संपन्न व म्हणूनच अत्यंत बलाढ्य असें राष्ट्र आहे. तेथील धनपति, उद्योगपति, कारखानदार, तेथील शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, ग्रंथकार, इतिहासकार, तेथील राजकारणी, मुत्सद्दी, सेनानी, प्रशासक, संघटक हे जगांत निस्तुळ असे आहेत. त्यांनी विद्या, शास्त्र, कला, धन, पराक्रम, त्याग, धैर्य यांच्या थोर परंपरा निर्माण करून स्वदेशाचें सामर्थ्य इतकें वाढविलें आहे की, त्याला जगांत तुलना नाही. अशा या राष्ट्राला सोव्हिएट रशियासारख्या चाळीस वर्षांपूर्वी अत्यंत दरिद्री, अप्रगत असलेल्या, सुलतानी सत्तेखाली भरडलेल्या, अर्धरानटी अशा देशाच्या आक्रमणाची चिंता वाटावी याचा अर्थ काय ? हाच अर्थ आपल्याला येथे पाहावयाचा आहे आणि त्याची मीमांसा करावयाची आहे. या मीमांसेला फार महत्त्व आहे. रशियाच्या दण्डसत्तेने केवळ अमेरिकेला किंवा पाश्चात्त्य राष्ट्रांना आव्हान दिलें आहे असें नाही. तें आव्हान सर्व लोकसत्तांना आहे. आपण भारतांत लोकसत्ता प्रस्थापित केलेली आहे. ती यशस्वी व्हावी अशी आपली मनीषा आहे. तेव्हा त्या आंव्हानाचा आपण विचार केलाच पाहिजे. त्या दृष्टीने या अभ्यासाला फार महत्त्व आहे. पण त्या आधी सोव्हिएट रशियाच्या या आव्हानाचें स्वरूप काय आहे, त्याचा अर्थ काय, त्याच्यामागे कोणतें सामर्थ्य आहे याचा विचार करणें अवश्य आहे. म्हणून तें विवेचन प्रथम करूं.

सोव्हिएट रशियांतील आजची सत्ता ही रानटी आहे, क्रूर आहे, मानवता, सौजन्य, सहृदयता, समता, बंधुता, व्यक्तिस्वातंत्र्य या सुसंस्कृत मूल्यांचा तिला स्पर्शहि झालेला नाही अशी टीका नित्य केली जाते. त्या टीकेला अर्थ आहे यांत शंका नाही. तरी पण हा रानटीपणा कोणत्या स्वरूपाचा आहे याचा शोध आपण घेतला पाहिजे. नाहीतर आपली फसगत होईल. अॅटिल्ला, अलेरिक, तयमूर, चंगीझ हे कत्तलखान इतिहासांत प्रसिद्ध आहेत. स्टॅलिन व माओ यांनी त्यांच्यासारख्याच नरहत्या केल्या आहेत. कदाचित् त्या हिंस्र सुलतानांपेक्षा दसपट हत्या यांनी केल्या असतील; पण या हत्या त्यांनी कोणत्या हेतूने केल्या आणि कोणत्या सामर्थ्याने केल्या हें पाहिलें पाहिजे. तयमूर, चंगीझ, यांच्याप्रमाणे स्टॅलिन, माओ यांचें सामर्थ्य आडदांड व रानटी असतें तर अमेरिकेने त्याचा निमिषार्धांत धुरळा करून टाकला असता. नव्या विज्ञानाने संपन्न असलेल्या देशांचें लष्करी सामर्थ्य व त्यांची संहारशक्ति

एवढी प्रचंड आहे की, वरील सर्व कत्तलखान व त्यांचे अफाट सेनासागर एकत्र होऊन जरी अंगावर कोळसले तरी नव्यापैकी कोणताहि देश त्यांचा सहज निःपात करूं शकेल. पण सोव्हिएट रशिया वा नवचीन यांचें सामर्थ्य तशा प्रकारचें नाही. त्यांनी नव्या मूल्यांची उपासना केली नसली तरी नव्या शक्तीची उपासना निश्चित केली आहे; आणि म्हणूनच जगाला त्यांची भीति वाटत आहे.

## औद्योगीकरण

' रशिया इतका बलशाली कसा झाला ' या लेखांत जोसेफ व स्टीवर्ट ॲलसॉप या अमेरिकन लेखकांनी रशियाच्या वाढत्या सामर्थ्याचें वर्णन केलें आहे. त्यांनी असें दाखवून दिलें आहे की, गेलीं चाळीस वर्षे रशियाने आपलें सर्व बळ औद्योगीकरणावरच खर्च केलें आहे. अन्नधान्य, कपडालत्ता, घरें, पादत्राणें, वाहनें इ. समाजाच्या जीवनाला आवश्यक असें जें धन त्याची वाढ करण्याकडे रशियाने संपूर्ण दुर्लक्ष केलें आणि पोलाद, पेट्रोल, कोळसा, वीज, अणुशक्ति, विमानें, तोफा, बाँब, रणगाडे हें जें औद्योगिक व लष्करी धन त्याची वाढ करावयाची असा कृतनिश्चय त्याने केला आणि अजूनहि त्याचें तेंच धोरण चालू आहे. सुधारलेल्या देशाचें सर्व सामर्थ्य औद्योगीकरणांत आहे. युद्धाला लागणारें सर्व धन, शस्त्रास्त्रें, अवजारें आणि सर्व प्रकारचें साहित्य औद्योगीकरणांतूनच निर्माण होतें हें जाणून तो एक ध्यास रशियन सत्ताधाऱ्यांनी घेतला आणि त्यासाठी लोकशाही मूल्यांचा, मानवी मूल्यांचा, पूर्ण बळी द्यावा लागला तरी द्यावयाचा असा निर्धार त्यांनी केला; व यमाच्याहिपेक्षा जास्त निर्दयपणा करून तो अंमलांत आणला. रशियन जनता अत्यंत दरिद्री असतांना रशियाला औद्योगिक प्रगति कशी करतां आली असें कोणी विचारतात. त्यावर ॲलसॉप म्हणतात की, रशियन जनता दारिद्र्यांत आहे म्हणूनच रशियाला ही प्रगति करतां आली. कामगारांना पुरेसें अन्नवस्त्र आहे की नाहीं, राहायला जागा आहे की नाहीं, याचा विचारहि तेथील सत्ताधीश करीत नाहीत. त्यामुळे इतर देशांत निर्माण होणारा प्रचंड भांडवलाचा प्रश्न तेथे निर्माण होतच नाहीं. मजुरी तेथे अत्यंत स्वस्त आहे. अन्नवस्त्र आहे आहे, नाहीं नाहीं,

अशी कामगारांची प्रारंभीं स्थिति होती. त्या वेळीं परदेशी भांडवल आणणें अवश्य होतें, पण त्यासाठी ऐनजिनसी माल परदेशीं पाठवावा लागे. तो माल सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांपासून बंदुकीच्या धाकाने लुटून घेतला. अन्नधान्य, लोणी, कोंबड्या, डुकरें यांनी भरलेल्या गाड्या परदेशाला जात आहेत व सभोवतालच्या परिसरांत हजारो शेतकरी अन्नान्न करीत मरत आहेत असें त्या वेळीं नेहमीचें दृश्य होतें (मॉरिस हिंडस 'मदर रशिया'). आज यांत थोडा तरी बदल झाला आहे, पण जेमतेम अन्नवस्त्रापलीकडे कामगारांना तेथे जास्त कांहीच मिळत नाही. जास्त सुखसोयीसाठी ते संप करतील तर तेंहि शक्य नाही. संप म्हणजे जनताद्रोह! तो सर्वांत मोठा गुन्हा. त्याला देहान्त शिक्षा; त्यामुळे इतर राष्ट्रांत नित्य संपामुळें उत्पादनांत घट होते ती रशियांत होत नाही. कामगाराला एका कारखान्यांतून दुसरीकडे जाण्याचा किंवा नोकरीचा राजीनामा देण्याचाहि हक्क नाही. तसें त्याने केल्यास तो जगांतून नाहीसा होईल. असें सर्व बाजूंनी कराल नियंत्रण ठेवून सोव्हिएट रशियाने गेलीं चाळीस वर्षें चोवीस तास यंत्रें चालवून व कामगार राबवून लष्करी धन निर्माण केलें आणि त्यामुळेच त्याची संहार-शक्ति फार मोठ्या प्रमाणांत वाढली आहे. रशियांत १९२८ सालीं जें पोलाद निघत असे त्याच्या दसपट आज निघतें. कोळसाहि दहापट निघतो. पेट्रोल ५ पट व वीज २४ पट निघते. उलट कापड, पादत्राणें हें जीवनधन दुप्पट व चौपट इतकेंच वाढलें आहे. १९५७ सालीं ६ नोव्हेंबरला क्रुश्चेव्ह याने सुप्रीम सोव्हिएटपुढे केलेल्या भाषणांत पुढील १५ वर्षांतील उत्पादनाचा अंदाज सांगितला आहे. त्यांतहि जीवनधनाची वाढ अल्प असून औद्योगिक धनाच्या वाढीवरच सर्व भर दिलेला स्पष्ट दिसतो. या औद्योगिक धनाच्या बाबतींत अमेरिकेला मागे टाकण्याची रशियाची महत्त्वाकांक्षा आहे. हें कितपत शक्य होईल याविषयी शंका आहे. पण आजचा रशियाचा वेग अमेरिकेपेक्षा तिपटीने जास्त आहे हें अमेरिकन लेखकांना मान्य आहे. १९५०-१९५५ या पांच वर्षांत अमेरिकेचें औद्योगिक उत्पादन शे. २५ वाढलें, तर रशियाचें शे. ७० वाढलें आहे. ब्रिटनच्या 'आयर्न अँड स्टील बोर्डा'चे एक सभासद रॉबर्ट शोन यांनी रशियाला जाऊन तेथील पोलाद कार-खान्यांची पाहणी केली व ब्रिटिश कारखान्यांपेक्षा सोव्हिएट कारखान्यांची

कार्यक्षमता जास्त आहे असें मत दिलें. त्याचप्रमाणे या बाबतींत ब्रिटिशांशीं स्पर्धा करून सोव्हिएट सरकार ब्रिटिशांपेक्षा स्वस्त भावांत पोलाद निर्यात करूं शकेल हेंहि त्यांनी मान्य केलें, याचें कारण म्हणजे ब्रिटनपेक्षा सोव्हिएट मजुरीचे दर फार स्वस्त आहेत हें होय. नेव्हिन बीन या अमेरिकन इंजिनियरानेहि सोव्हिएट कारखानदारीविषयी असेंच मत दिलें आहे, आणि म्हणून त्याचा आपण गंभीरपणें विचार केला पाहिजे असें स्वबांधवांना सांगितलें आहे.

ही सर्व माहिती देऊन लेखक श्री. अॅलसॉप म्हणतात की, सोव्हिएट रशियाची ही प्रगति नैतिक दृष्टीने अगदी हिडीस अशी आहे. व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिसुख या दृष्टीने आपण उद्योग करतों तर लष्करी बळाची वाढ हें एकच उद्दिष्ट रशियापुढे आहे. अमेरिकेचें भांडवल बव्हंशीं जीवनोपयोगी वस्तूंवर, सुखसोयींच्या वस्तूंवर खर्च होतें, तर रशियाचें भांडवल बव्हंशीं औद्योगिक व लष्करी उत्पादनावर खर्च होतें. पण नैतिक-अनैतिक हा प्रश्न बाजूला ठेवून त्यांतील कठोर सत्याला तोंड देण्याची सिद्धता आपण केली पाहिजे असें त्यांनी शेवटीं बजावलें आहे (रीडर्स डायजेस्ट–सप्टें. १९५६).

## विज्ञान – शिक्षण

औद्योगिक धन व लष्करी साहित्य याच्या निर्मितीसाठी शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, इंजिनिअर, यांची किती गरज असते हें सांगण्याची आवश्यकता नाही. आरंभीं रशियाला परकी तज्ज्ञांच्या साहाय्यावर अवलंबून राहावें लागत असे. पण तेव्हापासूनच सर्व जगामध्ये आपलें युद्धसामर्थ्य श्रेष्ठ ठरलें पाहिजे हें उद्दिष्ट रशियन प्रशासकांच्या डोळ्यांपुढे होतें, आणि त्या दृष्टीने त्यांनी रशियन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची योजना आखली होती.

जॉन गुंथूर यानी रशियांतील शास्त्रीय शिक्षणाविषयी आपल्या ग्रंथांत ('इन्साइड् रशिया टुडे') सविस्तर माहिती दिली आहे. ती देतांना त्यांनी रशियांतील शिक्षण म्हणजे पश्चिमेला एक आव्हानच आहे असें म्हटलें आहे. सध्या या विषयावर लिहिणारे बहुतेक सर्व पाश्चात्य लेखक विल्यम लॉरेन्स, जेम्स मिचेनेर, अलेक्झँडर, सेव्हरस्की, पॉल पामर – आव्हान, रशियाचें पश्चिमेला आव्हान, – हीच भाषा वापरतात. कारण लष्करी

सामर्थ्याची वाढ, संहारशक्तीचें वर्धन हेंच उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून सोव्हिएट रशियाने शिक्षणाची योजना आखली आहे. 'सायन्स अँड टेक्नॉलजी इन् मॉडर्न वॉरफेअर' या आपल्या ग्रंथांत पोक्राव्हस्की याने म्हटलें आहे की, 'अर्वाचीन युद्धशास्त्राचा विज्ञान हा पाया आहे. निसर्गशास्त्रें व समाजशास्त्रें यांच्या ज्ञानानेच भावी युद्धाची तरतूद करतां येईल.' आणि या दृष्टीनेच रशियांतील तरुणांना शिक्षण दिलें जातें. तेथे शाळा-कॉलेजांतून जास्त भर शास्त्रीय विषयांवर व तंत्रविद्येवर असतो. शे. ६५ टक्के विद्यार्थी शास्त्र-शाखेकडे जातात. शालेय अभ्यासक्रमांत १० वर्षे गणित, ४ वर्षे रसायन, ५ वर्षे पदार्थविज्ञान व ६ वर्षे जीवनशास्त्र यांचा अभ्यास विद्यार्थ्यांना करावा लागतो. शाळा २१३ दिवस भरतात. आठवड्यांतून ६ दिवस रोज सहा तास शाळा असते. शेवटचीं चार वर्षे शाळेशिवाय घरीं रोज ४ तास अभ्यास करावा लागतो. १९५८ सालच्या हिशेबाप्रमाणे रशियांत ७६७ उच्च शिक्षणसंस्था आहेत व त्यांत वीस लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यांतील १९३ संस्था इंजिनिअर तयार करतात. तेथे या विषयाच्या भिन्न भिन्न २०० शाखांचें अध्यापन केलें जातें. १९५० सालापर्यंत दरसाल ३६००० इंजिनिअर तयार होत. १९५७ सालीं ७७००० इंजिनियर तयार झाले. यांशिवाय लष्करी विद्यालयांतून तयार झालेले इंजिनियर ते निराळेच. एका मास्को विद्यापीठाच्या वर्णनावरून तेथील शिक्षणाविषयी आपल्याला कल्पना येऊं शकेल. ३६० कोटी रुपये खर्च करून हें विद्यापीठ १९५३ सालीं बांधण्यांत आलें. त्यांत १६००० विद्यार्थी आहेत. त्यांपैकी निम्म्या विद्यार्थिनी आहेत. विद्यापीठांत १७०० प्रयोगशाळा आहेत. १५००० वर्ग आहेत. २४०० प्राध्यापक आहेत. अभ्यासक्रम पांच वर्षांचा असून सायन्स विभागाकडे शे. ६५ विद्यार्थी असतात. पण त्यांनाहि अर्थशास्त्र व तत्त्वज्ञान हे विषय घ्यावे लागतात.

रशियांत सर्व शिक्षण मोफत आहे. शिवाय कॉलेजमधील विद्यार्थ्यांना दरमहा ३६० ते ६०० रु. पर्यंत शिष्यवृत्ति मिळते. आता प्रत्येक विद्यार्थ्याने दोन वर्षे कारखान्यांत काम केल्यावांचून त्याला पदवी मिळावयाची नाही असा नवा नियम झाला आहे. विद्यार्थी पोषाखी होत आहेत, शरीरश्रमाचा कंटाळा करीत आहेत अशी शंका आल्यामुळे अधिकाऱ्यांनी हा नियम केला

आहे. अशा या कॉलेजांतून प्रवेश मिळणें ही रशियांत महद्भाग्याची गोष्ट समजली जाते. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या जीवनाची सर्व कक्षाच बदलून जाते. समाजाच्या वरच्या श्रेणींत त्यांना निश्चित स्थान मिळतें. त्यांचें भवितव्य उज्ज्वल होऊन जातें. त्यामुळे घरांतील मुलांना विद्यापीठांत प्रवेश मिळाल्याचें कळतांच त्या घरांत मोठा आनंदोत्सव होतो.

रशियामध्ये निरक्षरता जवळजवळ नष्ट झालेली आहे. आज तेथे एकंदर दोन लक्ष तेरा हजार शाळा असून एकंदर आठ भाषांत शिक्षण चालतें. ताझिकिस्तानमध्ये १९१९ सालीं सात शाळा असून विद्यार्थी १२४ होते. आज तेथे २५०० शाळा व साडेतीन लक्ष विद्यार्थी आहेत. उझबेकिस्तानमध्ये ४० वर्षांपूर्वी शे. २ लोक साक्षर होते. आज तेथील पदवीधरांचें प्रमाण फ्रान्सच्या दुप्पट आहे.

ही सर्व माहिती देऊन जॉन गुंथूर यांनी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. ते म्हणतात, 'या सर्व शिक्षणाचा उपयोग काय ? हे विद्यार्थी म्हणजे केवळ आज्ञाधारक यंत्रेंच नव्हत काय ? त्यांच्या विषयाबाहेर विद्यार्थ्यांना कसलेंहि ज्ञान नसतें. तें मिळविण्याची त्यांना परवानगीच नाहीं. बाह्य जगाची अत्यंत विपर्यस्त व असत्य माहिती त्यांना पुरविली जाते. ती त्यांना निमूटपणें स्वीकारावी लागते. विरोध करण्याचा, स्वतंत्र विचार करण्याचा प्राथमिक हक्कहि त्यांना नाही. मग या शिक्षणाचा उपयोग काय,' असा प्रश्न उद्भवतो. तो प्रश्न मांडून गुंथूर यांनीच त्याचें उत्तर दिलें आहे. ते म्हणतात की 'एवढयामुळे सोव्हिएट रशियांतील शिक्षणाचें महत्त्व कमी लेखणें युक्त नाही. आज विज्ञानाचें शिक्षण घेतलेला एक मोठा वर्ग तयार होत आहे. शास्त्रीय रीतीने विचार करण्याचें शिक्षण त्याला दिलें जात आहे. हा वर्ग पुढील काळीं स्वतंत्र विचारशक्ति प्राप्त करून घेईल यांत शंका नाही. वेंडेल विल्की यांची स्टॅलिनशीं मुलाखत झाली त्या वेळीं स्टॅलिनने त्यांना रशियांतील शिक्षणाची माहिती दिली. त्या वेळी विल्की म्हणाले, "स्टॅलिनसाहेब, जरा जपूनच असा. या शिक्षणप्रसारामुळेच एखादे दिवशीं आपण पदच्युत होण्याचा संभव आहे." पंडित जवाहरलाल नेहरू यांनीसुद्धा सोव्हिएट शिक्षणपद्धतीला फार मोठें प्रशस्तिपत्र दिलें आहे. जगांतील सर्वोत्कृष्ट पद्धत असा तिचा गौरव

त्यांनी केला आहे. या पद्धतींत व्यक्तित्व मुरगळून टाकलें जातें हें त्यांना मान्य आहे; पण शिक्षणाचा प्रसार ही एक शृंखलाछेदक शक्ति आहे आणि अंतीं ती व्यक्तित्वावरचीं बंधनें नष्ट केल्याखेरीज राहणार नाही असा अभिप्राय त्यांनी प्रकट केला आहे. (टाइम्स २५-८-५८).

## अमेरिकेचा पराभव

भविष्यकाळीं काय होईल हें सांगणें कठीण म्हणून सोडून दिलें तरी आजचें रशियाचें सामर्थ्य कशांत आहे याचा अवगम वरील माहितीवरून आपणांस निश्चित होईल. औद्योगीकरण आणि शास्त्रीय ज्ञान हेंच त्याच्या सामर्थ्याचें रहस्य आहे. म्हणजे पाश्चात्त्य जगाने सामर्थ्यासाठी ज्या देवतांची उपासना केली त्यांचीच रशियाने केली आहे. तो रानटी असला तरी तो या क्षेत्रांत नव्हे. या क्षेत्रांत त्याने अगदी अद्ययावत् शास्त्रीय ज्ञानांत पाश्चात्त्यांची बरोबरी केली आहे इतकेंच नव्हे, तर त्यांच्यावर मात केली आहे हें त्याच्या यशस्वी स्पुटनिक-भ्रमणावरून दिसून येईल. अमेरिकन पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ, हैड्रोजन बाँबचा जनक एडवर्ड टेलर याने, रशियाने आकाशांत बालचंद्र सोडल्यानंतर असे उद्‌गार काढले की, " विज्ञानक्षेत्रांत रशियाने अमेरिकेचा केलेला पराभव पर्ल हार्बरपेक्षाहि जास्त घातक आहे, आणि अमेरिकेला सोव्हिएट रशियाची बरोबरी करावयास किती काळ लागेल हें सांगणें कठीण आहे." १९५७ च्या डिसेंबरांत नाटोची जी परिषद् झाली तीमध्ये लोकांच्या मनांत हीच चिंता व्यक्त झाली. हरप्रयत्न करून या बाबतींत आपण अंतर काटलें पाहिजे असा ठराव त्या वेळीं परिषदेने संमत केला.

## विज्ञान परपुष्ट नाही

सोव्हिएट शास्त्रज्ञांनी पाश्चात्त्य व विशेषतः अमेरिकन शास्त्रज्ञांवर मात केली हें पाहून व्यक्तिस्वातंत्र्यवादी लोकायत्त पाश्चात्त्य समाजाला धक्काच बसला. शास्त्राची प्रगति लोकसत्ताक समाजांतच होते, जेथे स्वतंत्र चिंतनाला अवसर नाही, जेथे व्यक्तित्व मारलें जातें तेथे विज्ञानांतील गूढ सत्याचें संशोधन होणें शक्य नाही असा त्यांचा बुद्धिनिश्चय होता. तो सोव्हिएट

रशियाच्या या प्रगतीमुळे डळमळूं लागला. त्या वेळीं पाश्चात्त्य जगांतील पंडितांनी याविषयीच्या निरनिराळ्या उपपत्ति मांडल्या; त्यांतली प्रमुख अशी की, जर्मनीचा पराभव झाल्यानंतर रशियाला जर्मनींत जर्मन शास्त्रज्ञांचे संशोधनाचे सर्व कागदपत्र सापडले; ते त्याने पळविले आणि त्या बरोबरच अनेक नामांकित जर्मन शास्त्रज्ञांनाहि त्याने पळवून नेलें; रशियाने विज्ञानक्षेत्रांत जी प्रगति केली तिचें श्रेय अशा रीतीने जर्मन शास्त्रज्ञांना आहे, सोव्हिएट शास्त्रज्ञांना नाही. हा समज अत्यंत भ्रामक व हास्यास्पद असा आहे. समाजाची पातळी उंचावलेली नसतांना, विज्ञानाचें वातावरण निर्माण झालें नसतांना, असे उसने शास्त्रज्ञ आणून एवढी अभूतपूर्व प्रगति एखाद्या देशाला करतां येईल हें सर्वथा अशक्य आहे. याविषयी निकोलाय गॉले या लेखकाने फार चांगलें विवेचन करून या भ्रमाचा निरास केला आहे. [ 'इन्स्टिटयूट फॉर दि स्टडी ऑफ दि यू. एस्. एस्. आर.' या नांवाची म्यूनिच (जर्मनी) येथे एक संस्था आहे. सोव्हिएट रशियांतून निर्वासित झालेले शास्त्रज्ञ व पंडित यांनी ही स्थापिली आहे. कोणीहि निर्वासित तिचा सभासद होऊं शकतो. मात्र तो कम्युनिस्ट वा कम्युनिस्ट-मित्र असतां कामा नये असा संस्थेचा नियम आहे. सोव्हिएट रशियाचा सर्वांगीण अभ्यास हेंच तिचें उद्दिष्ट असून दरमहा ती सुमारें ४८ पानांची एक पुस्तिका प्रसिद्ध करते. या पुस्तिकांतून येथे बरीच माहिती घेतलेली आहे. ] 'लोकायत्त समाज व दण्डायत्त समाज यांतील विज्ञानाची प्रगति' हा निकोलाय गॉले याचा लेख नोव्हेंबर १९५७ च्या पुस्तिकेंत आहे. गॉले म्हणतो की, 'जर्मन शास्त्रज्ञांचे संशोधनाचे कागद रशियाने नेले हें खरें. पण एवढ्यावरून स्पुटनिकचें, रॉकेटचें व नव्या लांब पल्ल्याच्या अस्त्रांचें श्रेय जर्मनांना देतां येईल असें नाही. तसें म्हटलें तर जर्मन शास्त्रज्ञ अमेरिकेंतहि गेले आहेत, आणि अमेरिकेंत गेलेले ब्राऊन, बर्जर व डॉ. ले हेच या शास्त्रांतले प्रमुख संशोधक होते. रशियांत गेले ते यांचे दुय्यम लोक होत. दुसरी गोष्ट अशी की, या विषयांचें संशोधन रशियांत १९१७ पूर्वीच झारशाहींत चालू झालें असून पहिल्या महायुद्धांत जर्मनांनी मेशखेरस्की, चॅपलिगीन व झिऑलव्होस्की या रशियन शास्त्रज्ञांचे सिद्धान्तच वापरले होते. रशियाची या बाबतींतली क्रान्तीपूर्वीची परंपरा मोठी

उज्ज्वल आहे. १९१२ सालीं जर्मनींतील क्रुप कारखान्याचा शतवर्षाचा उत्सव झाला. त्या वेळीं काढलेल्या स्मारक ग्रंथांत 'रशियन तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालीच क्रुपच्या शास्त्रज्ञांनी संशोधन केलें' असें म्हणून रशियाचें ऋण मान्य केलेलें आहे. क्रान्तीनंतर रशियनांनी या बाबतींत अखंड परिश्रम करून संशोधन चालू ठेवलें होतें. १९४६ सालीं 'अॅकॅडमी ऑफ आर्टिल्लरी सायन्सेस' स्थापन झाली. तेथील संशोधक प्रोफेसर ब्लागोन्रॉव्हॅव्ह व टिखोन् रॉव्हॅव्ह यांना या प्रगतीचें बव्हंशीं श्रेय आहे. हेरगिरीने मिळविलेलें, किंवा परकी शास्त्रज्ञांनी आणलेलें ज्ञान एखाद्या राष्ट्राला विज्ञानशास्त्रांत अग्रेसरत्व प्राप्त करून देईल हें खरें नाही. इतर अनेक शास्त्रज्ञांनीहि हेंच मत दिलें आहे. सोव्हिएट रशियाची वैज्ञानिक प्रगति ही रशियन शास्त्रज्ञांनीच घडविलेली आहे. उसन्या आणलेल्या परक्या शास्त्रज्ञांना तिचें श्रेय देतां येत नाही हें त्यांना मान्य आहे, आणि तसें आहे म्हणूनच त्यांना रशियाच्या आक्रमक लष्करी सामर्थ्याविषयी अहोरात्र चिंता वाटत आहे.

अर्वाचीन लष्करी सामर्थ्याच्या अभिवृद्धीला लागणारें जें षडंग बल तें सोव्हिएट रशिया, चीन इत्यादि दण्डसत्तांनी कसें प्राप्त करून घेतलें याचा विचार आपण करीत आहों. अत्यंत बलाढ्य अशा पाश्चात्त्य लोकसत्तांना त्यांच्या आक्रमणाची भीति वाटावी असें युद्धसामर्थ्य या दण्डसत्तांनी जोपासलेलें आहे. तें त्यांनी कसें जोपासलें हें पाहणें भारताच्या दृष्टीनेहि महत्त्वाचें आहे. कारण आपल्यालाहि त्या आक्रमणाची सदैव भीति आहे. षड्विध बलसाधनापैकी शस्त्रास्त्रें, औद्योगीकरण, शिक्षण व शास्त्रज्ञान यांचा विचार आपण केला. आता त्यांनी समाजसंघटना कशी केली याचा विचार करावयाचा आहे. वर सांगितलेल्या चतुरंग बलामागे संघटित असें राष्ट्र नसेल तर त्याचा कांही उपयोग नाही. उलट भस्मासुरासारखें तें बल स्वसमाजाच्या नाशाला कारण होतें हें अनेक देशांच्या उदाहरणांवरून दिसून येतें. राष्ट्रांत यादवी माजली, समाज दुभंगला, त्याच्या अनेक चिरफळ्या झाल्या की, वरील जड शस्त्रास्त्रें त्याचा किती संहार करतील तें सांगावयास पाहिजे असें नाही. पण या दण्डसत्तांनी अगदी दुर्भेद्य अशा संघटना निर्माण करून ही आपत्ति टाळण्यांत मोठें यश मिळविलें आहे.

## राष्ट्रसंघटना

रशिया किंवा चीन या देशांत अखिल राष्ट्र संघटित करण्यांत नेत्यांना एवढें अभूतपूर्व यश यावें हा सकृद्दर्शनी मोठा चमत्कार वाटतो. आता क्रान्ति होऊन चाळीस वर्षें झालीं. पण सोव्हिएट रशियाच्या संघटनेला तडा सुद्धा गेलेला नाही. या अवधींत संघटना भंगावी, दुफळी होऊन दौर्बल्य निर्माण व्हावें, मध्यवर्ती शासन दुबळें होऊन अराजक माजावें, असे अनेक प्रकार घडले आहेत. स्टॅलिनने आपल्या सर्व सहकाऱ्यांना, लेनिनच्या वेळीं कर्तबगार ठरलेल्या प्रभावी नेत्यांना, वाटेल ते आरोप ठेवून गोळ्या घातल्या आहेत. मध्यंतरीं जें शुद्धीकरण झालें त्यांत सैन्यांतल्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांनाहि त्याने परलोकाची वाट दाखविली आहे. सामुदायिक शेतीच्या प्रयोगांत त्याने लक्षावधि शेतकऱ्यांच्या रक्ताचे पाट वाहविले आहेत; आणि दशलक्षावधि कामगार-शेतकऱ्यांना सैबेरियांतील यमपुरींत धाडून दिलें आहे. सुशिक्षित विद्याजीवी वर्गाशीं तर त्याचा उभा दावा. योजनांच्या प्रारंभींच्या काळांत हजारो मध्यमवर्गीय सुशिक्षितांची त्याने हत्या केली. त्यांचीं कुटुंबेंच्या कुटुंबें उद्ध्वस्त करून टाकलीं. त्याने डॉक्टर म्हटला नाही, वकील म्हटला नाही, लेखक नाही, कवि नाही. त्याची मर्जी फिरली की ह्यांची घटका भरलीच. असें असूनहि या चाळीस वर्षांत सोव्हिएट राज्यांत कोठें म्हणण्यासारख्या बंडाळ्या झाल्या नाहीत. यादवीचा तर भासहि निर्माण झाला नाही. हा खरोखर फार मोठा चमत्कार आहे. सैन्याच्या बळावर, यमदण्डाच्या जोरावर, त्याने संघटना टिकविली या म्हणण्यांत फारसा अर्थ नाही. कारण यादवी माजते ती बहुधा सैन्यांतल्या अधिकाऱ्यांतच माजते. इतर विरोधकांना त्याने देहदण्ड वा त्याची दहशत घालून नष्ट केलें हें समजू शकतें. पण ज्या लष्कराच्या बळावर या विरोधकांचें निर्दाळण करावयाचें त्या लष्करांत दोन पक्ष झाल्यावर यादवी अटळ होऊन बसते. अफगाणिस्तान, इराण, इराक, सिरिया यांचे इतिहास आपल्या डोळ्यांपुढे ताजेच आहेत. तेथे दर ठिकाणीं बंड झालें तें सैन्यांत झालें, आणि त्यांतूनच यादवी निर्माण झाली. सैन्यांतले कर्ते अधिकारीच विरुद्ध गेले, त्यांच्यांत दुफळी झाली की, स्टॅलिनचें तरी काय चालणार? दोन

पक्षांपैकी अंतीं विजय कोणाचाहि झाला तरी यादवी माजून देशाचें बळ खच्ची होणार यांत शंकाच नाही. आणि हीच दुफळी वाढत गेली की, शेवटीं अराजक माजून देश परकीय आक्रमकांच्या भक्ष्यस्थानीं पडतो. पण तसें कांहीहि रशियांत घडलें नाही. वास्तविक क्रान्तीनंतर भांडवली देशांनी रशियावर जें आक्रमण केलें त्यापासून राष्ट्राचें रक्षण करण्यासाठी ज्या सेना कम्युनिस्टांना उभाराव्या लागल्या त्या सर्व ट्रॉट्स्कीने उभारल्या होत्या. त्यांचें सर्व नियंत्रण त्याच्या हातीं होतें, पण स्टॅलिनच्या सुलतानशाहीला विरोध करतांना ट्रॉट्स्कीला सेनेस वश करतां आलें नाही; आणि पुढेहि हें कोणाला साधलें नाही. स्टॅलिनशीं ज्यांचें हाडवैर निर्माण झालें होतें असे कित्येक कर्तबगार व समर्थ पुरुष होते. पोलीस व लष्कर यांतले मोठमोठे अधिकारीहि त्यांत होते; पण त्यांपैकीं कोणालाहि निराळा पक्ष निर्माण करतां आला नाही. लष्करांतले अधिकारीहि लष्करांत भेद करूं शकले नाहीत. क्रुश्चेव्हसारखा पाताळयंत्री मनुष्यहि हें करूं शकला नाही. यांतलें रहस्य आपण समजावून घेतलें पाहिजे.

नवचीनमध्येहि समाज असाच संघटित आहे. तेथेहि समाज दुभंगावा, यादवी माजावी अशा घटना नित्य घडत आहेत. १९४९ सालीं तेथील कम्युनिस्ट पक्षाच्या हातीं सत्ता आली. त्यानंतर पुढील दोन वर्षांत या ना त्या निमित्ताने तेथील नेत्यांनी जवळ जवळ वीस लाख लोकांची कतल केली आहे. अत्यंत समर्थ अशा, अगदी श्रेष्ठ अशा, मालिकेंतील नेत्यांनाहि माओ, चौ एन् लाय यांच्याविरुद्ध गेल्याबरोबर देहान्त प्रायश्चित्त देण्यास चीनचे हे नेते कचरत नाहीत. मध्यंतरीं मतस्वातंत्र्याचा सर्वांना हक्क द्यावा अशी एक लहर माओट्सी टुंग याला आली. त्याबरोबर नवचीनच्या राज्य-कारभारावर अनेक प्रकारांनी कडक टीका होऊं लागली. कोणी तर रशिया-वर व कोणी मार्क्सवादावरहि टीका केली. त्याबरोबर माओचा सुलतानी दण्ड पुन्हा फिरूं लागला व त्याने अनेकांचे बळी घेतले. शिक्षणखात्याचे उपमंत्री त्सेन चीलून, नॅशनल डिफेन्स कौन्सिलचे उपाध्यक्ष जनरल लुंग, वाहतूक मंत्री चॅंग चो चून, अन्नखात्यांतील अधिकारी चंगने, लाकूडखात्यां-तील अधिकारी लो चिंग ची, अशा मोठमोठ्या पदांवरच्या अधिकाऱ्यांना एका क्षणांत माओ धुळीला मिळवतो, त्यांचा पाणउतारा करतो. त्यांना

जाहीरपणें आपल्या पापाची कबुली देऊन माफी मागावी लागते. नाही तर इहलोक सोडावा लागतो. पण असें असूनहि चीनमध्ये कोठे दुफळी झालेली नाही किंवा मध्यवर्ती सत्ता दुबळी झाल्याचें कसलेंहि लक्षण तेथे दिसत नाही.

## राजकीय प्रबुद्धता

याचें प्रमुख कारण म्हणजे नवचीनने चिनी जनतेच्या ठायीं निर्माण केलेली राष्ट्रनिष्ठा हें होय. आज चीनमध्ये ६५ कोटि लोक जागृत झाले आहेत म्हणजेच राजकीय दृष्टीने प्रबुद्ध झाले आहेत. चीन व रशिया येथे मार्क्सच्या तत्त्वान्वयें क्रान्ति घडली व त्याच्या सिद्धान्तानुसारच पुढील काळांत आपण समाजरचना केली असें तेथील नेते सांगतात. पण आपण एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे की, या देशांतील प्रगतीचा मार्क्सवादाशीं अर्थाअर्थी कसलाहि संबंध नाही. आज मार्क्स रशियांत अवतरला तर त्याला गोळीच घातली जाईल असें ट्रॉट्स्की मागे म्हणाला होता, तें आजहि खरें आहे. सर्व जगाचा इतिहास हा वर्गविग्रहाचा इतिहास आहे असें मार्क्सचें मत आहे. 'पण रशियाचा इतिहास हा वर्ग-विग्रहाचा इतिहास नाही,' असें रशियांत सध्या प्रचलित असलेल्या शालेय इतिहासांत पहिलेंच वाक्य आहे. तेंच राष्ट्रनिष्ठेविषयी. मार्क्सने राष्ट्र-वादाला अत्यंत तुच्छ लेखिलें आहे. त्याच्या मतें कामगारांना मातृभूमि नाही, पितृभूमि नाही. धर्माभिमान, राष्ट्राभिमान, वंशाभिमान या त्याच्या मतें सर्व अफूच्या गोळ्या आहेत. पण या दण्डसत्तांकित देशांतील कम्युनिस्ट नेत्यांनी लवकरच हें जाणलें की, जनतेला धुंद, बेहोश करून टाकण्यास, खरी प्रेरणा देण्यास, यांतली कोणती तरी गोळी अवश्य आहे. रशियन नेत्यांनी प्रारंभीं थोडी आंतरराष्ट्रीयतेची उपासना चालविली होती; पण माओच्या कम्युनिस्ट पक्षाने हा भ्रम कधीच अंगीकारला नाही. प्रारंभापासूनच तत्त्व-ज्ञानपूर्वक त्याने जागतिक कामगार संघटनेचें उच्च तत्त्व वाऱ्यावर सोडून दिलें आणि राष्ट्रभक्तीच्या भावनेला आवाहन करून चिनी जनतेला संघटित केलें.

## रागद्वेषांना चेतना

स्वराष्ट्राचा गौरव म्हणजे इतर राष्ट्रांचा, निदान पक्षीं शत्रुराष्ट्रांचा द्वेष हें समीकरण ठरलेलें आहे. अज्ञानी, दरिद्री, दैववादी, पुराणयुगांत मनाने

राहणाऱ्या असंख्य जनतेला विश्वशांति, विश्वव्यापक संघटना, अखिल मानव्य या कल्पनांनी कसलीहि प्रेरणा निर्माण होत नाही. रागद्वेषादि भावनामात्र तिच्या चित्तांत प्रबळ असतात, आणि याच रागद्वेषांना जास्त उन्नत रूप देऊन राष्ट्रांतील कर्तबगार, कुशल नेते त्या जनतेच्या ठायीं राष्ट्राच्या शत्रूविषयी द्वेष निर्माण करून त्यांतून मोठी शक्ति निर्माण करतात. विश्वैक्याचा उदात्त विचार करणाऱ्या लोकांना राष्ट्रनिष्ठा आणि त्यांतहि परक्यांचा द्वेष, शत्रूविषयी चीड या भावना संकुचित वाटतात.

आज अनेक पंडित राष्ट्रनिष्ठेचा जोराने निषेध करतांना दिसतात तें याच कारणासाठी. पण हे सर्व सुखासीन पंडित होत. खेड्यामध्ये आज अज्ञान, दारिद्र्य यांत खितपत पडलेल्या जनतेच्या दृष्टीने राष्ट्रभक्ति हें फार विशाल तत्त्वज्ञान आहे. लहानशा जमिनीच्या तुकड्यावरून, क्षुद्र मानापमानाच्या कल्पनांवरून भडकून जाऊन पिसाट होऊन ते लोक एक-मेकांचे खून करण्यास प्रवृत्त होतात. लहानशा ग्रामीण जीवनापलीकडे त्यांची दृष्टि कधीच गेलेली नसते. अखिल समाजाच्या उत्कर्षापकर्षाची जबाबदारी आपल्यावर आहे या विचाराचा स्पर्शहि त्यांना झालेला नसतो. अशा जनतेला राष्ट्रभक्ति शिकविणें म्हणजे तिचीं मनें संकुचित करणें नसून तिला उदात्त ध्येयवादाची शिकवण देणेंच होय. परक्यांच्या द्वेषावर जरी ही राष्ट्रनिष्ठा उभारली असली तरी क्षुद्र परिसरांतल्या क्षुद्र प्रश्नांची विवंचना करण्यांत ज्यांचा जन्म जावयाचा त्यांना अमेरिकन साम्राज्यशाहीचें आक्रमण, त्यापासून आपल्या मातृभूमीचें, अखिल चिनी राष्ट्राचें रक्षण या विवंचना शिकविणें आणि त्या प्रेरणेने ६५ कोटि लोकांच्या ठायीं अहोरात्र कार्यमग्न होण्यांत भूषण वाटावें अशी वृत्ति निर्माण करणें ही समाजाची निश्चित प्रगति आहे. अज्ञानग्रस्त, दैवहत अशा मनुष्याच्या चित्तांत अखिल राष्ट्राच्या प्रश्नांचा विचार करण्याची प्रवृत्ति निर्माण झाली, समाजाच्या उत्कर्षाची मी चिंता वाहतों हा अहंकार, ही अस्मिता त्याच्या मनांत उद्-भवली तर त्याच्या व्यक्तित्वाचा तो निश्चित विकास आहे; आणि सामान्य मानव हा जास्तीकरून भाववश, रागद्वेषवश असल्यामुळे कोठला तरी शत्रु समोर आहे, त्याच्याशीं लढा करावयाचा आहे, अशी भावना असल्यावांचून त्याचें रक्त चेतत नाही. तो उद्योगोन्मुख होत नाही. म्हणूनच राष्ट्रांतील

चतुर व्यवहारनिपुण नेते देशाच्या उत्कर्षासाठी परक्याच्या द्वेषावर ही भावना उभारून तिचा कुशलतेने उपयोग करून घेतात. स्वतःच्या राष्ट्रा-विषयीची भक्ति व शत्रुराष्ट्राचा द्वेष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असें म्हटलें तरी चालेल.

इतिहासाने तर याहिपुढे जाऊन एक सिद्धान्त सांगितला आहे. दीर्घ-कालीन युद्धांतून, म्हणजे सर्वांना समान असलेल्या शत्रूच्या द्वेषांतूनच पुष्कळ वेळा राष्ट्रनिष्ठा निर्माण झाली आहे. इंग्लंड आणि फ्रान्स या दोन देशांत चौदाव्या शतकांत शतवार्षिक युद्ध चालूं होतें. त्यांतूनच या देशांत राष्ट्र-भावना निर्माण झाली. १८७० सालीं तर बिस्मार्कने फ्रान्सशीं मुद्दाम युद्ध घडवून आणून स्वतःच्या राष्ट्राची संघटना केली. तुर्की जनतेंत इंग्रजां-विषयीं जो द्वेष भडकला होता त्याच्याच साह्याने केमालपाशाने तुर्क-राष्ट्राची संघटना केली. भारतीय राष्ट्राच्या ऐक्याची जोपासना इंग्रजांशीं आपण जो लढा दिला, जुलमी राज्यकर्त्यांविषयी जो जळजळीत द्वेष चित्तांत बाळगला त्यावर झाली आहे. हिटलरने पहिल्या महायुद्धांत जर्मनीला पराभूत करणाऱ्या राष्ट्रांविषयी जर्मन जनतेंत पराकाष्ठेचा संताप व द्वेष प्रसृत करूनच तिची संघटना केली व तिच्या ठायीं अपार, अपार सामर्थ्य निर्माण केलें. रशिया व चीन यांनी आज त्याच मार्गाने सामर्थ्याची उपासना चालविली आहे. जॉन स्ट्रॉम हे एक अमेरिकन वृत्तपत्रकार आहेत. नुकताच चीनमध्ये साडेसात हजार मैलांचा प्रवास करून ते आले. ते म्हणतात की, आज चिनी मनाचें पोषण अमेरिका-द्वेषावर होत आहे. तेथील अर्धपोटी, अर्धनग्न जनता आज अपार कष्ट करीत आहे, औद्योगीकरण करण्यासाठी, उत्पादन वाढविण्यासाठी हाडें पिचून टाकणारे कष्ट करीत आहे. तिच्यामागे प्रेरणा कोणती आहे? अमेरिकाद्वेष! "एक शेर गहू अधिक पिकविलात तर एक बंदुकीची गोळी जास्त विकत घेतां येईल, आणि आक्रमक साम्राज्यवादी अमेरिकन शिपायाशीं तुम्ही मुकाबला करूं शकाल. पोलाद जितकें जास्त निर्माण कराल तितक्या तोफा जास्त तयार होतील, मग आपल्याला अमेरिकन आक्रमणाला तोंड देतां येईल. हें न केलें तर! आक्रमण, पारतंत्र्य, गुलामगिरी, सर्वनाश!" असा प्रचार तेथे चालतो; आणि त्याने भारून जाऊन तेथील जनता हिमालय-कष्ट उपसीत आहे.

(रीडर्स डायजेस्ट–एप्रिल १९५९). जॉन गुंथूर यांनी रशिया याच अमेरिका-द्वेषावर पोसला जात आहे हें आपल्या ग्रंथांत दाखविलें आहे.

परक्यांचा द्वेष ही एक बाजू झाली. तिच्याहून शतपटीने जास्त महत्त्व पूर्वपरंपरेचा अभिमान हा जो राष्ट्रनिष्ठेचा आत्मा, त्याला आहे. मार्क्स-मताने हा अभिमान प्रतिक्रियात्मक, पराभूतवृत्तीचा द्योतक व सर्वथा त्याज्य होय. सोव्हिएट नेत्यांना आरंभीं याच भ्रांतीने पछाडलें होतें. पण सामर्थ्य वाढविण्याचें धोरण ठरतांच त्यांनी मार्क्सवाद उधळून दिला; आणि परं-परेची पूजा अत्यंत भक्तीने सुरू केली. अलेक्झँडर नेव्हस्की, पीटर दी ग्रेट, कुटुसाफ, टॉल्स्टॉय यांची प्रारंभीं हेटाळणी होत असे. आता हे सर्व पुण्यश्लोक आहेत. रशियाला १९१७ च्या आधी इतिहासच नाही असें प्रारंभीं शिकविलें जाई. आता तो इतिहास, झारशाहीने सैबेरियांत जीं आक्रमणें केलीं त्यांच्या वृत्तान्तासकट अत्यंत उज्ज्वल म्हणून गौरविला जातो, शिकविला जातो, पढविला जातो.

असा मातृभूमीच्या गौरवाचा व परकीयांच्या द्वेषाचा प्रचार अहोरात्र चालू असल्यामुळे वीस कोट रशियन जनता व पासष्ट कोट चिनी जनता आज राजकीय दृष्टचा प्रबुद्ध झाली आहे आणि कम्युनिस्ट दण्डसत्तांचें हें फार मोठें बळ आहे. मागल्या काळीं या अफाट देशांत ही जनता अंधारयुगांत, अज्ञानांत हताश होऊन, दैववादी बनून राजकारणाविषयी, देशाच्या भवि-तव्याविषयी पूर्ण उदासीन होऊन, अर्धनिद्रेंत घोरत पडलेली असे. सतराव्या अठराव्या शतकांत पश्चिम युरोपांत राष्ट्रनिष्ठा निर्माण होऊन तेथली सर्व जनता प्रबुद्ध झाली. देशाच्या भवितव्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर आहे, असें मानू लागली, म्हणून तीं राष्ट्रें समर्थ झालीं. (हिंदुस्थानांतील जनता अशीच अप्रबुद्ध व उदासीन होती. पण त्यासाठीच तिचा गौरव करण्याची सध्या चाल आहे! या देशांत वेडेपणा किती पिकावा याला कांही मर्यादाच नाही का?) तीच राजकीय प्रबुद्धता दण्डसत्तांकित देशांत आता निर्माण झाली आहे आणि अशा या प्रबुद्ध जनतेची संख्या पाश्चात्त्य लोक-सत्तांच्या तुलनेने पाहतां अमर्याद आहे, अपर्याप्त आहे. एवढी जनता पिसाळून उठली तर काय होईल या विचाराने लोकायत्त देशांतील नागरिक अहोरात्र चिंताग्रस्त झाले तर त्यांत नवल नाही.

## विभूतिपूजा

केवळ दण्डसत्तेने जिवंत राष्ट्रनिष्ठा निर्माण करतां येईल काय अशी शंका या ठिकाणीं आपल्याला येईल, आणि तशी येणें अगदी साहजिक आहे; पण केवळ दण्डसत्तेने हें कार्य साधलेलें नाही. तिच्या जोडीला विभूतिपूजा व अंधश्रद्धा या वृत्तींचाहि दण्डायत्त देशांचे नेते उपयोग करीत असतात. स्टॅलिनविषयी सोव्हिएट जनतेच्या मनांत कोणत्या श्रद्धा रशियन प्रचारकांनी रुजविल्या होत्या हें आपण पाहिलें तर वरील कोडें आपल्याला सहज उलगडेल. रशियांत प्रत्येक समारंभाच्या आदि-अंतीं स्टॅलिनला नमन केलें जाई. स्टॅलिन म्हणजे मानवजातीच्या आशेची ज्योत, मानवाच्या सुखाचा विधाता, पृथ्वीचें चिरतारुण्य, सूर्याची प्रतिभा अशी त्याची नित्य स्तुति केली जाई. स्टलिन हा सूर्यचंद्रांचा शास्ता, अनंताची मूर्ति असें त्याचें नित्य स्तोत्र गाइलें जाई. रोगी त्याच्या कृपेनेच बरे होतात, युद्धांत विजय त्याच्यामुळेच मिळतो, जगांतल्या सर्व भावी पिढ्यांचा तो गुरु आहे अशी श्रद्धा रशियन जनतेंत नित्य जोपासली जाई; आणि या स्तवनांत शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, इतिहासकार, राजकारणी, मुत्सद्दी, कवि व सेनापति सर्व सूर धरीत. चीनमध्ये माओविषयी असाच प्रचार चालतो. जर्मनीसारख्या ज्ञानविज्ञानांत प्रगतीच्या अग्रभागीं असलेल्या देशांत हिटलरला अंधविभूतिपूजेची वृत्ति जोपासतां आली. मग रशिया, चीन यांसारख्या देशांतील अंधजनतेंत तें दसपटीने जास्त शक्य झालें असल्यास नवल काय? मागल्या काळांत लोकांच्या अंधश्रद्धेमुळे पोपच्या पीठाला जें सामर्थ्य प्राप्त झालें होतें तेंच अर्वाचीन काळांत स्टलिनच्या व माओच्या पीठाने प्राप्त करून घेतलें आहे. नेत्यांवरील या अंधश्रद्धेमुळेच त्यांनी जरी घोर अत्याचार केले तरी जनतेच्या मनांत विद्रोही वृत्ति निर्माण होत नाहींत व समाजसंघटना भंगत नाही. १९३३ च्या जूनमध्ये जर्मनींत हिटलरने एका रात्रीं शेकडो, हजारो लोकांची हत्या केली; पण जर्मन जनतेची त्याच्यावरची व जर्मन राष्ट्रावरची निष्ठा चळली नाही. 'फ्यूहररनी केलें तें न्याय्यच असलें पाहिजे' असेंच ती म्हणाली. दण्डायत्त देशांत राष्ट्रनिष्ठा अशी व्यक्तिनिष्ठ, विभूतिनिष्ठ असते, पण म्हणूनच ती जास्त अंध व जास्त समर्थ होते.

वरील वर्णनावरून एक गोष्ट स्पष्ट होईल की, दण्डायत्त देशांतील

नेत्यांनी जनतेंत कोणत्याहि उपायाने का होईना आपल्या मातृभूमीविषयी पराकाष्ठेची भक्ति, स्वदेशाचा प्रबल अभिमान निश्चित निर्माण केला आहे. तेथे प्रारंभीं भयंकर कत्तली झाल्या, अजूनहि क्वचित् होतात. तेथे कसलेंहि व्यक्तिस्वातंत्र्य नाही आणि सर्वांत मोठी व्यथा म्हणजे अन्नवस्त्राची तेथे फार मोठी वाण आहे. असें असूनहि रशिया किंवा चीन येथील जनता स्वदेशाच्या अभिमानाने प्रेरित होऊन आपल्या नेत्यांच्या मागोमाग जाण्यास सिद्ध झाली आहे. यांत सक्तीचा, जुलमाचा, दण्डसत्तेचा भाग फार मोठा असला तरी खऱ्या निष्ठेचा, जिवंत भक्तीचाहि भाग अगदी उपेक्षणीय आहे असें म्हणतां येणार नाही. त्या देशांत जाऊन आलेले शत्रुपक्षीय लोकहि तेथील जनता कांही विलक्षण उत्साहाने, चैतन्याने, कांही नव्या ध्येयवादाने प्रेरित झालेली आहे असा निर्वाळा देतात. यांत एकशतांश जरी सत्य असलें तरी त्याला फार मोठा अर्थ आहे; आणि यांतच त्या दण्डासत्तांचें सामर्थ्य आहे.

रशिया, चीन या दण्डसत्तांनी षडंग बल कसें प्राप्त करून घेतलें आहे याचा येथवर विचार केला. त्यावरून या दण्डसत्तांनी लोकसत्तांना आव्हान दिलें आहे असें कां म्हणतात आणि त्या आव्हानांत कितपत अर्थ आहे हें ध्यानीं येईल. पण या आव्हानाची चिकित्सा करीत असतांना औद्योगीकरण, शास्त्रज्ञान, राष्ट्रभक्ति यांचें जें वर्णन केलें त्यावरून या षडंग बलांत आक्षेपार्ह असें काय आहे असा एक प्रश्न निर्माण होतो. आरंभीं सांगितलें आहे की, पाश्चात्त्य लोकसत्ता या दण्डसत्तांना आसुरी, रानटी, हिंस्र असें म्हणतात. त्यांनी केलेली प्रगति मान्य करूनहि ती नैतिक दृष्टचा अत्यंत हिडीस आहे, जगाला, मानवतेला तें लांछन आहे, काळिमा आहे असें म्हणतात. या टीकेचा अर्थ समजावून घेण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आज अमेरिका जपान, जर्मनी या युद्धकाळांतल्या शत्रुराष्ट्रांना त्यांच्या उत्कर्षासाठी वाटेल तें साह्य करण्यास सिद्ध आहे. जर्मनीला युद्धसमाप्तीनंतरच्या ७-८ वर्षांच्या काळांत अमेरिकेने १८०० कोट रुपयांचें साह्य केलें आहे. हिंदुस्थान हें विस्ताराने व लोकसंख्येने फार मोठें व उदयोन्मुख असें राष्ट्र आहे. पण त्याची उदयोन्मुख सत्ता हें आपल्याला एक आव्हान आहे असें तर अमेरिका मानीत नाहीच; उलट त्याच्या उत्कर्षासाठी हरप्रकारें साह्य करावें अशीच तिची भूमिका आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की,

कम्युनिस्ट दण्डसत्ता या उत्कर्षपथावर आहेत एवढ्यासाठीच पाश्चात्त्य सत्तांनी त्यांच्याशीं दावा धरला आहे असें नाही. हा संग्राम वस्तुतः दोन राष्ट्रांमधला नसून समाजरचनेच्या दोन मूल तत्त्वांमधला आहे, आणि दण्डसत्तांनी जीं तत्त्वें स्वीकारलीं आहेत तीं अत्यंत निंद्य व अधोगामी असल्यामुळे पाश्चात्त्य लोकसत्ता त्यांना रानटी, हिंस्र, सैतानी म्हणतात. हा रानटीपणा नेमका कशांत आहे तें आता आपणांस पाहावयाचें आहे. वरील विवेचन करतांना मधून मधून त्याची कांहीशी चिकित्सा केलेलीच आहे. पण कांहीशा विस्ताराने त्याचें वर्णन केलें म्हणजे एकमेकीला आव्हान देऊन रणांगणांत उतरूं इच्छिणाऱ्या या दोन शक्तींचें स्वरूप आपणांस यथार्थपणें आकळतां येईल.

## रानटीपणा

औद्योगीकरण, शास्त्रज्ञान, यंत्रज्ञान, यांची अहोरात्र उपासना करणाऱ्या देशाला, आपल्या देशांतील प्रत्येक नागरिकास साक्षर करण्याची प्रतिज्ञा करून ती अल्पावधींत पार पाडणाऱ्या नेत्यांना, ज्ञानाच्या क्षेत्रांत अवघ्या चाळीस वर्षांत पाश्चात्त्य राष्ट्रांवर मात करणाऱ्या सोव्हिएट रशियासारख्या राष्ट्राला 'रानटी' ही पदवी कां दिली जाते, तिचा अर्थ काय, ती कितपत सयुक्तिक आहे याचा विचार आपण करीत आहों. या रानटीपणाचें मुख्य लक्षण म्हणजे मानवतेचा, मानवी मूल्यांचा संपूर्ण अभाव हें होय. मानवी मूल्यांचा सोव्हिएट रशियांत पूर्ण लोप झाला आहे हें स्टॅलिनच्या मरणानंतर क्रुश्चेव्हने त्याच्या पापांचा व आसुरी, रानटी कृत्यांचा जो पाढा वाचला त्यावरून स्पष्ट होईल. त्या पुराव्याची गरज होती असें नाही. सर्व जगाला स्टॅलिनच्या त्या हिंस्र कृत्यांची माहिती झालेलीच होती; पण आता ती अगदी अधिकृत रीतीने मिळाली म्हणून तिचें महत्त्व. रशिया म्हणजे त्या वेळीं रौरव नरक होता, यमपुरीसहि वरी म्हणवीत होता, असें क्रुश्चेव्हच्या भाषणावरून दिसतें. मानवी जीवन म्हणजे सोव्हिएट सत्ताधाऱ्यांना कःपदार्थ वाटतें, किडामुंगीपेक्षा त्याला त्यांच्या लेखीं जास्त महत्त्व नाही; म्हणूनच आपल्या मताला किंवा ठरविलेल्या कार्यक्रमाला विरोध करणाऱ्या लक्षावधि लोकांना त्यांनी कंठस्नान घातलें आणि ज्यांना असा मृत्युदण्ड दिला नाही त्यांना रौरव नरकापेक्षाहि भयानक अशा

कॉन्सेन्ट्रेशन कँपमध्ये—गुलामांच्या कोंडवाड्यांत—वर्षानुवर्षें पिचत ठेविलें. रानटीपणा म्हणजे याहून निराळें काय असतें? आणि हें सर्व तत्त्वज्ञानपूर्वक केलें जातें. व्यक्तीला व्यक्ति म्हणून महत्त्व असतांच कामा नये, तिला स्वतंत्र अस्तित्व नाहीच, ती समाजासाठी आहे, तिने आपल्या स्वार्थाचा त्याग तर समाजासाठी केलाच पाहिजे पण याहिपेक्षा भयंकर म्हणजे आपल्या मतांचा, विचारांचा, तत्त्वांचाहि त्याग केला पाहिजे, त्यांची निंदा निर्भर्त्सनाहि केली पाहिजे व समाजाविरुद्ध म्हणजेच सत्ताधाऱ्यांविरुद्ध मत दिल्याबद्दल सर्व स्वाभिमान गिळून माफी मागितली पाहिजे, शरणागति पत्करली पाहिजे, असें सोव्हिएट रशियाचें मार्क्सवादी तत्त्वज्ञान आहे. तेथला समाजवाद तो हाच. एखाद्या प्रचंड यंत्रांत स्क्रू किंवा खिळा असतो तसा समाजांत मानव आहे. तो वस्तु आहे, व्यक्ति नाही. मानव हें अंतिम मूल्य नाही, तें एक साधनभूत व म्हणूनच गौण, क्षुद्र मूल्य आहे; समाज हें अंतिम मूल्य होय असा सोव्हिएट रशियाचा सिद्धान्त आहे. व्यक्तित्ववादी पाश्चात्त्य तत्त्ववेत्ते याच समाजवादी सिद्धान्ताला 'रानटी' असें म्हणतात.

हा सिद्धान्त म्हणजे केवळ तात्त्विक मतभेद नाही. त्याचा आधार घेऊन नीतीच्या शाश्वत तत्त्वांची सोव्हिएट रशियांत नित्य होळी केली जाते. घरांतला कर्ता पुरुष रशियाबाहेर पळून गेला तर त्याच्या कुटुंबीयांचा त्यांत कसलाहि अपराध नसला तरी त्यांचा अनन्वित छळ केला जातो. त्यांतून ते केव्हा मुक्त होतील? तर पुत्राने वा कन्येने पित्याची जाहीर निंदा केली, त्याचा निषेध केला तर! पत्नीने पतीची जाहीर मानखंडना केली तर! अशी निंदा रशियांत सक्तीने करावयाला लावतात. कुटुंबापेक्षा समाज श्रेष्ठ असल्यामुळे असें करणें तेथे युक्तच आहे. स्टॅलिन मृत्यु पावला त्या वेळीं १४ डॉक्टरांच्यावर खटले भरले होते, त्यांनी पाश्चात्त्य साम्राज्य-शाहीला वश होऊन अनेक सोव्हिएट अधिकाऱ्यांना विषाचीं इंजेक्शनें दिलीं व आणखी असेच अनेक घातपात केले असे त्यांच्यावर आरोप होते. त्यांनी तसे कबुलीजबाबहि लिहून दिले होते; पण त्यांच्या नशिबाने स्टॅलिन तेवढ्यांत मृत्यु पावला, आणि मागून आलेल्या सत्ताधाऱ्याने ते सर्व खटले काढून घेऊन त्यांना निर्दोषी ठरविलें. त्यांचे कबुलीजबाब कसे असतील याची यावरून सहज कल्पना येईल. न्यायाची, सत्याची ही पराकाष्ठेची विटंबना होय. पण स्टॅलिनच्या राजवटीचें हें नित्याचेंच लक्षण होतें. ती

प्रकृतिच होती. सोव्हिएट सत्ताधाऱ्यांच्या हिंस्र अत्याचारांचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. युरोपीय लेखकांनी ग्रंथच्या ग्रंथ भरून त्यांचीं वर्णनें केलीं आहेत. त्यांच्या रानटीपणाची कल्पना यावी म्हणून एक दोन प्रकार सांगितले, इतकेंच. आजच्या रशियांतहि या दृष्टीने फारसा फरक झालेला नाही.

## लोकसंख्या

सोव्हिएट रशिया व नवचीन या सत्ता मानवी मूल्यांची कदर करीत नाहीत हें आणखी एका गोष्टीवरून दिसून येतें. ती गोष्ट म्हणजे त्यांचें लोकसंख्येविषयीचें धोरण. आज सोव्हिएट रशियाची लोकसंख्या २० कोटि आहे, आणि चीनची ६५ कोटि आहे. एवढ्या अफाट संख्येला जगण्यापुरतें अन्नवस्त्र देण्यास या दोन्ही सत्ता असमर्थ आहेत. सामुदायिक शेतीचे रशियाचे प्रयोग कितपत यशस्वी झाले हें स्टॅलिननंतर आलेल्या मेलेंकाव्हने जो कबुलीजबाब दिला त्यावरून स्पष्ट होतें आणि प्रारंभीं सांगितल्याप्रमाणे अन्नवस्त्राच्या उत्पादनावर शक्ति फारशी खर्च नाहीच करावयाची असें रशियाचें धोरण आहे. जीं जीवनधनें निर्माण होतात तीं वरिष्ठवर्ग, सत्ताधारी वर्ग, नवा नोकरशाहीचा वर्ग आणि शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ यांचा वर्ग यांच्यासाठी असतात. रोज बारापंधरा तास कष्ट करणारा जो शेतकरी-कामकरी वर्ग त्याला जेमतेम जगण्यापुरतें अन्नवस्त्र मिळतें. पूर्वी तेंहि नव्हतें. असें असूनहि लोकसंख्येचें नियंत्रण करणें दूरच राहो, ती वाढविण्याचेंच या सत्ताधाऱ्यांचें धोरण आहे. हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करणारे लोक सांगतात की, आपण संततिनियमन केलें नाही तर आपल्या पंचवार्षिक योजना कितीहि यशस्वी झाल्या तरी कांही उपयोग होणार नाही. कारण अनियंत्रितपणें वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेसें अन्नवस्त्र आपण कधीहि निर्माण करूं शकणार नाही. म्हणून सध्या आपलें सरकार कुटुंबनियोजनाचा प्रचार करीत आहे. ज्यूलियन हक्सले या विख्यात शास्त्रज्ञाने पुढील पन्नास वर्षांचा विचार करून संततिनियमन केलें नाही तर मानवी संस्कृतीची पिछेहाट होऊन आपण पुन्हा जंगली अवस्थेला जाऊं असें निक्षून सांगितलें आहे. असें असतांना ६५ कोटि संख्या असलेला चीन नियंत्रणाचा विचारहि करीत नाही, याचा अर्थ काय? युद्ध, लढाई! हीं दोन्ही राष्ट्रें

युद्धकल्पनेवर जगत आहेत, आणि त्यासाठी त्यांना माणूसबळ पाहिजे आहे. माओ एकदा म्हणाला की, फक्त चीनलाच युद्धांत यश मिळणें शक्य आहे, कारण ६५ कोटींपैकी ३५ कोटि लोक मेले तरी आपल्याजवळ तीस कोटि शिल्लक राहतीलच !

मानवी जीवनाकडे पाहण्याची कम्युनिस्ट दण्डसत्तांची ही दृष्टि आहे. विपुल लोकसंख्या हें युद्धाचेंच एक साधन आहे. तोफा, बंदुका, बंदुकीच्या गोळ्या, तशींच माणसें ! युद्धसाहित्याचा तो एक भाग आहे. रशियांतील मजुरांच्या कोंडवाड्यांत माणसांचे इतके हाल करतात की, तेथे पांच सहा वर्षांवर माणूस जगतच नाही. पण त्यांत कांही बिघडलें असें सत्ताधीशांना वाटत नाही. पांचसहा वर्षें अठरा अठरा तास, शून्याखालच्या थंडींत काम करून, उत्पादन वाढवून माणूस मरून गेला तर त्यांत कांहीच वाईट नाही. वीज, कोळसा खपून जातो तसा माणूसहि खपून गेला तर त्यांत तोटा नाही. आपल्याजवळ अफाट लोकसंख्या आहे. कमी झाली तर आणखी निर्माण होत आहे. औद्योगिक धन, लष्करी साहित्य निर्माण करण्यासाठी तेल, वीज, कोळसा जसा वापरावयाचा तशीच माणसांची श्रमशक्ति वापरावयाची ! रशियाला, चीनला माणसांची श्रमशक्ति हवी आहे, माणूस नको आहे. आता ही श्रमशक्ति कोणत्या माणसांची? याचें उत्तर अगदी उघड आहे. सत्ता, विद्या, धन. यांमुळे कमालीची विषमता या दोन्ही देशांत आहे. या धनांनी संपन्न असा जो वर्ग त्याची ही श्रमशक्ति नव्हे. तर राहिलेल्या शेकडा ७०-८० लोकांची ही श्रमशक्ति आहे. तेल, कोळसा यांच्याप्रमाणेच या शक्तीचा वापर हा सत्ताधारी वर्ग आपल्या सुखासाठी करीत असतो आणि म्हणून कोळसा, तेल यांचें उत्पादन, जितकें वाढेल तितकें, जसें त्याला हवें असतें, त्याचप्रमाणे मानवाची श्रमशक्ति म्हणजेच लोकसंख्या जेवढी वाढेल तितकी त्याला हवी असते. लोकसंख्येच्या वाढीची चिंता कोणाला? ज्यांना मानवी मूल्यांचा मान राखावयाचा आहे त्यांना. प्रत्येकाला अन्न, वस्त्र, घर, शिक्षण हें हक्काने मिळालें पाहिजे, प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा मान राखला पाहिजे, त्याचा विकास झाला पाहिजे, हें मूलतत्त्व ज्यांना मान्य आहे त्यांना ! मानवत्व हें अंतिम मूल्य आहे हें ज्यांना मान्य आहे त्यांना लोकसंख्यावाढीचें भय. पण लोकसंख्या हा एक

युद्धसाहित्याचाच प्रकार आहे असें ज्यांचें मत आहे त्यांना तिची वाढ ही चिंता नसून त्यांचें तें एक बलसाधनच आहे.

सोव्हिएट रशिया व चीन यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुत्व, अन्य मतांविषयी आदर, प्रातिनिधिक शासन इत्यादि लोकशाही मूल्यांचीच फक्त अवज्ञा केली आहे असें नाही. मानवाने आतापर्यंत संवर्धित केलेल्या अत्यंत श्रेष्ठ नीतितत्त्वांचीहि अवहेलना ते देश करीत आहेत. मातृभक्ति, पितृभक्ति, पतिपत्नीचें प्रेम, कौटुंबिक भावना, धर्मनिष्ठा या श्रेष्ठ भावना ते नित्य पायदळीं तुडवितात; आणि अत्यंत खेदाची गोष्ट ही की, तसें त्यांचें तत्त्वज्ञान आहे. इतर देशांत या श्रेष्ठ तत्त्वांची अवज्ञा अधोगामी लोक करीतच असतात; पण तेथे तें आचरण निंद्य गणलें जातें. त्या लोकांची तेथे निर्भर्त्सना होते. वरील कम्युनिस्ट देशांत ही अवज्ञा तत्त्वज्ञानपूर्वक होत असते. या भावनांना बूर्झ्वा ही शिवी दिली जाते. या दण्डसत्ता रानटी आहेत, हिंस्र व पाशवी आहेत असें म्हणण्याचें हें कारण आहे. अशा स्थितींत त्या देशांत विज्ञानाचें उत्तम अध्यापन होतें, शास्त्रसंशोधन होतें, जनतेंत शिस्त निर्माण झालेली आहे, हें पाहून लोकवादी पंडितांना यांतूनच पुढे त्या देशांत लोकशाही मूल्यें निर्माण होतील अशी आशा वाटते हें वर एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. पण तसें जेव्हा होईल तेव्हा सध्याचें समाजरचनेचें तत्त्वज्ञान त्या वेळच्या क्रांतिकारकांना समूळ उच्छिन्न करावें लागेल आणि तें न झालें तर लोकसत्तेचीं तत्त्वें तेथे जगूं शकणार नाहीत. पण वर सांगितल्याप्रमाणे त्यांचें लष्करी सामर्थ्य मात्र वाढतच राहणार आणि लोकायत्त जगाला भीति आहे ती ही आहे. उच्च मूल्यें, उदात्त तत्त्वें, श्रेष्ठ संस्कृति न येतां लष्करी सामर्थ्य वाढत गेलें तर या सत्ता केवळ आसुरी होतील, आजच झाल्या आहेत. म्हणूनच लोकायत्त जगाला हा आपल्या सत्तांना आणि एकंदर मानवी संस्कृतीला मोठा शह आहे, मोठें आव्हान आहे असें वाटतें; आणि आपण स्वीकारलेलीं, शतकानुशतकें जोपासलेलीं लोकशाही मूल्यें कायम टिकवून लष्करी सामर्थ्यांतहि या रानटी सत्तांवर मात कशी करावयाची ही त्यांच्यापुढे मोठी समस्या आहे. आजच्या सर्व लोकसत्तांत प्रधान सत्ता म्हणजे अमेरिका. तिने ही समस्या कशी सोडविली तें आता पुढील प्रकरणांत पाहूं.

✦ ✦ ✦

# प्रकरण : २

## अमेरिकन लोकसत्ता आणि दण्डसत्तेचें आव्हान

युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका या लोकायत्त राष्ट्राने, या लोकसत्तेने सोव्हिएट रशिया व नवचीन या दण्डसत्तांचें आव्हान कसें स्वीकारलें तें आता पाहावयाचें आहे. या बाबतींतली मुख्य समस्या कोणती तें मागे सांगितलेंच आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिष्ठा, मानवता, न्याय, सत्य, विश्वशांति, या श्रेष्ठ तत्त्वांची उपासना हा लोकायत्त समाजाचा आत्मा होय. या उदात्त मूल्यांचें रक्षण करून, त्यांना किंचितहि मुरड न घालतां दण्डसत्तांच्या बरोबरीने जड, पाशवी, लष्करी सामर्थ्याची जोपासना कशी करावयाची, अशी ही समस्या आहे. असा पेच नसता तर या दण्डसत्तांचें आव्हान स्वीकारणें हा अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला पोरखेळ वाटला असता. त्याची औद्योगिक प्रगति, शास्त्रज्ञान, शस्त्रास्त्रनिर्मिति हें इतकें अपरिमित आहे की, आज जगांतल्या इतर सर्व सत्ता एकवटल्या तरी त्याची बरोबरी करणें त्यांना शक्य नाही. मग अमेरिकेवर मात करणें दूरच राहो; पण उच्च मूल्यांचें संरक्षण करून, तें ब्रीद संभाळून युद्धसामर्थ्याची जोपासना करतां येईल कीं नाही, असा प्रश्न असल्यामुळे जरा गंभीर विचार करणें हें लोकसत्तांना अवश्य झालें आहे.

असें कां व्हावें याचा आधी थोडा विचार करूं आणि मग अमेरिकेने या दृष्टीने काय योजना केली आहे तें पाहूं.

उच्च मूल्यें, उदात्त कल्पना, थोर सात्त्विक विचार, विशाल ध्येयवाद यांचा समाजाने स्वीकार केला की, बारा वाटांनी दौर्बल्य त्याच्या अंतरांत शिरतें. त्याचें लढाऊ सामर्थ्य, जीवनकलहांत टिकून राहण्याचें सामर्थ्य

अनेक कारणांनी कमी होतें असा इतिहासाचा सिद्धान्त आहे. अमेरिकेचेंच उदाहरण पाहा. उद्या सोव्हिएट रशियाशीं या राष्ट्राचें युद्ध जुंपलें तर अमेरिकेंतील कम्युनिस्ट निश्चित स्वदेशाविरुद्ध प्रचार करणार, तें युद्ध साम्राज्यवादी म्हणून शिक्का मारून ते भेद माजविणार, पण मतस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य या उदात्त मूल्यांमुळे अमेरिका हा प्रचार बंद करूं शकणार नाही. अमेरिकेंतील कम्युनिस्ट राष्ट्रद्रोही कारस्थानेंहि करणार, रशियाला गुप्त वार्ता पुरविणार ! आता याला शिक्षा आहे. पण तो गुन्हा न्यायालयांत सिद्ध झाला पाहिजे. त्यावांचून शिक्षा करणें हा रानटीपणा होय. अमेरिका तो करणार नाही. म्हणजे पुन्हा डोळ्यांदेखत दौर्बल्य आलें. रशियांत हा प्रश्नच नाही. मतस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य हीं खुळें तेथे नाहीत. न्यायालयांत गुन्हा सिद्ध झाला पाहिजे असा वेडगळ (!) आग्रहहि तेथे नाही. संशय आला की पुरे. मनुष्य यमसदनास धाडून देण्यास तेथे कसलाच प्रत्यवाय नाही. म्हणजे भेद होण्याचा तेथे संभवच नाही. म्हणजे दौर्बल्य नाही. सामर्थ्य अभंग आहे. हें कशामुळें ? तर रानटी मूल्यें स्वीकारल्यामुळे ! कम्युनिस्टच लढाईला विरोध करतात असें नाही. शांततावादी, अगदी प्रामाणिक शांततावादी लोकहि युद्धविरोधी असतात. त्यांचा विवेक त्यांना स्वस्थ बसूं देत नाही. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं ब्रिटनमध्ये अशा युद्धविरोधी सभा भरत, भाषणें होत, आणि विवेकस्वातंत्र्य हें उच्च मूल्य ब्रिटनने स्वीकारलें असल्यामुळे अशा सभांना तेथे पूर्ण मुभा असे. रशिया, चीन, पूर्वजर्मनी येथे अशा सभा होणें शक्य नाही, म्हणजे भेदसंभव नाही.

व्यक्तिस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, याप्रमाणेच संघस्वातंत्र्य हेंहि लोकशाहीचें एक मूलतत्त्व आहे; त्यामुळे लोकायत्त देशांत वाटेल तितके पक्ष स्थापतां येतात, कामगारांना संघटना करतां येतात, आणि वाटेल त्या वेळीं संपहि करतां येतो. ऐन युद्धकाळांत कामगारांचा संप लोकायत्त देशांत पूर्ण शक्य आहे. गिरण्या, कारखाने, रेल्वे, येथील कामगारांनी युद्धकाळीं संप केला तर दुसऱ्याच दिवशीं युद्ध बंद पडेल आणि राष्ट्राचा पराभव होईल. १९१७ सालीं रशियांत क्रांति झाली. त्या वेळीं अनेक भांडवली लोकायत्त राष्ट्रांनी रशियावर आक्रमण केलें. तें अयशस्वी होण्याचें एक कारण असें

की, त्या वेळीं ब्रिटन, अमेरिका या देशांतील कामगारांनी संप करून उत्पादन बंद पाडण्याची धमकी दिली. लोकशाहीचीं उच्च मूल्यें स्वीकारलेल्या या देशांना त्या वेळीं माघार घ्यावी लागली. हें उदात्त तत्त्वांमुळे आलेलें दौर्बल्य होय. अत्यंत जहाल व आक्रमक राष्ट्रवादाचा प्रचार करून नागरिकांचीं मनें परकीयांच्या द्वेषावर सतत पोशीत राहणें, त्यांना सतत युद्धोन्मुख करून ठेवणें, ही गोष्ट कोणत्याच दृष्टीने श्रेयस्कर नाही. पूर्वपरंपरेचा अभिमान नित्य जागृत ठेवणें, प्राचीन थोर विभूतींची सतत पूजा करीत राहणें हें युक्त व इष्ट आहे. पण माणसें खरीं धुंद व पिसाट होतात तीं या अभिमानाला द्वेषाची जोड मिळेल तेव्हा ! तसें करणें हें संस्कृतीच्या वरच्या पातळीवर गेलेल्यांना फारसें शक्य होत नाही. पण मग माणसें व्हावीं तितकी अविवेकी, बेहोष, धुंद व पिसाट, म्हणजेच युद्धोन्मुख होत नाहीत; आणि जो पिसाट नाही तो बहुधा बलहीन असतो. दण्डायत्त कम्युनिस्ट देशांत अशा उच्च संस्कृतीचा प्रश्नच नाही. त्यांनी अहोरात्र युद्धपिपासा जागृत ठेवण्याचेंच धोरण ठेविलें आहे. मार्क्सवादाचें मूलतत्त्वच संग्राम, द्वंद्व हें आहे. क्षणकाल सोव्हिएट नेते, युद्ध नको म्हणत असले, शांततावादाचा पुरस्कार करीत असले तरी तो एक राजकारणांतला डावच होय. एरवी परक्यांचा द्वेष, युद्ध या कल्पना हीच त्यांची प्रकृति आहे.

पराकाष्ठेची अंध विभूतिपूजा हें एक सामर्थ्यकारण आहे. सोव्हिएट नेत्यांनी ती कोणत्या थराला नेलेली आहे हें वर सांगितलेंच आहे. व्यक्ति-स्वातंत्र्यसंपन्न, लोकायत्त देशांत अशी पूजा कालत्रयीं शक्य नाही. बुद्धिवाद हें अत्यंत मोठें मूल्य तेथे समाजरचनेला पायाभूत झालेलें असतें. अंध व्यक्तिपूजेचा तेथे नुसता वास आला तरी शास्त्रज्ञ, ग्रंथकार, तत्त्ववेत्ते हे उसळून उठतीलच. पण ब्रिटन-अमेरिकेंत सामान्य जनताहि संतापून उठेल. याचाहि अर्थ हाच की अप्रगत, अज्ञ, रानटी समाजांतील एक बलसाधन उच्च मूल्यांच्या स्वीकारामुळे सुसंस्कृत समाजाच्या हातांतून नाहीसें झालेलें असतें. सत्य, प्रखर शास्त्रीय सत्य, हें सुसंस्कृत समाजाचें ध्येय असतें. सत्यापलाप त्याला चालत नाही. १९४५ सालीं अमेरिकेने ६ ऑगस्टला हिरोशिमावर ॲटमबॉंब टाकले. रशियाने जपानशीं युद्ध पुकारलें तें ८ ऑगस्टला. म्हणजे त्यापूर्वीच जपानचें प्रतिकारसामर्थ्य नष्ट झालें होतें.

असें असून आज सोव्हिएट रशियाचे अधिकृत इतिहासकार सांगतात की, रशियाने जपान आधीच जिंकून जमीनदोस्त केला होता. ॲटमबाँब टाकण्याची जरुरी नव्हती. रशियाच्या हातचें यश लाटण्याच्या हेतूनेच अमेरिकेने हे बाँब टाकले. आता हा सत्यापलाप ब्रिटन-अमेरिकेंत क्षणभरहि टिकणार नाही. तेथील राजकारणी लोक एखादे वेळीं असा अपलाप करण्याचा प्रयत्न करतील, पण तेथील इतिहासकार व तत्त्ववेत्ते त्यांचे वाभाडे काढल्यावांचून राहणार नाहीत. मागल्या काळांत व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णतेस गेलें नव्हतें त्या वेळीं सुद्धा बर्कने वारन् हेस्टिंग्जला नको जीव करून टाकलें. मग आज तर काय होईल याची कल्पनाच केलेली बरी. पण रशियांत हें विधान जनतेने पूर्ण श्रद्धेने स्वीकारलेलें आहे. स्वीकारणें तिला भागच आहे. यावर तिच्या अहंकाराचा पोष होतो. आपण जपानचा पराभव केला या विश्वासाने तिचें सामर्थ्य वाढतें. हें उच्चमूल्याश्रयी लोकायत्त राष्ट्रांना कसें शक्य आहे ! १८५७ चें बंड हें स्वातंत्र्ययुद्ध होतें, या विधानाची टवाळी हिंदी विद्वान् करूं शकतात. हें रशियांत शक्य नाहीं. यावरूनहि हें स्पष्ट होईल की, अंधश्रद्धेने, असत्याने अहंकार पोसणें हें सुसंस्कृत देशांत शक्य नाही. म्हणजे आणखी एक बलसाधन गेलें.

उच्च संस्कृतीचें रक्षण व त्याबरोबरच संरक्षणसामर्थ्याची जोपासना हें कसें साधावें हा प्रश्न आज लोकायत्त राष्ट्रांपुढे नव्यानेच आला आहे असें नाही. मानवसमाजांत संस्कृतीचा उदय झाला तेव्हापासूनच ही समस्या त्यांच्यापुढे येऊन पडलेली आहे. संस्कृतीच्या वरच्या पायरीवर गेलेल्या समाजांचा रानटी टोळयांनी नाश केल्याची कितीतरी उदाहरणें मागल्या इतिहासांत आहेत. याचेंहि कारण हेंच आहे. उच्च मूल्यांचा स्वीकार केल्याबरोबर समाजाचें लढाऊ सामर्थ्य निश्चित कमी होतें; आणि ही उणीव अन्य उपायांनी भरून काढण्याची सावधगिरी जे समाज घेत नाहीत त्यांचा नाश होतो. सुधारणेची पहिली पायरी म्हणजे कृषि व पशुधन यांनी प्राप्त होणारें स्थिर जीवन ही होय. पण हें येतांच माणूस घरांत राहूं लागतो. थोडे बरे कपडे करतो, थोडा मृदु मनाचा होतो. जनावरावरहि त्याची माया जडते. कुटुंबप्रेम हें तर त्याच्या सर्व संस्कृतीचें सार असतें. उलट भटक्या स्थितींत राहणारे लोक नित्य थंडी, वारा,

पाऊस, ऊन सोशीत असतात. साहजिकच ते जास्त काटक, बळकट व टणक असतात. त्यांच्या तुलनेने स्थिरजीवनांत प्रवेश करणारे शेतकरी शरीरबळांत कमीच पडणार. दुसरें असें की, शेती, घरदार, प्रपंच करून स्थिर जीवनांत राहणाऱ्या समाजाला त्या जीवनांत कांही भावबंध निर्माण झालेले असतात. कांही आशाबंध, कांही लभ्य, कांही संरक्षणीय निर्माण झालेलें असतें. म्हणून त्यांतील व्यक्तींच्या प्राणांची किंमत वाढलेली असते. भटक्या जीवनांत यांतलें कांहीच नसतें. शेतकीची चांगली मशागत करून ती जिंदगी आपल्या मुलाला ठेवावी अशी किंवा या तऱ्हेची ओढ भटक्यांना मुळीच नसते. त्याचें घरदार सर्व बरोबरच. अपत्यांना वाढविणें, त्यांना शिक्षण देणें व मिळविलेल्या धनाचा व संस्कृतीचा वारसा त्यांना ठेवणें हा स्थिर जीवनांतला प्रकार त्यांना माहीतच नसतो. शाश्वत लभ्य, संरक्षणीय असें त्यांना कांहीच नसतें. त्यामुळे ते किसानवृत्ति मनुष्या-पेक्षा प्राणावर जास्त उदार असतात; आणि जो प्राणावर उदार तो जास्त शूर हा तर युद्धशास्त्रांतला पहिला सिद्धान्त आहे. संस्कृति आली को, प्राणाची किंमत वाढते व त्यांतूनच दौर्बल्य निर्माण होतें. महाभारतांत म्हटल्याप्रमाणे जे 'जीवितेषु निराश' ते खरे बलसंपन्न, ते पराक्रमी.. त्यांच्यापुढे लढाईंत कोणीच टिकत नाही.

पण संस्कृतीमुळे, उच्च तत्त्वामुळे येणारें हें जें दौर्बल्य, शौर्य साहसांत त्यामुळे येणारी जी उणीव, ती भरून काढण्याचीं साधनें सुदैवाने संस्कृतींतूनच हातीं लागतात. घरदार, शेती, प्रपंच, अपत्यें यांचा पाश नसल्यामुळे रानटी मनुष्य जास्त शूर होतो हें खरें. पण या प्रपंचावरचें मनुष्याचें प्रेम अत्यंत उत्कट झालें, प्राणार्पण करूनहि त्याचें रक्षण केलें पाहिजे अशा कोटीला हें प्रेम, ही भक्ति गेली तर त्या भक्तीमुळेच मनुष्य रानटी माणसा-इतका किंवा त्याच्यापेक्षाहि जास्त शूर होतो. धर्म, नीति यांच्या संस्कारा-भावीं रानटी मनुष्य स्वभावतःच क्रूर असतो व अचाट साहसी कर्माला तो नेहमीच सिद्ध असतो. पण सुसंस्कृत समाजांत धर्मनिष्ठाच इतकी प्रबल करतां येते की, त्या धर्मरक्षणासाठी रानट्यांपेक्षा दसपट साहसी कर्मे करण्यास मनुष्य सिद्ध होतो. व्यक्तिस्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य या उच्च मूल्यांचें असेंच आहे. यांनी भेद बळावण्याचा संभव आहे हें खरें; पण यांतूनच जी

बुद्धिनिष्ठा, विवेकनिष्ठा निर्माण होते ती पुरेशी प्रबल झाली तर व्यक्तिस्वातंत्र्यामुळे समाज छिन्नभिन्न होत नाही. ब्रिटनमध्ये युद्धकाळांतहि युद्धविरोधी प्रचारास मुभा होती. पण असा प्रचार कितीहि झाला तरी सर्व राष्ट्राने तसा विचार निश्चित करून पार्लमेंटमध्ये तसा ठराव करीपर्यंत एकहि ब्रिटिश नागरिक रणांगण किंवा युद्धकार्य सोडणार नाही ही ब्रिटिश अधिकाऱ्यांना खात्री असते. म्हणूनच त्यांना इतरांप्रमाणे व्यक्तिस्वातंत्र्याची भीति वाटत नाही. ब्रिटिश लोकांच्या या विवेकनिष्ठेमुळेच, उच्च मूल्यांमुळे येणारीं दौर्बल्यें त्या समाजांत शिरत नाहीत. स्थिरजीवनांतून संस्कृति जोपासली जाते व त्यांतूनच बुद्धीची वाढ होते. ही बुद्धि मनुष्याला मुत्सद्देगिरी, रणपांडित्य, विज्ञान व तज्जन्य श्रेष्ठ मारक हत्यार प्राप्त करून देते; आणि रानटयांच्या उपजत शौर्यधैर्यावर सुसंस्कृत मनुष्याला बुद्धिबळाने सहज मात करतां येते. यावरून असें दिसतें की, उच्च मूल्यांमुळे येणारें दौर्बल्य नष्ट करण्याचे उपाय उच्च संस्कृतींतून, उच्च मूल्यांतूनच साध्य होत असतात. जे समाज सावध राहून त्यांचा अवलंब करतात त्यांना हीनमूल्य रानटी समाजाची भीति बाळगण्याचें कांहीच कारण नसतें. पण हिंदूंसारखे जे समाज व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर विवेकनिष्ठा, नीतिमत्ता यांची जोपासना करीत नाहीत, संस्कृतीमुळे येणाऱ्या शरीरदौर्बल्याची, श्रेष्ठ मारक हत्यार, श्रेष्ठ संहारक शक्ति शोधून, जे समाज भरपाई करीत नाहीत, विभूतिपूजा, अंधनिष्ठा यांचा त्याग करतात, पण त्यामुळे गेलेलें सामर्थ्य बुद्धिनिष्ठ धर्मतत्त्वांचा अवलंब करून परत प्राप्त करून घेण्याची व्यवस्था जे समाज करीत नाहीत, अहिंसा, भूतदया, मानवता यामुळे येणारी मृदुता व तज्जन्य प्रतिकारशक्तींची कमतरता श्रेष्ठ संघनीतीने जे नाहीशी करीत नाहीत ते समाज हीनमूल्य रानटी समाजाच्या आक्रमणाला सहज बळी पडतात. संस्कृतीमुळे धनैश्वर्य वाढत जातें, पण त्याच वेळीं संयम, जितेंद्रियवृत्ति, निग्रह हे थोर गुण बाणवण्याची काळजी घेतली नाही तर समाज नाश पावतो. या सगळ्याचा अर्थ असा की, उच्च मूल्यांमुळे, श्रेष्ठ संस्कृतीमुळे लढाऊ लष्करी सामर्थ्यांत उणीव निर्माण होते हें जाणून त्या श्रेष्ठ संस्कृतींतूनच निर्माण होणारे धर्मनिष्ठा, नीतिनिष्ठा, संघविद्या, विवेकबल हे गुण व संस्कृतींतूनच प्राप्त होणाऱ्या

बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर प्राप्त होणारें शास्त्रज्ञान, औद्योगिक धन व तज्जन्य श्रेष्ठ संहारसामर्थ्य यांची जोपासना जो समाज करतो त्यालाच रानटी शक्तींचें आव्हान स्वीकारतां येतें. तिच्यावर मात करतां येते. या दृष्टीने अमेरिकेच्या एकंदर सामाजिक राष्ट्रीय सामर्थ्याचा आता आपणांस विचार करावयाचा आहे.

२१ मे १९५६ या दिवशीं पहाटे अमेरिकेने पॅसिफिक महासागरांत एच्. बॉंब प्रक्षेपणाचा प्रयोग केला. विल्यम लॉरेन्स या शास्त्रज्ञाने त्याचें प्रत्यक्ष पाहून केलेलें वर्णन 'तिसरें महायुद्ध घडणें अशक्य आहे' या आपल्या लेखांत दिलें आहे. त्यांत नेमका हाच विचार 'पुलिट्झर' पारितोषिक मिळविणाऱ्या या शास्त्रज्ञाने मांडला आहे. हा अग्निगोल म्हणजे अमेरिकेची व एकंदर लोकायत्त जगाची संरक्षक ढाल आहे, असें तो म्हणतो. याचें कारण असें की, या अग्निगोलाच्या ठायीं प्रलयंकर संहार-सामर्थ्य आहे. कांही शास्त्रीय हिशेब देऊन त्याने असें दाखविलें आहे की, दुसऱ्या महायुद्धांत प्रारंभापासून अखेरपर्यंत जेवढे अग्निगोल टाकले गेले त्याच्या पांचपट संहारशक्ति या एच्. बॉंबची आहे. नागासाकीवर टाकलेले अॅटमबॉंब या अग्निगोलापुढे केवळ ठिणग्या होत. या गोलाच्या ठायीं असें प्रलयसामर्थ्य असल्यामुळेच जगाला प्रलयाचें आता भय नाही असें हा लेखक म्हणतो. कोणाहि आक्रमकाला अमेरिकेवर आक्रमण म्हणजे केवळ आत्मघात आहे हें यावरून सहज ध्यानांत येईल; आणि यामुळेच जगाचें संरक्षण करण्यास, युद्धकल्पना अशक्य करून टाकण्यास हा अग्निगोल समर्थ आहे असें विल्यम लॉरेन्स याचें मत आहे.

अमेरिकेंतल्या इतर अनेक लेखकांनी अशाच तऱ्हेचे विचार प्रकट केले आहेत. त्यावरून हें ध्यानांत येईल की, उच्च सांस्कृतिक मूल्यें स्वत:च आत्मरक्षणाला समर्थ असतात, असला भ्रम अमेरिकेला नाही. भारताला असा भ्रम नित्य होत असतो. किंबहुना भारताची ही एक कायमचीच व्याधि आहे व तिच्यामुळेच तो कायमचा जर्जर व पंगु होऊन बसलेला आहे. रस्त्याने चाललेल्या अबलेची कोणींहि टवाळी करावी, कोणींहि तिचा पदर ओढावा, कोणीहि तिच्यावर अत्याचार करावा अशी गेलीं हजार वर्षें भारताची स्थिति आहे. अरब, अफगाण, मोंगल, तार्तर, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज यांनी आतापर्यंत हेंच केलें आहे; आणि आता पाकिस्तानी,

चिनी यांनी तोच प्रकार आरंभिला आहे. पण आम्हीं स्वीकारलेलीं सत्य, अहिंसा, मानवता, शांतता, अप्रतिकार, पंचशील, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, जगत्कल्याण हीं उच्च मूल्येंच आमचें रक्षण करतील अशी आमची श्रद्धा आहे. (पंडितजी, विनोबाजी, जयप्रकाशजी यांचीं भाषणें पाहा.) त्यामुळे आपण प्रस्थापिलेल्या लोकसत्तेला कोणी आव्हान देईल, तिला कशाची भीति आहे, असें आपल्याला वाटतच नाही. अमेरिकन शास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, इतिहासपंडित, मुत्सद्दी यांचें मत निराळें आहे. श्रेष्ठ मूल्यांचें संरक्षण श्रेष्ठ संहारशक्तीने होतें असें त्यांना वाटतें.

जेम्स मिचनेर या विख्यात अमेरिकन लेखकाने (व्हाइल अदर्स स्लीप) 'या निशा सर्वभूतानाम्' या आपल्या लेखांत अमेरिकेच्या स्ट्रॅटेजिक एअर कमांड(एस. ए. सी.)चें याच दृष्टीने वर्णन केलें आहे (रीडर्स डायजेस्ट जाने. '५८). सोव्हिएट रशिया लोकायत्त जगावर आक्रमण करील ही अमेरिकेला नित्य भीति वाटते. कारण आज रशियन नेते शांततेचीं भाषणें करीत असले तरी आक्रमक युद्ध, विश्वविजय, हें त्यांच्या जीवनाचें तत्त्वज्ञानच आहे. म्हणून या शत्रूची क्षणभरहि उपेक्षा करतां कामा नये असें पाश्चात्त्य जगाचें निश्चित धोरण आहे. त्यासाठीच अमेरिकेने चार भिन्न ठिकाणीं लष्करी तळ ठेवून तेथे बी ४७ जेट बॉंबर विमानें, त्यांचे वैमानिक आणि प्रलयंकर अग्निगोल अहोरात्र, चोवीस तास सन्नद्ध स्थितींत ठेवलेले आहेत. अध्यक्षांची आज्ञा येतांच वीस मिनिटांत ही संहारदेवता आपलें प्रलयनृत्य सुरू करील. इंधनासाठी मध्ये न उतरतां, एका दमांत पृथ्वीप्रदक्षिणा करतां येईल अशी या विमानांत व्यवस्था आहे. ताशीं ५०० मैल वेगाने हीं धावतात; आणि दुसऱ्या महायुद्धांतल्या सर्व संहारशक्तीं-पेक्षा जास्त घातक शक्ति या एकेका विमानांत असते. अशीं शंभर विमानें अमेरिकेने एकेक तळावर ठेविलीं आहेत. सोव्हिएट रशियाने हें सामर्थ्य जाणावें, त्याला याची संपूर्ण माहिती व्हावी अशीच अमेरिकेची इच्छा आहे. कारण यामुळेच या महाशक्तीचा उपयोग करण्याची वेळ येणार नाही व जगांत युद्ध अशक्य होईल अशी अमेरिकेची खात्री आहे. हीं अणुशस्त्रें कोणीच वापरूं नयेत असा सोव्हिएट रशियाने प्रचार चालविला

आहे; आणि आपण शांततावादी आहों, असें तो भासवीत आहे. पण असें केल्यास, या परमोदार तत्त्वाला अमेरिका बळी पडल्यास, जगाचा निश्चित नाश ओढवेल असें तेथील नेत्यांचें मत आहे. लोकायत्त देशांतील श्रेष्ठ मूल्यांचें रक्षण करण्यास दुसरें कोणतेंहि साधन सध्यातरी आपल्याजवळ नाही, असें लेखाच्या शेवटीं मिचनेरने बजावलें आहे.

पॉल पामर या लेखकाने अमेरिका व रशिया यांच्या बलाविषयी अमेरिकेच्या तीन मोठ्या लष्करी अधिकाऱ्यांची मुलाखत घेतली. अमेरिकेच्या नौदलाचे प्रमुख अॅडमिरल बर्क, विमानदलाचे उपसेनापति जनरल ली मे व अॅटॉमिक एनर्जी कमिशनचे अध्यक्ष लेविस स्ट्रास हे ते अधिकारी होत. तिघांच्याहि मतांचा इत्यर्थ असा की, सोव्हिएट रशियाशीं नजीकच्या भविष्यकाळांत युद्ध उद्‌भवण्याचा संभव नाही; कारण आपलें लष्करी सामर्थ्य कोणत्याहि आपत्तीला तोंड देण्यास पूर्ण सिद्ध आहे. तें क्षीण झालें तर मात्र युद्ध अटळ आहे. रशियाची प्रगति कौतुकास्पद आहे हें खरें. शास्त्रांत, औद्योगिक उत्पादनांत, व कांही प्रक्षेपणास्त्रांत त्याने अलीकडे खूपच भरारी मारली आहे; पण आपली बरोबरी करण्यास त्याला अजून फार काळ लागेल. मात्र आपण नित्य डोळ्यांत तेल घालून जागे राहिलें पाहिजे; कारण लोकशाही जगाशीं रशियाचें उभें हाडवैर आहे. तें त्याने बोलून दाखविलें आहे; आणि आपल्या जनतेला कायमचें युद्धोन्मुख करून ठेवणें हें त्याचें धोरण आहे, म्हणून आपल्याला लढाई गृहीत धरून सन्नद्ध, सुसज्ज राहिलें पाहिजे.

लष्करी सामर्थ्य, संहारशक्ति यांचा विचार झाल्यावर पामरने दुसरा प्रश्न या अधिकाऱ्यांना विचारला. नेहमी सन्नद्ध व सुसज्ज राहावयाचें तर त्या दृष्टीने अमेरिकन जनतेला आपल्या जीवनांत कांही बदल करावा लागेल काय ? रशिया सर्व शक्ति लष्करी निर्मितीवर केंद्रित करतो, जीवनधन पुरेसें निर्माण करीत नाही. त्यामुळेच त्याला कांही क्षेत्रांत आघाडी मारतां आली असें आपण म्हणतां. मग आपल्यालाहि तोच मार्ग अनुसरावा लागेल काय ? आपल्याला अर्वाचीन स्पार्टा व्हावें लागेल काय ? आपलें जीवन आज सुखी व समृद्ध आहे, आणि व्यक्तिस्वातंत्र्याचें वैभवहि आपल्याजवळ आहे. अफाट लष्करी खर्च पेलण्यासाठी आणि इतर दृष्टींनी आपल्याला या पातळीवरून खाली येणें अवश्य आहे काय ?

तीनहि अधिकाऱ्यांनी याला नाही असें उत्तर दिलें आहे. व्यक्तिस्वातंत्र्य कमी करण्याचा तर प्रश्नच नाही. समृद्धीचा थोडा प्रश्न आहे. त्यांतहि आज काटछाट करण्याची जरुरी नाही. वेळ आली तर आपल्या स्वातंत्र्या-साठी वाटेल तो त्याग करण्यास अमेरिकन जनता सदैव सिद्ध असते. त्यामुळे आज कसलाहि बदल करण्याची जरुरी नाही. आपण सध्या २०००० कोटी डॉलर्स दरसाल लष्करावर खर्च करतोंच आहों. हा त्याग कांही कमी नाही. यांतून पुरेसें लष्करी सामर्थ्य आज निर्माण होत आहे. हा त्याग करण्याची सिद्धता ठेवली म्हणजे झालें. मग आपल्याला आक्रमणाचें भय नाही.

अमेरिकेच्या या लष्करी शस्त्रास्त्रामागे केवढें शास्त्रज्ञान व केवढें औद्योगिक धन उभें आहे हें सर्वांना माहीतच आहे. त्याचें विवरण कर-ण्याची आवश्यकता नाही. कांही थोडे आंकडे दिले की, हें चित्र सहज उभें राहील. अमेरिकेचें राष्ट्रीय उत्पन्न दरसाल दीड लक्ष कोटि रु. आहे. तेथील लोकसंख्या अठरा कोटि आहे. ब्रिटनचें राष्ट्रीय उत्पन्न वीस हजार कोटि रु. असून लोकसंख्या पांच कोटि आहे. भारताचें राष्ट्रीय उत्पन्न सध्या ११००० कोटि रु. आहे आणि पांचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस तें २३००० कोटींपर्यंत वाढवावें अशी आपली आकांक्षा आहे. आपली लोकसंख्या ४२ कोटि आहे. या हिशेबानें अमेरिकेचें दरसाल दर माणशीं उत्पन्न दहा हजार रु. आहे, तर ब्रिटनचें ४००० रुपये, पाकिस्तानचें ३५० रु. आणि भारताचें ३०० रु. आहे. अमेरिका दरसाल १० कोटि मेट्रिक टन पोलाद निर्माण करते. रशिया ४·५ कोटि टन, पश्चिम जर्मनी २·४ कोटि टन, ब्रिटन २ कोटि टन, चीन २९ लक्ष टन, हिंदुस्थान १७ लक्ष टन व पाकिस्तान ११ लक्ष टन पोलाद निर्माण करतें. एका पोलादाच्या निर्मितीवरून बाकीच्या औद्योगिक धनाची कल्पना येईल. एकंदर जगांत जे रेडिओ आहेत त्यांतील शे. ४८ अमेरिकेंत आहेत. जगांतील टेलिफोनपैकी शे. ५७ टेलिफोन व मोटारींपैकीं शे. ७६ मोटरी अमेरिका वापरते. जगांतल्या एकंदर तेलापैकी शे. ६० व पोलादापैकीं शेकडा ४७ अमेरिका निर्माण करते. १८५० सालीं अमेरिकेंतील कामगाराला आठवड्यांतून ७२ तास काम करावें लागे. आज तेथें ४० तासांचा आठवडा आहे. चीन, रशिया येथील कोंडवाड्यांतून रोज वीसवीस तास कामगाराकडून काम करून घेतात.

अमेरिकेचें शस्त्रास्त्रबल, औद्योगीकरण व त्या राष्ट्राचें ऐहिक ऐश्वर्य यांचा विचार केला. पण मागे एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणे लष्करी सामर्थ्य एवढ्यावरच अवलंबून नाही. अत्यंत संघटित असें राष्ट्र हें लष्करी सामर्थ्याचें खरें लक्षण होय. त्याचा आता विचार केला पाहिजे. सामान्यत: आर्थिक, सामाजिक, धार्मिक इ. अनेक भेदांनी अनेक देशांत समाज छिन्नभिन्न झालेला असतो आणि राष्ट्रसंघटनेच्या आड हे भेद किंवा ही विषमता प्रामुख्याने येत असते. त्यांतील आर्थिक विषमता हें सर्वांत घातक असें जें भेदकारण त्याचा विचार आपण प्रथम करूं. दण्डायत्त देशांत ही विषमता असतेच. ती पराकोटीला पोचलेली असते. पण यम-दण्डाच्या जोरावर तेथील नेते दरिद्री जनतेला नियंत्रणांत ठेवून संघटना टिकवून धरीत असतात. अंधविभूतिपूजा हा त्यांचा दुसरा एक प्रभावी मार्ग असतो हें वर सांगितलेंच आहे. लोकसत्तेला यांतल्या कोठल्याच उपायाचा अवलंब करतां येत नाही. एकारलेल्या संपत्तीचा निचरा करणें, विषमता नष्ट करणें हा एकच उपाय येथे शक्य आहे. अमेरिकेने त्याचा अवलंब कसा केला तें पाहूं.

शंभर वर्षांपूर्वी मार्क्सने भविष्य करून ठेविलें होतें की, यापुढे भांडवल-दारांची, धनिकांची श्रीमंती वाढत जाईल आणि कामकरी, शेतकरी हा जास्त दीन, दरिद्री होत जाईल आणि शेवटीं या दोन वर्गांत कमालीची विषमता निर्माण होऊन त्यांतून भयंकर वर्गविग्रह निर्माण होईल. मार्क्सचें हें भविष्य खरें झालें असतें, तर आज जगांत कोठेहि लोकसत्ता दृष्टीस पडली नसती.

असल्या विषमतेंत लोकसत्ता कधीच टिकत नसते. अमेरिकेंत गेल्या शतकाच्या अखेरीस तशी परिस्थिति निर्माण झाली होती; पण अमेरिकन भांडवलदार, अमेरिकन मुत्सद्दी व नेते हे शहाणे आहेत. त्यांनी हळूहळू एकारलेल्या संपत्तीचा निचरा करून वर्गविग्रहाचा पायाच नष्ट करून टाकला. आज अमेरिकेंत भांडवलदार वर्गाइतकेच मध्यम वर्ग व कामगार वर्ग प्रभावी आहेत. राष्ट्रीय जीवनावर, संस्कृतीवर, राजकारणावर तेहि धनिकांइतकेंच वर्चस्व गाजवूं शकतात. शिक्षणाचा प्रसार हें त्याचें एक कारण आहे, पण त्या शिक्षणामुळेच त्यांना प्राप्त झालेलें धननियंत्रणाचें

सामर्थ्य हेंहि एक प्रभावी कारण आहे. हॉरवर्ड विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक समनर स्लीचर यांनी अमेरिकेंतील या शांततामय क्रांतीचें चांगलें विवेचन केलें आहे. इंजिनीयर, डॉक्टर, वकील, प्राध्यापक, तंत्रज्ञ, लेखक, संपादक, हिशेबनीस, व्यवस्थापक हा फार मोठा मध्यमवर्ग गेल्या ७५ वर्षांत निर्माण झाला आहे. या वर्गांतील स्त्रियाहि आता व्यवसायांत उतरल्या आहेत. त्यामुळे सध्या या वर्गांतील अनेक कुटुंबांचें मासिक उत्पन्न २५०० ते ५००० रु. पर्यंत असतें. १९३५ ते १९५० या पंधरा वर्षांत अगदी तळाशीं असलेल्या लोकांपैकी अनेक लोकांची क्रयशक्ति शे. ७८ पर्यंत वाढली, तर शिखराशीं असलेल्या धनिकांची क्रयशक्ति शे. १७ वाढली. अशा स्थितींत वर्गविग्रहाच्या धारा बोथट होऊन गेल्यास नवल नाही. शिक्षण हें सार्वत्रिक व मोफत झाल्यामुळे पूर्वीच्या कष्टकरी वर्गांतील अनेक लोक आता उच्चपदीं जाऊं शकतात. बहुतेक कांहींना कांही व्यवसाय वा तंत्र ते शिकतात. त्यामुळे केवळ हमाली करणारा वर्ग अमेरिकेंतून नाहीसा होत आहे; आणि जो थोडा आहे तो अगदी दुर्मिळ झाल्यामुळे त्याला भरमसाट पैसे मिळतात. अमेरिकेंत चांगल्या सधन कुटुंबालाहि हल्ली गडी वा मोलकरीण परवडत नाही, इतका त्यांचा पगार भारी झाला आहे. याच वर्गांत ९० टक्के लोक येऊन पडतील असें मार्क्सचें भविष्य होतें. त्यांत सध्या शे. १० सुद्धा नाहीत.

कामगारांची तर अमेरिकेंत इतकी सुस्थिति आहे की अमेरिकेंतील अत्यंत मोठ्या कामगार संघटनांचे एक अध्यक्ष वाल्टर सेनेरॅझो यांनी कंपनीच्या कारखान्याच्या हिताहिताची आपण काळजी वाहिली पाहिजे, पगारवाढ मागतांना कारखान्याला इतकी पगारवाढ परवडेल का नाही, याचाहि विचार आपण केला पाहिजे असा आपल्या अनुयायांना उपदेश केला आहे. याचें कारण काय ? अमेरिकेंत अनेक कारखानदार सध्या कामगारांच्यापुढे हिशेब मांडून त्यांच्या सहकार्यानेच काम चालविण्याचें धोरण आखीत आहेत. भांडवलदार, व्यवस्थापक व कामगार हे कारखान्याचे तीन समबल घटक असून या पद्धतीला सहकारी भांडवलशाही म्हणावें असें सेनेरॅझो म्हणतात. जेव्हा जेव्हा पगारवाढ मागावयाची तेव्हा कामगारांनी आपली उत्पादनशक्ति आपण वाढविली आहे काय, याचा विचार आधी

केला पाहिजे. कंपनीचें उत्पन्न वाढलें नसतांना पगारवाढ मागणें हें अंतीं कामगारांनाच घातक ठरतें; कारण तितक्या वस्तूंच्या किमती वाढून बसतात, आणि न वाढल्या तर कंपनीचा तोटा होतो असा विचार अमेरिकेंतील कामगारनेते करूं शकतात. याला फार मोठा अर्थ आहे. कंपनीच्या कारखान्याच्या नफातोटयांत त्यांचें हिताहित असावें इतकें या अर्थव्यवस्थेवर त्यांचें नियंत्रण सध्या आहे, हें स्पष्ट आहे. यामुळे सरकारी नियंत्रणास, सरकारी हस्तक्षेपास कामगारांचा अमेरिकेंत विरोध आहे. ही खरी लोकशाही होय. कायद्याने केलेलें अर्थनियोजन, म्हणजेच समाजवादी अर्थव्यवस्था अमेरिकेंत कामगारांनाहि नको आहे. याचा अर्थ असा की, कायद्याच्या दण्डावाचून भांडवलदारवर्ग संपत्तीची वांटणी करण्यास आपण होऊन तयार आहे. ' वर्गविग्रह समूळ नष्ट करण्याचा मार्ग ' हेंच सेनेरॅंझो यांच्या लेखाचें नांव आहे. (हाऊ टु किल क्लास स्ट्रगल--रीडर्स डायजेस्ट, सप्टें. १९४१) अमेरिकेंत बहुसंख्य कामगारांच्या घरीं रेडिओ असतो, अनेकांना स्वतःची मोटर असते आणि या वर्गांतील मनुष्य आता मंत्रिपदापर्यंत जाऊं शकतो हें आपण अनेक ठिकाणीं वाचतों. ' स्वतःच्या देशाचा पराभव घडवून आणणें हें कामगारांचें पहिलें कर्तव्य होय ' हा मार्क्सवादी कम्युनिस्ट नेत्यांचा उपदेश अमेरिकन कामगार कितपत मानतील हें यावरून दिसून येईल. वर्गविग्रहामुळे निर्माण होणारे भेद, विषमतेमुळे राष्ट्रसंघटनेस निर्माण होणारा धोका, कम्युनिस्टांच्या प्रचारामुळे समाजांत निर्माण होणारी बेदिली व यांतून निर्माण होणारें दौर्बल्य नष्ट करण्याचा अमेरिकेचा हा मार्ग आहे.

' दि चॅलेंज टु डिमॉक्रसी ' या नांवाच्या ग्रंथांत लेखक थिओडोर ब्लेच व जोसेफ बॉब गार्टनर यांनी ' अमेरिकन कॅपिटॅलिझम मीट्स् दि चॅलेंज ' या एका स्वतंत्र प्रकरणांत अमेरिकन भांडवलशाहीने लोकसत्तेचें हें आव्हान संपत्तीचा निचरा करून, कामगारांना सुस्थितीची राहणी देऊन कसें स्वीकारलें याचें वर्णन केलें आहे. कामाच्या वेळाच्या हिशेबांत त्यांनी वस्तूंच्या किमती दिल्या आहेत त्या उद्बोधक आहेत. ३८ मिनिटांच्या कामांतून जो पैसा मिळतो त्यांतून कामगाराला १ पौंड मांस मिळूं शकतें. ३४ मिनिटाला एक डझन अंडीं मिळतात, २३ मिनिटाला १ पौंड कॉफी मिळते. एका आठवडयांत कामगार ४० तास म्हणजे २४०० मिनिटें

याप्रमाणे काम करतो. यावरून तेथील जीवनमानाची कल्पना येईल. अजून पुष्कळशी सुधारणा व्हावयास पाहिजे असें सांगतांना लेखक म्हणतात की, अजून अमेरिकेंत शे. १३ कुटुंबांचें वार्षिक उत्पन्न ५००० रु. पेक्षा कमी आहे, ही चिंतनीय गोष्ट आहे. यावरून शे. ८७ कुटुंबांचें उत्पन्न ५००० रु. च्या वर आहे एवढें निश्चित झालें. दुसऱ्या महायुद्धाच्या आधीच अमेरिकन कामगारांची क्रयशक्ति ब्रिटिश कामगारांच्या दुप्पट, जर्मनांच्या तिप्पट व इटालियनांच्या चौपट होती. त्यानंतर गेल्या बारा वर्षांत अमेरिकेचें राष्ट्रीय उत्पन्नच तिपटीने वाढलें आहे. त्यांतील सर्व धन कामगारांना मिळत नसलें तरी तेथील कारखानदारीवर सरकारने जीं नियंत्रणें घातलीं आहेत आणि संपत्तीच्या वांटणीचे जे कायदे केले आहेत ते पाहतां अमेरिकेंत लोकशाहीला विघातक अशी आर्थिक विषमता यापुढे कधीच निर्माण होऊं शकणार नाही यांत शंका नाही.

वर्णविषमता हाहि अमेरिकेंत आर्थिक विषमतेइतकाच बिकट प्रश्न होता. अमेरिकेंत १८ कोटि लोकसंख्येपैकी जवळ जवळ दोन कोटि लोक निग्रो आहेत. या जातीचा गेल्या शतकांत केवढा भयंकर छळ होत असे हें जगजाहीर आहे; आणि काळ्या व गोऱ्या समाजांतील हें हाडवैर असेंच तीव्र स्वरूपांत आजपर्यंत राहिलें असतें तर अमेरिकन समाज दुभंगण्याचा बराच संभव निर्माण झाला असता. मध्यंतरीं झालेल्या लिट्ल रॉक येथील शाळेच्या प्रकरणावरून हें वर्णवैषम्य अमेरिकेंत तसेंच कायम आहे असा सर्व जगाचा समज झाला होता. अमेरिकेच्या हितशत्रूंनी पराचा कावळा करून त्या देशाची शक्य तितकी बदनामी करण्याचाहि प्रयत्न केला होता. पण याच सुमारास अमेरिकेचे कामगारमंत्री जेम्स मिचेल यांनी एक लेख लिहून या वर्णविषमतेच्या क्षेत्रांतहि शांतपणें केवढी क्रांति झाली आहे, होत आहे याची माहिती दिली आहे. त्यावरून हीहि बिकट समस्या अमेरिकन समाज लवकरच सोडवील असें दिसतें. आज अमेरिकेंत ७ ते १३ वयाच्या शे. ९८ निग्रो मुलांमुलींना गोऱ्या लोकांप्रमाणेच शिक्षण मोफत मिळतें. ४८ पैकी ३२ संस्थानांत विभक्त शाळा मुळीच नाहीत, आणि तेथे कधी बखेडेहि माजले नाहीत. १९३० सालीं २७ हजार निग्रो तरुण विद्यार्थी कॉलेजचें शिक्षण घेत होते. आज ही संख्या दोन लाखांच्या

आसपास गेली आहे; आणि या शिकलेल्या विद्यार्थ्यांना पुढे व्यवसाय मिळवून देण्याची सोयहि सरकारने केली आहे. अमेरिकन सरकार दरसाल अब्जावधि रुपयांचीं कंत्राटें ठेकेदारांना देतें. तीं देतांना वर्णभेद पाळला जाणार नाही अशी अट घातलेली असते, आणि ती अट पाळली जाईल अशी दक्षता घेतली जाते. अमेरिकन सनदी नोकरींत आज शेकडा २४ नोकर निग्रो असून अध्यक्ष आयसेनहोअर यांच्या कारभारांत वरच्या जबाबदारीच्या जागीं आज तीनशें निग्रो आहेत. निरनिराळ्या उद्योगधंद्यांत व बौद्धिक व्यवसायांतहि निग्रोंचें प्रमाण वाढत असून ते तेथे गोऱ्या लोकांइतकेच यशस्वी होत आहेत. निग्रोंच्या २०० विमाकंपन्या आहेत, १४ पेढ्या आहेत, ३० सहकारी संस्था आहेत. यांत कोट्यवधि रुपयांची उलाढाल होत असून अनेक गोरे लोकहि त्यांत भागीदार आहेत. वृत्तपत्रें, कामगारसंघटना, विमाव्यवसाय, शास्त्रसंशोधन, सरकारी समित्या, कारखाने अशा अनेक व्यवसायांत आज उच्चपदावर, क्वचित् मुख्यपदावरहि निग्रो जाऊं शकतात आणि त्यांच्या हाताखाली शेकडो गोरे लोक काम करीत असतात. अमेरिकेच्या लष्करांत कसल्याहि प्रकारचें वर्णवैषम्य नाही, आणि लिट्ल रॉक येथे पाठविलेलें सैन्य अगदी पूर्ण मिश्र स्वरूपाचें होतें ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. एवढ्यावरूनच आज निग्रोजातीयतेचा प्रश्न संपूर्ण सुटला आहे असें जरी म्हणतां येत नाही, —श्री. मिचेल तसें म्हणतहि नाहीत — तरी समाज-संघटनेला तडा जाईल, राष्ट्रीय सामर्थ्यांत वैगुण्य निर्माण होईल असें त्याचें रूप निश्चितच राहिलेलें नाही. अमेरिकन नागरिकांच्या राष्ट्रीय दृष्टीचा हा मोठाच विजय आहे.

अमेरिकेचें शास्त्रज्ञान, तेथलें औद्योगीकरण, त्यामुळे निर्माण झालेली अपार संपत्ति, भांडवलदारांनी विवेक जागृत ठेवून राष्ट्रहितदृष्टीने संपत्तीची थोडी न्याय्य वांटणी करण्याचें धोरण पत्करल्यामुळे तेथे प्रस्थापित होत चाललेली आर्थिक समता, त्याचप्रमाणे वर्णविद्वेष लुप्त करून अमेरिकन जनतेने मान्य केलेली वर्णसमता हें सर्व त्या राष्ट्राचें मोठें वैभव आहे यांत शंका नाही; आणि यामुळेच अमेरिकेला सर्व जगांत अग्रपूजेचा मान मिळत आहे. पण अलीकडे गेल्या ३०।४० वर्षांत या वैभवाला एक कीड लागत चाललेली आहे. एक फार मोठा रोग या वैभवाला ग्रासीत चालला आहे.

त्या रोगाचें नांव राजकारण. या शब्दाचा अशा अर्थाने उपयोग व्हावा हें मोठें दुर्दैव होय; पण आज जगांत बहुतेक सर्व लोकायत्त देशांत राजकारण या शब्दाला असाच अर्थ प्राप्त झाला आहे. डॉ. जॉन्सन याने आपल्या कोशांतच पॉलिटिक्स या शब्दाचा अर्थ 'मवाल्यांचा धंदा' असा देऊन ठेवला आहे. दुर्दैवाने आज तो अर्थ अक्षरशः खरा होत आहे. लोकसत्ताक जगावर हें मोठें भयानक संकट आहे. राजकीय क्षेत्रांत न्याय्य मार्गाने सत्ता काबीज करणें व ती प्राप्त झाल्यानंतर समाजाचें उत्तम शासन करणें हा या शब्दाचा मूळ अर्थ; पण जगभर राजकारणी लोकांनी स्वार्थलंपट होऊन जे उद्योग चालविले आहेत त्यामुळे त्याला बरोबर उलट व विपरीत अर्थ प्राप्त झाला आहे. सूक्तासूक्त न पाहतां गुंडगिरी करून कोणत्याहि मार्गाने सत्ता काबीज करणें आणि ती हातीं येतांच आपले इष्टमित्र, सगे-सोयरे, संबंधी यांच्या तुंबड्या भरण्यासाठी त्या सत्तेचा जास्तींत जास्त उपयोग करणें, नागरिकांची लूट करणें, आणि या स्वार्थाच्या आड येणाऱ्यांचा कांटा काढणें या अर्थी हल्ली राजकारण हा शब्द वापरला जातो. त्यामुळे अमेरिकेंत पॉलिटिक्स, पॉलिटिशिअन हे शब्द शिवीसारखेच वापरण्यांत येतात. अमेरिकेला या रोगाने किती ग्रासलें आहे त्याची यावरून कल्पना येईल. पुढे आपल्याला भारतीय लोकसत्तेचा विचार करावयाचा आहे. ती दृष्टि ठेवून येथे जरा जास्त विस्ताराने अमेरिकेच्या या सामाजिक व्याधीचा विचार केला आहे.

१९४६ सालची ही गोष्ट आहे. त्या वेळीं जॉन विल्यम्स् हे एक सिनेटर होते. सारा भरण्यासाठी म्हणून त्यांनी विल्मिंटन-डेलावेअर येथील इंटर्नल रेव्हिन्यू खात्याच्या कचेरींत चेक पाठविला, तरी कांही दिवसांनी त्यांना सारा थकल्याची नोटीस आली. तेव्हा त्यांनी या प्रकरणीं लक्ष घातलें, आणि मग प्रकरणांतून प्रकरण निघून सर्व अमेरिकेचें हें महसूल खातें किती भ्रष्ट आहे, कोटयवधि रुपयांची अफरातफर तेथे कशी चालते, ही अफरातफर करणाऱ्यांच्या मागे अमेरिकेच्या ॲटर्नी जनरलपर्यंतचे अधिकारी कसे असतात आणि त्यांना सिनेटर, गव्हर्नर या राजकारणपटु लोकांचा पाठिंबा कसा असतो हें सर्व जॉन विल्यम्स यांना दिसून आलें. त्यांनी मग ही मोहीमच हातीं घेतली. विल्मिंटन ऑफिसमधील एक

अधिकारी ५०० लोकांनी भरलेला सारा दरसाल असा गिळंकृत करीत असे. तेथील एका स्त्री-कारकुनाने पुराव्यासह हें कलेक्टरपुढे मांडलें. पण तेथे तें प्रकरण दडपलें गेलें आणि त्या स्त्रीलाच ठपका मिळाला. जॉन विल्यम्स् यांनी त्यावर चौकशी समिति नेमली. तरी हा अधिकारी अगदी प्रामाणिक आहे असा कलेक्टर निर्वाळा देऊं लागले. प्रकरण आणखी पुढे गेलें तेव्हा तो पैसे भरण्यास तयार झाला, पण त्याला पाठिंबा देणाऱ्या वरच्या अधिकाऱ्याला शिक्षा तर नाहीच झाली, उलट बढती मिळाली ! यानंतर न्यूयॉर्क, मिसूरी येथील महसूल खात्यांकडे विल्यम्स् वळले; आणि शेवट-पर्यंत चिकाटी धरून त्या खात्यांतील घाणीचा त्यांनी उपसा केला. यांत ॲसि. ॲटर्नी जनरल बडतर्फ झाले, महसूल खात्याचे मुख्य कमिशनर यांनी राजीनामा दिला व तीस-चाळीस कमिशनरांना शिक्षा झाल्या. वॉशिंग्टनला असलीं प्रकरणें नित्य धाडलीं जातात; पण तेथेहि तीं दडपलीं जात असत. जॉन विल्यम्स् यांच्या या शुद्धीकरणानंतर त्याला कांहीसा आळा बसला. या प्रकरणांतील आपला अनुभव सांगतांना जॉन विल्यम्स् म्हणतात, "मला केवळ गुन्हेगार, भामटे, यांच्याशींच मुकाबला करावा लागला असें नाही, तर त्यांच्या मागले मोठे सरकारी अधिकारी व राजकारणी यांच्याशींहि लढा करावा लागला. ही सर्व भ्रष्टता, ही हीनता, हा अधमपणा, हा अपहार, ही लूट यांच्यावर पांघरूण घालण्याचा ते प्रयत्न करतात; आणि गुन्हेगाराला ते पाठीशीं घालतात. प्रत्यक्ष भ्रष्टतेपेक्षा हें राजकारण जास्त घातक आहे." जॉन विल्यम्स् यांनी या प्रकरणीं अपार कष्ट केले व सर्व घाण धुऊन काढली म्हणून त्यांचा अमेरिकेंत मोठा गौरव झाला, पण त्यांना पदच्युत करण्याची मोहीमहि राजकारणी लोकांनी त्याच वेळीं सुरू केली.

१९३५–३६ सालीं झालेलें अमेरिकेंतील पेन्शन प्रकरण याच प्रकारचें आहे. किंबहुना जीवनाच्या सर्व क्षेत्रांतलीं सर्व प्रकरणें अशींच व याच प्रकारचीं आहेत. सरकारने किंवा कोणत्याहि संस्थेने कोणत्याहि सत्कार्या-साठी जो पैसा मंजूर केला असेल त्याचा ओघ आपल्या खिशाकडे वळविणें हा या राजकारणी लोकांचा धंदा. मग तें कार्य म्हणजे सर्वोदय असो, की सर्वनाश (युद्ध) असो. बालकाच्यासाठी दिलेला निधि असो, दुष्काळनिधि असो किंवा निराश्रित विधवांचें धन असो. राजकारण यांत भेदाभेद

करीत नाहीं. त्या त्या निधीच्या नियंत्रण समितीवर आपलीं माणसें निवडून आणणें, नेमून घेणें व मग तेथे अधिराज्य चालवून लूट करणें हें प्राप्तव्य ! यांत जे साह्य करतील त्यांना पैसा, प्रतिष्ठा, पदव्या व मद्यादि इतर सुखविलास मिळवून देणें व जे विरोध करतील त्यांना बदली, बडतर्फी, धमक्या, घरादाराला आग लावणें इ. मार्गांनी नमविणें आणि इतकेंहि करून तें न जमल्यास त्यांचा खून करणें असें हें राजकारणतंत्र आहे. लोकशाहींत याला कसें तोंड द्यावयाचें हा फार मोठा प्रश्न असतो; कारण रस्त्यावरचा शिपाई, पोलीस, अधिकारी, कलेक्टर येथपासून अॅटर्नी जनरलपर्यंत सरकारचे अधिकारी यांत शामील असतात. गुंड, दरोडेखोर, खुनी यांच्या सेना त्याच्या आश्रयाला असतात. राजकीय पक्षांतून सेनेट, हाऊस यांवर निवडून आलेले देशाचे कायदे करणारे राजकारणी लोक हे वास्तविक लोकशाहीचे आधार; पण तेच आज अशा रीतीने लोकशाहीचे व अंतीं राष्ट्राचे काळ ठरतात.

१९३५ – ३६ च्या सुमारास ७० वर्षांवरच्या निराश्रित गरीब वृद्धांना पेन्शन द्यावयाचें असें सरकारने ठरविलें, आणि राजकारणी लोकांना चरायला एक नवीन कुरण मिळालें. एकाएकी प्रत्येक स्टेटमधील अशा लोकांची संख्या वाढूं लागली. कॅनसासमध्ये दर शंभर वृद्धामागे असे चाळीस लोक निघाले तर ओक्लाहोमामध्ये साठ ! न्यूयार्कमध्ये अधिकारी प्रामाणिक होते, तेथे असे निराश्रित, पेन्शनयोग्य वृद्ध शंभरी १३ च सापडले. सेंट लुईमध्ये डॉ. केन हे अध्यक्ष होते. त्यांनी अशा वृद्धांची गणना करण्यासाठी कारकून नेमण्याचें ठरविलें. त्या वेळीं खुद्द गव्हर्नरांनी सहा कारकून पाठविले. त्यांतील एक नुकताच तुरुंगांतूनच सुटून आला होता. दुसरा दारुड्या होता. त्याला नुकतेंच नोकरीवरून काढलें होतें. तिसरा अगदीं अनाडी होता. डॉक्टर केन यांनी या सर्वांना हाकलून दिलें आणि हें वृत्त वर्तमानपत्रांत दिलें. त्यानंतर त्यांना जरा बरीं माणसें मिळालीं, पण एकंदरींत प्रत्येक प्रांतांत पेन्शनयोग्य वृद्धांची संख्या भरमसाट वाढली. एका सरकारी अधिकाऱ्याला दरमहा २५०० रु. पगार होता. त्याच्या मातापित्यांचीं नांवेंहि वरील निराश्रितांच्या यादींत सापडलीं. तेव्हा मग चौकशी सुरू झाली, आणि एकेका स्टेटमध्ये दोन दोन हजार लोकांचीं नांवें यादींतून काढावीं लागलीं; कारण त्यांची सुस्थिति होती. एच. जे. डेंटन या

अधिकाऱ्याने हें यादीशुद्धीचें काम मोठ्या धैर्याने केलें. पुष्कळ वेळा खोट्या याद्यांच्या बाजूने गव्हर्नरासारखे उच्च पदावरचे अधिकारीहि उभे असल्याचें त्याला आढळून आलें.

शिकागोच्या एज्युकेशन बोर्डात १९३४ सालीं असाच राजकारणी प्रकार घडला. त्याचें वर्णन करणारा लेखक फ्रँक् एस्. मीड (रीडर्स डायजेस्ट नो. '४७) यानेहि ही प्रत्येक गांवाचीच कहाणी आहे असें प्रारंभींच म्हटलें आहे. तो नागरिकांना उद्देशून म्हणतो, "तुम्ही शिक्षणाचा कर भरणें व मुलांची फी देणें यापलीकडे या क्षेत्रांत लक्ष घालीत नाही. जागरूक राहात नाही. त्यामुळे हा कारभार राजकारणी लोकांच्या हातीं जातो." शिकागो एज्युकेशन बोर्डाचा कारभार असाच दोन राजकारण्यांनी हाताखाली घातला होता. हा कारभार म्हणजे ४० कोटींचा मामला होता. बोर्डाच्या नियंत्रणाखाली ४०० शाळा, साडेतीन लक्ष विद्यार्थी व १३००० शिक्षक होते. एडवर्ड केली हा शिकागोंतील राजकीय यंत्रणेचा दादा होता. तो स्वत: महापौर म्हणून निवडून आला. लगेच त्याने आपला मित्र मकॉहे याला एज्युकेशन बोर्डाचा अध्यक्ष केला, आणि त्याने आपला मित्र विल्यम जॉनसन याला सुपरिंटेंडेंट ऑफ् स्कूल्स् म्हणून निवडून आणलें, आणि मग यांनी अक्षरश: नंगा नाच घालण्यास सुरुवात केली. परीक्षक मंडळ त्यांनी ताब्यांत घेतलें आणि आपल्याला हवे तेच लोक पास होतील अशी व्यवस्था केली. त्यांनी पास केलेल्या लोकांतील शे. ८१ लोक लेखी परीक्षेंत नापास झाले होते, पण तोंडी परीक्षेमध्ये मार्कांची खैरात करून यांनी त्यांना पास केलें. जॉनसन याचा एक क्लास असे. त्यांत नांव घालतील व अन्य तऱ्हेने निवडणुकांत साह्य करतील तेच लोक फक्त पास व्हावयाचे हें आता ठरून गेलें. बदली, बडतर्फी, यांचें त्यानंतर असें कांही सत्र सुरू झालें की, शिक्षक व नागरिक हैराण होऊन गेले. शिक्षणाला कांही रयाच राहिली नाही. कारण कालचे शिक्षक आज नाहीत, आजचे प्राचार्य उद्या नाहीत, असें नित्य होऊं लागलें. जॉनसन यांनी आपलीं व आपल्या संबंधितांचीं वीस पाठ्यपुस्तकें मंजूर करून घेतलीं. इतरांचीं सर्व काढून टाकलीं. अमेरिकेंतल्या एका विख्यात नगरींतल्या साडेतीन लक्ष विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा या तीन राजकारणी मवाल्यांनी असा खेळखंडोबा करून टाकला. अर्थात् शेवटीं नागरिक

जागे झाले. त्यांनी एक चौकशी समिति नेमली आणि हे सर्व प्रकार बाहेर येतांच त्या तिघांना बडतर्फ केलें. आता तेथील शिक्षणव्यवस्था उत्तम आहे. पण मवाल्यांचा तो नंगा नाच चार वर्षें चालू होता.

राजकारणी लोकांची ही प्रतिष्ठित दरोडेखोरी फार जुनी आहे. लोकशाहीच्या जन्माबरोबरच ती जन्मली आहे. पण तिला गेल्या ३०–४० वर्षांत अत्यंत उग्र, हिडीस व घोर रूप प्राप्त झालें. त्याचें कारण असें की, या काळांत पहिल्या जातीला, तसल्याच प्रतिष्ठित दरोडेखोरांची दुसरी एक जात येऊन मिळाली आहे, आणि ज्योतिषांत दोन पापग्रहांची युति झाली म्हणजे त्यांचीं फलितें जशीं जास्त घातक होतात त्याचप्रमाणे अमेरिकेच्या सामाजिक जीवनांतील या दोन पापग्रहांची युति झाल्यामुळे अमेरिकन लोकशाहीला ती जास्तच घातक झाली आहे. हा दुसरा पापग्रह, प्रतिष्ठित दरोडेखोरांची ही दुसरी जात अमेरिकेंतील दारूबंदीच्या काळांत आणि त्यांतहि १९१८ ते १९३२ या काळांत उदयास आलेली आहे. बेकायदा दारू पुरविणाऱ्या लोकांच्या त्या वेळीं टोळ्यांच्या टोळ्या निर्माण झाल्या आणि मारामाऱ्या, रक्तपात, खून हे त्या वेळीं नित्याचे प्रकार झाले. या टोळ्यांच्या नाइकांना त्या वेळीं इतका अमाप पैसा मिळाला की, भांडवलदारांनी पूर्वीच्या काळांत मिळविलेला पैसा त्याच्या तुलनेने कांहीच नव्हे. अलकॅपोन हा त्या वेळीं चोरट्या दारूचा बादशहा होता. त्याचें महिन्याचें उत्पन्न १२ कोटि रुपयांचें असे. हें धन पेरून तो साध्या शिपायापासून ॲटर्नी जनरलपर्यंत सर्वांना मिंधे करून टाकीत असे. अमेरिकन जीवनाला महारोग जडूं लागला तो या दारूबंदीच्या काळांत. कारण पुढें दारूबंदी उठली तरी या दरोडेखोरांच्या टोळ्या बरखास्त झाल्या नाहीत. त्यांनी आपला मोहरा सर्व व्यवसायांकडे वळविला. कापड, भांडीं, किराणा, भुसार यांचे व्यापारी, हॉटेलवाले, परीट, न्हावी, अशा प्रत्येक व्यवसायाचें एक मंडळ (असोसिएशन) असतें, त्याचप्रमाणे अमेरिकेंत या प्रत्येक धंद्याच्या लोकांकडून दहशतीने दरमहा बांधून पैसा वसूल करणारें एक दरोडेखोरांचें मंडळ असतें. दरमहा ठरलेले १००, २००, ५०० डॉलर्स दिले नाहीत तर कापडाच्या दुकानाला आग लागेल, हॉटेलच्या अन्नांत विष सापडूं लागेल, व्यापाऱ्यांचे ट्रक्स इष्टस्थळीं पोचणार नाहीत. स्वातंत्र्याच्या,

धैर्याच्या गप्पा मारणारे अमेरिकन लोक निमूटपणें आज कोटयवधि, अब्जावधि रुपयांचा हा कर खालच्या मानेने भरीत आहेत, अपमान सोशीत आहेत.

या प्रकाराला अमेरिकेंत रॅकेटिअरिंग असें म्हणतात. त्याची स्पष्ट कल्पना येण्यासाठी एक उदाहरण देतों. डच शूल्ट हा दारूबंदीच्या काळांत अलकॅपोनप्रमाणेच उदयास आलेला, तसल्याच एका टोळीचा नाईक होता. दारूबंदी उठणार व आपला धंदा बसणार हें पाहून १९३१ सालीं त्याने न्यूयार्क नगरींतील हॉटेलांच्या ' संरक्षणाची ' योजना आखली. लवकरच त्याला दरसाल एक कोटि रु. मिळूं लागले. त्याच वेळीं पुढे न्यूयार्कचे गव्हर्नर म्हणून विख्यात झालेले थॉमस डयूई हे डिस्ट्रिक्ट अॅटर्नी म्हणून नेमले गेले होते. अत्यंत निःस्पृह, वेडर व चलाख म्हणून त्यांची कीर्ति झाली होती. हा माणूस आपल्या मुळावर येणार हें जाणून डच शूल्ट याने त्यांचा खून करण्याचें ठरविलें. पण या काळांत या दरोडेखोरांनी सिंडिकेट्स्, बोर्डस, असोसिएशन्स् स्थापन करून आपल्या धंद्याला भांडवली व्यवसायाप्रमाणे व्यवस्थित रूप दिलें होतें. डच शूल्ट याच्या सिंडिकेटने हा खून नामंजूर केला. कां? सभासद म्हणाले की, " आपण साक्षीदारांना मारण्याचें धोरण ठेवूं. त्यांना नाहींसें केलें की, गुन्हा शाबीत होण्याची भीति नाही. उलट अॅटर्नीला मारलें तर गवगवा फार होईल. लोक संतापून उठतील. फेडरल पोलीसहि यांत लक्ष घालतील. मग आपलीं पाळेंमुळें खणून निघतील. आपलें फार नुकसान होईल. आपला हा धंदा सर्व राष्ट्रभर पसरलेला आहे. त्याचा विचार केला पाहिजे. या खुनामुळे आपल्या सगळ्याच रॅकेटसना धोका पोंचेल. तेव्हा डच शूल्टला आम्ही मना करतों." पण डच शूल्ट हा फारच आडदांड होता. त्याने हें ऐकलें नाही. त्याने सिंडिकेटची अवज्ञा करून थॉमस डयूई यांचा खून करण्याचें ठरविलें; पण सिंडिकेटची आज्ञा म्हणजे कांही फेडरल कोर्टाची आज्ञा नव्हे की जी कोणीहि मोडावी! या अवज्ञेबद्दल शिक्षा म्हणून सिंडिकेटने शूल्टला ठार केलें व आपल्या राष्ट्रव्यापी रॅकेटचें रक्षण केलें. थॉमस डयूई वांचले. दैवयोग असा की, त्यांनीच पुढे वरील सिंडिकेटमधील लुसीॲनो, लेपके या दुसऱ्या नाइकांना शिक्षा ठोठावल्या. जॉन विल्यम्सप्रमाणेच त्यांचीहि अमेरिकेंत या कार्यासाठी फार कीर्ति झालेली आहे.

थॉमस डयूई यांचे परममित्र ली थॉमसन स्मिथ यांचें या क्षेत्रांतलें कार्य फार मोठें आहे. स्मिथ हे एक सामान्य व्यापारी होते. एक दिवस केस कापण्यासाठी ते सलूनमध्ये गेले असतांना तेथे दोन सभ्य रॅकेटिअर आले. त्या नापिताला त्यांनी सांगितलें की, ' नापितसंरक्षण संस्थेकडून आम्ही आलों आहों. तुम्ही केस कापण्याचा दर २५ सेंटचा ५० सेंट करा व संस्थेचें सभासद व्हा. प्रवेश फी १०० डॉलर्स आणि महिन्याची वर्गणी ४० डॉलर्स ही आत्ता द्या...' नापिताने मागणी नाकारली तेंव्हा स्मितपूर्वक त्यांनी दोनचार गोष्टी सांगितल्या. ' अमक्याच्या दुकानाला आग लागली, तमक्याचा मुलगा नाहीसा झाला, हें होऊं नये म्हणून तर संरक्षणसंस्था आहे.' हें ऐकून स्मिथ अतिशय संतापले आणि त्या दोघांना त्यांनी बजावलें की, ' अशी दमदाटी केलीत तर तुम्हांला तुरुंगांत घालीन, ते × × × मोठे पुढारी आहेत. त्यांचा माझा स्नेह आहे. ते तुमची गय करणार नाहीत.' यावर त्या सभ्य गृहस्थांनी स्मितपूर्वक सांगितलें की, ' त्यांच्याशीं आम्ही कधीच समझौता केला आहे.' हें ऐकून स्मिथ थक्क झाले, आणि मग या प्रकरणीं त्यांनी लक्ष घातलें. तें काम त्यांना जन्मभर पुरलें. कारण या प्रतिष्ठित गुन्हेगारीचें जाळें सर्व राष्ट्रभर पसरलें आहे, असें त्यांच्या ध्यानांत आलें; त्याच सुमारास ग्रँड ज्यूरीचे चेअरमन म्हणून त्यांची नेमणूक झाली. या ज्यूरीला फार मोठे अधिकार असतात. पण विल्यम डॉज, डिक्सन डेव्ही हे अॅटर्नी या दरोडेखोरांविरुद्ध काम चालवायला तयार होईनात. स्मिथ यांना रोज खुनाच्या धमक्या येऊं लागल्या; तरुण स्त्रियांना त्यांच्याकडे रात्रीं धाडून त्यांना बदनाम करण्याचे प्रयत्न झाले. तरी याचीहि त्यांनी पर्वा केली नाही. पण गुन्हेगारांच्याविरुद्ध कोणी साक्षीलाच उभे राहीनात. खाजगी रीतीने स्मिथ यांच्यापाशी वाटेल तें सांगण्यास लोक तयार असत, पण आम्ही साक्ष देणार नाही असें ते सांगत. कारण जीवाची भीति ! म्हणजे पैसा आणि दहशत असें दुधारी शस्त्र हे डाकू वापरीत. यानंतर एक पत्रक काढून स्मिथ यांनी लोकजागृति करण्यास आरंभ केला. पत्रकांत ते म्हणतात, " रॅकेटस ही प्रतिष्ठित डाकूगिरी अखिल राष्ट्राला ग्रासून राहिली आहे. या डाकूंना कोणाचीहि कसलीहि भीति नाही. आपलें कोणी कांही करूं शकणार नाही अशी त्यांची खात्री

असते. याचें कारण असें की, राजकारणी नेत्यांकडून त्यांना अभय मिळालेलें असतें.'' स्मिथ यांच्या प्रयत्नामुळे हळूहळू लोकमत जागृत झालें आणि त्याचा परिणाम होऊन स्मिथ यांनी जवळजवळ ७० रॅकेट्सचा – प्रतिष्ठित डाकूंच्या टोळयांचा – नि:पात केला आणि १०० – १५० नाइकांना तुरुंगांत डांबलें.

अमेरिकेंत दारूबंदीच्या काळांत सुरू झालेली ही डाकूगिरी – व्हाईट कॉलर क्राइम – थॉमस डयूई, ली स्मिथ यांसारख्या साहसी, निर्भय लोक-सेवकांच्या प्रयत्नांमुळे तात्पुरती काय थंडावली तेवढीच, पण खरें पाहतां तिला तसा आळा पडलेला नाही. १९५० सालीं सीनेटने सीनेटर केफाव्हर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल पाहतां हें स्पष्ट दिसून येतें. अजूनहि न्यूयार्क, शिकागो अशा मोठ्या शहरांत त्याच प्रमाणांत या डाकूंचीं सिंडिकेटस् आहेत. राजकारणी लोकांची व या दरोडेखोरांची युति अजून तशीच कायम आहे; आणि अमेरिकेंतील कांही समाजशास्त्रज्ञांचें तर असें मत आहे की, आपली अर्थव्यवस्था व आपल्या सामाजिक संस्था अशाच आहेत तोपर्यंत अमेरिकन जीवनाच्या मोटर, बेसबॉल, ड्रगस्टोअर या काय-मच्या लक्षणाप्रमाणेंच ही सभ्य डाकूगिरी हेंहि एक आपल्या जीवनाचें दुर्निवार असें लक्षण होऊन बसणार आहे. (यासंबंधीचें विवेचन 'सोसायटी इन् ट्रॅन्झिशन' – हॅरी बार्नेस, 'ब्रासचेक' – अप्टन सिंक्लेअर, 'दि चॅलेंज टु डेमॉक्रसी' – थिओडोर ब्लेच व जोसेफ बॉम गार्टनर, 'मॉडर्न अमेरिकन सोसायटी' – किंग्जले डेव्हिस इ. ग्रंथांत सापडेल. १९५८ च्या 'वसंत' दिवाळी अंकांत 'आपल्या लोकशाहीवरील नवें संकट' या लेखांत अमेरिकेंतल्या या गुन्हेगारीचें बऱ्याच तपशिलाने मीं वर्णन दिलें आहे. प्रस्तुत प्रकरणांतील सामान्य माहिती वरील ग्रंथांतून घेतली आहे. उदाहरणें 'रीडर्स डायजेस्ट' या सुप्रसिद्ध मासिकांतून घेतलीं आहेत.) थिओडोर ब्लेच यांनी तर ही गुन्हेगारी म्हणजे अमेरिकन लोकसत्तेला कायमचें आव्हान आहे, असें म्हटलें आहे. क्लाइड बेडेल या लेखकाने 'लुक ब्रदर, युअर हाऊस इज् ऑन् फायर' या नांवाची एक पुस्तिका काढून 'आपली लोकशाही रसातळाला चालली आहे' असा अमेरिकनांना इषारा दिला आहे. त्यांत त्याने असें दाखवून दिलें आहे की, अमेरिकन जीवनाचा प्रत्येक धागान् धागा अनीति, भ्रष्टता, दहशत, अरेरावी, यांनी कुजून गेला आहे, कामगार संघटित झाले

आहेत. आता ते जेमतेम ३०।३२ तास काम करतात. पगार मात्र भरपूर घेतात. तेंच शिक्षकांचें, तेंच व्यापाऱ्यांचें, तेंच सर्वांचें. लोकशाही ही आपोआप व्यवस्थित टिकून राहण्याची कोणतीहि युक्ति परमेश्वराने सांगितलेली नाही. ज्यांची लोकशाहीवर निष्ठा नाही, जे तिच्यासाठी, लोकशाहीच्या तत्त्वासाठी वाटेल तो त्याग करण्यास सिद्ध नाहीत, त्यांची लोकशाही कधी टिकणार नाही. माणसें भ्रष्ट, अधम, उन्मार्गी झाल्यावर लोकशाही किती तग धरणार? आपण अमेरिकन आपल्या हातांनीच आपल्या पूर्वजांनी प्रस्थापिलेल्या लोकसत्तेचा नाश करीत आहोंत– इत्यादि विवेचन करून शेवटीं शील, चारित्र्य, न्याय, स्वार्थत्याग, नीतिनिष्ठा हे लोकशाहीचे मूलाधार होत असें या लेखकाने सांगितलें आहे.

अमेरिकेच्या या अधोगामी प्रवृत्तीची अनेकांनी अनेक प्रकारें मीमांसा केली आहे. त्या सगळ्यांचा सारार्थ पाहिला तर एकच दिसेल की, लोकशाहीला जी श्रेष्ठ नीति आवश्यक असते, जी विवेकनिष्ठा आवश्यक असते तिचा त्या समाजांतून लोप होत चालला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य हें अमोल धन असें समजतात. पण स्वतःच्या व्यक्तिस्वातंत्र्याइतकेंच दुसऱ्याचेंहि व्यक्तिस्वातंत्र्य महत्त्वाचें आहे हें जाणणें व त्याला तितकाच मान देणें याची जाणीव ज्यांना नाही, हा विवेक ज्यांना नाही त्या राजकारणी अमेरिकनांना व्यक्तिस्वातंत्र्याचें महत्त्व कळतें असें कसें म्हणावें? लोकशाहींत लोकहितबुद्धि हें प्रत्येक नागरिकाचें पहिलें लक्षण असलें पाहिजे. पण सामान्य शिपायापासून, सिनेटर, ॲटर्नी जनरल, न्यायाधीश येथपर्यंतचे लोक द्रव्यलोभाने किंवा भीतीने किंवा उदासीनतेने जेव्हा जनतेच्या हितावर निखारा ठेवतात आणि दरोडेखोरांचें राज्य चालूं देतात तेव्हा त्यांना लोकहितबुद्धि आहे असें कसें म्हणतां येईल? विवेकाशिवाय व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे गुंडांनाच फक्त व्यक्तिस्वातंत्र्य, त्यांनाच सर्वाधिकार असा अर्थ होतो, आणि अमेरिकेची तीच स्थिति होत चालली आहे. बाहेरून दिसायला तेथे पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य आहे. अध्यक्ष, न्यायाधीश, सेनापति यांच्यावर तेथे कोणीहि टीका करूं शकतो. पण डोळ्यांदेखत तेथे अन्याय, दरोडेखोरी, अपहार, लूटमार चालूं आहे आणि त्यांवर तेथे कोणीहि टीका करूं शकत नाही. कोणी स्वार्थामुळे, कोणी भीतीमुळे, कोणी हितसंबंधामुळे, कोणी

औदासीन्यामुळे ! याचा अर्थ असा की, श्रेष्ठ संस्कृतीमध्ये दौर्बल्य आणणारीं जीं मूल्यें त्यांचा अमेरिकेने स्वीकार केला आहे. पण त्या संस्कृतींतली विवेकनिष्ठा, धर्मश्रद्धा, नीतिमत्ता, समाजहितबुद्धि हीं जीं सामर्थ्यदायक मूल्यें त्यांचा मात्र त्या समाजांतून हळूहळू लोप होत आहे.

या अधःपाताचें आणखी एक कारण शास्त्रज्ञ सांगतात, तें म्हणजे विवाह-विच्छेद ! अमेरिकेंत विवाहसंस्था उद्ध्वस्त होत चालली आहे, आणि यामुळे अनेक अनर्थ घडून येत आहेत. पांच विवाहांपैकी दोन तेथे मोडतात, आणि त्यामुळे मानवी जीवनाच्या विकासाला, धर्मभावना, नीतिनिष्ठा यांच्या वाढीला अवश्य तें स्थैर्य अमेरिकेंतून नष्ट झालें आहे. ज्यांचा विवाह भंगला त्या व्यक्ति व त्यांचीं मुलें यांच्या मनःस्थितीचा आपण विचार केला तर चोरी, डाकूगिरी, मनोविकृति, दौर्बल्य यांची अमेरिकेंत झपाट्याने वाढ कां होत आहे हें सहज कळून येईल. पुरुषाची पत्नी दुसऱ्याकडे निघून गेलेली, मुलें वाऱ्यावर सोडलेलीं, त्यांना आई आहे तर बाप नाही, बाप आहे तर आई नाही, पुरुष गेल्यामुळे स्त्रीचा आधार गेलेला, अशा स्थितींत तेथले निम्मे अधिक नागरिक आहेत. द्वेष, मत्सर, निराशा, संताप यांनी ते नेहमीच ग्रस्त झालेले असणार. अशा स्थितींत दारू, जुगार, डाकूगिरी, व्यभिचार यांकडे त्यांची अधिकाधिक प्रवृत्ति होत गेली तर त्यांत नवल कसलें ? विवाहसंस्था व कुटुंबसंस्था भंगल्यामुळे हे अनर्थ घडत आहेत यांत शंकाच नाही; आणि याचाच हा परिणाम आहे असें दिसून येईल. जरा कांही खुट्ट झालें की, अमेरिकन स्त्रीपुरुषांना घटस्फोटाला कारण पुरतें. कारण व्यक्तित्वाच्या अत्यंत विपरीत कल्पना आम्हीं शास्त्रज्ञांनीच अमेरिकन स्त्रीपुरुषांच्या मनांत भरवून दिल्या आहेत. त्याचीं फळें आम्ही आता भोगीत आहोंत. वास्तविक मनुष्याने स्वतः होऊन आपणावर बंधनें घालणें याला स्वातंत्र्य म्हणतात. दुसऱ्याने बंधनें घालणें हें पारतंत्र्य; पण बंधनेंच नसणें म्हणजे स्वातंत्र्य अशा विपरीत कल्पना समाजांत शिरल्या म्हणजे समाजाचा नाश होतो, आणि मग व्यक्तिस्वातंत्र्यहि जातें आणि समाजाचेंहि स्वातंत्र्य जातें. अमेरिकन नागरिकांच्या मनांत अशा विपरीत कल्पना दृढमूल होऊन बसल्यामुळेच त्यांची कुटुंबसंस्था कोसळत आहे. आपण विवाह केला की, एक सामाजिक जबाबदारी आपल्यावर येऊन पडते,

अपत्यांची जबाबदारी आपल्यावर आहे, दोन कुटुंबांतल्या अनेक व्यक्तींचें सुखदुःख यावर अवलंबून आहे, ही व्यापक सामाजिक जबाबदारीची जाणीवच अमेरिकन स्त्रीपुरुषांच्या मनांतून लोपत चालली आहे. विवाह करतांनाच आज अनेकांची अशी वृत्ति असते की, 'नाही जमलें तर घटस्फोट आहेच!' म्हणजे बाजारांतून वस्तु विकत आणणें आणि विवाह करणें तेथे एकच झालें आहे. नाही पटली तर परत केली! दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक जर्मन कुटुंबें अमेरिकेंत आलीं. त्या कुटुंबांतील तरुण मुली अमेरिकन तरुणांना फार पसंत पडूं लागल्या; कारण असें की त्या मुली पति, संसार, मुलेंबाळें यांत जास्त रमत, त्यांची त्यांना ओढ जास्त असे; आणि पुरुषाला बायको अशीच हवी असते, पण अमेरिकन तरुण स्त्रीला यांत आपल्या व्यक्तित्वाचा संकोच आहे असें वाटतें. यामुळे पुरुषाला ती तितकी प्रिय होत नाही. अशा गोष्टी अर्थातच फार थोड्या घडलेल्या असणार; पण तेथील कुटुंब-संस्थेला कीड कोणती लागली आहे हें यावरून ध्यानीं येईल. कुटुंबाला अवश्य त्या निष्ठाच अमेरिकेंतून नष्ट होत चालल्या आहेत आणि निष्ठा नाही म्हणजे कोणतीहि संस्था टिकत नाही.

व्यक्तिस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य, हक्काने मिळणारें अन्नवस्त्र, न्यायालयांत काटेतोलपणें मिळणारा न्याय हे सर्व लोकशाहीने मान्य केलेले मूलभूत हक्क आहेत; पण त्याबरोबरच विवेकनिष्ठा, समाजहितबुद्धि, अन्यायाचा प्रतिकार करण्याची वृत्ति, त्याग, धैर्य, दुसऱ्यांच्याहि हक्कांची जपणूक करण्याची दक्षता, शील, चारित्र्य ही थोर संपदा लोकशाहीने आवश्यक म्हणून सांगितली आहे. या परंपरेच्या अभावीं पहिले हक्क जर एखाद्या समाजाने घेऊं म्हटलें तर ते अनर्थाला कारण झाल्यावांचून राहणार नाहीत. अमेरिकेंत हेंच घडत आहे. तेथील सभ्य डाकूगिरी, तेथील राजकारण, तेथील भग्न कुटुंबसंस्था यांचा विचार आपण केला, तेथील बालगुन्हेगारीचा विचार केला तर हेंच दिसून येईल.

या बालगुन्हेगारीमुळे तर अमेरिकेंतील समाजशास्त्रज्ञ, तत्त्ववेत्ते, शिक्षण-शास्त्रज्ञ अगदी हादरून गेले आहेत. कारण ही अत्यंत भयावह आपत्ति आहे. १९५१ सालीं १६ ते २४ वयाच्या अडीच लक्ष मुलांना चोरी, घरफोडी, आग, वाहनाच्या व इतर कायद्यांचा भंग यासाठी पोलिसांनी

कैद केलें होतें, आणि ही संख्या उत्तरोत्तर वाढतच आहे. दोन तरुण मुलांनी पेट्रोलचे डबेच रुळावरून घसरवून दिले. त्यामुळे आग लागून सहा लाखांचें नुकसान झालें. एका नऊ वर्षांच्या मुलाने एका कारखान्यास गंमतीने आग लावली. त्यामुळे १ कोटीची मालमत्ता जळाली. या मुलांना पकडून समजुतीच्या गोष्टी सांगूं लागलें तर तीं उत्तर देतात की, आमचें जीवन चाहेल त्या पद्धतीने जगण्याचा आम्हांला हक्क आहे. या वाढत्या गुन्हेगारीचें कुटुंबसंस्थेचा नाश हें एक प्रधान कारण आहे, हें वर सांगितलेंच आहे; पण आणखीहि अनेक कारणें आहेत. तीं म्हणजे सिनेमा, टेलिव्हिजन व हॉरर कॉमिक्स् हीं मासिकें. सिनेमा, रेडिओ, टेलिव्हिजन यांवर चांगल्या गोष्टींबरोबरच दरोडेखोरांच्या टोळ्या, त्यांचे नाईक, त्यांचीं धाडसी कृत्यें, खून, मारामाऱ्या, रक्तपात, लूटमार, अनाचार, हिडीस शृंगार, सूड यांनी भरलेल्या गोष्टी अलीकडे जास्त दाखवितात. त्यामुळे मुलांचीं मनें विकृत, विदीर्ण, भग्न होऊन जातात. शास्त्रज्ञ म्हणतात यामुळे मुलांची झोप नाहीशी झालेली आहे, मनें भीतीने ग्रस्त झालेलीं आहेत. कोणी दुबळीं झालीं आहेत, कोणी बेफाम झालीं आहेत. म्हणजे मूळ प्रकृति सर्वांचीच नष्ट झाली आहे. गुन्हेगारीचीं बीजें यांतच आहेत. हॉरर कॉमिक्स हा प्रकार सर्वांत भयंकर आहे. 'माझ्या गांवांत महारोग आला तरी चालेल, पण हीं मासिकें नकोत' असें एका अमेरिकेंतील नगरीच्या मेयरने म्हटलें आहे. या मासिकांतून अगदी अनन्वित, अनर्थकारक गोष्टी असतात. एक दारुड्या एका तरुण मुलीला नग्न करून तिला चाबकाने फोडून काढीत आहे, अशी गोष्ट त्यांत चित्रासह देतात. एका स्त्रीच्या प्रेतावर तरुण अत्याचार करीत आहेत असें वर्णन सचित्र दिलेलें आहे. अमेरिकेंतल्या एका गांवच्या दहा मुलांनी आपल्यापैकीच एकाला रानांत नेऊन प्रत्यक्ष फासावर चढविलें, आणि पोलिसांनी विचारल्यावर 'मासिकांतली गंमत आम्हीं करून पाहिली' असें सांगितलें. दुसऱ्या अशाच आठदहा मुलांनी शाळेंतल्या तीन मुलींना रानांत नेऊन त्यांच्यावर वाटेल ते अत्याचार केले आणि पकडल्यावर तसेंच उत्तर दिलें. अमेरिकेंत या मासिकांचा खप दरसाल अडीच कोटींचा आहे. हीं छापण्यास बंदी घातली तर ? मुद्रण-स्वातंत्र्य !

ब्रिटन हें राष्ट्र सर्वांत जास्त शाहणें आहे. तेथील लोक विवेकी आहेत. त्यांना व्यक्तिस्वातंत्र्याचें महत्त्वहि कळतें आणि मर्यादाहि कळतात. त्यांनी १९५५ सालीं कायदा करून हॉरर कॉमिक्स बंद करून टाकलीं; आणि असलें स्वातंत्र्य अनर्थकारक आहे असें सांगून हें केलें. या कॉमिक्स विरुद्ध चळवळ चालू होती त्या वेळीं ऑक्टोबर १९५४ मध्ये डेली एक्सप्रेसने लिहिलें होतें की, 'मुद्रणस्वातंत्र्याचे आम्ही कट्टे पुरस्कर्ते आहों. पण आज त्यावर मर्यादा घालण्याचें आम्ही समर्थन करतों, त्याचें कारण हीं कॉमिक्स.' हॉरर कॉमिक्सच्या विरुद्ध जी ब्रिटनमध्ये चळवळ झाली ती सर्व प्रामुख्याने शिक्षकांनी केली. प्रकाशकांनी त्यांना नानाप्रकारें विरोध केला, पण शेवटीं विवेकाचा जय झाला. स्वातंत्र्य व स्वैरता यांतील भेद त्या राष्ट्राला उमगला व त्याने बालकांचा हा महारोग नष्ट केला. ब्रिटनमध्ये विवेक-बुद्धि अशी प्रबल आहे म्हणूनच तेथील लोकशाही निर्भय आहे. अमेरिकेंतील शास्त्रज्ञांनीच तुलना करून हें दाखवून दिलें आहे. फिलाडेल्फिया नगरींत १९५१ मध्ये १०० खून झाले. शिकागो नगरींत २०० झाले. त्याच सालीं लंडनमध्ये फक्त २१ झाले. हें सांगून थिओडोर ब्लेच म्हणतात, गेलीं २५ वर्षें लंडनची सरासरी हीच आहे, याचें कारण इंग्लिश न्यायपद्धति. तेथे गुन्ह्याला शिक्षा इतकी निश्चित आहे की, २१ पैकी ११ गुन्हेगारांनी आत्महत्या केली, ६ जणांना शिक्षा झाली, ३ वेड्यांच्या इस्पितळांत गेले व एक निर्दोष सुटला. (चॅलेंज टु डेमॉक्रसी, पृ. ५५८). एका अमेरिकनाने अप्रत्यक्षपणें स्वतःच्या देशावर ही केवढी विदारक टीका केली आहे. बार्नेस यांनी आपल्या ग्रंथांत इंग्लंडची अशीच प्रशंसा केली आहे. अमेरिकन बँका धडाधड कोसळतात, त्यांचीं दिवाळीं निघतात. इंग्लंडमध्ये कित्येक दशकांत एकाहि बँकेचें दिवाळें निघालेलें नाही. याचें कारण असें की, 'तेथले लोक कायद्याचें निष्ठेने पालन करतात. तेथे लोकमत जास्त प्रभावी आहे. सट्टेबाजीचा मोह तेथे इतका नाही' (सोसायटी इन् ट्रॅन्झिशन, पृ. ७४०). ब्रिटनमध्ये धनलोभ नाही असें नाही, राजकारण नाही असें नाही. सर्व विकार, सर्व विकृति आहेत. पण समाजहितासाठी त्यांना मर्यादा घालणें अवश्य आहे, संयम, निग्रह यानेच समाज जगतो, हा विवेक तेथे जागरूक आहे. अमेरिकेंत ही विवेकशक्ति कमी होत चालली आहे. म्हणूनच

तेथल्या लोकशाहीला ही गुन्हेगारी म्हणजे मोठें आव्हान आहे असेंच तेथील शास्त्रज्ञ म्हणत आहेत.

डेव्हिड लिलिएंथल हे अमेरिकेंतील मोठे विचारवंत गृहस्थ आहेत. 'टेनेसी व्हॅली ऑथॉरटी'चे ते अध्यक्ष होते. त्यानंतर ॲटॉमिक एनर्जी कमिशनचे ते अध्यक्ष झाले. त्या पदावर असतांना मिचिगन स्टेट कॉलेज-मध्ये त्यांचें ' अमेरिकेच्या सामर्थ्याचें रहस्य ' या विषयावर व्याख्यान झालें. त्या वेळीं त्यांनी सांगितलें की, "आपल्या समाजाची नीतिनिष्ठा हा आपल्या लोकसत्तेचा खरा पाया आहे. आपली विवेकबुद्धि, आपल्या श्रद्धा हें आपलें खरें सामर्थ्य आहे. आपण अणुअस्त्रें तयार केलीं आहेत. त्याच खात्याचा प्रमुख म्हणून मी त्याचें महत्त्वहि जाणतों. पण केवळ संहार-सामर्थ्यालाच आपण आपलें खरें बळ मानूं लागलों तर तो भ्रम आहे. आपल्या समाजांत प्रत्येक नागरिकाची दुसऱ्याच्या सद्बुद्धीवर श्रद्धा आहे. ती जर ढळली तर शस्त्रास्त्रें कितीहि असलीं तरी आपण दुबळे होऊं. आपण दृढ बुद्धिवादी लोक आहों; ज्ञानाचे उपासक आहोंत. ही उपासना मंदावली तर आपली सुरक्षा ढासळेल. आपली विचारस्वातंत्र्यावर निष्ठा आहे, परमेश्वरावर श्रद्धा आहे. या आपल्या निष्ठा, या श्रद्धा लुप्त झाल्या तर आपला नाश ओढवेल. शस्त्रास्त्रें कितीहि असलीं तरी त्यांचा कांही उपयोग होणार नाही. मरण अटळ होऊन बसेल."

एडवर्ड गिबन आणि विल ड्युरँट या दोन थोर पंडितांनी रोमन साम्रा-ज्याच्या विनाशाची चिकित्सा केली आहे. ' डिक्लाइन अँड फॉल ऑफ दि रोमन एंपायर ' हा गिबनचा ग्रंथ व ' सीझर अँड ख्राइस्ट ' हा ड्युरँटचा ग्रंथ. दोघांनीहि अनीति, भ्रष्टता, समाजहितबुद्धीचा लोप, कमालीची विषमता, बेजबाबदारवृत्ति, स्वैराचार, श्रद्धाहीनता हेंच विनाशाचें प्रधान कारण दिलें आहे. या साम्राज्याचा नाश रानटी टोळ्यांनी केला. गॉथ, व्हँडाल, हूण हे रानटी लोक आणि अलेरिक, अटिल्ला हे राक्षस त्यांचे सेनापति; या धाडी रोमवर कोसळल्यामुळे त्या प्रचंड साम्राज्याचा नाश झाला हें खरें; पण हें केवळ बाह्य कारण आहे. ड्युरँट म्हणतो, "रोमन लोकांनीच रोमन साम्राज्याचा नाश केला. अनीति, यादवी, अरेरावी, अधिकाऱ्यांची उर्मट बेजबाबदार वृत्ति, स्त्रियांची स्वैरता, व्यभिचार, हे

दुर्गुणच रोमनांच्या नाशाला कारण झाले. इतर अनेक कारणें आहेत, पण तीं गौण आहेत. विघटना आधीच झाली होती. नैतिक, आर्थिक, राजकीय कारणांनी साम्राज्य आधीच जर्जर झालें होतें. वैफल्य, निराशा, क्षुद्रता यांनी समाज आधीच ग्रासला होता. या दुगुणांमुळे दौर्बल्य येऊन साम्राज्याच्या तटबंदीला आधीच भगदाडें पडलीं होतीं. रानटी टोळ्या तेथूनच आंत घुसल्या; त्यांनी प्रलयकाळ जवळ आणला येवढेंच.'' शेवटीं ड्युरँट याने इतिहासांतला एक फार मोठा सिद्धान्त मांडला आहे. ''कोणतीहि थोर संस्कृति तिच्या अभ्यंतरांत विनाशबीजें निर्माण झाल्यावांचून केवळ बाह्य कारणांनी विनाश पावत नसते.'' (सीझर अँड ख्राइस्ट, पृष्ठ ६६५ – ६६९)

अमेरिकन समाजांत अशा तऱ्हेचीं विषबीजें आज स्पष्टपणें दिसत आहेत. आणि दुर्दैव असें की, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिविकास या थोर तत्त्वांच्या पुण्याईखाली तीं अंकुरत आहेत. मागल्या शतकांत भांडवलशाहीने व्यक्तिस्वातंत्र्य, अनिर्बंध व्यवसायस्वातंत्र्य या नांवाखाली नंगा नाच घातला होता. त्या वेळीं आर्थिक क्षेत्रांत व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधनें घालावीं लागलीं, तशींच बंधनें आता सामाजिक क्षेत्रांत घालणें अवश्य आहे, असें दिसूं लागलें आहे. खरें म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधनें घालणें अवश्य आहे, असें म्हणणें युक्त ठरणार नाही. गुंड, मवाली, डाकू यांनी तीं आधीच घातलीं आहेत. सभ्य, प्रामाणिक माणसाला त्यांच्या गुंडगिरीविषयीचें मत प्रकट करण्यास स्वातंत्र्य नाही. न्यायालयांत खरी हकीकत सांगण्याचें स्वातंत्र्य नाही. विधिमंडळांत कायदा करण्याचें स्वातंत्र्य नाही. आपल्या मुलांच्या मनांत हॉरर कॉमिक्स्मधील जंतु टोचावे कीं न टोचावे हें आईबाप ठरवूं शकत नाहीत. म्हणजे मुलांना कसें वाढवावें हें ठरविण्याचें स्वातंत्र्य त्यांना नाही. गुंड मवाल्यांना, राजकारणी लोकांना मात्र वाटेल तें स्वातंत्र्य आहे. विवेकनिष्ठा समाजांतून गेली की, व्यक्तिस्वातंत्र्य हें गुंड मवाल्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य आणि सज्जनांच्या स्वातंत्र्याचा अपहार असा अर्थ होतो. तो अर्थ अमेरिकेंत कसा रूढ होत आहे तें वर दाखविलें. अशी समाजाची आंतून पोखरण झालेली असतांना दण्डसत्तेचें आव्हान लोकसत्ता स्वीकारूं शकतील काय, अशी शंका मनांत येणें साहजिक आहे.

ही शंका अत्यंत तीव्र स्वरूपांत पुढे उभी राहण्याचें आणखी एक कारण आहे. दण्डसत्तांनी लोकसत्तांचीं जीं बलसाधनें, शास्त्रज्ञान, औद्योगीकरण, अद्ययावत् शस्त्रास्त्रें, समाजशिक्षण, राष्ट्रनिष्ठा, –त्यांचीच उपासना केल्या-मुळे त्यांना अत्यंत बलाढ्य लोकसत्तांनाहि आव्हान देण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे असें वर सांगितलें आहे. याहून विशेष गोष्ट अशी की, सोव्हिएट रशियाच्या व नवचीनच्या नेत्यांनी दण्डबलाच्याच साह्याने समाजाची पोखरण करणारी अनीति, भ्रष्टता, अनाचार, स्वैरवर्तन हीं पापबीजेंहि दग्ध करून टाकण्यांत यश मिळविलें आहे. जॉन स्ट्रॉम हे अमेरिकन पत्रपंडित आहेत. चीनमध्ये ४ महिने त्यांनी अनिर्बंध प्रवास केला. अमेरिकेविरुद्ध तेथे अत्यंत जहरी प्रचार चाललेला त्यांनी डोळ्यांनी पाहिला, कानांनी ऐकला. या द्वेषावरच नव्या पिढीच्या मनाचें पोषण होत आहे असें त्यांनी लिहिल्याचें मागे सांगितलेंच आहे. अर्थात् त्यांचें चीनविषयी अत्यंत प्रतिकूल मत आहे. असें असूनहि त्यांनी नवचीनमधील नीतिनिष्ठेविषयी प्रसंशोद्गारच काढले आहेत (रीडर्स डायजेस्ट, एप्रिल १९५९). ते म्हणतात की, "१९३७ सालीं मी चीनला गेलों होतों. तेव्हा भुरट्या चोऱ्यामाऱ्या ही गोष्ट तेथे नित्याचीच होती. आता चोऱ्या अजिबात नाहीशा झाल्या आहेत. मी चार महिने चीनमध्ये होतों, पण हॉटेलच्या खोलीला एकदाहि कुलूप लावलें नाही. तरी कधी एक वस्तु इकडची तिकडे झाली नाही." त्याच-प्रमाणे नवचीनमध्ये इतर देशांत सर्वव्यापी होऊन बसलेली, बक्षिसी, पोस्त ही पद्धत नांवालाहि दिसत नाही. एका चांभाराच्या मुलाने त्यांच्या बुटाला पॉलिश केलें आणि तीन पेन्स मजुरी सांगितली. स्ट्रॉम यांनी त्याला सहा पेन्स दिले. पण त्या पोराने तीन पेन्स परत दिले व तीन पेन्सची पावती दिली. शिवाय वर तो म्हणाला की, 'बक्षीस घेणें म्हणजे नवचीनचा अप-मान आहे.' श्री. स्ट्रॉम यांना हाच अनुभव सर्वत्र आला. पौंडापर्यंतची बक्षिशीहि नाकारण्यांत आली. आपल्या नियोजन मंडळातर्फे चीनला गेलेले श्री. रा. कृ. पाटील यांनी आपला असाच अनुभव सांगितला आहे. त्यांनी नवचीनमधील श्रेष्ठ नीतिमत्तेचें एक फारच उत्कृष्ट गमक सांगितलें आहे. कम्युनिस्ट दण्डसत्ता येण्यापूर्वी शांघायच्या रस्त्यांतून तरुण स्त्रीला संध्या-काळीं हिंडणें कठीण होतें. आता अगदी मध्यरात्रींसुद्धा एकटी दुकटी स्त्री

तेथे निर्भयपणें हिंडूं शकते. 'भारत आणि चीन' या आपल्या पुस्तकांत उत्तर भागांत त्यांनी आपली दैनंदिनी दिली आहे. नवचीनच्या सीमा सोडून पुन्हा ब्रिटिश अंमलाखालच्या हाँगकाँगच्या हद्दींत ते आले. त्या वेळीं नवचीनचें जीवन व हाँगकाँगमधलें जीवन यांत सभ्यता, संस्कृति, नीतिमत्ता या दृष्टींनी कसा जमीनअस्मानाचा फरक पडला आहे तें त्यांना जास्तच स्पष्ट दिसून आलें. हाँगकाँगमध्ये रात्रीचें जीवन– (नाइट लाइफ) त्याचा उन्माद, विलास, जुगार, दारू, नाच सर्व चालूं आहे. रिक्षावाले चांगली मुलगी गांठून देतो, म्हणून गर्दी करीत आहेत. ऐश्वर्य, भपका, चैन, विलास! सर्वत्र हेंच वातावरण. नवचीनमध्ये याचा मागमूसहि दिसला नाही. तेथे गरिबी, दारिद्र्य आहे; पण सर्वत्र निग्रह, संयम, सभ्यता यांचें वातावरण आहे आणि हाँगकाँगमध्ये हें असें. तें पाहून त्यांच्या मनांत विचार आला, 'चारित्र्य आणि समृद्धि यांची अशी फारकतच राहावी काय?' डॉ. एस्. चंद्रशेखर हे भारत सरकारतर्फे चीनच्या लोकसंख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यास नवचीनला गेले होते. तेथे दण्डसत्ता आहे, व्यक्तिस्वातंत्र्य नाही, मानवी जीवनाला कसलीहि किंमत नाही, असें दिसल्यामुळे त्यांचें मत नवचीनबद्दल फारच प्रतिकूल झालें. तेथील शांतता म्हणजे स्मशान-शांतता आहे असें ते म्हणतात. पण चीनच्या नीतिमत्तेविषयी त्यांनीहि प्रशंसोद्गार काढले आहेत. खिसेकापू, डाकू, ठग, वेश्या तुम्हांला चीन-मध्ये दिसणार नाहीत. चिनी जनता अत्यंत प्रामाणिक झाली आहे. वृत्त-पत्रांचा गठ्ठा व शेजारीं पैशासाठी पेटी ठेवून विकणाऱ्याने दुसऱ्या कामास जाणें ही इंग्लंडच्या लौकिकाची गोष्ट चीनमध्ये शहरोशहरीं दृष्टीस पडते. त्या पैशाला कोणी हात लावणार नाही. कोणी पत्र फुकट घेणार नाही. चिनी दुकानांत मोड मोजून घ्यावी लागत नाही, कारण तेथे कमी जास्त कांही होणार नाही ही परक्यांचीसुद्धा खात्री झाली आहे (इलस्ट्रेटेड वीकली २५ जानेवारी ते १९ एप्रिल १९५९).

चीनमधील श्रेष्ठ नीतिमत्तेचें सर्वांत उत्तम उदाहरण म्हणजे हें की, तेथे ६५ कोटि लोक आपल्या अन्नवस्त्रासाठी, उपजीविकेसाठीं कष्ट करतात. चीनच्या कम्युनिस्ट नेत्यांनी ६५ कोटि लोकांना रोज ८–१० तास कष्ट करायला लावलें ही मानवी जीवनांतली अगदी अभूतपूर्व क्रान्ति होय.

अमेरिकेंत संघटित बलाचा फायदा घेऊन कामगार आठवड्यांत ठरलेले ४० तासहि काम करण्याचें टाळूं लागले आहेत. हेन्‍री फोर्ड एकदा म्हणाला होता की, केल्या कामाचे दाम मोजणें, दर कितीहि महाग असला तरी परवडतें, त्यांत अंतीं फायदाच होतो. पण टिवल्याबावल्या करणें, उशीरा येणें, लवकर जाणें, आणि फोरमनला धाक दाखवून हजेरी पूर्ण दाखविणें, असल्या कामाचा पैसा द्यावा लागला तर कारखानदारांचें दिवाळें निघाल्या-खेरीज राहणार नाही. मुद्दाम टाळाटाळ करून पगार भरपूर घेणें ही नवी अनीति आहे. पण चीन, भारत, इंडोनेशिया, इत्यादि पौर्वात्य राष्ट्रांत आळस, सुस्ती, दैववाद, हीन आकांक्षा यांमुळे काम न करतां सुस्तपणें पडून राहणें ही युगायुगांची अनीति आहे. या जनतेला पोटाला न मिळालें तरी चिंता वाटतच नाही. फार तर आजच्या भाकरीची ते विवंचना करतील. तेवढे कष्ट करतील. पण चार दिवसांच्या भाकरीची निश्चिति झाली की, त्यांनी कुदळ खाली ठेवलीच. थोडया श्रेष्ठ जीवनाची आकांक्षा, जास्त सुखाची अभिरुचि, संस्कृतीची गोडी, हा भागच त्यांच्या जीवनांत नाही. त्यांना उद्या, परवा हे माहीतच नाहीत. ते फक्त आज जाणतात. त्यामुळे ही कोटिकोटि संख्येची जनता कष्टविन्मुख आहे. उत्साह, प्रयत्नशीलता, उदयोन्मुखवृत्ति, जिगीषा या वृत्ति त्यांना अज्ञात आहेत. निवृत्तीचें, निराशेचें, दैववादाचें तत्त्वज्ञान त्यांच्या हाडींमांशीं खिळलें आहे. त्यामुळे वर्षभर रोज ८–१० तास कष्ट हे त्यांना पाश्चात्त्य संस्कृतीच्या आगमनापूर्वी माहीतच नव्हते. चिनी नेत्यांनी यमदण्डाच्या साह्याने का होईना पण ६५ कोटि लोकांना कामाला लावलें ही त्यांची फार मोठी बहादुरी आहे. कष्ट करावे आणि खावें ही खरोखर श्रेष्ठ नीतिमत्ता होय.

दण्डसत्तांनी आपल्या बहुजनांत प्रस्थापित केलेल्या या श्रेष्ठ मूल्यांमुळे त्यांनी लोकसत्तांना दिलेल्या आव्हानाला फार मोठा अर्थ प्राप्त होतो. नीतिमत्तेमुळे कोणत्याहि समाजाचें सामर्थ्य वाढत असतें, आणि पूर्वी सांगितलेल्या षडंगबलांनी संपन्न असलेल्या दण्डायत्त समाजांत याहि बलसाधनांची भर पडल्यामुळे त्यांचें सामर्थ्य द्विगुणित किंवा दशगुणित होईल यांत शंका नाही. लोकसत्तांच्या नेत्यांनी याचा फारच गंभीरपणें विचार केला पाहिजे.

अमेरिकेने कम्युनिस्ट दण्डसत्तांचें आव्हान कसें स्वीकारलें, तें स्वीकारण्याचें व त्याला प्रत्युत्तर देण्याचें सामर्थ्य त्या जगाच्या अग्रभागीं असलेल्या लोकसत्तेच्या ठायीं कितपत आहे याचा येथवर आपण विचार केला. केवळ आजचा विचार केला तर हें आव्हान अमेरिका अगदी लीलया स्वीकारूं शकेल हें आपल्याला प्रारंभींच्या विवेचनावरून दिसून येईल. दण्डसत्तांची कितीहि प्रगति झालेली असली, तरी अमेरिकेच्या आजच्या सामर्थ्याच्या तुलनेने त्यांचें सामर्थ्य फार तोकडें आहे. अमेरिकेच्या आजच्या सामर्थ्याशीं मुकाबला करूं शकेल अशी एकहि सत्ता जगांत नाही. तेव्हा आजचें आव्हान ही इतर लोकसत्तांना बिकट समस्या असली तरी अमेरिकेला ती समस्याच नाही. प्रश्न आहे तो उद्याचा, परवाचा, पंचवीस तीस वर्षांनंतरचा.

हा प्रश्न कां निर्माण झाला याचीं कारणें वर सांगितलीं आहेत. राजकारण, संघटित सभ्य डाकूगिरी, विवाहसंस्थेचा ऱ्हास, बालगुन्हेगारी, यांमुळे अमेरिकन समाजाची नीतिमत्ता, त्याची धर्मनिष्ठा, पार ढासळून गेली आहे. त्यामुळे लोकशाही मूल्यें नष्ट होत आहेत, आणि या कारणाने भावी काळाविषयी चिंता निर्माण झाली आहे; पण याविषयी निराश होऊन आजच निर्णय करावा असें कांही घडलें आहे असें मानण्याचें कारण नाही. अमेरिकन समाजाच्या धन व ऋण या दोन्ही बाजू विचारांत घेतल्या तर धन ही ऋणावर मात करील असें वाटण्याजोगीं अनेक लक्षणें, अनेक बलस्थानें आजहि दिसून येतात. त्यांचा विचार करून या प्रकरणाचा समारोप करूं.

अमेरिकेंत सभ्य डाकूगिरी व राजकारणी पेंढारशाही अगदी शिगेला पोचली असली तरी जॉन् विल्यम्स, थॉमस स्मिथ, थॉमस ड्यूई यांसारखे धर्मनिष्ठ, चारित्र्यसंपन्न झुंजार वीर तेथे सारखे निर्माण होत असतात. धनलोभ, सत्तालोभ यांना बळी न पडतां, प्राण नित्य धोक्यांत असले तरी त्याचीहि पर्वा न करतां, लोककल्याणार्थ नित्य संग्रामास सिद्ध असलेले ध्येयवादी शूर वीर ज्या समाजांत निर्माण होतात त्या समाजाला ढासळलेली नीतिमत्ता सावरण्यास फार वेळ लागेल असें वाटत नाही. अमेरिकन बहुजन हे पुष्कळच जागरूक व विवेकसंपन्न आहेत. ध्येयवादी नेतृत्व प्राप्त होतांच आपल्या संघटित सामर्थ्यानिशी त्याच्या मागे उभे राहण्याची बुद्धि

त्यांना आहे. म्हणूनच नीति-अनीतीच्या लढ्यांत नीति पुन:पुन्हा विजयी होऊं शकते. या अनीतीवर, राज्यकारभारांतील भ्रष्टतेवर अखंड पाहरा ठेवण्यासाठी अमेरिकन लोकसभेने—कॉंग्रेसने—एक कायमची समितिच नेमलेली आहे. या सर्वाधिकार—समितीची स्थापना १७९१ सालींच झालेली आहे; आणि गेल्या दीडशे वर्षांत तिने अशीं एक हजार प्रकरणें धसास लावलीं आहेत. विशेष म्हणजे ही समिति कोणाचाहि मुलाहिजा ठेवीत नाही. १९३३ सालीं तिने स्टॉक मार्केटचें शोधन केलें. त्या वेळीं मॉर्गन व्हिटने, आटोखान मिचेल अशा मोठमोठ्या भांडवलाधीशांना साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत उभें करून समितीने त्यांचीं सर्व कारस्थानें जनतेपुढें उघडीं करून मांडलीं. त्यामुळे स्टॉक मार्केटच्या कायद्यांत फार मोठ्या सुधारणा करतां आल्या. ही समिति मंत्र्यांनाहि तुरुंगांत टाकण्याइतकी नि:स्पृह आहे. अल्बर्ट फॉल हा अध्यक्ष हार्डिंग याचा गृहमंत्री. त्याने आपला एक मित्र एडवर्ड डोहने याला सरकारी तेलाच्या खाणीचा मक्ता, कायद्याप्रमाणे टेंडरें मागवावयाचीं तीं न मागवितां आपल्या अधिकारांत तसाच देऊन टाकला. उलट डोहने याने फॉल याला ५ लाख रु. कर्ज (?) म्हणून दिले. हें प्रकरण उजेडांत आलें तेव्हा एवढा गदारोळ झाला, जनतेच्या संतापाचा एवढा वडवानल पेटला की, त्यांत अल्बर्ट फॉलची तर आहुति पडलीच पण अध्यक्ष हार्डिंग, त्याचें मंत्रिमंडळ आणि त्याचा रिपब्लिकन पक्ष यांचाहि धुव्वा उडाला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत कॉंग्रेसच्या ट्रूमन् कमिटीने संरक्षणखात्यांतील भ्रष्टता, अपहार, लूट, लाच इत्यादि गुन्हेगारी उघडकीस आणून जनतेचे ७५०० कोटि रुपये वांचविले, आणि त्यांतील कुविख्यात डाकूंना तुरुंगांत धाडलें. कामगार संघटनांत अशीच ठग पेंढारशाही चालते. सीनेटर मॅक क्लेलन यांच्या अध्यक्षतेखाली सध्या तिचें शोधन चालू आहे.

गुन्हेगार, चोर, डाकू यांच्या दण्डनाविषयी हें झालें. पण समाजांतल्या या दुष्प्रवृत्ति मुळांतच नष्ट व्हाव्या म्हणून बाल-तरुण विद्यार्थ्यांच्या शिक्षणांत व बालपणच्या संस्कारांत आमूलाग्र क्रान्ति घडवून आणणारे ध्येयवादी शिक्षक व कार्यकर्ते हेहि अमेरिकेंत सारखे निर्माण होत असतात. अमेरिकेंत 'ज्यूनियर डेप्युटी शेरीफ लीग' या नांवाची संस्था १९४७ च्या सुमारास

स्थापन झाली आहे. १० ते २० या वयाच्या मुलांना या लीगचे सभासद होतां येतें. लोगन काउंटीचे शेरीफ ग्रोव्हर कोंब यांचे या बाबतींतले अनुभव सांगतों. ८०००० वस्तीचा हा जिल्हा असून तेथील शेकडा ८५ कुटुंबें कोळशाच्या खाणींत काम करतात. त्यांच्या मुलांमध्ये गुन्हेगारीचें प्रमाण फार मोठें होतें. चोरी, सुरामारी हे नित्याचे प्रकार असत. शेरीफ कोंब यांनी या मुलांच्यांत प्रचार करून त्यांना वरील लीगचे सभासद करून घेतलें आणि अनेक कामें जबाबदारीने त्यांच्यावर सोपविलीं. गांवांतील चोऱ्यामाऱ्या हुडकून काढणें, गावांतील स्वच्छतेकडे लक्ष ठेवणें, खेळांचीं मैदानें तयार करणें, आपापल्या शाळेंत बागा तयार करणें, दुरुस्त्या करणें आणि इतरहि अनेक प्रकारची जनसेवा करणें हीं कामें तीं मुलें हौसेने करूं लागलीं. आणि गुन्हेगारीचें प्रमाण झपाट्याने कमी झालें. तें इतकें की, रिमांड होमचे व्यवस्थापक जेसी रिले यांनी, लोगन काउंटींत निराळा प्रकार काय घडला आहे याची मुद्दाम चौकशी केली. कारण तेथून बाल गुन्हेगार मुळींच येईनासे झाले. या लीगचा प्रसार आता सर्व ४८ राज्यांत झाला असून सुमारें १० लाख मुलें 'ज्युनिअर डेप्युटी शेरीफ' झालेलीं आहेत. तरुण मुलांच्या अंगच्या उसळत्या रक्ताला कांहीतरी लोककल्याणाच्या, समाज-सेवेच्या कार्याला लावणें, त्यांच्यावर जबाबदारी टाकणें हें यांतलें मुख्य सूत्र आहे. यांतून त्यांच्यावर फार उत्तम संस्कार होतात आणि वाममार्गांनी जाणारी शक्ति सन्मार्गाला लागते. डॉ. ग्लेन यांनी अलबामा राज्यांतील बर्मिंगहॅम या गावीं शाळा काढून ती याच धोरणाने चालविली आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासाखेरीज समाजसेवेचीं कामें करावयास लावणें, त्यांच्या-वर जबाबदारी टाकणें, आपणांस मोठेपणा मिळावा, मान मिळावा ही त्यांची भूक या रीतीने तृप्त करणें आणि अशा रीतीने त्यांची अस्मिता संतुष्ट करून त्यांचें कर्तृत्व उदयास आणणें हें यांतील मुख्य तत्त्व आहे. तात्पर्यार्थ असा की, चीन-रशियामध्ये जें दण्डसत्तेने साधतात तेंच अमेरिकेंत लोकशाही मार्गांनी, शिक्षणाने, संस्काराने साधावें असा हा प्रयत्न आहे. त्याला यशहि भरघोस येत आहे असें दिसतें. यावरून अमेरिकेंतील जनता अंतरांत चांगलीच जागरूक झाली आहे हें प्रत्ययास येतें. कारण या दोन्ही प्रकारच्या उपक्रमांना नागरिकांनी तनमनधन खर्चून साह्य केलें आहे.

ही जागरूक जनता हेंच अमेरिकेचें खरें बळ आहे. आज अमेरिकेंतील ग्रंथकार, तत्त्ववेत्ते, समाजशास्त्रज्ञ, शिक्षक, धर्मगुरु आपल्या देशांतील अनीति, गुन्हेगारी, भ्रष्टता, अधर्म यांची फार गंभीरपणें चर्चा करीत आहेत, हें त्याचेंच लक्षण आहे. शेकडो, हजारो, ध्येयवादी लोक निरनिराळ्या योजना आखून त्या कार्यवाहींत आणून तेथील अनीतीला पायबंद घालण्यासाठी जीवाचें रान करीत आहेत. याचेंच नांव विवेकशक्ति. या विवेकशक्तीच्या उपासनेमुळेच अमेरिकेने गेलीं शंभर वर्षें भांडवलशाहीशीं झगडून तिच्यावर मात केली आहे. हा विजय फार मोठा आहे. राष्ट्रहितासाठी धनलोभाचा त्याग करावा ही सद्बुद्धि अमेरिकन भांडवलदारांत जागृत आहे असा याचा अर्थ होतो. मागे सांगितल्याप्रमाणे निग्रोंचा प्रश्नहि बराचसा अमेरिकन जनतेने सोडवीत आणला हें तर त्यांच्या मनःसंयमाचें, विवेकाचें फार मोठें लक्षण आहे. या सर्वांचें कारण माझ्या मतें एकच आहे. अमेरिकेची व्यक्तिस्वातंत्र्यावरची भक्ति ! परमेश्वराचा एकनिष्ठ भक्त ज्याप्रमाणे, 'देह जावो अथवा राहो' या भावनेने, देवासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध होतो त्याचप्रमाणे अमेरिकन लोक व्यक्तिस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी वाटेल तो होम करण्यास सिद्ध होतील. 'व्यक्तिस्वातंत्र्य किंवा मृत्यु' असाच त्यांचा बाणा आहे; व्यक्तिस्वातंत्र्याची ही भक्ति अमेरिकेंतील सामान्यांतल्या सामान्य मनुष्याच्या रक्तांत भिनलेली आहे. त्यामुळे क्षणकाळ जरी तेथील समाजाच्या मनाला मालिन्य आलें असलें तरी लवकरच त्या मनांतील विवेकज्योत पुन्हा पाजळेल, काजळी निघून जाईल आणि लोकशाही व अमेरिकन संस्कृति यांच्या रक्षणासाठी अमेरिकन नागरिक प्राणांचें मोल देण्यास सिद्ध होऊन संग्रामांत उभा ठाकेल याविषयी कोणालाहि संदेह नाही. म्हणून, 'कम्युनिस्ट दण्डसत्तांनी दिलेलें आव्हान, आपलीं लोकशाही मूल्यें पूर्णपणें अबाधित ठेवून, त्यांना तिळमात्रहि धक्का न लावतां, त्यांना अणुमात्रहि मुरड न घालतां, आम्ही सहज स्वीकारूं शकूं' असें अमेरिकेंतील कर्त्या पुरुषांनी, नेत्यांनी व रणपंडितांनी जगाला जें आश्वासन दिलें आहे तें अगदी यथार्थ आहे, सारगर्भ आहे असें मानण्यास कसलाच प्रत्यवाय नाही.

✦ ✦ ✦

## प्रकरण : ३

# दण्डसत्तांचें भारताला आव्हान

सोव्हिएट रशिया व नवचीन या कम्युनिस्ट दण्डसत्तांनी जगांतल्या लोकसत्तांना जें आव्हान दिलें त्या आव्हानाचें स्वरूप काय आहे आणि त्याला पाश्चात्त्य लोकसत्तांनी व विशेषतः अमेरिकेने काय उत्तर दिलें, तें आव्हान या बलाढ्य लोकसत्तेने कसें स्वीकारलें, याचा विचार आपण केला. आता भारताचा विचार करावयाचा. भारत ही उदयोन्मुख लोकसत्ता आहे. जगांतल्या इतर लोकसत्तांप्रमाणेच भारतालाहि या आव्हानाचा विचार केला पाहिजे. कारण या दण्डसत्तांपासून पाश्चात्त्य लोकसत्तांना एकपट भय असलें तर भारताला दसपट भय आहे. या दण्डसत्ता मुखाने पंचशीलाचा उद्घोष करीत असल्या तरी त्या कमालीच्या आक्रमक, साम्राज्यवादी आहेत हें हंगेरीच्या व तिबेटच्या कहाणीवरून जगाच्या आता ध्यानांत आलें आहे. तिबेट प्रकरणामुळे तर या दण्डसत्तांचें आव्हान अगदी निकट येऊन भिडलें आहे. म्हणून या आव्हानाकडे आपल्याला मुळीच दुर्लक्ष करतां येणार नाही. तेव्हा आपलें भारत सरकार तें कसें स्वीकारील, स्वीकारील की नाही, तें स्वीकारण्याचें आपल्याला सामर्थ्य आहे की नाही याचा विचार आपण अत्यंत जिव्हाळ्याने केला पाहिजे.

पहिल्या दोन प्रकरणांत जें विवेचन केलें त्यावरून हें आव्हान स्वीकारावयाचें म्हणजे केवढाल्या प्रचंड समस्या निर्माण होतात याची कांहीशी कल्पना वाचकांना येईल. औद्योगीकरण, प्रचंड औद्योगीकरण आपल्याला साधेल काय? सध्याच्या काळांत सामर्थ्य म्हणजे औद्योगीकरण हें समीकरण बनून राहिलें आहे. पण या औद्योगीकरणासाठी आपण भांडवल कोठून आणणार? अमेरिका, इंग्लंड यांना जगाचें रान मोकळें होतें. साम्राज्यांतील

वसाहतींतून त्यांनी अमाप भांडवल जमविलें. रशिया, चीन यांना हा मार्ग मोकळा नव्हता; तेव्हा त्यांनी स्वतःच्या जनतेचा रक्तशोष करून भांडवल जमविलें. आपल्याला हे दोन्ही मार्ग वर्ज्य आहेत, मग आपण भांडवल आणणार कोठून? औद्योगीकरणासाठी अत्यंत प्रतिभासंपन्न अशा शास्त्रज्ञांची थोर परंपरा देशांत असावी लागते, आणि देशांत शास्त्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी शिक्षणाची, विद्यापीठांची उत्तम व्यवस्था अवश्य असते. हें ज्ञान आपल्याजवळ आहे काय? नसल्यास तें कसें प्राप्त करून घ्यावयाचें? याची तरतूद आपल्याला करता येईल काय? अणुअस्त्रें, तोफा, रणगाडे, बाँबर विमानें, विविध प्रकारचे अग्निगोल हीं शस्त्रास्त्रें म्हणजे दशशतकोटींचा मामला असतो. आपल्यासारख्या दरिद्री देशाला याचा विचार तरी करतां येईल काय? आणि न आला तर पुढला विचार काय? या सगळ्या जडसामर्थ्याच्या मागे संघटित असें राष्ट्र उभें असावें लागतें. आपण संघटित आहों काय? जातीय भेद, प्रांतीय भेद, धर्म भेद, स्पृश्यअस्पृश्य भेद, दक्षिणोत्तर वाद, भाषिक भेद, आर्थिक विषमता, वर्गविग्रह यांनी आपला भारतदेश जर्जर झालेला दिसतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे भेद जास्तच चिघळले आहेत. आपली राष्ट्रनिष्ठा, अखिल भारतीय ऐक्यावरील आपली श्रद्धा विचलित झालेली दिसते. तिला ठायीं ठायीं तडे गेलेले आहेत. भांडवल परक्या देशांतून आणतां येतें, पण ही निष्ठा आपण कोठून आणणार आहोंत? संघटित राष्ट्रांच्या मागे शीलचारित्र्यसंपन्न कर्ते पुरुष, मुत्सद्दी, तत्त्ववेत्ते, इतिहासकार, वक्ते, ग्रंथकार, कवि, रणपंडित, धर्मप्रवक्ते यांची थोर परंपरा असली तरच या सामग्रींतून नवसृष्टि निर्माण होऊं शकते. ती परंपरा भारतांत आहे काय? नसल्यास ती कशी निर्माण करावयाची? दण्डसत्तांचें आव्हान स्वीकारायचें म्हणजे इतक्या समस्या सोडविण्याची ऐपत आपल्या ठायीं असणें अवश्य आहे. ती आपल्या ठायीं आहे काय? आपल्या सरकारचें याविषयीं काय मत आहे? सरकारच्या मागे उभी असलेली जी काँग्रेसची संघटना तिने या समस्या जाणल्या आहेत काय?' आणि जाणल्या असल्या तर तें आव्हान स्वीकारण्याची कांही सिद्धता ती करीत आहे काय? वर सांगितलेल्या सर्व भावार्थाने दण्डसत्तांचें हें आव्हान आपल्याला स्वीकारतां येईल असें आपल्या नेत्यांना वाटतें काय?

**भारताच्या प्रतिज्ञा**

होय. आपल्या नेत्यांना याविषयी कसलाहि संदेह नाही. लोकशाही मूल्यांना यत्किंचितहि मुरड न घालतां, पूर्ण लोकशाही मार्गांनी, साधनशुद्धीचें ब्रीद संभाळून आम्ही अवश्य तें सामर्थ्य निर्माण करून हें आव्हान निश्चितपणें स्वीकारूं, अशी काँग्रेसच्या नेत्यांनी राष्ट्राला ग्वाही दिलेली आहे. हें आपल्याला साधेल असा पूर्ण आत्मविश्वास त्यांना आहे. आपल्या नियोजन समितीने १९५८ सालीं 'न्यू इंडिया' या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांत अनेक ठिकाणीं अशा तऱ्हेच्या घोषणा दिलेल्या आहेत. "साध्याइतकेंच साधनांना महत्त्व आम्ही देतों, साधनशुचिता हें आमचें ब्रीद आहे. अहिंसाप्रधान लोकशाही मार्गाने आम्ही देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें आहे. राजकीय स्वातंत्र्याप्रमाणेच आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यहि आम्ही त्याच मार्गांनी मिळवूं अशी आमची प्रतिज्ञा आहे" असा उद्घोष ग्रंथाच्या प्रस्तावनेंतच आहे. त्यांत असेंहि म्हटलें आहे की, "कांहीं आक्षेपक म्हणतात की, लोकायत्त मार्गांनी या समस्या सुटणार नाहीत, किंवा निदान अवश्य त्या द्रुतगतीने त्या सोडवितां येणार नाहीत. पण आमचा असा आत्मविश्वास आहे की, आम्ही हें दोन्ही साधूं शकूं. समस्या तर सोडवूंच आणि त्या द्रुतगतीनेहि सोडवूं, आणि अशा रीतीने पूर्ण लोकायत्त मार्गाने आम्ही हें आव्हान स्वीकारूं." ग्रंथाला 'प्रोग्रेस थ्रू डेमॉक्रसी' असें उपनाम याच हेतूने दिलेलें आहे.

प्रस्तावनेंत या प्रकारच्या प्रतिज्ञांचा उच्चार केलेला आहे, आणि पुढे ग्रंथांत लोकशाही मार्ग म्हणजे काय, साधनशुचिता म्हणजे काय, लोकशाही मूल्यांचें संरक्षण म्हणजे काय, हें ठिकठिकाणीं स्पष्ट केलें आहे. त्याचा भावार्थ असा आहे — औद्योगीकरण करणें हें आमचें निश्चित उद्दिष्ट आहे. त्यावाचून, महायंत्रोत्पादनावाचून भारताची प्रगति होणार नाही. पण पोलाद, कोळसा, पेट्रोल, वीज, यंत्रें यांचें उत्पादन वाढवितांना अन्नवस्त्र-घर हें जीवनधन वाढविण्याकडे आम्ही तितकेंच लक्ष पुरवूं. औद्योगीकरणा-साठी आम्ही भांडवल घालीत राहणारच, पण त्यासाठी लोकांच्या राहणीचें मान कधीच कमी होऊं देणार नाहीं. तसें करणें हें दण्डसत्तेचें लक्षण होय. गेल्या पंचवीस वर्षांत इतर अनेक देशांनी औद्योगीकरणाचे प्रयत्न केले, पण

त्यांनी जाणून बुजून जीवनधनाकडे दुर्लक्ष केलें व दण्डसत्तेच्या जोरावर लोकांच्या राहणीचें मान अगदी खाली नेलें. आम्ही तसें करणार नाहीं. मानवी मूल्यांचा बळी देऊन, लोकशाही तत्त्वांना मुरड घालून आम्हांला प्रगति करावयाची नाही. तो लोकशाहीचा, अहिंसेचा, प्रेमाचा, न्यायाचा मार्ग नव्हे. ती हुकुमशाही झाली. दण्डसत्ता झाली. म्हणून जीवनावश्यक धनांची हेळसांड न करतां, त्यांची तूट न येऊं देतां, सुबत्ता निर्माण करून, राहणीचें मान वाढतें ठेवीत आम्ही औद्योगीकरण साधणार आहों. हीच तर आमच्या लोकशाही ध्येयवादाची कसोटी आहे. सुबत्ता निर्मून, अवश्य तें कृषिधन पैदा करून त्याच वेळीं औद्योगीकरणाला अवश्य तें भांडवल पुरवितां आलें तरच आम्ही या कसोटीला उतरलों असें ठरेल. जनतेच्या सहकार्याने, लोकशक्तीच्या साह्याने, अविरत कष्टाने, त्यागाने भारताला या कसोटीला उतरतां येईल अशी आमची खात्री आहे (न्यू इंडिया : पृ. २२, २४, ४३, ४९.)

आमच्या या देशांत अनेक प्रकारचे मिरासदार आहेत, भांडवलदार आहेत, जमीनदार आहेत, अनेक प्रकारचे धनपति आहेत. दरिद्री बहुजन समाज व हे मिराशी यांचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत, हें आम्ही जाणतों. पण इतर देशांतल्याप्रमाणे हिंसेने या मिरासदारांना नष्ट करावयाचें हें आमचें धोरण नाही. हृदयपरिवर्तन हेंच आमचें धोरण, हाच आमचा मार्ग होय. गांधीजी त्यांना विश्वस्त मानीत. आम्ही ही भूमिका त्यांनी मान्य करावी म्हणून, त्यांचें परिवर्तन करूं. वर्गविग्रह चेतवून हें कार्य साधावें असें आमच्या स्वप्नांतसुद्धा येणार नाही. आमचा मार्ग सहकार्याचा, प्रेमाचा, हृदयपरिवर्तनाचा, अहिंसेचा आहे. समाजवादी समाजरचना आम्हांला करावयाची आहे. याचा अर्थ असा की, या समाजांत वर्गभेद राहणार नाहीत. सर्वांना समान संधि मिळेल आणि प्रत्येकाला जीवन समृद्ध करण्यास अवसर मिळेल. राहणीचें मान वाढविणें, भिन्न वर्गांत सहकार्य निर्माण करणें, मागासलेल्या वर्गांना नवी चेतना देणें हें आमचें उद्दिष्ट आहे. समाजवादी समाजरचना ती हीच. ही सर्व क्रान्ति आम्ही मतपरिवर्तनाने करणार. या मार्गाने ती साधेल अशी आमची खात्री आहे. भारतीय जनतेवर, बहुजनांवर आमचा विश्वास आहे (पृ. ३३, ३५, ३६).

आमच्या लोकशाही मार्गाचीं दोन लक्षणें सांगितलीं. राहणीचें मान वाढतें ठेवून औद्योगीकरण करणें आणि वर्गभेद, विषमता नष्ट करण्यासाठी हृदयपरिवर्तनाचा अवलंब करणें हीं तीं लक्षणें होत. शुद्ध, अभ्रष्ट आणि अत्यंत दक्ष व कार्यक्षम राज्यकारभार हें तिसरें लक्षण होय. कारभार असा असल्यावाचून जनतेचा विश्वास व सहकार्य संपादणें अशक्य आहे. सार्वजनिक पैसा हा देशाच्या कारणींच खर्ची पडत आहे असें दिसलें तरच राष्ट्रकार्याची जबाबदारी शिरावर घेण्यास जनता तयार होते. म्हणून याविषयी आम्ही अत्यंत दक्षतेने जागता पहारा ठेवला आहे. त्यासाठी एक स्वतंत्र समिति नेमलेली आहे. शुद्धता ही वरीचशी कार्यक्षमतेवर अवलंबून असते. ही कार्यक्षमता साधावी म्हणून सत्तेचें विकेंद्रीकरण करण्याचें धोरण आम्हीं अंगीकारिलें आहे. सरकारी दीर्घसूत्री कारभार, नोकरशाही चेंगटपणा, लाल फितीची पद्धत हें सर्व कार्यक्षमतेच्या आड येत असतें. तें नाहीसें करून कार्याचा वेग सतत वाढता ठेवण्याकडे आमची दृष्टि राहील (पृ. ११५).

या सर्व कार्यामध्ये बहुजनांचें सहकार्य हें आमचें खरें बळ आहे. भारताचा विकास हें कार्य बहुजनांचें आहे व त्यांनीच तें करावयाचें आहे. सरकार पैसा पुरवील, मार्गदर्शन करील, सरकारी अधिकारी जनतेच्या साह्याला नित्य उभे राहतील; पण बहुजनांत उठाव निर्माण करणें, त्यांना कार्यप्रवण करणें हेंच त्यांचें मुख्य काम राहील. लोकांनी स्वतः आपला आपण उद्धार करणें हें लोकशाहीचें सर्वांत मोठें लक्षण होय. या मार्गानेच येथील लोकांचें व्यक्तित्व विकसित होईल. त्यांचा आत्मा विशाल होईल. ते खरेखुरे नागरिक होतील. अन्नधान्य, पोलाद, वीज, पेट्रोल, अणुशक्ति हें जड ऐश्वर्य आम्हांला प्राप्त करून घ्यावयाचें आहेच, पण आमचें खरें उद्दिष्ट म्हणजे आत्म्याचें ऐश्वर्य हें होय, म्हणजेच व्यक्तीचें व्यक्तित्व होय. यासाठी प्रत्येक राज्यांतील, प्रत्येक खेड्यांतील जनता जागृत व्हावी व आपल्या खेड्याचा उद्धार, विकास करण्यास तिने कटिबद्ध व्हावें म्हणून आम्ही विश्वप्रयत्न करूं. आमचें व आमच्या लोकशाहीचें खरें यश त्यांत आहे.

## योजनांची आखणी

भारताच्या प्रगतीची आज सर्व जबाबदारी काँग्रेस सरकारवर आहे. ती प्रगति साधतांना, भारताच्या उत्कर्षपथाची वाटचाल करतांना कोणतीं तत्त्वें डोळ्यांपुढे ठेवावयाचीं, कोणते मार्ग स्वीकारावयाचे व कोणतें धोरण अवलंबावयाचें याविषयी काँग्रेसच्या नेत्यांनी वेळोवेळीं ज्या प्रतिज्ञा केल्या त्यांचा भावार्थ वर दिला आहे. आता या प्रतिज्ञा सार्थ करण्यासाठी, आपलीं उद्दिष्टें साध्य करण्यासाठी त्यांनी कोणत्या योजना आखल्या आहेत तें पाहावयाचें आहे. या योजना आता जगजाहीर झाल्या आहेत. पंचवार्षिक योजना, समाजविकास योजना, राष्ट्रविकास योजना या त्रांपैकी प्रमुख योजना आहेत. याशिवाय सहकारी शेती, सहकारी कारभार, ग्रामीण कर्जयोजना अशा अनेक योजना आहेत. पण बहुधा या सगळ्यांचा पहिल्या तिन्हींत अंतर्भाव होतो. या योजनेमध्ये राष्ट्राच्या उत्कर्षाची जेवढीं म्हणून अंगें आहेत त्या सर्वांचा अत्यंत बारकाईने विचार केलेला आहे. प्रथम शेतीचा विचार करूं. हिंदुस्थानचा मुख्य व्यवसाय शेतीचा आहे. शेकडा ६८ लोकांचा तो व्यवसाय आहे. या शेतींतून भारताला अन्न, धान्य, कापूस, साखर, तेल व इतर कच्चा माल हें धन पुरेसें मिळतें की नाही यावर सर्व अवलंबून आहे. म्हणून वरील योजनांत कृषि-सुधारणेला अग्रस्थान दिलेलें आहे. या सुधारणेंतील पहिलें कलम म्हणजे जमीनदारीचा नाश हें होय. अहोरात्र कष्ट करून शेवटीं पदरांत कांहीच पडत नाही, पुरेसें अन्नवस्त्र मिळत नाही अशी भारतांतील शेतकऱ्यांची शतकानुशतकें अवस्था आहे, त्याचें कारण म्हणजे ही जमीनदारी. म्हणून 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वाचा अवलंब करण्याचें ठरवून भारत सरकारने मुंबई राज्यांतील कूळकायद्याप्रमाणे अनेक कायदे केले आणि आपल्या कष्टाचें फळ आपल्यालाच मिळेल, हा विश्वास शेतकऱ्याला निर्माण करून दिला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे धरणें, पाटबंधारे, कालवे, तळीं, विहिरी हीं बांधून शेतीला पाणीपुरवठ्याची सोय करून देणें. भाक्रानानगल, हिराकूड, दामोदर व्हॅली, कोयना या मोठ्या धरण-योजना व असंख्य लहान बंधाऱ्यांच्या योजना हातीं घेऊन सरकारने भावी समृद्धीचा पाया घातला आहे.

सिंद्रीला खतांचा कारखाना काढून लक्षावधि टन खत शेतकऱ्यांना मिळवून देण्याची सोय सरकारने केली हें सर्वश्रुतच आहे. १९५२ सालीं सुरू झालेली समाजविकास योजना हा तर भारतांतील सामाजिक व आर्थिक क्रान्तीचा शुभारंभच होय. एप्रिल १९५६ पर्यंत १,२३,००० खेडीं या योजनेंत समाविष्ट झालेलीं आहेत. पुढील कांहीं वर्षांत, राहिलेलीं साडेतीन चार लक्ष खेडीं या योजनेंत येतील. यांत १०० खेड्यांचा एक गट असून त्यांत सुमारे ६ हजार लोक येतात. दर १० खेड्यांना एक कार्यकर्ता नेमून दिलेला असतो. सकस बीं-बियाणें, अवजारें, खतें, शेतीच्या नव्या पद्धति, तगाई, कर्ज, लहान धरण-योजना या सर्वांची व्यवस्था त्याच्या नेतृत्वाने व्हावी अशी योजना आहे. खेडुतांना कार्यप्रवण करणें, मार्गदर्शन करणें, सरकारी मदत मिळवून देणें हें त्याचें मुख्य काम. खेडीं स्वावलंबी व्हावीं, ग्रामविकास ग्रामीण जनतेनेच घडवावा हें जें कॉंग्रेसचें मुख्य तत्त्व तें प्रत्यक्षांत आणण्यासाठी प्रयत्न करणें, जनतेची सुप्त शक्ति जागृत करणें हें योजनेचें अंतिम उद्दिष्ट आहे, म्हणून हे ग्रामीण कार्यकर्ते कृषिसुधारणे-कडेच लक्ष देतात असें नाही. खेड्यांचा सर्वच कायापालट करून टाक-ण्याचे त्यांचे प्रयत्न असतात. खेड्यांतील लोकांना संघटित करून रस्ते बांधणें, शाळा उभविणें, सर्व जगांतल्या घडामोडींचें ज्ञान खेडुतांना देणें, त्यांना सहकारी वृत्तीचें शिक्षण देणें आणि नवभारताच्या निर्मितीसाठी अवश्य ती मनःक्रान्ति ग्रामीण जनतेंत घडवून आणणें असें हें प्रचंड कार्य आहे. भारत सरकारचे व कॉंग्रेसचे हजारो कार्यकर्ते आज सात आठ वर्षें तें करीत आहेत.

शेतीप्रमाणेच औद्योगिक विकासाच्या क्षेत्रांतहि सरकारने असाच महोद्योग सुरू केला आहे. रुरकेला, भिलाई, दुर्गापूर येथील पोलादाचे कारखाने, चित्तरंजन लोकोमोटिव्ह कारखाना, पिंपरीचा पेनिसिलीनचा कारखाना, सिंद्रीचा खताचा कारखाना, बंगलोरचा टेलिफोनचा व विशाखापट्टण येथील जहाजांचा कारखाना, हे कारखाने सरकारच्या उद्योगाची साक्ष देतील. वर सांगितलेल्या धरण-योजनांतून लक्षावधि किलोवॅट वीज निर्माण व्हावयाची आहे. कोळसा, पेट्रोल, अनेक प्रकारचीं इतर खनिजें यांचें उत्पादन वाढविण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न होत आहेत. यासाठी अमेरिका, जर्मनी,

रशिया, ब्रिटन या देशांनी भांडवलाचा पुरवठा करून शिवाय हे कारखाने चालविण्यासाठी अनेक शास्त्रज्ञ व तंत्रज्ञहि पाठविले आहेत. शिवाय ग्राम-विकास योजनेंत लहान प्रमाणांच्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी समित्या स्थापून सरकारने कोटचवधि रुपये खर्ची घातले आहेत. कागद, चामडें, तेल, खादी, साबण इत्यादि नानाप्रकारचे ग्रामोद्योग या समित्यांनी सुरू केले आहेत. या महोद्योगांत खाजगी भांडवलदारांचेंहि सर्व प्रकारचें सहकार्य घ्यावयाचें सरकारने ठरविलें असून त्यांनी आतापर्यंत उभारलेल्या कारखान्यांना सर्व प्रकारें उत्तेजन देण्याचें धोरण सरकारने अवलंबिलेलें आहे. या प्रचंड उद्योगाला जनतेकडून साह्य मिळावें म्हणून अल्पबचत योजनेसारख्या अनेक योजनाहि सरकारने आखल्या आहेत. एवंच सरकारी प्रयत्न, खाजगी भांडवलदारांचें साह्य, जनतेचें सहकार्य व इतर राष्ट्रांचें साह्य अशा चतुर्विध बळावर भारताचें औद्योगीकरण अत्यंत वेगाने घडवावयाचें असा सरकारचा कृतनिश्चय असून त्यासाठी एवढा पसारा त्याने मांडलेला आहे.

या योजनांचा आढावा घेतांना त्यांचें यश अतिशय उत्साहदायक आहे असेंहि सरकारी प्रवक्त्यांनी सांगितलें आहे. पहिली पंचवार्षिक योजना १९५१ सालीं सुरू होऊन १९५६ सालीं संपली. या पांच वर्षांत १ कोटि ६० लक्ष एकर जमीन पाण्याखाली आली. ७४ लक्ष एकर पडीक जमीन लागवडीस आली. २१ लक्ष एकर जमिनींत जपानी पद्धतीची शेती झाली. सुमारें ४ लक्ष टन खतें व दीड लक्ष टन बियाणें वाटण्यांत आलें. ५६००० मैल नवे रस्ते बांधण्यांत आले, १५००० नव्या शाळा बांधल्या, ३४००० पंचायती स्थापन झाल्या, ६९००० शेतकरी मंडळें निघालीं. या सर्वांचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे अन्नधान्याची वाढ शे. २० ने झाली आणि राष्ट्रीय उत्पन्न शे. १८ ने वाढलें.

या सर्व योजना पाहिल्या म्हणजे कोणाचेंहि मन आनंदाने मोहरून जाईल यांत शंका नाही. योजनाकारांनी राष्ट्रीय उन्नतीचा सर्व अंगांनी विचार केला आहे, हें योजनांचा तपशील पाहतां स्पष्ट दिसून येतें. अन्नधान्याच्या उत्पादनावर भर देणें आणि औद्योगीकरणाची कसोशी करणें, भांडवलाची तरतूद करणें आणि लोकांच्या सुप्त शक्ति जागृत करून स्वावलंबनाने

आपला उत्कर्ष साधण्यास त्यांस प्रवृत्त करणें, हें सर्व अभिनंदनीय असेंच आहे. अखिल भारतांत एक नवा उठाव घडवून आणण्यास, आणि लोकशाही मार्गाने जीवनक्रान्ति प्रत्यक्षांत आणण्यास या योजना समर्थ आहेत असेंच कोणाचेंहि मत होईल; आणि येथे जे परकीय निरीक्षक येऊन गेले त्यांनी आपला असाच अभिप्राय नमूद करून ठेविला आहे. "या योजनांनी भारतीय किसानांच्या जीवनांत एक अभूतपूर्व अशी क्रान्ति घडून येत आहे" असें प्रा. टायनबी म्हणाले. आर्थिक व सामाजिक प्रगतीचा हा एक सर्व आशियांतला अभिनव प्रयोग आहे, असें इतर पंडित म्हणाले. आपल्याकडल्या डॉक्टर धनंजयराव गाडगिळांसारख्या अर्थकोविदांनीहि मूळ आखणीच्या दृष्टीने या योजना अतिशय उत्तम आहेत, निर्दोष आहेत असाच अभिप्राय दिला आहे.

## प्रत्यक्षांतील फलसिद्धि : अन्नधान्य, महागाई, बेकारी !

पण कागदांत व ग्रंथांत वर्णिलेल्या या योजना वाचून झाल्यावर त्यांचें सत्यसृष्टींत प्रत्यक्ष फल काय मिळालें हें पाहण्याच्या हेतूने तिकडे दृष्टि वळविली तर मात्र अत्यंत विपरीत दृश्य दिसूं लागतें. दारिद्र्य, उपासमार, महागाई, बेकारी यांचें स्वरूप पूर्वीपेक्षा जास्तच भेसूर झालेलें दिसतें. निराशा, उद्वेग, विफलता यांमुळे या देशावर सर्वत्र घोर अवकळा पसरलेली आहे. हें पाहून मनाला धक्काच बसतो, आणि आपल्या मागून स्वतंत्र झालेल्या व महायुद्धांत बेचिराख झालेल्या चीन, जर्मनी, जपान यांसारख्या देशांच्या प्रगतीचें चित्र आणि भारताचें चित्र यांची मनांत तुलना होऊन काळजाचा ठाव सुटतो. महागाई रोज वाढतेच आहे. १९५६–१९५७ या वर्षांत महागाई १३ टक्के वाढली आणि त्यानंतरच्या वर्षांत ती १५ टक्क्यांनी वाढली. रोज प्रत्येक पदार्थाची किंमत वाढतच आहे. अन्न महाग झालें, कापड महाग झालें, रॉकेल महाग, साखर महाग, कागद महाग, घर महाग, शिक्षण महाग. सर्वत्र – मुंबई, पंजाब, मद्रास सर्व राज्यांत–स्वस्त धान्याच्या दुकानांसमोर रांगांच्या रांगा ५–५ तास उन्हातान्हांत उभ्या असतात, आणि मग शेवटीं स्वस्त धान्य संपल्यामुळे चिडून, उद्वेगून परत जातात. १९५९ सालीं अखिल भारतीय कांग्रेस समितीच्या दिल्लीच्या बैठकींत

केन्द्र अन्नमंत्री अजितप्रसाद जैन म्हणाले, "गेल्या अठरा महिन्यांत अन्न-धान्याची परिस्थिति १९४३सालच्या बंगालच्या दुष्काळाप्रमाणेच भीषण झाली आहे." पं. नेहरू म्हणाले, "देशांतल्या बहुसंख्य जनतेला प्राणधारणाच्या वस्तुहि मिळत नाहीत. कित्येक ठिकाणीं तर प्यायचें पाणीसुद्धा नाही." अशी सर्वत्र महागाई आहे. बेकारीचा भस्मासुर असाच प्रत्येकाच्या डोक्या-वर हात ठेवीत चालला आहे. दहा वर्षांत सर्व बेकारी नष्ट करूं अशी आपण प्रतिज्ञा केली होती. दुसऱ्या योजनेंत ८० लाख लोकांना रोजगार मिळवून द्यावयाचा होता, पण आता ६० लाख लोकांनासुद्धा देतां येईल अशी खात्री नाही; आणि इतर रोजगार निर्माण झाला तरी १९६१ सालीं ७० लक्ष लोक बेकार राहणार असें केन्द्रीय रोजगार समितीचे अध्यक्ष गुलझारीलाल नंदाच सांगत आहेत. शिवाय तिसऱ्या योजनेच्या काळांत लोकसंख्येची भर पडून आणखी १ कोटि ४० लक्ष बेकार लोक निर्माण होतील! हें झालें संपूर्ण बेकारीचें. पण ज्यांना रोजगार आहे त्यांची स्थिति पाहिली तर हें चित्र अधिकच भेसूर दिसतें. भारत सरकारचे आर्थिक सल्लागार प्रा. महलोनबीस यांनी सांगितलें आहे की, दोन कोटि लोकांना रोज एकच तास काम मिळतें. आणखी ४॥ कोटि लोकांना ४ तासांपेक्षा कमी काम मिळतें. याशिवाय पुष्कळांना ८-१० तास काम करूनहि अर्धपोटीं राहावें लागतें, हें सर्वांनाच माहीत आहे. आपण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या १२ वर्षांच्या काळांत जीवन-धनाच्या बाबतींत अशी प्रगति केली आहे! आपले मार्ग लोकशाहीचे आहेत, निदान आपण तसें म्हणतों. चीनला आपल्यापेक्षा दोन वर्षें उशीरा स्वातंत्र्य मिळालें. तेथली लोकसंख्या ६५ कोटि आहे. पण १० वर्षांच्या अवधींत नवचीनने अन्नधान्याचा प्रश्न सोडवीत आणला आहे. यूनोचे एके काळचे अन्नप्रश्नाचे तज्ज्ञ लॉर्ड बॉईड ऑर हे नुकताच चीनचा दीर्घ प्रवास करून आले. ते म्हणाले की, चीनने गेल्या तीन वर्षांत आपलें अन्न-धान्य दुपटीने वाढविलें आहे. दर एकरीं चीन इंग्लंडइतकें धान्य पिकवूं शकतो. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येलाहि चीन अन्न पुरवूं शकेल असें ऑर म्हणतात. त्याचप्रमाणे चीनने औद्योगिक उत्पादनहि प्रचंड प्रमाणांत वाढविलें आहे. पांखरें, उंदीर, घुशी हे प्राणी दरसाल कोटि कोटि टन धान्याचा फडशा पाडतात. चीनने त्यांचा संपूर्ण नायनाट केला आहे. पण

हें सर्व दण्डसत्तेने झालें आहे. तेथे माओ, चौएन लाय, लिऊ शाऊची यांच्या-वर कोणाला टीका करतां येत नाही. मध्यंतरीं थोडे दिवस अशी परवानगी देण्यांत आली होती, पण सरकारवर फारच कडवट टीका झालेली पाहतांच या आक्षेपकांचा नायनाट करण्यांत आला. हें मोठें दुःख तेथे आहे, पण तेथे अन्नवस्त्र पुरेसें आहे ! आपल्याकडे नेहरू, पंत, मेनन, मुरारजी देसाई यांच्यावर वाटेल ती टीका करण्याचें स्वातंत्र्य आहे. पण खायलाच कांही नाही ! आणि हेंच दण्डसत्तेचें लोकसत्तेला आव्हान आहे. लोकशाही मूल्यें टिकवूनहि लोकांना तुम्ही खायला देऊं शकाल काय ?

## परकी चलन

अन्नधान्य, वस्त्र यांच्या बाबतींत योजनेचें फल काय मिळालें तें सांगितलें. परकी चलनाच्या बाबतींत काय स्थिति आहे ती पाहा. आपल्याला पर-देशांतून शेकडो पदार्थ योजनेच्या सिद्धीसाठी व रोजच्या व्यवहारासाठी आणावे लागतात. त्यासाठीं हें परकी चलन अवश्य असतें. १९४७ सालीं लंडनला आपली स्टर्लिंग शिल्लक १६१३ कोटि होती. आतां ती १६९ कोटि आहे. अनेक पदार्थांची, मालाची निर्यात करून परकी चलन मिळवा-वयाचें अशी आपली योजना आहे. तिचें काय झालें तें पाहूं. १९५४ सालापासून दरसाल १०० कोटि वार कापड निर्यात करून ७५ कोटि रुपये परकी चलन मिळवावयाचें असा निश्चय झाला होता. पण आपल्याला १९५४ सालीं ८० कोटि वारच कापड निर्यात करतां आलें. ५५ सालीं ७० कोटि, ५६ सालीं ६९ कोटि, ५७ सालीं ८४ कोटि आणि ५८ सालीं फक्त ५० कोटींची निर्यात आपण केली. येथे रोज संप चालू आहेत, टाळेबंदी आहे, मोर्चे आहेत, १०० कोटींचा इष्टांक आपण गांठणार कसा ? जपान-मध्ये कांही दण्डसत्ता नाही. पण त्या लहानशा राष्ट्राने याच काळांत आपल्या दिडोदुपटीने कापडाची निर्यात केली. १९५४ सालीं १२८ कोटि वार कापड, ५५ सालीं ११४ कोटि, ५६ सालीं १२६ कोटि, ५७ सालीं १४५ कोटि वार कापड जपान निर्यात करूं शकलें. या चार पांच वर्षांत तर तेथे पूर्ण लोकशाही आहे. पण तेथे ती त्यांच्या आड आलेली नाही. पण तेथे दुसरी एक गोष्ट आहे. जपानी लोक कष्ट करतात, श्रमाचें महत्त्व

जाणतात. तेथील भांडवलदारांना राष्ट्राच्या उन्नतीची काळजी आहे, आणि तो तर लोकशाहीचा पाया आहे. राष्ट्रनिष्ठा, समाजहितबुद्धि, लोककल्याणाची इच्छा ही नेत्यांमध्ये, अधिकाऱ्यांमध्ये, भांडवलदारांमध्ये, बहुजनांमध्येहि तीव्र स्वरूपांत असेल तर दण्डसत्तेचें आव्हान कोणतीहि लोक-सत्ता स्वीकारूं शकेल. हें थोर धन आपल्याजवळ आहे काय? आपल्या योजना सर्वतोपरी उत्तम असून त्या इष्ट फल कां देत नाहीत याचा विचार करतांना या प्रश्नाचें उत्तर शोधलें पाहिजे.

## पाटबंधारे

पाण्याखालीं जमीन भिजवून अन्नधान्य-उत्पादन वाढवावें असा योजना-कारांचा विचार आहे, पण प्रत्यक्षांत त्याचें फल काय मिळतें तें पाहणें उद्‌बोधक आहे. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन ही संस्था धरणें, बंधारे, कालवे, वीज यासाठीच स्थापन झालेली आहे. पब्लिक अकौंटस कमिटीचा तिच्याविषयीचा १९५६–५७ चा अहवाल पाहूं. दामोदर योजनेंतील एक तिलय्या नांवाचें धरण १९५२ सालींच पुरें झालें आहे; पण अजून या पाण्याखाली एक एकरहि जमीन भिजलेली नाही. कोनार डॅम नांवाचें दुसरें एक धरण १० कोटि रु. खर्चून बांधलें. त्याचा उपयोग काय असा प्रश्न आला. तेथील मुख्य संचालकांनी सांगितलें की, तें धरण बांधावयाला नको होतें, आणि आजचें ज्ञान तेव्हा असतें तर आम्हीं तें बांधलेंच नसतें. पहिल्या हिशोबाप्रमाणें १९७० सालीं या योजनेंतील भांडवलावर नक्त नफा शेकडा ८·६ मिळणार होता. आताचा हिशेब असा आहे की, १९७० सालीं ६१ लाख तोटा होणार आहे. सरकारी दीर्घसूत्रीपणा, चेंगटपणा टाळावा म्हणून या कॉर्पोरेशनला स्वतंत्र अधिकार दिलेले आहेत. दीर्घ-सूत्रीपणा न होऊं देणें हें आमच्या लोकशाही कारभाराचें लक्षण आहे, अशी नियोजन समितीची श्रद्धा आहे हें प्रारंभींच सांगितलें आहे. म्हणून तेथे (रेडटेप) लाल फितीचें वर्चस्व होऊं दिलें नाहीं. पण आमची गजगति टळली नाही. कॉर्पोरेशनला कांही पट्टे हवे होते. ते गावांतल्या कारखान्यांत तयार होतील की नाही हें कळायला ४० दिवस लागले. ४० दिवसांनी कळलें की, ते होत नाहीत. मग ते परदेशांतून आणावयाचे. त्यासाठी परवाना

पाहिजे, ती कचेरी गावांतच होती. पण परवाना मिळावयास चार महिने लागले. मग घाई झाली. परदेशांतून पट्टे विमानाने आणावे लागले. त्यामुळे नुसत्या भाड्यापायी १६००० रुपये जास्त खर्च झाला. तेथील अधिकाऱ्यांनी चैनीसाठी विहारनौका विकत घेतल्या. त्यांच्या व्यवस्थेसाठी १८००० रुपये खर्च झाला. आर्थिक सल्लागारांनी यास मनाई केली होती, तरी अधिकाऱ्यांनी ऐकलें नाही. एकंदर दामोदर व्हॅलीसाठी आरंभीं २२ कोटि रुपये खर्च लागेल असा हिशेब होता. आतां ४४ कोटि रुपये लागणार आहे आणि आपल्या सर्वच योजनांप्रमाणे हा खर्चाचा आकडा अजूनहि वाढेल. उत्पन्न मात्र हळूहळू सूक्ष्मदर्शकांतून पाहण्यासारखें होत जाईल.

## अप्रत्यक्ष प्रमाण

आपल्या योजनांचें काय होत आहे हें दाखविण्यासाठी कांही प्रत्यक्ष प्रमाणें वर दिलीं. आता एक अप्रत्यक्ष पण जास्त निर्णायक प्रमाण देतों. या योजना सर्व काँग्रेसने आखल्या व चालविल्या आहेत. योजनाकारांनी वेळोवेळीं जाहीर केल्याप्रमाणे त्यांचें यश खरोखरच स्पृहणीय, विलोभनीय असतें, त्यामुळे लोकांचें जीवन जर खरोखरच अंशत: तरी सुखी झालें असतें तर निवडणुकांमध्ये काँग्रेसला उत्तरोत्तर घवघवीत यश प्राप्त झालें असतें, पण प्रत्यक्षांत उलटच होत आहे. काँग्रेसची पत अनेक प्रांतांतून नष्ट होत चालली आहे, झाली आहे. केरळमधून काँग्रेस हाकलली गेली. ओरिसांत तोच प्रकार घडला. महाराष्ट्रांत तिची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली. इतर प्रांतांतहि तिचे चंद्रभान गुप्तासारखे हुकमी एक्के वाऱ्यावर उधळून गेले. सिद्धार्थ रे सारखे मंत्री राजीनामा देऊन नंतर आव्हान देऊन मोठ्या बहुमताने बंगालमध्ये निवडून आले. मद्रास राज्यांत स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकींत काँग्रेसची अशीच नापत झाली. ५४ पैकी १९ स्थानिक स्वराज्यें च फक्त काँग्रेसला जिंकतां आलीं. उत्तर प्रदेशांत हाच प्रकार घडला. मद्रास शहर काँग्रेसच्या हातचें गेलें, पुणें गेलें, मुंबई गेली, दिल्लीहि गेली. ही तर काँग्रेसची विटंबना आहेच, पण आणखी जास्त विटंबना म्हणजे काँग्रेसविरुद्ध लढून कम्युनिस्ट व जातीय हे निवडून येतात ही होय! योजना आखून जनतेचें कल्याण करूं म्हणणाऱ्या काँग्रेसच्यामागे जनता जायला

तयार नाही ! हें अपयश फारच लाजिरवाणें आहे. याचें कारण एकच. महागाई आणि बेकारी नष्ट करण्याचे काँग्रेसचे प्रयत्न विपरीत गतीला जात आहेत. महागाई व बेकारी या अवकळा वाढतच आहेत. परवा मद्रासच्या काँग्रेसजनांनी मुख्य मंत्र्यांना निक्षून सांगितलें की, महागाई अशीच वाढत गेली, तर आपल्याला येथे स्थान नाही. या महागाईची कथा जास्त घातक आहे. मद्रास, कोकण (कुलाबा) व उत्तर प्रदेश येथे १९५९ सालीं पिकें भरगच्च आलीं होतीं. पण वर्तमानपत्रांत शेजारीं शेजारींच बातम्या येत होत्या – 'सोळा आणे पीक' आणि 'धान्याची वाढती महागाई' – याचा अर्थ लोकांना आता समजूं लागला आहे. पिकें उत्तम आलीं तरी या राज्यांत खायला मिळेल की नाही, अशी अत्यंत दारुण शंका जनतेच्या मनांत घर करीत आहे !

आपल्या योजना उत्तम असतांना, सर्वांगीण विचार करून त्या आखलेल्या असतांना, साधनसामग्री व भांडवल यांची चांगली तरतूद केलेली असतांना त्या इतक्या विफल कां व्हाव्या, त्यांना विपरीतच फळें कां यावीं, महागाई, बेकारी वाढतच कां जावी या प्रश्नांनी कोणाहि भारतीयाचें मन व्याकुल झाल्यावाचून राहणार नाही. पण याचें कारण अगदी स्पष्ट आहे. तें हुडकण्यासाठी मोठें चिंतन करावयास पाहिजे असें नाही. परिश्रम, संशोधन कशाचीहि गरज नाहीं. अगदी एका साध्या वाक्यांत उत्तर द्यावयाचें तर तें असें की, या योजनांमागे 'भारतीय' उभा नाही.

## सेनापति कोठे आहेत ?

विषमता, अज्ञान, दारिद्रय, बेकारी आपल्या देशांतून नष्ट करण्याचे येथे जे प्रयत्न चालू आहेत त्यांचें 'ही युद्धआघाडी आहे', 'दारिद्रय, उपासमार या शत्रूंशीं ही लढाई आहे', 'विषमता, शोषण यांशीं हा संग्राम आहे', असें नेहमी वर्णन केलें जातें. त्यावरून एक प्रश्न मनांत येतो की, या लढाईंत, या संग्रामांत या देशाचे जे नांवाजलेले लढवय्ये, सरदार, शिलेदार, बिनीचे वीर ते कोठे आहेत ? ते सर्व आघाडीवर असावयास पाहिजेत. युद्ध, संग्राम या एकाच विषयावर त्यांचें सारें लक्ष, सर्व शक्ति केंद्रित झाल्या असल्या पाहिजेत. क्षुद्र मतभेद, क्षुद्र स्वार्थ विसरून, सर्व

लोभ-मोह सोडून एकोप्याने हे त्या आघाडीवर लढत असले पाहिजेत! कोणाचीहि अपेक्षा अशीच असणार! पण प्रत्यक्षांत काय आहे ? हे आघाडीचे वीर सध्या कोणत्या उद्योगांत गुंतले आहेत ? रोजचीं वर्तमानपत्रें वाचणारांच्या हें ध्यानांत येईल की, ते निराळ्याच उद्योगांत आहेत! मुख्य मंत्री जत्ती असावे की हनुमंतय्या असावे का निर्जलिंगप्पाच बरे, या प्रश्नावर आमच्या सर्व सरदार, शिलेदारांचें लक्ष केन्द्रित झालेलें असतें. प्रत्येक राज्यांत स्वातंत्र्य मिळाल्यापासून या लढाया चालू आहेत. जत्ती गटाचे काँग्रेसजन हनुमंतय्याविरुद्ध सह्या गोळा करतात. हनुमंतय्यांचे परिजन निर्जलिंगप्पाविरुद्ध सह्या गोळा करतात. या सह्या-मोहिमा एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालतात की, काँग्रेस-श्रेष्ठींना त्याविरुद्ध फतवे काढून त्या बंद कराव्या लागतात. पण अर्थातच त्यांचा कांही उपयोग होत नाही. मोहिमा चालूच राहतात. परिजन सह्या गोळा करण्यांत आणि विरुद्ध गटांचीं कुलंगडीं शोधण्यांत व जत्ती, हनुमंतय्या दिल्लीच्या वाऱ्या करण्यांत मग्न असल्यामुळे युद्धआघाडीवर जाण्यास त्यांना वेळ कोठून मिळणार? शिवाय इतर अनेक उद्योग असतातच. म्हैसूर सरकारच्या कारभाराचें परीक्षण करण्यास त्या सरकारनेच नागपूर हायकोर्टाचे न्यायाधीश श्री. पी. डी. देव आणि श्री. गोरवाला यांची नेमणूक केली. त्या दोघांनी अहवाल अतिशय प्रतिकूल लिहिला. तेव्हा तेच लोक कसे हीन वृत्तीचे आहेत हें सिद्ध करणें सरकारला अवश्य होऊन बसलें. इत्यर्थ असा की, आपलें आसन स्थिर ठेवणें, या उद्योगांतच तनमन व सरकारी धन खर्चावें लागल्यामुळे युद्ध-आघाडीवर या सेनापतींना जातां येत नाही. उत्तर प्रदेशांत डॉ. संपूर्णानंद यांची हीच स्थिति आहे. परवा त्यांचे एक मंत्री चरणसिंग यांनी सरकारी कारभारावर कडक टीका करून मंत्रिपदाचा राजीनामा दिला. तेथलीं काँग्रेसजनांमधील भांडणें मिटवावीं म्हणून गोविंदवल्लभ पंत, पं. नेहरू हे सारखे प्रयत्न करतात, पण उपयोग कांही होत नाही. मध्यप्रदेशाचे मुख्य मंत्री डॉ. काटजू यांनी मंत्र्यांच्या गटबाजीला व भांडणाला विटून राजीनामा देण्याचा अनेकदा विचार केला. तेथेहि सह्यांची मोहीम आहेच. काँग्रेसचे माजी अध्यक्ष ढेबरभाई यांनी तर उद्वेगून जाऊन मध्यप्रदेशांतील काँग्रेस संघटना बंदच करावी असे उद्गार काढले होते. पंजाब हा

मंत्र्यांच्या गटबाजीसाठी प्रसिद्धच आहे. मुख्यमंत्री कैरॉं व ग्यानी कर्तारसिंग यांचीं भांडणें मिटविण्यासाठी ढेबरभाई नित्य पंजाबला जात असत. त्यांची पाठ वळली की भांडणें सुरू? राजस्थानचे मुख्यमंत्री मोहनलाल सुखडिया व त्यांचे प्रतिस्पर्धी जयनारायण व्यास यांची यादवी १९५४ सालापासून चालू होती. सुखडियांना पदच्युत करण्याचे विरोधी गटाचे प्रयत्न सारखे चालू होते. आता त्यांच्यांत समझौता झाला आहे, तरी व्यास गटांतील अनेक लोक संतुष्ट नाहीतच. इतर राज्यांतहि हे युद्ध-आघाडीवरचे सेनापति याच उद्योगांत गुंतलेले असतात; आणि दुर्दैव असें की, स्वातंत्र्य मिळालेल्या क्षणापासून हे प्रकार चालू आहेत. मद्रासचे टी. प्रकाशम् व त्यांचे प्रतिस्पर्धी, बिहारमध्ये श्रीकृष्ण सिंह व अनुग्रह नारायणसिंह, पंजाबमध्ये भार्गव आणि साचार, मध्यभारतांत लीलाधर जोशी व विजयवर्गीय यांचीं भांडणें, मारा-मान्या यांचा पं. नेहरू, वल्लभभाई, राजेन्द्रबाबू यांनी अनेक वेळां निषेध केला आहे. हीं सर्व भांडणें लोभ, स्वार्थ, गटबाजी यांतून उद्‌भवलेलीं आहेत. त्यांत तत्त्वाचा कसलाच प्रश्न नाहा, अशी टीका या श्रेष्ठींनीच केली आहे. देशाचे सेनापति कायम या कामांत असल्यामुळे युद्धआघाडी नेहमीच रिकामी राहिली तर नवल कसलें?

दण्डसत्तांनी दिलेलें आव्हान स्वीकारण्याचें सामर्थ्य प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर षडंगबल प्राप्त करून घेतलें पाहिजे असें मागे अनेक वेळां सांगितलें आहे. तें भारताने प्राप्त करून घेतलें आहे काय, त्या प्रयत्नांत त्याला कितपत यश येत आहे याचा विचार आपण करीत आहों. संघटित दृढ ऐक्य जोपासणारा, यादवी, दुही, गटबाजी यांचें निर्मूलन करणारा समाज हें षडंगबलापैकी प्रमुख बल होय. वरील विवेचनावरून आपला समाज कितपत संघटित आहे याची कल्पना येईल. बहुतेक सर्व राज्यांत कॉंग्रेस ही संघटना चिरफळलेली आहे आणि युद्धाच्या काळीं तरी मतभेद, क्षुद्र स्वार्थ विसरावे हा विवेक वरच्या पातळींतल्या कॉंग्रेसजनांनासुद्धा नाही. सत्तालोभ त्यांना सुटत नाही. एकमेकांविरुद्ध कारस्थानें करण्यांत सध्याच्या बिकट युद्धकाळांतसुद्धा ते गुंतलेले आहेत. अशा स्थितींत समाज संघटित व्हावा कसा?

## सर्व भक्षक राजकारण

आमच्या सेनापतींच्या या सत्तालोभाला राजकारणी लोकांच्या स्वार्थी वृत्तीची जोड मिळाली असल्यामुळे आपल्या देशाचा अधःपात आकाशांतून पडणाऱ्या दगडाच्या गतीप्रमाणे दर क्षणाला जास्त जास्त वेगाने होत आहे. सत्ताधारी, सत्तेच्या लोभांतून मुक्त असले तर त्यांना निःस्पृहपणें राजकारणी लोकांना दूर ठेवतां येतें. पण दुर्दैवाने तसें नसल्यामुळे त्यांना पदोपदीं राजकारणी लोकांचें साह्य लागत असतें, आणि यांतच कल्याणकारी राज्याचा बळी पडतो. अन्नधान्य व एकंदर शेतमाल यांचे भाव स्थिर करून ठेवणें, त्यांत भलते चढउतार न होऊं देणें, हें सध्याच्या काळीं कोणत्याहि देशांत प्रगतीचें पहिलें साधन समजलें जातें. अमेरिका, कॅनडा या देशांनी नियोजन स्वीकारलेलें नाही, तरी शेतकऱ्यांच्या व एकंदर समाजाच्या आर्थिक स्थैर्यासाठी त्यांनी वरील तत्त्व स्वीकारलेलें आहे. आर्थिक नियोजन करणाऱ्या देशांना तर त्यावाचून गत्यंतरच नाही. कारण त्यावाचून नियोजन या शब्दाला अर्थच नाही. असें कां हें कोणालाहि सहज कळून येण्यासारखें आहे. शेतमालाचे भाव स्थिर असले तरच इतर वस्तूंचे भाव स्थिर राहतात. कारण अन्नवस्त्र, भाजी, तेल ही प्रत्येकाची गरज आहे. ते भाव वाढले तर गाडीवाला, लोहार, परीट, सुतार आपले भाव वाढविणार. कामगार जास्त पगार मागणार, कारखान्यांतल्या प्रत्येक वस्तूचा भाव वाढणार. म्हणजे शेती मालाच्या भावावर सर्व विश्वाचें स्थैर्य अवलंबून आहे. शेतकऱ्यांची कष्ट करण्याची हौसहि त्याच्यावरच अवलंबून आहे. आपण कष्ट केले तर अमुक इतकें निश्चित मिळेल अशी शाश्वती वाटल्यावाचून कोणालाहि कष्टाला उत्साह वाटत नाही. हें जाणूनच नवचीनच्या नेत्यांनी सत्ता हातीं येतांच अन्नधान्य व एकंदर शेती माल यांची खरेदीविक्री आपल्या हातीं घेतली आणि नियोजनाचा पाया घातला. अन्नधान्य, कापूस, ताग, तंबाखू, चहा, फळें, अंडीं, कोंबड्या, बदकें, भाजीपाला यांची सर्व खरेदीविक्री सरकार करतें. या मालाचे भाव पेरणीपूर्वीच जाहीर करतें. त्यामुळे शेतकऱ्याला आणि सहकारी संस्थांना उत्पन्नाचा अंदाज येतो, हमी मिळते व शाश्वती वाटते. जास्त पीक आलें तर भाव उतरेल

व नुकसान होईल ही भीति चीनच्या शेतकऱ्याला नाही. चीनला अन्नधान्य-उत्पादनांत जें मोठें यश मिळालें त्याच्या अनेक कारणांपैकी हें एक प्रधान कारण आहे; पण वर सांगितल्याप्रमाणे केवळ अन्नधान्य-उत्पादनाचेंच नव्हे, तर सर्व नियोजनांचेंच यश यावर अवलंबून आहे. अन्नधान्याचे भाव स्थिर नसतील तर कोणत्याहि योजनेचें अंदाजपत्रक करण्याला अर्थच नाही. आज वीस कोटींचा अंदाज केला आणि उद्या धान्याचे भाव वाढले तर खर्च एकदम चाळीस कोटींवर जातो. कारण मजुरांना महागाई द्यावी लागते, अधिकाऱ्यांना पगार जास्त द्यावा लागतो; सिमेंट महाग, कोळसा महाग, धरणाला आवश्यक ती प्रत्येक वस्तु महाग. त्यामुळे पहिला संकल्प व्यर्थ ठरतो. भारताच्या प्रत्येक योजनेची हीच कहाणी आहे. सिंद्री कारखाना, दामोदर खोरें, भाक्रा नानगल कोणतेंहि कार्य घ्या. १० कोटींवरून २० कोटींवर, २० कोटींवरून ४० कोटींवर असें त्यांचें अंदाजपत्रक जात असतें. अर्थातच त्यामुळे अपेक्षिलेला फायदा, व्याज सुटत नाही. उत्पादन केलेला माल महाग पडतो, त्यामुळे दुसऱ्या योजना कोलमडतात. रुरकेला, भिलाई, दुर्गापूर येथून पोलाद निघूं लागलें म्हणजे दरसाल १५० कोटींचें पोलाद बाहेर पाठवितां येईल व परकी चलनाचा प्रश्न सुटेल असें टी. टी. कृष्णम्माचारी यांनी सांगितलें होतें. आता असें सांगितलें जातें की, भारताचें पोलाद जागतिक बाजारपेठेंत खपणार नाही, कारण तें महाग पडणार आहे! कारण आपला पोलाद-उत्पादनाचा खर्च वाढला आहे. याचा अर्थ असा की, अन्नधान्याचे भाव स्थिर नाहीत म्हणजे नियोजनाला पायाच नाही, आणि पाया नाही म्हणजे वर जें आपण बांधूं तें खाली कोसळणार आहे. असें हें सर्व बालसुलभ असूनहि कृषिमालाचे भाव स्थिर करण्याचें धोरण आपलें भारत सरकार कां अवलंबीत नाही? राजकारण हें त्याचें उत्तर आहे. बाहेरदेशचे निरीक्षक येतात, त्यांना हिंदुस्थान सरकारने शेतमालाचे भाव स्थिर केले नाहीत असें सांगितलें तर त्यांचा विश्वासच बसत नाही. त्यांना वाटतें हें कसें शक्य आहे? याला कांही अर्थ आहे काय? पण वस्तुस्थिति तशीच आहे, हें त्यांना प्रयासाने पटवून द्यावें लागतें. डॉ. धनंजयराव गाडगीळ यासंबंधी लिहितांना म्हणतात की, अन्नधान्याच्या किंमती नियंत्रित केल्या पाहिजेत हें तत्त्व नियोजन मंडळाने मान्य केलेलें

आहे, पण योजना आखल्यानंतर याकडे कोणीं लक्षच दिलें नाही. प्रत्यक्षांत शेतमालाच्या भावांत जो चढउतार होत होता, तो मन अस्वस्थ करील असा होता; पण तत्त्वें ठरल्यानंतर त्याच्या कार्यवाहीचीं जीं धोरणें निश्चित होतात, तीं राजकीय पुढाऱ्यांच्या दडपणामुळे होतात. (भारतीय नियोजनांतील नियोजन मंडळाचें स्थान—डॉ. गाडगीळ) हें विवेचन करून नियोजनाच्या अपयशाचें एक महत्त्वाचें कारण म्हणून या अस्थिर बाजारभावांचा गाडगिळांनी निर्देश केला आहे. आपल्या नियोजन मंडळाचे एक सभासद श्री. रा. कृ. पाटील यांनी अशाच तऱ्हेचे विचार मांडले आहेत — 'योजनाबद्ध विकासाला, योजनेच्या कालापर्यंत किमतींत स्थैर्य राहणें हें फार महत्त्वाचें असतें; कारण योजनेचा खर्च हा कांहीं निश्चित किमती कल्पूनच आखलेला असतो. या किमतींत चढ-उतार झाल्यास योजनेचा अंदाज चुकतो. एवढेंच नव्हे तर त्याचे इतर परिणाम दूरवर होतात. म्हणून ही बाब फार महत्त्वाची आहे; व याच्याशिवाय कोणतीहि योजना सफल होणें शक्यच नाही. अमेरिका, कॅनडा या देशांतसुद्धा शेतीच्या मालाचे भाव निश्चित करण्याची योजना आहे. मग भारतांतच ही अत्यंत मूलगामी व जरुरीची बाब अंमलात कां येऊं नये, समजत नाही. (भारत व चीन — पृ. १२२-१२४) 'समजत नाही' असें श्री. पाटील यांनी लिहिलें आहे; पण या विवेचनांतच त्यांनी एके ठिकाणीं लिहिलें आहे की, 'लढाईच्या काळांत व स्वातंत्र्योत्तर काळांतसुद्धा अन्नधान्यावरचीं नियंत्रणें कायम होतीं, पण त्यांच्याविरुद्ध फार मोठा कांगावा करण्यांत आला व शेवटीं सरकारला हीं नियंत्रणें उठविणें भाग पडलें.' तेव्हा कांगावा हें कारण आहे. याचेंच नांव राजकारण. (याच संदर्भांत श्री. मायकेल ब्रेचर यांनी आपल्या नेहरू-चरित्रांत केलेलें विवेचन पाहावें. पृ. ५०९.)

पण असें राजकारण चालू देण्यांतच देशाचें कल्याण आहे असें १९५७ सालीं भारताच्या अर्थमंत्र्यांनी जाहीरपणें सांगितलें आहे. ते म्हणाले की, "मी परवाने देतों तेव्हा ते घेणारा माणूस काळाबाजार करणार हें मला माहीत असतें. आम्ही एखाद्या मालाला संरक्षण देतों तेव्हा यांतून भरमसाट नफेबाजी होणार हेंहि दिसत असतें. किमती वाटेल तशा चढूं देण्यामुळे आम्ही रक्तशोष करीत आहों हेंहि आम्ही जाणतों. त्यांत आम्ही मिरासदार

श्रेष्ठींचें कल्याण केलें आहे; तें करतांना गरीब रयतेचें अकल्याण झालें हें खरें. पण आम्हीं हें कां केलें? देशाची धनदौलत वाढावी म्हणून." (टाइम्स ऑफ इंडिया ८–८–५८. श्री. गोरवाला यांनी थैलीशहांनी सरकार वश केलें आहे हें दाखविण्यासाठी दिलेला उतारा). वास्तविक, 'असें आम्ही करणार नाही, देशाचें धन वाढवीत असतांना जनतेच्या राहणीचा दर्जा वाढतच ठेवूं,' अशा प्रतिज्ञा सरकारने केल्या आहेत. आरंभीं हें सांगितलेंच,आहे. हाच मार्ग लोकशाहीचा, हीच साधनशुद्धि, या उलट जे मार्ग ते दण्डसत्तेचे मार्ग होत, तें लोकशाहीला लांछन होय, असें भारताचे नेते म्हणतात. पण अर्थमंत्र्यांना तें मंजूर नाही. त्यांचें धोरण, त्यांचें तत्त्व, प्रतिज्ञा निराळ्याच आहेत; आणि तरीहि ते अर्थमंत्री राहूं शकतात.

राजकारण व राजकारणी हा प्रत्येक देशांतल्या लोकशाहीला जडलेला एक महाभयंकर रोग आहे, आणि हा रोग आपल्या भारतीय लोकसत्तेलाहि ग्रासीत चालला आहे, हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. आसाम सरकारच्या कारभारावर ऑडिटरने लिहिलेला अहवाल पाहा. हिशेबनीस म्हणतात, या कारभारांत सात कोटींचा हिशेबच नीट मिळत नाही. १९४८ सालीं पत्रकें (टेंडरें) न मागवितांच सरकारने ६ लाखांला दोन विमानें घेतलीं. त्यांच्या वाहतुकीचा व वजावटीचा खर्चच दीड वर्षांत ३ लाख रुपये झाला. धान्य विकत घेण्यास एक मुख्त्यार नेमला होता, त्याने पैशाचा हिशेबच ठेवलेला नाही. अर्थात् पावत्या त्याने दिल्या नाहीतच. कापड रेशनिंगचीं कार्डें छापलीं होतीं तीं अधिकृत नव्हतीं. टेक्सटाईल ब्रँच–डेप्युटी कमिशन याने हिशेब दिलेच नाहीत. सरकारने त्या सालीं १७००० रुपयांचीं गुरें खरेदी केलीं. त्यांतल्या निम्म्या गुरांना रोग झाले होते, तरी सर्व गुरें निरोगी आहेत, असा व्हेटरनरी सर्जनने शेरा दिला होता. आता वाचकांना यांत पावलोपावलीं राजकारण म्हणजे काय तें दिसून येईल. हजारो रोगग्रस्त गुरें निरोगी आहेत असा शेरा देण्याची एकट्या एकाकी पशुवैद्याची छातीच झाली नसती; त्याला संभाळून नेणारे अनेक लोक असले पाहिजेत. अर्थात् त्याला संरक्षण मिळणें स्वाभाविकच आहे. या संरक्षणाविरुद्ध अनेक राज्यांतील हिशेबनिसांनी जोराची तक्रार केली आहे. अमक्या अधिकाऱ्यांनी हिशेब दिले नाहीत, अमक्याने पावत्या ठेवल्या नाहीत, अमक्याचा व्यवहार

संशयास्पद आहे सबब त्याची चौकशी व्हावी, अशा सूचना सालोसाल हिशेबनीस करीत आहेत, पण त्याकडे कोणी लक्षच देत नाही. उलट ते ते अधिकारी बढती पावतात व मोठ्या पगारावर शेवटीं निवृत्त होतात. मग पुन्हा हिशेबनीस पुढच्या सालीं कोरडे ओढतात. पण हें सर्व दप्तरीं दाखल होतें. यापुढे कांही नाही. कारण त्या त्या अधिकाऱ्यांचा संभाळ करावयाचा हें ठरलेलें असतें. अमरावतीच्या मालतीबाई जोशी यांनी याला विटून राजीनामा दिला. काँग्रेसच्या अध्यक्ष श्री. इंदिराबाई गांधी यांच्याकडे गाऱ्हाणें नेलें. त्या म्हणाल्या, हें आम्हांला पूर्वीच कां कळविलें नाही? मालतीबाई म्हणाल्या, आम्हीं केलेल्या तक्रारींचे गठ्ठे काँग्रेसच्या दप्तरांत तुम्हांला सापडतील. सर्वत्र हेंच आहे. सरकारने नेमलेल्या हिशेबनिसांच्या तक्रारींचे गठ्ठेहि असेच सर्वत्र सुखरूप असतात. ते वाचण्याची गरज कोणालाच नसते. कारण त्या घटना सर्वांना आधीच माहीत असतात. त्या जाणूनबुजून केलेल्या असतात. मग तक्रारी वाचण्यात व्यर्थ वेळ कशाला घालवायचा!

१९५५–५७ या सालांत आयात-निर्यातीचे जे परवाने दिले गेले तें प्रकरण असेंच आहे. नियोजनासाठी परदेशी चलन हवें होतें. तें कमी पडणार हें प्रथमपासूनच दिसत होतें. अशा वेळीं निर्यात वाढवून आयात कमी करणें हें अर्थमंत्र्यांचें धोरण असावयास हवें होतें. पण त्यांनी आयातीचे भरमसाट परवाने दिले. त्यामुळे आपलें परकी चलन भराभर संपून गेलें व योजनेवर त्याचा अगदी घातक परिणाम झाला. आपली परदेशी हुंडणावळ अशी घटत चालली आहे, हें दिसत असूनहि नियोजन मंडळाने, अर्थखात्याने व रिझर्व्ह बँकेने त्यावर कांही निर्बंध घातले नाहीत. यामुळे व्यापाऱ्यांचा एक खास वर्ग निर्माण झाला. भरमसाट नफा मिळविण्याचें हें जें क्षेत्र निर्माण झालें होतें त्याचा त्याने फायदा घेतला. यामुळे आपल्या राष्ट्राचें फार मोठें नुकसान झालें. पण ते अर्थमंत्री, ते व्यापारी, यांनी एवढें धाडसी कृत्य कशाच्या बळावर केलें? त्यांना भीति कां वाटली नाही? त्यांना ही खात्री होती की, आपल्याला धोका कसलाच नाही. उलट आपला संभाळच केला जाईल. कारण हीं अनुदानें देणाऱ्यांना सत्तापदावर स्थिर करण्यासाठी व्यापारी निश्चित साह्य करणार होते. असा हा 'परस्परं भावयन्तः'-

मधला प्रकार असतो. यांना पैसा मिळतो, त्यांना सत्ता मिळते. म्हणजे तोटा कोणाचाच नाही ! दोघांचाहि फायदा. अशी ही कामधेनु सापडल्यावर तिचें दोहन कां न करावें !

सरकारने शेतकऱ्यांना किंवा इतर गरजू लोकांना कर्ज देण्याची व्यवस्था केलेली आहे, पण राजकारणामुळे या व्यवस्थेंतून अनर्थ निर्माण होतात. पहिली गोष्ट म्हणजे अमेरिकेंत धूर्त लोकांनी ज्याप्रमाणे खोटे पेन्शनर उभे केले त्याप्रमाणे येथील धूर्त लोक खोटे कर्जदार उभे करतात. बिहारमधील धूर्तांनी असे ४५४ खोटे कर्जदार उभे करून सरकारकडून पैसे काढले. अर्थातच वसुलीच्या वेळीं हे कर्जदार मुळांतच नाहीत, असें ध्यानांत येऊन थकबाकी वाढूं लागली. हें एकच कारण थकबाकीचें नाही. प्रत्यक्षांत असलेले लोकहि कर्ज परत देण्यास नाखूष असतात, आणि त्यांच्याकडून सक्तीने वसूल करण्याची स्थानिक अधिकाऱ्यांची हिंमत नसते. इतकेंच नव्हे, हे दादा लोक पुन्हा कर्ज मागावयास आले तर नाही म्हणणें अधिकाऱ्यांना शक्य होत नाही. कारण त्यांचे धागेदोरे वरपर्यंत पोचलेले असतात. सरकारी अधिकाऱ्यांना नोकरीवर गदा येण्याची भीति असते. या व अन्य कारणांमुळे बिहारमध्ये १४ कोटी रुपये कर्जापैकी १० कोटी रुपयांची थकबाकी आहे. गावोगावीं सरकारने ज्या सहकारी पेढ्या स्थापन केल्या आहेत त्यांची कहाणी अशीच आहे. त्यांतून कर्जें धूर्तांना, दादांनाच मिळतात, गरजूंना फारच क्वचित् मिळतात, आणि मोठीं कर्जें कधीच वसूल होत नाहीत. श्री. एस्. एस्. मुरडेश्वर यांनी टाइम्समध्ये पत्र लिहून असा हिशेब दिला आहे की, पाकिस्तानकडे असलेलीं व इतर अशीं बुडीत कर्जें पाहिलीं तर २००० कोटी रुपये थकबाकी निघेल. मध्यभारत खादी व ग्रामोद्योग समितीला अखिल भारत खादी कमिशनने साबण करण्यासाठी ३ लक्ष रुपये दिले. त्याचे पुढे कांहीच झालें नाही. त्यावर लोक असें स्वच्छ विचारूं लागले की, येथे अँटी-करप्शनखातें आता काय करणार आहे ? या प्रकरणाचा शोध घेणार की राजकीय दडपणामुळे तिकडे दुर्लक्ष करणार ? बहुधा दुर्लक्षच केलें जाईल. कारण असा शोध कोणी इन्स्पेक्टर करूं लागला तर त्याची चटकन् बदली होते. अमेरिकेचा विचार करतांना सांगितलेंच आहे की, महसुलाचे पैसे खाणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध एका स्त्री-कारकुनाने तक्रार केली तेव्हा

तिच्यावरच ठपका आला. ती बडतर्फ व्हावयाची, पण जॉन विल्यम्स यांनी तिला वांचविलें. राजकारणाचें स्वरूप सर्वत्र सारखेंच, असा याचा अर्थ. हीं सत्ता व धन यासाठी केलेलीं कारस्थानें असतात. सत्तावाल्यांना धन हवें असतें व धनवाल्यांना सत्तेचा पाठिंबा व संरक्षण हवें असतें; आणि यांच्या युतींतून राजकारण निर्माण होत असतें. निरनिराळ्या मार्गांनी सत्ता व धन मिळविणें हें राजकारणी लोकांचें उद्दिष्ट असतें. बिहारमध्ये कॉंग्रेसचे २२ लाख सभासद झाले. पुढे असें आढळलें की, यांतील १० लाख खोटे आहेत. बिहारचे शिक्षणमंत्री श्री. वर्मा आपल्या अहवालांत लिहितात की, एका ऑफिसांत बसून एकाच माणसाने शेकडो सह्या केल्या व अंगठे उठविले. खंडूभाई देसाई यांनी त्यावर भाष्य केलें की, भूमिहर, ब्राह्मण व रजपूत या भिन्न जातींमध्ये सत्तेसाठी तीव्र स्पर्धा आहे. त्यामुळे सत्ताप्राप्तीसाठी प्रत्येक जातीने आपापले जास्त सभासद नोंदविले. म्हणजे सत्तालोभ व धनलोभ यांना येथे जातीयता येऊन मिळाली. राजकारणाला आणखी एक रंग चढला, पण येथेच हें थांबेल असें नाही. अमेरिकन राजकारणाला अत्यंत हिडीस व भयानक रूप आलें आहे तें या मूळच्या गटांना डाकू, ठग, पेंढारी, मवाली हे येऊन मिळाल्यामुळें. हा प्रकार भारतांत चालू झाला आहे, हें अन्यत्र मीं दाखविलें आहे. (वसंत दिवाळी अंक १९५८ 'आपल्या लोकशाहीवरील नवें संकट') म्हणून त्याचा तपशील येथे देत नाही. येथे इतकें सांगितलें म्हणजे पुरें की, भारतांतील कांही राज्यांतील विधानसभांचे सदस्य एकमेकांवर 'या राजकीय पक्षांचा गुन्हेगारीला आश्रय असतो' असे आरोप करीत आहेत. मध्यप्रदेशांत तर भरसभेंत विरुद्ध पक्षीय सदस्यांवर कांही सभासदांनी असे आरोप केले, आणि आम्ही पुरावे देतों, असें आव्हान देऊन सांगितलें.

## लोकशाहीचें कर्मकांड

आपली भारताची लोकशाही समर्थ होईल काय, दण्डसत्तांनी उद्या आक्रमण केलें तर आपला निभाव लागेल काय, याचा आपण विचार करीत आहों. आम्ही लोकशाही मूल्यें कदापि सोडणार नाही, अशी आपली प्रतिज्ञा आहे. पण आपण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे की, विवेक, नीति, धर्म यांची

उपासना केली नाही तर लोकशाही मूल्यें सोडणें किंवा न सोडणें हा विकल्प आपल्या हातीं राहात नाही, तीं मूल्यें नष्ट होतच जातात. अशा वेळीं लोकशाही बाह्य आकारांत फक्त राहते, आणि बाह्य आकारांतच केवळ उरलेली, मतदान, निवडणुका, प्रतिनिधित्व हा सांगाडाच टिकवून धरणारी आणि धर्म, नीति, मनोनिग्रह, समाजहितबुद्धि, सामाजिक प्रबुद्धता, राष्ट्रनिष्ठ ध्येयवाद यांना पारखी झालेली लोकशाही हिच्याइतकी भयंकर अवदसा जगांत कोणतीहि नाही. केवळ कर्मकांडांत शिल्लक उरलेली लोकशाही म्हणजे श्रीफळ जाऊन उरलेली नरोटी होय. ती नेमकी गुंड, मवाली, ठग, पेंढारी यांच्या हातीं सत्ता देऊन ठेवते. राज्य त्यांचें चालतें. अशा परिस्थितींत लोकशाही मूल्यें टिकवूं म्हणणारा माणूस कळत न कळत ठग-पेंढारशाहीची स्थापना करीत असतो. समाजापुढे त्या वेळीं विकल्प असतो तो लोकसत्ता कीं दण्डसत्ता असा नसून ठग-पेंढारी-सत्ता कीं दण्डसत्ता असा असतो.

संघटित राष्ट्रबल ही कोणत्याहि देशाच्या प्रगतीला अवश्य अशी शक्ति होय. तिच्या अभावीं प्रगति साधणें तर नाहीच पण नुसतें जगणेंसुद्धा शक्य होणार नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काळांत भारतांतील ही महाशक्ति कशी नष्ट होत चालली आहे आणि त्यामुळे आपले सर्व क्षेत्रांतले प्रगतीचे प्रयत्न कसे विफल होत चालले आहेत त्याचा विचार आपण करीत आहोंत. कोणत्याहि प्रकारची विषमता ही समाजसंघटनेला अत्यंत घातक ठरते हें अनेक राष्ट्रांच्या इतिहासांतून सहज दिसून येतें. अमेरिकेंत आर्थिक विषमता व वर्णविषमता नष्ट करण्याचे प्रयत्न कसे होत आहेत ते मागल्या प्रकरणांत आपण पाहिलें, आणि त्यानंतर आपल्या समाजाचें चित्र कसें दिसतें तें आपण पाहात आहोंत. गेल्या दहाबारा वर्षांत सत्तेची व धनाची विषमता जास्तच वाढत आहे व त्यांनी आपला समाज विकल होत चालला आहे असें उद्वेगजनक दृश्य त्या चित्रांत आपल्याला दिसलें. सत्ताधारी आणि राजकारणी यांची युति होऊन सामान्य जनता दिवसेंदिवस असहाय व दीन होत चालली आहे आणि शास्ते व शासित यांच्यांतील भेदाची दरी मंदावत चालली आहे, हें क्षणाक्षणाला प्रत्ययास येत आहे. खेड्यांतील जनता तर आक्रोश करून सांगत आहे की, येथे सरकारचें राज्य नसून

गुंडमवाल्यांचें राज्य प्रस्थापित झालें आहे. सत्ता, बल, सामर्थ्य यांची विषमता इतक्या विकोपाला गेली आहे की, तेथे जीवनहि असुरक्षित झालें आहे, आणि सत्तेच्या विषमतेबरोबर धनाची विषमता अपरिहार्यपणेंच येत असते हें सांगण्याची गरज नाही.

## जातीयतेचें विष

या दोन विषांनी समाजाचें स्वास्थ्य पुरेसें नष्ट होत नाही. म्हणूनच की काय जातीयतेचें विष, हें कालकूट आता उफाळून वर येत आहे. स्वातंत्र्या-पूर्वी याचा प्रभाव दिसतच होता. पण राष्ट्रनिष्ठेने, स्वातंत्र्याच्या ध्येयवादाने तें महाविष जरा दबून राहिलें होतें, आणि आशा अशी होती की, स्वातंत्र्या-नंतर सत्ता हातीं आली की, जातीयतेचा समूळ नायनाट करणें सहज शक्य होईल. पण येथे अगदीच विपरीत घडलें. सत्तेच्या साहृयाने जातीयता नष्ट करण्याचें दूरच राहून जातीयतेच्या साह्याने सत्ता टिकवून धरावी हा सोपा मार्ग भारतांतील राजकीय पक्षांनी अवलंबिलेला आहे, आणि दुर्दैवाने काँग्रेस ही सर्व क्षेत्रांत जशी अग्रभागीं उभी आहे तशीच येथेहि ती अग्र-भागींच आहे.

बिहारमध्ये जातीयता कोणत्या थराला गेली आहे हें पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुढील उद्‌गारांवरून ध्यानांत येईल. ‘जातीयवादाचें हिडीस स्वरूप बिहारमध्ये दिसून येतें तितकें अन्यत्र कोठेंच आढळत नाही. येथील जातीयतेच्या विषाची बाधा आम्हांला दिल्लीपर्यंत त्रस्त करीत असते. मी येथे आलों तो भूमिहर, रजपूत या जातींना भेटण्यासाठी आलों नाही. भारताच्या नागरिकांना मला भेटावयाचें आहे. तुम्ही हें पक्कें ध्यानांत ठेवा की, जातीयवादी लोकांना काँग्रेसमध्ये कधीहि थारा मिळणार नाही.’ १९५२ सालीं, १९५४ सालीं सर्वोदय संमेलनाच्या वेळीं आणि इतर अनेक वेळीं पंडितजींनी असेच वैतागून उद्‌गार काढले आहेत. पण चमत्कार असा कीं, जातीयतेचा हा विषार मुळीच हटत नसून काँग्रेसमध्येहि तो बळावत चालला आहे. बिहारमध्ये भूमिहर व रजपूत या जाती प्रमुख असून श्रीकृष्ण सिंह हे पहिलीचे आणि अनुग्रहनारायण सिंह हे दुसरीचे पुढारी होते. हे दोघेहि पक्के जातीयवादी असून आळीपाळीने बिहारच्या मुख्य

मंत्रिपदावर आरूढ होण्याच्या खटपटींत असत व कधी कधी यशस्वी होत. त्यांच्या मारामाऱ्यांना कॉंग्रेस हाय-कमांडचे लोकहि विटून गेले आहेत, पण दोघांनाहि कॉंग्रेसमध्ये उत्तम थारा मिळालेला आहे. कोणालाहि हाय-कमांडने हाकलून दिलेलें नाहीं, कारण या जातीयतेचा आश्रय घेतला नाही तर सत्ता मिळणें अशक्य आहे. हे जाणून अगदी नाइलाजाने राष्ट्रवादी कॉंग्रेस-हायकमांडने हा विषाचा घोट गिळला आहे. बिहारमध्ये कम्युनिस्ट लोकहि प्रचाराला निघतांना जानवें घालून, गंध लावून बाहेर पडतात. कारण त्यांचा नाइलाज आहे. तसें केलें नाही तर त्यांना कोणी जवळ उभेंच करणार नाही. एवंच सर्वांचा नाइलाज आहे.

सत्तेसाठी कॉंग्रेसने अनेक प्रदेशांत जातीयवादाचा आसरा घेतला आहे. मद्रासमध्ये द्रविड कझगम पंथाचे लोक कोणत्या लीला करीत आहेत तें प्रसिद्धच आहे. हिंदूंच्या सर्व देवतांची ते विटंबना करतात. गांधींच्या प्रतिमा जाळतात. भारताने मान्य केलेल्या घटनेच्या प्रतीचें दहन करणें हा त्यांचा जाहीर कार्यक्रम होता, आणि भारताचीं शकलें करून कझगमस्थान निराळें केलें पाहिजे अशा जाहीर घोषणा ते करूं लागले आहेत. असें असूनहि त्यांच्याशीं कॉंग्रेसजनांची वागणूक अत्यंत प्रेमळपणाची, मायेची, आपुलकीची आहे. कामराज नाडर सारखे ० ग्रेसश्रेष्ठी द्रविड कझगम-नेत्यांबरोबर एका व्यासपीठावरून प्रचार कर ा. कझगम-नेत्यांनी अगदी अनन्वित अत्याचार केले तरी त्यांना शिक्षा सौम्य व सुखदायक अशाच होतात. त्यांच्या एका नेत्याने भर न्यायालयांत "तुम्ही नेहरूंच्या दडपणामुळे मला शिक्षा देत आहांत" असा न्यायाधीशावर आरोप केला, पण तो न्यायालयाचा अपमान मानण्यांत आला नाही. याचीं कारणें उघड आहेत. निवडणुकांत त्यांचें साह्य घेऊन कॉंग्रेसला सत्ता जिंकावयाची असते. तेव्हा त्यांच्याशीं कठोर वागून कसें बरें चालेल? हेंच धोरण सर्वत्र आहे. ओरिसाच्या गणतंत्र परिषदेंत जुन्या सरदार जमीनदारांचा भरणा आहे, जुन्या संस्थानिकांचें तेथे वर्चस्व आहे. परिषद् अत्यंत प्रतिगामी, सुधारणा-विरोधी आहे अशी कॉंग्रेसश्रेष्ठींनी तिच्यावर अनेक वेळा टीका केली आहे, पण सत्ता हातची जाते असें दिसतांच कॉंग्रेसश्रेष्ठींनी त्या जातीय-वादी, प्रतिगामी परिषदेशीं हातमिळवणी करण्याचा हरेकृष्ण मेहताब यांना

आदेश दिला. हें धोरण स्वीकारलें तें गणतंत्र परिषदेने कॉंग्रेसची पुरोगामी भूमिका मान्य केली म्हणून नव्हे. कॉंग्रेसची भूमिका परिषदेने मान्य केलेली नाही, उलट संमिश्र मंडळाच्या करारावर सह्या होतांच "कॉंग्रेसचें राज्य एकदाचें नष्ट झालें, बरें झालें" असे जाहीर उद्गार परिषदेच्या नेत्यांनी काढले. असें असून राष्ट्रवादी कॉंग्रेसने, वेळोवेळीं जातीयतेच्या विरुद्ध कडक भाषणें करणाऱ्या कॉंग्रेसश्रेष्ठींनी, जातीय संस्थेचाच सत्ताप्राप्तीसाठी आश्रय केला. कॉंग्रेसच्या प्रारंभींच्या काळांत, 'आधी राजकीय सुधारणा', 'आधी स्वराज्य', 'आधी इंग्रजी सत्तेचें उच्चाटन' असें धोरण त्या वेळच्या पुढाऱ्यांनी आखलें होतें. त्यांची कल्पना अशी की, स्वातंत्र्यसमरांत आपण विजयी झालों की त्या वेळीं राष्ट्रनिष्ठ, ध्येयवादी, स्वीकृत तत्त्वांवर अव्यभिचारी भक्ति करणारे असेच नेते पुढे येतील व त्यांच्या हातीं सत्ता येतांच सर्व प्रकारची विषमता ते नष्ट करतील, भांडवली सत्तेला ते नमवतील, राजकारणी गुंडांचा निःपात करतील आणि जातीय वाद समूळ उखणून काढतील. प्रचंड बहुमताचा पाठिंबा असलेली राजकीय सत्ता त्यांच्या हातीं आलेली असल्यामुळे हें दुर्घट कार्य ते सहज साधतील. पण त्यांच्या स्वप्नांतहि हें आलें नाही की, राजकीय सत्तेच्या साह्याने भांडवलदारीचा, जातीयतेचा व राजकीय गुंडगिरीचा निःपात करावयाच्या ऐवजीं त्यांना जोगवून, पोसून त्यांच्याच साह्याने भावी कॉंग्रेसचे नेते राजकीय सत्तेची प्राप्ति करून घेतील.

जें बिहार, मद्रास, ओरिसामध्ये आहे तेंच कमी अधिक प्रमाणांत म्हैसूर, पंजाब, राजस्थान इत्यादि प्रदेशांत आहे. म्हैसूरने तर या जातीयवादापायी जैन, लिंगायत इत्यादि लोकांनाहि मागासलेल्या जमातींत समाविष्ट केलें आहे; आणि सर्व क्षेत्रांत सवलती मिळावयाच्या असल्यामुळे या प्रगत समाजांनीहि आपण मागासलेले आहों हें निमूटपणें मान्य केलें आहे. पण यामुळे अस्पृश्य, आदिवासी हे जे खरे मागासलेले लोक ते तक्रार करूं लागले आहेत. कारण सवलतींचा मोठा हिस्सा त्यांच्या वर्गांत उगीचच समाविष्ट केलेल्यांना आता जाणार आहे. सत्तेचा वापर जातीयता नष्ट करण्यासाठी न करतां त्या भावना जास्तच बळकट करण्यासाठी कसा केला जातो याचें हें उत्तम उदाहरण आहे. पंजाबांत शीख-अकाली यांच्या जातीय वृत्तीचें

थैमान चाललें आहे, पण कॉंग्रेसने त्यांच्यांतीलच अकालींशों मागे सहकार्य केलें होतें. माजी मुख्य मंत्री गोपीचंद भार्गव यांनी तर जाहीरपणें शिखांना राखीव जागा देऊं केल्या होत्या. त्यांच्या बळावरच ते निवडून आले होते. जातीयतेचें हें विष आपल्या राष्ट्रपुरुषाच्या देहांत, नसानसांत भिनलेलें आहे. निवडणुकीचें तिकीट देतांना, नेमणुका करतांना, सवलती देतांना दरवेळीं जातीय विचार प्रभावी ठरतो. त्यामुळे गुण, कर्तृत्व यांची रयाच राहात नाही. कारभारांतील कार्यक्षमतेवर याचा अत्यंत अनिष्ट परिणाम होतो. पण सत्तेचा लोभ असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करावेंच लागतें. सत्ताधाऱ्यांचा अगदी नाइलाज आहे.

दुर्दैव असें की, सत्तेसाठी जातीयतेचा आश्रय करावयाचा हें धोरण केवळ कॉंग्रेसचेंच आहे असें नाही. यांतून मुक्त असा एकहि पक्ष भारतांत नाही. प्रजासमाजवादी, समाजवादी, कम्युनिस्ट, कोणताहि पक्ष, कोणतीहि संघटना घ्या. निवडणूक आली की, सर्व तत्त्वनिष्ठा सोडून वाटेल त्या जातीय पक्षाशीं हातमिळवणी करावयास त्यांची तयारी असते. मग त्यासाठी कोणतीहि तडजोड करणें, म्हणजेच जनहिताकडे दुर्लक्ष करणें, हें त्यांना मंजूर आहे. वास्तविक ध्येयवादाची उच्च प्रेरणा दिली तर जातीय, प्रांतीय क्षुद्रभेद विसरण्याइतकी राष्ट्रहितदृष्टि आपल्या ठायीं आहे हें वेळोवेळीं जनतेने दाखविलें आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन महाराष्ट्रांतील जनतेने गेल्या निवडणुकांत अगदी चमत्कार करून दाखविले. अगदी अव्वल ब्राह्मणेतर मतदारसंघांतून ब्राह्मणांना निवडून दिलें, आणि सर्वसामान्य मतदारसंघांतून अस्पृश्यांनाहि निवडून दिलें. ध्येयवाद ही खरोखरच मोठी शक्ति आहे, पण समितीच्या नेत्यांना निवडून आल्यावर तिचा विसर पडला आणि जीं स्थानिक स्वराज्यें त्यांच्या हातीं आलीं तेथे तेथे जातीय तत्त्वांवर गट पाडून जातीयवादी सभासदांना आपल्याकडे ओढण्यासाठी त्यांच्या मागण्या मान्य करून दर ठिकाणीं जनहितावर त्यांनी निखारा ठेवला. आज समितीचे नेते यशवंतराव चव्हाणांच्याकडे राजीनाम्याची मागणी करीत आहेत, कारण सीमा प्रश्न सोडविण्यांत त्यांना अपयश आलें आहे. पण जरा अंतर्मुख होऊन त्यांनी स्वतःकडे पाहिलें तर प्रत्येक स्थानिक स्वराज्यांतून आपण आधी राजीनामे दिले पाहिजेत हें

त्यांना सहज दिसून येईल, कारण तेथे कोणताहि प्रश्न सोडविण्यांत त्यांना यश आलेलें नाहीं, आणि स्वार्थ, सत्ता, लोभ, राजकीय गुंडगिरी, जातीय दृष्टि हींच यांचीं कारणें आहेत.

केंद्र सरकारने न्यायखात्याच्या कारभाराचें परीक्षण करण्यासाठी लॉ कमिशन नेमलें होतें. त्या कमिशनवर अॅटर्नी जनरल, हायकोर्टाचे माजी न्यायमूर्ति असे मोठे अधिकारी होते. त्यांनी आपलें मत दिलें की, न्याय-खात्यांत वरच्या जागांवर नेमणुका करतांना गुण, कर्तृत्व, यांपेक्षा इतर गोष्टींचा विचार जास्त केला जातो. भारताच्या सर्वश्रेष्ठ न्यायाधिकाऱ्यांनी हा निकाल दिला आहे. सर्वश्रेष्ठ सत्ताधीश व कारभारी यांच्या लेखींहि गुण व कर्तृत्व यांना किंमत नसेल तर भारतीयांच्या अंगच्या गुणांनी व कर्तृत्वाने जावें तरी कोठे ? कोणाचा आश्रय करावा ? तें कर्तृत्व सध्या अगदी अनाथ होऊन वनवासी झालें असलें, क्षीण होत चाललें असलें तरी त्याला जबाबदार कोण ? आणि कर्तृत्वाचीच जोपासना करणाऱ्या दण्डसत्तां-पुढे त्याच्या अभावीं आपला टिकाव लागेल काय ?

## भारताची मानहानि

रशिया व चीन यांच्या सामर्थ्याचा विचार करतांना पहिल्या प्रकरणांत असें सांगितलें आहे की, त्यांनी नव्या मूल्यांची उपासना केली नसली तरी नव्या शक्तींची उपासना निश्चित केली आहे. त्या शक्तींना आपल्याला तोंड देतां येईल काय असा आपल्यापुढे प्रश्न आहे. त्या शक्ति आक्रमक, युद्धवादी व साम्राज्यवादी आहेत व संधि मिळतांच कोठेहि झडप घालायला कमी करणार नाहीत हें हंगेरी, तिबेट यांच्या कहाणीवरून स्पष्ट झालें आहे. त्यामुळे भारतानेहि अहोरात्र सन्नद्ध, सज्ज राहिलें पाहिजे हें अगदी निर्वि-वाद आहे. तसें आपण सज्ज आहोंत का, तसें सन्नद्ध, सज्ज राहण्याची ताकद आपल्याला आहे काय याचा आपण विचार करीत आहों. लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने आपली काय स्थिति आहे याचा प्रत्यय पाकिस्तान दर-घडीला आणून देत आहे. आपला प्रदेश तो आक्रमीत आहे, स्त्रिया पळवून नेत आहे, सरहद्दीवरच्या लोकांना ठार करीत आहे, शेतीचा विध्वंस करीत आहे आणि सर्व प्रकारें भारताची मानहानि करीत आहे. आपल्याला

कसलाहि प्रतिकार करतां येत नाही. आपल्या प्रदेशावर त्यांचीं विमानें येऊन टेहळणी करून जातात, पण आपण कांही करूं शकत नाही. आपलें मात्र एखादें विमान चुकून पाकिस्तानी हद्दींत गेलें तरी त्यांचे सैनिक भडिमार करून तें खाली पाडतात. याचा जाब विचारण्याचें सामर्थ्य आपल्याला नाही. त्यांचें पंचावन्न कोटींचें देणें आपण लागत होतों तें त्याचें आपल्या प्रदेशावर आक्रमण चालू असतांनाहि, या पैशाचा आक्रमणाला पोसण्यासाठीच उपयोग होईल हें दिसत असूनहि सत्यप्रतिज्ञेच्या पालनासाठी, आपण देऊन टाकलें. आपलें ३०० कोटींचें कर्ज मात्र आपल्यावरच टेपूर ठेवून पाकिस्तानी नाकारीत आहेत, पण आपण कांही करूं शकत नाही. आपण नागांचा बंदोबस्त करूं शकत नाही, गोव्याचा प्रश्न सोडवूं शकत नाही, काश्मीर ही तर एक चेष्टाच होऊन बसली आहे.

याला आपल्या संरक्षणमंत्र्यांचें असें उत्तर आहे की, "आपण चिंता करण्याचें कांहीच कारण नाही. आपल्याजवळ लष्करी सामर्थ्य नाहीं, म्हणून आपण प्रतिकार करीत नाही, असें मुळीच नाही. तर हीं आक्रमणें अत्यंत क्षुद्र आहेत. डास किंवा चिलटें अंगावर येऊन बसावींत तसा हा प्रकार आहे. त्यासाठी तलवार उपसण्याचें कांहीच कारण नाही." पण प्रश्न असा येतो की, भारतांत जरा कोठे दंगल झाली की गोळीबार करण्यांत येतो तेव्हा तो प्रश्न जागतिक युद्धाइतका महत्त्वाचा असतो काय? दरसाल हजार पांचशे वेळां गोळीबार करावा लागतो त्या वेळीं डास-चिलट-न्यायाचा आश्रय आपलें सरकार कां करीत नाही? गोव्याचा प्रश्न, काश्मीरचा प्रश्न हे चिलटांचेच आहेत काय? आणि असले तर तलवार उपसूनच त्या चिलटांचा नाश करावा असा कोणाचाच आग्रह नाही. डास-चिलटांना तलवार नको हें म्हणणें योग्य, सयुक्तिक व समंजस आहे, पण त्यांना थप्पड हवी हें तर मान्य आहे ना? त्यांचें आक्रमण थांबलें पाहिजे हा मूळ मुद्दा आहे. लढाई न करतां निषेधाच्या खलित्याने तें थांबत असेल तर लढाई पुकारावी असें कोणीच म्हणत नाही. पण मूळ मुद्दा बाजूस ठेवून चिलटाचा दृष्टान्त आपले संरक्षणमंत्री देतात. त्यामुळे भाषण रंगतें हें खरें; पण आपलें लष्करी सामर्थ्य संरक्षणक्षम आहे हा दिलासा जनतेच्या चित्तांत निर्माण होत नाही.

भारताचें सामर्थ्य संरक्षणक्षम आहे याचें एक प्रमाण श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी १९५९ च्या मे महिन्यांतील पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत दिलें. ते म्हणाले, "स्वातंत्र्यापूर्वी आपल्याला कोणी विचारीत नव्हतें, पण आता जगांत कोठेंहि कांही घडलें तरी आधी दिल्लीची प्रतिक्रिया काय आहे हें विचारतात." पण काकासाहेबांनी पूर्वार्धच फक्त सांगितला असें वाटतें. तसें विचारून, दिल्लीची प्रतिक्रिया काय आहे तें समजल्यावर नंतर विचारणारे काय करतात, हा जो उत्तरार्ध तो सांगावयाचा राहून गेला असें दिसतें. काश्मीरवर पाकिस्तानचें आक्रमण झालें तेव्हा दिल्लीची प्रतिक्रिया काय तें बड्या राष्ट्रांना समजलें होतें. पाकिस्तानला अमेरिकेने शस्त्रास्त्रें पुरविलीं तेव्हा दिल्लीचें मत काय तेंहि जगाला माहीत झालें होतें. चीनला यूनोंत प्रवेश देण्याविषयी दिल्लीचा अभिप्राय सर्वश्रुत आहे. या दिल्लीच्या अभिप्रायांना जगाने किती मान दिला? दिल्लीच्या प्रतिक्रियेचा खरोखरच जगांतलीं राष्ट्रें विचार करीत असतीं तर हंगेरीवर आक्रमण करण्यापूर्वी रशियाने तिचा सल्ला घेतला असता. इजिप्तवर बाँब फेकण्यापूर्वी ब्रिटन-फ्रान्सनी आणि तिबेट गिळंकृत करण्यापूर्वी नवचीनने दिल्लीची प्रतिक्रिया काय होईल हें समजून घेण्याचा प्रयत्न केला असता. तसा प्रयत्न त्यांनी नाहीच केला, पण उलट भारतावरच साम्राज्यवादी, आक्रमक म्हणून उद्दाम-पणें आरोप करून पंडित नेहरूंनाच पंचशीलाप्रमाणें वागा, असा उपदेश केला. शिवाय नेपाळ, भूतान हे प्रांतहि गिळंकृत करण्याची योजना नव-चीनने आखली आहे अशी वार्ता आहे. तेव्हा दिल्लीच्या प्रतिक्रियेला जगांत काय किंमत आहे हें सर्व भारतीयांना आता सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट दिसूं लागलें आहे. वास्तविक ही भारताची फार मोठी मानहानि आहे, एकट्या दिल्लीची किंवा पंडितजींची नव्हे. आपल्या राष्ट्राला विश्वासांत घेऊन नेत्यांनी हा अपमान कां होतो हें जनतेला समजावून दिलें पाहिजे व तिच्या राष्ट्रनिष्ठेला चेतविलें पाहिजे. पण तसें न करतां दिल्लीची प्रतिक्रिया काय आहे हें दर वेळीं विचारतात, यांतच आपलें मोठें वैभव आहे, यांत आपला गौरव आहे अशी प्रौढी त्यांनी जनतेपुढे मिरवावी ही मोठी खेदजनक गोष्ट आहे.

पण भारतीय नागरिकांनी असल्या वैभवाला दिपून जाऊं नये.

दण्डसत्तांचें आव्हान आपल्याला स्वीकारतां येईल काय याचा विचार करतांना त्या दण्डसत्तांनी ज्या नवशक्तींची उपासना केली त्या वश करून घेणें हा एकच उपाय आहे हें ध्यानांत ठेवून त्या दृष्टीने त्यांनी हिशेब करावा. लष्करी सामर्थ्य, औद्योगीकरण, विज्ञानोपासना, संघटित समाज आणि कर्तृत्वशाली व कार्यक्षम पुरुष हें षडंगबल आपल्याजवळ सिद्ध आहे काय हें प्रथम पाहावें. या प्रकरणांत आपण तोच हिशेब घेत आहों. ऐक्य, संघटना, समाजहितबुद्धि या दृष्टीने या प्रकरणांत आपण पाहणी केली. धर्म, चारित्र्य, ध्येयवाद यांचा दिवसेंदिवस शून्याकार होत चालल्यामुळे आपला समाज शतधा भंगला आहे, छिन्नभिन्न झाला आहे आणि म्हणून अन्नधान्य, महागाई, बेकारी या सर्व युद्ध-आघाड्यांवर त्याला यश:प्राप्ति होत नाही असें आपल्याला दिसून आलें. इतर क्षेत्रांतल्या बलाबलांचा विचार यापुढे केला पाहिजे. तो पुढील प्रकरणांत करूं.

✦ ✦ ✦

# प्रकरण : ४

# भारताचें राष्ट्रीय चारित्र्य

दण्डसत्तांनी लोकसत्तांना दिलेलें आव्हान आपली भारतीय लोकसत्ता स्वीकारूं शकेल काय, असें बारा वर्षांपूर्वी कोणीं विचारलें असतें तर क्षणाचाहि विलंब न लावतां, न चाचरतां, अगदी निःशंकपणें, "यांत कसलीहि शंका नाही" असें मीं उत्तर दिलें असतें. १९५२-५३ सालीं म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पांचसहा वर्षांनी 'भारतीय लोकसत्ता' या ग्रंथाचीं प्रकरणें लिहीत असतांनाहि माझ्या मनाची तीच निश्चिति होती. त्या वेळीं कॉंग्रेसमधल्या व इतर राजकीय पक्षांमधल्या दोषांची जाणीव मला पूर्णपणें झाली होती. त्यावर या ग्रंथांत भरपूर टीकाहि मीं केली आहे. तरी आपल्या भूमीच्या उज्ज्वल भवितव्याविषयीचा मनांतला विश्वास ढळला नव्हता. पं. नेहरू, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी अत्यंत कडक शब्दांत कॉंग्रेसजनांची निर्भर्त्सना केली आहे. त्यांच्या उद्‍गारांच्या आधारेंच मीं बरीचशी टीका केली होती. ते उद्‍गार वाचतांना पंडितजींच्या आणि विशेषतः वल्लभभाईंच्या मनांत कॉंग्रेसच्या भवितव्याविषयी अतिशय निराशा असावी असें केव्हा केव्हा मला वाटत असे. तरीहि देशांतल्या भ्रष्टतेला, अनीतीला, चारित्र्यहीनतेला लवकरच आळा पडेल, देशाचे नेते सत्ताधाऱ्यांच्या अधोगामी वृत्तीला लवकरच पायबंद घालतील, प्रचंड कार्याची जबाबदारी अंगावर येऊन पडल्यामुळे अधिकाऱ्यांची कार्यक्षमता हळूहळू वाढीस लागून हा भार पेलण्यास देश लवकरच समर्थ होईल अशी प्रबळ आशा मनांत असल्यामुळे निराशेचा स्पर्श माझ्या मनाला त्या वेळीं झाला नाही. त्यानंतर आता सहा वर्षांनी भारतीय लोकसत्तेचें पुन्हा मूल्यमापन करण्याच्या हेतूने लिहावयास बसलों. या वेळीं मनःस्थिति फारच पालटलेली आहे.

मागलें प्रकरण लिहिलें तेव्हा मनावर फारच खिन्नता पसरलेली होती; आणि तें वाचतांना वाचकहि अस्वस्थ झाले असतील यांत शंका नाही. या देशावर अशी अवकळा येण्याचें वास्तविक कांहीच कारण नव्हतें. टिळक, महात्माजी, पंडित जवाहरलालजी यांसारखे हिमालयोत्तुंग पुरुष नेते म्हणून, कर्णधार म्हणून, आपल्याला लाभले होते. ब्रिटिशांसारख्या अत्यंत समर्थ जातीशीं सामना देऊन, त्या बलाढ्य सत्तेवर मात करून, आपण स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें होतें. देशांतली, प्रत्येक प्रांतांतली जनता प्रबुद्ध झाली होती. अमेरिकेसारखें अत्यंत संपन्न व बलशाली राष्ट्र आशिया खंडांतल्या या नवोदित लोकसत्तेला वाटेल तें साह्य करावयाचें, त्यावरच जगांतल्या लोकसत्तेचें भवितव्य अवलंबून असल्यामुळे वाटेल ती किंमत देऊन या रोपाची जपणूक करावयाची, अशा कृतनिश्चयाने पावलें टाकीत होतें. आशिया खंडांतल्या लहान मोठ्या राष्ट्रांना तर महात्मा गांधी व पंडितजी म्हणजे देवदूत वाटत होते. उत्कर्ष-सोपानावर चढणाऱ्या राष्ट्राला यशः-सिद्धीची ग्वाही देण्यास यापेक्षा आणखी काय हवें असतें ?

लोकशाहीच्या मार्गाने उत्कर्ष साधावयाचा तर देशांत अत्यंत प्रबळ अशी ऐक्यभावना पाहिजे, आणि तिचें प्रत्यंतर म्हणजे जनतेने प्रचंड बहुमताने एका पक्षाच्या हातीं सत्ता दिली पाहिजे. १९५२ सालीं निवडणुका झाल्या त्या वेळीं नेत्यांना अवश्य असलेली ही महाशक्ति जनतेने अविचलित श्रद्धेने त्यांच्या हातीं दिली, आणि 'या भूमींत नवी सृष्टि निर्माण करा, आम्ही तुमच्या पाठीशीं आहों, म्हणाल तो त्याग करावयास, सांगाल ते कष्ट उपसावयास, कोणत्याहि हालअपेष्टा सोसावयास आम्ही सिद्ध आहों' असें प्रत्यक्ष कृतीने दाखवून दिलें. खरोखर त्या वेळीं कांग्रेसच्या हातीं एवढें सामर्थ्य आलें होतें, इतकी कर्तुमकर्तुम् शक्ति एकवटली होती, की जगांतल्या कोणत्याहि देशांतल्या कोणत्याहि पक्षाच्या हातीं पूर्वकाळीं तशी आली नसेल. लोकसभा, विधानसभा यांतून कांग्रेसला प्रचंड बहुमत तर मिळालें होतेंच, पण त्याहिपेक्षा खरें सामर्थ्य म्हणजे पंडितजींवरची लोकांची अतुल भक्ति! आधींच्या पंचवीस वर्षांतलें पंडितजींचें कर्तृत्वच तसें होतें. धैर्य, त्याग, कार्यक्षमता, विशाल दृष्टि, तळमळ, आत्मविश्वास,— नेतृत्वास अवश्य असलेला प्रत्येक गुण त्यांच्या ठायीं प्रकर्षाने वास करीत होता. अशा या पुरुषाच्या हातीं पसतीस कोटी लोकांनी भक्तिभावाने दिलेली ती सत्ता!

जगांतल्या कोणत्याहि सुलतानापेक्षा ती सत्ता जास्त होती, आणि ती शुद्ध लोकशाही मार्गाने आलेली असल्याने तिच्या शतपटीने जास्त प्रभावी होती. उत्कर्षपथावर पावलें टाकणाऱ्या भारताला जें जें म्हणून पाथेय अवश्य होतें तें तें सर्व त्यांच्याजवळ होतें.

## सर्वत्र अपयश

पण असें असूनहि आज दहा वर्षांनंतर दण्डसत्तांचें आव्हान आपल्याला स्वीकारतां येईल काय असा प्रश्न विचारल्यास त्याचें उत्तर देण्याचें धाडस होत नाही. उत्तरच देऊं नये असें वाटतें. कारण यश:सिद्धीचीं सर्व साधनें असूनहि आपल्याला कोणत्याहि क्षेत्रांत यश म्हणून येत नाही. प्रत्येक क्षेत्रांत आपलें पाऊल मागेच पडत आहे. अलीकडे सरकारनेच जाहीर केलें की, १९५७–५८ या वर्षीं आपलें राष्ट्रीय उत्पन्न १७० कोटी रुपये कमी झालें. ११००० कोटींवरून तें १०८३० कोटींवर आलें. कारण काय, तर या वर्षी एकंदर शेतमालाचें उत्पन्न ३२० कोटींनी कमी झालें. याचा अर्थ असा की, आपलें सर्व जीवन अजून मान्सूनच्या मर्जीवर अवलंबून आहे. बारा वर्षांत माणसांच्या हातीं कसलीहि सत्ता आलेली नाही. गेल्या सहा वर्षांचा हिशेब पाहतां राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ झाली आहे हें खरें; पण तिचें स्वरूप पाहिलें म्हणजे हेंच दिसतें. येथे योगायोगाने कांही तरी घडत आहे; आपण घडवीत आहों असें दिसत नाही. एक सालीं वाढ शे. ६ तर दुसऱ्या सालीं शे. १. एकोणीसशे सत्तावन सालीं शे. ५ वाढ तर अठ्ठावन सालीं उणे एक. सगळी मिळून सरासरी शे. २.५ वाढ अशी दिसते, पण एकतर जेथे नियोजन नाही तेथेहि इतकी वाढ होतेच; आणि दुसरें म्हणजे या मानाने लोकसंख्या थोडी जास्तच वाढली आहे. म्हणजे ही वाढ खरी वाढच नव्हे असा हिशेब होतो. (टाइम्स : २७ जुलै १९५९). हा झाला गेल्या तीन चार वर्षांचा हिशेब. त्याच्या आधीच्या पांच वर्षांत (१९५१ ते ५६) राष्ट्रीय उत्पन्नांत शेकडा १७.५ ने वाढ झाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत आपल्याला चांगलें यश मिळालें असें सर्वांचेंच मत आहे, पण तें सांगून तज्ज्ञ पुढे लगेच म्हणतात की, पहिलीं तीन वर्षें पाऊसपाणी उत्तम होतें म्हणून वाढ झाली. पुढल्या दोन वर्षांत वाढ अगदीच अल्प झाली. म्हणजे गेल्या बारा वर्षांत पुरुषार्थ असा कांहीच झाला नाही. मागे घडत होतें तेंच आता घडत आहे.

आपल्या औद्योगिक उत्पादनाची तीच कहाणी आहे. १९५९ च्या मध्या-वर रिझर्व्ह बँकेने जाहीर केलें की, आपली औद्योगिक उत्पादनवाढ ३·५ वरून या सालीं १·५ वर आली. कापड गिरण्यांचें काय झालें तें मागे सांगितलेंच आहे. १०० कोटी वार कापड निर्यात करावयाचें होतें तेथे या वर्षी आपण ५० कोटी वारच करूं शकलों. इतकें उत्पादन घटलें आहे, आणि याचें अपश्रेय एकाने दुसऱ्यावर व त्याने पहिल्यावर लादावयाचें असें सध्या चालू आहे. श्री. लालबहाद्दूरशास्त्री म्हणाले की, कारखानदारांचा कारभार अव्यवस्थित आहे. कारखानदार म्हणाले की, सरकारच्या धोरणामुळे उत्पादनखर्च कमालीचा वाढला आहे; नवीन अद्ययावत् यंत्रें आणूं देण्याचें सरकारचें धोरण नाही आणि संप नित्य चालू आहेत. मग उत्पादनवाढ होणार कशी? सध्या चित्तरंजन लोकोमोटिव्ह फॅक्टरी, भिलाई, रुरकेला, दुर्गापूर येथील पोलादाचे कारखाने, सिंद्रीचा खतांचा कारखाना, पिंपरीचा पेनिसिलीनचा कारखाना, यांची नांवाजणी फार ऐकूं येते. यांतून अपेक्षेपेक्षा जास्त उत्पादन होत आहे असें सरकारी प्रवक्ते सांगतात. तसें खरेंच असेल तर अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. पण त्याविषयी चार पांच वर्षांनी बोलावें हें बरें. लोकसभेच्या गेल्या अधिवेशनांत श्री. र. के. खाडिलकर यांनी सांगितलें की, सरकारी कारखाने व्यापारी तत्त्वावर, फायद्याच्या तत्त्वावर मुळीच चालत नाहीत; आणि त्या कंपन्यांच्या ताळेबंदाच्या आधारेंच आपण हें सांगत आहों असें ते म्हणाले. एकदा एक अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ श्री. जे. के. गालब्रेथ येथे येऊन गेले. त्यांनी पण हीच टीका केली. सरकारी म्हणजे राष्ट्रीय कारखान्यांत खर्च कमी व फायदा जास्त असें धोरण असलें पाहिजे, कारण त्यांतूनच शिल्लक पडून एकंदर औद्योगिक वाढीसाठी भांडवल मिळावयाचें असतें. म्हणून राष्ट्रीय कारखान्यांकडे — पब्लिक सेक्टरकडे — पाहण्याची दृष्टि बदलली पाहिजे असा उपदेश त्यांनी केला. (टाइम्स : २२ जुलै १९५९) आणि या औद्योगिक उत्पादनाची एवढी प्रगति असती तर एकंदर औद्योगिक धनांत घट झाली नसती हें उघडच आहे. पण सरकारने चालविलेल्या राष्ट्रीय उद्योगाची स्थिति काय आहे याचा विचार सरकारी अहवालावरूनच आपल्याला पुढे करावयाचा आहे. त्या वेळीं आपल्या औद्योगिक प्रगतीचें स्वरूप कळून येईल.

## लोकसत्तेकडून दण्डसत्तेकडे

पाश्चात्त्य पंडित आणि इतर अनेक अभ्यासक यांनीं लोकशाही मूल्यें टिकविल्याबद्दल भारताची प्रशंसा केली आहे हें खरें आणि स्वातंत्र्यप्राप्ती-नंतरच्या गेल्या दहाबारा वर्षांत आपण राजकीय क्षेत्रांत अगदी असामान्य यश मिळविलें आहे यांत शंकाच नाही. फारशा पूर्वपरंपरा नसतांना, एवढ्या प्रचंड देशांत बहुसंख्य लोक निरक्षर असतांना, एक संघटित पक्ष निर्माण करणें आणि व्यक्तिस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य अबाधित राखून बहुमत मिळवून एवढ्या अफाट लोकसमूहाचें प्रशासन करणें ही गोष्ट सोपी नव्हे. हें यश कॉंग्रेसचें आणि विशेषतः पंडितजींचें आहे. त्यांच्या अभावीं यांतलें कांहीच साध्य झालें नसतें. पण राजकीय क्षेत्रांतल्या या यशाकडून दृष्टि काढून आपण आर्थिक व सामाजिक क्षेत्राकडे ती वळविली की, मन शंकाकुल होऊन जातें. इतरांनी केलेला गौरव आपण फार सावधगिरीने ऐकला पाहिजे असें वाटूं लागतें. आपण लोकशाही मूल्यें टिकविलीं म्हणजे काय केलें? समता हें लोकशाहींतलें प्रधान मूल्य आहे. वरील सर्व स्वातंत्र्यें तिच्यावर अवलंबून असतात, आणि ज्या देशांत कोटी कोटी लोक बेकार आहेत, आणखी अनेक कोटी लोक अर्धपोटी आहेत तेथे समता आहे या म्हणण्याला काय अर्थ आहे? दर क्षणाला जेथे महागाई वाढते आहे, सामान्य जनांना क्षणाक्षणाला जीवन जास्त जास्त असह्य होत चाललें आहे तेथे समता नांदणें कसें शक्य आहे? आणि समता नाही तेथे वरील स्वातंत्र्यें कायद्याने दिलीं असलीं तरी संपत्तीप्रमाणेच तीं अत्यंत अल्पसंख्यांच्याच वाट्याला येणार हें उघड आहे. तेव्हां लोकशाही मूल्यें टिकविलीं म्हणजे बाह्य सांगाडा टिकविला इतकाच त्याचा अर्थ होतो. त्यालाहि महत्त्व आहे. पण त्या सांगाड्यांत जीव भरण्यांत म्हणजेच ऐहिक सुखसमृद्धि निर्माण करण्यांत, सर्वांना अन्नवस्त्रादि भोग्यधन पुरविण्यांत यश येत असेल तर! कायद्याचें राज्य काटेकोरपणें चालू असेल तर! आज भारतांत काय चालूं आहे तें आपण मागल्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. कायद्याचें राज्य खेड्यापाड्यांतून नष्टच झालें आहे. तेथे केवळ गुंड-मवाल्यांची सत्ता आहे हें तर कॉंग्रेसच्या मोठमोठ्या श्रेष्ठींनीच म्हटलें आहे. यांतूनच अराजक निर्माण होतें आणि

शेवटीं दण्डसत्तेला देश बळी पडतो. म्हणजे आज कसें विपरीत दृश्य दिसतें आहे तें पाहा. आपण लोकशाहीच्या घोषणा करीत आहों. पण आपला सर्व राज्यकारभार भ्रष्ट व धर्मशून्य झाल्यामुळे, कायद्याचें (म्हणजेच धर्माचें ) राज्य येथून नष्ट होत चालल्यामुळे, अधिकारी, सत्ताधारी, नेते हे मदांध व सत्तालोलुप झाल्यामुळे आपण दण्डसत्तेकडे वाटचाल करीत आहों. तिकडे सोव्हिएट रशिया व नवचीन दण्डसत्तेच्या घोषणा करीत आहेत. पण त्यांनी विज्ञानाची उपासना चालविली आहे. लोकांत शास्त्रज्ञानाचा प्रसार ते करीत आहेत. भ्रष्टता, चारित्र्यहीनता यांचा नायनाट करून जनतेला दण्डसत्तेनेच का होईना; ते शुद्ध आचारविचारांची शिकवण देत आहेत; आणि. प्रचंड उत्पादन करून सुखसमृद्धि निर्माण करण्यासाठी अहोरात्र कष्ट करीत आहेत; आणि ही सुखसमृद्धि व तें शास्त्रज्ञान यांतून व्यक्तित्व व लोकशाही यांचा उदय झाल्यावाचून राहणार नाही अशी वेंडेल विल्की, जॉन गुंथूर आणि खुद्द पंडित जवाहरलालजी यांसारखे लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्तेच ग्वाही देत आहेत. भारत हा लोकशाहीच्या मार्गानें दण्डसत्तेकडे—कम्युनिझम-कडे चालला आहे, आणि नवचीन दण्डसत्तेच्या — कम्युनिझमच्या मार्गानें लोकशाहीकडे चालला आहे !

असें कां व्हावें ? अशी विपरीत गति कां निर्माण व्हावी ?

याच प्रश्नाचें उत्तर आपण शोधीत आहों. याच विषयाचा प्रपंच करीत आहों. ' क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ' या कविवचनांत त्याचें उत्तर सापडेल.

यश हें समाजाच्या अंगच्या सत्त्वावर अवलंबून आहे; बाह्य उपकरणांवर नाही. अल्बर्ट आइनस्टाइन् यांनी म्हटलें आहे की, " इतिहासाच्या प्रगतीला समाजांतील कर्त्या पुरुषांच्या बुद्धिमत्तेपेक्षा चारित्र्याची जास्त आवश्यकता आहे. चारित्र्याचें महत्त्व जास्त आहे; आणि बौद्धिक क्षेत्रांतलें कर्तृत्वहि बहुंशीं चारित्र्यावरच अवलंबून आहे." यावर भाष्य करतांना सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ क्रोथर यांनी ' चारित्र्य ' याचा अर्थ स्पष्ट केला आहे. ध्येयनिष्ठा, दृढनिश्चय, असीम सत्यनिष्ठा, सत्याच्या रक्षणासाठी आवश्यक ती निर्भय-वृत्ति, समाजहितबुद्धि, अंतिम उद्दिष्टासाठी बलिदान करण्याची सिद्धता या गुणसंपदेला क्रोथर चारित्र्य असें म्हणतात. हाच धर्म, हेंच सत्त्व ! आइन्-स्टाईन व क्रोथर यांनी हें विज्ञानाच्या इतिहासाविषयी लिहिलें आहे.

विज्ञानाची प्रगतिसुद्धा कोपरनिकस, गॅलिलिओ, डार्विन, मेरी क्युरी या शास्त्रज्ञांच्या ठायीं सत्त्व नसतें, चारित्र्य नसतें तर झाली नसती. मग लोकशाही समाजवाद या क्षेत्रांत सत्त्वाची किती आवश्यकता असेल याची सहज कल्पना करतां येईल. १९४७ पूर्वी, कवीने ज्यांना उपकरणें म्हटलें आहे, तशीं उपकरणें, म्हणजे साधनसंभार आपल्याजवळ फारसा नव्हता; पण तेव्हा सत्त्व होतें. तेव्हा टिळक होते. महात्माजी होते. आता पूर्वीच्या मानाने साधनसंभार पुष्कळच लाभला आहे. पैसा आहे, अधिकार आहेत, सरकारी यंत्रणा आपलीच आहे, हजारो पगारी माणसें आहेत, वृत्तपत्रें, नभोवाणी यांसारखीं प्रचारसाधनें आहेत. नद्यांचें पाणी अडवलेलें आहे, यंत्रांत वीज तयार आहे, खतांचें उत्पादन होत आहे, परदेशचे स्थापत्याचे, शेतकीचे, कारभाराचे तज्ज्ञ येत आहेत, आपले तरुण शिकून तयार झालेले आहेत. तुलनेने पाहिलें तर साधनसंभार खूपच वाढला आहे, पण भारतांतलें सत्त्व नष्ट होत चाललें आहे.

आपल्या समाजविकासयोजना, राष्ट्रविकासयोजना इ. योजनांनी भारताच्या सर्व खेड्यांपाड्यांत नवजीवनाची हाक निश्चित पोचली आहे; आणि सर्व समाज, सर्व ग्रामीण जनता कांही नव्या औत्सुक्याने सभोवार पाहूं लागली आहे. युगानुयुगें सुस्त पडलेल्या या राष्ट्रपुरुषाच्या देहांत मोठेंच चलनवलन दिसूं लागलें आहे. त्याच्या सर्व अवयवांत, अंगप्रत्यंगांत या योजनांमुळे नवी थरारी गोचर होऊं लागली आहे. दिल्लीला राज्य कोण करतें आहे, तो राजा स्वकीय आहे की परकीय आहे, तो आपल्यासाठी काय करतो आहे, तो आपल्याला काय सांगतो आहे, याची दखल आपण घेतली पाहिजे अशी एक नवी प्रबुद्धता सर्व भारतांत निर्माण झाली आहे. कांही कांही वृत्तपत्रांतून कांही खेड्यांनी. कांही ग्रामसंघटनांनी आपल्या सर्व खेड्याचा कायापालट करून टाकल्याचे जे वृत्तान्त येतात ते वाचून आपल्या योजनांची आखणी नी मांडणी किती योग्य आहे त्याची साक्ष पटते. त्या गावांत ग्रामजनांनी रस्ते केले आहेत, शाळा बांधल्या आहेत, मंदिर उभारलें आहे, पार बांधले आहेत, जवळून वाहणाऱ्या ओढ्याचें पाणी अडविलें आहे, विहिरी खोदल्या आहेत, पेढी उघडली आहे, सरकारच्या साह्याने बीं-बियाणें, खतें, नवीं अवजारें मिळविलीं आहेत, पिकांचें रक्षण

करण्याची व्यवस्था केली आहे, चोर-दरोडेखोरांच्या प्रतिकाराची व्यवस्था केली आहे. अशीं वर्णनें मधूनमधून वाचावयास मिळतात आणि अधिक शोध केला तर लगेच कळून येतें की, या सर्व नवसृष्टीच्या मागे त्या गावांतले कोणीतरी एकदोन कर्तेपुरुष – चारित्र्य संपन्न पुरुष – उभे आहेत. ते म्हणजे त्या गांवाचा आत्मा असतो. त्यामुळे त्या देहांत नवचैतन्य निर्माण झालेलें असतें आणि त्या चैतन्यामुळें सर्व कायापालट झालेला असतो. पण अशा वार्ता मधून मधून येतात. योजनांत समाविष्ट झालीं आहेत तीं भारताचीं खेडीं पांच लक्ष आहेत. त्यांतल्या कांही खेड्यांतून, हजारांतून एखाद्या खेड्यांतून अशा वार्ता येतात. आपल्याला कायापालट करावयाचा आहे, तो सर्व भारताचा. पांच लक्ष खेड्यांचा आणि हजारो नगरींचा ! तेथे असें यश कां येत नाही ?

## योजकस्तत्र दुर्लभः

भारताच्या योजनांचीं वर्णनें वाचलीं म्हणजे मनांत येतें की, आकाशांतून कोसळणाऱ्या मुसळधार पावसासारखी किंवा सागराच्या प्रचंड लाटांसारखी ही शक्ति आहे. सागराच्या लाटा ही प्रचंड शक्ति आहे, पण मानवाला तिचा उपयोग शून्य आहे. कारण ती अजून आपल्याला यंत्रबद्ध करतां आलेली नाही. ती पट्ट्यावर घेतां आलेली नाही. तशी ती आली तर एका क्षणांत या विश्वाचें रूप ती पालटून टाकील. तेंच आपल्या ग्रामीण शक्तींचें आहे. योजनांचा जो पसारा आपण मांडला आहे त्यामुळें सर्व भारत हलून गेला आहे. ही शक्ति जागृत झालेली आहे; पण ती नियंत्रित करण्याचें, संघटित करण्याचें चातुर्य, त्यासाठी लागणारें चारित्र्य येथे कोणाजवळ नाही. आकाशांतून पाणलोट कोसळावे तसा वर सांगितलेला साधनसंभार – यंत्रें, खतें, बियाणें, तगाई, कर्ज, माणसें – दिल्लीहून आपल्या खेड्यावर कोसळत आहे. पण तो पाणलोट अडवून धरून बंदिस्त जागीं साठवून, हुकमतींत ठेवून योग्य त्या ठिकाणीं त्याचा विनियोग करतां आला नाही तर त्याचें काय होतें तें आपण पाहातच आहों. आज हजारो वर्षें पाहात आहों. हा अनंत जलराशी पडतो तसाच वाहून जातो आणि जातांना जमीन धुपून नेतो, झाडें उन्मळून टाकतो. महापुराने जीवन उद्ध्वस्त करून टाकतो. उभी शेती

बुडवून टाकतो आणि थोडा काळ लोटला की, एवढा पूर येऊनहि डोळ्याला लावायलासुद्धा पाणी मिळत नाही ! हें होऊं नये म्हणून या जलराशींतून लक्ष्मी निर्माण करणारा नियंता, समर्थ असा योजक हवा असतो, आणि तोच येथे दुर्लभ आहे.

तो कां दुर्लभ झाला आहे त्याचीं कांहीं कारणें मागल्या प्रकरणांत सांगतलीं. १९४७ पूर्वीं जो योजक येथे होता तो सध्या सत्तालोभाला बळी पडून त्या खेळांत गुंग आहे. त्याच्या बहुसंख्य अनुयायांना 'राजकारण' झालें आहे; आणि त्यामुळेच स्वार्थ, जातीयता, कूपमंडूक वृत्ति हे रोग बळावले आहेत, आणि या रोगांनीच आमचें चारित्र्य नष्ट झालें आहे. नीति संपुष्टांत आली आहे. धर्माला ग्लानि आली आहे. या रोगांनी आणखी काय अनर्थ केले आहेत तें आता पाहावयाचें आहे.

## कार्यक्षमता

धर्म, नीति, सद्भावना यांच्या इतकीच कार्यक्षमतेची सामर्थ्याच्या उपासनेला आवश्यकता आहे. चारित्र्यहीनतेमुळे ज्याप्रमाणे कोटी कोटी धनाची हानि होते त्याचप्रमाणें अक्षमतेमुळेहि होते हें आपण जाणलें पाहिजे. दामोदर व्हॅलीचे मुख्य इंजिनियर यांना कोनार हें १० कोटींचें धरण बांधण्याची जरूर नव्हती हें तें धरण बांधल्यावर कळलें. ते सावध, साक्षेपी, जाणते असते– तसे ते आहेत असें धरूनच त्यांची सरकारने एवढ्या मोठ्या जागीं स्थापना केली होती – तर हे १० कोटी रु. पाण्यांत गेले नसते. आपल्या देशांत धरणें अशीं व्यर्थ बांधलीं जातात, इमारती पुऱ्या होण्याच्या आंतच त्यांना तडे जातात, रेल्वेचे अपघात ही नित्याचीच गोष्ट होऊन बसली आहे. मनुष्य नोकरींतून निवृत्त झाल्यावर चार चार वर्षें त्याला त्याचें पेन्शन मिळत नाही, हीं कशाचीं लक्षणें आहेत ? नालायकी, गहाळपणा, बेजबाबदार वृत्ति याचे हे सर्व परिणाम आहेत. यामुळे दर क्षणाला राष्ट्रीय सामर्थ्य खच्ची होत आहे हें ध्यानीं घेऊनच समर्थांनी कार्यक्षमता, साक्षेप, सावधता या गुणांना धर्म, नीति, चारित्र्य यांच्या बरोबरीचें स्थान दिलेलें आहे. ते म्हणतात, " अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे. " जे इंजिनिअर इमारत कच्ची बांधतात ते दैत्य होत. हिंसा करणारे, बलात्कार करणारे,

घनाचा अपहार करणारे गुंड, मवाली हे तर दैत्य आहेतच; पण दुर्लक्षामुळे, बेसावधपणामुळे, अज्ञानामुळे, गहाळपणामुळे जे रेल्वेचे अपघात घडूं देतात, इमारती पडूं देतात, धान्य कुजूं देतात तेहि दैत्यच होत. दण्डसत्तांकित देशांत सत्ताधाऱ्यांनी हा नियमच केला आहे. स्टॅलिन नेहमी म्हणे, की ' अक्षमता हा गुन्हाच आहे. ' अचूक यत्न करणाऱ्या कार्यक्षम लोकांना समर्थ देव म्हणतात आणि चुकणाऱ्यांना, अक्षमांना, नालायकांना दैत्य म्हणतात त्यांतला भावार्थ हाच आहे. समर्थांना वन्ही चेतवावयाचा होता, शक्तीची उपासना सांगावयाची होती, राष्ट्रीय प्रपंच यशस्वी करावयाचा होता. त्यामुळे त्यांनी धर्माइतकेंच कार्यक्षमतेला महत्त्व दिलेलें आहे. ' सावधू देव जाणावा । उन्मत्तू दैत्य बोलिजे ।। साक्षेपी अंश देवाचे । आळशी वंश दानवी ।। प्रत्यये बोलता आले । अचूक न चुके जनीं ।। चुकेना, ठकेना कामीं । प्रसंग जाणतां बरा ।। " असा माणूस समर्थांच्या मतें शहाणा होय. "तयाची संगति धरितां सौख्य होताहे ।" लोकांना सुख देणारा तोच देव; आणि " दैत्य ते पीडिति लोकां । तदंश जाणिजे तसा ।।" दण्डसत्ता किती कार्यक्षम असते त्याचें वर्णन प्रारंभींच्या प्रकरणांत केलेंच आहे. भारतीय लोकसत्ता अशी कार्यक्षमता निर्माण करूं शकेल काय ? हें साधलें नाही तर योजना यशस्वी कशा होणार ? दण्डसत्तेच्या आव्हानाला आपण सहज तोंड देऊं हीं आपली प्रतिज्ञा खरी कशी होणार ?

कोणतेंहि कार्य यशस्वी व्हावयाचें तर त्या कार्याविषयी कर्त्याला फार मोठी तळमळ असणें अवश्य आहे. त्या कार्याचें महत्त्व त्याला इतकें वाटलें पाहिजे की, त्यासाठी त्याने तनमनधन अर्पावें. आपलीं नियोजनें एवढीं प्रचंड आहेत, त्यांचा राष्ट्रव्यापी पसारा, त्यांत गुंतलेलें धन, त्यावर अवलंबून असलेलें आपलें भवितव्य यांचीं प्रमाणें, मापनें इतकीं अजस्र आहेत की, पहाडी कर्तृत्वाचे, कृतबुद्धीचे, ' देह जावो अथवा राहो ' या वृत्तीचे लक्षावधि कार्यकर्ते तीं यशस्वी होण्यासाठी अवश्य आहेत. दुर्दैव असें की, काँग्रेसजवळ हें मानवधन मुळीच नाही. एकदा दिल्लीला अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक झाली त्या वेळीं श्री. ढेबरभाई म्हणाले, " काँग्रेस कार्यकर्ते जागा भूषविण्यापलीकडे कांही करीत नाहीत. योजना आखणें एवढेंच आपलें काम, त्या कार्यवाहींत आणणें हें सरकारचें काम आहे असें त्यांना वाटतें. इतकेंच

नव्हे तर पंचवार्षिक योजनेंत ते रस घेतच नाहीत.'' श्री. सी. सुब्रह्मण्यम् म्हणाले की, ''आमच्याजवळ ध्येयवादी कार्यकर्ते नाहीत. नागपूर ठरावाप्रमाणे सहकारी शेती घडवून आणण्याचा उत्साह काँग्रेस जनांतच नाही.'' सर्वांत शेवटीं, ''या कार्यासाठी सर्वस्व अर्पिण्यास किती लोक तयार आहेत?'' असा प्रश्न अध्यक्ष सौ. इंदिराबाई गांधी यांनी विचारला. तेव्हा तीन-चार हातच वर झाले. नवचीन आणि भारत यांची तुलना करतांना श्री. रा. कृ. पाटील यांनी चीनच्या व भारताच्या कार्यक्षमतेंतील या फरकाची कारणमीमांसा दिली आहे. चीनमध्ये एखादी योजना आखली गेली की, ४–५ लाख कार्यकर्ते बाहेर पडतात आणि आधी जनमन वळविण्याचें, लोकशिक्षणाचें कार्य सुरू करतात. सभा, बैठकी, चर्चा, पत्रकें, भाषणें, नभोवाणी या साधनांनी अहोरात्र नव्या कल्पना, नव्या योजना ते लोकांच्या गळीं उतरवितात; आणि अशा रीतीने प्रथम ही महाशक्ति कार्यसिद्धीला अनुकूल करून घेतात. 'टाइम्स ऑफ इंडिया' चे माजी संपादक फ्रँक मोरेस यांनी म्हटलें आहे की, 'आखणी झाली कीं हिंदुस्थान सरकार कायदा करतें, आणि चिनी सरकार चळवळ करतें.' तीच टीका उद्धृत करून श्री. पाटील यांनी चीनच्या यशस्वितेचें रहस्य समजावून दिलें आहे, व भारतीय कार्यकर्त्यांच्या निरुत्साहावर टीका केली आहे. एकदोन ठिकाणीं तर, 'सरकारला निकटच्या भविष्यांत कांही करावयाचें आहे कीं नाही, कां समाजवादी समाजरचना ही एक लोकांना आकर्षित करणारी पण पोकळ शब्दगर्जनाच आहे, अशी शंका येते', असें त्यांनीं म्हटलें आहे. नियोजन मंडळाच्या कार्यावर डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी हीच टीका केली आहे. ते म्हणतात, 'योजना तयार होऊन प्रसिद्ध झाल्यानंतर नियोजन मंडळ सुप्तावस्थेंत गेलें.' या योजनांचें पुढें काय होतें, त्या कार्यवाहींत येतात कीं नाही, त्यासाठी यंत्रणा काय आहे, ती कार्यक्षम आहे कीं नाही, याकडे मंडळाने लक्ष दिलें नाही.' ढेबरभाईंनी म्हटल्याप्रमाणें, तें आपलें कामच नाही, अशी त्यांची वृत्ति असल्यावर दुसरें काय होणार? चीनचे कार्यकर्ते आखणी होतांच जनतेकडे धाव घेतात, आणि काँग्रेसचे कार्यकर्ते फक्त निवडणुकीच्या वेळीं जनतेकडे जातात. काँग्रेसचा जनतासंपर्क नाहीसा होत चालला आहे ही टीका तर खुद्द पंडितजींनीच अनेक वेळां केली आहे. शक्तीची जोपासना

करावी असें धर्मानुज जो भीम त्याला वाटलें की, ज्या मातींतून आपला देह निर्माण झाला त्या मातीशीं तो संपर्क करीत असे. तिच्यामध्ये आपला देह घोळवीत असे. काँग्रेसने हें करावें अशी पंडित जवाहरलालजींची इच्छा आहे. कारण काँग्रेस तेथून निर्माण झाली आहे हें त्यांनी डोळ्यांनी पाहिलें आहे. पण काँग्रेसजनांत ही वृत्ति नाही. कारण त्यांच्यांत उत्साह, तळमळ, आस्था यांचा अभाव आहे. कार्यांविषयी उत्साहच जेथे नाही तेथे कार्यक्षमता कोठून येणार ?

## मूल्यमापन

आपलें सरकार आपण हातीं घेतलेल्या योजनांचें दरसाल मूल्यमापन करीत असतें; आणि त्या मूल्यमापनाचीं इतिवृत्तें दरसाल प्रसिद्ध होत असतात. मे १९५८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पांचव्या मूल्यमापनाचें (रिपोर्ट ऑफ दि फिफ्थ इव्हॅल्युएशन कमिटी) वृत्त पाहा. मूल्यमापक अधिकारी सांगतात की, त्यांनी एकंदर ८२ विभाग (ब्लॉक) तपासले. प्रत्येक विभागाला एक नियंता अधिकारी (ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर) असतो. या ८२ नियंत्यांची त्यांनी मुलाखत घेतली. यांतील बहुतेक दुसऱ्या कोठल्या तरी सरकारी खात्यांतून बदलून आलेले होते. मूल्यमापक अधिकाऱ्यांनी त्या सर्वांना विचारलें की, हें काम तुम्हांला दिलें यांत तुम्हांला बढती वाटते कीं शिक्षा वाटते ? २३ नियंत्यांनी सांगितलें की, आम्हांला हें काम नको आहे. परत पहिल्या जागीं पाठविलें तर बरें होईल. ३२ जणांना ही बढती वाटत नाही. हें काम नको आहे असें नाही. पण एकंदर परिस्थिति सुखाची नाही म्हणून ते असंतुष्ट आहेत. या ८२ जणांत राजकीय वा सामाजिक कार्यकर्ता एकहि नव्हता. आता या इतिवृत्ताचा अर्थ किती वाईट आहे तें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. आपल्या खेड्यांची संख्या सुमारें ५ लाख आहे. शंभर खेड्यांचा एक विभाग साधारणपणें असतो. एवढ्यांना ५००० नियंते पाहिजेत. पण ते समर्थ रामदासांच्या महंतासारखे पाहिजेत. कार्याला वाहून घेणारे पाहिजेत. अहोरात्र त्याची चिंता वाहणारे पाहिजेत.. ध्यानीं-मनीं-स्वप्नीं त्यांना समाजविकास योजना दिसली पाहिजे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या भावी भारताचीं चित्रें त्यांच्या डोळ्यापुढे तरळलीं पाहिजेत. म्हणजेच ते ध्येयनिष्ठ

पाहिजेत. चारित्र्यसंपन्न पाहिजेत. काँग्रेसजवळ अशीं ५००० माणसें तर नाहीतच, पण पन्नासहि नाहीत. विकासयोजना कां फलदायी होत नाहीत हें पाहावयास लांब जाण्याची आवश्यकता काय आहे? तेथले नेते, तेथले नियंते कोण आहेत हें पाहिलें की झालें. बलवंतराय मेहता कमिटीने लिहिलें आहे की, हे विकास अधिकारी कामाच्या जागीं जिपमधून येतात, ५। १० मिनिटें थांबतात की चालले परत. म्हणून कमिटीने एक उपाय सुचविला आहे की, त्यांच्या जिपगाड्या काढून टाकाव्या. म्हणजे ते आल्यासारखे दोनतीन दिवस राहतील तरी! खरोखर हा किती सोपा उपाय आहे. काँग्रेसच्या अंगीं ध्येयवाद बाणविण्यास किती सोपा उपाय हा. जिप गाड्या काढून टाकाव्या! मेहता कमिटीने अगदी तळमळून इतिवृत्त लिहिलें आहे. कमिटी म्हणते या विकास अधिकाऱ्यांच्या ठायीं केवळ प्रदर्शनवृत्ति आहे. मुंबईचे, दिल्लीचे, युरोप-अमेरिकेचे पाहुणे विकासयोजना पाहण्यास वरचेवर येत असतात. तेव्हा त्यांच्यापुढे प्रदर्शन मांडावें याकडे त्यांचें सारें लक्ष असतें. आणि वर्षभर पाहुणे सारखे येतच असल्यामुळे ही आरास मांडण्यांतच सगळा वेळ जातो. विकासाला वेळच राहात नाही. यामुळे परिणाम काय होतो? बळवंतराय मेहता म्हणतात की, ग्रामीण जनता यामुळे दुरावते. या विकासयोजना आपल्यासाठी आहेत यावर तिचा विश्वास बसत नाही. हे कांही सरकारी समारंभ आहेत, आपलें यांत कांही नाही अशीच जनतेची समजूत आहे. -आणखीहि अनेक कारणें आहेत. कांही विभागांत पाटबंधाऱ्यावरचा सगळा पैसा मोठ्या जमीनदारांच्या फायद्याच्या दृष्टीने खर्च केला गेला. त्यामुळे जनता दुरावली. कोठे अधिकाऱ्यांच्या इमारतीवर भरमसाट पैसा ओतला गेला. लोक दुरावले. पाहुणे आले की, समारंभावर अतिशय पैसा खर्च होतो; इतकेंच नव्हे तर जनतेसाठी आणलेलें सामान बहुतेक तेथेच वापरलें जातें. मेहता म्हणतात की, इकडे आपण शेतकऱ्याला सांगतो की, मुलीच्या लग्नसमारंभांत जास्त पैसा खर्च करूं नये, आणि आपले समारंभ मात्र चालूच असतात. त्यामुळे काय होतें? लोक या योजनेकडे गंमत म्हणून पाहतात! (रिपोर्ट ऑफ दि टीम फॉर दि स्टडी ऑफ कम्यूनिटी प्रॉजेक्ट्स् अॅन्ड नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिस, नोव्हें. १९५७) लोकांचें योजनांना सहकार्य नाही, ते अजून दूरच आहेत हें तर प्रत्येक मूल्यमापन समितीने

सांगितलें आहे. त्यामुळे जें काम झालें त्याची निगा राहात नाही. खेड्यांतून आता बालोद्यानें केलीं आहेत, बागा रचल्या आहेत, लोकांच्या सभांसाठी इमारती बांधल्या आहेत, झाडें लावलीं आहेत, ग्रंथालयें आहेत, खेळाचें सामान आहे, सर्व आहे. पण मेहता सांगतात की, घेतलेल्या सामानाचा उपयोग केला जात नाही. तें वायां चाललें आहे. पैसा मंजूर केलेला असतो. पण तोहि खर्च होत नाही. कित्येक ठिकाणीं शे. ५० रु. पडून आहेत; आणि मग वर्षाअखेरीं तो पैसा वाटेल तसा खर्च करण्याची प्रवृत्ति होते. मग तो आकाशांतून कोसळणाऱ्या पाणलोटासारखा येतो आणि जातो. मेहता कमिटीने सांगितलें आहे की, एका विभागांत मार्च महिन्यांत १ लक्ष ७० हजार रुपयांच्या विकास अधिकाऱ्यांनी नुसत्या मुताऱ्या बांधल्या! कर्जें दिलीं तीं कसलाहि विचार न करतां दिलीं आहेत. त्यामुळे एका विभागांत १९ लक्षांपैकी फक्त ८ लक्षच वसूल झाले आहेत. खतें, बियाणें शेतकऱ्यांना दिलीं जातात, पण शेतकरी येईल त्या भावाने तो माल विकून पैसा करतात आणि चैन करतात. कारण उधार दिलेलें परत द्यायचें नसतें अशीच शेतकऱ्यांची प्रामाणिक समजूत आहे. मुसळधार पाऊस कोसळतो त्याची व्यवस्था झाली नाही तर तो वाहून जातो, आणि जातांना अनर्थ करून जातो. तसा हा दिल्लीचा पैसा खेड्यांवर कोसळत आहे, पण तो लोकांचीं मनें कोरडीं करीत चालला आहे. कारण तो इमारतींत साठतो आहे, जिप गाड्यांत साठतो आहे, समारंभांतून वाहत आहे, प्रदर्शनें मांडीत आहे, आरास करीत आहे. पावसाचें पाणी असें कोठे तरी साठलें की त्याला दुर्गंधि येते. मग लोक त्याच्याजवळ येत नाहीत. शेतकऱ्याला बीबियाणें, खतें पुरविणें, कर्ज देणें एवढेंच आपलें काम असें अधिकारी मानतात. त्याच्या मागे राहून त्याला मार्गदर्शन करून उत्पादन वाढविण्याचें अंतिम उद्दिष्ट पार पाडणें हें आपलें कार्य असें मानणारे विकास अधिकारी कोठेच नाहीत. वास्तविक, प्रत्येक विभागांत समर्थांच्या महंतांसारखे कॉंग्रेसचे दहावीस लोक पाहिजे होते. स्वातंत्र्याच्या लढ्यापेक्षाहि जास्त कठीण असा हा लढा आहे. येथे तशाच ध्येयनिष्ठ, कार्यक्षम कार्यकर्त्यांची जरुरी आहे. पण स्वातंत्र्या-नंतर अशीं ध्येयनिष्ठ माणसें कॉंग्रेसमध्ये राहूं शकलीं नाहीत. तीं निघून गेलीं आणि अशीं नवीं माणसें कॉंग्रेसला मिळत नाहीत. याचें कारण काय?

समर्थ नाहीत म्हणून त्यांचे मठ नाहीत व त्यांचे महंतहि नाहीत हें अगदी उघड आहे.

कार्यक्षमतेसाठी अवश्य गुण कोणते याचा विचार आपण करूं लागलों तर शालेय पुस्तकांतील कंटाळवाणी यादी डोळ्यांसमोर येते. उद्योग, हिशेबीपणा, वक्तशीरपणा, चिकाटी, दक्षता, प्रसंगावधान, मनमिळाऊपणा, हेच गुण डोळ्यांपुढे येतात; आणि मौज अशी की, हे सर्वांना माहीत असतात. आर्थिक किंवा राजकीय धोरण कोणतें ठेवावें यासाठी अवश्य जें ज्ञान तें दुर्मिळ असेल, पण कार्यक्षमतेसाठी अवश्य जे गुण त्यांचें ज्ञान दुर्मिळ नाही. त्यांचें आचरण दुर्मिळ आहे, कठीण आहे. मनुष्य किंवा समाज किंवा राष्ट्र लहान किंवा मोठें ठरणें हें या आचरणावर अवलंबून आहे, एरवी हे गुण सामान्यच आहेत.

आपल्या भारतांतलेंच कार्यक्षमतेचें, अलौकिक कार्यक्षमतेचें एक उदाहरण सांगतों. त्यावरून याचा अर्थ स्पष्ट होईल. तें उदाहरण म्हणजे १९५२ व १९५७ सालीं भारतांत झालेल्या निवडणुका. हें प्रचंड कार्य अगदी नवीन होतें, त्याचा विस्तार फार मोठा होता, त्यांतील गुंतागुंतीमुळे तें अत्यंत बिकट झालेलें होतें. कोटचवधि मतदार, लक्षावधि केन्द्रें, त्यांतील कांही जंगलांत, कांही लांबच्या दऱ्याखोऱ्यांत. त्यासाठी लक्षावधि अधिकारी व कामगार तयार करावयाचे, कोटचवधि मतपत्रिका, पत्रकें छापावयाचीं. त्यांची चोरी होऊं द्यावयाची नाही. पेटचा तयार करावयाच्या. त्या जपून ठेवावयाच्या. मतदारांच्या याद्या छापावयाच्या, तत्पूर्वी घरोघरीं जाऊन निश्चित माहिती मिळवावयाची, ती तपासावयाची, खोटे मतदार शोधून काढावयाचे, त्यावरून निर्माण होणाऱ्या हजारो तक्रारींचा परामर्श घ्यावयाचा. हें सर्व झाल्यावर पत्रिका, पत्रकें, पेटचा इत्यादि सामान व माणसें नेमल्या दिवशीं, नेमल्या वेळीं, आसामच्या जंगलापासून मलबारच्या समुद्रापर्यंत लक्षावधि केन्द्रांवर पाठवावयाचीं. नंतर या मतांच्या मोजणीची व्यवस्था! या व्यापाच्या दर्शनानेच बुद्धीला घेरी येईल. पण हें काम सुकुमार सेन व त्यांचे अधिकारी यांनी इतकें चोख पार पाडलें की, त्याला जगाच्या इतिहासांत तोड नाही, आणि हें जगांतल्या पंडितांनी मान्य केलें आहे. खरोखरच ज्याला या कार्याच्या बिकटपणाची कल्पना आहे तो

त्यांतील यश पाहून विस्मित होऊन जातो. त्यामुळेच मग मनांत प्रश्न येतो की, हें कर्तृत्व इतरत्र म्हणजे समाजविकासयोजनांत व राष्ट्रीय उद्योग-धंद्यांत कां दिसू नये? त्याचें उत्तर सोपें आहे. पाऊसपाणी जसें दैवयोगा-वर अवलंबून आहे तसेंच आपल्या समाजाचें कर्तृत्वहि दैवावर अवलंबून आहे. पाऊस यदृच्छेने पडला तर त्या सालीं जशी थोडी सुबत्ता दिसते, त्याच-प्रमाणें यदृच्छेने कोठे कार्यक्षमता निर्माण झाली तर त्या क्षेत्रांत यश प्राप्त होतें. कार्यक्षमता निर्माण करण्याचे जे प्रयत्न होणें आवश्यक असतें तशा तऱ्हेचे प्रयत्न येथे होत नाहीत. मनुष्य थोर ध्येयनिष्ठेमुळे, समाजहिताच्या तळमळीमुळे कार्यक्षम होतो. या भावनांचा आपल्या देशांत लोप होत चालला आहे. धर्मनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा या निष्ठांतून या भावना निर्माण होत असतात. पण त्यांच्या संस्कारांची व्यवस्था तर इथे नाहीच; तर उलट आपले शास्त्ते त्याविषयी पूर्ण उदासीन आहेत. पण त्याचा विचार आपणांस पुढे करावयाचा आहे. सध्या आपल्या कार्यक्षमतेचा हिशेब घेऊन आपल्या विकासयोजना, आपले राष्ट्रीय उद्योगधंदे तिच्या अभावीं कसे अपयशी होत आहेत तें आपण पाहात आहों.

## आपले हिशेब !

कोणत्याहि कार्याच्या योजना आखतांना प्रारंभीं कांही हिशेब करावे लागतात, कांही गणित करावें लागतें. आपल्याजवळ भांडवल किती आहे, या विशिष्ट कार्याला खर्च किती लागेल, साधनसामग्री काय लागेल, ती पुरविणें शक्य होईल कीं नाही या सर्वांचा विचार करूनच पाऊल टाकावें लागतें. पण आपला एकंदर राष्ट्रीय कारभार पाहिला तर आपल्याला असले हिशेबच करतां येत नाहीत असें दिसून येतें. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व उद्योगपति ए. डी. श्राफ यांनी 'इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स' या संस्थेच्या विद्यमानें झालेल्या भाषणांत हें दाखवून दिलें आहे. त्यांचें म्हणणें असें की, एवढ्या सर्वंकष योजना यशस्वी होण्यासाठी बिनचूक आकडे गोळा करणाऱ्या यंत्रणेची आवश्यकता असते. तशी यंत्रणा आपल्या-कडे नाही, ही आपल्या योजनांतील मोठी उणीव आहे. यामुळे काय गोंधळ होतो त्याचीं दोन उदाहरणें श्री. श्राफ यांनी दिलीं आहेत. द्वितीय पंचवार्षिक

योजना आखतांना असा हिशेब धरला होता की, दरवर्षी ४० कोटींप्रमाणे ५ वर्षांत आपल्याला परकी गंगाजळींतून २०० कोटी रुपये काढावे लागतील. पण प्रत्यक्षांत पहिल्या दहा महिन्यांतच २०० कोटी रुपये काढावे लागले! परकी चलनाबाबत उत्पन्न होणाऱ्या अडचणींना बऱ्याच अंशीं आमचे चुकीचे अंदाज व हिशेब कारणीभूत असतात. दुसरें उदाहरण रेल्वेखात्यांतील आहे. रेल्वेमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडतांना सांगितलें की, सिमेंट, पोलाद, यांसारख्या आवश्यक वस्तूंच्या तुटवडयामुळे आम्हांस कित्येक नवीन विकासकार्यें करतां आलीं नाहीत. पहिल्या वर्षासाठी पुढे ठेवलेलें उद्दिष्ट गाठतां आलें नाही. याचा अर्थ काय? उद्दिष्ट ठरवितांना आपल्याला पोलाद, सिमेंट इत्यादि साहित्य किती लागेल, तें येथल्या कारखान्यांत मिळूं शकेल कीं नाही याचा नेमका हिशेब आपण करूं शकत नाही. इतकेंच नव्हे तर या साहित्याची वाहतूक करण्याचें सामर्थ्य रेल्वेला आहे कीं नाही याचाहि हिशेब आपल्याला नीट जमत नाही. पुष्कळ वेळां माल कारखान्यांत किंवा बंदरांत पडून असतो; पण वाहतूक होऊं न शकल्यामुळे तो इष्ट स्थळीं पोचत नाही. त्यामुळे इष्ट तो विकास होत नाही.

आपल्याला साधे हिशेब करतां येत नाहीत, हा काय प्रकार आहे, हें भारतीय नागरिकांना मोठें कोडें पडतें. पण अशा प्रकारच्या कोणत्याहि ऑफिसांत आपण जाऊन पाहिलें तर हें कोडें सहज उलगडतें. अनेक हिशेब ऑफिसांत बसून केलेले असतात. सर्व हिंदुस्थानच्या शेतींत ज्वारी, बाजरी, गहूं, तांदूळ यांचें किती पीक आलें याचा हिशेब करावयाचा तर गावोंगावच्या मामलेदारांनी खेडयांतून हिंडून माहिती गोळा केली पाहिजे, तिचा तक्ता केला पाहिजे व तो वरच्या अधिकाऱ्यांकडे धाडला पाहिजे. पुष्कळ वेळां अशी माहिती योग्य वेळीं आलेली नसते, आली असली तरी गहाळ झालेली असते, फायली सापडत नाहीत. दिल्लीहून तर निकडीचीं पत्रें येतात. मग ऑफिसांतले कारकून माहिती तयार करतात. यापुढली पायरी म्हणजे ही सर्व माहिती एकत्र करणें. लक्षावधि केंद्रांवरून गव्हाची माहिती येते, बाजरीची येते, तांदुळाची येते. यांतून गव्हाच्या सदरांतच गव्हाची व तांदुळाच्या सदरांतच तांदुळाची माहिती मांडणें अवश्य. पण हें किती अवघड आहे याची एस्. एस्. सी. बोर्डाच्या कारभारावरून कल्पना

येईल. विद्यार्थ्यांच्या नांवापुढे त्यांच्याच पेपरावरचे मार्क मांडणें व ते बरोबर मांडणें ही आपल्या दृष्टीने मोठी कलाच आहे. त्यांत मग आणखी पेपरांचे गठ्ठे गहाळ होणें, इकडचे तिकडे जाणें याची भर पडल्यावर एकंदर अंतिम चित्र कसें होत असेल याची कल्पना सहज येईल. ही झाली एका प्रांतांतली एका खात्याची गोष्ट. मग अखिल भारताचीं सगळीं राज्यें – त्यांतील गहूं, तांदूळ, बाजरी, ज्वारी, मका, ताग, ऊस हीं पिकें आणि पोलाद, सीमेंट, खतें, तेलें, तांबें, रबर इत्यादि अनंत पदार्थ यांचे हिशेब ! ते हजारो हातांतून, कागदांतून फिरत, रूपें पालटत, गिरक्या घेत दिल्लीला पोचणार. मग त्यांचें मूळ रूप व अंतिम रूप यांत किती मेळ असेल हें आपल्या सहज ध्यानीं येईल. अर्थात् निवडणुकीची यंत्रणा ज्यांनी उभारली त्यांना हें अशक्य नाही. पण अशी यंत्रणा येथे नाही हें खरें आहे.

## सरकारी अहवाल

सरकारी योजनांचें मूल्यमापन करण्यासाठी 'इव्हॅल्युएशन कमिटी', 'स्टडी टीम' असल्या समित्या नेहमी सरकार नेमीत असतें म्हणून वर सांगितलेंच आहे. त्यांचे कोणतेहि अहवाल काढून पाहिले तर त्यांत हीच टीका केलेली आढळून येते. योजनांची आखणी नीट झालेली नव्हती, प्रारंभीं हिशेब नीट मांडलेले नव्हते, खर्च किती येईल, उत्पन्नाची अपेक्षा काय याचा अंदाज केलेला नव्हता, हेंच प्रत्येक समिति म्हणत असते. आणखीहि एक तक्रार अनेक समित्यांनी केलेली आहे. मंत्रिमंडळें व जबाबदार अधिकारी मागितलेली माहिती नीट देत नाहीत, वेळेवर देत नाहीत, तपासून पाठवीत नाहीत, चूक आहे असें माहीत असलें तरी तशीच पाठवितात ! १९५८–५९ सालच्या एस्टिमेट कमिटीने तर सरकारने कोणती माहिती पुरविली नाही याची एक यादीच परिशिष्ट म्हणून जोडली आहे. एकंदर अठरा बाबतींत, अधिकाऱ्यांनी सहा सहा महिने आधी मागवूनहि, माहिती वेळेवर दिली नाही असें लोकसभेने नेमलेल्या एका मोठ्या समितीला उद्वेगून म्हणावें लागलें. यंत्रणा नाही याचा हा अर्थ आहे. नियोजन मंडळाने योजना आखल्या त्या वेळीं अर्थशास्त्रज्ञांचें जें सल्लागार मंडळ नेमलें होतें, त्याने योजनाकारांना निक्षून सांगितलें होतें की, सर्व गृहीत धरलेल्या गोष्टी, केलेले अंदाज बरोबर आहेत कीं नाही, वस्तुस्थितीशीं जुळतात कीं नाही,

तें तपासून पाहिलें पाहिजे. पण योजनेची शास्त्रशुद्धता कोणीं तपासली नाही. उद्दिष्टांक वस्तुनिष्ठ आहेत कीं नाही हें कोणीं पाहिलें नाही. सर्व अंदाज एकमेकांशीं सुसंगत आहेत कीं नाहीत याचा विचार केला नाही. पोलाद व सिमेंट किती लागेल याचा हिशेब करणें, त्याची तरतूद करणें, त्यासाठी वाहतुकीची व्यवस्था करणें हें सर्व अवश्य होतें, पण तें झालें नाही. (भारतीय नियोजनांतील नियोजन मंडळाचें स्थान – धनंजयराव गाडगीळ) असल्या बेहिशेबी सरदारी कारभारामुळे अंदाजापेक्षा दुप्पट खर्च, परदेशी चलनाची तूट, साहित्य वेळेवर न मिळणें, त्यांचा अजिवात तुटवडा पडणें आणि त्यामुळे सर्व गोंधळ होणें हें सर्व अटळ होऊन बसतें; आणि हें सर्व या गरीब देशांत! सध्या करांचें ओझें असह्य झालें आहे. पुढच्या पंच-वार्षिक योजनेंत आणखी तें वाढणार आहे; तें कशासाठी? तर भावी पिढीच्या कल्याणासाठी; पण दिलेल्या करांपैकी त्या पिढीपर्यंत कांही पोचेल का, अशी शंका जनतेच्या मनांत नित्य येत असते.

आपण सध्या समाजवादी समाजरचना करूं म्हणतों त्याचा एक ढोबळ अर्थ एवढाच दिसतो की, कारखाने; उद्योगधंदे यांचें राष्ट्रीयीकरण करायचें म्हणजे विमाकंपन्या सरकारने ताब्यांत घेतल्या तसे इतर उद्योगधंदे घ्याव-याचे व कांही स्वतःच नवीन चालू करावयाचे. पण हें सरकारने करावयाचें; म्हणजे कोणीं? तर सरकारी अधिकाऱ्यांनी. त्या अधिकाऱ्यांची वृत्ति काय असते तें वर सांगितलेंच आहे. रेल्वेचा कारभार सध्या सरकारच्याच ताब्यांत आहे. त्यासंबंधी सरकारी हिशेबनिसाने दिलेला अहवाल पाहा. रेल्वे अधिकाऱ्यांनी अडीच लक्ष रुपये खर्चून एक छपरी बांधली, पण तिचा अद्याप कांही उपयोग केलेला नाही. लोहमार्ग बांधण्यासाठी दहा वर्षांपूर्वी एक जागा घेतलेली आहे, अजून रस्ता बांधावयाचा कीं नाही तें ठरावयाचें आहे. इंजिनांचे सुटे भाग घ्यावयाचे होते, पण वेळेवर ऑर्डर न दिल्यामुळे १ लक्ष ७६ हजार रुपयांचें नुकसान झालें. कित्येक ठेकेदारांना करारापेक्षा जास्त पैसे दिले गेले. चोऱ्या व उधळमाधळ ही नित्याचीच आहे. (रेल्वे ऑडिट रिपोर्ट १९५७–५८) या अहवालावरून एकंदर कारभार व्यापारी पद्धतीने न चालतां सरदारी पद्धतीने चालतो असें दिसून येईल. खाजगी कारखानदार किंवा व्यापारी प्रत्येक पैन् पैचा हिशेब ठेवतो, पैशाचे दोन

पैसे झालेच पाहिजेत असें त्याचें धोरण असतें. पण सरकारी अधिकाऱ्यांना ही दक्षता बाळगण्याचें काय कारण? त्यांचा पगार चालूच राहतो. भांडवल म्हणून घातलेल्या पैशावर व्याजहि सुटलें नाही तरी त्यांचें नफा-नुकसान कांहीच नसतें. अशा स्थितींत राष्ट्रीयीकरण करणें कितपत हितावह होईल याचा आपणांस विचार केला पाहिजे.

समाजविकास योजनांचें मूल्यमापन करण्यासाठी ज्याप्रमाणे मूल्यमापन समित्यांसारख्या समित्या नेमलेल्या असतात, त्यांचप्रमाणे सार्वजनिक म्हणजेच सरकारी उद्योगधंदे (पब्लिक सेक्टर) व इतर असेच सरकारी व्यवहार यांचें मूल्यमापन करणे व त्यांचा हिशेब तपासणें यासाठी पब्लिक अकाउंटस् कमिटी, एस्टिमेट कमिटी अशा समित्या नेमलेल्या असतात. या भारताच्या लोकसभेने व राज्यांतल्या विधानसभांनी नेमलेल्या असतात. म्हणजे या सरकारी समित्याच असतात. त्यांचे अहवाल आपण पाहिले तर आपल्या सार्वजनिक म्हणजे सरकारी उद्योगधंद्यांचे – पब्लिक सेक्टरचे – कारभार वर वर्णिलेल्यांहून कांही निराळे नाहीत हें ध्यानांत येईल. हिराकूड योजना, दिल्ली रोड ट्रॅन्सपोर्ट ॲथॉरिटी, कोळशाच्या खाणी, तेथील कामगारांच्या घरांच्या योजना, प्रीफॅब्रिकेटेड हौसिंग फॅक्टरी, रेल्वेच्या कोळशाच्या खाणी, सिंद्री कारखाना, दामोदर व्हॅली हीं सर्व सरकारी खातीं आहेत. त्यांचीं कामें कशीं चाललीं आहेत तें पाहा. हिराकूड योजनेंत पैशाची मोठी अफरातफर झाली, एका अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे एका पुलाचा खर्च कांही लाखांनी वाढला, पण कोणालाहि शासन झालें नाही. (प. अ. क. अकरावा अहवाल जून १९५४) 'कोलमाइन्स् लेबर हौसिंग ॲन्ड जनरल वेल्फेअर फंड' यांवरील अधिकाऱ्यांकडे जीं कामें दिलीं होतीं तीं त्यांनी नीट केलीं नाहीत. त्यांनी प्रारंभीं कित्येक वर्षे कामगारांच्या घरांचा प्रश्न व त्यांची अर्थव्यवस्था यांचा विचारहि केला नाही. कामाची आखणी केली ती अत्यंत गचाळ केली. घरांना पाण्याची सोय, रस्त्यांची सोय केलीच नव्हती. मोठमोठ्या रकमा मात्र खर्ची पडत होत्या. पुढे घरें बांधलीं तीं अकरा वर्षे रिकामींच राहिलीं. १९४८ सालापर्यंत १५००० घरें बांधावीं असें ठरलें होतें, पण १९५८ पर्यंत ५५०० घरेंच फक्त बांधून झालीं. अशा रीतीने सर्व योजनाच सुरचित नव्हती. (प. अ. क. १२ वा

अहवाल एप्रिल १९५९). दिल्ली रोड ट्रॅन्सपोर्ट ॲथॉरिटीवरचा अहवाल (१९५४-५५) पाहा. कमिटीने तक्रार केली आहे की, मंत्रिमंडळ आम्हांला नीट माहितीच पुरवीत नाही. १९५४ सालीं जी माहिती देतात त्याच्या बरोबर उलट माहिती १९५५ सालीं देतात. हिशेब मागितले तर मिळत नाहीत, आणि या सालीं तर अधिकाऱ्यांनी कमालच केली. हिशेबनिसांनी जो अहवाल लिहिला त्यावर आपली मखलाशी करून मग तो लोकसभेपुढे मांडला! सभासदांनी त्यावर आक्षेप घेतला तेव्हा मंत्रिमहाशय उत्तर देते झाले की, ही गोष्ट नजरचुकीने झाली. प. अ. कमिटी म्हणते की, डी. आर. टी. चा कारभार व्यवस्थापकांना मुळीच भूषणावह नाही. कांही बसेस पडूनच असतात. त्यांची दुरुस्ती वेळेवर होत नाही. त्यामुळे रोज १२३ रु. चा तोटा झालेला आहे. बसेसच्या कारभारांत दरमैली खर्च रु. १-०-६ होतो, आणि उत्पन्नहि दर मैली रु. १-०-६ आहे. असें कां व्हावें याचा गेलीं चार वर्षें शोध चालू आहे!

हे पब्लिक अकाउंटस् कमिट्यांचे अहवाल झाले. आता एस्टिमेट कमिट्यांचे अहवाल पाहा. प. अ. कमिटी, इव्हॅल्युएशन कमिटी किंवा एस्टिमेट कमिटी यांच्यांत तांत्रिक काय फरक पडत असेल तेवढाच. बाकी या सर्व कमिट्या भारताच्या भिन्न क्षेत्रांतील सरकारी कारभाराची पाहणी व मूल्यमापन करण्यासाठी नेमलेल्या असतात आणि त्यांच्या आधारेंच आपण आपल्या कर्तृत्वाचा हिशेब घेत आहों. यांपैकी कोणत्याहि कमिटीचा अहवाल उघडून पाहिला तरी पानापानावर 'हा कारभार पाहून आम्हांला उद्वेग वाटतो,' 'असें कसें घडतें हें कळतच नाही,' 'हें सांगतांना आम्हांला मोठा खेद होतो,' 'हें अत्यंत दुःखदायक आहे' असे उद्गार सापडतात; आणि उद्वेग वाटावा असेच प्रकार सर्वत्र घडत आहेत. रूरकेला, भिलाई व दुर्गापूर येथील पोलाद कारखान्यांच्या कारभाराविषयी फेब्रुवारी १९५९ मध्ये एस्टिमेट कमिटीने दिलेला अहवाल पाहा. कमिटी म्हणते, या कारखान्यांच्या बाबतींत पूर्वयोजना नीट केलेली नव्हती. खर्चाचें अंदाजपत्रकहि काटेकोरपणें केलेलें नव्हतें, आणि आज अजूनहि खर्च व उत्पन्न यांचा रेखीव हिशेब केलेला नाही. कारखान्यासाठी जागा निवडली ती खडकाळ आहे, हें बांधकाम सुरू झाल्यावर ध्यानांत आलें, मग जागा बदलावी लागली.

त्यापायीं ३ कोटी रुपये फुकट गेले. लोखंडाच्या खाणीची यंत्रयोजना व कोल वॉशरीजचें बांधकाम हें कारखान्याच्या प्रारंभापासूनच सुरू व्हावयास हवें होतें. तें न झाल्यामुळे दरसाल ६८ लाख रुपये खर्च जास्त येतो. उत्पन्न झालेल्या पोलादाचें पुढे काय करावयाचें हें अजून ठरलेलें नाहीं. तें तसेंच पडून राहील अशी भीति वाटते. सल्लागारांशीं करारपत्रें केलीं तीं अत्यंत संदिग्ध, अस्पष्ट, त्यांच्या कामाचें स्वरूप निश्चित न करणारीं अशीं आहेत. त्यामुळे त्यांना २ कोटी रुपये, २·५ कोटी रुपये फी देऊनहि मध्येच ते सांगतात की, कराराप्रमाणे हें काम आमचें नाहीं. त्यामुळे ६५ लाख रु. खर्च जास्त आला. त्यांनी जो सल्ला द्यावयाचा त्यांतला बराचसा भाग सांगण्यासाठी दुसरे निराळे अधिकारी नेमलेले असतात. मग यांनाहि फी व त्यांनाहि फी असा दुहेरी खर्च चालू आहे. मूळ योजनेंत खर्चाचा अंदाज ३५३ कोटी रु. होता. आता तो ४३९ कोटी रु. आहे, आणि हाहि आकडा अखेरचा नाही. यामुळे अर्थातच पोलादाच्या किमतींत वाढ होणारच. १० लाख टनाला ९० कोटी रुपये असा पहिला हिशेब होता. आता १३० ते १८० कोटी रुपये पडणार आहेत. पण एवढ्यावरच हें थांबेल असें नाही. कारण योजनेच्या आखणीप्रमाणे ठरलेल्या वेगाने काम चालू नाही. प्रत्येक टप्प्याला ६ महिने तरी उशीर लागेल असा हिशेब आहे. अर्थात् त्यापायी भुर्दंड पडणारच. किती? रोज दहा लाख रुपये! आणि हें सर्व जवळ जवळ १५ कोटी रुपये फी देऊन आणलेल्या परदेशी सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली चाललेलें आहे. कमिटीने स्वच्छ म्हटलें आहे की, एवढी फी देऊन हे सल्लागार आणण्याची मुळीच जरुरी नव्हती. पण सर्वांत वाईट व दुःखद गोष्ट ही की, या परकी तज्ज्ञांच्या हाताखाली भारतीय तंत्रज्ञ तयार करण्याची सरकारने मुळीच सोय केलेली नाही. त्यामुळे आपण नेहमी परतंत्रच राहणार अशी भीति आहे.

आणखी एक आक्षेपार्ह गोष्ट अशी की, जर्मनी, रशिया, ब्रिटन यांशीं करार केले ते दीर्घ मुदतीचे – ४ वर्षांचे, ६ वर्षांचे – असे आहेत. म्हणजे वर सांगितलेलें नुकसान इतकीं वर्षे होत राहणार आहे; आणि इतकीं वर्षे भारतीयांना संधि नाही. भारतीयांना संधि देण्याच्या बाबतींत सरकार किती उदासीन आहे तें जर्मनीहून आणविलेल्या सुतारांच्या सुप्रसिद्ध उदाहरणावरून दिसून येतें. चांगले कसबी सुतारहि भारतांत सरकारला मिळाले

नाहीत, म्हणून ते जर्मनीहून आणले. त्याच्या पायीं वीस लाख रुपये खर्च आला. कमिटीने विचारलें, असले सुतार भारतांत मिळण्याची शक्यता नव्हती का? मंत्री महाशय उत्तरले, 'कदाचित् मिळाले असते, पण त्यांना हुडकून काढण्याइतका वेळ नव्हता, कामाची घाई होती, म्हणून जर्मनीहून आणविले.'

संरक्षण खात्यासंबंधीचा एस्टिमेट कमिटीचा अहवाल (प्रकाशन–मार्च १९५७–अहवाल ५६ वा) असाच उद्वेगजनक आहे. इकडे गरीब नागरिकांना पोटाला गोळाभर अन्न मिळत नाही आणि तिकडे कोटी कोटी रुपयांचा माल फुकट जातो! कमिटीने हेंच म्हटलें आहे. लष्करी खात्यांत अनंत वस्तु, अनंत अवजारें, गाडे, तारा, जिप्स हा सर्व माल आज वर्षांनुवर्षें उघड्यावर पडल्यामुळे गंजून, सडून, कुजून, फुकट जात आहे. कमिटी म्हणते याची किंमत कोटींनीच करावी लागेल आणि अजूनहि या मालासाठी छपरें बांधण्याची सोय झालेली नाही व पुढील वर्षांत होईल अशी आशा नाही. उघड्यावर पडलेला म्हणून हा माल फुकट जातो, पण अन्नधान्य व वैद्यकीय उपकरणें व औषधें हीं कांही उघड्यावर नसतात. पण दरसाल ७५ टन तरी धान्य व लाख दोन लाख रुपयांचीं औषधें अशीं फुकट जातात. इतकें अन्न केवळ कुजून जातें!

माल कोणीं किती साठवावा याला संरक्षणखात्यांत व रेल्वे खात्यांत सीमाच नाही. माल उधार मागविला जातो, एकाने मागविला त्याचा दुसऱ्याला पत्ता नसतो, टेंडर मान्य करतांना तें नीट तपासलेलें नसतें, त्यामुळे वाटेल तो माल येतो. त्या हिशेबाप्रमाणे माल आला आहे कीं नाही याची कोणालाहि दखल नसते, त्याच्यावर कोणाचीहि देखभाल नसते. रेल्वे स्टोअर्स इन्क्वायरी कमिटीने तर लिहिलें आहे की, आणखी शंभर किंवा दोनशे वर्षें तरी पुरेल इतका माल कित्येक कोठ्यांमध्ये रेल्वे अधिकाऱ्यांनी साठविला आहे. तेंच संरक्षण खात्याच्या बाबतींत आहे असें कमिटी म्हणते; आणि सर्व अंदाधुंदी असल्यामुळे दरसाल जादा माल झाला म्हणून लाखाचा माल हजाराला काढून टाकणें हाहि एक धोरणाचा भाग होऊन बसला आहे. सन १९५१ ते ५५ या पांच वर्षांत १२८ कोटी रुपयांचा माल जादा – सरप्लस – ठरवून १९ कोटींला फुंकून टाकण्यांत आला.

## राष्ट्रीयीकरण

आपण उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करावें असें मनांत आणलें आहे. त्यांतून कोणता अर्थ वा अनर्थ निर्माण होईल हें यावरून सहज ध्यानांत येईल. पब्लिक सेक्टर – राष्ट्रीय उद्योगधंद्यांवर – होणाऱ्या टीकेबद्दल पंडित जवाहरलाल एकदा म्हणाले की, खाजगी भांडवली उद्योगधंद्यांत हेच प्रकार चालू असतात. त्यांवर लोकसभेंत टीका होत नाही एवढेंच. लोकसभेंत त्यांचे अहवाल मांडले जात नाहीत म्हणून टीका होत नाही असें म्हणून राष्ट्रीय उद्योगधंदे हे खाजगी भांडवलाने चालविलेल्या उद्योगधंद्यांइतकेच कार्यक्षम आहेत असा त्यांनी निर्वाळा दिला. म्हणजे वर सांगितलेल्या नाना प्रकारच्या सरकारी कमिट्यांनी राष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या संचालकांचे गहाळ-पणा, बेजबाबदार वृत्ति, अक्षमता इत्यादि जे दोष दाखविले तेच पंडितजींना अमान्य आहेत असें नाही, तर खाजगी उद्योगधंद्यांतहि तेंच चालतें मग यांनाच कां धारेवर धरावें, असें त्यांचें म्हणणें आहे. पण यांत एक हेत्वाभास आहे. राष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या चालकांचें म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांचें फक्त टीकेवरच भागतें. यापेक्षा त्यांना जास्त कांहीच भोगावें लागत नाही, त्यांनी कोटीकोटींची नासाडी केली, कारखान्यांत फायदा झाला नाही, उत्पन्न झालेला माल महाग झाल्यामुळे खपला नाही, तरी त्यांना कसलीच शिक्षा होत नाही. कारण त्यांच्या मागे सरकारचा म्हणजे लोकांचा सर्व खजिना उभा असतो; पण असें खाजगी उद्योगधंद्यांचें नाही. विमा कॉर्पोरेशन, दामोदर व्हॅली, रुरकेला येथल्यासारखे प्रकार त्यांनी केले तर त्यांना एकदम मृत्यूची शिक्षा मिळेल म्हणजे त्यांचें दिवाळें निघेल, त्यांना जीवनांतून उठावें लागेल, आणि असा दंड भोगावा लागेल ही भीति असल्यामुळेच ते सरकारी अधिकाऱ्यांपेक्षा दसपट सावध, दसपट जागरूक असतात. कार्यक्षम माणसेंच ते निवडतात, तीं नालायक ठरलीं तर त्यांना काढून टाकतात काटकसरीचें धोरण ठेवतात, पैन् पैचा हिशेब ठेवतात, आणि उद्योग फायद्यांत चाललाच पाहिजे यासाठी सर्वस्व पणाला लावतात. कारण त्यांत त्यांचा स्वार्थ असतो, त्यांना दिवाळें वाजण्याची भीति असते. संचालक, व्यवस्थापक, तंत्रज्ञ हीं माणसें दोन्हीकडे सारखींच असतात. सरकारी

कशामुळे झालें? राष्ट्रीयीकरणावरील अंधश्रद्धेमुळे! राष्ट्रीय उद्योगधंदे सुद्धा खाजगी उद्योगधंदे ज्या व्यापारी तत्त्वावर चालतात, त्याच तत्त्वावर चालविले पाहिजेत. नफा-तोटा येथेहि जागरूकतेने पाहिला पाहिजे. पण अॅटली साहेबांच्या मजूर सरकारने ही दृष्टि ठेवली नाही. ते लोक समाजवादी होते. राष्ट्रीयीकरण हें त्यांचें तत्त्वज्ञान होतें. त्यांचें अपयश म्हणजे त्यांचें अपयश होतें. त्यामुळे सरकारी उद्योगधंद्यांना सावरण्यासाठी त्यांनी इंग्लंडचा खजिना वाटेल तसा उपसला. केल्फ कोहन म्हणतात, यामुळे या उद्योगधंद्यांची अपरिमित हानि झाली. टीकेची त्यांनी पर्वा केली नाही. आर्थिक व्यवहाराकडे लक्ष पुरविलें नाही. मुख्य गिऱ्हाईक म्हणजे जनता तिच्याशीं बेजबाबदार वृत्तीने ते वागले. त्यामुळे ब्रिटिश उद्योगधंद्यांना फार मोठा धोका निर्माण झाला आहे. यावर उपाय सांगतांना ग्रंथकार म्हणतात, —हा सर्व मानवी कर्तृत्वाचा प्रश्न आहे. कार्यक्षमता, उत्साह, कर्तव्यबुद्धि, दूरदृष्टि, तडफ, स्वयंप्रेरणा हे गुण नसतील तर परिस्थिति सुधारण्याची कसलीहि आशा नाही. (उक्त ग्रंथ – प्रकरणें ३ व १६)

हे गुण आपल्या लोकांत निर्माण करावयाचे असतील तर आपली सर्व सरकारी कार्यपद्धतिच बदलली पाहिजे. सध्यांची आपली कारभारपद्धतिच अशी आहे की, येथे कार्यक्षमता निर्माण होणें सर्वथा अशक्य आहे. कोणत्याहि कामाची निश्चित जबाबदारी अमुक एका अधिकाऱ्यावर आहे, ती पार पाडली तर त्याला बढती मिळेल, न पडली तर त्याला शिक्षा होईल अशी व्यवस्थाच येथे नाही. विमा कार्पोरेशनच्या कारभाराचें उदाहरण ताजेंच आहे. मुंदडा प्रकरणाला जबाबदार कोण हें कोणाला ठरवितांच येत नाही. त्यामुळे कोटयवधि रुपयांची नुकसानी होऊनहि सगळेच निर्दोष! वर सांगितलेल्या कमिटयांच्या अहवालांत सारखी ही तक्रार केलेली दिसून येते. करारपत्रांत ढिलाई असते. लाखो रु. ठेकेदारांना चुकून जास्त दिले जातात. कमी माल किंवा भलताच माल स्वीकारला जातो. याला जबाबदार कोण म्हणून कमिटी विचारते. त्यावर तें सांगतां येणार नाही अशीं उत्तरें मिळतात. एकतर यामागे राजकारण असतें हें उघडच आहे. त्याचें विवेचन मागे केलेंच आहे. पण कार्यपद्धतिहि या अनर्थाला तितकीच जबाबदार आहे. कांही माणसें राजकारणांत अगदी उलटया काळजाचीं असतात. पण सर्व

माणसें – सर्व सरकारी खात्यांतलीं खालपासून वरपर्यंतचीं सर्व माणसें – अशीं असतात हें म्हणणें सयुक्तिक होणार नाही. सरकारी खात्याचे अहवाल वाचले म्हणजे असें वाटूं लागतें हें खरें. हे सर्व अधिकारी उलटया काळजाचे, प्रेताच्या टाळूवरचें लोणी खाणारे, माणुसकीला पारखे झालेले असे आहेत असें वाटतें. पण ही यंत्रणाच अशी आहे की, त्यांत कोणीहि असाच होईल. याविषयी रा. कृ. पाटील यांनी चांगलें विवेचन केलें आहे. ते म्हणतात, 'आमच्या शासनापुढे लक्ष्य (ऑब्जेक्टिव्ह) नाही. म्हणूनच शासनांत जबाबदारी नाही. आजच्या शासनाची परिस्थितिच अशी आहे की, कल्पने-प्रमाणें सुधार झाला नाही किंवा कांही बिघडलें तर त्याची निश्चित जबाब-दारी कोणावरच टाकतां येत नाही. ही जबाबदारी वरपासून खालपर्यंत राहण्याकरता व तिचें निश्चित विभाजन होण्याकरता शासनाच्या प्रत्येक अंगाने कांही निश्चित लक्ष्यें आपल्यासमोर ठेविलीं पाहिजेत...... आज तर पगार घेऊन कसल्याहि तऱ्हेची लक्ष्यपूर्तीची जबाबदारी आमच्या अधिकारी-वर्गावर नसल्यामुळे त्यांना केव्हाहि अंग झटकतां येतें, ही दुःखद समस्या पदोपदीं नजरेला येत आहे. ...... हें जर योग्य तऱ्हेने व्हावयाचें असेल तर सरकारी नोकरांत जास्त शिस्त, कर्तव्याची जास्त जाणीव व कामांत चुकार-पणा केल्यास जबर शिक्षा मिळणें ही भीति, या तिन्ही बाबींचा आजच्या-पेक्षां जास्त प्रमाणांत प्रादुर्भाव झाल्यावाचून लक्ष्यपूर्ति करूं शकेल असें शासन निर्माण होणें शक्य नाही. ( भारत व चीन—पृ. ११३ ) आजचीं सरकारी खातीं म्हणजे उलटया काळजाचीं माणसें निर्माण करण्याचीं केंद्रें झालीं आहेत. अधिकार मोठा, पैशाचें विलोभन मोठें, निश्चित जबाबदारी नाही आणि वाटेल तें नुकसान झालें तरी शिक्षा नाही ही निश्चिति. यांतहि कांही माणसें उत्तम काम करून दाखवितील. पण तितकी मोठी सत्ता मात्र नाही. एका गावीं सरकारी धान्याचें कोठार होतें. वादळी पावसांत त्यावरील पत्रे उडून गेले. खंडोगणती धान्य भिजूं लागलें. आता पत्रे पुन्हा ठोकले पाहिजेत, पण त्याच्या खर्चास मंजुरी पाहिजे. ती वरून आली पाहिजे. तिला कालगत लागणार. कांही मर्यादेपर्यंत स्थानिक अधिकारी खर्च करूं शकतो, पण त्यापलीकडे खर्च गेला तर ? त्याला खर्चाची मंजुरी पाहिजे. शिवाय तें कंत्राट कोणाला द्यावयाचें हें ठरविण्याचा अधिकार स्थानिक

माणसाला नसतो, कारण त्यांत राजकारण असतें. म्हणून शेवटीं तो धान्य भिजतांना दिसत असूनहि स्वस्थ बसतो. माणसें हृदयशून्य होतात तीं यामुळे. जाऊं दे, मरूं दे, मी काय करणार ही वृत्ति प्रत्येक अधिकाऱ्याची बनत जाते. संरक्षणखात्यांत कोटीकोटीचा माल कुजून जातो. आगगाड्यांचे रोज अपघात होतात. इस्पितळांत औषधपाणी, शुश्रूषा न मिळाल्यामुळे रोगी तडफडून मरतात. हें सर्व डोळ्यांदेखत होत असतांना त्याचें कांहीच वाटूं नये इतके भारतीय नागरिक मुळांतच हृदयशून्य आहेत ? इतके ते अक्षम, नालायक आहेत? असें खरेंच असेल तर येथे लोकशाही ही श्रेष्ठ संस्कृतिच काय, पण अत्यंत खालच्या पातळीवरची रानटी संस्कृतिहि निर्माण होणें शक्य नाही. पण तसें वाटत नाही. आपली सरकारी कार्यपद्धतिच अशी आहे की, येथे माणसें हृदयशून्य झालींच पाहिजेत, अक्षम ठरलींच पाहिजेत. जबाबदारीचें विभाजन नाही, निश्चिति नाही आणि शिक्षा होईल हें भय नाही. लोभाला मात्र अवसर मोठा. अनेक ठिकाणीं तर वरपासून खालपर्यंत अशी सांखळी लागलेली असते की, मधल्या माणसाला पैसे न खाणें शक्यच नसतें. तो प्रामाणिक राहूं लागला तर त्याची नोकरी जाईल. अशा स्थितींत माणसाचें काय होणार ?

गेल्या वर्षी बालिया–अलाहाबाद येथें एक अत्यंत खेदजनक प्रकार घडला आणि असे अनेक ठिकाणीं घडत आहेत. सकाळीं ८ ला एक मनुष्य जखमी झाला. पण पोलिसांनी संध्याकाळीं ६॥ पर्यंत त्याला इस्पितळांत नेलें नाही. तेथेहि साडेसातपर्यंत अधिकाऱ्यांनी त्याला प्रवेश दिला नाही. प्रवेश मिळाल्यावर वीसच मिनिटांनी तो मनुष्य मेला. ही गोष्ट अत्यंत लांछनास्पद, भारतीयांच्या माणुसकीला काळिमा लावणारी अशी झाली यांत शंका नाही. त्या अधिकाऱ्यांचा अलाहाबाद हायकोर्टांत न्या. मू. ढवण यांनी कडक शब्दांत निषेध केला तें योग्यच झालें. कोणत्याहि सबबीवर हें केव्हाहि घडतां कामा नये हें खरें; पण या वेळीं पुन्हा वरचाच प्रश्न मनांत येतो. भारतांतला मानव, वैद्यकीय पेशा घेतलेला मानव, इतका हीन, इतका अधम झाला आहे काय ? आणि तो सर्व प्रांतांत, सर्व शहरांत? कारण हल्ली बहुतेक सर्व इस्पितळांची हीच कहाणी आहे. तेथे माणसें नसून कोणी मानवेतर प्राणी, हिंस्र प्राणी असावेत असें वाटण्याइतक्या त्या हकीकती उद्वेगजनक आहेत,

पण कांही निर्णय करण्यापूर्वी पुढील माहिती पाहावी. मध्यप्रदेशांत ५७ इस्पितळांत डॉक्टरच नेमलेले नाहीत. आंध्र प्रदेशांतल्या एका जिल्ह्यांत १२ इस्पितळांत डॉक्टर नाहीत. रिसोर्सेस अँड रिट्रेंचमेंट कमिटीचा पंजाब-विषयीचा अहवाल पाहा. शंभर इस्पितळांत तेथे डॉक्टर नाहीत. अनेक इस्पि-तळांत उपकरणें नाहीत. सरकारी वैद्यकी संस्था म्हणजे राजकारणी कार-स्थानाचे अड्डे झाले आहेत. राज्याचे आरोग्यमंत्री तीन वेळां बदलले गेले. त्यामुळे धोरणें सारखीं बदलतात. आरोग्य खातें हें जातीयता, गटबाजी व भ्रष्टता यांनी सडून गेलें आहे. त्यांत बुद्धि व कर्तृत्व यांचा उपयोग नाही. जात, नातें यांनाच सर्वत्र महत्त्व आहे! (टाइम्स : १६ मे १९५९) अशा स्थितींत माणूस श्रद्धाशून्य, हृदयशून्य झाला तर त्याची निर्भर्त्सना करतांना (ती केली पाहिजे यांत शंका नाही. माणुसकी सोडणें हें केव्हाहि क्षम्य नाही.) आपण खोलवर विचार केला पाहिजे, आणि तसा विचार केला म्हणजे हें ध्यानांत येईल की, आपली सरकारी कारभारपद्धतिच याला जबाब-दार आहे. या यंत्रणेंत बसल्यावर माणुसकी टिकवून धरणें हें फार अवघड होऊन बसतें. माणसांची कार्यक्षमता विकास पावते ती निश्चित जबाब-दारीच्या जाणिवेमुळे, कर्तृत्वाचें चीज होईल, गुणांना योग्य स्थान मिळेल या शाश्वतीमुळे आणि प्रमाद घडला तर शिक्षा होईल या भीतीमुळे. आपल्या यंत्रणेंत या सर्वांचा अभाव आहे. तेथे माणसाच्या भावना बोथट होतात, वृत्ति बधीर होतात, ईर्षा नष्ट होते, मन निराश होतें आणि तो या यंत्रणेंतला एक खिळा किंवा स्क्रू होऊन बसतो. यंत्रचालकाच्या भूमिकेवर त्याला आरूढ होतांच येत नाही. मग कार्यक्षमता कशी जोपासावी ?

## तरुण रक्त

दण्डसत्तेचें आव्हान स्वीकारण्याचें सामर्थ्य भारताच्या ठायीं आहे काय याचा विचार आपण करीत आहों. आपलें कृषि–उत्पादन, औद्योगिक उत्पादन यांचे हिशेब आपण पाहिले. आपल्या विकास योजनांचीं फलितें काय आहेत हें सरकारी समित्यांनीच आपल्याला सांगितलें; आणि या सर्व राष्ट्रीय प्रपंचाच्या मागे मानवी कर्तृत्व काय दर्जाचें आहे याचाहि विचार आपण केला. या सर्वांत अत्यंत निराशाजनक स्थिति आहे हें अत्यंत कटु असें

सत्य आहे. यानंतर आणखी एका इतक्याच मोठ्या गंभीर समस्येचा विचार करून हें प्रकरण संपवावयाचें आहे. राष्ट्रांतलें तरुण रक्त हें राष्ट्राचें मोठें सामर्थ्य आहे. धाडस, साहस, निष्ठा या गुणांनी तरुण रक्त नेहमीच संपन्न असतें. असें हें तरुण रक्त, ही शक्तीची, सामर्थ्याची देवता, काँग्रेसने उभारलेल्या प्रचंड योजनांच्या मागे उत्साहाने उभी आहे काय, हें पाहणें अवश्य आहे. हें सामर्थ्य काँग्रेसच्या मागे उभें नसेल तर आपल्या राष्ट्रीय सामर्थ्यांत फार मोठी उणीव आहे. राष्ट्रालाच वार्धक्य, वैक्लव्य आल्याचें तें मोठें लक्षण आहे असा त्याचा अर्थ होईल. म्हणून हा तपास अवश्य केला पाहिजे.

आज भारतांत एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न चर्चिला जात आहे. 'पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर कोण?' हा तो प्रश्न होय. आणि या प्रश्नाची चर्चा करतांनाच काँग्रेसश्रेष्ठी—स्वतः पंडितजीसुद्धा—एकमुखाने सांगत आहेत की, काँग्रेसमध्ये तरुण रक्त येत नाही. 'नेहरूंच्या नंतर कोण?' ही समस्या निर्माण झाली ती त्यामुळेच झाली आहे. वास्तविक लोकशाहीचें लक्षणच हें की, त्या समाजव्यवस्थेंत कर्त्या पुरुषांची अखंड मालिकाच निर्माण होत राहिली पाहिजे. नव्या दण्डसत्तांनी आपल्या पद्धतीने हा प्रश्न सोडविला आहे. कोटीकोटींच्या त्यांच्या संघटना असतात. त्यांतून तरुण स्त्री-पुरुषांना सर्व प्रकारचें शिक्षण देण्याची अहोरात्र काळजी घेण्यांत येते. त्यांच्यावर जबाबदारीहि टाकली जाते व त्यांना धारेवरहि धरलें जातें. पण राष्ट्रनिष्ठा, मार्क्सचें तत्त्वज्ञान, सर्व प्रकारचें विज्ञान, नव्या जगाचा इतिहास, मानसशास्त्र, प्रचारतंत्र या सर्वांचें सशास्त्र अध्ययनहि त्यांच्याकडून करून घेतलें जातें; आणि यांतून राष्ट्राला कर्ते तरुण पुरुष सारखे उपलब्ध होत असतात. आपली लोकशाहीवर निष्ठा आहे, आणि त्या व्यवस्थेंत तर क्रांतीनंतर सर्व बाजूंनी तरुण कर्तृत्व बहरून यावयास पाहिजे होतें; पण तसें झालें नाही. उलट तरुण रक्त काँग्रेसमध्ये येत नाही असे निराशेचे उद्गार काँग्रेसश्रेष्ठींना काढावे लागतात. अलीकडेच आपले राष्ट्रपति डॉ. राजेन्द्रप्रसाद म्हणाले की, "इतक्या वार्धक्यांत मी या मोठ्या पदावर अजून कां बसून आहे? याचें उत्तर असें की या पदावर येण्याजोगा कोणी तरुण पुढे येत नाही. तसा कोणी येत असेल तर ही जागा आत्ता खाली करण्यास मी तयार आहें." पण पंडितजींच्या जागीं येण्याजोगा जसा कोणी

नाही तसा राष्ट्रपतींच्या जागीं येण्याजोगाहि कोणी नाही. भावार्थ असा की, काँग्रेसचें कर्तृत्व वृद्ध झालें आहे, पण ती धुरा वाहण्यास समर्थ असें तरुण कर्तृत्व तेथे येत नाही.

## लोकशाहीची विस्मृति

असें कां व्हावें? याचें उत्तर असें की, दण्डसत्तेच्या पद्धतीचा आपणांस अवलंब करावयाचा नाही; आणि लोकशाहीच्या उच्च तत्त्वांचा आपणांस विसर पडलेला आहे. सत्ता व धन यांच्या लोभामुळें काँग्रेस धर्महीन झाली, चारित्र्यहीन झाली, एवढेंच नव्हे तर लोकशाहीचें मूळ महातत्त्वच ती विसरली. अत्यंत तीव्र अशा मतभेदालाहि अवसर दिला पाहिजे. इतकेंच नव्हे तर सर्व प्रकारच्या प्रामाणिक मतभेदांची मोठ्या सावधगिरीने जोपासना केली पाहिजे, संघटनेंतल्या प्रत्येक व्यक्तीच्या विवेकाचा मान श्रेष्ठींनी राखला पाहिजे, हें धोरण लोकशाहीच्या प्रगतीला अत्यंत अवश्य आहे. आपल्याइतकेंच दुसऱ्याचें मत बरोबर असूं शकतें हें जाणणें आणि त्याचा आपल्या मताइतकाच आदर करणें हें तत्त्व सत्ताधारी विसरले की, लोकशाहीचा पायाच ढासळून पडतो. प्रत्यक्ष ज्यांना राज्यकारभार करावयाचा आहे त्यांनी तो आपल्या मताप्रमाणेच करावा हें निश्चित. पण आपल्या संघटनेंत, आपल्या पक्षांत अत्यंत निःस्पृह रामशास्त्री सन्मानाने ठेवून घेणें अवश्य, हेंहि तितकेंच निश्चित आहे. काँग्रेसच्या नेत्यांना हातीं सत्ता येतांच या महातत्त्वाची विस्मृति झाली; आणि महात्माजींचा दुःखद अंत झाल्यापासून चारपांच महिन्यांच्या आंतच त्यांनी विरोधी मतप्रणालीला काँग्रेसमध्ये वाव द्यावयाचा नाही असें ठरवून त्या वेळच्या समाजवादी लोकांना बाहेर काढलें. काँग्रेस धर्महीन होऊं नये, चारित्र्यहीन होऊं नये, भ्रष्ट होऊं नये हें पंडितजी, राजेन्द्रबाबू, वल्लभभाई यांना मान्य होतें आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ती होऊं लागतांच त्यांनी अत्यंत कठोर शब्दांत आपल्या अनुयायांवर टीका केली; पण तात्त्विक मतभेदाला आपण अवसर दिला पाहिजे, नाहीतर तरुण रक्त काँग्रेसमध्ये राहणार नाही याची जाणीव मात्र या थोर पुढाऱ्यांनी ठेवली नाहीं, आणि एकजात सर्व, भिन्न मतांची हकालपट्टी केली. त्यानंतर

काँग्रेसच्या सावटाखाली तरुण कर्तृत्व वाढीस लागणें हें अशक्यच होऊन बसलें. त्यामुळेच आज 'नेहरूनंतर कोण' अशी गंभीर समस्या निर्माण होऊन बसली आहे.

कुऱ्हाडीचा एक घाव घालून आपल्या मतांहून भिन्न असलेल्या ज्या विचारप्रणालींचा नेहरू-पटेलांनी नाश केला त्यांची जपणूक करण्यासाठीं लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांनी आटापिटा केला होता. वाटेल ते अपमान सहन केले होते. स्वराज्य पक्षांतील मोतीलाल नेहरू, जयकर, केळकर, मालवीय यांचे वाटेल ते प्रहार महात्माजींनी सोसले, पण त्यांनी काँग्रेसमधून फुटून जाऊं नये म्हणून विश्वप्रयत्न केले. त्यांना सही केलेला कोरा कागद देऊन आपण बाजूला होण्याची तयारीहि दर्शविली. पंडित नेहरू, जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, वल्लभभाई, विठ्ठलभाई यांच्याविषयीहि त्यांचें तेंच धोरण होतें. नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रांत व जयप्रकाशांनी आपल्या 'समाजवादच कां?' या पुस्तकांत महात्माजींवर वाटेल ती कडक टीका केली आहे, हें सर्वविश्रुतच आहे. पण यांना, सर्व सामर्थ्य हातीं असूनहि, हाकलण्याचा विचार महात्माजींच्या मनांतहि आला नाही. उलट त्यांच्याच हातीं काँग्रेसचीं सूत्रें द्यावीं असा त्यांनी आग्रह धरला. नेहरूंच्या नंतर नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण यांना काँग्रेसचे अध्यक्ष करावें अशी सूचना त्यांनी केली होती, आणि तात्त्विक कारण देऊन ती सूचना केली होती. भिन्न मतप्रणालीला अवसर दिला पाहिजे, नाहीतर आपली स्थिति साचलेल्या पाण्यासारखी किंवा बंद केलेल्या खोलीप्रमाणे होईल, मग व्यक्तित्व गुदमरून जाईल असें त्यांनी लिहिलें होतें. लोकमान्यांनीहि आपल्या-भोवती माणसें अशींच संभाळलीं होतीं. १९१७ सालानंतर महात्माजींशीं त्यांचा तीव्र मतभेद झाला होता, पण यापुढचा नेता हाच आहे असें त्यांनी आपल्या अनुयायांना लेखी कळविलें होतें. या दोन महापुरुषांनी आपल्या विराटरूपाच्या सान्निध्यांत अनेक भिन्न विचारप्रणालींची वाढ सुखाने होऊं दिली, इतकेंच नव्हे तर या रोप्यांचें संवर्धन करण्याचेंच धोरण ठेवलें. तसें त्यांनी केलें नसतें तर टिळकांनंतर कोण? महात्माजींच्या नंतर कोण? असे प्रश्न तेव्हाच निर्माण झाले असते. पण आजच्या प्रौढ पिढीच्या लोकांनी महात्माजींच्यानंतर कोण, असा प्रश्न आपल्या स्वप्नांत तरी आला होता

काय, तें आठवून पाहावें. आलाच नव्हता. पंडित जवाहरलालजी आहेत, वल्लभभाई आहेत, सुभाषचंद्रजी आहेत, राजेन्द्रबाबू आहेत, राजाजी आहेत, कोणीहि ही धुरा खांद्यावर घेईल असा विश्वास भारताला त्या वेळीं वाटत होता आणि तो विश्वास सार्थ होता, हें या थोर पुरुषांनी पुढे दाखवूनहि दिलें. पण टिळक, महात्माजींचें हें उदार धोरण, आपल्या सान्निध्यांत अत्यंत विरोधी प्रणालींना विकसूं देण्याची ही लोकशाही वृत्ति, त्यांनी स्वतः मात्र जोपासली नाही. महात्माजींच्या बरोबरच तिचा अंत झाला. भिन्न विचार-सरणी, भिन्न मतप्रणाली या त्यांनी एका घावांत छिन्न करून टाकल्या. याचें गमक म्हणून एक साधा प्रश्न आपण मनाला विचारून पाहावा. मोतीलाल, जवाहरलाल, वल्लभभाई, विठ्ठलभाई, जयप्रकाश, नरेंद्र देव हे महात्माजींच्या-वर ते जिवंत असतांना जितकी कठोर, निःस्पृह टीका करीत असत तशी पंडितजींच्यावर टीका करणारा रामशास्त्री आज काँग्रेसमध्ये कोण आहे ? एकहि नाही. औषधालासुद्धा एकहि नाही. तो तेथे राहूं शकणार नाही. असे सर्व लोक आज काँग्रेस सोडून गेले आहेत. त्यांना काँग्रेस सोडणें सध्याच्या श्रेष्ठींनी भाग पाडलें आहे. नागपूरला सहकारी शेतीचा ठराव झाल्यावर पंडित नेहरू व श्रीमतो इंदिरा गांधी यांनी एकदम जाहीर केलें की, ज्यांना हा ठराव मान्य नसेल त्यांनी काँग्रेस सोडून जावें! तुम्ही काँग्रेस सोशॅलिस्ट आहांत, बाहेर व्हा. तुम्ही संयुक्त महाराष्ट्रवादी आहांत, काळें करा. तुम्ही सहकारी शेतीला विरोध करतां, निघा येथून! काँग्रेसमध्ये धर्महीन, चारित्र्यहीन लोक चालतात, सत्तालोभी व स्वार्थी लोक चालतात, गटबाजी करून काँग्रेस चिरफळून टाकणारे लोक चालतात; पण तात्त्विक मतभेद असलेले निःस्पृह लोक तेथे चालत नाहीत; आणि काँग्रेसला तरुण रक्त हवें आहे !

स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेस ही एक संघटना होती, आता तो एक सत्ताधारी राजकीय पक्ष आहे. तेव्हा पूर्वीचें, भिन्न विचारसरणींना, अनेक रामशास्त्र्यांना सामावून घेण्याचें धोरण आता चालूं ठेवणें युक्त नाही, असें कोणी म्हण-तील. पण हा युक्तिवाद फोल आहे. ब्रिटनमध्ये जे अनेक पक्ष आहेत त्यांनी रामशास्त्री सन्मानाने संभाळून ठेवण्याचें धोरण ठेवल्यामुळेच ते जिवंत राहिले व त्यांची वाढ झाली. १७५६ सालीं सप्तवार्षिक युद्ध सुरू झालें. त्या वेळीं न्यू कॅसल मुख्य प्रधान होता. थोरला पिट(चॅथॅम) हा त्याचा

दुय्यम होता. चॅथॅम हा अत्यंत निःस्पृह व फटकळ होता. पण त्याच्या ठायीं असामान्य कर्तृत्व होतें. म्हणून न्यू कॅसलने त्याला ठेवून तर घेतलेंच; शिवाय युद्धाची सर्व जबाबदारी, सर्व सूत्रें त्याचे हातीं दिलीं आणि हेंच धोरण पुढें डिझरायली, ग्लॅडस्टन यांनी चालू ठेवलें होतें. दुसऱ्या महायुद्धांत ॲलन ब्रूक हे ब्रिटनचे लष्करी सूत्रधार होते. त्यांनी 'टर्न ऑफ दि टाईड' हा ग्रंथ नुकताच लिहिला आहे. पंतप्रधान चर्चिल यांच्याशीं त्यांचे अनेक वेळां कसे तीव्र मतभेद झाले त्याचें वर्णन त्यांनी त्यांत दिलें आहे. चर्चिलचें धोरण चुकीचें आहे, अशी टीका अनेक वेळां त्यांना करावी लागली. चर्चिल कित्येक वेळां चिडून जात असे, पण दुसऱ्या दिवशीं ॲलन ब्रूक यांचें म्हणणें मान्य करीत असे. प्रत्यक्ष युद्धाच्या वेळीं ही स्थिति! ब्रिटन, अमेरिका या देशांतील पक्षांचे इतिहास पाहतां असें स्पष्ट दिसून येतें की, पक्ष सत्ताधारी झाल्यावरहि त्याच्या श्रेष्ठींनी हेंच उदार, समावेशक धोरण दृढनिश्चयाने चालू ठेवलें होतें. तसें त्यांनी केलें नसतें तर ते पक्ष टिकून राहिलेच नसते; आणि ब्रिटनची लोकशाहीहि टिकली नसती. कॉंझरवेटिव्ह, लिबरल, लेबर या दिसायला ढोबळ अशा तीन विचारसरणी दिसतात, पण त्या प्रत्येक तत्त्वज्ञानाच्या अभ्यंतरांत कितीतरी भिन्न प्रणाली असतात व आजहि आहेत. पण ब्रिटनमधल्या सर्व विचारसरणींचा समावेश दोन–तीन पक्षांतच होतो. याचा अर्थच असा की, ते अत्यंत समावेशक आहेत; पण भिन्न मतप्रणाली किंवा विचारसरणी यापेक्षाहि हा प्रश्न निःस्पृह रामशास्त्र्यांना समाविष्ट करून घेण्याचा आहे. कारण तत्त्वज्ञान तेंच असलें तरी त्याच्या व्यवहारांत अनेक मतभेदाचे प्रश्न निर्माण होत असतात. त्या वेळीं निःस्पृह तरुणांना अवसर मिळाला तरच त्यांचें कर्तृत्व वाढीस लागतें, आणि मग पहिले श्रेष्ठी वृद्ध झाले की त्यांची जागा घेण्याच्या वेळीं ते समर्थ होऊन बसलेले असतात. कॉंग्रेसश्रेष्ठींच्या असहिष्णु धोरणामुळे ही प्रक्रियाच बंद पडली आणि आज कॉंग्रेस निस्तरुण झाली आहे.

वृद्ध पित्याला आपल्या घरांत कर्ते तरुण पुत्र असावेत अशी इच्छा असते. आपण थकलों आहों, आता संसाराचा गाडा ओढण्यास तरुणांची शक्ति, त्यांचें बळ, त्यांचा उत्साह, त्यांचें सामर्थ्य हें अवश्य आहे, तेव्हा त्यांनी भार उचलावा असें त्याला वाटत असतें. पण सुज्ञ पिता हेंहि जाणतो

की, तरुण शक्ति आली तर तिच्याबरोबर उद्दाम आवेश, उसळणारें रक्त, तीव्र मतभेद, स्वतंत्र व्यक्तित्व, हेंहि येणार; आणि आपल्या मताला मुरड घालून त्या तरुण उसळीलाहि अवसर दिला पाहिजे. तरुण शक्तीचें चैतन्य यांतच असतें. तेव्हा वत्सलतेने त्यांचीहि वाढ होऊं दिली पाहिजे. तो उद्दाम व्यक्तित्वाचा आवेश ज्यांच्या ठायीं आहे तेच खरे तरुण. बाकी सर्व वयाने तरुण. ते पित्यापुढे गम खातात, मान खाली घालतात, पण ती पितृभक्ती-मुळे नव्हे तर पित्याच्या जिंदगीसाठी. सुज्ञ पित्याला असे तरुण आवडत नाहीत. त्याला तरुण चैतन्य आवडतें. पण चैतन्याला संभाळायचें तर दर वेळेला, असें असेल तर चालता हो, तसें करशील तर बाहेर निघावें लागेल असें म्हणून चालणार नाही, हेंहि त्याला समजतें. तसें केल्यास कर्ते तरुण पुत्र निघून जातात आणि मग संसार उघडा पडतो, आणि त्या तरुणांचें कर्तृत्व बाहेर गेल्यावर वाढीस लागत असलें तरी पुष्कळ वेळा बाहेरहि चांगला अवसर न मिळाल्यामुळे तें खुरटून जातें. म्हणजे यांत दोघांचाहि नाश होतो. म्हणून संसार संभाळण्याची चिंता ज्या वृद्ध पित्याला आहे तो तरुणांना त्यांच्या व्यक्तित्वाच्या दाहक तेजासकट स्वीकारण्याची सिद्धता ठेवतो. मन मोठें करतो, उदार करतो आणि त्यामुळे संसाराची परंपरा पूर्व वैभवानिशीं टिकून राहते. ज्या वृद्धांना तरुण हवे असतात पण त्यांचें चैतन्य नको असतें, त्यांना ते फक्त पाय चेपण्यापुरते हवे असतात. बाजार करण्या-साठी, देवपूजा करण्यासाठी हवे असतात. काँग्रेसश्रेष्ठींना आज तरुण हवे आहेत ते तसे हवे आहेत. तसे त्यांना लाखांनी मिळालेलेहि आहेत. पण असें असूनहि 'नेहरूनंतर कोण' हा प्रश्न सोडविण्यास ते असमर्थ आहेत. ते समर्थ असते तर त्यांना काँग्रेसमध्ये राहतांच आलें नसतें. आम्ही आमच्या समस्या लोकशाही मार्गानेच सोडविणार असें ब्रीद मिरविणाऱ्या काँग्रेसने महात्माजी दिवंगत झाल्याबरोबर लोकशाहीचें एक महान् तत्त्व, आद्यतत्त्व नष्ट करून टाकलें. त्यामुळे लोकशाहीमध्ये राष्ट्राच्या वृक्षाला दर क्षणाला जी नव्या नव्या उन्मेषाची विरूठी फुटत असते, नवे पल्लव येत असतात, नवा मोहोर येत असतो तो येण्याचें बंद झालें. तरुण कर्तृत्वाचा फुलोरा गेल्या बारा वर्षांत काँग्रेसमध्ये दिसून येत नाही, नवा फलबहार या वृक्षाला येत नाही. कारण बारा वर्षांपूर्वीच नवे कोंभ, नवे धुमारे छाटून टाकण्याची व पुन्हा न

येऊं देण्याची व्यवस्था झालेली आहे. चमत्कार असा की, नवा नेता मिळणार नाही अशी भीति युरोपीय पंडितांनी दण्डसत्तांविषयी व्यक्त केली होती, पण तेथे अशी वाण पडली नाही. लेनिननंतर स्टॅलिन आला. स्टॅलिननंतर क्रुश्चेव्ह आला, आणि पहिल्याच वेगाने त्याने प्रगति चालू ठेवली आहे. चीनमध्ये मावत्सेतुंग याला नव्या पिढीच्या लोकांनी खुशाल बाजूला केला. आपल्याकडे पंडितजी राजीनामा देतों असें म्हणाले तेव्हा वास्तविक अनेकांनी धैर्याने पुढे येऊन, आम्ही ती धुरा खांद्यावर घेतों, असें म्हणावयास पाहिजे होतें आणि ती घ्यावयास हवी होती. पण असें तर झालें नाहीच, उलट तुम्ही गेलांत तर आम्ही पोरके होऊं, असें म्हणून काँग्रेसजन रडूं लागले. पंडितजी बाजूला होतांच काँग्रेस शतखंड होईल ही सर्वांचीच खात्री आहे. ते गेले तरी आम्ही संघटना टिकवून धरूं असें म्हणण्याची धमक, तें तेज, तें कर्तृत्व एकांतहि नाही. कोणालाहि हा आत्मविश्वास नाही. उलट दण्डायत्त चीनमध्ये मावत्सेतुंगला मुद्दाम बाजूला करून सर्व धुरा आपल्या खांद्यावर घेण्याची धमक त्याच्या अनुयायांनी दाखविली. कर्तृत्वाची अखंड परंपरा निर्माण करणें हें लोकशाहीचें लक्षण. असें असून दण्डसत्तेने ती निर्माण केली. रशियांत सेनापति कमी पडले नाहीत, मुत्सद्द्यांची वाण नाही, शास्त्रज्ञ, ग्रंथकार, संयोजक, कारभारी, शिक्षणतज्ज्ञ, वैद्य, इंजिनीयर, कलाकार सर्व, सर्व क्षेत्रांतले लोक विपुल प्रमाणांत निर्माण होत आहेत. अमेरिकेंतले चिकित्सक, लोकवादी पंडित तेथे जाऊन पाहून हें सांगत आहेत, आणि रशियाचे बालचंद्र जगाला तें प्रत्यक्ष दाखवीत आहेत; हिंदुस्थानांत अन्न व वस्त्र निर्माण करण्याच्या योजना पार पाडण्याइतकें, साधे हिशेब बरोबर ठेवण्याइतकेंहि कर्तृत्व मात्र पैदा होत नाही. आणि हिंदुस्थानांत लोकसत्ता आहे! ! याच्यावर कोण विश्वास ठेवील ?

या गेल्या दोन प्रकरणांत आपण काय पाहिलें ? आपल्या प्रतिज्ञा फार भव्य आहेत, योजना उत्तम आहेत, पण त्या कार्यवाहींत आणणारे सेनापति आघाडीवर उपस्थित नाहीत. सर्वत्र राजकारण प्रभावी झालेलें आहे. देश धर्महीन, चारित्र्यहीन होत चालला आहे. आपल्या शासनाच्या मागे ध्येयवादी, कार्यैकनिष्ठ तरुण उभे नाहीत, त्यामुळे आपली काय दशा होत चालली आहे पाहा. भारत सरकार सामर्थ्यहीन व पंगु होऊन बसलें आहे.

चीन आपला सारखा अवमान करीत आहे, पण यूनोमध्ये त्याचा पक्ष सोडून द्यावा हें धैर्य आपल्याला नाही. पाकिस्तान आपल्या सार्वभौमत्वाचा सारखा भंग करीत आहे, त्याला पायबंद घालण्याचें सामर्थ्य आपल्याजवळ नाही. त्यामुळे दुबळें तत्त्वज्ञान आपल्याला सांगावें लागत आहे. देशांत मोठी संघटना म्हणजे काँग्रेस. तिला ठायीं ठायीं तडे गेले आहेत, म्हणून ती निष्प्रभ झाली आहे. कारखानदार साखर महाग करतात, रॉकेल महाग करतात, व्यापारी नागरिकांची लूट करतात, त्याचें नियंत्रण सरकार करूं शकत नाही. साठेबाजी अत्यंत मोठ्या प्रमाणांत चालते, ती नष्ट करावी अशी सरकारची इच्छाहि आहे, पण साठेबाजांपुढे सरकारला नांगी टाकावी लागते. 'या साठेबाज व्यापाऱ्यांमुळे सर्वत्र महागाई होत आहे. त्यांचें हें धोरण निंद्य आहे.' असें, सर्व सत्ता हातीं असूनहि अजितप्रसाद जैनांसारखे केंद्रमंत्री हताशपणें म्हणून चडफडत म्हातारीप्रमाणे बोटें मोडीत बसतात. काकासाहेब गाडगिळांच्यासारखे राज्यपाल हातीं सत्ता असूनहि, साखर वर्ज्य करणें हा उपाय योजतात. अजून सत्ताधारी उपोषण करीत नाहीत हें नशीब! महागाई, बेकारी सारखी वाढत आहे. स्वस्ताई करावी, लोकांना रोजगार द्यावा अशी सरकारला तीव्र तळमळ लागून राहिलेली आहे. पण महागाई वाढते आहे, बेकारी वाढते आहे, सरकार कांही उपाययोजना करूं लागलें की महागाई जास्तच वाढते. साखरेच्या बाबतींत आणि अन्न-धान्याचा जो सरकारी व्यापार (स्टेट ट्रेडिंग) व्हावयाचा आहे त्या बाबतींत हें स्पष्ट दिसून आलें आहे. आपल्या तिजोरीचा विचार केला तर धक्काच बसतो. कर्जें, कर्जें — इतकीं कर्जें वाढलीं आहेत की, कांही वर्षांनी आपलें सर्व राष्ट्रीय उत्पन्न व्याजापायीं द्यावें लागेल कीं काय अशी चिंता वाटूं लागली आहे. आंध्र, म्हैसूर, ओरिसा, मध्यप्रदेश या प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांनी परवा तीव्र चिंता व्यक्त केली. आम्हीं कर्जें काढलीं खरीं; पण व्याज कोठून द्यावयाचें या फिकिरींत आम्ही आहों, असें ते म्हणाले. (टाइम्स— ७ ऑगस्ट १९५९).

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या बारा वर्षांत सत्ताधारी पक्ष जो काँग्रेस त्याच्या हातीं कर्तुमकर्तुम् सामर्थ्य असूनहि आज आपली अशी दीन दशा झाली आहे. प्रतिकार-सामर्थ्य नाही, संघटना नाही, उत्पादन-सामर्थ्य नाही, कर्तृत्व

नाहीं, अन्न नाही, वस्त्र नाही, घर नाही आणि ज्याच्या बळावर प्रपंच यशस्वी करावयाचा तें तरुण रक्त थंड, उदासीन होऊन बसलें आहे, आणि आश्चर्य असें की, दण्डसत्तांनी हें सर्व सामर्थ्य अल्पावकाशांत प्राप्त करून घेतलें आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी अशीं बलाढ्य राष्ट्रें समोर उभीं असतांना रशियाचा क्रुश्चेव्ह त्यांना वाटेल त्या धमक्या देण्यास समर्थ आहे. त्याच्या हातून बर्लिन सोडवून घेण्याचें यांना सामर्थ्य नाही. चीनची वृत्तिहि तशीच आहे. ताडकन् सैन्य पाठवून त्याने तिबेट घेऊन टाकलें. या दण्डसत्तांना कशाचीहि भीति वाटत नाही. आपला इष्ट हेतु त्या क्षणार्धांत साध्य करून घेतात. भारतासारख्या सर्व जगाने प्रशंसिलेल्या, सर्व जगांत मोठी प्रतिष्ठा असलेल्या लोकसत्तेचा वाटेल तसा पाणउतारा त्या करूं शकतात. अशा लोकसत्तांचें आव्हान स्वीकारण्यास भारत समर्थ व्हावा अशी प्रत्येक भारतीय नागरिकाची स्वाभाविकच तीव्र इच्छा असणार. म्हणूनच त्यासाठी अत्यंत तळमळीने आपण उपायचिंतन केलें पाहिजे. पुढच्या प्रकरणाचा विषय तोच आहे.

✦ ✦ ✦

## प्रकरण : ५

# राष्ट्रीय स्वार्थाची उपासना

---

'लोकसत्तेला दण्डसत्तेचें आव्हान' या लेखमालेंतील पहिला लेख जुलै १९५९ च्या 'वसंत' अंकांत आला. त्या आधी मे महिन्यांत हा विषय मी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंतील व्याख्यानांत मांडला होता. त्याचे आधी दोन महिने या विषयाची मी तयारी करीत होतों. म्हणजे विषय मनांत आला त्या वेळीं चीनच्या दण्डसत्तेचें आव्हान भारताला इतक्या त्वरित येऊन पोचेल, चीन भारतावर उघड उघड लष्करी आक्रमण करून हें आव्हान त्याच्या तोंडावर अशा रीतीने फेकील असें स्वप्नांतहि आलें नव्हतें. आता या लेखमालेंत या विषयाची चर्चा केवळ तात्त्विक भूमिकेवरून केली होती असें मुळीच नाही. रशिया किंवा चीन या दण्डसत्तांपासून भारताच्या लोकसत्तेला नजीकच्या भविष्यकाळांत धोका पोचणार आहे हें मनांत आल्यामुळेच हा विषय असा विस्तृतपणें मांडावा असें मीं ठरविलें. तरी पण आक्रमणाची ही लाट ४-५ महिन्यांतच भारताच्या सीमांवर येऊन थडकेल याची कल्पनाहि त्या वेळीं मला नव्हती. रशियाच्या वाढत्या सामर्थ्याविषयी अमेरिकन पंडितांनी व शास्त्रज्ञांनी लिहिलेले लेख माझ्या वाचनांत आले त्या वेळीं सोव्हिएट दण्डसत्तेच्या लष्करी सामर्थ्याची भारतानेहि पाश्चात्त्य राष्ट्रांप्रमाणेच दखल घेतली पाहिजे, त्या आक्रमणाची भारतालाहि त्यांच्या इतकीच भीति आहे हा विचार प्रामुख्याने मनांत आला. चीनची दण्डसत्ता त्या वेळीं डोळ्यांसमोर नव्हती असें नाही, पण आव्हान येईल तें रशियाकडून येईल अशी कल्पना होती. कारण सामर्थ्य वाढलें आहे तें रशियाचें वाढलें आहे, चीन त्याच मार्गाने जात असला तरी भारताला आव्हान

देण्याइतकें सामर्थ्य प्राप्त होण्यास त्याला अजून कालावधि लागेल, असें वाटत होतें. पण प्रत्यक्षांत चीनचेंच आक्रमण आलें आणि तेंहि ही लेख-माला पुरी होण्याच्याहि आधी !

वास्तविक हेंहि खरें नाही. कारण प्रत्यक्षांत आक्रमण झाल्याला चार वर्षें होऊन गेलीं आहेत. १९५४ सालींच चीनने भारताचा सीमाप्रान्त बळकावला होता. आपल्या पंतप्रधानांनी कांही राजकीय धोरणाने तें भारताच्या नागरिकांना कळूं दिलें नाही इतकेंच. पण नव्याने उघडकीस आलेल्या या सत्यामुळे या आक्रमणाचें स्वरूप जास्तच भयानक आहे असें ठरतें. चीनमध्ये कम्युनिस्टांची सत्ता १९४९ सालीं प्रस्थापित झाली आणि त्यानंतर अवघ्या पांच वर्षांत भारतासारख्या एका मोठ्या राष्ट्राला शह देण्याइतकें सामर्थ्य, इतका आत्मविश्वास चीनला प्राप्त व्हावा हें जितकें आश्चर्यकारक, तितकेंच भारताच्या दृष्टीने लज्जास्पद आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळून बारा वर्षें झालीं, पण आपला एकहि प्रश्न सोडविण्यांत आपल्याला यश आलेलें नाही. गोवा, काश्मीर हे प्रश्न बाजूलाच राहिले. पाकिस्तानकडून आपलें कर्ज वसूल करण्याचें सुद्धा सामर्थ्य आपल्याला नाहीं, आणि चीनला मात्र ४–५ वर्षांत भारताच्या सरहद्दींत घुसून केवळ भारता-च्याच नव्हे तर सर्व जगाच्या छातीवर पाय देण्याइतकें सामर्थ्य प्राप्त करून घेण्यांत यश आलें आहे. आपलें राष्ट्र नुकतेंच स्वतंत्र झालें आहे, तेव्हा इतक्यांतच आक्रमणामुळे निर्माण होणारा संघर्ष आपण ओढवून घेतला तर आपला नाश होईल ही भीति चीनला नाही, आपण केलेला मनसुबा यूनो संघटनेला अमान्य झाला तर जगांतलीं अनेक बलाढ्य राष्ट्रें आपल्याविरुद्ध उठतील याची चीनला पर्वा नाही, आणि भारतावर स्वारी केली तर तो प्रतिकार करील आणि मग मोठें रणकंदन माजेल ही चिंता तर स्वप्नांतसुद्धा चीनच्या मनाला स्पर्श करीत नाही. चीन, पाकिस्तान (आणि गोवासुद्धा) यांच्या दृष्टीने भारत ह्या इतका प्रतिकारशून्य, इतका दुबळा ठरला आहे. आम्ही आत्मरक्षणाला पूर्ण समर्थ आहों असें, भारताचे शास्ते सर्वांना कंठ-रवाने सांगत आहेत. पण आपल्या स्त्रियांची विटंबना, सरहद्दींचा भंग व तेथील नागरिकांची मानखंडना, विवस्त्र होत असलेल्या द्रौपदीकडे शांतपणें पाहणाऱ्या धर्मराजाच्या शांतपणाने भारत पाहात उभा असतांना, या

घोषणांना वल्गनांपेक्षा जास्त किंमत द्यावी असें कोणालाच वाटत नाही. अर्थात् या संयमामुळे, या शांततावादामुळे जगांत भारताची कीर्ति पसरत चालली आहे हें खरें आहे, पण कीर्ति आणि सामर्थ्य यांत फरक आहे हें आपण जाणलें पाहिजे.

भारताला इतकें दौर्बल्य कशामुळे आलें याची कारणमीमांसा गेल्या दोन प्रकरणांत केली आहे. भारताच्या प्रत्येक प्रांतांतले कॉंग्रेसचे नेते हे राजकारणांत मग्न आहेत. समाजकल्याणाच्या योजना यशस्वी करून दाखविण्यास त्यांना वेळ नाही. स्वार्थ, सत्तालोभ, धनलोभ, जातीयता या दुर्धर रोगांनी कॉंग्रेसला ग्रासलें आहे. त्यामुळे राष्ट्रसेवा करण्याचें सामर्थ्यच तिच्या ठायीं राहिलेलें नाही. आपल्या कार्यक्षमतेचा हिशेब केला तर ती शून्यावर येऊन ठेपली आहे असें दिसतें. आपल्याला साधे हिशेबसुद्धा नीट करतां येत नाहीत, मग ठरल्या वेळांत, ठरलेल्या भांडवलांत एखादी योजना यशस्वी करून दाखविणें लांबच राहिलें. आपल्या रेल्वे, आपले कारखाने, आपली शेती, आपलीं रुग्णालयें यांविषयी सरकारने नेमलेल्या समित्यांचे अहवाल पाहिले तर उधळपट्टी, विध्वंस, कर्तृत्वशून्यता हींच आपल्या अठरा कारखान्यांचीं लक्षणें होऊन बसलेलीं दिसतात. हें सर्व सांगून भारतांतील राजकीय पक्ष, त्यांचे नेते व सामान्यत: सर्वच अधिकारी व कार्यकर्ते हे चारित्र्यहीन, धर्महीन, ध्येयहीन झाले आहेत, हीनवृत्तीचे व भ्रष्ट झाले आहेत. त्यामुळे आपण प्रत्येक क्षेत्रांत अपयशी होत आहोंत असा निष्कर्ष तेथे काढला होता, आणि आपण यासाठी अत्यंत तळमळीने उपायचिंतन केलें पाहिजे असें म्हटलें होतें.

हें उपायचिंतन करावयाचें तर वरील कारणमीमांसेच्याहि पलीकडे आपण गेलें पाहिजे, आणि या कारणांचीहि कारणमीमांसा केली पाहिजे. आपण धर्महीन, चारित्र्यहीन तरी कां झालों याचा विचार आपण केला पाहिजे. बारा वर्षांपूर्वीच आपण स्वातंत्र्य मिळविलें. त्याच्या आधीच्या तीस-पंचवीस वर्षांत आपण अनेक सत्याग्रहसंग्राम केले होते. त्या वेळीं राष्ट्राच्या हाकेला साद देऊन लक्षावधि लोक संग्रामांत उतरले होते, आणि ध्येयवादाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान केलें. गेल्या शंभर वर्षांच्या काळांत रानडे, टिळक, सावरकर, लजपतराय, गांधी,

पटेल, नेहरू, सुभाषचंद्र यांसारखे अव्वल दर्जाचे श्रेष्ठ नेते भारताने निर्माण केले आणि त्यांच्या संदेशाने प्रेरित होऊन अखिल भारतभर हिंडून, सरकारी रोषाची पर्वा न करतां लोकजागृति करणारे तरुण तर प्रत्येक प्रांतांत सहस्रसंख्येने निर्माण झाले होते. हे सर्व लोक आता कोठे गेले? सत्ता-मोहिनीचें दर्शन होतांच हे सर्वच पतित आणि भ्रष्ट झाले काय? आज भारतांत वर उल्लेखिलेल्या नेत्यांच्या तोडीचा एकहि श्रेष्ठ नेता नाही हें खरें आहे; आणि दऱ्याखोऱ्यांतून हिंडून लोकजागृति करणारे तरुण तर अपवादालाच आहेत हेंहि खरें आहे. पण याचींच कारणें आपण शोधलीं पाहिजेत. स्वातंत्र्यसंग्रामांत निर्माण झालेलें तें शुभ्र चारित्र्य, तो ध्येयवाद, तें असामान्य कर्तृत्व एकाएकी अगदी निपटून नष्ट व्हावें याला केवळ सत्ता-लोभ, स्वार्थ ही कारणमीमांसा पुरेशी नाही असें वाटतें. सर्वच्या सर्व कार्य-कर्ते आणि नेते इतके दुबळे, इतके नादान केवळ सत्ताप्राप्तीमुळे झाले असतील तर भारताला सध्याच्या आपत्तींतून डोकें वर काढणें कधीच शक्य नाही असा त्याचा अर्थ होईल. रशियांत राज्यक्रान्ति झाली, चीनमध्ये राज्यक्रान्ति झाली, पण सत्ता हातीं आल्यामुळे तेथल्या नेत्यांच्या कर्तृत्वाचा व चारित्र्याचा इतका लोप केव्हाहि झाला नाही. मग भारतांतच तसें कां व्हावें? आपला ध्येयवाद इतका तकलुपी, इतका दिखाऊ होता काय? कीर्ति, सत्ता, धन यांचा मोह जिकण्याचें सामर्थ्यच भारतीयांच्या ठायीं नाही काय? असें म्हणवत नाही. याचीं कांहीतरी निराळीं कारणें असलीं पाहिजेत. तींच आता शोधावयाचीं आहेत.

कोणत्याहि समाजाचा वा राष्ट्राचा उत्कर्ष आणि विलय, किंवा त्याला प्राप्त झालेली कोणतीहि उत्तममध्यमाधम दशा ही त्याने स्वीकारलेल्या समाजसंघटनेच्या, समाजरचनेच्या, मूलभूत तत्त्वांवर म्हणजेच त्याच्या सामाजिक वा राष्ट्रीय तत्त्वज्ञानावर अवलंबून असते. समता, विषमता, व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मनिष्ठा, समाजवाद, साम्यवाद, लोकसत्ता, दण्डसत्ता, जातिनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, शब्दप्रामाण्य, बुद्धिप्रामाण्य, हीं सर्व समाजरचनेचीं तत्त्वें होत. यांतील जीं कोणतीं तत्त्वें एखाद्या समाजाने स्वीकारलीं असतील तीं सर्व मिळून त्यांचें तत्त्वज्ञान होतें, आणि त्याने स्वीकारलेलें हें जें तत्त्वज्ञान त्यावर त्याचा उत्कर्षापकर्ष अवलंबून असतो. चौदाव्या

पंधराव्या शतकांत पश्चिम युरोपांतील जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड इ. राष्ट्रांचा झपाट्याने उत्कर्ष होऊं लागला. तो त्याने त्या वेळीं ग्रीक विद्येचें म्हणजेच तत्त्वज्ञानाचें जें पुनरुज्जीवन केलें त्यामुळे झाला असें इतिहासकार सांगतात. तोपर्यंत अनियंत्रित राजसत्ता, परमेश्वरप्रणीत धर्मसत्ता, शब्दप्रामाण्य, जन्मनिष्ठ उच्चनीचता, हें त्या देशांचें तत्त्वज्ञान होतें. ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनानंतर हें सर्व पालटलें, नष्ट झालें. त्या जागीं व्यक्तिस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, लोकसत्ता, बुद्धिप्रामाण्य, समता, हें तत्त्वज्ञान आलें, आणि यामुळेच त्या पाश्चात्त्य राष्ट्रांचा उत्कर्ष झाला व पूर्व युरोपमधील पोलंड, बल्गेरिया, रुमानिया, रशिया इ. राष्ट्रांनी हीं नवीं तत्त्वें स्वीकारलीं नाहीत म्हणून त्यांचा अपकर्ष झाला याबद्दल इतिहासवेत्त्यांत दुमत नाही. गेल्या शतकाच्या अखेरीस जपानचा उत्कर्ष झाला. अल्पावधींत तो देश महत्पदाला चढला व बलाढ्य झाला याचें कारण त्याने राष्ट्रनिष्ठा, समता, विज्ञाननिष्ठा, प्रयत्नवाद ही पाश्चात्त्य संस्कृति, समाजरचनेचीं हीं पाश्चात्त्य तत्त्वें अंगीकारलीं हें होय असेंच सर्व पंडितांचें मत आहे. इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकापासून भारतांतील सर्व प्रांत इस्लामी आक्रमणाला बळी पडत गेले आणि त्यांतून ते मुक्त होतात न होतात तोच पुन्हा ते पाश्चात्त्य आक्रमणाला बळी पडले. याची मीमांसाहि अशीच केली जाते. शब्दप्रामाण्य, अपरिवर्तनीय अपौरुषेय धर्म, अनियंत्रित राजसत्ता, जन्मनिष्ठ उच्चनीचता, अतिरिक्त निवृत्तिवाद, त्यांतून आलेला दैववाद, ही त्या काळांत भारताची संस्कृति होती, समाजरचनेचीं तत्त्वें होतीं, त्याचें तत्त्वज्ञान होतें. म्हणून मोगल, इंग्रज, फ्रेंच, डच यांच्यापुढे त्याचा टिकाव लागला नाही; आणि आज इतिहासकार असें सांगतात की, हें तत्त्वज्ञान निषिद्ध मानून गेल्या शंभर वर्षांत त्याने व्यक्तिस्वातंत्र्य, समता, राष्ट्रनिष्ठा, लोकसत्ता, इहवाद, प्रयत्नवाद, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, धर्माची परिवर्तनीयता हें तत्त्वज्ञान स्वीकारलें म्हणूनच ब्रिटिशांसारख्या बलाढ्य राष्ट्राशीं लढा करून त्याला स्वातंत्र्य मिळवतां आलें. राष्ट्राचा उत्कर्ष वा अपकर्ष त्याने स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानामुळे होतो या विधानाचा अर्थ एवढ्यावरून स्पष्ट होईल. तो जमेस धरून मला असें म्हणावयाचें आहे की, स्वातंत्र्योत्तर काळांत आपण जें तत्त्वज्ञान स्वीकारलें आहे त्यामुळेच

सध्या आपली अधोगति झाली आहे. आपल्या कोणत्याहि योजना यशस्वी होत नाहीत, कोणीहि आपल्या देशाचा अवमान करावा, सरहद्दींचा भंग करावा, आक्रमण करावें, आणि आपल्याला कसलाहि प्रतिकार करतां येऊं नये, इतके आपण दुबळे झालों आहोंत; चारित्र्य व कर्तृत्व यांचा या भूमींतून सर्वस्वी लोप झाल्यासारखें दिसावें अशी दशा झाली आहे, याचें प्रधान कारण म्हणजे काँग्रेसने व तिच्या नेत्यांनी स्वातंत्र्योत्तर काळांत (आणि कांही अंशीं पूर्वीच्या २५-३० वर्षांत) राष्ट्रनिष्ठा, धर्म, लोकसत्ता, बुद्धिनिष्ठा, शांततावाद, अहिंसा, सत्य, यांच्या विषयीचे जे सिद्धान्त म्हणजे जें तत्त्वज्ञान स्वीकारलें तें आहे.

राष्ट्रनिष्ठा ही एक महाशक्ति आहे. पाश्चात्त्य विद्येचा भारतांत प्रसार झाल्यानंतर आपल्या नेत्यांनी आपली रसना व लेखणी झिजवून लोकांमध्ये ही निष्ठा दृढमूल केली, आणि तिच्याच प्रभावाने भारतांत क्रान्ति होऊं शकली. पण आज आपण वाणीने राष्ट्रनिष्ठेचा पुरस्कार करीत असलों तरी तिचें खरें स्वरूप जाणून घेऊन ती महाशक्ति जनमानसांत निरंतर तेवत ठेवण्याचे प्रयत्न मात्र आपल्या हातून होत नाहीत. राष्ट्रभक्ति या निष्ठेचीं दोन अंगें आहेत. एक पूर्वपरंपरेचा अभिमान आणि दुसरें व तितकेंच महत्त्वाचें अंग म्हणजे परकीयांचा, देशाच्या शत्रूंचा, आक्रमकांचा द्वेष ! या दोन्ही अंगांचा जसा परिपोष व्हावयास हवा तसा येथे होत नाही व होण्याची आशा नाही. कारण येथे स्वीकारलेलें तत्त्वज्ञान हें त्यांना विरोधी आहे.

पूर्वपरंपरेचा अभिमान हा राष्ट्रनिष्ठेचा आत्मा आहे. त्या अभिमानावांचून कोणत्याहि राष्ट्राला आजवर पराक्रम करतां आलेला नाही व पुढे येणार नाही. कम्युनिस्ट हे या अभिमानाचे शत्रु आहेत किंवा होते. मार्क्सवादाने राष्ट्रनिष्ठेची व परंपरापूजेची कमालीची हेटाळणी केली आहे. लेनिन व त्याचे सहकारी क्रान्तीनंतर प्रारंभीं हेंच करीत असत. रशियाचा इतिहास १९१७ सालापासून सुरू होतो असें ते म्हणत, आणि त्या दृष्टीने लिहिलेला इतिहासच शाळा-कॉलेजांत शिकवीत असत. पण जर्मनराष्ट्र समर्थ होऊं लागलें आणि हिटलरचें आक्रमण रशियावर होणार असा धोका उत्पन्न झाला त्या वेळीं केवळ अर्थवादी तत्त्वज्ञानाने पराक्रमाचें स्फुरण

जनतेंत होत नाही हें स्टॅलिनच्या ध्यानांत आलें; तेव्हा रशियाच्या उन्नतीसाठी त्याने मार्क्सवाद वाऱ्यावर उधळून दिला आणि परंपरेचा अभिमान व शत्रूचा द्वेष या राष्ट्रनिष्ठेच्या दोन्ही अंगांचा तो रशियन जनमानसांत पोष करूं लागला. पीटर दि ग्रेट, कुटुसाफ, अलेक्झँडर नेव्हस्की यांचा गौरव करून आपल्या पूर्वजांनी नेपोलियनचा, पोलंडचा व इतर आक्रमकांचा पराभव कसा केला याचीं वर्णनें तो करूं लागला. हे सर्व पुरुष सरंजामदार वा राजे होते. पूर्वी यांची निंदा होत असे. आता ऐक्यासाठी, स्फूर्तीसाठी, पराक्रमासाठी स्टॅलिन त्यांचा गौरव करूं लागला. या गौरवाचा सारार्थ एकच होता. राष्ट्ररक्षणासाठी त्यांनी अतुल धैर्याने केलेला शत्रूंचा संहार! या गौरवाबरोबरच जर्मनीचा भयंकर द्वेष त्याने रशियन जनतेंत पद्धतशीरपणें पसरवून दिला. तें जगांतील कामगारांचें ऐक्य, ती आंतरराष्ट्रीय दृष्टि त्याने हद्दपार केली आणि जर्मनांचा द्वेष या आगीने त्याने रशियन कामगारांचीं मनें पेटवून दिलीं. कारण मरण-मारणाचा संग्राम तिच्यावाचून करणेंच शक्य नसतें. रशियाचें साफ निर्दाळण करण्यासाठीच जर्मन उद्युक्त झाले होते, तेव्हा त्यांचा संहार करावयाचा, कत्तली करावयाच्या तर नागरिकांच्या मनांत त्या शत्रूविषयी जहरी, आसुरी द्वेषच असला पाहिजे. असीम राष्ट्रभक्ति आणि तितकाच कडवा शत्रुद्वेष यांवाचून मरण-मारणाचा संग्राम होत नसतो; आणि म्हणून मार्क्सवाद, आंतरराष्ट्रीयता हें व्यापक तत्त्व सोडून देऊन सोव्हिएट नेत्यांनी राष्ट्रनिष्ठेच्या दोन्ही अंगांचा परिपोष जनतेंत करून जर्मनीवर विजय मिळविला.

चीनचा माओ हा प्रारंभापासूनच शहाणा झाला होता. राष्ट्रनिष्ठा ही महाशक्ति आहे, त्या महाप्रेरणेवाचून आपल्या समाजाचा उत्कर्ष होणार नाही, त्याच्या अंगीं सद्गुणांचें संवर्धन होणार नाही, हें त्याने प्रारंभींच जाणलें होतें, आणि प्रत्येक कम्युनिस्टाने राष्ट्रनिष्ठ असलेंच पाहिजे असा त्याने दंडक घालून दिला होता. राष्ट्रनिष्ठेचें द्विविध रूपहि त्याने ओळखलें होतें. पूर्वपरंपरेचा निःसीम अभिमान आणि शत्रूविषयीचा कडवा द्वेष यांतूनच कर्तृत्वाची प्रेरणा मिळते, त्यामुळेच पशूचीं माणसें होतात याविषयी त्याला शंका नव्हती. म्हणून त्याने जीं राष्ट्रीय कवनें रचलीं त्यांपैकी प्रत्येकांत त्याने या द्विविध भावनांचें उद्दीपन केलेलें आहे. सम्राट्

शी हुआंग आणि वू ती, त्याचप्रमाणे सम्राट् तै शुग, तै सु आणि चेंगीजखान यांचें स्मरण तो या कवनांत करतो. त्यांचा मुख्य गुण तो एकच जाणतो. गरुड हें लक्ष्य ठेवून ते धनुष्याची प्रत्यंचा ओढतात! यांतले कोणी अक्षरशत्रु होते, कोणी क्रूर होते; पण याबद्दल त्यांचा अधिक्षेप तो करीत नाही. सम्राट् तर सगळेच होते; पण हा कामगारप्रेमी नेता यासाठी त्यांची निंदा करीत नाही. ते सर्व चिनी होते, चीनचे सम्राट् होते, याचा त्याला अभिमान वाटतो; आणि यांचा जितका अभिमान तितकाच जपान, अमेरिका यांचा द्वेष त्याच्या गीतांतून जळजळत असतो. शत्रूच्या संहाराचा उल्लेख केल्याखेरीज तो आपलें गीत पुरें करीतच नाही. तीन हजार वर्षांपूर्वी आम्ही दिशादर्शक यंत्राचा शोध लावला, सतराशें वर्षांपूर्वी कागद तयार करण्याची कला हस्तगत केली, बाराशे वर्षांपूर्वी मुद्रणयंत्र तयार केलें, या पूर्वीच्या दिव्य इतिहासाचा जसा तो ठायीं ठायीं गौरव करतो, त्याचप्रमाणे तितक्याच आवेशाने व त्वेषाने शत्रूचें आम्ही निर्दाळण केलें हेंहि पावलोपावलीं तो अभिमानाने सांगतो. स्वाभिमान व परद्वेष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हें माओला माहीत आहे.

आता या दृष्टीने भारताचा विचार केला तर काय दिसतें तें पाहा. भारतांत पाश्चात्त्य विद्येच्या प्रसाराबरोबरच पुनरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली; आणि तिच्यांतूनच राष्ट्रनिष्ठेचा उदय झाला. प्रारंभीच्या काळांत लो. टिळक यांच्याकडे या चळवळीचें नेतृत्व होतें. त्या वेळीं राष्ट्रनिष्ठेच्या दोन्ही अंगांचा परिपोष येथे होत होता. टिळकांनीं पूर्वपरंपरेचा अभिमान आणि ब्रिटिशांचा द्वेष या दोन्ही भावना भारतीय जनतेच्या ठायीं अखंड ४० वर्षे तेवत ठेविल्या होत्या. त्यानंतर भारताचें नेतृत्व महात्माजींकडे आलें, आणि तेव्हापासून राष्ट्रीय स्वार्थ हें जें आमचें एकमेव लक्ष्य होतें त्यावरून भारतीयांची दृष्टि विचलित झाली. सत्य, अहिंसा, मानवता, विश्वबंधुत्व हीं मूल्यें राष्ट्रीय स्वार्थापेक्षा श्रेष्ठ ठरलीं आणि त्यांचे प्रयोग येथे होऊं लागले. वैयक्तिक जीवनांत हीं तत्त्वें अत्यंत वंदनीय अशीं आहेत. पण राष्ट्रीय जीवनांत त्यांचा प्रवेश होतांच त्यांना अत्यंत विपरीत रूप येऊं लागलें. तसें तें येणें अपरिहार्यच होतें. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी सुद्धा सत्य, अहिंसा यांचा त्याग करणें युक्त नव्हे असें महात्माजींचें मत होतें.

" माझी राष्ट्रभक्ति अन्यनिरपेक्ष नाही. या राष्ट्रभक्तींत परक्यांचें अहित तर येत नाहीच, तर उलट त्यांच्या हितासाठीच आम्हांला स्वातंत्र्य हवें आहे. इंग्लंडचा नाश होऊन भारताला स्वातंत्र्य मिळत असेल तर मला स्वातंत्र्य नको. " असें प्रतिपादन ते करीत. सुदैवाने महात्माजींचीं हीं मतें राष्ट्राने फारशीं मानलीं नाहीत. एकांतिक सत्य-अहिंसेवर काँग्रेसमध्ये कोणाचाहि विश्वास नव्हता. पंडितजी, वल्लभभाई यांनी केवळ धोरण म्हणून आम्ही अहिंसा मान्य करतों, शस्त्रयुद्ध शक्य नाही म्हणून हा सत्याग्रहाचा मार्ग आम्ही स्वीकारतों, असें अनेक वेळा जाहीर रीत्या सांगितलें आहे, लिहिलें आहे. आम्हीं अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविलें असें काँग्रेसचे नेते आज सांगत असतात, पण तें खरें नाही हें त्यांचें त्यांनाच इतरांपेक्षा जास्त माहीत आहे. १९४७ पूर्वी येथे जे तीन चार सत्याग्रहाचे लढे झाले त्यांतल्या नेत्यांना किंवा सैनिकांना इंग्रजांविषयी प्रेम नव्हतें. रौलेट कायदा, जालियनवाला बाग या अत्याचारांच्या स्मरणाने ब्रिटिशां-विषयी लोकांत द्वेषच पसरला होता, आणि त्यामुळेच स्वातंत्र्यसंग्राम शक्य झाले. लक्षावधि लोक स्वातंत्र्यसंग्रामांत उतरले ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि ब्रिटिशांच्या द्वेषामुळेच उतरले. पण असें जरी असलें तरी परंपराभक्ति आणि शत्रुद्वेष या दोन भावनांचा जो पद्धतशीर, योजनापूर्वक, प्रयत्नपूर्वक परिपोष व्हावयास हवा होता तो भारतांत झाला नाही. सर्व नेत्यांचे अग्रणी जे महात्माजी त्यांचा या वृत्तीला कडवा विरोध; दुय्यम नेत्यांची त्यांच्या सत्य-अहिंसेवर श्रद्धा नाही, पण धोरण म्हणून त्यांनी ती स्वीकारलेली ! त्यामुळे या महाशक्तीच्या जोपासनेविषयीं ते उदासीनच राहिले. अशा स्थितींत मुळांतच शत्रुद्वेष ही जी मनुष्याची उपजत वृत्ति, तिच्यामुळे जेवढें शक्य, तेवढें झालें. पण इतर राष्ट्रांनी सर्व सामर्थ्य खर्च करून, विश्वप्रयत्न करून, वाढविलेली ती महाशक्ति कोणीकडे आणि आईबापांनी टाकून दिलेल्या अनाथ कन्यकेप्रमाणे कशी तरी वाढलेली भारतांतील राष्ट्रनिष्ठा कोणीकडे !

परंपराभक्ति हा राष्ट्रनिष्ठेचा आत्मा होय. या आत्म्याची उपासना इतर देशांत कशी चालवितात त्याचीं कांही उदाहरणें वर दिलींच आहेत. भारतीय विद्याभवनाचे कुलपति श्री. मुनशी यांनी सर्व जगाचा प्रवास करून

आल्यावर याविषयीचे आपले विचार ' भवन जर्नल ' मध्ये मांडले आहेत ते येथे देतों. चालू संदर्भांत ते आपल्याला निश्चित उद्बोधक वाटतील. जगाचा प्रवास करीत असतांना श्री. मुनशी यांना प्रत्येक देशांत चैतन्य, उत्साह, आशावाद भरून राहिलेला दिसला. भारतांत मात्र सर्वत्र मरगळ, निरुत्साह, शून्य ! असें कां व्हावें याचा विचार एका पत्रांत त्यांनी मांडला आहे. त्या सर्व देशांत राष्ट्रनिष्ठा ही महाशक्ति अखंड प्रज्वलित ठेवण्याचे प्रयत्न होत असतात, आणि हिंदुस्थानांत तसे कांहीच प्रयत्न होत नसल्यामुळे ही अधोगति झाली आहे असा त्यांचा निष्कर्ष आहे. ते म्हणतात, सर्ववंद्य अशा महापुरुषांची पूजा, समाईक अशा पूर्वपराक्रमाची स्मृति, आणि सांघिक पराक्रमाची ईर्षा यांनी समाज एकजीव होत असतो. राष्ट्र घडत असतें. त्या दृष्टीने गेलीं १२ वर्षें भारताने व्यर्थ घालविलीं. अमेरिकेंत शिक्षण-पद्धतिच अशी आहे की, कोणतेहि परकी समाज तेथे दोन तीन पिढ्यांत अमेरिकन होऊन जावे. वॉशिंग्टन, लिंकन हे माझे पूर्वज ही भावना तेथे नागरिकांच्या मनांत रुजविली जाते. त्या तऱ्हेचें शिक्षण देण्याचा कसलाहि प्रयत्न भारतांत होत नाही. आपली शिक्षणपद्धति अगदी फलशून्य आहे. हिंदूंनी आतापर्यंत आपल्या पूर्वपरंपरेचा अभिमान टिकविला होता. पण आणखी वीस वर्षांत हिंदूविषयीं हेंच म्हणतां येईल कीं नाही याची शंका आहे. गेलीं शंभर वर्षें आपल्या नेत्यांनी ध्येयवृत्ति टिकविली होती. आता ती नष्ट झाली आहे. (भवन जर्नल २५–१–१९५९. कुलपतींचें पत्र. सारांशरूपाने.) जगांत कोठेहि आपण गेलों तरी एका देशांत असलेल्या भिन्न समाजांना एकरूप करून टाकण्याचे मार्ग ठरलेले आहेत. समान ईर्षा, समान पूर्वपराक्रम, समान महापुरुष-परंपरा ! त्या भूमीच्या प्राचीन परंपरेचा अभिमान जे धरतील तेच खरे राष्ट्रनिष्ठ. मग ते कोणत्याहि धर्माचे असोत. या दृष्टीने व्यास, वाल्मीकि, श्रीकृष्ण, श्रीरामचंद्र, महावीर, बुद्ध, विक्रमादित्य, चंद्रगुप्त, कबीर, अकबर, शंकराचार्य, शिवछत्रपति, लो. टिळक, महात्माजी ही परंपरा जो वंद्य मानील तोच राष्ट्रनिष्ठ भारतीय अशा वृत्तीची जोपासना येथे व्हावयास हवी होती. मुनशी म्हणतात तशी स्वातंत्र्योत्तर काळांत ती झाली नाहीच, पण स्वातंत्र्यपूर्व काळाची कथाहि तीच आहे ! मानवता, विश्वबंधुत्व, विशालता यांविषयीच्या विपरीत

कल्पनांमुळे काँग्रेसच्या नेत्यांनी भारताच्या वर सांगितलेल्या परंपरेची एकनिष्ठ उपासना केली नाही. एवढेंच नव्हे तर अनेक वेळां जाणूनबुजून तिची अवहेलना केली आहे. या देशांत हिंदूखेरीज मुस्लिम, ख्रिस्ती इ. अनेक परधर्मी समाज आहेत. त्या सर्वांच्या चित्तांत राष्ट्रनिष्ठा दृढमूल करून टाकण्यासाठी वरील परंपरेचा अभिमान त्यांच्या ठायीं उत्पन्न करणें व तो सतत प्रज्वलित ठेवणें अवश्य होतें. पण त्या परधर्मीयांना, आणि विशेषत: मुस्लिम समाजाला ही परंपरापूजा मान्य होणार नाही म्हणून काँग्रेसने अत्यंत विपरीत धोरण स्वीकारलें. या परंपरेचा आग्रहच तिने सोडला; इतकेंच नव्हे तर मुस्लिम लीगच्या अनुनयाची वृत्ति स्वीकारून हिंदूंच्या परंपराभक्तीचा अवमानहि केला. 'वन्दे मातरम्' हें आपलें राष्ट्रगीत, पण मुस्लिमांना तें अप्रिय; त्यामुळे, एका मुस्लिमाचा जरी विरोध असेल तरी तें सभेंत म्हणूं नये अशी काँग्रेस सरकारची आज्ञा! वास्तविक मुसलमान समाजहि कडवी राष्ट्रनिष्ठा जोपासूं शकतो, हें तुर्कस्थान, ईजिप्त यांच्या इतिहासावरून त्या वेळीं प्रत्यक्ष दिसत होतें. तुर्कस्थानचा केमाल पाशा, ईजिप्तचा झगलूल पाशा यांचे लाखो अनुयायी मुस्लिमच होते. पण राष्ट्रनिष्ठेचा त्यांचा संदेश त्यांनी मोठ्या भक्तीने स्वीकारला. तुर्कस्थानांत अभिमान तुर्की भाषेचा, अरबीचा नाही. कुराणहि तुर्कीतून पढलें पाहिजे हा केमाल पाशाचा दंडक तुर्की मुस्लिमांनी मान्य केला. तुर्कस्थानांत जे पराक्रमी पुरुष होऊन गेले ते मुस्लिम नसले तरी तुर्कांनी वंद्य मानले पाहिजेत, तुर्केतर मुस्लिमांशीं आपला संबंध नाही, आपण त्यांचा वारसा सांगूं शकत नाही, हें परंपराभक्तीचें केमाल पाशाचें तत्त्वहि त्यांनी मान्य केलें. मुसलमानी धर्माच्या उदयापूर्वी तुर्कस्थानांत होऊन गेलेले जे अटिल्लासारखे वीर, त्यांचें गुण-संकीर्तन तुर्क आज करतात, त्यांचा अभिमान ते आपले पूर्वज म्हणून धरतात. इस्तंबूलचा सुलतान हाच मुसलमानांचा धर्मगुरु – खलिफा असे. पण राष्ट्रनिष्ठेच्या आड ती खिलाफत येते हें दिसतांच केमाल पाशाने ती नष्ट करून टाकली, आणि अखिल तुर्क समाजाने या कृत्याला पाठिंबा दिला. याचा अर्थ असा की, राष्ट्रनिष्ठेसाठी मुस्लिम समाजहि धर्मक्रांति करूं शकतो. भारतांतहि हेंच घडलें असतें. तसें घडूं नये म्हणून इंग्रजांचे प्रयत्न असत हें खरें; पण काँग्रेसच्या नेत्यांनी तरी तें घडविण्यासाठी काय प्रयत्न केले? कांही नाही. त्यांना ही दृष्टिच नव्हती. सर्वधर्मीय समाजांची एक परंपरा निर्माण

करून तिची भक्ति हा राष्ट्रीयतेचा निकष ठरवून ती भक्ति भारतांत दृढमूल करण्याऐवजी इतर समाजांना जें अप्रिय तें हिंदूंनीहि वर्ज्य मानावें, निदान त्याचा आग्रह धरूं नये, त्याविषयी (म्हणजे स्वतःच्या आत्म्याविषयीच) उदासीन राहावें, असा उपदेश त्यांनी चालविला. स्वातंत्र्यानंतर भारत या नांवाचा आग्रहहि त्यांनी धरला नाही. कारण इतर धर्मीयांना तो तितका मान्य होणार नाही ! म्हणून 'भारत' याच्या जोडीला 'इंडिया' असें अभद्र नांव त्यांनी ठेवून दिलें. पूर्वपरंपरेची पूजा म्हणजे राष्ट्राच्या अहंकाराचें पोषण होय. तो अहंकार जेवढा पोसेल, प्रबळ होईल तेवढें राष्ट्राचें कर्तृत्व पोसत असतें. त्याला दुखवणें म्हणजे राष्ट्राची हत्या होय. पण काँग्रेसच्या नेत्यांना याची जाणीवच नाही. कारण राष्ट्रीय स्वार्थ हें त्यांचें लक्ष्य नाही.

मुस्लिम हे आपले धाकटे भाई आहेत, तेव्हा त्यांच्याशीं प्रेमाने, औदार्याने, वागावें असें तेव्हा सांगितलें जाई, आणि आजहि सांगितलें जातें. हा उपदेश फारच चांगला आहे. पण मुस्लिम हे भाऊ केव्हा ठरतील ? आईवर, या भारतभूमीवर त्यांचें आमच्याइतकेंच प्रेम असेल, आमच्याइतकीच अनन्य-निष्ठा असेल तेव्हा ! व्यास–वाल्मीकि, राम–कृष्ण, शिवछत्रपति, राणा प्रताप यांच्यावर आमच्याइतकीच त्यांची भक्ति असेल तेव्हा ! भारतांतल्या मुसलमानांतहि अशा राष्ट्रीय वृत्तीचे लोक होते. वास्तविक त्यांना काँग्रेसने भाई मानावयास हवें होतें, पण त्यांना जवळ करण्याऐवजी काँग्रेसने या थोर परंपरेचा ज्यांना अत्यंत तिटकारा, ती आपली परंपरा आहे असें मानावयास जे कधीहि तयार नव्हते म्हणजे जे खरोखरच आमचे भाई नव्हते त्या लीगच्या लोकांचा अनुनय करण्यांतच धन्यता मानली. त्या मुस्लिमांना संस्कृतचा द्वेष व उर्दूची भक्ति ! अर्थातच काँग्रेसलाहि उर्दूचें प्रेम; आणि तें किती ? तर हिंदी भाषासुद्धा संस्कृतनिष्ठ असण्यापेक्षा उर्दूनिष्ठ असली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. शिवछत्रपति व राणा प्रताप हे हिंदूंना अत्यंत प्रिय. लगेच महात्माजींनी त्यांना मूढ व भ्रान्त ठरविलें ! हे दोन पुरुष म्हणजे भारताचा आत्मा आहे. आमची प्राणशक्ति आहे. त्यांची निंदा करण्याने आपण केवढी भयानक हिंसा करीत आहोंत याची महात्माजींना कल्पनाच नव्हती काय ? पण हें तरी कसें म्हणावें ? मुस्लिमांच्या पूर्व-परंपरेंत भयंकर कत्तली करणारे अनेक बादशहा होऊन गेले. पण त्यांना

कोणी भ्रांत किंवा मूढ ठरविलें नाही. त्यामुळे त्या समाजाच्या भावना दुखविल्या जातील हें काँग्रेसच्या नेत्यांना निश्चित माहीत आहे. पण तशाच भावना हिंदूंनाहि आहेत हें त्यांनी कधी जाणलें नाही. त्यामुळे इतर समाजांत भारतनिष्ठेचें बीजारोपण करण्याचे प्रयत्न करण्याऐवजी हिंदू-विरुद्ध मुस्लिमांची बाजू घेण्यांत त्यांनी भूषण मानलें. यांत अधःपात सगळ्यांचाच झाला. मुस्लिमांचा धर्म निराळा असला तरी या भूमीच्या प्राचीन पराक्रमी पुरुषांचेच ते खरे वारस आहेत. त्यांचें भरणपोषण सर्व या भूमीनेच केलें आहे. तेव्हा तिच्या प्राचीन वैभवाच्या अभिमानानेच त्यांची उन्नति होईल. इतर देशांतल्या मुस्लिमांनी हें जाणलें आहे. ईजिप्तच्या राष्ट्रसभेचे चिटणीस हमीद् अल् अलेली १९१० सालच्या आपल्या भाषणांत म्हणतात, " ज्यांनी पिरामिड उभारले, युरोपचें अस्तित्वहि नव्हतें तेव्हा ज्यांनी संस्कृति निर्माण करून तिचा प्रसार केला त्यांचें कर्तृत्व, त्यांची प्रज्ञा आमच्या रक्तांत आहे." हिंदुस्थानांतील अनेक मुस्लिम पंडितांनीहि याच तऱ्हेचा उपदेश आपल्या बांधवांना केला आहे. ('भारतीय लोकसत्ता' या ग्रंथांत या विषयाचें विस्तृत विवेचन मीं केलें आहे. जिज्ञासूंनी तें पाहावें. पृष्ठ ४०२–४१२) अशा अभिमानानेच समाजाच्या अंगीं कर्तृत्वाचा उदय होतो. त्याला पराक्रम शक्य होतो. येथला मुस्लिम समाज भारताच्या बाहेरच्या मुस्लिमांच्या पराक्रमाचा वारसा अर्थातच सांगूं शकत नाही. येथले ख्रिस्ती आम्ही नेपोलियन, वॉशिंग्टन, न्यूटन यांचे वारस आहों, असें म्हणूं लागले तर तें हास्यास्पद होईल; आणि फ्रेंच किंवा इंग्लिश लोक त्या तत्त्वावर त्यांना कधीहि जवळ करणार नाहीत. ते ख्रिस्ती असले तरी भरत-भूमीच्या प्राचीन पराक्रमाचे—रामकृष्णांचेच ते वारस होत. त्याचप्रमाणे मुस्लिमांचें आहे. ज्या भूमींत आपण राहतों तिच्या या वैभवाचा अभिमान जो समाज धरीत नाही त्याची उन्नति होत नाही. हें ध्यानीं घेऊन काँग्रेसने तसा अभिमान बाळगणाऱ्या राष्ट्रनिष्ठ मुस्लिमांनाच जवळ करावयास हवें होतें, पण तें न करतां मुस्लिमांनी काँग्रेसमध्ये यावें म्हणून देवाण-घेवाणीच्या बाजारी तत्त्वावर ऐक्य करण्याचे तिने प्रयत्न केले. कायदेमंडळांतील जागांचा व मंत्रिपदाचा सौदा करून लीगला वश करण्याचें धोरण तिने आखलें. त्यामुळेच भारताचा नाश झाला. राष्ट्रीय अहंकाराच्या जाणिवेंतून त्यागाची

प्रेरणा मिळत असते. हिंदूंचा हा अहंकार काँग्रेस पदोपदीं दुखवीत असे, आणि मुस्लिमांत तर तो निर्माणच झाला नाही. त्यामुळे पाकिस्तानी वृत्ति बळावत गेली व मुस्लिम अत्याचार करूं लागले. पण त्याचा प्रतिकार करण्यासाठी काँग्रेसने संघटना उभारण्याचेंहि नाकारलें. कारण राष्ट्रशत्रूंची हिंसा तिला वर्ज्य होती, आणि या अहिंसक वृत्तीमुळे भारताची घोर हत्या मात्र घडली.

पण या अनुभवाने शहाणे होण्याचें मात्र काँग्रेसचे नेते नाकारीत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचें भावनात्मक ऐक्य घडविण्याचा विश्वप्रयत्न व्हावयास हवा होता. येथल्या परंपरेच्या ओघांत, अमेरिकेप्रमाणे सर्वांना मिसळून टाकण्यासाठी काँग्रेसच्या नेत्यांनी अपार कष्ट करावयास हवे होते. पण राष्ट्रनिष्ठा याचा जो अर्थ प्रत्येक देश जाणतो तो भारताच्या नेत्यांना मान्य तरी नसावा किंवा कळत तरी नसावा असें वाटतें. नाहीतर मुस्लिम लीगशीं – आम्ही जिनांचे वारसदार आहों म्हणून जाहीरपणें सांगणाऱ्यांशीं – त्यांनी सख्य केलें नसतें. केरळांतील मुस्लिम लीगचा जाहीरनामा मल्याळी भाषेंत असल्यामुळे आपण वाचला नव्हता असें पंडितजी म्हणाले. पण तो वाचण्याची जरुरी काय होती ? तो काय असणार हें गेल्या चाळीस वर्षांच्या अनुभवाने ध्यानांत येण्यास हरकत नव्हती; पण त्यांना तें ध्यानांत घ्यावयाचेंच नाही हें खरें आहे. कारण ही कांही अपवादात्मक गोष्ट नाही. द्रवीड कळहम्‌चे नेते भारताच्या परंपरेचा वाटेल तो अवमान करतात, पण त्यांच्याशींहि काँग्रेस सख्य करते ! परक्या मिशनऱ्यांचे धर्मप्रसाराचे प्रयत्न भारताच्या ऐक्याला निश्चित घातक आहेत, असल्या धर्मान्तरानेच समाज पूर्वपरंपरेंतून तुटून निघतात, तिचे विरोधक बनतात. असें धर्मान्तर परके ख्रिस्ती मिशनरी फार मोठ्या प्रमाणावर करीत आहेत याचे शेकडो पुरावे उपलब्ध झाले आहेत. नियोगी कमिटीचा तसा अभिप्राय आहे. बैतुलपूरच्या महारोग्यांच्या इस्पितळांतील रोग्यांनी तशा तऱ्हेची तक्रार राज्यपाल पाटसकरांच्याकडे केलेली आहे. मंगलोरच्या 'क्रुसेडर्स लीग'च्या विरुद्ध हीच तक्रार आहे. नाग टोळ्यांच्या बंडाळीमागे परके मिशनरी आहेत असेंहि दिसून आलें होतें. भारतीय ख्रिस्ती लोकांनीसुद्धा परक्या मिशनऱ्यांना विरोध दर्शविला आहे. यासाठीच असें छळाने, कपटाने होणारें धर्मान्तर

कायद्याने बंद करावें असा ठराव प्रकाशवीर शास्त्री यांनी लोकसभेंत आणला होता; पण कॉंग्रेसने तो मान्य तर केला नाहीच, उलट तिचा मंत्रिमहाशयांनी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केलेल्या सेवेचा गौरवच केला! ही सेवा करतांनाच भारताच्या एका महाशक्तीवर हे परके मिशनरी केवढा घाव घालीत आहेत याची जाणीव कॉंग्रेसजनांना नाही काय? सरहद्दीवरच्या जमातींच्या बाबतींत हेंच घडत आहे. श्री. ह. वि. कामत यांनी नेपाळ, भूतान, कॅलिम्पांग या भागांत हिंडून, माहिती जमा करून 'कम्युनिस्ट चायना कॉलनायझेस तिबेट, इन्व्हेड्स इंडिया' या नांवाची एक पुस्तिका लिहिली आहे, सरहद्दीच्या भागांतील लोकांची मनोवृत्ति काय आहे हें तीवरून स्पष्ट दिसून येईल. कॅलिम्पांग येथील एका दुकानदाराने श्री. कामत यांनी दिलेलें एक भारतीय नाणें नाकारलें. हें नाणें सर्व हिंदुस्थानांत चालतें, असें कामतांनी सांगितलें तेव्हा तो दुकानदार म्हणाला, 'पण हा देश निराळा आहे'. स्वातंत्र्य मिळून आज बारा वर्षें होऊन गेलीं, पण सरहद्दीवरच्या भारतीयांना, तेथील जमातींना शान, कुमान, काचीन, नाग या लोकांना भारत हा आपला देश आहे असें दृढनिश्चयाने वाटलें पाहिजे असे कसलेहि प्रयत्न कॉंग्रेसने केलेले नाहीत. चीनने मात्र अत्यंत धडाक्याने या जमातींत प्रचार चालविला आहे. उद्या युद्ध जुंपलें तर आपल्याला चीनकडे जाणें श्रेयस्कर आहे, ही भावना चीनचे नेते या प्रदेशांत निर्माण करून ठेवीत आहेत. म्हणजेच त्यांची भारतनिष्ठा विचलित करीत आहेत. पण विचलित करीत आहेत, असें तरी कां म्हणावें? ती निष्ठा तेथे आपण कधी प्रस्थापित तरी केली होती का? तिचें महत्त्व आज तरी आपण जाणलें आहे काय?

परंपरेचा अभिमान हें जें राष्ट्रभक्तीचें अत्यंत सोज्ज्वळ अंग त्याची जेथे ही परवड, तेथे परक्यांचा, आक्रमकांचा, जुलमी राज्यकर्त्यांचा द्वेष या दुसऱ्या अंगाची काय स्थिति असेल याची कल्पना सहज करतां येईल. शत्रूवर प्रेम करावें हीच शिकवण कॉंग्रेसचे नेते भारताला देऊं लागले आणि द्वेष, प्रक्षोभ, संताप, ही कांही त्याज्य, हीन, निंद्य भावना आहे असा उपदेश येथे होऊं लागला. वास्तविक आक्रमकांचा द्वेष, मातृभूमीवर अत्याचार करणाऱ्यांविषयीचा जहरी संताप, तीव्र अमर्ष, ही अत्यंत शुद्ध व सात्त्विक

भावना आहे. एरव्ही आपण सामान्य माणसें शेजाऱ्यांचा, भाऊबंदांचा द्वेष करीत राहतों, त्याच्या बुडाशीं हीन असा स्वार्थ असतो; पण आक्रमकांच्या द्वेषामागे राष्ट्रीय स्वार्थ असतो. त्यामुळे माणसांतलें हीण जळून जातें, त्याच्या मनाचें उन्नयन होतें व तो वाटेल त्या पराक्रमाच्या कोटी करावयास सिद्ध होतो. भारतांतल्या हजारो क्रान्तिकारकांनी मातृभूमीवरील प्रेमाचें दुसरें अंग जें इंग्रजांचा द्वेष त्या द्वेषामुळेच अंदमान साहिलें, वधस्तंभ सोसला. महात्माजींच्या सत्याग्रहाच्या चळवळींत जे सामील झाले तेहि इंग्रजांच्या द्वेषानेच प्रेरित झाले होते. इंग्रजांवर प्रेम त्यांपैकी कोणीच करीत नव्हता, आणि मातृभूमीचें प्रेम व इंग्रजांचा द्वेष यामुळेच भारताच्या भिन्न प्रांतांत ऐक्य टिकून होतें. समान शत्रु, समान आपत्ति हा ऐक्याला पोषक असा घटक आहे.

'रॉयल इन्स्टिटयूट ऑफ इंटरनॅशनल अफेअर्स' या संस्थेने 'नॅशनॅलिझम' या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया इत्यादि देशांत राष्ट्रनिष्ठेचा उदय व परिपोष कसा झाला तें विवरून सांगितलें आहे. एक धर्म, भाषा, परंपरा इत्यादि कारणें देऊन दर ठिकाणीं अंतिम निर्णायक कारण म्हणून परक्यांचें आक्रमण हें दिलेलें आहे. इंग्लंडमध्ये राष्ट्रभावना उदित झाली ती फ्रान्सबरोबर झालेल्या शतवार्षिक युद्धामुळे. नेपोलियनच्या आक्रमणामुळे जर्मनी संघटित झाला. त्याच्या आधी हें घडून येत नव्हतें. रशियावर १८१२ सालीं नेपोलियनने स्वारी केली त्या वेळीं त्याचा अहंकार दुखावला आणि अगोदर फ्रेंचमय होऊन गेलेले सरंजामदारहि फ्रेंचांच्या द्वेषाने पेटून गेले व मातृभूमीच्या रक्षणासाठी उभे राहिले. (या ग्रंथाचीं पहिलीं पांच प्रकरणें पाहावीं. ग्रंथ इंग्लंडमधल्या सहा सात पंडितांनी मिळून अनेक वर्षें संशोधन करून लिहिला आहे आणि युरोपांतल्या वीस पंचवीस इतिहासवेत्त्यांनी तो तपासून पाहिला आहे.) जपानमध्ये १८५४ च्या आधी तीनशे वर्षें नुसता अंधार होता. अराजक होतें. दुही, फूट, मत्सर, परस्परांचा द्वेष, जातीय वैमनस्य यांनी, स्वातंत्र्योत्तर भारताप्रमाणे, तेथे नुसती बजबज माजली होती. इतकी की, अमेरिकन सेनापति कमोडोर पेरी याने नुसत्या तोफांच्या दहशतीने जपानला शरण आणलें. पण या परकी आक्रमणामुळेच जपानी लोक खडबडून जागे झाले.

अमेरिकेविषयीच्या द्वेषाची आग सर्व देशभर पसरली, आणि त्या आगींत क्षुद्र भेद, जातीय भेदसुद्धा पार जळून गेले. वाटेल त्या त्यागास जपानी सिद्ध झाले, आणि थोड्याच अवधींत त्यांनी आपला देश बलाढ्य, समृद्ध व समर्थ करून टाकला.

हिंसा, द्वेष यांतून कधी चांगलें निर्माण होत नाही, झालें तरी तें टिकाऊ नसतें, असें सध्याचें कॉंग्रेसचें तत्त्वज्ञान आहे. पण इतिहासाला तें मंजूर नाही. १८५४ पूर्वी जपानमध्ये मातृभूमीचा अभिमान होताच, पण अमेरिकेच्या द्वेषामुळे त्यांतून स्फुलिंग बाहेर पडले, आणि मग त्यांतून जपानच्या सर्व गुणसंपदेचा उदय झाला. पण जपानचाच काय ? सर्व मानवी संस्कृतीचा इतिहासच असा आहे. ग्रीक, रोमन, युरोपीय, अमेरिकन, भारती, मिसरी– सर्व, सर्व संस्कृतींच्या पायाशीं हिंसाच होती. शेकडा ६०–७० जनांना गुलामगिरींत पिचत ठेवल्यावांचून त्या काळांत संस्कृतीचा उदय होणेंच शक्य नव्हतें. तरी त्या संस्कृतींनी अमर कार्य केलें आहे. जर्मनी, रशिया, जपान यांचे इतिहासहि तेंच सत्य दर्शवितात.

जर्मनी, रशिया, जपान हे देश दण्डसत्तेचे, एकतंत्री सत्तेचे पुरस्कर्ते आहेत म्हणून राष्ट्रीय ऐक्यासाठी परक्यांचा द्वेष चेतविणें त्यांना अवश्य आहे असें कोणास वाटेल. पण अमेरिकेच्या इतिहासांतहि हेंच दिसून येतें. (इंग्लंडचें उदाहरण वर दिलेंच आहे.) अमेरिका स्वतंत्र होण्याआधी तेथे तेरा वसाहती होत्या, आणि त्यांचे आपसांत नित्य कलह, संघर्ष चालू होते. पण इंग्लिशांनी त्यांच्यावर जुलूम केला. त्याचा संताप येऊन त्या सर्व वसाहती प्रतिकारार्थ एक झाल्या व त्यांतूनच आजच्या महान् अमेरिकन राष्ट्राचा जन्म झाला. पुढे अमेरिकेंत येऊन राहिलेल्या भिन्न भिन्न युरोपीय जमातींना पूर्ण अमेरिकन करून टाकून एकसंध समाज निर्माण करण्याचें कार्यहि परराष्ट्रांशीं युद्ध, संघर्ष यांमुळेच झालें असें इतिहासवेत्ते सांगतात. अमेरिकेंतील यादवी युद्धांतून उत्तर-दक्षिणेंत जो दूरीभाव निर्माण झाला होता तो स्पेन-अमेरिका युद्धामुळे, म्हणजे दोघांनाहि समान शत्रु निर्माण झाल्यामुळे बराचसा कमी झाला, आणि मग राष्ट्रीय भावनेवर कळस कोणीं चढविला ? तर विड्रो विल्सन यांनी ! हें सांगतांना वरील ग्रंथाचे (नॅशनॅलिझम) लेखक म्हणतात, ‘ दुसऱ्या राष्ट्राचा सांघिक द्वेष करण्याचें

अथवा सामूहिक रीत्या संतापून उठण्याचें सामर्थ्य हें जर राष्ट्रनिष्ठेचें एक लक्षण असेल (आणि तें फार मोठें लक्षण आहे हें या ग्रंथांत अनेक ठिकाणीं सांगितलें आहे.) तर १९१७ सालीं अमेरिका हें संपूर्ण अर्थाने राष्ट्र झालें असें म्हटलें पाहिजे.

युद्ध, परराष्ट्राशीं संघर्ष, परक्यांच्या द्वेषामुळे, संतापामुळे सामुदायिक उठावणी करण्याचें सामर्थ्य याचें राष्ट्राच्या घडणीच्या दृष्टीने जें महत्त्व आहे तें प्रत्येक राष्ट्राच्या विवेचनांत या ग्रंथांत आवर्जून सांगितलें आहे आणि शेवटीं विश्वराष्ट्राचा विचार करतांना तशी विश्वसंघटना होण्याचा संभव नाही असें सांगून त्याचें एक कारण म्हणून बाह्य राष्ट्रसंघर्षाचा अभाव हें दिलें आहे. एका तत्त्ववेत्त्याने तर मंगळ, शुक्र, यांच्याशीं दळणवळण सुरू होऊन त्यांच्याशीं संघर्ष सुरू होईपर्यंत विश्वराष्ट्र घडणेंच शक्य नाही असें म्हटलें आहे. याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. भिन्न धर्म, भिन्न जाती, भिन्न पंथ या सर्वांनी ऐक्य करावयाचें म्हणजे सर्वांनाच मोठा त्याग करावा लागतो, संयम ठेवावा लागतो, कांही अपमान सोसावे लागतात. हें सर्व ते समाज केव्हा करतील? सर्वांवर प्राणसंकट आलें, सर्वांवर आक्रमण झालें, सर्वनाश दिसूं लागला तर. म्हणून त्या वेळीं जी परद्वेषाची भावना निर्माण होते ती समाज जगण्याला अवश्यच असते, आणि अखिल समाजाच्या हित-बुद्धींतून ती निर्माण झालेली असल्यामुळे ती अगदी उदात्त व सात्त्विक अशीच असते. खेड्यापाड्यांतल्या, आळीआळींतल्या क्षुद्र स्वार्थापायी जे रागद्वेष निर्माण होतात, म्युनिसिपालिट्यांतल्या भांडणांतून जे किळसवाणे मत्सर व विद्वेष जोपासले जातात त्यापेक्षा अखिल भारताच्या शत्रूविषयीचा जो द्वेष तो कितीतरी सोज्ज्वळ व उदात्त आहे. कारण या द्वेषाला स्वार्थाचा संपर्कहि नसतो. स्वार्थ असला तरी तो राष्ट्रीय स्वार्थ असतो. आणि त्यामुळेच निर्माण झालेले रागद्वेष हे अतिशय उंच पातळीवरचे असतात. सामान्य रागद्वेषांत, वैय्यक्तिक क्षुद्र स्वार्थांत बरबटलेल्या मनुष्याला एवढ्या उंचीवर नेतां आलें तर समाजाचा तो फार मोठा उत्कर्ष आहे, ती फार मोठी प्रगति आहे यांत शंकाच नाही.

पण भारताच्या नेत्यांचें एवढ्या उंचीवर, या प्रगतीवर, समाधान नाही. सर्व समाजाने वैश्विक उंची गाठली पाहिजे, व्यक्तीचा आत्मा मानवतेइतका

विशाल झाला पाहिजे, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' 'जो खांडावया घाव घाली, कां लावणी जयाने केली, दोघां एकचि साउली, वृक्षु दे जैसा,' हा उपदेश संतांनी परमार्थांत केला. तो समाजकारणांत, राजकारणांत, राष्ट्रीय व्यवहारांत आणावयाचा अशी त्यांची प्रतिज्ञा आहे. सत्याने असत्य जिंकावें, अहिंसेने हिंसा जिंकावी हें तत्त्व राजकारणांतहि प्रभावी झालें पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. यामुळे या देशावर पूर्वीहि अनेक वेळां महान् आपत्ति ओढवल्या आहेत, आणि दुर्दैवाने आजहि तेंच घडत आहे.

मुख्य आपत्ति म्हणजे असल्या उपदेशाने समाजाला मरगळ येते. कारण असलीं श्रेष्ठ ध्येयें, उदात्त तत्त्वें त्याला कळत नाहीत. संतांनी स्त्रीपुत्रांची निंदा करून संसाराचीं किळसवाणीं वर्णनें करून माणसांच्या सामान्य रागद्वेषांची उपेक्षा केली. षड्विकार हे रिपु आहेत असें सांगितलें. त्यामुळे संतांना इष्ट तो परमार्थ तर साधला नाहीच, पण येथला माणूस ५०० वर्षेंपर्यंत मरगळून कर्तृत्वहीन झाला होता, पण त्याच्यापेक्षा वाईट गोष्ट म्हणजे क्षुद्र रागद्वेष नाहीसे झाले नाहीत ते नाहीतच. ते उलट आणखी प्रबळ झाले, आणि मग याचा अत्यंत वाईट परिणाम झाला. तोंडाने उच्च तत्त्वांचा जप करावयाचा आणि प्रत्यक्ष जीवन खातेऱ्यांत घालवावयाचें, दृष्टि तारामंडळाकडे ठेवावयाची आणि उभें शेणांत राहावयाचें, असा कमालीचा मिथ्याचार भारतांत सुरू झाला. पण दुसरें कांही घडणेंच शक्य नाही. मनुष्याच्या जीवनांत पाशवी वासना प्रबळ असतात. त्यांना योग्य वळण लावून, त्यांचें उन्नयन करून त्याला मानव बनविणें एवढेंच खरोखर शक्य आहे, पण आपण त्याला देव करण्याच्या प्रयत्नांत नेहमी असतो. त्यामुळे तें तर साधत नाहीच; उलट मानवांतला पशुमात्र उसळून नंगा नाच घालूं लागतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या दहाबारा वर्षांचा आपला इतिहास पाहिला तर या भीतिदायक सत्याचा आपल्याला चांगलाच प्रत्यय येईल. तेथल्या नुसत्या विद्यार्थिवर्गाच्या लीला पाहिल्या तरी या भूमींत माणसेंच राहतात काय, अशी कोणालाहि शंका आल्यावांचून राहणार नाही. मग त्याच्या जोडीला म्युनिसिपालिटयांतले नगरपिते, प्रत्येक वस्तूंत काळाबाजार करून जनतेला हैराण करून टाकणारे व्यापारी, अन्नांत, औषधांत भेसळ करणारे कारखानदार,

ते पोलीस, ते अधिकारी यांची भर घातली तर काळजाचा ठाव सुटतो. हें सर्व कां व्हावें? १९४७ पूर्वी अखिल भारतीय जनतेसमोर कांही ध्येय होतें. स्वातंत्र्यप्राप्ति हें तें ध्येय होतें आणि त्यासाठी कांही त्याग करावा, संयम करावा, विवेकाने आपल्या पशुवासना आवराव्या अशा वृत्तीची जोपासना येथे होत होती. आजहि भारतांत ध्येय आहे, राष्ट्रविकास योजना हें कांही सामान्य ध्येय नाही. त्यांत माणसाचा स्वार्थहि आहे, पण एकतर मागल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे येथले नेते व अधिकारी अत्यंत लोभी, स्वार्थी व केवळ भाडोत्री असल्यामुळे त्या स्वार्थाच्या लाभाची जनतेला खात्री नाही, पण त्यापेक्षाहि महत्त्वाची गोष्ट ही की, हौतात्म्याची प्रेरणा द्यावी असें तें ध्येय नाही. राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें ध्येयमात्र तसें आहे. राष्ट्रावर आलेल्या आक्रमणाचा प्रतिकार हें ध्येय तसें आहे. त्या प्रतिकाराच्या भावना प्रदीप्त झाल्या की, त्यांतून रागद्वेष चेततात (राग म्हणजे स्वराष्ट्राचें प्रेम आणि द्वेष म्हणजे शत्रुराष्ट्राचा द्वेष). त्यामुळे लोक त्याग, संयम, आत्मबलिदान याला तयार होतात. मग विकासयोजनासाठी कष्टाला ते तयार होतील यांत शंका कसली?

चीनने भारतावर १९५४ सालीं आक्रमण केलें. त्याच वेळीं सर्व भारतभर दौरा करून काँग्रेसने चीनविषयीच्या द्वेषाचा वडवानल भारतांत पेटवून द्यावयास हवा होता. त्यामुळे आज मरगळून गेलेले भारतीय जिवंत झाले असते. विकासयोजनांचा व युद्धांत चीनला जो प्रतिकार करावयाचा त्याचा संबंध किती निकट आहे तें हजारो प्रचारकांनी खेडुतांना पटवून दिलें असतें, तर आज त्या योजनांमागे जनता नाही म्हणून आक्रोश करण्याची पाळी आली नसती. आज आपल्या उन्नतीच्या सर्व योजना भाडोत्रीपणें चालल्या आहेत. याचीं अनेक उदाहरणें, अनेक प्रमाणें मागे दिलींच आहेत. आपले गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी सरकारी अधिकाऱ्यांची सर्वत्र भाडोत्री वृत्ति आहे असें म्हटलें आहे. पण काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची वृत्ति काय निराळी आहे? काँग्रेसने नेमलेल्या 'दहांच्या समितीने' जो अहवाल सादर केला तो अगदीं निर्णायक व तितकाच उद्बोधक आहे. समिति म्हणते : काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना तळमळ अशी नाहीच. कोणत्याहि प्रश्नाचा गांभीर्याने ते विचारच करीत नाहीत. कसलाहि ध्येयवाद नसल्यामुळे त्यांच्यांत

ऐक्य टिकत नाही. कांग्रेसमध्ये सत्ता हेंच प्राप्तव्य आहे. सेवा ही वृत्तिच नाही. कांग्रेससंस्था ही सेवासंस्था म्हणून राहिली नाही. शिस्त व चारित्र्य यांचे मानदंड नाहीसे झाले आहेत. कांग्रेसकार्यकर्त्यांची राष्ट्रनिष्ठा ओसरत चालली आहे. (टाइम्स : २७–११–५९) हें सर्व कशामुळे झालें याचा आपण विचार केला पाहिजे. माझें असें निश्चित मत आहे की, आक्रमक चीनबद्दल जळता द्वेष आपण समाजांत पसरविला असता तर हें हीण सर्व जळून गेलें असतें, आणि लोक त्यागाला सिद्ध झाले असते. त्यांना तळमळ वाटली असती. त्यांच्या ठायीं सेवावृत्ति निर्माण झाली असती. प्रत्येक राष्ट्राच्या नेत्यांनी लोकांच्या या वृत्तीला साद घालून त्यांच्या मनाचें उन्नयन केलें आणि चारित्र्य, कर्तृत्व, राष्ट्रसेवा, अतुल त्याग इ. सद्‌गुणांची जोपासना समाजाच्या ठायीं करून राष्ट्र सामर्थ्यशाली केलें. शत्रूवर प्रेम करण्याचें पाप त्यांनी केलें नाही.

तें पापच आहे. अत्यंत निंद्य व गर्हणीय असें पाप आहे. कारण लाखांतल्या एकाहि माणसाला तें शक्य नसल्यामुळे तसल्या उपदेशाने समाजांत मिथ्याचार सुरू होतो. ब्रह्मचर्याचा व संन्यासाचा सार्वत्रिक उपदेश केला तर परिणाम काय होतो तें बुद्धधर्मीय विहारांनी व कॅथॉलिक धर्मीय मठांनी जगाला सांगितलें आहे. या विहारांत व मठांत अत्यंत हिडीस व भयानक अत्याचार माजले होते. शत्रूवरील प्रेमाच्या उपदेशाने हेंच होणार आहे, झालें आहे, होत आहे. वैयक्तिक जीवनांत हा उपदेश ठीक आहे, पण राष्ट्रीय जीवनांत असल्या उदात्त तत्त्वांचा उपदेश करणें अत्यंत घातक आहे. सामान्य मानवी जीवनांतून रागद्वेष, स्वार्थ, अहंकार कधीहि नष्ट होणार नाहीत आणि मानवाच्या ठायींच्या त्या मोठ्या शक्तिच आहेत. त्यांचा सात्त्विकतेच्या प्रेमाने साधुसंतांनी अवमान केला तर समाज पौरुषहीन होतो, निःसत्त्व होतो. म्हणून स्वार्थाला राष्ट्रीय स्वार्थाचें रूप देणें, अहंकाराचें राष्ट्रीय अहंकारांत रूपांतर करणें आणि द्वेष, अमर्ष या शक्तीला सामुदायिक रूप देऊन आक्रमकांविरुद्ध त्या अग्निज्वाळेचा उपयोग करणें हाच समाजाची उन्नति करण्याचा राजमार्ग होय. हें न केलें तर ही ज्वाळा उलटी फिरते व समाजाचा नाश करते. परक्यांचा, आक्रमकांचा द्वेष त्याला शिकवला नाही तर तो स्वकीयांचा, आप्तजनांचा द्वेष करूं लागतो. आक्रमकांच्या हिंसेला

त्याला प्रवृत्त केलें नाही तर तो स्वकीयांची हिंसा करूं लागतो. सध्यां भारतांत हेंच चालूं आहे. शत्रूंशीं अहिंसा व भारतीयांवर रोज तीन वेळां गोळीबार! पाकिस्तानशीं प्रेमाने वाटाघाटी. त्याने अत्याचार केले, गांवें बळकावलीं तरी प्रेमाने वाटाघाटी! आणि बेळगांव सीमेवर हिडीस पाशवी अत्याचार, आणि तें करणाऱ्यांना राष्ट्रपतिपदक!

पण भारताला हा शापच आहे. अतिरेकी, अव्यवहारी सात्त्विकतेच्या, औदार्याच्या बेहोषीने स्वजनांच्या हिताचा नाश करावा आणि त्यांतच श्रेष्ठ धर्म आचरल्याचा अभिमान मिरवावा, अशी वृत्ति जोपासली जाणें हा भारताला शापच आहे. आम्हांला सत्य, औदार्य सुचावयाचें तें परक्याशीं वागतांना. धर्मराजा फासे खेळावयास बसला. भीमाने ठार मारलेल्या राक्षसाच्या हाडाचे फासे केले होते. त्यामुळे भीमाने आरोळी मारली की, पांडवांना अनुकूल दान पडे. त्यावर शकुनीने तक्रार केली. तेव्हा धर्माने भीमाला ओरडण्याची बंदी केली. कारण काय? कांही नाही. केवळ औदार्य, शत्रुप्रेम! पुढे कौरवांचें कपट ध्यानांत आल्यावर धर्मराजाने तसें स्वच्छ सांगून खेळ बंद करावयास हवा होता, पण तसें त्याने केलें नाही. कारण वचननिष्ठा! मनांत विचार असा येतो की द्रौपदीला पणाला लावतांना तिला विवाहांत दिलेल्या 'नातिचरामि' या वचनाने तो बद्ध नव्हता काय? तिला त्याने पणाला लावली ही केवढी हिंसा आहे! केवढा वचनभंग आहे! पण त्याच्या यातना स्वकीयांना भोगावयाच्या होत्या. त्याला धर्मराजाची हरकत नव्हती. आमच्या सर्व श्रेष्ठ निष्ठांचा फायदा नेहमी शत्रूलाच मिळावयाचा! स्वतःच्या स्त्रीच्या बाबतींत धर्मराजाने धर्मद्रोह केला. हिंसाच केली. मग तशीच हिंसा, तसाच वचनभंग तिच्या वस्त्राला दुःशासनाने हात घालतांच पुन्हा करून त्याने ती विटंबना थांबविणें अवश्य होतें. पण ती हिंसा परक्याच्या बाबतींत झाली असती. ती आम्हांला वर्ज्य आहे. पहिली हिंसा स्वजनांच्या बाबतींत होती. तिने जगाला आमचें औदार्य दिसतें. या औदार्यामुळेच पुढे अखिल भारतांतल्या क्षत्रियांचा, १८ अक्षौहिणींचा संहार झाला. मुस्लिम लीगवरील कॉंग्रेसच्या प्रेमामुळे पाकिस्तान निर्माण होऊन लाखो हिंदवासीयांचा जसा संहार झाला त्याच प्रकारची ही पूर्वावृत्ति होती. त्या वेळीं जर धर्मराजाने हिंसा करून, वचननिष्ठा सोडून द्रौपदीची विटंबना

थांबविली असती तर पुढील घोर हिंसा टळली असती, पण मग धर्मराजाला जागतिक कीर्ति मिळाली नसती! आजहि टॉयनबीसारखे पंडित येथे येऊन भारताची जी प्रशंसा करतात तिला आपण मुकलों असतों! राष्ट्रीय स्वार्था-पलीकडे भारताला कांही दिसत नाही अशी त्याची जगभर अपकीर्ति झाली असती! त्या सभेंत भीष्म, द्रोण यांनीहि कांही तत्त्वज्ञान सांगून द्रौपदीची विटंबना खुशाल होऊं दिली. वास्तविक स्त्रीची विटंबना थांबविणें हा सर्व-श्रेष्ठ धर्म होय. तें सर्वश्रेष्ठ सत्य होय. पण निरनिराळीं तत्त्वें सांगून त्या वेळचे सर्व दळे पुरुष स्वस्थ बसले. विटंबनेचा संताप आला फक्त भगवान् श्रीकृष्णाला. पण त्यामुळेच त्या वास्तववादी, व्यवहारवादी, स्वजनप्रेमी महान् तत्त्ववेत्त्याला, भारताच्या त्या महापुरुषाला आम्ही पद्धतशीरपणें विसरलों आहों, कारण समाजशत्रूंचा संताप भारतीयांना वर्ज्य आहे! स्वजनहिंसा मात्र वर्ज्य नाही!

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या राष्ट्रध्वजाचें स्वरूप ठरविण्याची वेळ आली त्या वेळीं ज्यांचें पावन नाम हजारो वर्षे भारतीयांच्या कानांत घुमत राहिलें आहे, ज्यांच्या स्मरणाने त्यांच्या वृत्ति उचंबळून येतील त्या राम-कृष्णांचें स्मरण कोणत्याहि कॉंग्रेस कार्यकर्त्याला झालें नाही. त्यांना आठवला तो सम्राट् अशोक! कारण तो अहिंसावादी होता, आणि श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण हे शस्त्रधर होते. शत्रूचा त्यांना संताप येत असे. चीड येत असे. स्त्रियांची विटंबना त्यांना सहन होत नसे, आणि या अमर्षामुळे त्यांनी शत्रूंचा संहार केला. अर्थातच कॉंग्रेसला त्यांचें नाम वर्ज्यच झालें. पण कोटयवधि भारतीयांपैकी अशोकाचें स्मरण होतांच ज्यांना स्फुरण चढेल, ज्यांच्या अंगावर रोमांच येतील असे किती आहेत? ज्या खेडयापाडयांत आमच्या नेत्यांना जागृति निर्माण करावयाची आहे, त्यांपैकी किती खेडयांत अशोकाची पूजा होते? अशोकाचें नांव माहीत असणारे तरी किती आहेत? हजारांत एक, लाखांत एक तरी असेल का? मदर रशिया या पुस्तकांत रशियाच्या दुसऱ्या महायुद्धांतील पराक्रमाविषयी लिहितांना मॉरिस हिंडसनने म्हटलें आहे की, रशियाचे नेते कार्ल मार्क्सला मानीत. पण हा अज्ञात पुरुष रशियन जनतेला स्फूर्ति देण्यास असमर्थ होता, म्हणून कम्युनिस्टांनी आपल्या ध्वजावरचें त्याचें ध्येयवाक्य काढून टाकलें आणि महाराणा पीटर, अलेक्झँडर

नेव्हस्की यांच्या नांवाचा ते घोष करूं लागले. राष्ट्रध्वज हें पराक्रमाचें स्फूर्तिस्थान असावयास पाहिजे, आणि स्फूर्ति ही युगायुगांच्या स्मरणांतून, पूजनांतून प्राप्त होत असते. ती पराक्रमांतून, शत्रूच्या संहारांतून येत असते. भारतीयांच्या मनोमंदिरांत अशोकाला तें स्थान नाही. पण आमच्या नेत्यांनी हें जाणलें नाही आणि जाणलें असलें तरी आपल्या तत्त्वज्ञानाच्या आग्रहापुढे त्यांना या महाशक्तीची पर्वा नाही. श्रीकृष्णाचें सुदर्शन आणि दाशरथीचें धनुष्य यांचें त्यांना वावडें आहे. तेव्हा त्यांच्यापासून जनतेला स्फूर्ति मिळणार असली तरी राष्ट्रध्वजावर त्यांच्या स्मृतीला स्थान मिळणार नाही.

या सर्वांच्या मागे एक मोठें तत्त्व आहे. संताप, द्वेष, अमर्ष, क्रोध यांपासून आपल्या नेत्यांना भारतीय जनतेला मुक्त करावयाचें आहे. १९५४ सालींच चीनने भारतावर आक्रमण केलेलें आहे, पण पंडितजींनी तें जनतेला कां कळविलें नाही? जनतेंत प्रक्षोभ माजेल म्हणून! बंगालची फाळणी झाली. तेव्हा तिचा संताप येऊन लोकांत विलक्षण जागृति निर्माण झाली, लोक राष्ट्रभावनेने प्रेरित होऊन वाटेल त्या त्यागास सिद्ध झाले. त्या वेळीं लाला लजपतराय म्हणाले की, 'कर्झनसारखे व्हाइसरॉय इंग्रजांनी पुन्हा पुन्हा नेमले तर किती चांगलें होईल!' त्यांचा भावार्थ असा की, परक्यांच्या जुलमामुळे, आक्रमणामुळे लोकांत प्रक्षोभ माजतो आणि लोक राष्ट्रसेवेसाठी अवश्य तो त्याग करण्यास सिद्ध होतात. नेमका हाच प्रक्षोभ काँग्रेसच्या नेत्यांना नको आहे. मध्यंतरीं वृत्तपत्रांत कांही लष्करी अधिकाऱ्यांनीहि पत्रें लिहून पंडितजींचा पाठपुरावा केला होता. सर्वांना हीच चिंता आहे, की लोकांच्या भावना आता चेतविल्या जातील कीं काय? द्रौपदीची विटंबना विनाप्रक्षोभ पाहणाऱ्यांची परंपराच या अधिकाऱ्यांनी पुढे चालविली यांत शंका नाही. या वेळीं चीनच्या आक्रमणाकडे बोट दाखवून पंडितजींनी राष्ट्राला साद घातली असती तर लोकांची मरगळ नाहीशी होऊन त्यांच्या ठायीं चैतन्य आलें असतें. वास्तविक १९४७-४८ सालापासूनच हें जनताजागृतीचें धोरण अवलंबावयास हवें होतें. काश्मीरवर आक्रमण झालें होतें. गोव्याचा संघर्ष चालू होता. चीनने तिबेट गिळंकृत केला होता. या प्रसंगांनी सावध होऊन आपल्या नेत्यांना जनतेचें राष्ट्रप्रेम धगधगत ठेवतां आलें असतें, आणि मग आपसांतले मत्सर, गटबाजी, दुही, क्षुद्र स्वार्थ, द्वेष हें सर्व

त्या अग्नींत खाक होऊन लोक उत्साहाने राष्ट्रकार्याला लागले असते. आज भारतीयांची शक्ति परस्परांच्या द्वेषांत खर्च होत आहे. ती शत्रुद्वेषाने संघटित झाली असती व आपल्या सर्व योजना सफळ झाल्या असत्या. प्रत्येक देशांत हें घडलें आहे, घडत आहे; पण प्रक्षोभ, शत्रुद्वेष, वैराग्नि हें सर्व भारतीयांना वर्ज्य आहे. आमच्या नेत्यांची शुचितेवर श्रद्धा असल्यामुळे असल्या मार्गाने ते देशांत कदापि चैतन्य निर्माण होऊं देणार नाहीत. मात्र याचा परिणाम एकच होतो. शत्रुद्वेष, आक्रमकांविषयींचें वैर याऐवजी भारतीय जनता परस्परांचा द्वेष, एकमेकांविषयी वैर या भावना जोपासीत आहे. कर्तृत्वशून्य व पौरुषहीन होत आहे. तिला मरगळ येत आहे. कोणत्याहि कार्याविषयी तिला उत्साह नाही. भारत आणि चीन या आपल्या पुस्तकांत श्री. रा. कृ. पाटील यांनी एक उद्‌बोधक उदाहरण दिलें आहे. पंडितजी एकदा सिंद्री येथील खतांच्या कारखान्याला भेट देण्यासाठी गेले होते. तेव्हा त्यांनी तेथील मजुरांना विचारलें की, "तुम्ही येथे कोणासाठी काम करतां?" पंडितजींची अपेक्षा अशी की, राष्ट्रविकास योजनेसाठी, भारता-साठी, समाजकल्याणासाठी आम्ही काम करतों, असें ते म्हणतील. पण त्या मजुरांनी, 'आमच्या कंत्राटदारासाठी आम्ही काम करतों,' असें उत्तर दिलें. चीनमधला सामान्यांतला सामान्य कामगार, बूटपॉलिश करणारा मुलगासुद्धा राष्ट्रकार्याच्या जाणिवेने बोलतो याचीं अनेक उदाहरणें रा. कृ. पाटील यांनी दिलीं आहेत; आणि अनेक युरोपीय, व इतर पंडितांनी, प्रवाशांनीहि दिलीं आहेत. ६५ कोटी चिनी जनतेंत एवढी मोठी सामाजिक जाणीव निर्माण करण्यांत तेथील नेत्यांना यश आलें तें कशामुळे? कोणती किमया त्यांनी केली? चीनच्या प्राचीन वैभवाची भक्ति व आक्रमकांचा द्वेष ही ती किमया आहे. या ग्रंथांतील तिसऱ्या प्रकरणांत याचें विवेचन केलें आहे, म्हणून त्याची पुनरुक्ति येथे करीत नाहीं. पण आपणांवर आक्रमण करणाऱ्या दण्डसत्तांचें सामर्थ्य कशांत आहे हें मात्र वाचकांनी ध्यानांत घेणें अवश्य आहे.

ज्या चीनशीं आपला मुकाबला आहे त्याच्या सामर्थ्याचा आपण विचार केला तर प्रत्येक भारतीय चिंतातुर होईल. चीनच्या नेत्यांनी अनेक मार्गांनी, अनेक साधनांनी राजकीय दृष्टीने चीनच्या ६५ कोटी लोकांना प्रबुद्ध करण्या-साठी विश्वप्रयत्न तर केले आहेतच, पण त्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे

आज चाळीस वर्षें चिनी माणूस सारखा रणांगणांतच उभा असल्यासारखा आहे. तो चिआंग-कै-शेकच्या देशद्रोही फौजांशीं लढत आहे, जपानशीं लढत आहे, अमेरिकेशीं लढत आहे. या लढ्यांत तो अक्षरशः अग्नि-दिव्यांतून अनेक वेळां बाहेर आलेला आहे. जपानच्या आक्रमणाच्या वेळीं खेड्याखेड्यांत, घराघरांत चिनी माणूस लढत होता. आग, जाळपोळ, लूटमार, कत्तली हा जपान्यांचा नित्याचा खेळ होता. त्यांना तोंड देतां देतां बेडर झालेला, कडवट भावनांचा चित्तांत परिपोष करणारा, सर्व प्रकारच्या युद्धांत निष्णात असलेला, थंडी, वारा, ऊन, पाऊस, उपासमार, यमयातना यांची तमा नसणारा असा चिनी माणूस पोलादाने घडविलेला आहे. शून्याच्या खालच्या थंडींत आणि १२० अंशाच्या वरच्या उन्हांत तो सहज काम करूं शकतो. तुफान नद्या ओलांडणें, दऱ्या डोंगर चढणें, गहन अरण्यांत दिवस काढणें याची त्याला खातरजमा नाही. अशा ६५ कोटी चिन्यांशीं आपल्याला लढा करावयाचा आहे, आणि आपण कसे आहोंत? गेल्या शंभर वर्षांत आपण लढाई पाहिलेली नाही. आपल्या सैन्याने पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांत मिळून ८।१० वर्षें लढाई देखली आहे, पण ती शिपायांनी आणि तिसऱ्या चवथ्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनी. ( जनतेने नव्हे. ) याच्यावर इंग्रजांनी आपल्याला कधी जाऊं दिलेंच नव्हतें. युद्धाचें नेतृत्व करणें, योजना आखणें, सर्व व्याप डोळ्यांपुढे ठेवून त्याची चिंता वाहणें, व अनेक आघाड्यां-वर युद्ध चालविणें या कर्तृत्वाचा आपल्याला अभ्यासच नाही. शिवाय या सर्वां-तून जो कांही अनुभव आला असेल तो फक्त आपल्या शिपायांना आला आहे. जनतेला यांपैकी कशाचाच अनुभव नाही. जनता संग्रामांत उतरली होती ती सत्याग्रह-संग्रामांत. त्यांत पुष्कळांना 'अ' वर्ग मिळे, पुष्कळांना 'ब' वर्ग! त्या वेळीं तुरुंगांत दूध पिऊन पुष्कळांचीं वजनें वाढलींसुद्धा. सामान्य जनतेचे 'क' वर्गांत कांही हाल झाले, पण ते तुरुंगांच्या इमारतींत. अन्नवस्त्र तेथे निश्चित होतें. बर्फ नव्हतें, आग नव्हती, जाळपोळ नव्हती, कत्तल नव्हती. चिन्यांशीं तुलनेने पाहतां आपण लढाई अनुभवली आहे या म्हणण्याला काडीचाहि अर्थ नाही. अशा या चीनची अद्ययावत् सेना ३० लक्ष आहे, तर आपली ५ लक्ष आहे.

पण अत्यंत महत्त्वाचा फरक आहे तो असा की, स्वातंत्र्यप्राप्तीच्या क्षणा-पासून आपल्याला हें स्वातंत्र्य सुखाने कोणी भोगूं देणार नाहीं, कोठून

तरी आक्रमण येणारच ही जाणीव ठेवून युद्धसाधन-संभाराच्या आणि मानसिक प्रवृत्तीच्या दृष्टीनें चीनने तयारी केलेली आहे, आणि स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर आता युद्ध, लढाई संपली, आपल्यावर कोणी आक्रमण करणार नाही अशा पूर्ण विश्वासाने आपण दोन्ही दृष्टींनी युद्धपराङमुख राहिलों. आणि तसेच राहणार असें आपलें तत्त्वज्ञान आहे. विश्वबंधुत्व, शत्रुप्रेम, शांतता, पंचशील या उदात्त तत्त्वांनी पंडित जवाहरलाल इतके मोहून गेले की, चीन आपल्याला दगा देईल असें त्यांच्या स्वप्नांतहि आलें नाही. सर्व राजनीतीचें सार म्हणजे अविश्वास, असें महाभारतकार म्हणतात. 'संक्षेपो नीतिशास्त्राणां अविश्वासः परो मतः।' राजकारणांत कधीहि, कोणावरहि विश्वास ठेवूं नये असें तत्त्वज्ञान आहे; आणि निरागस बालभावाने सर्वांवर विश्वास हें ठेवावा असें आपलें तत्त्वज्ञान आहे, आणि त्यावर आपली इतकी श्रद्धा आहे की, आक्रमण झालेलें कळलें असूनहि पंचवार्षिक योजनेंतील औद्योगिक विकासांत युद्धसामग्रीचा समावेशहि आपण केला नाही. मेजर-जनरल परांजपे आपल्या भाषणांत म्हणतात, "आपल्या एकसारख्या चाललेल्या शांतिपाठामुळे युद्ध हा शब्द उच्चारणेंहि आतापर्यंत पाप होतें. त्यामुळे युद्धाचा देशांतील उद्योगधंद्यांशीं संबंध असतो याचाहि सर्वांना विसर पडला होता. त्यामुळे गेल्या दोन पंचवार्षिक योजनांत राष्ट्राची युद्धसंपत्ति वाढविण्यावर जो भर द्यावयास हवा होता तो दिला गेला नाही. संरक्षणदलाच्या काय गरजा आहेत, कोणत्या उद्योगांना प्राधान्य द्यावें, कारखाने कोठे उभारावेत इत्यादि गोष्टींचा विचारहि पहिल्या दोन योज-नांच्या आखणींत केला गेला नाही." (केसरी, २०-१२-५९). चीन आक्रमण करील ही कल्पनाच संभवनीय नसल्यामुळे सरहद्दीवरच्या रस्त्यांच्या बांधणीचा किंवा वाहतुकीच्या साधनांचा विचारसुद्धा भारताने केला नाही. चीनने मात्र तो विचार करून कृतिहि केली. भारताच्या सरहद्दींतच त्याने रस्ते बांधून काढले !

स्वातंत्र्यप्राप्तीच्या क्षणापासून संरक्षणाची, युद्धाची चीननें तयारी केली तशी आपल्याला करतां आली नसती असें नाही; पण तशी करावयाची नाही असें आपलें ठरलेलें आहे. जनतेंत प्रक्षोभ माजूं द्यावयाचा नाही, कारण द्वेषाने कधी कल्याण होत नाही, परराष्ट्राशीं लष्करी करार करावयाचा नाही,

कारण तो भेकडपणा आहे, आणि स्वतः युद्धसाहित्य सिद्ध करावयाचें नाही कारण आक्रमण होणारच नाही. पंचशीलाचीं तत्त्वें त्रिकालाबाधित आहेत अशी आपली श्रद्धा आहे. खरोखर भारतांतील क्षात्रधर्माची ही हत्या आहे. आश्चर्य असें की, सध्याचें आपलें हें तत्त्वज्ञान गांधीवादांत मुळीच बसत नाही. अन्यायाचा, आक्रमणाचा प्रतिकार केलाच पाहिजे हें महात्माजींचें पहिलें तत्त्व होतें. त्यांच्या सर्व तत्त्वज्ञानाचा तो आदि सिद्धान्त आहे. प्रतिकार शस्त्रबलाने करावयाचा कीं आत्मबलाने म्हणजे सत्याग्रहाने एवढाच प्रश्न मतभेदाचा होता. त्याबाबत त्यांचें मत असें की प्रतिकार सत्याग्रहाने करणें उत्तम, पण तें शक्य नसेल तर शस्त्रबलाने करावा. ते म्हणत की, प्रतिकार-शून्य राहून राष्ट्र पौरुषहीन होण्यापेक्षा हजार वेळां हिंसा झालेली चालेल. या दृष्टीने पाहतां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक तर कॉंग्रेसने सत्याग्रहसेना तयार करण्याच्या मार्गास लागणें अवश्य होतें आणि काश्मीर, गोवा, हैदराबाद येथे ती सेना पाठवून प्रतिकार करावयास हवा होता. तिबेटवर आक्रमण झालें तेव्हाहि शांतिसेना तेथे पाठविणें अवश्य होतें. कारण शेजाऱ्यावर हल्ला झाला असतांना तटस्थ राहणें हा महात्माजींच्या मतें भेकडपणा होय. आज चीनचें आक्रमण झालेलें पाहतांच लक्षावधि सत्याग्रही नागरिक स्त्री-पुरुष, वृद्धबाल तेथे जाणें अवश्य होतें. पण हा मार्ग सध्या आपण अनुसरत नाही. मग राहिला दुसरा मार्ग शस्त्रबलाचा. तो स्वीकारावयाचा असें बारा वर्षांपूर्वी ठरवून तेव्हाच तयारीला लागणें अवश्य होतें. त्यासाठी शस्त्रास्त्रें, रस्ते, वाहतुकीचीं साधनें, औद्योगिक उत्पादन यांच्या तयारीला प्रारंभ करावयास हवा होता. आणि महत्त्वाची तयारी म्हणजे समाजाच्या रागद्वेषाची चेतावणी ही होय. पण वर सांगितल्याप्रमाणे युद्धाच्या दृष्टीने औद्योगिक उत्पादनाचा आपण विचार केला नाही व राष्ट्राला प्रक्षुब्ध करणें हें आपल्याला निषिद्ध असल्यामुळे आपण कोणताच मार्ग अवलंबिलेला नाही. आणि सहा सहा वर्षे परकीय आक्रमण धर्मराजालाहि हेवा वाटावा इतक्या शांततेने आपण पाहात बसलों आहोंत. आपलें राष्ट्र सध्या पौरुषहीन झालें आहे, मरगळून गेलें आहे, कर्तव्यशून्य झालें आहे, त्याचें हें कारण आहे. धड शस्त्रवादी नाही व धड गांधीवादीहि नाही असें तृतीयपंथी, भ्रष्ट, तेजोहीन, चैतन्यहीन, स्फूर्तिशून्य तत्त्वज्ञान आपण स्वीकारलें आहे.

चीनच्या दण्डसत्तेने आपल्या लोकसत्तेला जें आव्हान दिलें आहे त्याला प्रत्युत्तर द्यावयास भारत समर्थ व्हावा अशी आपली इच्छा असेल तर काँग्रेसप्रणीत वरील अधम तत्त्वज्ञान आपण सोडलें पाहिजे, भारतांतून नष्ट केलें पाहिजे. आणि भारताचा राष्ट्रीय स्वार्थ हें एकच उद्दिष्ट आपल्या डोळ्यांपुढे आपण ठेवलें पाहिजे. भारताच्या जनतेचें जें कल्याण, तिचा ज्यांत ऐहिक उत्कर्ष, तिची जी भौतिक प्रगति, ती साधण्यासाठी जें करावें लागेल तेंच सत्य, तीच अहिंसा, तोच धर्म ही आपली दृष्टि असली पाहिजे. विश्वबंधुत्व, मानवता, पंचशील हीं तत्त्वें वंद्य आहेत, पण भारताच्या हिताच्या आड तीं येत असतील तर त्यांचा त्याग आपण केला पाहिजे. आपला स्वार्थ साधल्यानंतर त्या थोर तत्त्वांसाठी प्रत्येक राष्ट्राने कांही प्रयत्न करावे हें योग्यच आहे. पण सध्या निरपेक्षपणें त्यांची उपासना चालली असल्यामुळे भारतावर मोठी संकटपरंपरा कोसळत आहे. 'पंचशीलाचा जन्म पापांत झाला आहे' अशी जी कटु टीका आचार्य कृपलानी यांनी केली ती याच अर्थाने. चौ एन् लाय वाटाघाटीसाठी येणार असें ठरल्यानंतर भारतीय संसदेंतील सभासदांना एक भीति वाटूं लागली. ती अशी की, आपले पंतप्रधान चीनने व्यापलेला प्रदेश कदाचित् त्याला देण्याचें मान्य करतील, आणि त्यामुळे लोकसभेंत 'भारताचा तसुभरहि प्रांत चीनला देणार नाही', असें आश्वासन त्यांनी मागितलें. याचा अर्थ फार भयंकर आहे. राष्ट्रहितापेक्षा परक्यांना न्याय देण्यांत आपले नेते धन्यता मानतात, राष्ट्रीय स्वार्थ हें त्यांचें एकमेव लक्ष्य नसून कांही अंतिम, निरपेक्ष सत्याचे ते उपासक आहेत अशी जनतेला भीति वाटूं लागली आहे, असा त्याचा अर्थ आहे. आणि आतापर्यंत हेंच घडत आल्यामुळे लोकांना तसें वाटणें स्वाभाविक आहे. स्वयंनिर्णयाच्या उदात्त तत्त्वान्वयें आपण पाकिस्तान देऊन टाकलें. सार्वमताच्या तत्त्वासाठी काश्मीरचा प्रश्न नासून टाकला. तिबेट हा स्वायत्त प्रदेश आहे असें आपलें मत असूनहि १९५४ च्या एप्रिल-मध्ये झालेल्या हिंद-चीन करारांत तिबेट हा चीनचा भाग आहे हें आपण मान्य केलें, आणि मग थोर न्यायबुद्धीने ल्हासाला जाणाऱ्या व्यापारी मार्गावर आपलीं जीं लष्करी ठाणीं होतीं व आपलें पोस्ट व तार खातें यांच्या संरक्षणासाठी ज्या सैन्याच्या तुकड्या होत्या त्या आपण काढून

घेतल्या. आधीचे इंग्रज सेनापति असें करूं नका, यांत भारताला धोका आहे असें परोपरीने सांगत होते. पण न्यायबुद्धीपुढे भारताचें हित आपण गौण लेखीत असल्यामुळे आपण उदार मनाने सैन्य काढून घेतलें, आणि मग तिबेटचा स्वाहाकार शांतपणें पाहात बसलों. परवा चीनने आक्रमण केल्यानंतर 'तुमचें लांगजूच्या पूर्वेचें तामादेम हें लष्करी ठाणें मॅकमोहन रेषेच्या बाहेर आहे' असें भारताला त्यानें सुनावतांच भारताने कसून तपास केला व सत्य ध्यानांत येतांच आपण होऊन तें ठाणें सोडून दिलें. चीन मॅक-मोहन रेषा मानीत नाहीच, तरी पण आपण राष्ट्रीय स्वार्थापेक्षा सत्य श्रेष्ठ मानतों, तेव्हा हें ठाणें सोडणें अवश्यच होतें. आणि आता भारताचा कांही प्रदेश न्यायबुद्धीने पाकिस्तानला देऊन टाकावयाचा आहे! त्यासाठी घटना बदलून घेणें अवश्य झाल्यामुळे कॉंग्रेसनेत्यांनी तेंहि केलें आहे. कारण भारत सोडून सर्वांना न्याय देणें हेंच आपलें ध्येय आहे. परक्यांवर अविश्वास दाख-विणें हाहि आपल्या मतें अन्याय आहे, ती हिंसाच आहे. म्हणून १९५८ च्या जानेवारींत चीनचें लष्करी शिष्टमंडळ भारतांत आलें होतें, त्याला आपण आपलीं सर्व लष्करी ठाणीं दाखविलीं. टॅक्स्, विमानें, दारूगोळा सर्व कांही हिशेब दिला. त्याचा रोजचा दहा हजारांचा खर्चहि आपण केला, आणि चीनने आपल्यावर आक्रमण केलेलें असतांना, वाटेल ते आरोप चीन भारतावर करीत असतांना, चिनी लष्करी अधिकाऱ्यांना आपलें सर्व लष्कर, सर्व सरंजाम आपले संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन यांनी दाखविला. चीनने भारतावर आक्रमण करून आपल्या सैनिकांची हत्या केली अस-तांनाहि चीनला यूनोंत स्थान मिळवून देण्याचा आपण जो आग्रह धरला तो याच उदारबुद्धीनें होय. चीनने आक्रमण केलें, आपला प्रदेश बळकावला तरी त्याचा द्वेष करणें हें युक्त नव्हे, तें भारतीय संस्कृतींत बसत नाही; आणि भारत सोडून जगांत कोठेहि अन्याय होऊं द्यावयाचा नाही, अत्याचार घडूं द्यावयाचा नाही हें आपलें ब्रीद आहे. त्यामुळेच जगांत भारताची कीर्ति झाली आहे. परवा इंग्लंडचे मोठे इतिहासपंडित टॉनयबी येथे व्याख्यानासाठी आले होते. त्यांनी व्याख्यानांत सांगितलें की, भारतांतील पशुपक्षी, हिंस्र श्वापदें यांच्या मुद्रा पाश्चात्त्य जगांतल्या श्वापदांपेक्षा निर्भय दिसतात. येथला माणूस जास्त प्रेमळ, जास्त अहिंसावादी, उदार व निरागस

असल्याचेंच त्यांच्या मतें, हें द्योतक आहे. ही कीर्ति आपल्याला जास्त लोभनीय वाटते. मागे ऋषींच्या आश्रमांतच असें अहिंसक वातावरण असे. आता कांग्रेसच्या राज्यांत अखिल भारतांत तें पसरलें आहे हा भारतीय संस्कृतीचा फार मोठा विजय आहे! राष्ट्राच्या संरक्षणापेक्षा, सामर्थ्यापेक्षा या विजयाचा लोभ भारतीयांनाच जास्त आहे.

दण्डसत्तांच्या आक्रमणाला तोंड देण्यास भारत समर्थ व्हावा अशी जर आपली इच्छा असेल तर हा विश्वव्यापक तत्त्वांचा लोभ म्हणजे त्या कीर्तीचा लोभ आपण सोडला पाहिजे. हा फक्त कीर्तीचा लोभ आहे असें म्हणण्याचें कारण असें की, तीं विश्वव्यापक तत्त्वें प्रत्यक्षांत कधी अवतरत नाहीत. साकार होत नाहीत. समाज पौरुषहीन करून टाकण्याचें कार्य मात्र तीं करतात. अर्नोल्ड टॉयनबी यांच्या वर उल्लेखिलेल्या व्याख्यानांचा विषय ‘ विश्वराष्ट्र आणि भारत ’ असा होता. त्यांत विश्वराष्ट्र घडविण्यांत भारताने फार मोठी कामगिरी केली आहे अशी भारताची त्यांनी स्तुति केली आहे. ‘ संडे टाइम्स ’ मध्ये या व्याख्यानांचें परीक्षण करणारा टीकाकार कठोर वास्तववादी असावा असें दिसतें. “ या स्तुतीला आपण पात्र आहोंत काय ? ” असा नास्तिक प्रश्न त्याने केला आहे. भारतांत हीं तत्त्वें सांगितलीं गेलीं हें त्याला मान्य आहे. महावीर, बुद्ध, अशोक यांनी आणि अलीकडे महात्माजींनी या उदार, विश्वधर्माचा उपदेश केला हें खरेंच आहे. पण भारतांत, विश्वधर्म लांबच राहिला, केवळ भारताचेंहि ऐक्य घडलें नाही. भिन्न राजघराणीं, भिन्न जाति, पंथ, जमाती यांचे नित्य संघर्ष व कत्तली येथे चालू होत्या; आणि महात्माजींच्याहि डोळ्यांदेखत त्यांच्या साठ वर्षांच्या तपःसाधनेनंतर अत्यंत भयानक अशा कत्तली झाल्या. त्या थोर महात्म्याचीं तत्त्वें प्रत्यक्षांत कधीच आलीं नाहीत, असें सांगून हा टीकाकार म्हणतो की, गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास पाहतां टॉयनबी हा एक वेडा स्वप्नवादी वाटू लागतो. (संडे टाइम्स : २७–३–६०).

दुर्दैव असें की, आपण हें वेडें स्वप्नाळू तत्त्वज्ञान स्वीकारून आज स्वतःचा नाश करून घेत आहोंत आणि त्याहून शतपट दुर्दैव असें की, या तत्त्वाचा स्वीकार आपल्या नेत्यांनी प्रामाणिकपणें केलेला नाही. स्वतःच्या देशाच्या कारभारांत सत्य, अहिंसा, न्याय, औदार्य, समता यांची ते पदोपदीं अवहेलना

करतात, किंबहुना तेंच येथल्या राज्यकारभाराचें मुख्य लक्षण झालें आहे. असें असल्यामुळे येथे सर्वत्र मिथ्याचार चालू आहे. आणि या मिथ्याचारामुळेच आपला नाश होत आहे. आपलें तत्त्वज्ञान फार उदात्त आणि आपली करणी अत्यंत हीन, अत्यंत अधम असें नित्य घडत असल्यामुळे इतर देशांनी केवळ राष्ट्रीय स्वार्थाची दृष्टि ठेवून स्वसमाजाचें जें कोटकल्याण करून घेतलें तें भारतीयांना साधतां येत नाही. केवळ आपल्या राष्ट्रीय परंपरेचा अभिमान बाळगणें, त्या अभिमानाने राष्ट्रीय अहंकाराचा पोष करणें, आक्रमकांचा द्वेष समाजांत दृढमूल करून टाकणें, न्याय, सत्य, अहिंसा यांची उपासना केवळ राष्ट्रमर्यादेंतच ठेवणें (आणि तीहि हितकारक ठरेल तेव्हाच) मुत्सद्देगिरीने अन्य राष्ट्रांना दूर ठेवणें, त्यांच्यावर कधीहि विश्वास न टाकणें हें धोरण सर्व महत्त्वाकांक्षी राष्ट्रें अवलंबितात. त्याचाच अवलंब आपणहि केला पाहिजे. तिसऱ्या, चवथ्या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणे आपल्या देशांत चारित्र्य व कर्तृत्व शून्यावर येऊन ठेपलें आहे. समाजाचा उत्कर्ष व्हावयाचा तर चारित्र्याचें व सद्गुणांचें संवर्धन आपण केलें पाहिजे. तेंहि याच मार्गाने होईल. जपान, जर्मनी येथे जाऊन आलेले लोक तेथील लोकांची उद्योगतत्परता, कार्यक्षमता, संघटनाबुद्धि, थोर चारित्र्य, सत्यप्रियता, समाजहितबुद्धि, ज़बाबदारीची जाणीव इ. गुणांची प्रशंसा करीत असतात. ते गुण त्यांनी याच मार्गाने संपादन केले आहेत. त्यांची राष्ट्रभक्ति, त्यांचें परंपरेचें प्रेम, शत्रुराष्ट्राचा द्वेष, राष्ट्रीय अहंकार या प्रेरणाच त्याच्या बुडाशीं आहेत. आपल्या देशांत आज चाळीस वर्षें महात्माजींसारखा महावीर, बुद्ध, जीजस यांच्या तोलाचा महापुरुष सत्य-अहिंसेचा, शत्रुप्रेमाचा, विश्वबंधुत्वाचा उपदेश करीत आहे. पण परिणाम मात्र जर्मनी, जपान यांच्या बरोबर उलट झालेला आहे. आपण सर्व सद्गुणांना मुकलों आहों. याचें कारण उघड आहे. तीं महान् तत्त्वें, तें अति उच्च ध्येय कर्तृत्वाला प्रेरणा देऊं शकत नाही. माझा देश, माझें राष्ट्र, माझी परंपरा येवढेंच मी जाणतों. त्याच्या सुखांत माझें सुख आहे, त्याच्या भक्तींत माझ्या अहंकाराचा उगम आहे, हें माझ्या बुद्धीला आकळू शकतें. म्हणून यांना दुखावणाऱ्या, त्यावर आक्रमण करणाऱ्या शत्रूच्या द्वेषाने मी वाटेल त्या त्यागाला सिद्ध होतों. तसा विश्वबंधुत्वाने, मानवताप्रेमाने होत नाही. शत्रूवरच्या प्रेमाच्या

उपदेशाने तर मला मरगळच येते. हें सर्व जाणून, राष्ट्रनिष्ठा या महाशक्तीची इतर राष्ट्रांनी केली तशी, विश्वव्यापक ध्येयवाद सोडून, आपण उपासना केली पाहिजे. तरच या राष्ट्रांत सत्य, अहिंसा कांही प्रमाणांत तरी शिल्लक राहतील.

सध्या मात्र त्यांचा समूळ नाश करण्याच्या योजनेंत आपण आहों. कारण आपण प्रत्येक क्षेत्रांत मिथ्याचार करीत आहोंत. तत्त्वांच्या घोषणेंत अति उदात्तता आणि स्वदेशांतील कारभारांत कमालीची तत्त्वभ्रष्टता असें पावलोपावलीं आपलें वर्तन दिसतें. राष्ट्रनिष्ठेच्या बाबतींत हा मिथ्याचार कसा चालू आहे तें येथवर दाखविलें. धर्म, लोकशाही, कायद्याचें पालन या तत्त्वांच्या बाबतींत हेंच चालू आहे. आणि त्यामुळे असेच अनर्थ घडत आहेत. त्याचा विचार पुढील प्रकरणांत करावयाचा आहे. सध्या आपण राष्ट्रनिष्ठेपुरता विचार संपवूं. प्रारंभीं सांगितल्याप्रमाणे मनुष्याला कार्य-प्रवृत्त करणारी ही एक महाशक्ति आहे. म्हणून परंपरेंतून दिसून येणारा अहंकार आणि आक्रमकांविषयीचा द्वेष या तिच्या दोन्ही अंगांचा परिपोष आपण केला पाहिजे. तो आपण केला तर आपल्या समाजाला सध्या जी मरगळ आली आहे ती नष्ट होईल. आपल्या अंगीं चैतन्य निर्माण होईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नष्ट झालेला ध्येयवाद पुन्हा जागृत होईल आणि मग त्यामुळे आपल्या सर्व योजना सफल होऊन दण्डसत्तेच्या आव्हानाचा स्वीकार करण्यास आपण समर्थ होऊं.

## प्रकरण : ६

# धर्मात् अर्थश्च कामश्च!

जगांतल्या दण्डसत्तांनी आणि विशेषतः चीनच्या दण्डसत्तेने भारताच्या लोकसत्तेला जें आव्हान दिलें आहे तें भारताला स्वीकारतां येईल काय, आणि एकंदरच जगांतल्या दण्डसत्तांच्या वाढत्या सामर्थ्यापुढे लोकसत्ताक राष्ट्रांना टिकाव धरतां येणें शक्य आहे काय, याचा विचार आपण करीत आहों. या अभ्यासांत भारताची स्थिति अत्यंत निराशाजनक आहे असें आपल्या ध्यानांत आलें. म्हणून त्याची कारणमीमांसा आपण करूं लागलों. ती करीत असतांना मागल्या प्रकरणांत आपल्या नेत्यांनी राष्ट्राच्या उत्कर्षा-साठी जें तत्त्वज्ञान स्वीकारलें आहे तें अत्यंत भ्रान्त, विपरीत व घातकी असून त्यामुळेच सर्व क्षेत्रांत आपल्याला अपयश येत आहे असा विचार मांडला. प्रत्येक क्षेत्रांत आपण उत्तम योजना आंखल्या आहेत. पण त्या योजना सिद्धीस नेण्यासाठी जीं ध्येयवादी, कार्यक्षम, कर्तव्यदक्ष, प्रतिभासंपन्न, दूरदृष्टीचीं, व्यक्तित्वसंपन्न अशीं माणसें लागतात तींच येथे नाहींत. आणि तीं नाहींत हा केवळ योगायोग नाही. अशीं कर्तबगार माणसें निर्माण होण्यास समाजांत ज्या प्रेरक शक्ति असाव्या लागतात त्याच काँग्रेसच्या तत्त्वज्ञानामुळे नष्ट झाल्या आहेत व होत आहेत. राष्ट्रनिष्ठा ही अर्वाचीन काळांतली एक महान् प्रेरक शक्ति आहे. त्या निष्ठेमुळे माणसें ध्येयवादाने भारून जातात, वेडीं होतात आणि मग वाटेल त्या पराक्रमाच्या कोटी करतात. या निष्ठेचें स्वरूप काय आणि काँग्रेसच्या भ्रामक उदात्ततेमुळे, भ्रान्त सात्त्विकतेमुळे व हीन सत्तालोभामुळे तिचा भारतांतून कसा लोप होत चालला आहे हें मागल्या प्रकरणांत सांगितलें. आज राष्ट्रनिष्ठेइतक्याच, नव्हे, तिच्यापेक्षा शतपटीने जास्त प्रभावी अशा दुसऱ्या एका प्रेरक शक्तीचा विचार करावयाचा आहे. ती शक्ति म्हणजे धर्म.

धर्म या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. समाजसेवा हाच धर्म असें कोणी

म्हणतात. राष्ट्रनिष्ठेलाहि राष्ट्रधर्म म्हणून कोणी गौरवितात. सत्य हा धर्म आहे, परोपकार, दया हा धर्म आहे. हे सर्व अर्थ आपापल्या परीने युक्तच आहेत. पण येथे धर्माचा मूळ अर्थच अभिप्रेत आहे. सर्वशक्तिमान्, सर्वसाक्षी, सर्वज्ञ, शरणागतांचा त्राता, विश्वाचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्याच्यावरील श्रद्धा, त्याची भक्ति, त्याची उपासना या अर्थाने धर्म शब्द येथे वापरला आहे. हा धर्म ही मानवी समाजांतील एक अत्यंत मोठी प्रेरक शक्ति आहे. या परमेश्वरनिष्ठेसाठी मानवाने आतापर्यंतच्या इतिहासांत वाटेल तो त्याग केला आहे. वाटेल त्या यातना सोसल्या आहेत. या परमेश्वरभक्तीमुळे माणसांनी संसार सोडला आहे, स्वजन-त्याग केला आहे, धनवित्त यांचा मोह सोडला आहे, प्राणहि अर्पण केले आहेत. तेव्हा आत्यंतिक ध्येयवादाला प्रवृत्त करणारी अशी ही प्रेरणा आहे याबद्दल दुमत होणें शक्य नाही. पण आजच्या या शास्त्रीय युगांत, या विसाव्या शतकांत, सध्याच्या बुद्धिवादी जगांत ही परमेश्वरनिष्ठा राष्ट्राच्या ऐहिक उत्कर्षाच्या दृष्टीने कितपत व कशी उपयोगी पडेल याविषयी मात्र बराच वाद होणें शक्य आहे. त्याच प्रश्नाचा आता विचार करावयाचा आहे.

वर वर्णिलेली धर्मश्रद्धा समाजाच्या ऐहिक उन्नतीला कशी साहाय्यभूत होणार अशी शंका येणें साहजिक आहे. कारण सामान्यत: या धर्मश्रद्धेच्या नांवाशीं दोन मोठीं वैगुण्यें, दोन मोटे दोष निगडित झालेले असतात. ही धर्मश्रद्धा मनुष्याला संसारविन्मुख करते, ऐहिक प्रपंचाविषयी तिच्यामुळे मनुष्य उदासीन होतो, हा एक दोष; आणि बहुधा ही श्रद्धा सर्वत्र अंधळी आणि त्यामुळेच विज्ञानविरोधी, शब्दप्रामाण्यवादी व दुराग्रही अशी असते, हा दुसर दोप होय. जगाच्या पाठीवरच्या बहुतेक सर्व धर्मांची एके काळीं अशी स्थिति होती यांत शंका नाही. आणि त्यामुळे तेथली धर्मश्रद्धा राष्ट्राच्या प्रगतीला उपकारक तर नव्हेच, पण अनेकदा विघातकहि ठरलेली आहे यांतहि वाद नाही. पण युरोपांत १५-१६ व्या शतकांत ग्रीक विद्येचें जें पुनरुज्जीवन झालें तेव्हापासून तेथील युग पालटलें आणि हळूहळू गेल्या तीनचारशे वर्षांत धर्मश्रद्धेंतले वरील दोन्ही दोष नष्ट झालेले असून पाश्चात्त्य देशांतली आजची धर्मश्रद्धा ऐहिक उत्कर्षाची एक महाशक्ति होऊन बसली आहे.

हें कार्य मेथॉडिस्ट, क्वेकर, इव्हँजेलिस्ट, जेसुइट, साल्व्हेशन आर्मी इ. जे अनेक धर्मपंथ पश्चिम युरोपांत निर्माण झाले त्यांनी केलें आहे. दीन, दलित, अनाथ, अपंग, बहिष्कृत, पतित, रंजले गांजले यांच्या उद्धारासाठीच धर्माचा अवतार आहे, हें महातत्त्व वेस्ले, फॉक्स, बूथ, इ. या पंथाच्या प्रवर्तकांनी सांगितलें आणि त्याच्या आचारासाठीच हे पंथ स्थापिले. त्यांना अभिप्रेत असलेला हा दलितांचा उद्धार म्हणजे केवळ पारलौकिक उद्धार किंवा मोक्ष नव्हे, तर ऐहिक उद्धार होय. प्रपंचाशिवाय परमार्थ व्यर्थ होय, केवळ अशक्य होय असें त्यांचें मत होतें. म्हणून या दलित बांधवांना प्रथम जीवनांत प्रतिष्ठा प्राप्त करून देणें हें धर्माचें पहिलें कार्य होय असें ते मानीत. एलिझाबेथ फ्राय, विल्बर फोर्स यांनी तुरुंग-सुधारणेच्या व गुलाममुक्तीच्या ज्या चळवळी केल्या त्या धर्मप्रेरणेनेच होत. त्या काळांत तुरुंगांतलें जीवन अत्यंत भयानक होतें. अत्यंत थोड्या अवधींत माणूस तेथे पशु होऊन जात असे. तुरुंग-सुधारणेची चळवळ अखंड २५।३० वर्षं चालवून एलिझाबेथ फ्राय हिने युरोपांतील लाखो लोकांना या नरकांतून सोडविलें. युरोपांतील धर्मपंथांचें हेंच वैशिष्टय आहे. ज्या सामाजिक व्यवस्थे-मुळे, बंधनामुळे, रूढीमुळे कायद्यामुळे, दीनदलितांचे हाल होत असतील त्या रूढि वा तीं बंधनें समूळ नष्ट करून टाकणें हें खरें धर्माचें कार्य आहे असें ते समजतात. आणि तें साध्य करण्यासाठी केवळ उपदेश करून न थांबतां ते चळवळी करतात, लोकजागृति करतात, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी संघटना उभारतात आणि त्यापायी वाटेल ते हाल सोसून अंतीं प्राणत्यागहि करतात. क्वेकरपंथाने महात्माजींचें सत्याग्रहाचें तत्त्व तीनशे वर्षांपूर्वींच अवलंबिलें होतें. राजे, सरदार, सरंजामदार, अधिकारी, लष्कर यांच्या सत्तेची, सामर्थ्याची कसलीहि पर्वा न करतां त्यांच्या तोंडावर त्यांच्या अपकृत्यांचा ते पाढा वाचीत, त्यांची निर्भर्त्सना करीत आणि यासाठी फटके, तुरुंग, फांशी — वाटेल ते सहन करीत. अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य हें मानवी प्रतिष्ठेचें पहिलें लक्षण होय. युरोपच्या धर्मपंथांनी दीनदलित लोकांच्या ठायीं तें निर्माण करून समाजाची जी उन्नति केली ती पाहिली म्हणजे धर्म ही समाजोद्धाराची केवढी प्रभावी शक्ति आहे हें सहज उमगेल.

ऐहिक जीवनाची प्रतिष्ठा, या संसारांतील सुबत्ता हें या धर्मपंथांचें पहिलें लक्ष्य असतें. हे धर्मसुधारक जेथे जातील तेथे प्रथम लोकांतील अज्ञान, दारिद्रय, रोगराई यांचें निवारण करण्यासाठी प्रयत्न करतात. यासाठी ते शाळा स्थापन करतात, रुग्णालयें उभारतात, आणि संस्था निर्माण करून शेकडो कार्यकर्त्यांना ध्येयवादी बनवून दलितोद्धार करतात. या तऱ्हेचें धर्माचरण भारतांत गेल्या हजार वर्षांत अभावानेच दिसतें. पाश्चात्त्यांच्या धर्मबुद्धीला प्रेरणा देणारा ख्रिस्ती धर्माचा आदिग्रंथ जो बायबल त्याच्या-प्रमाणेंच येथल्या साधुसंतांनीहि समाजोद्धाराचा उपदेश केला होता हें त्यांच्या ग्रंथावरून सहज दिसून येतें. ‘ जे कां रंजले गांजले, त्यांसि म्हणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा ।। दया करणें जे पुत्रासि, तेचि दासां आणि दासीं । ’ हीं श्रीतुकाराममहाराजांचीं वचनें प्रसिद्धच आहेत. ‘मुख्य पूजेचें आयतन प्राणिमात्रा सुखदान, ’ ‘ यथासामर्थ्यें यथावित्तें, सुख द्यावें प्राणिमात्रांतें! ’ ‘अन्नवस्त्रदान हा स्वधर्म जाण सर्वांचा ।।’ हा श्रीएकनाथांचा उपदेश अनेकांच्या नित्यपाठांत आहे. पण या वचनांतून समाजसेवेची प्रेरणा कोणी घेतलीच नाही हें भारताचें मोठें दुर्दैव होय. दीन, दरिद्री, रोगी, अनाथ, पतित अशा लोकांची दया येथे कोणाला येत नसे असें नाही. पण त्यांना पैसा दोन पैसे द्यावे, त्यांच्या दुःखाचा कांही तात्पुरता परिहार करावा, यापलीकडे येथे कोणाची धर्मबुद्धि गेलीच नाही. कारण असा धर्म करून स्वतःचा मोक्ष साधावयाचा, वैयक्तिक पुण्याची जोड करावयाची एवढीच आमची दृष्टि होती. पण दलितांचा कायमचा उद्धार करावयाचा, त्यांची पशुअवस्था नष्ट करून त्यांच्या जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावयाची ही धर्मबुद्धि येथे निर्माण झालीच नाही. त्यामुळे ज्या सामाजिक तत्त्वामुळे, बंधनामुळे, रूढीमुळे दैन्य, दारिद्रय, विषमता, निर्माण होते, मानवाचा अधःपात होतो त्या नष्ट करणें हें जें धर्माचें महान् कार्य तें येथे कोणी केलेंच नाही. याचा अर्थच असा की धर्म ही महाशक्ति भारतांत आज कित्येक शतकें लुप्तावस्थेंतच आहे.

धर्मभावना ही मनुष्याच्या ठायीं समाजसेवेची केवढी उदात्त ध्येयदृष्टि निर्माण करते, हें मिशनऱ्यांचीं चरित्रें वाचून भारतीयांनी जाणून घेतलें पाहिजे. नुकत्याच दिवंगत झालेल्या श्रीमती इडा स्कडर यांचें उदाहरण पाहा.

त्यांचे आजोबा १८१९ सालीं प्रथम हिंदुस्थानांत आले. एका धनाढ्य अमेरिकन वकिलाचा हा मुलगा. स्वत: नामांकित डॉक्टर! पण बापाचा रोष पत्करून, पुढचें उज्ज्वल भवितव्य सोडून मिशनरी म्हणून तो भारतांत आला तो जीजसचा संदेश जगभर प्रसृत करावा, धर्मप्रसार करावा या एकाच हेतूने. त्याचे सातहि मुलगे डॉक्टर होऊन मिशनरी झाले व भारत हीच त्यांनी आपली कर्मभूमि मानली. त्यांतल्या कनिष्ठ मुलाची इडा ही मुलगी. बालपणापासून भारतांतली रोगराई, अज्ञान, दारिद्र्य ती पाहात होती. आठव्या वर्षी ती अमेरिकेंत परत गेली. आणि तेथे पंधरा सोळा वर्षे घालविल्यानंतर आपण मिशनरी व्हावयाचें नाही असें तिने ठरविलें. तेवढ्यांत इकडे आई आजारी पडली म्हणून तिला नेण्यासाठी इडा हिंदुस्थानांत आली. त्या वेळीं एका रात्रीं एक तरुण ब्राह्मण तिच्याकडे आला व बाळंतपणांत बायको अडली आहे, तुम्ही मदतीला चला असें तिला विनवूं लागला. पण इडा स्वत: वैद्यकांत अनभिज्ञ असल्यामुळे तिने, माझ्या वडिलांना तुम्ही न्या, असें त्या ब्राह्मणास सांगितलें. त्याला हें ऐकून धक्काच बसला. सनातन ब्राह्मणाच्या घरांत स्त्रीच्या बाळंतपणासाठी पुरुष डॉक्टर! आणि तोहि म्लेंच्छ! त्यापेक्षा बायको मेली तरी चालेल, असें तो म्हणाला, आणि दुर्दैवाने ती खरोखरच मेली. पण तें दुर्दैव येथेच थांबलें नाही. त्या एका रात्री आणखी दोन तरुण मुली याच आपत्तींत सापडून मृत्युमुखीं पडल्या, आणि त्यामुळे इडाचें भवितव्य बदललें. स्त्री-डॉक्टरांच्या अभावीं भारतांतील स्त्रिया अशा मृत्युमुखीं पडत आहेत हें पाहून या समाजाची सेवा करणें, हें आपल्या मिशनरी आजोबांनी व वडिलांनी स्वीकारलेलें व्रत आपणहि स्वीकारावयाचें अशी त्याच रात्रीं तिने प्रतिज्ञा केली. अमेरिकेला परत जातांच तिने वैद्यकीय विद्यालयांत नांव घातलें आणि सहा वर्षे आयुर्विद्येचा अभ्यास करून ती हिंदुस्थानांत परत आली व पुढील पन्नास वर्षे तिने भारतीय स्त्रियांची सेवा केली. त्या सेवेंतच परवा तिने देह ठेवला.

डॉ. इडा स्कडर आणि त्यांचें एकंदर कुटुंब यांचा इतिहास पाहिला म्हणजे धर्म ही केवढी प्रबल शक्ति आहे, व्यक्तीला ध्येयप्रवृत्त करण्यास ती कशी समर्थ आहे आणि आजच्या शास्त्रीय युगांत पाश्चात्त्य लोक तिची

एकनिष्ठेने कशी जोपासना करीत आहेत हें सहज ध्यानांत येतें. कोठें अमेरिका, कोठें हिंदुस्थान ! अमेरिकेंतलें जीवन किती संपन्न, सुधारलेलें, सुखी ! भारतांतली जनता किती दीन, दरिद्री, अज्ञानग्रस्त, मोहमूढ ! तिचीं घरें अस्वच्छ, घाणेरडीं ! अमेरिकेच्या तुलनेने माणसें हेंगाडी, कुरूप ! अंधरूढीच्या प्राबल्यामुळे तीं सर्व हेकट झालेलीं, दुराग्रही बनलेलीं. अशा ह्या माणसांची सेवा करण्यासाठी तें संपन्न व विलासी जीवन टाकून सर्व आयुष्य खर्ची घालावयाचें, हें चारित्र्य खरोखर असामान्य आहे. डॉ. इडा येथे परत आल्या तेव्हा वेलोरच्या आसपासचे लोक त्यांना घरांत येऊं देण्यासहि तयार नव्हते. येऊं दिलें तरी, त्या घरांतल्या बाळंतिणीची सुटका करण्याची गरज त्यांनाच आहे, यांना कांही नाही, असें ते त्यांच्याशीं वागत. घरांतल्या बायका विटाळाच्या भीतीने त्यांना कसलीहि मदत करीत नसत. तरीहि इडाबाईंनी आपलें सेवाव्रत सोडलें नाही. जीजसचा हाच संदेश आहे अशी त्यांची श्रद्धा होती; आणि रुग्णांना रोगमुक्त करतांना त्या संदेशाची शिकवणहि त्या देत राहिल्या. त्यांच्या सेवेमुळे हळूहळू लोकमत पालटूं लागलें, मग त्यांचें स्वागत होऊं लागलें, त्यांना साह्य मिळूं लागलें तेव्हा लगेच पुढचें पाऊल टाकून त्यांनी एक वैद्यकीय शाळा व एक रुग्णालय स्थापन केलें. आज वेलोरचें रुग्णालय व विद्यालय यांची जगभर कीर्ति झाली आहे. आणि भारतांतल्या अनेक स्त्रिया व पुरुष – (ज्यांचें जीवन डॉ. इडा स्कडर यांच्या धर्मप्रेरणेच्या अभावीं केवळ खातेऱ्यांत गेलें असतें) – मोठ्या प्रतिष्ठेला पोचून, जगांतल्या महाविद्यालयांतून पदव्या घेऊन डॉक्टर होऊन भारताच्या सर्व प्रांतांतील रुग्णालयांत जनतेची सेवा करीत आहेत. त्यांतील अनेक लोक आज ख्रिस्ती झाले आहेत. पण हिंदु धर्म जोपर्यंत ही प्रेरणा देऊं शकत नाही, दीनदलितांच्या ऐहिक उत्कर्षावरच धर्माचा उत्कर्ष अवलंबून आहे हें जोपर्यंत हिंदुसमाज मानीत नाही, हिंदु धर्मांत राहून आपला उत्कर्ष होणार नाही असें जोपर्यंत अस्पृश्य, दीन, दलित, आदिवासी अशा जमातींना वाटत आहे, तोपर्यंत याविषयी कसलीहि तक्रार करण्याचा अधिकार हिंदु समाजाला नाही.

सुखी, संपन्न, विलासी जीवनाचा त्याग करून ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी जगाच्या पाठीवर आज हजारो युरोपीय मिशनरी भ्रमण करीत

आहेत. त्यासाठी वाटेल ते कष्ट व यातना सोशीत आहेत, प्रसंगीं प्राणांचें बलिदान करीत आहेत. त्यांच्यावर नेहमी एक आक्षेप घेण्यांत येतो की, त्यांची सेवा वाटते तितकी निरक्षेप नाही. ज्या दलितांची ते सेवा करतात त्यांचें धर्मांतर घडावें असा त्यांचा हेतु असतो. असा त्यांचा हेतु असतो यांत शंकाच नाही. तीच त्यांची मूळ प्रेरणा आहे. आणि ज्या उदात्त धर्मावर आपली श्रद्धा आहे त्यांतील तत्त्वांचा प्रसार जगांत करावा असें ध्येय मनुष्याने डोळ्यांपुढे ठेविलें तर त्यांत आक्षेपार्ह तरी काय आहे ? त्यांत जेव्हा इतर राजकारणी आणि स्वार्थी लोक शिरतात, आणि राजकीय हेतु त्यांच्या कार्यांत प्रभावी ठरूं लागतो त्या वेळीं त्यावर आक्षेप घेणें युक्त होईल; इतकेंच नव्हे तर राष्ट्रहिताच्या दृष्टीने तें अवश्यहि आहे. मागील प्रकरणांत राष्ट्रनिष्ठेचा विचार करतांना भारतांतल्या परकी मिशनऱ्यांच्या संबंधी याच दृष्टीने मीं लिहिलें आहे; धर्म ही निष्ठा मानवाच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीला आजच्या काळांतहि किती प्रेरक होऊं शकते याचा विचार आपण करीत आहों. धर्मामुळे जी उदात्त ध्येयवादाची, त्यागाची, तपश्चर्येची, जनसेवेची शिकवण मिळते तिला या दृष्टीने महत्त्व आहे. मिशनऱ्यांच्या मनांत स्वार्थ असला तरी तो राष्ट्रीय स्वार्थ आहे, तो स्वार्थ ते जनसेवा करून, मानवाची प्रतिष्ठा वाढवून, दलितांची उन्नति करून साधतात आणि त्यापायी वाटेल तो त्याग करण्यास सिद्ध असतात हें विसरून चालणार नाही. हा स्वार्थच इतका ध्येयवादी आहे की, त्या जातीचा स्वार्थ त्यांच्या शतांश जरी आज भारतीयांच्या अंगीं निर्माण झाला तरी आपल्या सर्व योजना यशस्वी होतील. कारण या धर्मप्रेरणेंतून राष्ट्रनिष्ठेच्या प्रेरणेप्रमाणेच समाजाला अवश्य तीं कर्तबगार व तपोनिष्ठ माणसें निर्माण होत असतात. आज आपल्या सरकारने आखलेल्या योजनांवरचे जे अधिकारी आहेत त्यांना या योजनांतून दीनदलितांचा योगक्षेम सिद्ध व्हावयाचा आहे, या प्राणिमात्राच्या सुखदानासाठी आहेत, रंजल्यागांजल्यासाठी आहेत, आणि म्हणून त्या यशस्वी करणें हें, श्रीतुकाराम, श्रीएकनाथ यांच्या वचनाप्रमाणे, फार मोठें धर्मकार्य आहे असें जर वाटलें, अशी श्रद्धा जर त्यांचे ठायीं निर्माण झाली तर समृद्धि भारताच्या पायाशीं धावत येईल यांत शंका नाही.

युरोपीय मिशनऱ्यांचीं वर उदाहरणें दिलीं तीं परक्या देशांत जाऊन धर्मप्रचार करणाऱ्यांचीं दिलीं. इकडे पूर्वेकडे अशाच लोकांचीं नांवें आपल्या कानीं येतात. पण युरोपच्या इतिहासांत अशा मिशनऱ्यांचाच प्रामुख्याने भरणा आहे असें मुळीच नाही. आपापल्या देशांतल्या दलितांचा उद्धार करण्याचें महान् कार्य आज तीनशे वर्षे ही धर्मप्रेरणा करीत आहे. त्याचींहि कांही उदाहरणें वर दिलीं आहेत; पण आजच्या घटकेलाहि या निष्ठेने प्रेरित होऊन प्रत्येक देशांत धर्मगुरु केवढें कार्य करीत आहेत हें ध्यानांत यावें म्हणून आणखी कांही उदाहरणें देतों. या धर्मगुरूंच्या कार्याकडेच प्रामुख्याने वाचकांचें लक्ष वेधावें हा तीं उदाहरणें देण्यांत हेतु आहे. कारण आपल्या देशांत आपण प्रस्थापित केलेली लोकसत्ता यशस्वी व्हावी यासाठी ध्येयवादी, कार्यक्षम स्त्रीपुरुषांची आपल्याला फार गरज आहे. ही उणीव कशी भरून निघेल याचा मुख्यत: आपण विचार करीत आहों. हिंदुधर्मीयांनी इतर देशांत जाऊन धर्मप्रसार करावा, इतरांचें धर्मांतर घडवून आणावें असें सांगण्याचा किंवा सुचविण्याचाहि हेतु नाही. राष्ट्रनिष्ठेप्रमाणेच धर्मनिष्ठा हीहि उदात्त ध्येयवादाची प्रेरणा माणसाला देते, हें कार्य करण्यास ती आजच्या या विज्ञानयुगांतहि तितकीच समर्थ आहे म्हणून तिची जोपासना आपण केली पाहिजे हें मुख्य प्रतिपाद्य आहे. त्या दृष्टीने पुढील उदाहरणें अत्यंत उद्बोधक ठरतील.

दक्षिण स्पेनमध्ये कार्डोब्रा ही विख्यात नगरी आहे. तेथे फादर अल्बिनो यांची १९४५–४६ च्या सुमारास बिशप म्हणून नेमणूक झाली. त्या वेळीं कार्डोबा नगरीला अत्यंत अवकळा आली होती. दोन लाखांपैकी निम्याहून अधिक लोक अत्यंत गलिच्छ घाणेरड्या भागांत राहात. तीं घरें पशूंनाहि राहण्यास योग्य नव्हतीं. रोगराई, गुन्हेगारी आणि अनाचार यांनी ती नगरी सडून गेली होती. भ्रष्टता, लाचलुचपत, सत्तालोभ, हीनस्वार्थ यामुळे नागरिकांना जीवन असह्य झालें होतें. प्रथम फादर अल्बिनो कांही दिवस सर्व नगरींत संचार करीत राहिले. गरिबांचें जिणें, श्रीमंतांचे विलास, त्यांनी निरखून पाहिले आणि मग मनाशीं त्यांनी कांही निश्चय केला. फादर फाँट हा एक उत्कृष्ट सहकारी त्यांना मिळाला. त्याला ते म्हणाले, ' अरे, इतक्या दीन, इतक्या गांजलेल्या लोकांपुढे धर्मप्रवचन कसलें करावयाचें ?

भगवंताचें नामसंकीर्तन त्यांना कसें ऐकवावयाचें ? प्रथम आपण त्यांच्या अन्नवस्त्राची, घराची सोय करूं. आणि मग त्यांना धर्म शिकवूं.' असें म्हणून गांवांतील डॉक्टर, इंजिनियर, वकील, व्यापारी इ. प्रमुख वर्गांतील नागरिकांना त्यांनी पाचारण केलें. प्रथम अर्थातच मिळावें तसें या लोकांकडून साह्य मिळालें नाही. पण अल्बिनो त्यांच्या धर्मश्रद्धेला सतत आवाहन करीत राहिले. हें धर्मकार्य आहे, ही परमेश्वराची सेवा आहे असा उपदेश ते करीत राहिले. त्याचा परिणाम होऊन लवकरच हे सर्व लोक कामाला लागले. एक हजार घरें बांधण्याचा फादर अल्बिनो यांचा संकल्प होता. तीन वर्षांत पंधराशे घरें बांधून झालीं. यांत नवल वाटण्याजोगें कांही नाही. अजूनहि जगांत सर्वत्र धर्मश्रद्धा प्राचीन काळाइतकीच जिवंत आहे. त्या महाशक्तीचा उपयोग दलितांच्या ऐहिक उत्कर्षासाठी, संपत्तीच्या समविभाजनासाठी, लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी करावयाचा, आर्थिक, सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी करावयाचा हें मात्र सर्वत्र घडत नाही. आपल्याकडे आजहि मेहेरबाबा, साईबाबा, नारायणमहाराज, उपासनी महाराज यांच्यावर लोकांची किती भक्ति आहे, त्यांच्यासाठी लोक किती पैसा खर्च करतात हें आपण पाहिलें तर लोकांत धर्मभावना किती प्रबल आहे हें ध्यानांत येईल. या भावनेचा ओघ सामाजिक कार्याकडे वळविणारा 'योजक' मात्र येथे दुर्लभ आहे. वैगुण्य आहे तें हें आहे. धर्म हा परमार्थ आहे, धर्म हा वैयक्तिक मोक्ष आहे, धर्म हें परलोकसाधन आहे हाच विचार येथे प्रबळ आहे. वैयक्तिक पुण्याइतकेंच सामाजिक पुण्यहि अत्यंत मोठें धर्मकृत्य आहे हा विचार आपल्या समाजांत अजून दृढमूल होत नाही. ऐहिकाच्या पायावरच परमार्थाची इमारत उभी राहूं शकते हा विचार अजून आपल्या मनाची पकड घेत नाही. गेल्या तीनशे वर्षांत युरोपांत जी धर्मक्रान्ति झाली तिचें मात्र स्वरूप असें आहे. फादर अल्बिनो यांचें कार्य हें तिचेंच एक उदाहरण आहे. कार्डोबामध्यें तीन चतुर्थांश लोक दलित होते, अनाथ होते, रंजले गांजले होते. अल्बिनो यांनी स्वत: त्यांना आपलें म्हटलेंच पण नगरींतील वरिष्ठ वर्गांतील श्रेष्ठीनाहि तसें म्हणावयास लाविलें. त्यांनी दलितांच्यासाठी अनेक संस्था स्थापिल्या, श्रीमंतांकडून जमविलेल्या भांडवलावर सीमेंटचा कारखाना, ट्रकचा व्यवसाय, छापखाना,

सुतारकामाचा कारखाना असे अनेक व्यवसाय सुरू करून प्रथम दलितांना सुस्थिति प्राप्त करून दिली आणि हें करतां करतांच धर्माचा, जीजसचा संदेशहि दिला. या पद्धतीने धर्मोपदेश केला म्हणूनच तो त्यांच्या चित्तांत दृढमूल झाला. भगवान् वेदव्यास यांनी धर्माची महती सांगतांना हेंच धोरण ठेवलें आहे. धर्माचें आचरण कां करावें? तर त्यापासून अर्थ व काम हे प्राप्त होतात म्हणून, असें ते सांगतात. फादर अल्बिनो यांनी हें धर्मरहस्य जाणलें होतें. म्हणून धर्म या महाशक्तीचा त्यांना समाजोद्धारासाठी उपयोग करतां आला. त्यांनी जें कार्य केलें त्याला डॉक्टर, वकील, इंजिनियर या मध्यमवर्गीयांचें साह्य झालें, भांडवलदारांचेंहि झालें आणि सरकारनेहि अमाप पैसा दिला. पण हे सर्व घटक आधी कार्डोबा या नगरींत होतेच. त्यांना सर्वांना एकत्र आणून कार्यप्रवण केलें तें फादर अल्बिनो यांनी; आणि तें त्यांच्या धर्मभावनेला आवाहन करून.

युरोपांतील बहुतेक सर्व नगरींत आज लोकांच्या धर्मभावनेला आवाहन करून तेथील धर्मोपदेशक दलितांचा, दीन, दरिद्री, अनाथ, अपंग यांचा उद्धार करीत आहेत. त्यांना प्रतिष्ठित, सुखी, संपन्न जीवनाचा लाभ करून देत आहेत. लंडनमधील एक धर्मोपाध्याय जिमी बटरवर्थ यांचें कार्य असेंच आहे. बाराव्या वर्षापासून गिरणींत बारा-पंधरा तास काम करून आईचें व भावंडांचें पालन-पोषण करणारा हा मुलगा. त्या वयांतच आपण उपाध्याय व्हावें ही आकांक्षा त्याच्या मनांत होती म्हणून तो मेथॉडिस्ट पंथाचा सभासद झाला. विसाव्या वर्षी लंडन नगरीच्या सरहद्दीवरील दीनदलित वस्तींतील एका चर्चमध्ये त्याची नेमणूक झाली. असल्या वस्तींत रस्त्यावर हिंडणारीं, भटकणारीं, उनाड अशीं शेकडो मुलें असतात. त्यांच्या आईबापांचें त्यांच्याकडे लक्ष नसतें. लक्ष द्यायला त्यांना वेळ नसतो. त्यामुळें हीं मुलें चोऱ्यामाऱ्या, चाकूमारी, दंगली यांतच वाढत असतात आणि त्यांच्यांतूनच पुढे इरसाल गुंड व मवाली निर्माण होतात. हीं जीं रस्त्यावरचीं मुलें त्यांना सन्मार्गाला लावून प्रतिष्ठित जीवनांत आणावयाचें हें जिमी बटरवर्थ यांचें पहिल्या-पासूनच ध्येय होतें. या चर्चमध्ये येतांच प्रथम त्यांनी या मुलांच्यासाठी एक क्लब काढला; पण तो त्या चर्चमध्ये काढला, आणि घरोघर जाऊन त्याचा प्रचार सुरू केला. आमच्या मुलांना रस्त्यावरून घरांत आणण्याचें कार्य एखादा धर्मोपाध्याय करीत असेल तर त्याला आम्ही वाटेल तें साह्य करूं,

असें सर्व पालकांनी त्याला सांगितलें. बटरवर्थ यांनी प्रथम सहा मुलें जमविलीं, थोड्याच दिवसांत सहाचीं आठ झालीं आणि आता सहा हजार मुलें त्या क्लबलँडचे सभासद आहेत.

पण बटरवर्थ यांनी केवळ धर्मोपदेश केला असता, केवळ भजन, नामसंकीर्तन केलें असतें तर हीं मुलें तेथे आलीं नसतीं. बटरवर्थ यांनी तेथे पिंगपाँग, बिलियर्ड इत्यादि खेळ सुरू केले, नाट्यसंस्था स्थापिली आणि चित्रकलेचा वर्ग सुरू केला. थोडी प्रगति होतांच ते लंडनमधील विख्यात शिल्पकार सर एडवर्ड मॉफी यांच्याकडे गेले व अशा वस्तींत एक भव्य चर्च बांधावयाचें आहे आणि तें तुम्हीं बांधून दिलें पाहिजे असें त्यांनी त्यांना सांगितलें. सर एडवर्ड यांनी तें एकदम मान्य केलें. 'मी असें चर्च बांधीन की, अगदी इरसाल मवाली आला तरी त्याचें मस्तक तेथे नमलेंच पाहिजे' असें ते म्हणाले आणि आपली प्रतिज्ञा त्यांनी पुरी केली. आज त्या वस्तींत 'रस्त्यावर' मुलें नाहीत. मग तीं कोठे आहेत ? त्यांनी स्वतःचें पार्लमेण्ट स्थापन केलें आहे आणि क्रीडामंत्री, आरोग्यमंत्री, कलामंत्री अशा जागा निर्माण करून त्या सर्व वस्तीचें जीवनच त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणलें आहे. त्यांचीं क्रीडामंदिरें आहेत, रंगमंदिरें आहेत, दवाखाने आहेत, कारखाने आहेत. या क्लबलँडच्या सभासदांतून आज शेकडो व्यापारी, डॉक्टर, इंजिनियर निर्माण झाले आहेत, लंडनची रंगभूमि गाजविणारे नट व रॉयल अॅकॅडमींत स्थान मिळविणारे चित्रकार उदयास आले आहेत. ज्या रस्त्यावरच्या मुलांतून बहुंशीं गुंड-मवाली निर्माण व्हावयाचे त्यांतूनच हे सुप्रतिष्ठित नागरिक निर्माण होऊन ब्रिटनचें जीवन समृद्ध करीत आहेत.

फादर आंद्रे टालव्हास यांनी पॅरिसमधील वेश्यांच्या उद्धारासाठी चालविलेलें कार्य पाहिलें म्हणजे युरोपांतील धर्मनिष्ठा किती प्रकारांनी समाजसेवा करीत आहे याची सम्यक् कल्पना येईल. वाममार्गाला गेलेल्या या अभागी तरुण स्त्रियांची मुक्तता करण्याचा प्रयत्न करतांना प्रत्येक क्षणीं मृत्यूला तोंड देतच पुढे जावें लागतें, असा सर्व देशांतल्या समाजसेवकांचा अनुभव आहे. कारण या क्षेत्रांत काम करणारे दलाल केवळ सैतान असतात. त्यांच्या धंद्याच्या आड येणाराचा ते हातोहात निकाल लावतात

आणि त्यांच्या हातून निसटूं पाहणाऱ्या स्त्रियांचीहि ते अशीच वासलात लावतात; म्हणून या क्षेत्रांत समाजसेवकांना तळहातावर शिर घेऊनच प्रवेश करावा लागतो. राष्ट्रनिष्ठेप्रमाणेच धर्मनिष्ठाहि माणसाला ही शक्ति देते. असलीं कार्यें हा एक प्रकारचा धर्मसंग्रामच आहे. किंबहुना आज कोणतीहि समाजसेवा हा धर्मसंग्राम आहे. दारू, अफू इत्यादि मादक पदार्थ, तरुण मुलांचीं मनें भ्रष्ट करून टाकणारीं हॉरर कॉमिक्ससारखीं मासिकें, तरुण मुलींना पळवून त्यांना विकण्याचा व्यापार, या धंद्यांत लोकांनी कोटी-कोटींनी भांडवल गुंतविलेलें असतें, आणि युरोपांत तर आंतरराष्ट्रीय संघटना उभारलेल्या असतात. असल्या भस्मासुरी शक्तीला आव्हान द्यावयाचें म्हणजे एका महाधर्मसंग्रामालाच सिद्ध व्हावयाचें हें सहज कळण्याजोगें आहे, आणि त्यांच्याच तोडीच्या संघटना उभारल्या तरच या संग्रामांत विजय मिळणें शक्य आहे हेंहि ध्यानांत येणें अवघड नाही.

फादर टालव्हास यांनी, या दृष्टीने पाहतां, कौतुकास्पद यश मिळविलें आहे. १९३७ सालीं पॅरामी या गांवीं ते व्हिकार (धर्मगुरु) होते. एक दिवस मरणोन्मुख झालेल्या एका स्त्रीला शेवटचा धर्मबोध करण्यासाठी त्यांना बोलावण्यांत आलें. ती स्त्री एक वेश्या होती. तिने आपली सर्व कहाणी टालव्हास यांना सांगितली तेव्हा त्यांचें हृदय पिळवटून निघालें आणि या अभागी स्त्रियांच्या उद्धारासाठी सर्वस्व अर्पण करण्याचें त्यांनी ठरविलें. आज 'ला निड' ही त्यांची संस्था हेंच कार्य करीत आहे. तें इतकें यशस्वी होत आहे की, जगांतल्या सर्व देशांतून त्याचा अभ्यास करण्यासाठी लोक येत आहेत. वेश्याव्यवसायांतून सोडवून आणलेल्या किंवा तेथून आपण होऊन आलेल्या स्त्रियांची तेथे राहण्याची सोय करण्यांत येते. तेथे डॉक्टर आहेत, परिचारिका आहेत, शिक्षक आहेत, मानसशास्त्रज्ञ आहेत आणि या अभागी स्त्रियांच्या सेवेलाच वाहून घेणाऱ्या अनेक तरुण स्त्रिया आहेत. विशेष म्हणजे हे सर्व लोक स्वयंसेवक आहेत. फादर टालव्हास यांच्या प्रेरणेने ते ही धर्मसेवा करीत आहेत. तेथे आलेल्या स्त्रीला प्रथम रोगमुक्त होण्यासाठी उपचार केले जातात. तिची प्रकृति सुधारल्यावर तिला कांही पोटाचा उद्योग शिकविला जातो. मग पांच सहा महिने तिची एखाद्या संभावित कुटुंबांत राहण्याची सोय केली जाते आणि त्यानंतर

तिचें लग्न करून देण्याचीहि खटपट होते. गेल्या दहाबारा वर्षांत अनेक स्त्रिया या रीतीने प्रतिष्ठित जीवनांत स्थिर झाल्या आहेत.

'टॉक् एच्' या संस्थेचे संस्थापक फादर क्लेटन यांनी तर 'प्रवचनें न करतां धर्मप्रसार करावा' असा आपल्या पंथीयांना आदेश दिलेला आहे. जीजसचा धर्म प्रसृत केला पाहिजे हें त्यांना मान्य आहे. त्यासाठीच त्यांचा सर्व उद्योग आहे. पण 'मानवसेवा' हाच धर्मप्रसाराचा खरा मार्ग होय असें त्यांचें मत आहे. "मेळवूनि षोडशोपचार, प्रतिमा पूजितां साचार, स्वयें सुखावेना शंकर, जेवि चराचर पूजिलिया ।। मुख्य पूजेचें आयतन, प्राणिमात्रा सुखदान ।।" हा श्रीएकनाथांचा उपदेश त्यांची संस्था ततोतंत पाळीत आहे लंडनच्या 'ऑल हॉलोज चर्च' या मंदिराचे फादर क्लेटन हे उपाध्याय आहेत, पण त्यांनी स्थापिलेल्या 'टॉक् एच्' या संस्थेच्या शाखा आज वीस देशांत पसरल्या आहेत. नायगेरियामध्ये त्यांनी तेरा लाख रु. खर्च करून महारोग्यांसाठी रुग्णालय काढलें आहे. दरबान येथे शंभर खाटा असलेलें क्षयरोग्यांचें रुग्णालय स्थापिलें आहे. अनेक ठिकाणीं त्यांनी क्रीडांगणें बांधलीं आहेत. उद्योगशाळा काढल्या आहेत. त्यांच्या प्रत्येक संस्थेंत अनेक स्वयसेवक असे असतात की, ते गावांतल्या अनाथ, असहाय, दलित अशा लोकांना कोणतेंहि साह्य करण्यास सारखे सिद्ध असतात. अपंगांना औषध आणून देणें, खुर्चीवरून हिंडविणें, लाकडें फोडून देणें, अंधांना वाचावयास शिकविणें इत्यादि सर्व प्रकारचीं कामें ते करतात. आपल्याला परमेश्वराने या पृथ्वीवर राहावयास जागा दिली आहे, तिचें भाडें आपण भरलें पाहिजे. 'प्राणिमात्रां सुखदान' या रूपाने तें भाडें द्यावें, असा फादर क्लेटन यांचा धर्मसंदेश आहे, आणि त्यांचे हजारो अनुयायी त्या संदेशाचें मनोभावें आचरण करून समाजोद्धार करीत आहेत.

युरोप-अमेरिकेंत आज शेकडो संस्था अशा तऱ्हेचें कार्य करीत आहेत आणि म्हणूनच तेथे लोकशाही कांही प्रमाणांत तरी यशस्वी होत आहे. समाजांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या अन्न-वस्त्र-घर-शिक्षण या प्राथमिक गरजा पुरविल्याच पाहिजेत, प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधि दिलीच पाहिजे हें नव्या लोकशाहीचें ब्रीद आहे. हें कार्य एवढें प्रचंड आहे की, सरकार कितीहि समर्थ व संपन्न झालें तरी त्याच्याकडून तें कधीहि होणें शक्य नाही.

त्यासाठी समाजांतील कर्त्या पुरुषांनी आपण होऊन पुढाकार घेऊन शेकडो संस्था स्थापून, समाजबल संघटित करून समाजसेवेचे व्रत घेणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या सेनाच उभारल्या पाहिजेत. दण्डसत्तांकित देशांत अशा सेना असतातच; पण त्या सरकारच्या सक्तीने, दण्डभयाने काम करीत असतात. मुळीच कामें न करण्यापेक्षा ही गोष्ट शतपटीने चांगली आहे; पण ज्यांना लोकशाही साध्य करावयाची आहे त्यांना मानवी कर्तृत्वाला प्रेरणा देणाऱ्या अन्य शक्तींचा, निष्ठांचा आश्रय केला पाहिजे. राष्ट्रनिष्ठा व धर्मनिष्ठा या त्या शक्ति होत. पाश्चात्त्य राष्ट्रें आज जगत आहेत, आपला उत्कर्ष साधीत आहेत, सामर्थ्यसंपन्न होत आहेत तीं या निष्ठांची आराधना करून होत आहेत हें दाखविण्यासाठी विषयाचा एवढा प्रपंच येथवर केला.

वरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल की, पाश्चात्त्यांनी गेल्या तीनशे वर्षांत आपल्या धर्माचें स्वरूप आमूलाग्र पालटून टाकलें आहे. आपापल्या समाजांत त्यांनी फार मोठें धर्मपरिवर्तन घडवून आणलें आहे. पूर्वी धर्म हा व्यक्तिनिष्ठ शब्दप्रामाण्यवादी, विज्ञानविरोधी व बह्वंशीं परलोकनिष्ठ असा होता. अशा धर्माने इहलोक तर नाहीच पण परलोकहि साधणार नाही हें तेथील समाजनेत्यांच्या, तत्त्ववेत्त्यांच्या ध्यानीं आलें आणि त्यांनी धर्मसुधारणेसाठीच धर्मसंग्राम सुरू केला. दीर्घकालच्या या संग्रामामुळे तेथील धर्मपीठांतहि हळूहळू परिवर्तन होऊं लागलें आणि आज समाजाच्या उन्नतीला अवश्य असलेल्या धर्माचें प्रवर्तन स्वतः हीं धर्मपीठेंच करीत आहेत असें दृश्य आपल्याला दिसूं लागलें आहे. मध्यंतरीं एक काळ असा होता की, विज्ञानाच्या आश्चर्यकारक प्रगतीमुळे ईश्वरनिष्ठेची, श्रद्धेची, भक्तिभावनेची समाजाच्या प्रगतीला मुळीच गरज नाही असा एक समज सुशिक्षितांमध्ये रूढ झाला होता. पण आता आइनस्टाईन, ऑलिव्हर लॉज, सर जेम्स जीन यांसारखे मोठमोठे विज्ञानवेत्तेच ईश्वरश्रद्धा ही मानवाच्या प्रगतीला आवश्यक आहे, मानवी जीवनाचें कोडें केवळ बुद्धीने उलगडणें अशक्य आहे, भक्तीशिवाय तरणोपाय नाही असें सांगत आहेत. त्यामुळे धर्माला युरोपांत श्रेष्ठ प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. मात्र आता नवीन उदयाला आलेला धर्म, श्रद्धा, भक्ति यांचा उपदेश करीत असला तरी इह-लोकाची उपेक्षा करावी, विज्ञानाला विरोध करावा हें त्याच्या स्वप्नांतहि

नाही; उलट इहलोकींचें वैभव, येथली समृद्धि, संपन्नता, अर्थकामांची प्राप्ति हें धर्माचें एक प्राप्तव्यच आहे अशी प्राचीन भारतीय ऋषींप्रमाणेच युरोपांतल्या धर्मज्ञांचीहि धारणा आहे; आणि त्यामुळेच आज युरोप, अमेरिकेंत धर्मनिष्ठा पूर्ण जागृत झाली असून समाजाला कर्तृत्वाची, या विज्ञानयुगांतहि, प्रेरणा देण्यास ती समर्थ झाली आहे.

या स्वरूपाची धर्मक्रांति भारतांत झाली, धर्म ही आपल्या समाजांत एक जिवंत शक्ति झाली तरच भारताच्या उन्नतीला अवश्य तें कर्तृत्व येथे निर्माण होईल. भारतांत वेदकालांत व पुढे महाभारतकालांत आणि इसवी सनाच्या पहिल्या पांचसहा शतकांत धर्म असाच इहलोकनिष्ठ व प्रवृत्तिपर होता. शंकराचार्यांच्या काळापासून हें सर्व पालटलें असें वाटतें. मोक्ष व संसार, परलोक आणि ऐहिक वैभव यांची फारकत झाली आणि सर्व लोक संन्यासी झाले नाहीत तरी संसाराविषयी, स्त्रीपुत्रांविषयी, ऐहिक वैभवाविषयी त्यांच्या मनांत उदासीनता, तुच्छता आणि घृणाहि निर्माण होऊन समाजाच्या पराक्रमाचा कणाच मोडून पडला. पुढे संतांच्या कालांतहि समाजाच्या या मनःप्रवृत्तींत फरक पडला नाही. भारतांतल्या सर्व प्रांतांतील संतांनी स्त्रीपुत्र, धनदौलत, राज्यसाम्राज्य यांची कमालीची निंदा केली आहे. त्यामुळे, संसारांत राहूनच भक्तियोग साधावा, असा जरी त्यांनी उपदेश केला असला तरी हा संसार अत्यंत तुच्छ आहे, पापमय आहे, त्यांत रमणें कमीपणाचें आहे ही भावना आपल्या समाजांत कायमच राहिली, नव्हे, आणखी दृढमूल झाली. यामुळे धर्म हें केवळ एक मोक्षसाधन झालें. वैयक्तिक पुण्य असें त्याला रूप आलें. सामाजिक संघटनेची, समाजोद्धाराची एक महाशक्ति, एक प्रबल प्रेरणा असें रूप हिंदुधर्माला ब्रिटिश येथे येईपर्यंत आलेंच नाही. दलितांच्या योगक्षेमाची चिंता वाहणें, अनाथ, अपंग, उपेक्षित, असहाय यांच्यासाठी संस्था स्थापून त्यांच्या जीविताची प्रतिष्ठा वाढविणें, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करणें हें धर्माचें कार्य आहे असें युरोपांतल्या प्रमाणे येथे, समर्थ रामदासस्वामी हा एक अपवाद सोडला तर, कोणाला वाटलेंच नाही. अन्यायाचा प्रतिकार हें समाजाच्या जिवंतपणाचें पहिलें लक्षण होय. युरोपांतल्या क्वेकर, मेथॉडिस्ट, साल्व्हेशन आर्मी या पंथांनी दलितांना या प्रतिकाराला सिद्ध करून तेथला धर्म जिवंत

आणि कार्यक्षम ठेवला. दुर्दैवाने भारतांत धर्माला असें सामाजिक रूप देणारा महात्मा जन्माला आलाच नाही. त्यामुळे मोक्षसाधन हेंच धर्माचें प्रधान रूप होऊन बसलें. ऐहिक व्यवहारांत धर्म राहिला तो म्हणजे केवळ कर्मकांड ! स्नानसंध्या, सोवळेंओवळें, भक्ष्याभक्ष्य, उपासतापास, वाऱ्या, तीर्थयात्रा, टिळेमाळा यालाच लोक त्या काळांत धर्म मानीत असत. हा अत्यंत हीन व अमंगल धर्म होय. संतांनी याची परोपरीने निर्भर्त्सना केली आहे. पण समाज त्या कर्मकांडाला आणि त्याच्याच अनुषंगाने जातिभेद, अस्पृश्यता, यांना आणि शब्दप्रामाण्याला व दैववादाला चिकटून राहिला.

युरोपांत धर्मपंथ स्थापन झाले त्याचप्रमाणे कोपर्निकस, केप्लर, गॅलिलिओ, डाल्टन, न्यूटन, रॉजर बेकन, फ्रॅन्सिस बेकन हे विज्ञानवेत्तेहि निर्माण झाले; आणि धर्मातील शब्दप्रामाण्य, अंधश्रद्धा, दैववाद, विषमता यांशीं त्यांनी प्राणपणाने संग्राम केला. त्यामुळे धर्मातील हीं जळमटें नष्ट होऊन तो शुद्ध झाला, विज्ञानपूत झाला, त्याला सामाजिक रूप आलें. एक सामाजिक शक्ति अशी प्रतिष्ठा त्याला प्राप्त झाली. भारतांत ब्रिटिश येण्यापूर्वी हिंदुधर्माला हें स्वरूप प्राप्त झालें नाही.

पाश्चात्त्यविद्येच्या प्रसारानंतर येथे धर्माच्या पुनरुज्जीवनाला व धर्मक्रांतीला खरा प्रारंभ झाला, आणि हिंदुधर्माला इहलोकनिष्ठ व सामाजिक रूप प्राप्त होऊं लागलें. या दृष्टीने ब्राह्मसमाज, प्रार्थनासमाज आणि विशेषतः आर्यसमाज यांचें कार्य फार मोठें आहे. आर्यसमाजाने अस्पृश्य, दलित यांना वेदमंत्रांचा अधिकार देऊन अवश्य ती सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आणि याच्याच जोडीला शिक्षणाच्या प्रसाराची मोहीम हातीं घेतली. आज सर्व हिंदुस्थानांत आर्यसमाजाचीं अनेक महाविद्यालयें आणि अनेक शाळा आहेत. औद्योगिक व तांत्रिक शिक्षणाच्याहि अनेक संस्था समाजाने स्थापन केल्या आहेत. एकंदर पाहतां धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या क्षेत्रांत वर सांगितलेलें युरोपीय धर्मपंथांचें जें धोरण आहे तशाच प्रकाचें धोरण आर्यसमाजाचें आहे आणि त्यामुळे पंजाबमध्ये त्याच्या उद्योगाला स्पृहणीय असें यशहि प्राप्त झालें आहे. स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणेने स्थापन झालेली रामकृष्णमठ ही संस्थाहि अशाच प्रकारचें धर्मकार्य करीत आहे, पण भारताचा एकंदर व्याप पाहिला तर हे सर्व प्रयत्न 'दर्यामें खसखस'

अशाच प्रमाणाचे आहेत असें वाटतें. लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यानें फार मोठी मनःक्रांति घडवून आणली हें खरें आहे. धर्माचें पूर्वीचें निवृत्तिपर रूप आता जवळ जवळ नष्ट झालें आहे यांत शंका नाही; पण आज एकंदर भारतीय समाजांत धर्म ही समाजोन्नतीची, ऐहिक उत्कर्षाची प्रेरणा आहे असें दिसत नाही. पाश्चात्त्य देशांत चर्च हें बहुतेक सर्व खेड्यांत आणि शहरांत धर्मकार्याबरोबरच समाजकार्याचें केंद्र झालेलें आहे. गांवांतील अनाथ, अपंग, दलित यांचें तें आश्रयस्थान होऊन बसलेलें आहे, आणि भोवतालच्या समाजांतील लोकांचा योगक्षेम वाहणारी संस्था असें रूप तिला देण्याचे फार जोराचे प्रयत्न तेथे चालू आहेत. भारतांतील धर्मवेत्त्यांनी, धर्माभिमान्यांनी आणि धर्मप्रवर्तकांनी आपल्या धर्मसंस्थांना हें रूप प्राप्त करून दिलें तरच आपला धर्म समाजोद्धाराच्या दृष्टीने एक प्रभावी अशी शक्ति ठरेल.

या दृष्टीने पाहतां आजची स्थिति फार निराशाजनक आहे. हिंदुधर्माचें मुख्य पीठ म्हणजे श्रीशंकराचार्यांचें. आपल्याकडे ख्रिस्ती धर्माच्या चर्च-सारखी धर्म ही एक संघटित संस्था नाही. तरी पण मुख्य पीठाचा मान संकेताने तरी श्रीशंकराचार्यांना मिळतो. पण वरील पुनरुज्जीवनाच्या दृष्टीने पाहिलें तर आजचे त्या पीठावरचे अधिकारी पुरुष शून्यवत् आहेत. धर्मक्रांति करावी, समाजांतील विषमता नष्ट करावी, दीनदलितांचा कैवार घेऊन उठावें, त्यासाठी संस्था स्थापन कराव्या हें धोरण पीठस्थ अधिकाऱ्यांचें केव्हाच नव्हतें आणि नाही. मागल्या काळांत विद्यारण्यस्वामींनी ऐहिकोन्मुख होऊन स्वराज्य, स्वातंत्र्य, साम्राज्य हें धर्माचेंच कार्य आहे अशी दृष्टि ठेवून प्रयत्नाला प्रारंभ करतांच भारताच्या इतिहासालाच कलाटणी मिळाली हें सर्वश्रुत आहे. पण आज ही दृष्टि पीठाची नाही. पीठस्थ अधिकारी चातुर्मास्यामध्ये स्त्री-पुत्र-धन-दौलत हें सर्व क्षणभंगुर आहे हेंच तत्त्वज्ञान सांगत असतात. मात्र गेलीं तीस चाळीस वर्षें या क्षणभंगुर धनदौलतीसाठी पीठस्थ शंकराचार्यांचे प्रीव्ही कौन्सिलपर्यंत व सुप्रीम कोर्टापर्यंत दावे चाललेले आहेतच. पीठाच्या योगक्षेमासाठी धनदौलतीची फार आवश्यकता आहे एवढें त्यांना मान्य झालेलें दिसतें. तशीच आवश्यकता दीनदलितांच्या योगक्षेमासाठी आहे हें त्यांना पटलें तर धर्मक्रांति फार दूर नाही. आज नव्या युगांत समाजांत पीठाबद्दल जुन्या काळाप्रमाणे आदर नाही हें खरें

आहे. पण आजच्या श्रीशंकराचार्यांनी पाश्चात्त्य धर्मसंस्थांप्रमाणे दीन-दलितांच्या उद्धाराचें कार्य हातीं घेतलें आणि लोकांपुढे शब्द टाकला तर फादर अल्बिनो, टालव्हास यांच्या शतपटीने यांना कार्य करतां येईल आणि तसें झालें तरच भारतीय लोकसत्ताहि टिकूं शकेल. व्यक्तीची प्रतिष्ठा हा लोकशाहीचा पाया आहे. अस्पृश्य, आदिवासी, पतित, असहाय, अनाथ, यांच्या वस्तींत श्री संचार करूं लागले आणि पीठाची सर्व पुण्याई खर्च करून त्यांनी समाजांतील श्रेष्ठींना आवाहन केलें तर ह्या सर्व जनांच्या जीविताला निश्चित प्रतिष्ठा प्राप्त होईल, पण पीठस्थ अधिकारी इकडे वळतील अशी मुळीच आशा नाही.

वारकरी पंथ हा महाराष्ट्रांतला फार मोठा पंथ आहे. रंजले गांजले यांचा उद्धार करण्याची जबाबदारी त्याच्यावर फार मोठी आहे. प्रारंभीं जीं संतवचनें दिलीं आहेत तीं सर्व या पंथांतल्या सर्वश्रेष्ठ पुरुषांचींच आहेत. पण त्या वचनांचा जो सामाजिक अर्थ आहे त्याची गंधवार्ताहि जुन्या आणि नव्या वारकऱ्यांना नाही. अस्पृश्योद्धार हें एकच कार्य वारकऱ्यांनी हातीं घेतलें असतें तर हजारो अस्पृश्य जें धर्मांतर करीत आहेत तें त्यांनी केलें नसतें. वारकरी बहुंशीं खेड्यापाड्यांतच असतात, आणि खेड्यापाड्यांत अजूनहि अस्पृश्यतेचा फार मोठा जोर आहे. तिचें उच्चाटन झालें नाही तर राहिलेला अस्पृश्य समाजहि असाच धर्मांतर करील हें उघड दिसत आहे. पण वारकरी पंथाला, त्यांतील धुरीणांना याची चिंता नाही. मग आदिवासी, पतित, बेवारशी, अनाथ, वेश्या या वर्गांत शिरून त्यांच्यांत राहून, त्यांच्या सुखदुःखाशीं समरस होऊन, त्यांच्या योगक्षेमाची चिंता वाहून त्यांना प्रतिष्ठित जीवनांत स्थिर करण्याच्या कार्याला वारकरी पंथाचे धुरीण वाहून घेतील ही आशा स्वप्नांतहि करतां येत नाही. इतर जुन्या धर्मसंस्थांची व पंथांची हीच कथा आहे, आणि तीच कथा गेल्या पांचपन्नास वर्षांत निर्माण झालेल्या महाराजांच्या संस्थांची आहे. त्या सत्यनारायण करतात, भंडारे करतात, त्यांचे दर्शनांचे कार्यक्रम होतात. पण समाजांतली भोळसट, बावळी, अंध धर्मश्रद्धा नष्ट करावी, धर्माला विज्ञानवादी, बुद्धिवादी बनवावें, आपलीं धर्मतत्त्वें कमाल मर्यादेपर्यंत विज्ञानपूत करून त्यांचा उपदेश करावा, प्रसार करावा असें धोरण त्यांनी मुळीच अवलंबिलेलें नाही. या विचारांचा

महाराजांना किंवा त्यांच्या अनुयायांना स्पर्शहि झालेला नसतो. साईमहाराज गेल्यानंतर दहा वर्षेपर्यंत एका सामान्य चतुर गृहस्थाने त्यांचें दर्शन घडवितों असें सांगून हजारो सुशिक्षित अनुयायांना हातोहात फसविलें, त्यांच्याकडून अमाप पैसा उकळला, ही वार्ता नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. हे श्रम व हा पैसा जे का रंजले गांजले त्यांच्यासाठी संस्था उभारण्यांत खर्ची पडला असता तर! पण धर्म हें सामाजिक पुण्य आहे ही दृष्टिच आपल्याला नाही. आपली सर्व धडपड वैयक्तिक पुण्यासाठी आहे.

यानंतर आजच्या हिंदुत्ववादी संस्थांचा विचार. हिंदुमहासभा, जनसंघ, वर्णाश्रमस्वराज्य संघ, अशा अनेक संस्था हिंदुधर्मरक्षणाचें ब्रीद मिरवीत आहेत. पण त्या सर्व आज सत्तास्पर्धेच्या राजकारणांत उतरल्या आहेत. नगरपालिका, लोकल बोर्डें, विधानसभा या ठिकाणच्या निवडणुका लढविणें यावरच आज या संस्थांची शक्ति खर्च होत आहे. पाश्चात्त्य मिशनऱ्यांचीं पाताळयंत्री कारस्थानें या संस्थांनी ओळखलीं आहेत. त्यावर टीका करून त्यांच्या धर्मप्रसाराला बंदी घालावी अशा मागण्याहि विधानसभेंत हे लोक करतात. पण पाश्चात्त्य मिशनरी आज तीनशे वर्षें दीन, बहिष्कृत, असहाय, अनाथ यांच्या उद्धाराचें जें कार्य करीत आहेत तें आपण करावें, अशी वृत्ति या संस्थांची नाही. वास्तविक श्रेष्ठ अर्थानें हेंच खरें राजकारण आहे. कारण वर सांगितल्याप्रमाणे व्यक्तीची प्रतिष्ठा हाच खरा लोकशाहीचा म्हणजेच श्रेष्ठ राजकारणाचा पाया आहे. भारतामध्ये अस्पृश्य, आदिवासी, बहिष्कृत, पतित, दीन, दरिद्री यांचीच संख्या दहाबारा कोटींपर्यंत भरेल. या समाजांतून तत्त्ववेत्ते, इतिहासकार, मुत्सद्दी, राजकारणी, धर्मज्ञ, साहित्यिक, डॉक्टर, वकील, इंजिनियर, संशोधक, शिक्षक, कलाकार, व्यापारी, कारखानदार असे कर्ते पुरुष निर्माण होतील तेव्हाच लोकशाहीची ही प्रचंड जबाबदारी पेलण्याचें सामर्थ्य भारतीय समाजाला प्राप्त होईल. पण या समाजांतील लोकांना जीवनांत प्रतिष्ठा लाभल्यावांचून त्यांच्यांतून असे पुरुष कधीच निर्माण होणार नाहीत. ती प्रतिष्ठा प्राप्त करून देणें हें धर्माचें कार्य आहे, आणि म्हणूनच हिंदुमहासभा, जनसंघ या संस्थांचें तें कार्य आहे. पाश्चात्त्य मिशनरी आफ्रिकेच्या, ब्राझीलच्या, मंगोलियाच्या जंगलांत जातात, हिमालयांत येतात, सातपुड्यांत फिरतात, आणि तेथे

मठस्थापना करून भोवतालच्या समाजांत हें कार्य करतात. पण अशा मठांची स्थापना या हिंदुत्ववादी संस्था भारतांतल्या जंगलां-पहाडांत तर राहोच, पण खेड्यांतहि करीत नाहीत. तें त्यांचें उद्दिष्टच नाही. काँग्रेस परधार्जिणी आहे एवढी टीका फक्त त्या करतात. मिशनऱ्यांपासून धोका कसा आहे तें समाजाला त्या सांगतात. पण हा रोग निवारण्याचा जो मूलगामी उपाय – म्हणजे मिशनऱ्यांचेंच कार्य आपण करणें – त्याचा अवलंब मात्र त्या करीत नाहीत. कारण त्यांना म्युनिसिपालिटींत निवडून यांवयाचें आहे.

अशी ही वर सांगितल्याप्रमाणे निराशाजनक स्थिति आहे. व्यक्तीचा उद्धार करणारी, तिच्या सुप्त गुणांचा विकास करण्याची संधि देणारी संस्था हें स्वरूप अजूनहि हिंदुधर्माला येत नाही. पूर्वी हा धर्म फक्त वैयक्तिक पुण्याची, मोक्षाची जोड करून देत असे. आता त्याच्या नांवाने स्थापन झालेल्या संस्था सत्ताप्राप्तीचें राजकारण खेळत आहेत. गेल्या हजार दीड हजार वर्षांचा हिंदुधर्माचा इतिहास पाहिला तरी मनावर निराशाच येते. पतित, दीन, बहिष्कृत, अनाथ यांना आश्रय द्यावा, त्यांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकवावें, संघटित करावें, त्यांच्या योग-क्षेमाची चिंता वाहावी आणि अशा रीतीने या थोर धर्माचा पाया भक्कम करावा असें येथील धर्मधुरीणांचें धोरण कधीच नव्हतें. त्यांना दूर लोटणें, त्यांचा वाराहि न लागूं देणें, त्यांची सावलीहि न घेणें, त्यांचा शब्दहि कानीं न पडूं देणें यांतच धर्माचरण आहे असें त्यांना वाटत असे. ज्ञानेश्वरादि संतांनी हें धोरण बदलण्याचे प्रयत्न केले. परमार्थांत त्यांना कांही यशहि आलें. सामाजिक व्यवहारांत त्याचा थोडा परिणामहि झाला. पण त्यांच्या वचनांचा जो भरीव सामाजिक अर्थ तो कोणींहि जाणला नाही. मग पाश्चात्त्य मेथॉडिस्ट, क्वेकर इत्यादि पंथीयांप्रमाणे तो प्रत्यक्ष आचरणांत आणणें दूरच राहिलें. त्यामुळे ज्ञानेश्वरांच्या काळीं आपल्या समाजांतील शूद्र, अस्पृश्य, भिल्ल, कोळी, कातकरी इत्यादि जमातींची जी स्थिति होती तिच्यांत पुढल्या सहाशे वर्षांत कसलाच फरक पडला नाही. या समाजांतून वर सांगितल्या प्रकारचे कर्तृत्वशाली पुरुष किती निर्माण झाले याचा हिशेब घ्यावा म्हणजे हिंदुधर्माने यांच्यासाठी काय केलें तें सहज कळून येईल. त्या

मागल्या काळांतच वरिष्ठ वर्णीयांनी केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्यास, शांततेने प्रतिकार करण्यास क्वेकर पंथाप्रमाणे हिंदुधर्मधुरीणांनी त्यांना शिकविलें असतें, तर आज या जमाती समाजाला आधारभूत झाल्या असत्या आणि हिंदु समाज कर्तृत्वसंपन्न झाला असता; पण ही दृष्टिच येथे नव्हती. असली धर्मक्रान्ति येथे कधी झालीच नाही, आणि दुर्दैव असें की आज ही दृष्टि प्राप्त झाली असूनहि तसली धर्मक्रान्ति येथे घडून येत नाही. हें कार्य झेपण्याइतकी धर्मनिष्ठा भारतीयांत नाही असा याचा स्पष्ट अर्थ आहे.

भारतीय जनतेंत धर्मश्रद्धाच नाही, ती लुप्त झाली आहे असा मात्र याचा अर्थ नाही. धर्मश्रद्धा ही कोणत्याहि समाजांतून कधीहि लुप्त होणें शक्य नाही असें माझें निश्चित मत आहे. हिंदु समाज त्याला अपवाद नाही. काशी, रामेश्वर, अयोध्या, द्वारका, पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविकांची संख्या पाहिली, कुंभमेळ्यासारख्या पर्वणीला सहज तीस-चाळीस लाख यात्रा जमते हें लक्षांत घेतलें, साईमहाराज, नारायणमहाराज, उपासनी, मेहेरबाबा यांचे भक्त कोणत्या वर्गांतून येतात हें ध्यानीं घेतलें म्हणजे विसाव्या शतकाविषयीच्या, बुद्धिवादी युगाविषयीच्या, भौतिकवादाच्या प्राबल्याविषयीच्या आपल्या भ्रांतिष्ट कल्पना तत्काळ नष्ट होतील. आपण हें ध्यानांत घेतलें पाहिजे की, विज्ञानाची, मानवी सामर्थ्याची कितीहि प्रगति झाली तरी मानवाचें दुःख शतांशानेहि नष्ट करणें त्याला शक्य होणार नाही. परमेश्वराचें मूळ रूप कसें आहे, तो निर्गुण आहे कीं सगुण आहे, तो अवतार घेतो कीं नाही, बुद्धीला त्याचें आकलन होईल कीं नाही हें सांगणें फार कठीण आहे. तें कोडें मानवी बुद्धीला उलगडणार नाही असें तत्त्ववेत्तेच सांगतात. पण असें असलें तरी परमेश्वर हा मानवाचा फार मोठा आधार आहे यांत मात्र शंका नाही. हें जग अत्यंत दुःखमय आहे. मनुष्यावर, त्याच्या आप्तजनांवर, त्याच्या संसारावर, पदोपदीं अनंत आपत्ति येत असतात. संकटांनी तो अत्यंत जर्जर झालेला असतो. रोगराई, दारिद्र्य, अन्नान्नदशा व मृत्यु या दुःखांनी तो सतत गांजलेला असतो, आणि मानवी भौतिक उपायांनी या आपत्तींना तोंड देणें शक्य नाही हें प्रतिक्षणीं त्याला दिसत असतें. अशा वेळीं कोणती तरी दैवी शक्ति – अत्यंत वत्सल, दयाळू, न्यायी व सर्वसमर्थ अशी शक्ति – आपल्याला आश्रय म्हणून असावी अशी

मनुष्याची तीव्र, अतिउत्कट इच्छा असते, आणि परमेश्वर अशी शक्ति आहे असें ज़गांतले सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्ते व धर्मवेत्ते सांगत असल्यामुळे त्याच्यावर मनुष्य साहजिकच श्रद्धा ठेवतो. दुसरेंहि एक कारण आहे. जगांतील दुःखांतून मुक्तता ही जशी मानवाची आर्ती आहे त्याचप्रमाणे मृत्यूनंतरच्या जीवनाची, अमरतेचीहि मानवाला आस आहे. भौतिक देह हा नाशवंत आहे, तो अमर होऊं शकत नाही हें तो जाणतो, पण याच देहांतील आत्मा अमर आहे ही कल्पना, ही श्रद्धा त्याला फार मोठें समाधान प्राप्त करून देते. देहनाश म्हणजे सर्वनाश, मरण म्हणजे पूर्ण विलय, अगदी शून्याकार असें जर मनुष्याला वाटलें तर त्याचें जीवित वैराण होईल, त्याचें वाळवंट होईल. हें जीवित अर्पून, प्राणहि टाकून कांही मिळवावें असें त्याला कधीहि वाटणार नाही. कारण प्राण टाकल्यावर मिळवावयाचें कोणीं आणि कोणासाठी ? पुढच्या जन्मीं मींच मिळवावयाचें आणि तें माझ्या आत्म्यासाठी मिळवावयाचें ही श्रद्धा मानवाला ध्येयवादी बनविते. वाटेल त्या त्यागाला, तपश्चर्येला त्याला उद्युक्त करते. ती मानवी जीवनांतून लुप्त झाली तर मानव तपहीन, ध्येयहीन होईल आणि त्यामुळेच तो दुबळा होईल. तेव्हा परमेश्वर माता आहे, संकटहर्ता आहे ही श्रद्धा जशी मानवाच्या मनःस्वास्थ्यासाठी अवश्य आहे तशीच अमरतेची, अनंतत्वाची त्याची आकांक्षा तृप्त करण्यासाठीहि ती अवश्य आहे. ही श्रद्धा हीच धर्मबुद्धि होय.

पण ही श्रद्धा मूळच्या अंधस्थितींत राहूं दिली तर, मानवाच्या इतर अनेक सहजप्रवृत्ति मूळच्या असंस्कृत अवस्थेंत राहूं दिल्या तर जशा अनर्थास कारण होतात, तशीच हीहि होते. अंधश्रद्धेमुळे आतापर्यंत किती व कसे अनर्थ उद्‌भवले हें स्पष्ट करून सांगण्याची गरज नाही, ते सर्वविश्रुत आहेत. म्हणून ही श्रद्धा शक्य तितकी विज्ञानपूत करून घेणें अवश्य असतें. परमेश्वर किंवा सृष्टीचें मूळ कारण हें सर्वस्वी बुद्धीच्या किंवा विज्ञानाच्या कक्षेंत येणें कधीहि शक्य नाही. आज कोणाच्या स्वप्नांतहि ही आशा नाही; पण विवेकाच्या, विज्ञानाच्या अग्नींत घालून ती शक्ति जास्तींत जास्त शुद्ध करून घेणें, तिला अत्यंत उदात्त रूप देणें हें मात्र शक्य व अत्यंत अवश्य आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांनी गेल्या तीन चारशे वर्षांत हें केलें आहे. त्यांनी

धर्मक्रान्ति केली ती हीच होय, आणि अशा रीतीने जास्तींत जास्त विज्ञान-पूत करून घेतलेली श्रद्धा ही मानवाला केवढी ध्येयशक्ति प्राप्त करून देते तें आपण वर पाहिलेंच आहे. परमेश्वर आहे कीं नाही हा प्रश्न येथे सर्वस्वी अप्रस्तुत आहे. ग्रीक इतिहासाचें विवेचन करतांना फिशर या पण्डिताने म्हटलें आहे की, मानवाला प्रेरणा मिळते ती मूळ वास्तवापासून किंवा सत्यापासून मिळत नसते, तर त्या वास्तवाविषयी त्याची जी कल्पना असते तिच्यापासून मिळते. भोवतालच्या इतर रानटी जमातींहून आपण वंशतः श्रेष्ठ आहों अशी ग्रीकांची श्रद्धा होती. वास्तविक हें सत्य नव्हतें, पण त्यांची तशी श्रद्धा इतकी जबरदस्त होती की, तीच त्यांच्या उत्कर्षाला, अलौकिक वैभवाला कारणीभूत झाली. धर्मश्रद्धेचें असेंच आहे. ती श्रद्धाच मानवाच्या उत्कर्षाला, वैभवाला आजपर्यंत कारणीभूत झालेली आहे. मात्र समाज-धारणेसाठी अवश्य असलेल्या या महाशक्तीचा विनियोग समाजधुरीण कसा करतात यावर सर्व अवलंबून आहे.

वर सांगितलेंच आहे की, भारताची लोकसत्ता यशस्वी व्हावयाची असेल तर अशा तऱ्हेची धर्मक्रान्ति येथे होणें अवश्य आहे. गेलीं हजार दीड हजार वर्षें तरी आपला धर्म वैयक्तिक व मोक्षवादी असल्यामुळे आपल्या समाजाचा अधःपात झाला आहे. पाश्चात्त्य देशांतील धर्माचें जें नवें स्वरूप आहे त्यांत संघटना आहे, बुद्धिवाद आहे, ज्ञाननिष्ठा आहे आणि प्रयत्नवाद आहे. समाजधारणेला अत्यंत अवश्य असलेल्या या गुणांचा आपल्या समाजांतून मधल्या काळांत अगदी लोप झाला होता. मोक्ष, परलोक हेंच साध्य असल्यामुळे संघटित जीवनाची लोकांना आवश्यकता कधी भासलीच नाही. कारण हजार पांचशे लोक एकत्र येऊन संघटित बल निर्माण करून मोक्ष मिळवावयाचा नसतो. त्यासाठी अवश्य तें धर्माचरण एकटचानेच करावयाचें असतें, आणि भजन, कीर्तन, मनन-चिंतन हेंच प्रामुख्याने त्या धर्माचरणाचें स्वरूप असल्यामुळे ऐहिक जीवनाला अवश्य तो प्रयत्नवाद त्यांतून जोपासला जात नाही. आपला शेतकरी, कारागीर आणि वारकरी हा आज शेकडो वर्षें दैववादी झाला आहे. त्यामुळे नवें संशोधन करावें, निसर्गावर मात करावी, शेतीच्या, विणकामाच्या, सुतारकामाच्या, लोहारकामाच्या नव्या पद्धति शोधून काढाव्या ही ईर्षाच त्याच्या ठायीं कधी निर्माण झाली नाही,

आणि ही ईर्षा नसल्यामुळें दिवसांतून बारा, चौदा, सोळा तास काम करावें ही ऐपतच भारतीयांच्या अंगीं कधी आली नाही. आज गरज आहे ती अशा अविश्रांत कष्टाची आहे. जर्मनी, जपान हीं राष्ट्रें महायुद्धानंतर अगदी रसातळाला गेलीं होतीं, पण आठ दहा वर्षांच्या अवधींतच त्यांनी पूर्वीच्या दसपट समृद्धि निर्माण केली आहे. अखंड, अहोरात्र, अविरत कष्ट हेंच त्यांच्या उन्नतीचें रहस्य आहे, याविषयी जगांत दुमत नाही. असे कष्ट भारतीयांच्या रक्तांतच नाहीत. वैयक्तिक, परलोकनिष्ठ, मोक्षवादी धर्मामुळें आपलें रक्तच पांगुळलें आहे. शेतकऱ्याला दुप्पट जमीन दिली तर कष्ट निम्मे करून तो पहिल्या पातळीवरच राहतो, आणि दिल्लीचा सरकारी अधिकारी वरची श्रेणी मिळतांच ऑफिसांत निम्मा वेळच येतो. दुप्पट जमीन, दुप्पट पगार हे येथे दुप्पट श्रमाला प्रेरणा देत नाहीत, तर आळस, निरुद्योग, हीन विलास हे त्यांतून निर्माण होतात. आपलें शब्दप्रामाण्य, आपला दैववाद व आपली मोक्षदृष्टि हीं या अनर्थाच्या बुडाशीं आहेत.

आपली धर्मदृष्टि आमूलाग्र बदलल्यावांचून शेकडो वर्षे आपल्या हाडीं-मांसीं खिळलेले हे दोष नाहीसे होणार नाहीत, आणि ते नाहीसे झाल्या-वांचून लोकशाहीला अवश्य तें कर्तृत्व येथे निर्माण होणार नाही. आपण लोकशाहीचे पुरस्कर्ते आहोंत, त्यामुळे तर या धर्मक्रान्तीची येथे फारच आवश्यकता आहे. दण्डसत्तांकित देशांची गोष्ट थोडी निराळी आहे. दण्ड-सत्ता म्हणतांच प्रामुख्याने आज रशिया व चीन हीं राष्ट्रें डोळ्यांसमोर येतात. तेथे धर्म ही अफूची गोळी मानली जाते, धर्म हा समाजाचा शत्रु मानला जातो. पण या राष्ट्रांच्या बाबतींत कांही ऐतिहासिक निर्णय करतांना फार जपून विचार केला पाहिजे. धर्मनिष्ठेप्रमाणेच राष्ट्रनिष्ठाहि मार्क्स-वादाला निषिद्ध वाटत असे; आणि पहिल्या उत्साहाच्या भरांत रशियांतील धुरीणांनी राष्ट्रनिष्ठेचाहि नायनाट करण्याचा प्रयत्न केला होता. आपापल्या देशांतील सरकारांचा पराभव घडवून आणणें हें कामगारांचें पहिलें कर्तव्य होय असें लेनिन म्हणत असे. कामगार मातृभूमि जाणीत नाहीत, असें मार्क्स म्हणाला होता. मार्क्सवादांतील अनेक भ्रम पुढे नाहीसे झाले तसाच हा भ्रमहि नष्ट होऊन आज रशिया व चीन हे दोन्ही देश कट्टर राष्ट्रवादी झाले

आहेत. हिंदुस्थानसारख्या इतर देशांतल्या कम्युनिस्टांना स्वदेशद्रोही बनविण्यापुरतीच आंतरराष्ट्रीयता त्यांनी शिल्लक ठेवली आहे. धर्माच्या बाबतींत अजून इतकें परिवर्तन झालेलें नाहीं हें खरें; पण धर्माचरणाला व धर्मप्रसाराला प्रारंभीं जितका कम्युनिस्ट नेत्यांचा विरोध होता तितका आता राहिलेला नाहीं. त्या प्रारंभींच्या काळांतहि रशियन जनतेची धर्मनिष्ठा अणुमात्र कमी झालेली नव्हती. सिडने वेबने म्हटलें आहे की, रशियनांना लेनिन, स्टॅलिन हे पूज्य वाटत; पण मध्ये ख्राइस्ट, एका बाजूला लेनिन व दुसऱ्या बाजूला स्टॅलिन अशीं चित्रें लावून ते तिघांची पूजा करीत असत. आता तर घटनेनेच प्रत्येकाला पूर्ण धर्मस्वातंत्र्य दिलेलें आहे. त्या अन्वयें ख्रिस्ती, मुसलमान, ज्यू, बौद्ध सर्वांचे धर्मसंस्कार त्यांच्या त्यांच्या धर्मग्रंथाप्रमाणे होतात, त्यांच्या उपासना त्यांच्या धर्ममंदिरांत चालतात आणि पूर्ण धर्मनिष्ठ, ईश्वरनिष्ठ नागरिकांना आता इतरांप्रमाणेच मताधिकार आहे.

पण महत्त्वाची गोष्ट अशी की, युद्धासारखी आपत्ति आली की, कम्युनिस्ट लोक राष्ट्राच्या याच प्रेरक शक्तीला आवाहन करतात. हिटलरचें आक्रमण येणार असें १९३४–३५ सालीं दिसूं लागतांच मार्क्सवादाच्या शिळोप्याच्या गप्पा संपल्या व रशियाने राष्ट्रनिष्ठेची जोपासना करण्यास प्रारंभ केला आणि प्रत्यक्ष युद्ध सुरू होतांच कम्युनिस्ट नेत्यांनी जनतेच्या धर्मभावनेला आवाहन करण्यास सुरुवात केली. सर्व जुनीं मंदिरें खुलीं करण्यांत आलीं. सहस्रसंख्येने लोक प्रार्थनेला जमूं लागले. मंदिरांत पूजासाहित्य सरकार पुरवूं लागलें. पूर्वीच्या काळीं धर्मनिष्ठेमुळेच रशियाला मोठमोठे जय मिळाले असें कम्युनिस्ट नेतेहि लिहूं बोलूं लागले. धर्म ही अफूची गोळी कोणी म्हणेल तर त्यालाच आता गोळी बसेल असा मनु पालटला. नोव्हेंबर १९४२ मध्ये सेरेजी व सुलेव्ह या धर्मगुरूंचे स्टॅलिनने जाहीरपणें आशीर्वाद घेतले आणि तें वृत्त प्रवदा पत्रांत छापण्यांत आलें. निरीश्वरवाद, नास्तिक्य हें कम्युनिस्ट पक्षाचें (मार्क्सप्रणीत) प्रिय तत्त्व; पण त्याच्या प्रचारास बंदी घालण्यांत आली. धर्म ही प्रतिगामी शक्ति नसून रशियाने ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यापासून त्याची सारखी प्रगतिच होत आहे असें रशियन सरकारी इतिहासकार आता सांगूं लागले. (मॉरिस हिंडस : मदर रशिया) याचा अर्थ असा की, धर्मनिष्ठा ही फार मोठी प्रेरणा आहे, तिच्यावांचून महान् कार्यें मानवाला

पार पाडतां येणार नाहीत हें सोव्हिएट नेत्यांनी कृतीने तरी मान्य केलें आहे. आज रशिया व त्याचे अंकित देश येथे प्रवास करून येणारे निरीक्षक तर एकमुखाने सांगतात की, तेथील नेत्यांचा तत्त्वतः धर्माला कितीहि विरोध असला तरी जनतेमध्ये धर्मभावना वाढीलाच लागलेली दिसते. धर्मनिष्ठेचा संपूर्ण नाश झाला पाहिजे असें तत्त्वज्ञान मात्र कम्युनिस्ट नेते तोंडाने सांगत असतात. त्यासाठी कोणत्या उपायांचा अवलंब करावा याची चर्चा करण्यासाठी गेल्या चाळीस वर्षांत २५–३० तरी परिषदा झाल्या असतील, पण अजून याविषयी धोरण निश्चित झालेलें नाही. कारण कोणताच उपाय यशस्वी होत नाही, आणि तो होणारहि नाही. कारण जरा आपत्प्रसंग आला की, कम्युनिस्ट नेते धर्मनिष्ठेची स्वतःच जोपासना करतात.

भारताला पुढच्या कांही वर्षांत महाकार्य साधावयाचें आहे. अतिमहाकार्य, अगदी दुष्कर, अघटित असें कार्य साधावयाचें आहे. स्वातंत्र्यप्राप्ति हें कार्य कांहीच नव्हे इतकें तें ध्येय दुःसाध्य आहे. आपल्याला लोकशाही सिद्ध करावयाची आहे. हें कार्य किती दुर्घट आहे हें आवतीभोवती दृष्टि टाकली तर सहज कळून येईल. गेल्या पंचवीस वर्षांत आशिया खंडांत ज्या लोकसत्ता प्रस्थापित झाल्या त्या आपल्या डोळ्यांदेखत कोलमडून पडत आहेत. ब्रह्मदेश, ईजिप्त, इराक, इंडोनेशिया, पाकिस्तान, तुर्कस्थान येथल्या लोकसत्ता पत्त्यांचे बंगले कोसळावे तशा कोसळत आहेत. पण येवढ्यानेच हें भागत नाही. ज्या युरोपपासून आपण लोकसत्तेचीं तत्त्वें घेतलीं तेथेहि असाच प्रलयकंप चालू आहे. जर्मनी, इटली, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया येथल्या लोकसत्ता हिटलर-मुसोलिनींनी उधळून दिल्या. आता त्यांच्यावर सोव्हिएट रशियाची काळी छाया पसरली आहे. त्यांतून कोणी थोडा सावरत आहे तो लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचें आदिपीठ, यांचें माहेरघर जें फ्रान्स तेथेच लोकशाहीला ग्रहण लागलें आहे. अजून तें खंडग्रास आहे. पण केव्हा खग्रास होईल त्याचा नेम नाही. असा कल्पान्त सर्वत्र दिसत असतांना आपण आपली लोकसत्ता यशस्वी करणारच अशी प्रतिज्ञा केली आहे. लास्कीने आपल्या ' रिफ्लेक्शन्स ' या ग्रंथांत इंग्लंडच्या भवितव्याविषयी विवेचन करतांना म्हटलें आहे की, " मोठीं कार्यें साधण्यासाठी धर्मनिष्ठेसारखी निष्ठाच अवश्य आहे, आणि ती तर आपणांजवळ सध्या नाही. " भारताला आज बेकारी नष्ट करावयाची आहे, समृद्धि निर्माण करावयाची आहे, औद्योगिक

प्रगति साधावयाची आहे, ४० कोटी लोकांना साक्षर करावयाचें आहे; आळशी, मंद, अंध, अशा लोकांना १२, १४, १६ तास काम करावयास शिकवावयाचें आहे, सहकारी संस्थांचें जाळें विणावयाचें आहे, योजना यशस्वी करावयाच्या आहेत, नद्या अडवावयाच्या आहेत, वाळवंटें भिजवावयाचीं आहेत, डोंगर फोडावयाचे आहेत, पर्वत उचलावयाचे आहेत, आणि हें सर्व व्यक्तिस्वातंत्र्य न हिरावतां, गोळी न घालतां, कॉन्सेन्ट्रेशन कँप न उघडतां साधावयाचें आहे. प्राध्यापक लास्कीप्रमाणेच आपणहि ध्यानीं घेतलें पाहिजे की, " मोठीं कार्यें साधण्यासाठी धर्मनिष्ठाच अवश्य आहे "; आणि लोकशाहीला पोषक अशी धर्मनिष्ठा येथे निर्माण व्हावयाची तर वर वर्णिलेल्या युरोपांतल्या धर्मक्रान्तीसारखीच धर्मक्रान्ति भारतांत झाली पाहिजे. धर्माने केवळ मोक्षच मिळतो असें नाही तर श्रेष्ठ, धर्माला अविरोधी असे जे अर्थकाम तेहि प्राप्त होतात हें भारतीयांनी जाणणें हीच ती धर्मक्रान्ति होय.

पण अशी धर्मक्रान्ति येथे कशी घडविणार हा मोठाच प्रश्न आहे. खरे म्हणजे वारकारी संप्रदाय, रामदासी संप्रदाय, शंकराचार्यांचीं पीठें, इतर अनेक संतमहंतांचीं पीठें, जुन्या देवस्थानांचे, मठांचे अधिकारी यांचें हें काम आहे. गेल्या पन्नास वर्षांत या संस्थांमध्ये नवीन पदवीधर, पाश्चात्त्य विद्याविभूषित, सुशिक्षित अशा अनेक लोकांचा प्रवेश झाला आहे. त्यांतील कित्येक तेथे मोठ्या अधिकारपदांवर आहेत. पण धर्म हें सामाजिक पुण्य आहे, केवळ मोक्षकार्य नाही, अनाथ, अपंग, बहिष्कृत, पतित, रंजले गांजले यांच्या योगक्षेमासाठी, त्यांच्या ऐहिक उत्कर्षासाठी, त्यांच्यावर होणारे अन्याय दूर करण्यासाठी, आपण संस्था उभारल्या पाहिजेत, त्यांना संघटित केलें पाहिजे, आणि या सेवेंतून श्रीभगवद्गीतेचा, ज्ञानेश्वरांचा, तुकाराममहाराजांचा संदेश त्यांच्या मनावर ठसविला पाहिजे, अशा तऱ्हेची जाणीव सुद्धा या लोकांना नाही. मग तसे प्रयत्न त्यांच्या हातून होणें लांबच राहिलें. हिंदुमहासभा, जनसंघ, वर्णाश्रमस्वराज्य संघ यांची कहाणी वर सांगितलीच आहे. या तर सर्व अर्वाचीन संस्था आहेत. राष्ट्रसेवेसाठी, ऐहिक उत्कर्षासाठी, अभ्युदयासाठीच त्या निर्माण झाल्या आहेत. माझें तर असें मत आहे की, निवडणुकीचें, सत्तेचें राजकारण पूर्णपणें सोडून देऊन त्यांनी गेल्या तीनशे वर्षांत मेथॉडिस्ट, क्वेकर, साल्व्हेशन आर्मी, इ. ख्रिस्ती धर्मपंथांनी

युरोपांत जशी धर्मक्रान्ति घडवून आणली तशी येथे घडवून आणण्याच्या कार्याला वाहून घेतलें पाहिजे. समर्थांच्या कार्याचें विवेचन करतांना प्रा. माटे यांनी म्हटलें आहे की, रूढ अर्थानें समर्थांनी राजकारण केलें नसेल. पण सर्व राजकारणाचा पाया जो प्रवृत्तिधर्म त्याचा उपदेश त्यांनी केला, जनमनांत त्या दृष्टीने क्रान्ति केली, हेंच त्यांचें खरें राजकारण होय. या दृष्टीने हिंदुत्ववादी संस्थांनी भारतांत जर इष्ट ती धर्मक्रान्ति घडवून आणली तर तें खरें श्रेष्ठ राजकारण होईल.

भारत हें निधर्मी राष्ट्र आहे. याचा अर्थ इतकाच की, येथलें शासन निधर्मी आहे, म्हणजे तें कोणत्याहि एका विशिष्ट धर्माविषयी पक्षपात दाखवीत नाही. खरें पाहतां भारतांतल्या सर्व धर्मीयांच्या धर्मभावनेचा परिपोष करण्याची चिंता वाहणें हें भारताच्या शासनाचें कर्तव्य आहे. पण एकंदर धर्मभावनेविषयी उदासीन राहणें येवढीच आपल्या शासनाची दृष्टि आहे. वास्तविक आर्थिक, सामाजिक व राजकीय क्रान्ति घडवून आणणें हें जसें सरकारचें कर्तव्य आहे त्याचप्रमाणे भारतांतल्या सर्व समाजांत धर्म-क्रान्तीला चालना देणें हेंहि सरकारचें कर्तव्य आहे. पण सध्याचें सरकार हें कधीहि करणार नाही. कारण मुसलमानांच्या धर्मभावना दुखवतील अशी येथल्या शास्त्यांना भीति आहे. राष्ट्रनिष्ठेची जोपासना करणें हा तर या युगाचा धर्म आहे, पण परधर्मीयांच्या भीतीने– भीति इतकीच कीं, ते निवड-णुकींत मतें देणार नाहीत – कॉंग्रेसच्या नेत्यांना आपल्या महनीय पूर्वपरंपरेचा अभिमान भारतीयांच्या चित्तांत बिंबविण्याचें धाडसहि करवत नाही. मग धर्माचा प्रश्न तर आणखीच नाजूक आहे. तेव्हा हे निवडणूकनिष्ठ लोक मुसल-मान, ख्रिस्ती या समाजांत धर्मक्रान्ति घडवून आणण्याचा विचार स्वप्नांतहि करणार नाहीत. निवडणूकनिष्ठेमुळे त्या विधर्मी समाजांत प्रयत्न नाही आणि निधर्मी व्रतामुळे हिंदुसमाजांत नाही. असें हें कॉंग्रेसचें धर्मकारण आहे. खरें पाहतां धर्मप्रचारापासून अलिप्त राहण्याचें धोरण कटाक्षाने संभाळल्या-नंतर प्रत्येक समाजांत वर सांगितल्या प्रकारची धर्मक्रान्ति घडवून आणण्या-साठी भारत सरकारने प्रचंड प्रयत्न करणें अवश्य आहे. शब्दप्रामाण्यवादी, केवळ परलोकनिष्ठ, अंध, विज्ञानविरोधी अशी धर्मभावना भारतांत कोणत्याहि समाजांत दृढावून राहिली तरी ती राष्ट्रसंघटनेला व लोकशाहीला घातक

ठरल्यावांचून राहणार नाही. रशियाचें धर्म मुळांतच नष्ट करण्याचें धोरण कोणाला पटो वा न पटो पण सोव्हिएट रशियांतील अंध, हेकट, दुराग्रही, राष्ट्रविरोधी, विज्ञानविरोधी धर्मभावना तेथील नेत्यांनी सगळ्याच जमातीं-तून समूळ खणून काढली आहे यांत शंकाच नाही, आणि यामुळे रशियाचें बळ शतपटीने वाढलें आहे याबद्दलहि दुमत होईल असें वाटत नाही. शतका-नुशतकें शब्दप्रामाण्यवादी अंध धर्माला कवटाळून असलेल्या जमातीच्या प्रदेशांचें तीस चाळीस वर्षांत औद्योगीकरण करून टाकण्यांत, त्या जमातींना अज्ञानयुगांतून विज्ञानयुगांत ओढून आणण्यांत सोव्हिएट नेत्यांना जें अभूत-पूर्व यश आलें आहे त्याचें बरेचसें श्रेय त्यांच्या इतर अनेक तत्त्वांप्रमाणे या धर्मकारणालाहि देणें अवश्य आहे. रशियांतील धर्मनाशाच्या प्रयत्नांचा विचार करतां एक गोष्ट स्पष्ट दिसून येते की, सोव्हिएट नेते अखिल जनतेची मनःक्रांति घडवून आणण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करीत आहेत. धर्मभावना नष्ट करीत असतांना त्या मनांत विज्ञाननिष्ठा रुजविली पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असतो. १९५७ च्या मेमध्ये 'शास्त्रीय निरीश्वरवादा'ची मॉस्को येथे परिषद भरली होती. तिच्यापुढे झालेलीं भाषणें वाचलीं की, हें अगदी स्पष्ट होईल. 'पाव्हलाव्हचे सिद्धान्त' 'फिजिक्समधील जडवाद व अध्यात्मवाद' 'पृथ्वीवरील जीवोत्पत्ति' 'जीवनशास्त्रांतील द्वंद्व' या तऱ्हेचे निबंध तेथे वाचले गेले, आणि शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराने अंध धर्मश्रद्धा नष्ट करावी या धोरणाचा पुरस्कार केला गेला. कारण जुलमी साधनांनी दडपशाही करून धर्मश्रद्धा कधीच नष्ट होणार नाही हें आता रशियन नेत्यांनी चांगलेंच जाणलें आहे. त्यामुळे धर्मगुरूंच्या व जनतेच्या धर्मभावना दुखवावयाच्या नाहीत असा सक्त दंडक तेथील शास्त्यांनी घातलेला आहे. विज्ञानावरील ग्रंथ, पत्रकें, व्याख्यानें, प्रवचनें यांचा पाऊस पाडून जनतेला विज्ञानवादी व बुद्धिवादी बनवावयाचें असें धोरण त्यांनी आता आखलें आहे, यामुळे लोक विज्ञानवादी होत आहेत यांत शंका नाही. पण त्यांची धर्मभावना अणुमात्र कमी होत नाही. १९५४ सालीं सरकारच्या असें ध्यानांत आलें की सरकारी सायन्स ॲकॅडमींतच धर्मनिष्ठ लोक आहेत. एवढेंच नव्हे तर कॉमसोमॉल या कम्युनिस्ट तरुणांच्या संघटनेचे सभासदहि जोराने धर्मभावनेकडे वळत आहेत. ते चर्चमध्ये प्रार्थनेला जातात, आणि

विवाहसंस्कार व जातकर्महि चर्चमध्येच करतात. ( स्टडी ऑफ यू. एस्. एस्. आर. – ऑगस्ट १९५७) या सगळ्याचा परिणाम असा होत आहे की, रशियांत धर्मभावना नष्ट होत नाहीं तर ती पश्चिम युरोपांतल्याप्रमाणे विज्ञानपूत, बुद्धिवादी, इहलोकनिष्ठ व सामाजिक पुण्याची चिंता वाहणारी अशी होत आहे. हीच धर्मक्रान्ति भारतांत घडवून आणण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न आपल्या सरकारने करणें अवश्य होतें, पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्र-निष्ठेच्या जोपासनेची जशी त्याने अक्षम्य हेळसांड केली तशीच धर्मभावनेच्या जोपासनेचीहि केली. दोन्ही बाबतींत कारणपरंपरा मात्र तीच आहे. यामुळे यापुढेहि भारत सरकार असले कांही प्रयत्न करील ही आशा नाही..

पण जुन्या धर्मसंस्थांनी किंवा सरकारने कांहीहि प्रयत्न केले नाहीत तरी भारताच्या लोकशाहीची चिंता असणाऱ्या भारतीयांनी या कार्यासाठी नव्या संस्था निर्माण केल्या पाहिजेत. नवे धर्मपंथ स्थापिले पाहिजेत. मेथॉडिस्ट, क्वेकर इ. पंथांचा इतिहास आपण पाहिला तर त्यांनी जरी प्रत्यक्षांत केवळ धर्मक्रान्तीचेंच उद्दिष्ट ठेविलें असलें तरी ती क्रान्ति सामाजिक व राजकीय क्रान्तीला पोषक झाली, आणि लक्षावधि दलित जनतेच्या जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त झाल्याने या क्रान्तीमुळेच युरोपांत लोकशाहीचा पाया घातला गेला हें आपल्या ध्यानांत येईल, आणि भारताची लोकसत्ता समर्थ व बलाढ्य करण्यासाठी येथेहि तशीच क्रान्ति घडविण्याची प्रेरणा आपल्याला होईल. मोठ्या संस्था स्थापन होण्यास वेळ लागेल, पण त्यासाठी थांबून राहण्याची मुळीच आवश्यकता नाहीं. ज्याला या धर्माची प्रेरणा होईल त्याने आपल्या लहानशा परिसरांत प्रारंभीं सांगितलेल्या अल्बिनो, बटरवर्थ, टालव्हास, फादर क्लेटन यांच्याप्रमाणे धर्ममंदिर उभारून त्यांच्याच पद्धतीने कार्याला प्रारंभ केला पाहिजे. सध्या आपल्या समाजांत धार्मिक जीवन व इतर जीवन यांची फारकत झाली आहे. शिक्षणामध्ये धर्माला अग्रस्थान असावयास पाहिजे. सांस्कृतिक कार्यक्रमांत नव्या धर्माची शिकवण दिली पाहिजे. नव्या मानसशास्त्रज्ञांनी रोगमुक्ततेसाठी धर्मभावनेची, ईशप्रार्थनेची फार आवश्य-कता आहे असें सांगितल्यामुळे इंग्लंडमध्ये प्रत्येक रुग्णालयांत आतां धर्मो-पाध्यायांची योजना झालेली आहे, म्हणजे त्याहि क्षेत्रांत धर्मसंस्कारांची आवश्यकता आहे; पण इतर धर्मीयांच्या भावना दुखवतील म्हणून आपण

सार्वजनिक जीवनांतून धर्माला स्थानभ्रष्ट केलें आहे. यामुळे विज्ञानपूत, बुद्धिवादी, विवेकनिष्ठ अशा धर्मशिक्षणाची आपल्या जनतेची भूक भागविण्याची येथे सोयच नाही. त्यासाठी नव्या धर्मसंस्था लोकांनी उभारणें अवश्य आहे. महाराष्ट्रांतल्या खेडोपाडीं श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीज्ञानेश्वर, श्रीतुकाराम यांचीं मंदिरें उभारण्यांत आलीं आणि तेथे नव्या पद्धतीने भूतांचें पालन, कंटकांचें निर्दळण, प्राणिमात्रास सुखदान, अनाथांच्या काजा साह्य होणें, ज्यासी अपंगिता नाही त्यासी हृदयीं धरणें या धर्माचा प्रत्यक्ष आचार करण्याचें शिक्षण मिळालें तरच लोकशाहीला अवश्य ती धर्मक्रान्ति येथे घडून येईल. मात्र या नव्या धर्माच्या प्रवचनांत संसार, स्त्रीपुत्र, समृद्धि, लक्ष्मी, ऐहिक वैभव, विज्ञान, बुद्धिवाद, तर्कनिष्ठा, यांची चुकूनसुद्धा हेटाळणी होतां कामा नये. या सर्वांचा परिपोष करील व तो भगवंताच्या अधिष्ठानावरून करील अशाच धर्माची आता येथे आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे जातिधर्मनिरपेक्ष सर्व समाजाची सेवा हेंच याचें धोरण असलें पाहिजे. ‘हें विश्वचि माझें घर’ हा श्रीज्ञानेश्वरांचा संदेश प्रत्यक्ष आचरणांत आणणारीं धर्ममंदिरें प्रत्येक खेडयांत स्थापन झालीं तरच अवश्य ती धर्मक्रान्ति येथे घडून येईल. या मंदिरांनी चालविलेलीं रुग्णालयें, क्रीडामंदिरें, शाळा, औद्योगिक केन्द्रें यांत सर्वांना प्रवेश असला, सर्वांचें तेथे स्वागत झालें, त्यांनी सर्वांची सेवा केली आणि मानवधर्माचें उंच ध्येय डोळयांपुढे ठेविलें तर मिशनऱ्यांनी स्थापिलेल्या संस्थांना जगांत सर्वत्र जसें यश आलें तसें या मंदिरांनाहि येईल. आपल्या खेडयांमध्ये सध्या डॉक्टर, वकील, इंजिनियर, बागाइतदार, सहकारी पतपेढयांचे व्यवस्थापक असे समाजावर वर्चस्व असणारे अनेक व्यवसायांतले लोक असतात. त्यांनी या बाबतींत पुढाकार घेऊन सामाजिक पुण्याची प्राप्ति करून देणाऱ्या या धर्माच्या प्रसारासाठी संस्था उभारल्या, त्यासाठी स्वतःला वाहून घेतलें तर भारतांत थोडक्या अवधीत फार मोठें धर्मपरिवर्तन घडून येईल आणि रशियाने दण्डसत्तेने जें सामर्थ्य, जें बल प्राप्त करून घेतलें तें भारताला प्राप्त होईल. लोकसत्तेला दण्डसत्तेचें आव्हान आहे तें हेंच आहे. रशियाप्रमाणे विज्ञाननिष्ठा लोकांत बाणली पाहिजे, शब्दप्रामाण्य नष्ट झालें पाहिजे, समाजसेवेचें शिक्षण प्रत्येक तरुणाला मिळालें पाहिजे. राष्ट्रासाठी प्रत्येकाने सर्वस्वत्याग करावा ही

भावना नागरिकांत बाणली पाहिजे आणि तसा आचार घडला पाहिजे. रशियाने हें सर्व क्रूर, कठोर अशा दण्डसत्तेच्या साह्याने घडविलें आहे. 'तुम्ही व्यक्तिस्वातंत्र्याचे, अहिंसेचे, लोकशाहीचे अभिमानी म्हणवतां. तर त्या मार्गाने तुम्ही हें करून दाखवा' असें दण्डसत्तेचें लोकसत्तेला आव्हान आहे. वरील प्रकारची धर्मक्रांति आपल्याला घडवितां येते कीं नाही यावर याचें उत्तर अवलंबून आहे.

✦ ✦ ✦

प्रकरण : ७

# भारताचें अध्यात्मनिष्ठ परराष्ट्रकारण

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रीय प्रपंचांत भारताने जें तत्त्वज्ञान स्वीकारलें आहे त्यामुळे हा देश दिवसेंदिवस ऱ्हास पावत आहे, त्याचा शक्तिपात होत आहे, त्याची संघटना भंग पावत आहे आणि त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कोणत्याहि समस्या सोडविण्यांत त्याला यश येत नाही, या विचाराचा प्रपंच गेल्या दोन प्रकरणांत केला. राष्ट्रनिष्ठा व धर्मनिष्ठा या दोन महाशक्ति समाजाला थोर कार्याला प्रवृत्त करीत असतात. पण या दोन्ही बाबतींत आपल्या नेत्यांनी अत्यंत भ्रामक, अवास्तव व घातकी तत्त्वज्ञान स्वीकारलें आहे, आणि त्यामुळे राष्ट्रीय जीवनांतील चैतन्य नष्ट होऊन भारतीय समाजाला अवकळा प्राप्त झाली आहे. आश्चर्य असें की, दण्डसत्तांकित देशांनी त्यांचें मूल तत्त्वज्ञान या दोन्ही निष्ठांच्या विरोधी असूनहि समयज्ञता दाखवून आपलें धोरण बदललें आणि या महाशक्तींचा आश्रय करून आपापले समाज बलशाली व सामर्थ्यसंपन्न केले. पण यांत आश्चर्य तरी कसलें? समाजाच्या उद्धारासाठी तत्त्वज्ञान (जुन्या भाषेंत धर्म) असतें, तत्त्वज्ञानासाठी समाज नसतो, ' नियमन मनुजासाठी, मानव नसे नियमनासाठी,' हें त्यांनी जाणलें आहे.

**प्रभवार्थाय भूतानां धर्मस्य नियमः कृतः ।**
**यः स्यात् प्रभवसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ।।**

असें धर्मरहस्य भगवान् श्रीकृष्णांनी महाभारतांत सांगितलें आहे. पण हें महासत्य आकळण्याची ऐपतच भारतीय नेत्यांच्या ठायीं नाही. आपल्या परराष्ट्रकारणांत आपण सारखे अपयशी होत आहों याचें हेंच कारण आहे. पंचशील, अहिंसा, विश्वशांति, तटस्थता या तत्त्वांवर पंडित जवाहरलाल

नेहरू यांची यशापयशनिरपेक्ष अढळ श्रद्धा आहे. या तत्त्वांमुळेच हिंद व चीन भाई भाई झाले असें आरंभीं त्यांनी सांगितलें. पुढे चीनने भारतावर आक्रमण केलें, त्याने पंचशील पायाखाली तुडविलें, तरी पंचशील अपयशी झालें असें पंडितजींना वाटलें नाही. मनुष्य चुकला तरी तत्त्वें उत्तम तीं उत्तमच असें ते म्हणाले.

एका वृत्तपरिषदेंत त्यांनी जाहीर केलें की, चीनचें सोडून द्या. पण जगांत आमच्याच धोरणाचा विजय झाला आहे. आम्ही त्याचें यश गाणार नाही इतकें युरोपीय गातात. शिखर परिषद भरणार आहे, आयसेन होअर मास्कोला जाणार आहे, हा या तत्त्वाचाच विजय आहे. (टाइम्स ऑफ इंडिया, ६–११–१९५९) दुर्दैवाने आयसेन होअर मास्कोला गेला नाही. प्रथम निमंत्रण दिलें असून नंतर क्रुश्चेव्हने यूटू विमान-प्रकरणामुळे तें मागे घेऊन त्याचा अवमान केला. त्यामुळे अमेरिका व रशिया या राष्ट्रांत स्नेहाऐवजी कडवटपणाच वाढत गेला, आणि नंतर शिखर परिषदेचा क्रुश्चेव्हने बोजवारा उडविला. सर्व जगांतील राष्ट्रांच्या प्रतिनिधींची त्याने मानखंडना केली. यामुळे दोन गटांतील राष्ट्रांचें वैमनस्य वाढलेंच आहे. अलीकडे कांगो, कटांगा या प्रकरणांत तर जागतिक शांततेचे दूत हॅमरशूल्ड यांचाच बळी पडून आंतरराष्ट्रीय संबंध जास्तच बिघडले आहेत. पण ज्या आधारावर आपल्या तत्त्वांचा विजय पंडितजींनी उभविला होता तो आधार ढासळून पडला तरी पंडितजींच्या मनांतली श्रद्धा ढासळलेली नाही. तत्त्वें विजयीच आहेत ! त्यांना वस्तुस्थितीचा आधार लागत नाही. तीं परब्रह्माप्रमाणे निराधार, निरालंब असतात. गोव्याविषयी आपलें धोरण चुकलें असें परवा पंडितजी म्हणाले, पण इतके दिवस तें धोरण अवलंबिलें म्हणून आपल्याला पश्चात्ताप मुळीच होत नाही असें त्यांनी जाहीर केलें. याचेंहि कारण हेंच आहे. इतर राष्ट्रांचीं तत्त्वें राष्ट्रहितासाठी असतात, तर आपलीं तत्त्वें तत्त्वासाठीच असतात, म्हणूनच देशाची कांहीहि स्थिति झाली तरी तटस्थतेचें तत्त्व आम्ही सोडणार नाहीं असें पंडितजींनी जाहीर केलें आहे.

आपलें तत्त्वज्ञान हें असें आहे आणि त्यामुळेच भारताला फार भयंकर धोका निर्माण झाला आहे. कम्युनिस्ट दण्डसत्तांचें बळ दर क्षणाला वाढत आहे. तेथील नेत्यांचें परराष्ट्र धोरण रोख, व्यवहारी व वास्तव आहे.

राष्ट्रीय स्वार्थ हेंच त्यांचें उद्दिष्ट आहे. उलट जगत्कल्याण, मानवता, सत्य, अहिंसा हें आपलें धोरण आहे. या धोरणाने कोणताहि समाज बलसंपन्न होत नाही, उलट त्याचा शक्तिपात होतो आणि जगांत तो एकाकी राहतो. भारताची तीच स्थिति झाली आहे. पंचशील, तटस्थता, शत्रुप्रेम हेंच आपल्या परराष्ट्र राजकारणाचें स्वरूप यापुढे राहिलें तर दण्डसत्तांचें आव्हान आपल्याला कधींहि स्वीकारतां येणार नाही. म्हणून आपल्या परराष्ट्रकारणाचें सविस्तर विवेचन येथे करावयाचें आहे.

## लोकवादी राष्ट्रांचा संघ

भारत स्वतंत्र झाला त्या वेळीं जगांत अमेरिका व रशिया असे दोन पक्ष पडले होते. त्यांतील अमेरिका हा देश लोकवादी, धनधान्यसंपन्न व सामर्थ्यशाली असा असून उदयोन्मुख लोकसत्तांना वाटेल तें साह्य करण्यास त्याची सिद्धता होती. तशी त्याची जाहीर प्रतिज्ञा होती. त्याप्रमाणे ‘मार्शल-योजना’ आखून त्याने युरोपांतील देशांना अनंत हस्तांनी साह्य करण्यास प्रारंभ केला होता. अमेरिकेला बाजारपेठा नको होत्या. तिला भूमीचा अभिलाष नव्हता आणि युरोपीय देशांवर प्रत्यक्ष साम्राज्य स्थापण्याचा विचार तर अमेरिकनांच्या स्वप्नांतहि नव्हता. युरोप व आशिया खंडांतील देशांत महायुद्धामुळे फार मोठा विध्वंस झाला होता. जीवनाला अवश्य अशा धनाचा व उत्पादन-साधनांचा संपूर्ण नाश झाला होता. तशाच स्थितींत ते देश राहिले तर तेथे कम्युनिझमचा प्रसार होईल, सोव्हिएट रशियाच्या आक्रमणाला ते देश बळी पडतील व त्यामुळे लोकवादी राष्ट्रांना व म्हणून पर्यायाने अमेरिकेलाहि धोका निर्माण होईल अशी भीति अमेरिकन नेत्यांना वाटत होती. म्हणून वेळींच सावध होऊन लोकवादी राष्ट्रांचें पुनरुत्थान घडवून आणावें व त्यांचा एक बलाढ्य संघ निर्माण करून कम्युनिझमच्या आक्रमणाला यशस्वीपणें पायबंद घालण्याची व्यवस्था करावी असा हेतु धरून अमेरिकेने हा खटाटोप आरंभिला होता. यांत स्वार्थ निश्चित होता, पण तो राष्ट्रीय स्वार्थ होता, आणि तोहि नेहमीच्या अर्थाने नव्हे, तर जगाच्या लोकसत्तेच्या रक्षणांत अमेरिकेच्या लोकसत्तेचेंहि रक्षण होईल अशा विशाल अर्थाचा तो स्वार्थ होता. या स्वार्थाचें साधन

म्हणजे जगाची सेवाच होती, कारण अमेरिकेने हा स्वार्थ साधतांना – म्हणजे हें साहृय देतांना – त्या देशांवर कसल्याहि अटी, कसलींहि बंधनें घातलीं नव्हतीं, म्हणून त्यांत साम्राज्यशाहीचा वासहि येण्याचें कारण नव्हतें. उलट सोव्हिएट रशियाचें आक्रमक धोरण मात्र पदोपदीं प्रत्ययास येत होतें. पूर्व युरोप त्याने गिळंकृत करून टाकला होता, आणि तेथल्या लोकांना गुलाम करून तेथली सर्व औद्योगिक संपत्ति धुऊन नेण्याचा त्याने सपाटा चालविला होता. त्याने लोकायत्त म्हणून स्थापन केलेल्या पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट शासनांविरुद्ध सारखीं बंडें होत होतीं, हें युगोस्लाव्हिया, पूर्व जर्मनी, पोलंड, हंगेरी या देशांतील जनता दाखवून देतच होती. उलट मार्शल योजनेअन्वयें ज्या राष्ट्रांना अमेरिकेने साहृय केलें त्या देशांतील जनतेने अमेरिकेविरुद्ध बंड केल्याचें एकहि उदाहरण नाही.

अशा स्थितींत भारताने कोणता मार्ग स्वीकारावयाचा हें अगदी सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट होतें. अमेरिका, इंग्लंड, पश्चिम जर्मनी, फरान्स या लोकवादी राष्ट्रांचा एक मोठा मित्रसंघ करून कम्युनिझमला व त्याच्या दण्डसत्तांना शह देण्याचें जें धोरण त्या देशाच्या धुरीणांनी आखलें होतें त्याला भारताने पाठिंबा दिला असता व त्या संघांत तो स्वातंत्र्यप्राप्ति होतांच सामील झाला असता तर आपल्या भूमीवर आक्रमण करण्याची चीनची छाती झाली नसती.

## निष्पक्ष धोरण कां स्वीकारलें ?

पण दुर्दैवाने भारताच्या शास्त्यांनी तटस्थतेचें धोरण स्वीकारलें. इंग्रजींत 'न्यूट्रॅलिझम्' असें याला कोणी म्हणतात, पण पंडितजींना हा शब्द मुळीच आवडत नाही. जगाच्या व्यवहारापासून अलिप्त राहणें, त्याशीं संबंध न ठेवणें असा त्याचा अर्थ होतो आणि तसें आपलें धोरण मुळीच नाही. कोरिया, इंडोचायना, व्हिएटनाम या प्रकरणांत भारताने मध्यस्थी केली, साहृय केलें, तडजोड सुचविली आणि पुष्कळ वेळा भारताला त्या बाबतींत यशहि आलें. तेव्हा आमचें धोरण तटस्थतेचें नाही असें पंडितजी म्हणतात. हें धोरण 'नॉन-अलाइनमेंट'चें आहे असें ते त्याचें वर्णन करतात. मराठींत तटस्थतेचा तोच अर्थ आहे. पण वरील भेद स्पष्ट व्हावा म्हणून भारताचें

धोरण पक्षातीत किंवा निष्पक्ष आहे असें आपण म्हणूं. कारण, आपलें धोरण 'न्यूट्रॅलिझम्'चें किंवा अलिप्ततेचें आहे असें मलाहि म्हणावयाचें नाही. आपल्या शास्त्यांनी हें निष्पक्ष धोरण कां स्वीकारलें? त्यांनी दिलेलें त्याचें कारण असें की, एकदा असा कोणताहि पक्ष स्वीकारला की आपल्यावर बंधनें येतात. त्या पक्षाचीं जीं जीं धोरणें किंवा जगाच्या राजकारणांतील त्याने केलेलीं जीं जीं कृत्यें तीं आपल्याला पसंत नसलीं, तीं असत्य, अन्याय्य, अनैतिक असलीं तरी त्यांचें समर्थन करावें लागतें; आणि असली लाचारी पत्करून मिळावयाचें काय? तर त्यांनी दया म्हणून आपल्याकडे फेकलेले चार शिळ्या भाकरीचे तुकडे! हिंदुस्थानांतील भांडवलदार-कारखानदार यांनी आपलें मुखपत्र जें 'ईस्टर्न इकॉनॉमिस्ट' त्याच्या ३१ डिसेंबर १९४८ रोजीं निघालेल्या वार्षिकांत, भारत-सरकारचें धोरण अतिरिक्त ध्येयवादी असून तें वास्तववादी होणें अवश्य आहे आणि त्या दृष्टीने पाहतां आपण पाश्चात्त्य सत्तांशीं हार्दिक स्नेहसंबंध जोडणें हितावह होईल, असा अभिप्राय व्यक्त केला होता. त्याला उत्तर म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या धोरणाचें वरील प्रकारें स्पष्टीकरण व समर्थन केलें होतें.

## उच्च तत्त्वांना मुरड घालावी लागते

वास्तविक हा वस्तुस्थितीचा अत्यंत विपर्यास आहे. पाश्चात्त्य देश भारताकडे केवळ तुकडे फेकतात किंवा फेकतील असें जर आपल्या राज्यकर्त्यांना खरोखरच वाटत असतें तर आपले अर्थमंत्री हे सारखे त्यांच्या दाराशीं कशाला जाते? अगदी रसातळाला गेलेलीं फ्रान्स, जर्मनी हीं राष्ट्रें आपली सर्वांगीण उन्नति करूं शकतील इतकें अमाप धन अमेरिकेने त्यांना दिलें. एकट्या पश्चिम जर्मनीला अमेरिकेने १८०० कोटी रुपये दिले, आणि वर सांगितल्याप्रमाणे जर्मनीच्या सार्वभौमत्वाला अणुमात्र बाध न आणतां हें धन दिलेलें आहे. अर्थात्, या देशांनी लोकवादी पक्षांत सामील व्हावें, कम्युनिस्टविरोधी आघाडी उघडण्यासाठी जे पश्चिम युरोपाच्या देशांचे संघ होतील त्यांचे सभासद व्हावे, अशी अपेक्षा अमेरिकेची निश्चित होती, पण आत्मरक्षणासाठी अशा तऱ्हेचे दोस्तांचे मित्र-संघ तयार करणें, त्यांच्यांत तुल्यारिमित्रत्वाचे तह घडवून आणणें, हें तर सनातन राजकारण आहे. याच

देशाला जगांत आपलें सार्वभौमत्व टिकवावयाचें आहे, स्वातंत्र्य टिकवावयाचें आहे त्याला अशा संघांत सामील व्हावेंच लागतें आणि मग त्यासाठी अवश्य तीं पथ्येंहि पाळावीं लागतात. दोस्त राष्ट्रांच्या प्रत्येक कृत्याचें जरी समर्थन केलें नाही — तसें करावें अशीहि अपेक्षा असते — तरी निदान जें अप्रिय त्याविषयी मौन पाळणें एवढें पथ्य तरी अवश्यच असतें. सत्य, न्याय यांच्या समर्थनाचा कितीहि उमाळा आला तरी त्याचा संयम करणें हें राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी अपरिहार्य असतें. अमेरिकेसारख्या बलाढ्य देशालाहि इतकी आत्यंतिक सत्यप्रियता, इतकी न्यायप्रियता परवडत नाही. दुसऱ्या महायुद्धांत हिंदुस्थानाचें दोस्तांना हार्दिक साह्य मिळावें अशी प्रेसिडेंट रूझवेल्ट यांची इच्छा होती. पण स्वातंत्र्याचें निश्चित आश्वासन दिल्यावांचून असें साहय आम्ही देणार नाही, असें कॉंग्रेसने जाहीर केलें होतें; म्हणून रूझवेल्ट यांनी ब्रिटनचे पंतप्रधान चर्चिल यांना हिंदुस्थानला तसें आश्वासन द्यावें असें आग्रहाने सांगितलें होतें; पण चर्चिल यांनी स्पष्ट नकार दिला तेव्हा त्यांनी आपली न्यायप्रियता, दलितांविषयीची सहानुभूति, उदात्त ध्येयवाद, विश्व-कल्याणाची चिंता हें सर्व बाजूस ठेविलें. चीनचे त्या वेळचे शास्ते चिआंग-कै-शेक यांनी रूझल्वेट यांना पत्र लिहून, आपण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्या-कांक्षांना अनुकूल आहों, असें जाहीरपणें निदान सांगा तरी, अशी सूचना केली होती; पण या नसत्या भानगडींत पडून आपल्या एका दोस्त राष्ट्राचें मन दुखविण्यास रूझवेल्ट यांनी साफ नकार दिला. तसें त्यांनी केलें नसतें तर दोस्तांचे युद्धप्रयत्न हार्दिक सहकार्याने झाले नसते व अमेरिकेच्या राष्ट्रीय स्वार्थाला बाध आला असता. हें पाहून रूझवेल्ट यांनी आपली न्यायप्रियता दूर ठेविली. वास्तववादी राजकारण तें हें! आणि हिंदुस्थानांत याचाच नेमका अभाव आहे. कारण आपण ध्येयवादी आहों, सत्यवादी आहों. न्यायाचा कैपक्ष घेऊन उठणारे आहों. आपल्या श्रेष्ठ तत्त्वांना कोणत्याहि कारणासाठी मुरड घालण्यास आपण तयार नाही.

## पक्षीय स्वार्थासाठी वेगळाच न्याय !

पण 'कोणत्याहि कारणासाठी नाही' हें खरें नाही. जें राष्ट्रीय स्वार्थासाठी करावयास आपण तयार नाही तें पक्षीय स्वार्थासाठी पावलोपावलीं आपण

करीत आहों. सत्तालोभाने प्रेरित होऊन पक्षीय स्वार्थासाठी श्रेष्ठ तत्त्वांना वाटेल तो हरताळ फासण्यास आपले शास्ते नित्य सिद्ध असतात. ते मुस्लिम लीगशीं सहकार्य करतात, गणतंत्र परिषदेशीं हातमिळवणी करतात, भांडवलवाल्यांच्या पुढे नमतात! तत्त्वांच्या बाबतींत तडजोड, मुरड सर्व सर्व त्यांना मंजूर आहे. इतकेंच नव्हे तर तत्त्वभ्रष्टेतेचें उदात्त समर्थनहि करण्यास काँग्रेसच्या नेत्यांची तयारी असते. केरळ-प्रकरणापासून मुस्लिम लीग ही जातीय नाही असें ठरत आहे. त्यामुळे हैदराबाद, मुंबई येथे पुन्हा या संघटनेचें उत्थापन सुरू झालें आहे. याचे परिणाम अत्यंत घातक होतील हें कोणालाहि स्पष्ट दिसून येईल, पण काँग्रेसला तें दिसणार नाही. गणतंत्र परिषद् पूर्वी प्रतिगामी होती, पण सत्ता टिकविण्यासाठी तिच्या सहकार्याची आवश्यकता आहे असें दिसतांच काँग्रेसच्या दृष्टीने तिचें प्रतिगामित्व नष्ट झालें, आणि आता तिच्याविरुद्ध व मुस्लिम लीगविरुद्ध बोलावयाचें नाही हें पथ्य पाळण्यास काँग्रेसची सिद्धता आहे! मुंबई-गुजराथचें द्वैभाषिक मागे भारताच्या हिताचें होतें, आता तें अहिताचें ठरलें आहे. असे हे राजकारणाचे, तत्त्वच्युतीचे खेळ येथे रोज चालत असतांना राष्ट्रीय स्वार्थासाठी कोणी तशा तऱ्हेचा सल्ला दिला तर मात्र थोर तत्त्वांची भाषा बोलून आपले नेते त्यांचा उपहास करतात. म्हणजे परराष्ट्रीय राजकारणांत नसली तरी अंतर्गत पक्षीय राजकारणांत आपली दृष्टि पूर्ण वास्तववादी आहे!

## आपली निष्पक्षता सर्वांना अमान्य

पण आपलें परराष्ट्रकारण स्वतंत्र, पक्षातीत, निष्पक्ष असें ठेवून आपल्याला प्रत्यक्ष फलप्राप्ति काय होते? तर जगांत ज्या देशांवर अन्याय होईल, ज्यांच्यावर साम्राज्यवाद्यांचें आक्रमण होईल, अत्याचार होतील, त्या देशांच्या बाजूने आपल्याला सहानुभूतीच्या फक्त घोषणा करतां येतात! या पलीकडे कांहीहि करण्याचें सामर्थ्य आपल्याजवळ नाही. लष्करी सामर्थ्य नाही, धनसामर्थ्य नाही, वाक्सामर्थ्य फक्त आहे! पण त्याचा दलितराष्ट्रांना कसलाहि उपयोग होत नाही. १९५० सालीं चीनने तिबेटवर सैन्य पाठवून त्याचें स्वातंत्र्य नष्ट केलें. त्या वेळीं भारताने चीनचा जोराने निषेध केला. पण, 'तुमचा यांत कसलाहि संबंध नाही. हा अंतर्गत

प्रश्न आहे, तुमच्या देशापुरतें तुम्ही पाहा,' असा अवमानकारक जबाब चीनने दिला. या वर्षी चीनने तिबेट संपूर्ण खालसा केला तेव्हाहि तेंच घडलें. हंगेरीमधील स्वातंत्र्याचा उठाव रशियाने क्रूरपणें चिरडून टाकला त्या वेळीं हेंच घडलें. इंडोचायनामध्ये लढा सुरू झाला त्या वेळीं युद्ध थांबविण्याची मागणी प्रथम पंडितजींनी केली. अर्थातच तिचा कांही एक उपयोग झाला नाही. फ्रेंच सेना पराभूत होण्याची वेळ आली त्या वेळींच फ्रान्सने माघार घेतली. या वेळीं इंडोचायनामध्ये प्रथम ठिणगी कम्युनिस्टांनी टाकली, असें अमेरिकेचे त्या वेळचे भारतांतले वकील जॉर्ज ॲलन यांनी पंडितजींच्या निदर्शनास आणलें तेव्हा त्यांनी कम्युनिस्टांवर कडक टीका केली, आणि नंतर अमेरिकेचा युद्ध पसरविण्याचा हेतु होता असें दिसतांच त्यांनी अमेरिकेवरहि तशीच प्रखर टीका केली. भारताचें परराष्ट्रीय धोरण स्वतंत्र आहे, निष्पक्ष आहे, हें दाखविण्यासाठी हें उदाहरण नेहमी दिलें जातें. त्यावरून तसें सिद्ध होतें यांत शंकाच नाही, पण त्यामुळे आत्मसंतोषाखेरीज कसलीच प्राप्ति होत नाही. ज्या दलितांच्या, पीडितांच्या बाजूने आपण उभे राहतों त्यांना नुसत्या सहानुभूतीचा कांही उपयोग नसतो; आणि आपण पक्षातीत आहोंत हें मान्य करायला जग एक क्षणभरहि तयार नाही! आपण कम्युनिस्ट पक्षांत आहों, रशिया-चीनचे साथी आहों, असा आपल्यावर ॲंग्लो-अमेरिकनांचा आरोप आहे; आणि ॲंग्लो-अमेरिकन पक्षांत आहों, साम्राज्यवादी आहों, हें तर रशिया व चीन रोज दहा वेळा बोलून दाखवितात.

## 'स्वतंत्र' धोरणाचे दुष्परिणाम

पण एवढ्यावरच हें भागत नाही. आपल्याला हें आत्मिक समाधान, हा आत्मसंतोष फारच महाग पडतो आहे. कारण जगांतल्या दीनदलितांविषयीची सहानुभूति घोषित करण्यामुळे भारतांतल्या दीनदलितांचा प्रश्न सोडविण्याचें सामर्थ्य आपल्याला प्राप्त होत नाही. मित्रराष्ट्रसंघांत आपण सामील झालों असतों तर भांडवली व लष्करी साह्य आपणांस सध्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त मिळालें असतें आणि आज आपल्याला जी त्या दोन्ही दृष्टींनी दीन दशा आली आहे ती आली नसती. श्रीमती विजयालक्ष्मी

पंडित यांनी १९४९ सालींच भारताला अमेरिकेच्या साहाय्याची किती गरज आहे तें एका भाषणांत स्पष्ट केलें होतें. लोकांना अन्नधान्य, वस्त्र आम्हीं दिलें नाही, स्वातंत्र्याचा लढा भारतीयांनी केला त्या वेळीं त्यांच्या ज्या अपेक्षा होत्या त्या पुऱ्या झाल्या नाहीत तर भारतांत कम्युनिझम पसरण्याचा धोका फार मोठा आहे; कारण कम्युनिझम हा गरीब, अप्रगत देशांत लवकर मूळ धरतो; त्या दृष्टीने पाहतां अध्यक्ष ट्रूमन यांचा चतुर्विध कार्यक्रम आशियांतील व हिंदुस्थानांतील कम्युनिझमला पायबंद घालण्यास फार उपयोगी पडेल, असें त्या वेळींच त्यांनी आपलें मत व्यक्त केलें होतें; पण यावी तशी अमेरिकेची मदत भारताकडे आली नाही. इतर राष्ट्रांना अमेरिकेने मदत दिली त्या मानाने हिंदुस्थानला कांहीच मिळाली नाही. (इंडिया अँड वर्ल्ड अफेअर्स – के. पी. करुणाकरन्, पृष्ठ ४६–४७) आणि याचें कारण म्हणजे आपलें स्वतंत्र परराष्ट्र-धोरण ! पंडितजी अमेरिकेंत गेले होते त्या वेळीं त्यांनी अमेरिकनांना स्वच्छ सांगितलें की, आम्हांला गहू हवा आहे, तांत्रिक साह्य हवें आहे, भांडवल हवें आहे; पण यासाठी आम्ही आमचें स्वतंत्र धोरण सोडण्यास तयार नाही.

पण राजकारण ही देवाणघेवाण आहे. आपलें स्वातंत्र्य व सार्वभौमत्व टिकवावयाचें तर प्रत्येक राष्ट्राला मित्रसंघ करावेच लागतात, आणि मित्र-संघ म्हटले की, कांही पथ्यें पाळावींच लागतात. संपूर्ण निष्पक्ष व स्वतंत्र परराष्ट्रनीति जगांत कोणत्याहि राष्ट्राला टिकवितां आलेली नाही. यापुढे येणार नाही. इंग्रजांचा राष्ट्रीय स्वाभिमान हा आपल्यापेक्षा कमी नाही, पण दुसऱ्या महायुद्धांत प्रसंग बाका आहे हें ओळखून ब्रिटिशांनी वास्तववादी भूमिका स्वीकारली. हिटलरची एक हजार विमानें रोज ब्रिटनवर अग्नि-वर्षाव करीत होतीं, आणि लवकरच ब्रिटिश भूमीवर जर्मन सेना उतरणार असा संभव निर्माण झाला होता. त्या वेळीं ब्रिटिशांनी अमेरिकेचा धावा केला, आणि सर्व प्रकारें रूझवेल्ट यांची मर्जी संभाळण्याची कसोशी केली. पुढे रशियावर जर्मनी उलटला त्या वेळीं सर्व मानापमान सोडून चर्चिलने मास्कोला खेटे घातले, रशियाने ज्यांच्यावर जुलूम केला होता, आक्रमण केलें होतें त्या दलितांचा कैवार घेऊन त्या काळांत रशियाविरुद्ध भाषण त्याने केलें नाही. आपल्या स्वतंत्र निष्पक्ष परराष्ट्रीय राजकारणाचा बडिवार

त्याने माजविला नाही. सर्व पथ्यें त्याने पाळलीं आणि इंग्लंडचा राष्ट्रीय स्वार्थ साधला. भारतांत जें पक्षीय वा वैयक्तिक स्वार्थासाठी करतात तें त्याने राष्ट्रीय स्वार्थासाठी केलें. अमेरिकेच्या आजच्या भारतविषयक धोरणाचा आपण विचार केला तर आपल्याला हेंच दिसेल की, तेथील नेते वास्तववादी आहेत; आणि आपण भारतीय लोक अद्भुतरम्य सृष्टींत, व्यवहारशून्य ध्येयवादांत रमलेले आहों.

## वास्तववाद व अद्भुतरम्य ध्येयवाद

अमेरिकेवर आज प्रसंग असा कांहीच नाही; पण जगांत कम्युनिझम पसरेल आणि त्यामुळे पुढे-मागे सोव्हिएट रशियाचा पक्ष प्रबळ होईल व मग आपल्या राष्ट्राला धोका निर्माण होईल अशी एक भीति अमेरिकनांच्या मनांत आहे. त्यामुळेच त्यांनी वर सांगितल्याप्रमाणे फ्रान्स, जर्मनी इत्यादि युद्धांत उद्ध्वस्त झालेल्या देशांना आणि ब्रह्मदेश, हिंदुस्थान, इंडोनेशिया, इराण इत्यादि अप्रगत देशांना, त्यांची औद्योगिक प्रगति व्हावी व तेथे समृद्धिहि निर्माण व्हावी म्हणून अनंत हस्तांनी १९४६–४७ सालापासूनच साह्य करण्यास प्रारंभ केला. एका मार्शल योजनेंतच त्या वेळीं अमेरिका दरसाल २५०० कोटी रुपये खर्च करीत असे. हिंदुस्थानसारख्या देशांना दिलेली मदत ती निराळीच. हिंदुस्थानला मदत द्यावी कीं नाही याविषयी अमेरिकेंत दोन पक्ष आहेत. हिंदुस्थान आपलें स्वतंत्र परराष्ट्र-धोरण सोडून अमेरिकन पक्षांत येत नाही म्हणून त्याला साह्य करूं नये असा एक पक्ष आहे. यांतील लोकांचें मत असें की, कम्युनिझमच्या प्रसाराला बंदी घालण्यासाठी आपण हें द्रव्यसाह्य देत आहों, आणि हिंदुस्थान स्वतंत्र व निष्पक्ष धोरणाच्या नांवाखाली रशियन पक्षांत सामील झालेला आहे. कृष्ण मेनन यांची वृत्ति, नवचीनला यूनोंत प्रवेश देण्यासंबंधीचा भारताचा आग्रह, पाश्चात्त्यांच्या अपकृत्यांचा एकदम निषेध करावयाचा आणि सोव्हिएट पक्षाच्या आक्रमक क्रूर कृत्यांचा निषेध मात्र विलंबाने, नाखुषीने करावयाचा, हें भारताच्या नेत्यांचें धोरण, हे भारत सोव्हिएट पक्षांत गेल्याचे, त्यांच्या मतें, पुरावेच आहेत. म्हणून भारताला साह्य करण्याचें धोरण त्यांना मान्य नाही. पण अमेरिकेंत दुसरा एक पक्ष आहे. त्याला हें सर्व जाणवत आहे, पण भारत अगदी कम्युनिस्ट झाला आहे असें त्याला वाटत नाही;

म्हणून त्याला साह्य करून, शक्य त्या प्रयत्नाने त्याला लोकवादी पक्षांत स्थिर केला पाहिजे असें त्यांचें मत आहे; आणि हें कशासाठी ? तर अमेरिकन राष्ट्राच्या स्वार्थासाठी ! कांही अमेरिकन सिनेटरांनी हें स्वच्छ शब्दांत सांगितलें आहे. हिंदुस्थानसारखा एक प्रचंड देश जर कम्युनिस्ट झाला तर जगांतल्या लोकशाहीला व मग पर्यायाने अमेरिकेला धोका आहे, म्हणून त्याला साह्य करावयाचें तें अमेरिकेच्या गरजेसाठी अशी त्या दुसऱ्या पक्षाची भूमिका आहे. त्यांना पंडित जवाहरलाल नेहरूंचीं कांही भाषणें व कांही कृति बोचतात, नाही असें नाही; तरी पण आपल्याला गरज म्हणून हें साह्य करावें असें त्यांचें मत आहे. (इंडिया अँड अमेरिका : पोपलाई व टॅलबॉट–प्रकरण सहावें.) परराष्ट्रीय धोरण ठरवितांना लोक कोणता विचार करतात हें यावरून दिसून येईल. भारतासारख्या नुकत्याच स्वतंत्र झालेल्या, अप्रगत देशाने ठेवलेलें ताठर धोरण सहन करण्याचें अमेरिकेला वास्तविक कांहीच कारण नाही. तरी या देशाला साह्य करण्यांत आपलाच राष्ट्रीय स्वार्थ आहे हें ध्यानीं घेऊन कृष्ण मेननचीं भाषणें, नेहरूंचा त्यांना भासत असलेला पक्षपात, चीनविषयीचा आग्रह, अमेरिकेवर होणारी टीका, तिच्या सद्‌हेतूविषयी घेतलेली शंका हें सर्व विसरण्याची तयारी तेथील मुत्सद्द्यांनी दाखविली आहे, आणि आपण मात्र भारत सर्वस्वी गरजू असतांना, आपला सर्व राष्ट्रीय उत्कर्ष या लोकवादी राष्ट्रांच्या साह्यावर अवलंबून आहे असें दिसत असतांना, सोव्हिएट रशिया व चीन यांचें अंतरंग स्पष्ट दिसून आल्यावरहि, आपल्या सार्वभौमत्वावर प्रत्यक्ष आक्रमण झालेलें असतांनाहि, आपल्या परराष्ट्रीय धोरणाची पक्षातीतता म्हणजे जगांतल्या इतर देशांच्या न्याय-अन्यायाविषयी, सत्यासत्याविषयी मधून मधून उदार भाषणें करण्याचें–फक्त भाषणें करण्याचें–आपलें स्वातंत्र्य गमाविण्यास तयार नाही. भारतीय जनता दरिद्री राहिली तरी, अवमानित झाली तरी चालेल, पण आम्ही जगांतल्या दलित जनतेचें आश्रयस्थान आहों, शरण्य आहों, पाठीराखे आहों ही उदात्त भूमिका सोडण्यास भारताचे नेते तयार नाहीत. वास्तववाद व अद्‌भुतरम्य ध्येयवाद यांतील फरक यावरून कळून येईल.

उदात्त ध्येयवादाच्या अद्‌भुतरम्य, अवास्तव वातावरणांत गेलीं १२ वर्षें

विहार करीत राहिल्यामुळे आज आपली स्थिति काय झाली आहे पाहा. पाकिस्तानाने आपल्या देशावर आक्रमण केलें आहे, आपलीं गांवें बळकाविलीं आहेत, स्त्रिया पळविल्या आहेत व नित्य गोळीबार चालविला आहे. चीननेहि आक्रमण केलें आहे. आपल्या हद्दींत रस्ते बांधले आहेत ! तरी हें आक्रमण नाही, किरकोळ गोष्ट आहे असें भारतीयांना सांगण्याची आपल्या नेत्यांवर पाळी आली आहे. मागे काश्मीरवर आक्रमण झालें तर भारतावर झालें असें समजू असें पंडितजींनी पाकिस्तानला बजावलें होतें. आता भारतावर प्रत्यक्ष आक्रमण झालें तरी तें मोठें आक्रमण नाही, तुम्ही शांत राहा, असें स्वतःच्या जनतेला ते बजावीत आहेत. अतिरिक्त ध्येयवादाने शेवटीं हीच शोचनीय अवस्था प्राप्त होते असा इतिहासाचा निर्वाळा आहे. पूर्ण ब्रह्मचर्य पाळण्याच्या प्रतिज्ञा करून मठांत राहणाऱ्या बौद्ध भिक्षु-भिक्षुणींची आणि ख्रिस्ती बिशप व नन यांची काय स्थिति झाली हें जगजाहीर आहे. रणामध्ये कुटिल नीति वापरावयाची नाही, समोरासमोर लढावयाचें, गुत्सद्देगिरीनेहि माघार घ्यावयाची नाही, प्रसंग आला तर धारातीर्थीं सर्वांनी देह ठेवावयाचे व स्त्रियांनी जोहार करावयाचा हा रजपुतांचा उदात्त ध्येयवाद होता, पण यामुळे राजस्थानांतील प्रत्येक घराण्याला शेवटीं मोगलांपुढे नमावें लागलें आणि मुलगी बादशहांना देणें भाग पडलें. आश्चर्य असें की, हे रजपूत आपसांत वागतांना, रजपूत संघटना करण्यासाठी कधीहि ध्येयवादाने वागले नाहीत. त्यांचा ध्येयवाद फक्त परक्याशीं वागतांना ! तीच आपली आज स्थिति झाली आहे. आक्रमकांशीं वागतांना पंचशील, साधनशुद्धि, जगाने गौरव करावा अशी शांति – म्हणजे परराष्ट्रनीतींत पूर्ण अहिंसा आणि स्वदेशांतील जनतेवर रोज तीन वेळां गोळीबार ! संयुक्त महाराष्ट्रवाद्यांवर गोळीबार, महागुजराथवाद्यांवर गोळीबार, विद्यार्थ्यांवर गोळीबार, कामगारांच्यावर गोळीबार, घरांत घुसून गोळीबार ! ठार मारण्याच्या हेतूनेच गोळीबार ! पण ही स्थिति अपरिहार्य आहे. परिस्थितीचा, निसर्गाचा हा अत्यंत कठोर नियम आहे. राष्ट्राचें राजकारण हा अगदी जड, व्यावहारिक, स्थार्थनिष्ठ खेळ आहे. तेथे कोणी उदात्त ध्येयवादाचा आश्रय केला तर तो ध्येयवाद तर अपयशी होतोच, पण सामान्य व्यावहारिक यशहि त्याच्या हातून निसटून जातें. वाचकांनी

जाणावें की, हें राष्ट्रीय प्रपंचांतील ध्येयवादाविषयीं लिहिलें आहे. वैयक्तिक ध्येयवादाविषयी नाही. त्या जीवनांत व्यक्ति जेवढा उदात्त ध्येयवाद आचरील तेवढा हवाच आहे. सत्य, अहिंसा, न्याय यांसाठी जेवढा त्याग व्यक्ति करील तेवढा कमीच आहे. तेथेहि व्यक्तीने व्यवहार पाहावा; पण तो न पाहतां बेशक आत्मबलिदान केलें तरी तें समाजाला हितावहच होतें. जगाचा इतिहास दधीचि, गौतम बुद्ध, सॉक्रेटिस, जीझस यांच्या बेहिशेबी, त्यागानेच उजळलेला आहे. कोलंबस, लिंडबर्ग यांच्या अव्यवहार्य साहसानेच संपन्न झाला आहे. पण अखिल राष्ट्राच्या राजकारणांत उदात्तता, पूर्ण सत्य पूर्णनीति आणण्याचा प्रयत्न केला तर त्या राष्ट्रांचा नाश झाल्या-खेरीज राहणार नाही. महात्माजींनी प्रारंभींच्या काळीं तशी वृत्ति ठेविली होती. लो. टिळकांविषयी लिहितांना ते म्हणाले होते की, ‘त्यांची व माझी निष्ठा निराळ्या प्रकारची आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी सत्य, नीति यांचा मी त्याग करीन असें टिळक म्हणत; मला मात्र तें मान्य नाही. सत्य-अहिंसेवरील निष्ठा मी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीहि चळूं देणार नाहीं.’ पण महात्माजी पुढे वास्तववादी झाले. साधनशुद्धीचा विचार त्यांनी अनेक वेळां झुगारून दिला. देशहितासाठी भांडवलदारांचा (अर्थातच शोषणाने मिळविलेला) पैसा त्यांनी घेतला. निवडणुकी लढवितांना सत्याला वाटेल ती मुरड घालण्यास त्यांनी मान्यता दिली. १९२२ च्या बार्डोलीच्या लढ्याच्या वेळीं चौरीचुऱ्याला दंगा झाला म्हणून हिंसेच्या भयाने त्यांनी माघार घेतली होती; पण १९४२ सालीं आता तो विचार मी करणार नाहीं, स्वातंत्र्य हेंच माझें ध्येय, असें जाहीर करून ते टिळकपंथी झाले; आणि सर्वांत विशेष म्हणजे स्वातंत्र्याचा लढा म्हणजे सत्याग्रह नाही, तो निःशस्त्रप्रतिकार आहे, कारण त्यांत इंग्रजांवर प्रेम कोणाचेंच नव्हतें, त्यांचें हृदयपरिवर्तन होण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता, हें दिसत असूनहि त्यांनी सत्याग्रहच झाला पाहिजे, प्रेमानेच इंग्रजांना जिंकलें पाहिजे असा आग्रह धरला नाही. असा वास्तवाचा अवलंब त्यांनी केला म्हणूनच भारताला स्वातंत्र्य मिळालें, आणि तसा यापुढे आपण केला तरच तें स्वातंत्र्य टिकेल. इतिहासाची अशीच साक्ष आहे. व्यक्तीने अव्यवहारी, अवास्तव दृष्टि ठेवून उदात्त तत्त्वासाठी वाटेल तो त्याग करावा; पण

राष्ट्राच्या राजकारणांत असा खेळ करण्याचा कोणालाहि अधिकार नाही. उदात्त ध्येयासाठी व्यक्तीला हालअपेष्टा, यातना, सोसाव्या लागल्या तर तिचें जीवन त्यांनी उजळून निघतें. राष्ट्राच्या जीवनाचें तसें नाही. राष्ट्राला व्यवहारी राजकारणासाठी लढणें हें स्वाभिमानाचें वाटतें. त्यांतली उदात्तता त्याला कळते, म्हणून त्या त्यागाने त्याचें जीवन सार्थकीं लागतें; पण परराष्ट्राचें आक्रमण होत असतांनाहि बुद्धाप्रमाणे, किंवा जीझस्प्रमाणे, किंवा एकनाथाप्रमाणे सत्याने असत्य जिंकणें, अहिंसेने हिंसा जिंकणें ही कल्पना अखिल समाजाला पेलत नाही, समजत नाही; आणि मग यातना, कष्ट, मरण एवढेंच शिल्लक राहतें. असल्या आपत्तींनी व्यक्तीचें मन जास्तच समर्थ बनतें. आपण या यातना समाजासाठी, ध्येयासाठी सोशीत आहों या जाणिवेने त्याची पातळी उंचावते, पण समाजाला हें समाधान कधीच नसतें. पाकिस्तानने गोळीबार केला, स्त्रिया पळविल्या, तरीहि शांत राहणें यांतली उदात्तता त्याला समजू शकत नाही, आणि मग अशा स्थितींत या घटनेंतला अवमान, मानहानि, लाचारी, हीनता, असहायता, निराशा एवढेंच त्याच्या वांटचाला येतें, आणि यामुळे मनाचा कमालीचा अध:पात होतो. जो ध्येयवाद, जी सत्यनिष्ठा संतांच्या वैयक्तिक जीवनांत मन विशाल व समर्थ करण्यास कारणीभूत होते तो आत्यंतिक ध्येयवाद व ती सत्यनिष्ठा समाजाच्या मन:शक्तींच्या ऱ्हासाला कारण होत असते. म्हणून राष्ट्राला ध्येयवाद शिकवावयाचा तो व्यवहारसिद्ध, राष्ट्राच्या स्वार्थाशीं स्पष्टपणें निगडित असलेला, बहुजनांच्या भावनांना आवाहन करणारा व बुद्धीला पेलणारा असला पाहिजे.

## जमिनीवरून चालण्यास तयारी नाही

जगाची शांति, मानवहित, साध्याइतकेंच साधनाला महत्त्व देणारें तत्त्वज्ञान हें राष्ट्रीय प्रपंचांत जर लादलें गेलें तर समाजाचा नाश झाल्याखेरीज राहणार नाही. सत्य हें अतिरेकाला नेलें की, या जगाच्या व्यवहारांत निश्चित पराभूत होतें. जमिनीवरून चालण्याचें नाकारून समाजाने, अखिल राष्ट्राने (आणि तेंहि राजकारणाच्या क्षेत्रांत) आकाशांतून विहार करण्याचें ठरविलें की, जमिनीच्या खाली त्याला जावें लागतें. सत्याचा अतिरिक्त

आग्रह शेवटीं सत्याच्याच विटंबनेला कारण होतो; पण भारतांत नेहमी हेंच घडत असतें. येथे जमिनीवरून चालायला कोणी तयारच नाही. 'आपल्या परराष्ट्रकारणाचा गांधीप्रणीत सत्यअहिंसा हाच पाया आहे.' असें पंडितजींनी अनेक वेळां सांगितलें आहे, आणि आपलें पक्षातीत स्वतंत्र धोरण सोडून कोठल्यातरी मित्रसंघांत सामील होण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही याचें कारण हेंच आहे. अमेरिकेंतील कोलंबिया विद्यापीठांत पंडितजींनी जें भाषण केलें त्यांत हा विचार त्यांनी स्पष्टपणें मांडलेला आहे. ते म्हणाले, "साध्य व साधन हीं अविभाज्य आहेत. त्यांत भेद करतांच येत नाही. महात्माजींनी आम्हांला हेंच शिकविलें आहे. साध्यापेक्षा साधनांना कधीहि गौण लेखूं नका, असें ते आम्हांला नेहमी बजावीत असत. पंचवीस तीस वर्षें एका अत्यंत प्रबळ राष्ट्राशीं लढा करून आम्ही विजयी झालों. त्या लढ्याचें मुख्य वैशिष्टय साधनशुद्धि हेंच होतें. अर्थात्, याचें श्रेय दोन्ही पक्षांना आहे; पण स्वातंत्र्यलढ्यांत आम्हांला जें यश मिळालें त्यावरून लष्करी सामर्थ्य हेंच दर वेळीं निर्णायक ठरतें असें नाही आणि ज्या साधनांनी आपण लढा जिंकतों त्यांनाच सर्वस्वीं महत्त्व आहे, हें उघड दिसतें." कोठल्या तरी देशाच्या मित्रसंघांत सामील होण्याचा प्रधान हेतु आत्मरक्षण हाच असतो, पण भारताला अशा मित्रसंघाच्या लष्करी सामर्थ्याची गरजच नाही. कारण आपण साधनशुद्धीच्या व सत्याग्रहाच्या मार्गाने राष्ट्ररक्षण करणार आहों! आपलें परराष्ट्रीय धोरण आपण स्वतंत्र ठेवलें आहे त्याच्या मागची भूमिका ही आहे. राष्ट्ररक्षणासाठी आपल्याला कोणाच्यांहि साह्याची गरज नाही.

ही भूमिका किती अवास्तव आहे हें थोडया विचाराअंतीं कोणाच्याहि ध्यानांत येईल. भारताने इंग्रजांशीं लढून स्वातंत्र्य मिळविलें तें सत्याग्रहाने, अहिंसामार्गाने मिळविलें, हा भ्रम आपण जितक्या लवकर सोडून देऊं तितकी आपली उन्नति लवकर होईल. या मार्गाने लोकजागृति झाली यांत शंकाच नाही; पण अंतीं सुभाषचंद्रजींच्या लष्करी उठावामुळे ती जागृति सैन्यापर्यंत जाऊन पोचली, आणि आता लष्करी सामर्थ्याने हिंदुस्थान ताब्यांत ठेवतां येणार नाही, हें इंग्रजांच्या ध्यानांत आलें, म्हणून त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिलें, असा इतिहास आहे. शेवटीं नाविकदलांत प्रत्यक्ष बंड झालेंच

होतें. इंग्रज सत्ताधाऱ्यांनी हें स्पष्टपणें मान्य करूनच आपलें धोरण आखलें. तेव्हा आपण प्रेमाने, आत्मक्लेशाने इंग्रजांचें हृदयपरिवर्तन केलें म्हणून त्यांनी स्वराज्य दिलें हें सत्य नाही. दुसरी गोष्ट अशी की, पंचवीस-तीस वर्षें निःशस्त्र प्रतिकाराची –सत्याग्रहाची नव्हे – चळवळ आपल्याला करतां आली याचें श्रेय जितकें आपल्याला, तितकेंच इंग्रजांच्या सौम्य वृत्तीला आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. जगांतल्या दुसऱ्या कोणत्यांहि देशाने एक दिवसहि ही चळवळ चालू दिली नसती. पोर्तुगीजांनी पहिल्याच दिवशीं गोळ्या घातल्या आणि आपली चळवळ पहिल्याच दिवशीं थांबविली. इंग्रज सत्ताधारी सौम्यवृत्तीने वागले नसते तर भारताच्या निःशस्त्रप्रतिकाराचें हेंच झालें असतें. शेवटचा लढा किंवा स्वातंत्र्याचे पुढे होणारे एक-दोन लष्करी लढे टळले, तेहि इंग्रजांच्या विवेकशीलतेमुळे, म्हणजे त्यांचा स्वार्थ शहाणा असल्यामुळे टळले. जपान, जर्मनी, रशिया हे हिंदुस्थानचे सत्ताधारी असते तर प्रत्यक्ष घनघोर संग्राम झाल्यावांचून आपल्याला स्वातंत्र्य मिळालें नसतें. सत्याग्रहामुळे येथे विजय मिळाला नसता इतकेंच नव्हे तर एक दिवसाच्या-वर सत्याग्रह चाललाच नसता.

## या पराकोटीस ध्येयवाद गेला आहे

वर पंडितजींच्या अमेरिकेंतील भाषणांतील जो उतारा दिला आहे त्यांत त्यांनीहि हें मान्य केलें आहे. आमच्या विजयाचें श्रेय दोन्ही पक्षांना आहे असें ते म्हणतात. दुसरें असें की, स्वातंत्र्यानंतर आपल्या साधनशुद्धीची व उदात्त तत्त्वांची अनेक वेळा परीक्षा होऊन आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग तेथें कुचकामाचा ठरला आहे. गोव्याचा उल्लेख वर आलाच आहे. काश्मीर-वर पाकिस्तानने आक्रमण केलें तेव्हा आपण लष्करी सामर्थ्याचाच उपयोग केला आणि तोहि गांधीजींच्या संमतीने ! काश्मीरचा बाकीचा निम्मा भाग त्या वेळीं सहज सोडवितां आला असता, पण तो आपण कांही उदात्त न्यायबुद्धीने सोडविला नाही. आपल्या स्वातंत्र्यलढ्याच्या मार्गाने अजूनहि आपल्याला तो सोडवितां आलेला नाही. हैदराबादचें प्रकरण लष्करी बळा-नेच सोडवावें लागलें, आणि आता पाकिस्तानचें व चीनचें आक्रमण येऊनहि बरेच दिवस झाले. आपण फक्त पत्रे लिहीत आहों ! सत्याग्रह किंवा

निःशस्त्र प्रतिकार यांचा विचारहि आपण केलेला नाही. तो मार्ग स्वातंत्र्य-लढ्यांत जसा यशस्वी झाला तसाच येथेहि होईल अशी श्रद्धा असेल तर आपण कां थांबलों आहोंत हें सांगणें कठीणच आहे. अमेरिकेंत पंडितजींनी साधनशुद्धीचें महत्त्व सांगितलें त्या वेळीं तेथे याच शंका लोकांनी प्रदर्शित केल्या. 'न्यूयॉर्क टाइम्स' म्हणाला की, 'गांधींच्या शिष्याने निःशस्त्र प्रतिकारावर श्रद्धा ठेवावी हें युक्तच आहे, पण पाकिस्तानपुढे तो चालत नाही असें दिसत असूनहि सोव्हिएट युनियनपुढे तो चालेल असें त्यांनी मानणें हें समजू शकत नाही.' हें अवतरण देऊन श्री. करुणाकरन् पुढे म्हणतात की, "अहिंसा-मार्गाच्या खऱ्या अडचणी दिसतात त्या भारताच्या अंतर्गत राजकारणांत. स्वातंत्र्यानंतर येथे अनेक चळवळी झाल्या त्या वेळीं केन्द्र सरकारचे व राज्यसरकारचे अधिकारी ब्रिटिशांप्रमाणेच वागले. आपल्या सरकारने राजकारणी चळवळ्यांवर वरचेवर गोळीबार केला आहे आणि कधी कधी तर तुरुंगांतल्या कैद्यांवरहि गोळीबार केला आहे." (इंडिया इन् वर्ल्ड अफेअर्स, पृ. २५)

मला अशी आशा आहे की, सध्या भारताने चीनशीं ज्या वाटाघाटी चालविल्या आहेत त्या केवळ नाइलाजाने, आज लढाईची कसलीहि तयारी आपल्याजवळ नाही म्हणून चालविल्या आहेत असें पंडितजी मानीत असतील; पण तसें नसेल आणि लष्करी सामर्थ्य असूनहि भारत सरकार साधनशुद्धीचा अवलंब करीत असेल तर आपलें मोठें विपरीत वर्तन घडत आहे असें ठरेल. त्याचप्रमाणे भारतांतील व्यापारी, भांडवलदार, कारखानदार व इतर धनिक हे साठे करून, अनीति आचरून, कर चुकवून अन्नधान्य, साखर, रॉकेल या बाबतींत सरकारच्या सर्व योजनांचा विचका करीत आहेत, जनतेला पिळून काढीत आहेत (असें सरकारच म्हणत आहे) ; पण वाटाघाटीच्या मार्गाने त्यांच्यावर नियंत्रण घालणें हें सुद्धा सरकारला आज बारा वर्षांत शक्य झालेलें नाही. हे लोक सर्वस्वी सरकारच्या अधीन, निःशस्त्र व कायद्याच्या कक्षेंतले असून त्यांच्या बाबतींत जो मार्ग यशस्वी होत नाही तो चीनच्या बाबतींत यशस्वी होईल असें भारत सरकार मानीत असलें तर आपण खरोखरच मोठ्या अद्भुतरम्य वातावरणांत आहोंत व आपला ध्येयवाद राष्ट्राचें हिताहित न पाहण्याइतक्या पराकोटीला गेलेला आहे असें म्हणावें लागेल.

## दण्डसत्तांचें निश्चित धोरण

आजपर्यंत जगाच्या इतिहासांत दर वेळीं शस्त्रबळच निर्णायक ठरलें आहे असें नाही, असें ध्येयवादी लोक म्हणतात तें खरें आहे. पण त्यामुळे दुसरें कोठलें बळ निर्णायक ठरलें असें होत नाही, आणि तरीहि अहिंसेचा, साधन-शुद्धीचा प्रयोग करावयाचा असेल तर तो प्रथम स्वजनांशीं वागतांना, अंतर्गत राजकारणांत करावा. कॉंग्रेसच्या नेत्यांची या उदात्त ध्येयावर खरी श्रद्धा असेल तर पुढील पांच वर्षांत भारतांत साधनशुद्धीचा प्रयोग त्यांनी करून पाहावा, आणि पाकिस्तानला, तुम्ही आमचीं विमानें पाडलींत तरी आम्ही तुमचीं पाडणार नाही, असें जाहीर आश्वासन देऊन तेथे जो महान् प्रयोग चालविला आहे तसाच भारतांत चालवावा. काय वाटेल तें झालें तरी गोळीबार करणार नाही असें जाहीर करावें, आणि भारतांत ही साधनशुद्धि यशस्वी झाली तर परराष्ट्रकारणांत ती अवश्य अवलंबावी.

भारताच्या उन्नतीच्या व विकासाच्या दृष्टीने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जगा-मध्ये शांतता नांदणें अत्यंत अवश्य होतें, आणि त्या दृष्टीने भारताने पक्षातीत व स्वतंत्र असें परराष्ट्रीय धोरण आखणेंच अवश्य होतें असें सांगितलें जातें. याचा अर्थ समजणें फार कठीण आहे. भारत लोकवादी मित्र-संघांत सामील झाला असता, त्याने ब्रिटन-अमेरिकेशीं लष्करी करार केला असता तर जगाच्या शांततेला धोका पोचण्याऐवजी ती दृढ होण्याचाच संभव अधिक होता. कारण हिंदुस्थानसारखा आशियांतला एक मोठा विस्तीर्ण देश लोकवादी राष्ट्रांना मिळाल्यामुळे त्या संघाचें पारडें खूपच जड झालें असतें, आणि युद्धखोर, आक्रमक कम्युनिस्ट दण्डसत्तावादी संघाच्या आक्रमणाच्या व युद्धाच्या भाषेला व वृत्तीलाहि लगाम पडला असता. परवा तेहरानच्या मुलाखतींत पंडितजी म्हणाले की, कम्युनिस्ट व कम्युनिस्टविरोधी असे जगाचे पक्ष करण्यांत अर्थ नाही. पण दुर्दैवाने कम्युनिस्टांना हें मान्य नाही. लेनिनने १९२० सालींच जाहीर केलें आहे की, 'भांडवलशाहीचा निःपात करण्याची शक्ति ज्या क्षणीं आम्हांला येईल त्या क्षणीं आम्ही तिचें नरडें धरूं.' १९५७ सालीं रशियांतील कम्युनिस्ट पक्षाचें 'कॉम्युनिस्ट' हें जें मुखपत्र त्यानेहि घोषणा केली आहे की, "समाजवादी तत्त्वें व भांडवली

तत्त्वें हीं परस्परव्यवच्छेदक आहेत. त्यांच्यांत शांततामय सहजीवन कालत्रयीं शक्य नाही." रशिया व चीन यांच्या मतें भारत हा साम्राज्यवादी व भांडवली देश आहे हें मागे सांगितलेंच आहे व तें जगजाहीर आहे. अशा स्थितींत आपण पक्षातीत आहों अशा घोषणांनी युद्ध टळणार कसें ? जो कम्युनिस्ट नाही तो निश्चित शत्रुपक्षांतला होय हें दण्डसत्तांचें निश्चित धोरण आहे.

## युद्ध दाराशीं आलें आहे

ज्याला शांततारक्षणाचें महत्त्व वाटतें त्याने प्रथम स्वत: बलाढ्य व सामर्थ्यसंपन्न होण्याचा प्रयत्न करणें हेंच त्याचें कर्तव्य होय. जगांत भारतासारखें दुबळें राष्ट्र असणें हेंच खरें युद्धाचें कारण असतें. ज्याला आत्मसंरक्षणहि करतां येत नाही, कोणीहि लचके तोडले तरी ज्याला यशस्वी प्रतिकार करतां येत नाही, जेथील कोट्यवधि प्रजा नित्य भुकेली आहे अशा राष्ट्रांवरच सर्वांचा डोळा असतो. अनेकांना तें एक भक्ष्य वाटतें आणि त्यामुळेच लढाई उद्‌भवते. तेव्हा कोठल्यातरी मित्रसंघाच्या साह्याने बलसंपन्न होणें हाच शांतता रक्षिण्याचा खरा मार्ग होय. आपण लोकवादी मित्रसंघांत समाविष्ट झालों असतों तर अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, फ्रान्स, पश्चिम जर्मनी व भारत यांचा वर सांगितल्याप्रमाणे एक बलाढ्य संघ झाला असता आणि हें एकवटलेलें सामर्थ्य कोणत्याहि प्रतिपक्षाला भारी ठरून युद्धाचा संभव निश्चितच टळला असता. शिवाय यामुळे भारताला अवश्य तें सर्व आर्थिक, लष्करी व वैज्ञानिक साह्य मिळून तोहि बलशाली झाला असता, पण आपल्या स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणामुळे आज आपल्याला कोणीहि मित्र राहिलेला नाही आणि युद्धाचा संभव वाढलाच आहे. युद्ध आपल्या दाराशीं आलें आहे.

पण अजूनहि कोणत्याहि विशिष्ट पक्षांत सामील व्हावयाचें नाही हा पंडितजींचा निश्चय कायम आहे. १९५९ सालच्या सप्टेंबर २२ तारखेच्या तेहरानच्या मुलाखतींत त्यांनी स्पष्टपणें सांगितलें आहे. आमचें सर्वच राष्ट्रांशीं स्नेहसंबंध जोडण्याचें धोरण आहे. त्यांत चीन प्रकरणामुळे बदल झालेला नाही, असें ते म्हणाले. पण व्यवहारांत सर्वांशीं मैत्री म्हणजे कोणाशींच मैत्री नव्हे

असा अर्थ होतो. युद्धाचा प्रसंग उद्भवला तर आपल्याला मित्र कोण या दृष्टीने हा विचार केला आहे. एरवीं सर्व जगाशीं आपण मैत्री जोडूं शकूं हें खरें आहे; पण ती शिळोप्याची मैत्री होय. मरण-मारणाच्या संग्रामांत कोणी राष्ट्र आपलें मित्र आहे का असें पाहिलें तर तशी मैत्री आम्हांला जोडावयाचीच नाही असें त्या मुलाखतींत पंडितजींनी जाहीर केलें आहे. लष्करी करार, लष्करी दृष्टीने दोस्ती कोणाशींहि करावयाची नाही असा दृढनिश्चय त्यांनी बोलून दाखविला आहे. लोकांना मित्र हवे असतात ते प्रसंगीं आपल्या बाजूस सज्ज राहणारे हवे असतात, आणि स्नेह केला तर संपूर्ण करावा अशी त्यांची अपेक्षा असते. आपल्या न्याय-अन्यायावर जगाच्या चावडीवर टीका करणारा मित्र कोणालाहि नको असतो. जें आपण करूं त्याचें समर्थन करणाराच मित्र सर्व राष्ट्रांना हवा असतो. निदान त्याने अप्रिय गोष्टींत मौन पाळावें अशी अपेक्षा असते. हे प्राणपणाचे, मरण-मारणाचे प्रसंग असतात. तेथे जिवाला जीव देणारा मित्र हवा असतो. न्यायपीठावर आरोहण करणारा मित्र हा त्यांच्या दृष्टीने मित्रच नव्हे. तुल्यरागद्वेष, समशत्रुमित्र यावांचून संघटना टिकत नाहीत. प्रसंगीं मित्र-राष्ट्राच्या असत्यावर, अन्याय्य कृत्यांवर पांघरूण घालणेंहि अवश्य असतें. त्याचें समर्थन करणेंहि अवश्य असतें. या अपूर्ण जगांत यावांचून कोणाचें चालत नाही. पंडित जवाहरलाल नेहरू यांना हें तत्त्व अक्षरशः मान्य आहे, पण तें अंतर्गत राजकारणांत. काँग्रेस पक्षाच्या संघटनेच्या वेळीं काँग्रेस-श्रेष्ठींनी एकदा निर्णय केला की, प्रत्येक काँग्रेसजनाने त्याचें समर्थन केलेंच पाहिजे, मग तो निर्णय त्यांना अन्याय्य वाटो, असत्य वाटो, कसाहि वाटो. तसें समर्थन त्याने केलें नाही तर निदान त्याने मौन पाळलें पाहिजे. त्यामुळे तो दूरचा होईलच; पण त्याची हकालपट्टी होणार नाही. त्याने निःपक्ष धोरण अवलंबिलें तर मात्र त्याला काँग्रेसपक्षांत जागा नाही. मतस्वातंत्र्याचा अधिकार काँग्रेसमध्ये दिला जात नाही, याचें कारण हेंच. त्यावांचून संघटना टिकणार नाही. म्हणून आपली विवेकदेवता, आपली सत्यनिष्ठा तेथे सभासदांनी बाजूस ठेवलीच पाहिजे असा काँग्रेसचा दंडक आहे. पण हेंच तत्त्व भारताने परराष्ट्रीय धोरणांत अवलंबावें हें मात्र पंडितजींना मान्य नाही. भारत बलाढ्य करण्यासाठी लष्करी करार करून

दोस्तराष्ट्र-संघटना निर्मावी हें त्यांना मंजूर नाही. भारताचें असामान्यत्व आहे तें यांतच आहे! सत्तालोभासाठी तत्त्व सोडावयाचें, पण राष्ट्रासाठी नाही.

## सगुण, साकार, सान्त होणें आवश्यक

ब्रिटन हें अतिबलाढ्य राष्ट्र आहे. त्याच्याशीं लढा करून आपण स्वातंत्र्य मिळविलें हा अभिमान आपण बाळगतों. त्याचे परराष्ट्रमंत्री सेल्विन लॉईड यांनी या संबंधांत जे विचार मांडले आहेत ते आपल्याला उद्बोधक होतील असें वाटल्यावरून पुढे देतों. ते म्हणतात, "कम्युनिस्ट सत्तेला तोंड द्यावयाचें तर पश्चिमेने संघटित राहिलेंच पाहिजे. विशेषत: ब्रिटन व अमेरिका हे आता इतके परस्परावलंबी झाले आहेत की, त्यांना विभक्ततेचा, भिन्न मार्गांचा विचार करणेंच शक्य नाही. आपल्या स्वतंत्र व नि:पक्ष परराष्ट्रीय धोरणाची खूण म्हणून त्यांनी कांही किरकोळ मतभेद व्यक्त केले तरी चालेल. पण मूलगामी मतभेद, किंवा पूर्णतया स्वतंत्र धोरण हा अद्‌भुत श्रीमंती विलास आता आपल्याला परवडणार नाही. आपण एकाकी राहिलों तर सर्वनाश ओढवेल. आपला पक्ष न्याय्य आहे, सत्य आहे, शुद्ध आहे, म्हणून आपल्याला जय मिळेल हा भ्रम आहे. हें सर्व असूनहि आपला केव्हाहि पराभव होऊं शकेल. आपण संघटित राहिलों, स्वत:चे देश समर्थ केले, आणि सर्व अर्वाचीन साधनांनी जगांतल्या देशांशीं दृढसंबंध जोडले तरच आपल्याला यश येईल." (रीडर्स डायजेस्ट — मे १९५९). जो श्रीमंती विलास ब्रिटन-अमेरिका यांसारख्या धनाढ्य व बलाढ्य राष्ट्रांना परवडणार नाही, तो भारताला परवडेल असें पंडितजींना कां बरें वाटतें? त्यांची सत्तत्त्वांवरची अढळ श्रद्धा हें त्याचें कारण होय. तेहरानच्या २२ सप्टेंबर १९५९ च्या मुलाखतींत त्यांनी हेंच सांगितलें. 'चीन-प्रकरणानंतर आपलें सहजीवनाविषयी आता काय मत आहे?' असा प्रश्न त्यांना विचारला होता. त्यावर ते म्हणाले की, 'त्यांत यामुळे अणुमात्र फरक झालेला नाही. एखाद्या देशाने त्याचा दुरुपयोग केला किंवा एखादा त्याप्रमाणे वागला नाही तरी सहजीवनाच्या तत्त्वाला बाध येत नाही. तत्त्व हें केव्हाहि तत्त्वच; कोणी असत्य बोलला तरी सत्य तें सत्यच.' (टाइम्स ऑफ इंडिया, २३ सप्टेंबर १९५९) याचा अर्थ असा की, सेल्विन लॉइडचें मत

पंडितजींना मान्य नाही. दुसऱ्या कोणी तत्त्वांचा दुरुपयोग केला किंवा असत्याचरण केलें तरी आपण तत्त्वनिष्ठ, सत्यनिष्ठ राहिलों की आपल्याला जय निश्चित मिळेल अशी त्यांची श्रद्धा आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यांत त्याच पुण्यामुळे आपण विजयी झालों असें त्यांचें मत असल्याचें वर सांगितलेंच आहे.

अशी तत्त्वनिष्ठा असल्यामुळेच आज स्वातंत्र्यलढ्याच्याहि एक पाऊल पुढे पंडितजींनी टाकलेलें दिसतें. स्वातंत्र्यलढ्यांत भारत शत्रूचा अहिंसेने का होईना पण प्रतिकार करीत होता, पण आता शत्रूंना केवळ प्रेमाने, निर्भेळ प्रेमाने जिंकण्याचा प्रयोग चालू झाला आहे. पाकिस्तान भारताचा नित्य अवमान करीत आहे, सरहद्दींचा भंग करीत आहे, आपल्या स्त्रिया, आपले अधिकारी यांना पळवीत आहे. चीनने तर १२००० चौरस मैलांचा मुलूखच आक्रमिला आहे. पण या दोन्ही देशांवर पंडितजींचें निरपेक्ष प्रेम आहे. शुक्लानगरमध्ये भाषण करतांना त्यांनी त्याचा सुंदर आविष्कार केला आहे. चीन-हिंदुस्थान वाटाघाटींचा उल्लेख करतांना 'दोन महान् राष्ट्रें शांततेने चर्चा करीत आहेत' असें ते म्हणाले. मीरत येथे भाषण करतांना चीन-भारताच्या दोन हजार वर्षांच्या मैत्रीचें त्यांनी हृदयंगम वर्णन केलें. चीन मात्र भारताची पावलोपावलीं मानखंडना करीत आहे. तरी त्याच्या-विषयी भारताची प्रेमभावना कायम आहे. निरपेक्ष प्रेम तें हेंच. हीच भावना पाकिस्तानविषयीहि आहे. त्याच्याविषयी प्रखर शब्दांत बोलणें पंडितजींना मान्य नाही. आपले पूर्वीचे स्नेहसंबंध आहेत, स्वातंत्र्यलढ्यांत आपण खांद्याला खांदा लावून लढलों आहोंत हें आपल्याला विसरणें शक्य नाही. शेवटीं पंडितजी म्हणाले की, 'जगांतल्या कोणत्याहि राष्ट्राविषयी आमच्या मनांत शत्रुभाव नाही. चीन, पाकिस्तान यांच्याविषयीहि नाही.' शत्रूला प्रेमाने जिंकण्याचा हा प्रयोग स्वातंत्र्यलढ्यापेक्षा निःसंशय वरच्या दर्जाचा आहे !

आणखीहि एका बाबतींत आपली प्रगति झालेली आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या वेळीं आपल्याला देश मुक्त करण्याची घाई झाली होती. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यावांचून स्वातंत्र्य नाही हें गांधीजींचें प्रियतत्त्व. पण तेंहि त्यांनी सोडलें, आणि 'करा वा मरा' असा संदेश देऊन अंतिम संग्राम त्यांनी सुरू केला.

वास्तविक हळूहळू कालांतराने, पायरी-पायरीने आम्ही भारताला स्वातंत्र्य देऊं, असें ब्रिटिश राज्यकर्ते म्हणतच होते; पण तेव्हा आपल्याला घाई झाली होती. आता प्रगति अशी की, ती घाई नष्ट झालेली आहे. 'आपल्या वाटाघाटी दहा वर्षे चालतील किंवा दहा शतकें—हजार वर्षे—चालतील. त्यांत कांहीच हानि नाही. घिसाडघाईने कांही करण्याने मात्र नाश ओढवेल' असें पंडितजी शुक्लानगरच्या भाषणांत म्हणाले. (भारतज्योति:३०-१०-६०) स्वातंत्र्यलढ्याच्या काळांत भारतांतील नेमस्त पक्षांतील श्रीनिवासशास्त्री, सप्रू, चिंतामणि यांचें असेंच धिम्में धोरण होतें. घिसाडघाई करण्यांत अर्थ नाही असेंच ते म्हणत होते. त्यांच्यावर पंडितजींनी आत्मचरित्रांत अत्यंत कडक टीका केली आहे. 'त्यांना अपमानाची चीड नाही, संताप नाही. ब्रिटिश आमच्या बांधवांना पायपुसण्याप्रमाणे वागवितात याचें त्यांना सोयरसुतक नाही' असें त्यांनी म्हटलें आहे. आज पाकिस्तान-चीनविषयी पंडितजींची हीच नेमस्त वृत्ति आहे. त्यांना या दोन देशांविषयी चीड नाही, संताप नाही. स्वबांधवांच्या अवमानाचें सोयरसुतक नाही. उलट प्राचीन काळच्या स्नेह-संबंधांची आठवण होऊन त्यांच्या मनांत प्रेमच उचंबळतें. भारताची राजकारणांतली अध्यात्मनिष्ठा ती हीच होय. शत्रु-मित्र भाव नाही, राग-द्वेष नाहीत, फलाची आकांक्षा नाही, सर्वत्र समबुद्धि आहे.

पण यामुळेच भारताला धोका आहे. राजकारणांत अत्यंत तीव्र शत्रुमित्र-भाव असणेंच अवश्य असतें; आणि आक्रमकांचें निर्दाळण करून स्वत:च्या राष्ट्राचा स्वार्थ साधणें यांतच त्याची परिणति झाली पाहिजे. मित्रराष्ट्रसंघ निर्मावयाचे, मित्र राष्ट्रांशीं तुल्यारिमित्रत्वाचे लष्करी करार करावयाचे हें राजकारणांत अगदी अटळ आहे. लष्करी करारांची आपले नेते नेहमी हेटाळणी करतात. आपण अमेरिकेशीं लष्करी करार केला आणि त्या अन्वयें अमेरिकेच्या लष्करी फौजा भारतांत आल्या तर तें भारताला अवमानकारक आहे असें कॉंग्रेसच्या नेत्यांचें मत आहे. मित्र राष्ट्राच्या साह्यार्थ फौजा आल्या तर तो अवमान आणि शत्रुराष्ट्राच्या फौजा आक्रमक म्हणून आल्या तर त्यांत मात्र अवमान नाही अशी ही विचारसरणी आहे! वास्तविक अमेरिकेने पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांत ब्रिटन, फ्रान्समध्ये व इतर अनेक देशांत साह्यार्थ फौजा धाडल्या होत्या, आणि युद्ध संपतांच त्या

परत गेल्या. मुलूख वळकावून बसल्या नाहीत. उलट चीन, रशिया यांच्या फौजा मात्र जेथे गेल्या तेथे भूमि बळकावून बसल्या. शिवाय, आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे की, थोडा युद्धसंभव दिसतांच भारतांत आपल्या सेना घुसवाव्या कीं नाही याचा विचार करीत, नीति-अनीति पाहात बलाढ्य राष्ट्रें स्वस्थ बसणार नाहीत. भारताची परवानगीहि विचारणार नाहीत. त्यांना अवश्य वाटेल तेव्हा तीं राष्ट्रें आपापलीं सैन्यें भारताच्या भूमीवर निश्चितपणें उतरवितील. कांगोमध्ये सेना पाठवितांना भारताने कोणाला विचारलें होतें ? तद्देशीयांची परवानगी काढली होती काय ? इतर राष्ट्रें युद्धाचा वास येतांच अशाच सेना धाडतील. त्यांना शत्रु म्हणून येऊं द्यावयाचें कीं मित्र म्हणून त्यांचें स्वागत करावयाचें एवढेंच भारताच्या हातीं राहील. हें ध्यानीं घेऊनच आपण वेळींच मित्रराष्ट्रें जोडून ठेवणें अवश्य आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तत्काळ आपण या उद्योगाला लागावयास हवें होतें, आणि आता तर जगण्यामरण्याचाच प्रश्न निर्माण झाला आहे. एका दण्डसत्तेने आपली भूमिच आक्रमिली आहे व दुसरीने ५० मेगॅटनी बाँबचे स्फोट करून जगाच्या माथ्यावर भस्मासुराप्रमाणे हात ठेवण्याची तयारी चालविली आहे. कम्युनिस्ट दण्डसत्तांचें हें आव्हान भारताला स्वीकारावयाचें असेल, आक्रमणांतून आपली भूमि मुक्त करावयाची असेल, तर तटस्थतेचें उदात्त, आध्यात्मिक राजकारण सोडून देऊन, वास्तववादाचा, व्यवहारी वृत्तीचा अवलंब करून, इतर सामान्य देशांप्रमाणेच आपण मित्रराष्ट्रसंघ केला पाहिजे व राष्ट्रीय स्वार्थ साधला पाहिजे. कडवी राष्ट्रनिष्ठा आणि समाजोन्मुख धर्मनिष्ठा या महाशक्तींचा अवलंब करून अंतर्गत सामर्थ्य वाढविणें आणि लष्करी करारांनी मित्रराष्ट्रें जोडून बाह्य सामर्थ्य प्राप्त करून घेणें यावर अहोरात्र आपण सर्व मन केन्द्रीभूत केलें तरच आपल्या लोकसत्तेचें आपल्याला कम्युनिस्ट आक्रमणापासून रक्षण करतां येईल.

दुसऱ्या प्रकरणांत रानटी समाज व सुसंस्कृत समाज यांच्या बलाबलाचा विचार केला आहे. त्याचा वाचकांनी येथे पुन्हा विचार करावा. कोणताहि समाज संस्कृतीची एक पायरी वर चढला की, त्याचें बल, त्याचें लढाऊ सामर्थ्य तितकें कमी होतें. संघटनेचीं श्रेष्ठ तत्त्वें, श्रेष्ठ निष्ठा, थोर विवेक-बुद्धि व जास्त मारक हत्यार यांचा आश्रय करून संस्कृत समाजाने ती

उणीव भरून काढली नाही तर रानटी समाजापुढे त्यांचा टिकाव लागत नाही, हें तेथे स्पष्ट केलें आहे. भारताचा आतापर्यंतचा तोच इतिहास आहे. भागवत धर्माचीं श्रेष्ठ तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचा उपदेश संतांनी केला. त्यामुळे समाजाला दौर्बल्य मात्र आलें. त्याच वेळीं संघटनेचीं श्रेष्ठ तत्त्वें व जास्त मारक हत्यारें मात्र आपण शोधून काढलीं नाहींत, म्हणून शेकडो वर्षे आपण पारतंत्र्याच्या नरकांत पडलों होतों. गेल्या शंभर वर्षांत लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, स्वातंत्र्यवीर सावरकर, वल्लभभाई, सुभाषचंद्र यांनी कडव्या राष्ट्रनिष्ठेचें बीज पेरून आपलें राजकारण वास्तवाच्या दृढ पायावर उभें केलें होतें. महात्माजींनी त्या राजकारणांत पुन्हा सत्य, अहिंसा व शत्रुप्रेम इत्यादि थोर तत्त्वें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मनाप्रमाणे त्यांना त्यांत यश आलें नाही. आपला स्वातंत्र्यलढा ब्रिटिशांच्या द्वेषाच्या प्रेरणेने लढला गेला, पण चीनने जपानशीं वीस वर्षे जो घनघोर सशस्त्र संग्राम केला तसा आपण केला असता तर आज अखिल भारत अर्वाचीन युद्धकलेंत निष्णात होऊन आज आपल्याला शांततामय वाटाघाटींचा आश्रय करावा लागला नसता. पण एवढ्यानेच भागलें नाही. उच्च मूल्यांच्या, श्रेष्ठ धर्माच्या रक्षणासाठी श्रेष्ठ संघटनेची, विवेकबुद्धीची, त्यागवृत्तीची अत्यंत आवश्यकता असते. दुर्दैवाने त्याहि बाबतींत आपलें दिवाळें वाजलें आहे. स्वातंत्र्य लढ्याच्या काळीं जी राष्ट्र- निष्ठा भारताच्या ठायीं होती तीहि आज राहिलेली नाही. प्रांताप्रांतामध्ये, जातीजातीमध्ये, जमातीजमातीमध्ये अत्यंत कटु असें विषारी वैमनस्य चेतलें आहे. कॉंग्रेस पक्षांत प्रत्येक प्रांतांत दुफळी तिफळी झाली आहे. केंद्रांतहि कॉंग्रेस भंगली आहे. ज्यांनी हीं विषें उतरावयाचीं, तेच तीं विषें पौष्टिकें म्हणून समाजांत पसरून देत आहेत. सत्तालोभ, धनलोभ, हीन स्वार्थ यांनी प्रत्येक पक्षाचा, प्रत्येक संघटनेचा धागान् धागा कुजून गेला आहे. कर्तृत्व आणि चारित्र्य यांची कोणती पातळी आपण गाठली आहे हें सर्वश्रुत आहेच. मारक हत्यारांचा विचार आपल्याला वर्ज्यच आहे. त्या बाबतींत रानटी दण्डसत्ताच संस्कृत समाजापेक्षा श्रेष्ठ ठरल्या आहेत. असें सर्व बाजूंनी अंतर्बाह्य दौर्बल्य असतांना आपण सत्य, अहिंसा, शत्रुप्रेम, निःपक्ष धोरण, जागतिक न्याय हीं श्रेष्ठ मूल्यें, हा श्रेष्ठ धर्म कशाच्या आधाराने

स्वीकारावयाचा ? ‘धर्मो रक्षति रक्षितः ।’ हें कविवचन आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. ‘बले धर्मः प्रतिष्ठितः ।’ श्रेष्ठ धर्माचें, श्रेष्ठ मूल्यांचें रक्षण श्रेष्ठ बलाने, श्रेष्ठ युद्धसामर्थ्यानेच होत असतें, हें आपण विसरतां कामा नये. दुर्दैवाने त्याचाच आपल्याला विसर पडलेला आहे. या भ्रान्तींतून बाहेर पडून आपण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणांत रोख व वास्तववादी वृत्ति धारण केली नाही तर दण्डसत्तांचें आव्हान स्वीकारणें आपल्याला कधीहि शक्य होणार नाही.

✦ ✦ ✦

## प्रकरण : ८

# मध्यम मार्ग

### लोकशाही म्हणजे अराजक

तीनशे वर्षांपूर्वी इंग्लंडमध्ये रक्तशून्य क्रान्ति होऊन लोकशाही प्रस्थापित झाली. त्या वेळीं इंग्लंडच्या हितचिंतकांना चिंता वाटूं लागली आणि त्यांच्या शत्रूंना आनंद झाला. कारण हा देश आता दुबळा होणार, त्याचें सामर्थ्य लयास जाणार, त्याला मोठ्या सेना उभारतां येणार नाहीत, आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करतां येणार नाही व देश अभंग राखतां येणार नाही याविषयीं कोणालाच शंका राहिली नव्हती. कारण लोकशाही म्हणजे यादवी, लोकशाही म्हणजे अराजक, बेबंदशाही, लोकशाही म्हणजे दौर्बल्य आणि अंतीं नाश असें समीकरण स्पेन, जर्मनी, फ्रान्स इत्यादि देशांच्या मनांत ठरून गेलें होतें. इंग्लंडमध्येहि कित्येक लोकांचें मत असेंच होतें; पण लवकरच या भ्रमाचा निरास झाला. १६८८ नंतर इंग्लंडचें सामर्थ्य कमी तर झालें नाहीच; उलट दिवसेंदिवस तें वृद्धिंगत झालें आणि हळूहळू ब्रिटिशांचें साम्राज्य सूर्याच्या मर्यादा ओलांडून जाऊं लागलें. लोकशाही पद्धतीचा अंगीकार करूनहि राष्ट्र बलाढ्य होऊं शकतें, स्वदेशांत समर्थ शासन निर्माण करून फुटीर, अराजकी प्रवृत्तींचा नायनाट करूं शकतें, परकीय आक्रमणाला तोंड देऊन राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें रक्षण करूं शकतें आणि बलाढ्य व राजसत्तांकित देशांना नामोहरम करून जगावर अधिराज्यहि प्रस्थापित करूं शकतें हें ब्रिटनने जगाला दाखवून दिलें. इतकें झालें तरी शंभर वर्षांनी अमेरिकेने आपलें लोकसत्ताक स्थापन केलें, त्या वेळीं अमेरिकेचे हितचिंतक असेच चिंतातुर झाले होते. त्या वेळीं अमेरिकन वसाहतींनी सर्व देश व्यापला नव्हता. त्यांचा सर्व संसार अलेघानी पर्वताच्या पूर्वेलाच होता, तरी त्याचा

विस्तार फ्रान्सच्या दुप्पट होता आणि त्यामुळे मॉंटेस्क्यूसारखे युरोपांतले लोकसत्तेचे पुरस्कर्तेहि म्हणूं लागले की, इंग्लंडचें ठीक आहे, तो लहान देश आहे; पण अमेरिकेसारख्या मोठ्या देशांत लोकशाही कधीच यशस्वी होणार नाही. वॉशिंग्टनने अध्यक्ष न होतां राजा व्हावें असें म्हणणारा अमेरिकेंतहि एक पक्ष होता; पण त्याने हें मत मानलें नाही आणि लोकशाहीचाच अंगीकार केला. जर्मनीचा महाराणा फ्रेडरिक यानेहि ही लोकशाही टिकणार नाही असेंच भविष्य त्या वेळीं सांगितलें होतें; पण पुन्हा एकदा अमेरिकनांनी या मताचा निरास केला. अमेरिकन राष्ट्र उत्तरोत्तर बलाढ्यच होत गेलें.

पण यानंतरहि पाश्चात्त्यांमधील लोकशाहीबद्दलचा अविश्वास नष्ट झाला असें नाही. उलट, मेक्सिको, दक्षिण अमेरिका, जर्मनी, फ्रान्स येथे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत ज्या घटना घडल्या त्यामुळे तो अविश्वास बळावतच चालला. १८२१ च्या सुमारास मेक्सिको आणि ब्राझील, वेने-जुवेला, पेरू, चिली इत्यादि दक्षिण अमेरिकेंतील देश यांवरील स्पेनचें वर्चस्व नष्ट झालें आणि मग तेथील नेत्यांनी आपापल्या देशांत ब्रिटनचें अनुकरण करून लोकसत्ताक शासनें स्थापन केलीं; पण या वेळीं लोकांच्या सर्व शंका खऱ्या ठरल्या. लोकशाही म्हणजे दुही, दुफळी, अराजक, यादवी, बेबंद-शाही, अंदाधुंदी हें समीकरण या देशांनी खरें ठरविलें. अजूनहि तेथे तेंच समीकरण बरोबर आहे, आणि हें पाहून राजसत्तावादी लोक म्हणाले की, 'पाहा, आमचें मतच बरोबर आहे. लोकशाही म्हणजे अराजक, लोकशाही म्हणजे दौर्बल्य, लोकशाही म्हणजे नाश हेंच खरें आहे.' इंग्लंडमध्ये लोक-शाही यशस्वी झाली हा एक योगायोग आहे. अमेरिकेंत ती यशस्वी झाली हें निराळें प्रमाण होऊं शकत नाही. कारण ब्रिटिश लोकच तेथे गेलेले आहेत. दैवयोगाने त्यांना हें जमलें, पण म्हणून इतरांना तें जमेलच असें नाही. त्यांनी लोकशाहीच्या वाटेस जाऊं नये हेंच खरें. तसें त्यांनी केलें तर अराजक, यादवी, दौर्बल्य, परकीय आक्रमण, स्वातंत्र्यनाश या आपत्ति त्यांच्यावर ओढवल्यावांचून राहणार नाहीत.

याहि गोष्टीला आता शंभर-सव्वाशे वर्षें झालीं, आणि आशियांतील नव्यानेच उदयाला येणारे देश पुन्हा एकदा तें समीकरण बरोबर असल्याचा

निर्वाळा देत आहेत. ईजिप्त, तुर्कस्तान, पाकिस्तान, इंडोनेशिया इ. देशांत गेल्या दहा वर्षांत लोकसत्ताक शासनें स्थापन झालीं; पण हिंदुस्थानांतील धरणांच्या व नव्या इमारतींच्या भिंतीप्रमाणे बांधकामें पुरीं होण्याच्या आंतच तीं कोसळलीं. अराजकाने, यादवीने, बेबंदशाहीने तेथे लोकशाहीचा बळी घेतला, आणि मग बहुतेक ठिकाणीं दण्डसत्ता प्रस्थापित झाली.

## फेरविचार आवश्यक

जगांतल्या लोकशाहीचें इतिवृत्त थोडक्यांत वर दिलें आहे. तें बारकाईने अभ्यासून आपण भारताचा विचार केला पाहिजे. आपण लोकशाहीच्याच मार्गाने जाणार, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता या थोर तत्त्वांच्या आश्रयानेच आपण भारताचा उत्कर्ष करून घेणार अशी आपण प्रतिज्ञा केली आहे. हा आपला आग्रह कितपत सयुक्तिक आहे, या मार्गाने जाऊन बल, वैभव, सामर्थ्य, समृद्धि यांचा लाभ आपल्याला करून घेतां येईल काय, जगांतल्या बहुतेक देशांना तो मार्ग सोडून दण्डसत्ता किंवा निदान बह्वंशीं मर्यादित अशी लोकसत्ता यांचा अवलंब करावा लागला हें दिसत असतांना भारतांत मात्र तसा प्रसंग येणार नाही असा जो आत्मविश्वास आपण प्रकट करीत आहोंत तो कितपत समर्थनीय आहे, याचा आपण विचार केला पाहिजे. मागल्या दोन प्रकरणांत धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा या दोन महाप्रेरणांचा आपण विचार केला. लोकशाही यशस्वी होण्यासाठी त्या दोन निष्ठा अत्यंत अवश्य आहेत हें आपण पाहिलें. पण त्यांचें तें उदात्त व परमदिव्य रूप पाहून मनांत प्रश्न असा येतो की, नजीकच्या भविष्यकाळांत भारतीयांच्या मनांत त्या रुजविणें कितपत शक्य आहे? रशिया आणि चीन यांनी आपल्या समाजांत राष्ट्रनिष्ठा दृढमूल करण्याचे विश्वप्रयत्न केलेले आहेत, आणि कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानाला जवळ जवळ धर्माचें रूप देऊन त्या धर्माचा संदेश प्रत्येक नागरिकाला पढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे; पण एवढ्याने भागेल असें तेथील नेत्यांना वाटलें नाही. या उदात्त प्रेरणांचा राष्ट्रसंघटनेसाठी ते उपयोग करतातच, पण त्यांनी हें जाणलें की, बहुसंख्य मानवांच्या मनांत लोभ, स्वार्थ, अहंभाव, धनवासना, कामवासना, याच प्रबळ असतात, आणि केवळ धर्मनिष्ठा किंवा राष्ट्रभक्ति यांच्या आवाहनाने

त्यांवर त्याला जय मिळवितां येत नाही. या तत्त्वांचे त्याच्या मनावर कितीहि संस्कार केले तरी बलवान् इंद्रियग्राम त्याची समाजहितबुद्धि, त्याची कर्तव्य-निष्ठा ही झांकळून टाकतो आणि अत्यंत वेगाने त्याला वैयक्तिक हिताच्या, संकुचित स्वार्थाच्या मार्गानेच ओढून नेतो. अशा मानवाला समाजसेवा, राष्ट्र-सेवा, करण्यास उद्युक्त करावयाचें तर वरील दोन निष्ठांच्या साह्याला दण्डाची भीति ही अवश्य आहे. माणूस हा धर्मवश असण्यापेक्षा, विवेकवश असण्या-पेक्षा जास्तीकरून भीतिवश आहे, दण्डवश आहे, हें कटुसत्य ध्यानांत घेऊन प्रथमपासूनच चीन-रशियाचे नेते शहाणे झाले, सावध झाले आणि त्यांनी दण्डसत्तेचा आश्रय केला. प्रत्येक मानवाच्या ठायीं परमेश्वराचा अंश असतो आणि त्याला आवाहन केलें की, त्याच्या सर्व सुप्त सद्गुणांचा विकास होतो ही विचारसरणी फार उदात्त आहे, पण तिचा रशियन नेत्यांनी क्षणभरहि अवलंब केला नाही. तिच्यावर त्यांचा कदाचित् विश्वासहि नसेल, पण त्यांनी हें जाणलें की, हा परमेश्वरी अंश जागा होण्यास बहुतेक वेळां फटक्यांची, दण्डाची, भीतीची आवश्यकता असते. हा रोख व्यवहार-वाद आहे, वास्तववाद आहे आणि त्याचाच आश्रय करून दण्डसत्तेच्या पुरस्कर्त्यांनी आपला मार्ग आखला आहे. चीनमध्ये सध्या कामगारांना, शेतकऱ्यांना रोजीं पंधरा, सोळा तास काम करावें लागतें. ख्रिस्टल वेल्झेन बचर नांवाचा एक युरोपीय प्रवासी चीनमध्ये गेला असतां त्याने चिनी अधिकाऱ्यांना याविषयी प्रश्न केला. त्याला उत्तर देतांना पेकिंगचे शिक्षण-मंत्री म्हणाले, " सक्ती केली नाही, दण्डभय दाखविलें नाही, तर लोक इतकें काम करणें शक्य आहे काय ? आम्हांला राष्ट्राची पुनर्रचना करावयाची आहे. त्यामुळे आमच्या देशाला पाश्चात्त्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य परवडणार नाही. वाद, मतभेद, चर्चा यांना आम्हीं अवसर दिला तर कामाचा वेग मंदावेल. तें कसें चालेल ?" कठोर दण्डभयानेच माणसें कष्टाला तयार होतात, या भीतीनेच त्यांच्यांतला परमेश्वरी अंश जागृत होतो हें कटु सत्य चीन-रशियांनी नुसतें तोंडीं सांगितलें नाही, तर प्रत्यक्ष त्याचा आचार करून, त्यायोगें आपलीं राष्ट्रें बल-वैभव-संपन्न करून त्यांनी तें सिद्ध केलें आहे.

या दृष्टीने भारताने अंगीकारलेल्या तत्त्वांचा फेरविचार आपण केला

पाहिजे असें मला वाटतें. पाश्चात्त्यांचीं व्यक्तिस्वातंत्र्य, समता हीं लोकशाहीचीं तत्त्वें आम्हांला परवडणार नाहीत असें चीनचे नेते म्हणतात. भारताला तीं परवडतील काय ? लोकशाहीसाठी विवेकशीलता, संयम, समाजहितबुद्धि, कार्यक्षमता, चारित्र्य, या गुणांची आवश्यकता आहे. ब्रिटनमध्ये आज ते गुण प्रकर्षाने दिसतात म्हणून तेथे लोकशाही टिकली आहे. पण तेथेहि ही परिणत अवस्था तीनचारशे वर्षांच्या दीर्घ प्रयत्नाने प्राप्त झाली आहे. हे गुण जसजसे वाढत गेले तसतशी तेथली लोकशाही विकसित होत गेली. ' व्यक्तिस्वातंत्र्य, नाहीतर मृत्यु' अशी आज तेथील नागरिकांची धारणा झाली आहे. कायद्याचें पालन केलेंच पाहिजे ही वृत्ति आज सातशे वर्षे ब्रिटिशांच्या अंगीं बाणलेली आहे. न्यायासनाची प्रतिष्ठा राखलीच पाहिजे हें ब्रिटिश सरकारचें आद्य तत्त्व आहे. व्यक्तिस्वातंत्र्याला कोठे धक्का लागला, न्यायासनाचा थोडा जरी अवमान झाला तरी ब्रिटिश जनता त्या अन्यायाचा प्राणपणाने प्रतिकार करील, त्यासाठी लागणारी अभेद्य संघटना उभारील आणि विवेकाने तिचीं पथ्येंहि पाळील. या गुणांमुळेच इंग्लंडची लोकसत्ता प्रबळ झालेली आहे. हा केवळ दैवयोग नाही. पण हे गुण नसतांना एकदम संपूर्ण लोकायत्त शासनाचा अवलंब करणें हें भारताला परवडणार आहे काय, याचा आपण विचार केला पाहिजे. त्यांतहि आणखी एक ऐतिहासिक घटना आपण विचारांत घेतली पाहिजे. ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रान्ति झाली, आणि त्यानंतर तो देश हळूहळू समृद्ध, संपन्न होत गेला. त्याचें साम्राज्य निर्माण झालें आणि मगच तेथे संपूर्ण लोकशाही अवतरली. त्याआधी रशियासारखी दण्डसत्ता तेथे नसली तरी तितकीच क्रूर व कठोर अशी आर्थिक दण्डसत्ता होती. तेथेहि कामगार पंधरा सोळा तास काम करीत असत. दण्डभयाच्या ऐवजी तेथे उपासमारीचें भय होतें. कामगारांनी लढा करून ही स्थिति हळूहळू पालटून टाकली; पण तेंहि त्यांना साम्राज्यामुळे जी समृद्धि आली, इतरांना पिळून जें धन ब्रिटनला मिळालें त्याच्या ज़ोरावर करतां आलें. भारतामध्ये ती विवेकशीलता नाही आणि तें धनहि नाही. अशा स्थितींत संपूर्ण लोकशाहीच्या तत्त्वांचा आपण जो अवलंब केला आहे त्याला कितपत अर्थ आहे, तें कितपत श्रेयस्कर आहे, याचा विचार भारतीयांनी केला पाहिजे.

## जनतेवरील श्रद्धा ?

भारतामध्ये गेलीं शंभर वर्षे स्वातंत्र्य, समता, बंधुता, बुद्धिप्रामाण्य या तत्त्वांची जोपासना रानडे, टिळक, आगरकर, महात्माजी, पंडितजी या महापुरुषांनी केली. त्यामुळेच लोकशाही शासनाच्या आकांक्षा येथील जनतेंत निर्माण झाल्या, आणि स्वातंत्र्यलढ्यामध्ये त्या बळावत गेल्या. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर दोनदा सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्या पुष्कळच उच्च पातळी-वरून झाल्या. त्यामुळे येथेहि लोकांच्या मनांत लोकशाहीचीं कांही तत्त्वें रुजलीं असावीं असें वाटूं लागलें. गेलीं बारा वर्षे देशामध्ये स्थिर शासन निर्माण करण्यांत कॉंग्रेसला बरेंच यश आलें, त्यामुळे आपली लोकशाही यशस्वी होईल अशी थोडी आशाहि वाटूं लागली; पण स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच कॉंग्रेसला सत्तेची प्राप्ति झाली, आणि तेव्हापासूनच तिच्या चारित्र्याची सत्त्वपरीक्षा सुरू झाली. दुर्दैवाने या सत्त्वपरीक्षेंत ती टिकली नाही, आणि म्हणूनच भारताच्या लोकशाहीच्या भवितव्याची विचारी लोकांना चिंता वाटूं लागली आहे. ही चिंता कां वाटते याचें आता तपशिलाने विवेचन करावयाचें आहे.

ब्रिटनमध्ये लोकसत्ता यशस्वी झाली त्याचें पहिलें कारण म्हणजे तेथील नेत्यांची जनतेवरील श्रद्धा हें होय. कोणत्याहि पक्षाचें शासन असलें तरी त्याच्यामागे लोकशक्ति उभी असली पाहिजे हें तेथील नेत्यांनी जाणलें आहे. लोकांना योग्य प्रकारें शिक्षण दिलें तर त्यांच्या ठायीं सामाजिक प्रबुद्धता निर्माण होऊन त्यांची संघटित शक्ति शासनाच्या मागे निश्चित उभी राहूं शकते, व शासन हें अनियंत्रित होऊन अन्याय करूं लागलें, जुलूम करूं लागलें, किंवा अकार्यक्षम व नालायक ठरलें तर त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य तिच्या ठायीं निर्माण होतें असा ब्रिटिशांचा दृढ विश्वास आहे. म्हणून लोकशिक्षण हें लोकवादी नेत्यांचें आद्य कर्तव्य होय असें तेथे समजतात. लोकशाहींत लोक हेच खरे देशाचे धनी असें मानतात. १८६८ सालीं मतदानाचा हक्क विस्तृत करण्यांत आला तेव्हा 'या आपल्या धन्यांना प्रथम शिक्षण दिलें पाहिजे' हें तेथील नेत्यांच्या ध्यानीं आलें आणि त्यांनी कसोशीने तसे प्रयत्न केले. जनतेवर, लोकशक्तीवर आपल्या नेत्यांची

अशी श्रद्धा आहे काय ? त्या श्रद्धेने प्रेरित होऊन त्यांनी सत्ताप्राप्तीनंतर लोकशिक्षणाचे प्रयत्न केले काय, हा पहिला प्रश्न आहे. त्याच्या उत्तरावर आपल्या लोकशाहीचें भवितव्य अवलंबून आहे.

स्वातंत्र्यप्राप्ति झाली त्या वेळीं लोकशाहीचीं तत्वें भारतांत प्रसृत झालीं होतीं हें खरें; पण तीं शेकडा दहापंधरा लोकांतच ! अस्पृश्य, आदिवासी व इतर तत्सम जमाती या तर त्या तत्त्वांच्या कक्षेबाहेरच होत्या आणि इतर सामान्य जनतेला शेवटच्या स्वातंत्र्यलढ्यांत त्यांची नुसती तोंडओळख होऊं लागली होती. अशा स्थितींत स्वातंत्र्याचें महासाधन हातीं येतांच पूर्वीपेक्षाहि जास्त निष्ठेने या देशांत लोकशाही मूल्यांची जोपासना करण्याचे अखंड, अविरत, अविश्रांत प्रयत्न होणें अवश्य होतें. सत्ताधारी काँग्रेस-पक्षाने हें लोकशिक्षणाचें कार्य प्रथम हातीं घ्यावयास पाहिजे होतें. कारण, त्याच्यावर त्याच्या सत्तेचें व भारताच्या लोकशाहीचें मंदिर उभें राहावयाचें होतें; पण या दृष्टीने पाहतां काँग्रेसचे नेते अत्यंत अक्षम, अगदी अपात्र व पूर्णपणें दृष्टिशून्य असे ठरले. लोकशाही यशस्वी करावयाची तर आधी आपल्यामागे लोकशक्ति उभी केली पाहिजे, त्यासाठीं विवेकनिष्ठा, त्याग, बुद्धिप्रामाण्य, सामाजिक प्रबुद्धता, व्यापक दृष्टिकोण, समाजहितबुद्धि, अन्यायाचा संघटित प्रतिकार करण्याची वृत्ति, सहिष्णुता या गुणांचें शिक्षण समाजाला देणें अवश्य असतें. हे गुण अंगीं बाणले तरच लोकशाहीला अवश्य ते लोक देशांत निर्माण होतात. पूर्वी राजांच्या राज्यांत त्यांच्या प्रजा असत. आता त्या प्रजांचे ' लोक ' झाले पाहिजेत. हें परिवर्तन फार मोठें आहे. जागरूक, प्रबुद्ध, विवेकशील, राष्ट्रनिष्ठ जनता म्हणजे ' लोक '. ते निर्माण केले तरच लोकशक्ति निर्माण होते. यासाठी लोकशिक्षणाची फार आवश्यकता असते; पण गेल्या चौदा वर्षांत काँग्रेसच्या नेत्यांनी त्या दृष्टीने कसलेहि प्रयत्न केले नाहीत. याचा अर्थच असा की, काँग्रेसची लोकशक्तीवर, जन-शक्तीवर श्रद्धा नाही. आपल्या नेत्यांनी दण्डसत्तेच्या मूल्यांचा मुखाने जाहीरपणें धिक्कार केला, आणि लोकसत्तेच्या तत्त्वांच्या घोषणा केल्या; पण त्या लोकसत्तेच्या तत्त्वांचा कृतीने त्यांनी तितकाच धिक्कार केला आहे, तितकीच अवहेलना केली आहे. आज दण्डसत्तेचें आव्हान आपल्याला स्वीकारतां येईल कीं नाही, तिच्या आक्रमणाला आपल्याला तोंड देतां येईल कीं नाही,

त्या आक्रमणापासून आपली मातृभूमि मुक्त करतां येईल कीं नाही, अशी जी दारुण शंका, कृष्ण मेनन सोडून, प्रत्येक भारतीयाच्या मनाला व्यथित करीत आहे तिचें हें कारण आहे, आणि आज एका आक्रमणाबद्दल जी शंका आली तिच्यामुळे आता एकंदर भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने, लोकसत्ताक राज्यपद्धतीचा अवलंब करण्यांत आपण फार मोठी चूक केली कीं काय, अशी दुसरी व्यापक शंका मनाला त्रस्त करीत आहे. लोकशाही म्हणजे वैभव, समृद्धि, सामर्थ्य हें ब्रिटन-अमेरिकेंतलें समीकरण येथे खरें न ठरतां लोकशाही म्हणजे दुफळी, दुही, अराजक, यादवी, दौर्बल्य हें इतर देशांतलें दुसरें समीकरण येथे खरें ठरणार अशीं अशुभ लक्षणें भारतांत दिसू लागलीं आहेत. येथले संप, येथले गोळीबार, प्रत्येक पक्षांतल्या दुफळ्या, जबडा वासीत चाललेला बेकारीचा ज्वालामुखी, पंजाबी सुभा, नागादेश, द्रवीड कझगम, विदर्भचंडिका या घातक चळवळी आणि चीनचें प्रत्यक्ष आक्रमण हीं दुसऱ्या समीकरणाकडे आपली वेगाने वाटचाल सुरू झाल्याचें आक्रंदून सांगत आहेत. या सगळ्या लक्षणामागे रोग दिसतो तो हा की, येथे लोकशाहीवर कोणाचीच श्रद्धा नाही. निराशा वाटते ती यामुळे.

## लोकशिक्षण

लोकशिक्षण हा लोकशाहीचा पाया आहे, समाजसुधारणेचें तें मूलतत्त्व आहे हें चीन- रशियांतील दण्डधर शास्ते जितकें जाणतात त्याच्या शतांशाने जरी भारताच्या शास्त्यांनी जाणलें असतें तरी येथे लोकशाही पेलणारे 'लोक' निर्माण झाले असते. कांही झालें तरी – म्हणजे लोकसत्ता असली तरी किंवा दण्डसत्ता असली तरी – लोकांची अनुकूलता, जनतेची संमति हेंच शासनाचें खरें सामर्थ्य आहे, तोच सरकारच्या सामर्थ्याचा आत्मा आहे हें चीन-रशियाचे शास्ते निश्चित जाणतात. त्यांच्या सत्ता या अनियंत्रित असल्या तरी त्यांच्या मागे बहुसंख्य जनता कटिबद्ध होऊन निष्ठेने उभी आहे यांत तिळमात्र संदेह नाही. त्यांवांचून जगांतल्या अत्यंत बलाढ्य अशा अमेरिकेसारख्या लोकसत्तेला सहज हेटाळून टाकावें, तिचा वाटेल तो अवमान करावा, आणि तिने तो निमूटपणें सोसावा एवढें अचाट सामर्थ्य रशियाला किंवा चीनला कधीच प्राप्त झालें नसतें. हंगेरीमध्ये रशियाने अक्षरशः

नरमेध केला. त्या वेळीं इटली, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, दक्षिण अमेरिकेंतील अनेक देश येथे सोव्हिएट रशियाच्या द्वेषाची एक प्रचंड लाट उसळली होती. लक्ष लक्ष नागरिकांनी रशियाविरोधी घोषणा करीत मिरवणुकी काढल्या, सभा भरविल्या. या सर्व देशांच्या कोटयवधि नागरिकांनी वर्तमानपत्रांतून, रेडिओवरून रशियावर निर्भर्त्सनेचा, निषेधाचा भडिमार केला; पण रशियाने या सर्व विरोधाला कवडीइतकीहि किंमत दिली नाही. तो ताठरपणेंच उभा राहिला, आणि हे बलाढ्य देश त्याला लवमात्र वाकवूं शकले नाहीत. आजहि रशिया सर्व देशांतल्या प्रतिनिधींच्या सभा अशाच उधळून देतो. त्यांची हेटाळणी करतो. या सर्व देशांना रशियन जनतेंत दुही आहे, रशियन नेत्यांच्या मागे ती उभी नाही अशी नुसती शंका आली असती, तरी त्यांनी जनतेच्या दोन फळयांत पाचर ठोकून रशियांत यादवीचा वणवा निश्चित पेटविला असता. त्यांच्या परराष्ट्रीय धोरणाचें तें तर मुख्य सूत्र आहे; पण त्यांना तसें कांही एक करतां आलेलें नाही. यावरून रशियन जनता तेथील नेत्यांच्या मागे उभी आहे ही वस्तुस्थिति मान्य करण्यावांचून गत्यंतर नाही. हा सर्व तेथील लोकशिक्षणाचा प्रभाव आहे. रशियांत व चीनमध्ये कोणताहि कायदा करण्यापूर्वी जनतेला त्याची उपयुक्तता, आवश्यकता, हितकारकता व महत्त्व पटवून देण्यासाठी विश्वप्रयत्न केले जातात हें प्रसिद्धच आहे. त्याच्या शतांशहि प्रयत्न भारतांत होत नाहीत. श्री. रा. कृ. पाटील, प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी अनेक वेळां अनेक लेखांत, भाषणांत हें कटु सत्य स्पष्ट करून सांगितलें आहे. वास्तविक दण्डसत्तेला लोकांच्या मान्यतेचें, संमतीचें एकपट महत्त्व वाटलें तर लोकसत्तेला तें त्याच्या दसपट वाटावें; पण लोकसंमत शासन हें लोकशाहीचें आद्यमूल्य मुखाने शंभर वेळां उच्चारूनहि कॉंग्रेसचे नेते त्याच्या शिक्षणाची काडीमात्र पर्वा करीत नाहीत. आपल्या समाजविकास योजना, राष्ट्रविकास योजना या जनतेच्या योजना होतच नाहीत. सामान्यजनांना त्या आपल्या आहेत, आपल्यासाठी आहेत असें वाटतच नाही. जनतेची शक्ति त्यांच्यामागे मुळीच उभी नाही हें त्या योजनांचें मूल्यमापन करणाऱ्या बहुतेक सर्व समित्या कंठरवाने सांगत आहेत. समाजविकास योजनेच्या सहाव्या अहवालांत निरीक्षकांनी असें स्वच्छ म्हटलें आहे की, या योजनांचीं सर्व सूत्रें वरून हलत असतात. जनतेला

तिच्याविषयी मुळीच जिव्हाळा नाही, आपलेपणा नाही. वरचे अधिकारी सत्तालोभाने जनतेंतील कार्यकर्त्यांना स्वयंप्रेरणा घेऊं देत नाहीत. खालचे कार्यकर्ते स्वयंचल झाले तर यांचें महत्त्व काय राहिलें! 'प्रोग्रॅम इव्हॅल्युएशन ऑर्गनायझेशन् ऑफ दि प्लॅनिंग कमिशन'—यांच्या अहवालांत म्हटलें आहे की, सेंट्रल बोर्डाचे सभासद प्रत्यक्ष कामाच्या जागीं जाऊन कामाची पाहणी करीतच नाहीत. ते फक्त पायाभरणी, उद्घाटन यासाठी जातात. अधिकारी सभासदांत गटबाजी असते. सर्वांनाच अध्यक्ष व्हावयाचें असतें. त्यामुळे असलेल्या अध्यक्षाशीं कोणी सहकार्यच करीत नाहीत. शिर्डीच्या काँग्रेसच्या सभेंत तर यशवंतराव चव्हाणांनी स्पष्टच सांगितलें की, 'आपण जनतेंत जात नाही, म्हणून पराभूत झालों आहों.' आपल्या योजनेमागे लोकशक्ति उभी नाहीं हें खुद्द केन्द्र सरकारचे समाजविकास मंत्री श्री. एस्. के. डे यांनीच सांगितलें आहे. 'विकासयोजनामध्ये जनतेचें स्वालंबन हें गेल्या सात वर्षांत हळूहळू शून्यापर्यंत आलें आहे' असें ते म्हणाले. (टाइम्स ऑफ इंडिया, दि. ६–८–५९) काँग्रेसच्या अनेक सभांत हें कटु सत्य सांगितलें जातें, तरीहि लोकशिक्षणाची मोहीम काँग्रेसचे लोक काढीत नाहीत याचा अर्थ काय? याचा अर्थ असा की, काँग्रेसची सत्ता ही लोकसत्ता तर नाहीच, पण दण्डसत्ताहि नाही. कारण दण्डसत्ता ही जनशक्ति आपल्या पाठीशीं आणण्यासाठी जिवाचें रान करते. मग काँग्रेस ही कसली सत्ता आहे? ती जुनी सरंजामसत्ता आहे! सरंजामदार धनवैभवविलासाचे फक्त मालक. कुळांनी वर्षभर मरावें आणि धन्यांचे विलास चालविण्याइतकें धन त्यांना द्यावें. या शेती व्यवसायाची देखभालहि सरंजामदार करणार नाहीत. ते फक्त भोगाचे धनी. दण्डसत्तेला असे केवळ भोगधनी होऊन चालणार नाही. ती दुसऱ्या दिवशीं कोसळून पडेल. काँग्रेसला मात्र तें शक्य आहे. कारण तिला लोकशक्ति नकोच आहे. नेमकी हीच टीका काँग्रेसने स्वतःच्या कारभाराचें निरीक्षण करण्यासाठी नेमलेल्या 'दहांच्या समिती'ने काँग्रेसवर केली आहे. समिति म्हणते, "काँग्रेसचे वरिष्ठ अधिकारी हे सामान्य कार्यकर्त्यांशीं सरंजामदारासारखे वागतात. त्यांच्यांत समान भूमिकेवरून चर्चा होणें अशक्य झालें आहे. खुलास चर्चा वरिष्ठांना नकोच आहे. मतांचा संघर्ष टळावा म्हणून कित्येक प्रदेशांत वार्षिक सभा घेण्याचें सुद्धा टाळतात. सध्या काँग्रेसमध्ये

सत्ता हेंच प्राप्तव्य आहे. सेवा हें नाही. काँग्रेस ही सेवासंस्था राहिलेलीच नाही. जनतेला शिकवून जवळ केलें नाही, तिचें सहकार्य मिळविलें नाही तर सर्व व्यर्थ आहे; पण काँग्रेससंघटनेंतील श्रेष्ठींना या कार्याच्या महतीची जाणीवसुद्धा नाही. या संघटनेंतील कार्यकारिणीच्या सभासदांमध्ये अंतिम उद्दिष्टाविषयी तळमळ अशी नाहीच. सर्व अनर्थाच्या बुडाशीं हें कारण आहे. काँग्रेसजनांतील ध्येयनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा कमजोर होत चालली आहे. त्यामुळे जातीयतेचीं व इतर विषें पसरत आहेत व त्यामुळे ऐक्याचा भंग होऊन दुही, दुफळी सर्वत्र माजली आहे. काँग्रेसमध्ये शिस्त नाही, नीतीची कांही इष्ट पातळीहि नाही. ती एक म्हातारी संस्था झाली असून तेथे तरुण नेतृत्व निर्माण करण्याचे कसलेहि प्रयत्न केले जात नाहीत." (टेन मेंबर कमिटी ऑफ दि काँग्रेस पार्लमेंटरी पार्टी -अहवाल – सारार्थाने– टाइम्स : २७–११-५९) विदर्भामध्ये कुळकायदा १९५८ अखेर लागू झाला. त्यानंतर त्याचें फलित शेतकऱ्याला काय मिळालें याविषयी प्रा. ठाकुरदास बंग यांनी माहिती दिली आहे. मालगुजारी नष्ट होणार म्हणून जमीनदार जागे झाले. त्यांनी वाटेल तो प्रचार केला. कुळांची दिशाभूल केली. कायद्याचे वाटेल ते अर्थ सांगितले आणि लाखो कुळांकडून जमिनीच्या हक्कासंबंधीचे राजीनामे लिहून घेतले. रोज शेकड्याने राजीनामे येऊं लागले, तेव्हा येथे कांही घोटाळा असावा असें सरकारच्या ध्यानीं आलें. मग त्याने काय उपाययोजना केली? जनता-जागृति? छे छे! तें काँग्रेसचें कार्य नाहीच. सरकारने तहसीलदार, कलेक्टर यांना कडक पत्रें लिहिलीं की, कायद्याची अंमलबजावणी योग्य केली पाहिजे, पण ती होतच होती. मालगुजार कुळाकडून सर्व कायदेशीरच करून घेत होते आणि त्याची अंमलबजावणी कमिशनर, कलेक्टर उत्तम करीत होते. गरज होती ती याच्या पलीकडे जाऊन जनतेला कायद्याचें स्वरूप समजावून देण्याची, तिला सावध करण्याची व तिची फसवणूक होऊं नये म्हणून सतत तिच्या जवळ राहण्याची. पण जवळ जवळ २०–२५ लाख एकरांचा ताबा कुळांनी आपण होऊन अज्ञानाने सोडून दिला त्याअर्थी तिला कायद्याचें स्वरूप समजावून देण्याची कसलीहि व्यवस्था कायदा करणाऱ्यांनी केली नव्हती हें स्पष्ट आहे. चीनमध्ये, रशियामध्ये कायदा करण्याच्या आधी वर्षभर त्याचा प्रचार केला जातो. भारतांत

नंतरसुद्धा तो होत नाहीं. यावरून जनशक्तीची आराधना करण्याचें महत्त्व जास्त कोणाला वाटतें, लोकसत्तेला कीं दण्डसत्तेला, हें सहज ध्यानांत येईल.

लोकशक्ति आपल्यामागे उभी करण्यासाठी जें लोकशिक्षण करावयाचें त्याची काँग्रेसजनांना व नेत्यांना किती आस्था आहे तें यावरून स्पष्ट होईल. मागे अनेक ठिकाणीं याचे काँग्रेस-नेत्यांच्या मुखीचेच पुरावे दिले आहेत. या सर्वावरून जनतेवरील श्रद्धा हें लोकशाहीचें आद्यतत्त्वच भारतांतून कसें नष्ट झालें आहे तें दिसून येईल. अशा स्थितींत दण्डसत्तेचें आव्हान स्वीकाण्याइतकी येथे लोकशाही यशस्वी होईल अशी आशा धरण्यांत काय अर्थ आहे ?

## काँग्रेसची निवडणूक-निष्ठा

लोकशाही हा अत्यंत श्रेष्ठ धर्म होय. तो आचरणांत आणणें हें फार कठीण कर्म आहे. या राज्यपद्धतींत जे लोक निवडून येतात त्यांच्या हातीं सत्ता आली की, सर्व सुखें त्यांना वश होतात, आणि मग ती सत्ता हातून जाऊं नये म्हणून वाटेल तीं पापें ते आचरूं लागतात. निवडून येणें व सत्ता काबीज करणें एवढेंच त्यांचें ध्येय बनतें. असें ज्या देशांत होतें तेथे लोकसत्ता कधीहि यशस्वी होणें शक्य नाही. ब्रिटनमध्ये लोकसत्ता यशस्वी झाली त्याचें कारण असें की, तेथील शास्ते हे फार निःस्पृह, कर्तव्यदक्ष आणि लोभमोहातीत असे बह्वंशीं असतात आणि तसे ते नसले, ते लोभवश झाले तर त्यांना तत्काळ पदच्युत करण्याचें सामर्थ्य तेथील जनतेंत आहे. भारतांत या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. असें एक पाप नाही की, जें काँग्रेसचे व इतर पक्षांचे लोक सत्तालोभाने आचरीत नाहीत. खोटे सभासद नोंदविणें, काँग्रेसच्या किंवा पक्षाच्या तत्त्वावर ज्यांची निष्ठा नाही त्यांना केवळ ते लखपती आहेत म्हणून तिकिटें देणें, निवडणुकांत यश यावें म्हणून जातीयवादाला आवाहन करणें, व्यापारी, काळा बाजारवाले, करचुकवे यांना संभाळून घेणें, आपल्या परिजनांचीं पापें झाकण्यासाठी न्याय, कायदा यांची वाटेल ती विटंबना करणें, अशीं अनंत प्रकारचीं पापें आजचे सत्ताधारी प्रत्यहीं आचरीत आहेत. अशा स्थितींत येथे लोकशाही यशस्वी कशी होणार ? आणि ज्यांनी सर्व हयात महात्माजींच्या सहवासांत घालविली असे नेतेच

निवडणूकनिष्ठ, सत्तालोभी झाल्यावर हिंदुस्थान लोकशाहीला लायक आहे काय अशी शंका मनांत कां येऊं नये? काँग्रेसमध्ये हीं सर्व पापें आचरलीं जात आहेत हें प्रमुख काँग्रेसजनांनीच १९६० च्या जूनमध्ये झालेल्या पुण्याच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकींत दाखवून दिलें आहे. या बैठकींत शामनंदन मिश्र, माणेकलाल वर्मा, हनुमंतय्या यांनी पंडित नेहरू, गोविंदवल्लभ पंत, संजीव रेड्डी, ढेबरभाई इत्यादि काँग्रेसश्रेष्ठींना अत्यंत कडवट शब्दांत आपली टीका ऐकविली. या टीकेचे शब्द अत्यंत जहरी आणि विषारी असे होते, आणि ते या श्रेष्ठींच्या शिष्यवरांनीच वापरले होते. काँग्रेसची सत्ता ही श्रेष्ठींची मिरास झाली आहे. आपलें आसन ढळूं नये म्हणून ते तरुणांना पुढे येऊं देत नाहीत. महात्माजींची ही संस्था भ्रष्ट झाली आहे. धर्म व सत्य यांचा तिच्यांतून लोप झाला आहे. तरी कार्यकारिणी या प्रकारांकडे लक्ष देत नाही; काँग्रेसच्या तत्त्वांवर विश्वास नसलेल्या लखपतींना कांग्रेस तिकिटें देते. ही काँग्रेस समाजवादी कशी ठरते? कांग्रेस संघटनेला बलिष्ठ करील असा कोणताहि कार्यक्रम श्रेष्ठींच्या (हायकमांडच्या) जवळ नाहीं. काँग्रेसचे कार्यकर्ते खेडयांत जातात ते फक्त मतयाचनेसाठी आणि तेथे जाऊन ते एकमेकांविरुद्ध वाटेल ते आरोप करतात. ही काँग्रेसची शिस्त ! शामनंदन मिश्र तर म्हणाले की, '' काँग्रेस वर्किंग कमिटीचीच काँग्रेस तत्त्वांवर श्रद्धा नाही.'' गोविंदवल्लभ पंतांची, 'ते इतक्या म्हातारपणीं खूप काम करतात म्हणून,' नेहरूंनी प्रशंसा केली. तेव्हा हनुमंतय्या म्हणाले, ''त्यांना इतकें काम करायला कोणीं सांगितलें आहे ? तरुणांना संधि द्यायची नाही म्हणून ते जागा अडवून बसले आहेत. वास्तविक त्यांचें काम करण्यास समर्थ असे अनेक तरुण लोक आहेत; पण आपण व आपला परिवार यांच्या हातीं सत्तासूत्रें कायम ठेवावीं हाच श्रेष्ठींचा हेतु असल्यामुळे नेत्यांची दुसरी पिढी ते निर्माण होऊंच देत नाहीत.'' असा भडिमार पुण्याच्या सभेंत सारखा चालला होता.

बंगलोरला भाषण करतांना (२७-७-६०) काँग्रेसचे अध्यक्ष संजीव रेड्डी यांनी जनतेविरुद्ध एक तक्रार केली. ते म्हणाले, ''सध्या लोक असेंच धरून चालतात की, प्रत्येक काँग्रेसजन हा लुच्चा असलाच पाहिजे!'' हें सांगून ते रागाने म्हणाले की, ''आम्ही इतके दिवस जी देशसेवा केली त्याचें हें प्रशस्तिपत्र कीं

काय? '' श्री. संजीव रेड्डी यांचा गैरसमज झालेला दिसतो. काँग्रेसने सेवा केली तिचें हें प्रशस्तिपत्र नव्हे. अखिल भारतभर प्रत्येक प्रदेशांत व लोकसभेंत भारतीय जनतेने काँग्रेसच्या हातीं विश्वासाने सत्ता दिली हें सेवेचें प्रशस्तिपत्र आहे आणि प्रत्येक काँग्रेसजन हा लुच्चा, अप्रामाणिक असलाच पाहिजे, असा जो लोकांत समज पसरला आहे तो म्हणजे जर प्रशस्तिपत्र असेल तर तें सत्ता प्राप्त झाल्यानंतरच्या कार्याबद्दलचें आहे. वर दाखविल्याप्रमाणें काँग्रेसजनांतील अनेक कार्यकर्त्यांनीहि तसलेंच प्रशस्तिपत्र दिलें आहे. न्याय आणि कायदा यांची प्रतिष्ठा राखणें हें काँग्रेसला आता झेपेनासें झालें आहे, हें त्याचेंच लक्षण होय. म्हैसूर प्रदेश राज्याचे माजी मुख्य मंत्री निजलिंगप्पा धारवाड जिल्हा काँग्रेस कार्यकर्त्यांपुढे बोलतांना म्हणाले की, "काँग्रेसमध्ये उच्च ध्येयाची सध्या थट्टा चालू आहे. सर्वोदयाच्या नांवाखाली कित्येक काँग्रेसजनांनी पैसा केला आहे, त्याची माहिती मला आहे. '' यावर प्रश्न असा येतो की, या गुन्हेगारांना शिक्षा करण्याची कोणती तजवीज निजलिंगप्पांनी केली ? लोभी, स्वार्थी, सत्तास्पर्धी लोकांचा प्रत्येक प्रदेशांत काँग्रेसमध्ये गट तयार होतो. अनेक गट होतात. तसा त्यागी, ध्येयवादी, निःस्पृह, न्यायाची प्रतिष्ठा ठेवण्यासाठी प्राणार्पणाला सिद्ध असलेला काँग्रेसजनांचा गट कां होत नाही? इंग्रज सरकारशीं लढा देणारे ते काँग्रेसजन स्वातंत्र्यानंतर कोठे गेले? शिर्डीच्या काँग्रेसच्या सभेंत श्री. ठाकोरभाई यांनी निजलिंगप्पांप्रमाणेच तक्रार केली आहे. "काँग्रेसजन सरकारवर दडपण आणतात आणि आपलीं कामें करून घेतात. गुंड, दारूबाज यांच्या वतीनेहि ते दडपण आणतात" असें ते म्हणाले. पुण्याच्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीचा वृत्तान्त वर दिलाच आहे. न्याय, कायदा, सत्य, नीति यांची काँग्रेसला कदर नाही, असा आरोप काँग्रेसजनांनीच तेथे केला. भागवत आझाद यांनी फारच प्रखर टीका या वेळीं केली. एका काँग्रेसवाल्याला भ्रष्टाचारासाठी पक्षांतून हाकललें होतें, पण कोणाच्या तरी वशिल्याने त्याला परत घेण्यांत आलें आणि मंत्रिपदहि देण्यांत आलें, हें उदाहरण त्यांनी दिलें. श्री. चिंतामणराव देशमुखांनी भ्रष्ट काँग्रेसश्रेष्ठी, मंत्री व अधिकारी यांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र न्यायासन निर्मावें अशी सूचना केली तेव्हा पंडित नेहरूंनी त्यांना ' अशीं प्रकरणें माझ्याकडे द्या ' असें सांगितलें, पण

भागवत आझाद म्हणाले की, "भ्रष्टाचार कसा चालला आहे हें काँग्रेस-श्रेष्ठींना पूर्ण माहीत आहे. तरी चौकशीला त्यांचा विरोध आहे."

जगांतलें एक दारुण दुःख असें आहे की, येथे दुष्ट शक्ति या नेहमी चटकन् संघटित होतात; पण सात्त्विक शक्ति, कल्याण शक्ति मात्र तशा होत नाहीत. शुभशक्ति जेथे संघटित होतात तेथेच लोकशाही समर्थ होऊं शकतें. अन्यत्र नाही. गेलीं दहा वर्षें काँग्रेसमधल्या प्रमुख कार्यकर्त्यांनी काँग्रेसवर जी कडक टीका केली आहे ती पाहून हा विचार मनांत येतो की, भारताची हीच शोकान्तिका आहे. काँग्रेसमधल्या शुभशक्ति दुबळ्या आहेत, असंघटित आहेत. त्या नुसत्या दीन, आर्त क्रंदन करीत आहेत. त्या संघटित होऊन अन्यायाचा प्रतिकार करूं शकत नाहीत. पुण्याच्या बैठकींत के. के. शहा यांनी हेंच कटु सत्य सांगितलें. ते म्हणाले, "काँग्रेसचे सामान्य पाईक हे सत्य सांगण्यास भितात. काँग्रेसच्या प्रतिनिधींनाहि टीका करण्याची भीति वाटते. श्रेष्ठी शिक्षा करतील ही भीति सदैव त्यांच्या मनांत असते." याचा अर्थ फारच वाईट आहे. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या तोंडावर टीका करणारे काँग्रेसजन आज काँग्रेसश्रेष्ठींवर टीका करण्यास भितात! लोकशाहीच्या दृष्टीने विचार केला तर जे भितात ते आणि ज्यांची भीति वाटते ते दोघेहि लोकशाही पेलण्यास सारखेच असमर्थ आहेत. दोघांचींहि लक्षणें सरंजामशाहीचीं आहेत. काँग्रेसने नेमलेल्या 'दहांच्या समिती' ने हेंच म्हटलें आहे. फ्यूडल रिलेशनशिप, असाच शब्द तिने वापरला आहे.

काँग्रेसचे सामान्य पाईक आणि कार्यकर्ते श्रेष्ठींच्यापुढे नांगी टाकतात त्याचप्रमाणे निवडणूकनिष्ठेमुळे काँग्रेसश्रेष्ठी हे व्यापारी, काळाबाजारवाले यांच्यापुढे नांगी टाकतात. त्यागी कमिटीने हें स्पष्ट केलें आहे. 'दि डायरेक्ट टॅक्सेस ॲडमिनिस्ट्रेशन इन्क्वायरी कमिटी' असें हिचें नांव आहे. तिचें म्हणणें असें की, करखातें कायद्याची कडक अंमलबजावणी करीत नाही. त्यामुळे करचुकव्या लोकांची संख्या वाढत आहे. इंग्लंडमध्ये दरसाल एक दोन करचुकव्यांना व त्यांना साह्य करणाऱ्या हिशेबनिसांना तुरुंगांत पाठविलें जातें. पण करखात्याने १९४७ पासून (म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीपासून) एकाहि माणसावर खटला भरला नाही. हें सांगून कमिटी सरकारला उपदेश करते की, 'कायद्याची कडक अंमलबजावणी करावी,' पण सरकारने प्रामाणिकपणें

असें अनेक वेळां जाहीर केलें आहे की, आम्हांला हें शक्य नाही. इन्कमटॅक्स भरणारे लोक दरसाल जवळ जवळ २०० कोटी रुपयांचा कर चुकवितात, पण त्यांना वठणीवर आणणें सरकारला शक्य नाही. 'स्टेट ट्रेडिंग'या योजनेचा व्यापाऱ्यांनी विचका करून टाकला, पण त्यांना शासन करणें सरकारला शक्य नाही. काळाबाजारवाल्यांपुढे सरकार शरण आहे ही रोजच्या अनुभवाची गोष्ट आहे. 'इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स' या संस्थेच्या तेराव्या अधिवेशनांत भाषण करतांना प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी म्हटलें आहे की, "सरकारचें भावविषयक धोरण गिऱ्हाईक व उत्पादक यांचें नुकसान करून व्यापारी दलालांचा फायदा करून देणारें आहे." कॉंग्रेस-श्रेष्ठींची त्यांच्या अनुयायांना मोठी दहशत वाटत असली तरी ते श्रेष्ठी त्यांचे जे धनवाले श्रेष्ठी त्यांच्यापुढे गोगलगाईसारखे असतात. अगदी दीन दुबळे असे होतात. लोकसत्ताक राज्य चालविणारांचीं हीं लक्षणें नव्हेत. दण्डसत्ताधारांचीं तर मुळीच नव्हेत. हीं लक्षणें सरंजामदारांचीं आहेत. सरंजामदारी पद्धतींत वरपासून खालपर्यंत कायदा आणि न्याय यांची अप्रतिष्ठा होत असते. जनतेचा तेथे सारखा उपमर्द होत असतो. तिच्या कल्याणाची चिंता सरंजामदारांना कधीच नसते.

## भारतापुढील समस्या

लोकशाही पद्धतीने भारताचा उत्कर्ष साधेल का, या प्रश्नाचा विचार करतांना भारताला कोणत्या समस्या सोडवावयाच्या आहेत, केवढाले डोंगर इकडून तिकडे न्यावयाचे आहेत, आणि हीं कार्यें साधणारे भारताचे नागरिक कसे आहेत, याचा हिशेब भारताच्या नागरिकांनी अवश्य करून पाहावा. लोकशाहीमध्ये अन्न, वस्त्र, घर व शिक्षण हें प्रत्येक नागरिकाला पुरविण्याची जबाबदारी शासनाला शिरावर घ्यावी लागते. यासाठी आजच्यापेक्षा शतपट, सहस्रपट धन निर्माण केलें पाहिजे. ही धननिर्मिति अजूनपर्यंत कोणत्याहि देशाने लोकशाही पद्धतीने केलेली नाही. ब्रिटनमध्ये काय झालें तें मागे सांगितलेंच आहे. आधी औद्योगिक क्रान्ति, त्यांतून धननिर्मिति, त्यांतून साम्राज्य, त्यांतून अमाप धनाचा लाभ आणि मग लोकशाहीचा पूर्ण विकास असें तेथे घडलें. म्हणजे धननिर्मितीच्या काळांत तेथे अत्यंत मर्यादित

अशी लोकशाही होती. रशिया व चीन हा प्रश्न कसा सोडवीत आहेत तें आपण पाहातच आहों. व्यक्तिस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य हीं आम्हांला सध्याच्या काळांत परवडणार नाहीत, असें त्यांनी जाहीरच करून टाकलें आहे. शेतकरी व कामकरी, यांच्याकडून पंधरा-सोळा तास काम तेथे सक्तीने करून घेतात. त्यांना संप करण्याचें, मोर्चे काढण्याचें, हरताळ पाडण्याचें, राजीनामा देण्याचें कसलेंहि स्वातंत्र्य नाही. इतरहि क्षेत्रांत लोकशाहीच्या कोणत्याहि तत्त्वाचा त्या दण्डसत्ता अवलंब करीत नाहीत. भारताने मात्र लोकसत्तेच्या तत्त्वांना धक्का न लावतां अवश्य ती धननिर्मिति करण्याची प्रतिज्ञा केली आहे. ती पुरी करण्याचें सामर्थ्य आपल्या ठायीं आहे काय?

सध्याच आपल्याला करांचें ओझें असह्य झालें आहे आणि तशांत तिसऱ्या योजनेसाठी करवाढ व्हावयाची आहे. समृद्धि हवी तर आजच्या पिढीने त्याग केलाच पाहिजे असें आपले नेते आपल्याला सांगत आहेत. ही करवाढ सर्वसामान्य जनतेनेच सोसावयाची आहे हें उघड आहे. कराचे दोन प्रकार असतात. एक प्रत्यक्ष कर व एक अप्रत्यक्ष कर. यांपैकी प्रत्यक्ष कर हा श्रीमंतांवर बसतो आणि अप्रत्यक्ष कर हा गरिबांना भरावा लागतो. आपल्या भारत सरकारचा १९६० सालचा अर्थसंकल्प पाहिला तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी जमा करावयाची रक्कम अप्रत्यक्ष कराच्या रूपानेच मिळवावी असा सरकारचा निर्धार असल्याचें स्पष्ट दिसतें. 'हा अर्थसंकल्प बलिष्ठांना, श्रीमंतांना भिणारा व दुर्बलांना, गरिबांना घातक आहे,' असें त्याचें वर्णन श्री. ए. डी. गोरवाला यांनी केलें आहे (केसरी, २७ मार्च १९६०). सरकारच्या या धोरणावर मागे अनेक वेळां टीका झालेली आहे. आताचा आपला प्रश्न असा आहे की, लोकशाही पद्धतीने ही करवाढ करणें भारताला शक्य आहे काय? यांतून जे संप, दंगली, दरोडेखोरी, लूटमार, जाळपोळ हे प्रकार उद्भवतील त्याला रोज गोळीबार केल्यावांचून आळा बसणें शक्य आहे काय? आणि यापुढे गोळीबार करून तरी तें शक्य होईल काय? त्यापेक्षा चीन-रशियाचा मार्ग जास्त शहाणपणाचा ठरणार नाही काय? भारताच्या मार्गाने विध्वंस, धनहानि, उत्पादनांत घट टळत नाही. ती दण्डसत्तेच्या मार्गाने टळते. करवाढींतून भाववाढ येते व भाववाढींतून

बेकारीचा प्रश्न उद्भवतो. पहिल्या व दुसऱ्या योजनेंतून जेवढ्या लोकांना रोजगारी देण्याचा संकल्प होता तेवढ्यांना देतां आली नाही हें मागे एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. आता शास्त्रज्ञ असें सांगत आहेत की, तिसऱ्या योजनेच्या प्रारंभींच बेकारांची संख्या एक कोटीच्या आसपास जाईल, आणि ती पुढे वाढतच जाईल. त्यांत पुन्हा वाढत्या लोकसंख्येमुळे भर पडणार. शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे की, १९८१ च्या सुमारास भारताची लोकसंख्या अडुसष्ट कोटींच्या घरांत जाईल. आपल्या औद्योगिक व शेतीच्या धनांत कितीहि वाढ झाली तरी एवढ्या लोकसंख्येला पोसण्याचें सामर्थ्य तिच्यांतून निर्माण होईल हें कालत्रयीं शक्य नाही; पण लोकशाही म्हटली की, एवढ्यांना अन्न, वस्त्र, घर व शिक्षण पुरविलेंच पाहिजे. तें शक्य आहे काय? कृष्ण मेनन व मुरारजीभाई यांनी केलेला त्यागाचा उपदेश कार्यक्षम ठरेल काय?

हिंदुस्थानांतील शेतीविकासाची पाहणी करण्यासाठी यूनोतर्फे एक तज्ज्ञ मंडळ भारतांत येऊन गेलें. प्रा. रेने ड्युमां हे जागतिक कीर्तीचे शेतीतज्ज्ञ या मंडळाचे सभासद होते. त्यांनी भारताच्या शेतीविषयी फ्रान्समधील मासिकांत लेख लिहून आपला अभिप्राय प्रकट केला आहे. लोकशाही मार्गाने भारताचा उत्कर्ष साधूं इच्छिणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांनी त्याचा जरूर अभ्यास करावा. ते म्हणतात, "भारतांत शेतीमालाचें उत्पन्न एक टक्क्याने वाढतें, पण लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण त्याच्या दुप्पट आहे. गेल्या दहा वर्षांत भारताला कित्येक लक्ष टन धान्य आयात करावें लागलें. उलट १९५३ ते५७ या काळांत चीनने कांही लक्ष टनांची निर्यात केली. हिंदुस्थानांत दरसाल दुधाचें उत्पन्नहि घटतच चाललें आहे. चिनी शेतकरी भारतीय शेतकऱ्यांपेक्षा अधिक वाकबगार आहे. त्याला सधन शेतीचें ज्ञान आहे आणि मिश्र खतांचा वापर तो अनेक वर्षें करीत आहे. आज जमीन-मालकाला शेतींत जास्तींत जास्त भांडवल गुंतवण्यास प्रोत्साहन देणें हें उत्पादन-वाढीच्या दृष्टीने अवश्य आहे. जमिनीची कमाल मर्यादा ठरविण्याचा जो उद्योग आज चालू आहे त्याने उत्पादन-वाढीचा उद्देश सफल होण्याची फारशी आशा नाही. उत्पादन-वाढीच्या दृष्टीने पाहतां सरकारने गौरवास्पद असें कांहीहि केलेलें नाही. उत्पादन-वाढीपेक्षा भव्य योजना आखण्याकडेच

सरकारी यंत्रणेचा कल असल्याचें दिसून येतें. पाणी इतकें महाग आहे की, शेतकऱ्याला तें परवडत नाही. त्यामुळे कालव्याच्या पाण्यावर ज्या प्रमाणांत पिकें घ्यावयास हवींत त्या प्रमाणांत घेतलीं जात नाहीत. पश्चिम बंगाल-मध्ये व इतरत्रहि अवघ्या १४ टक्के जमिनींतून दोन पिकें घेतलीं जातात. चीनपेक्षा हिंदुस्थानची जमीन जास्त चांगली आहे. तीन पिकें घेण्याला अधिक लायक आहे. तरी चिनी शेतकरी कालव्याच्या पाण्यावर जास्त पिकें काढतो. चीनची पाणीपुरवठ्याची जास्त व्यवहार्य योजना आणि पन्नास कोटी चिनी जनतेचे कष्ट, ही चीनच्या यशाची गुरुकिल्ली आहे. हिंदुस्थानांतल्या श्रमदानाचा गवगवा आम्हीं फार ऐकला होता, पण प्रत्यक्ष श्रमदान असें कोठे पाहावयास मिळालेंच नाही. याचा अर्थ असा की, भारतांत शेती उत्पादन कमी आहे, याचें कारण निसर्ग हें नसून तेथला मानव हेंच आहे. येथे कोणी कष्टच करीत नाहीत."

आपल्या एकंदर योजनांचें अपयश यांतच आहे. येथे कोणी कष्ट करण्यास तयार नाही. अशा स्थितींत शेतकऱ्यापासून अधिकाऱ्यापर्यंत प्रत्येकाकडून पंधरा-सोळा तास — निदान आठ-दहा तास कष्ट करून घेणें लोकशाही मार्गानें आपल्याला शक्य आहे काय याचा विचार आपण केला पाहिजे. इतके कष्ट केल्यावांचून येथे समृद्धि निर्माण होणें शक्य नाही, आणि समृद्धि नाही म्हणजे लोकशाही नाही. तरीहि अशा स्थितींत लोकशाही चालविण्याचा अट्टाहास आपण धरला तर लोकशाहीचा दंगली, अराजक, संप, यादवी, दुफळी, लूटमार, विध्वंस हाच अर्थ भारतांत निश्चित होईल.

## ईश्वरी अंशाला आवाहन

प्रत्येक मानवामध्ये ईश्वरी अंश असतो आणि त्याला आवाहन केलें की, मनुष्य वाटेल त्या उदात्त कार्यास प्रवृत्त होतो अशी श्रद्धा ज्यांच्या मनांत आहे ते लोक दण्डसत्ता कधीच मान्य करणार नाहीत. त्यांना तें भयंकर पापच वाटणार. त्यांना जपान, जर्मनी येथील किंवा शंभर वर्षांपूर्वीची ब्रिटनमधील मर्यादित लोकसत्ताहि मान्य होणार नाही. इतकेंच नव्हे तर पूर्ण परिणत अशी लोकसत्ताहि त्यांच्या कक्षेंत बसत नाही, असें ते म्हणतात.

शासनमुक्त समाज हेंच त्यांचें ध्येय आहे, आणि भारतांत आध्यात्मिक भावना पाश्चात्त्य देशांपेक्षा जास्त प्रभावी असल्यामुळे येथे मानवांतील ईश्वरी अंशाला आवाहन करून भारताचा उत्कर्ष करून घेतां येईल अशी या लोकांची श्रद्धा आहे. भूदान आंदोलनाचे अध्वर्यु आचार्य विनोबा भावे यांनी हा प्रयोग गेलीं दहा वर्षें चालविला आहे. या आंदोलनाने भारतांत सर्व प्रकारची क्रान्ति होईल व भारत हा जगाला आदर्श असा देश होईल अशी विनोबांची व एकंदर भूदान-कार्यकर्त्यांची श्रद्धा आहे. भारताच्या लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने गेल्या नऊ दहा वर्षांत या आंदोलनाच्या पुरस्कर्त्यांनी जें कार्य केलें त्याचें परीक्षण करणें अवश्य आहे. आज आपल्यापुढे हीच मूलभूत समस्या आहे. हृदयपरिवर्तनाच्या मार्गाने मानवांतील ईश्वरी अंशाला केलेल्या आवाहनाने भारतांतील जनतेमध्ये त्याग, संयम, राष्ट्रहितबुद्धि, विवेकशीलता, अविरत कष्टांची हौस हे गुण जर निर्माण होणार असतील तर येथे लोकशाही यशस्वी होईल कीं नाही ही शंका घेण्याचें मुळीच कारण नाही. वर भारताच्या जीवनांतील सर्व क्षेत्रांची जी आपण पाहणी केली तिच्यावरून हे गुण त्या मार्गाने येथे निर्माण होतील अशी आशा दिसत नाही. म्हणून या भूदानमार्गांत त्या आशेला कांही जागा आहे का हें पाहणें अगत्याचें आहे.

या दृष्टीने पाहतां येथेहि संपूर्ण निराशाच आहे. १९५१ सालीं ही चळवळ सुरू झाली आणि १९५९ सालीं विनोबांनी पंजाबची यात्रा पुरी केली. त्या यात्रेच्या शेवटीं पंजाबांत कार्यकर्ते मुळीच मिळत नाहीत म्हणून विनोबांनी अश्रु ढाळले. यात्रेची असली अखेरी ही कांही शुभसूचक नाही. १९५७ पर्यंत ५ कोटी एकर जमीन मिळवावयाची आणि तिची योग्य वाटणी करून भारतांतील आर्थिक विषमता नष्ट करावयाची हा विनोबाजींचा संकल्प होता. पण आतापर्यंत एकंदर ४२ लक्ष एकरच जमीन मिळाली आहे. हें कार्यहि कांही थोडें नाही. पण या जमिनीचें योग्य वितरण होऊन, विनोबांना इष्ट तीं ग्रामराज्यें स्थापन होऊन, या ४२ लक्षांतून इतर जमिनींच्या मानाने कांही विशेष उत्पन्न झालें असतें, या पद्धतीने वितरण केलें असतां भारताचा अन्नधान्याचा प्रश्न कांही अंशीं जरी सुटला असता तरी या आंदोलनांतून कांही आशा निर्माण झाली असती. पण दुर्दैव

असें की, भूदान कार्यकर्त्यांचा तसा दृष्टिकोणच नाही. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्यासारखे कांही कार्यकर्ते अट्टाहासाने तेंच आमचें उद्दिष्ट आहे असें सांगतात. पण या एकंदर आंदोलनाची बैठक आध्यात्मिक आहे. भूदान-कार्यकर्त्यांना अहिंसक ग्रामराज्य स्थापन करावयाचें आहे. प्रत्येक ग्रामराज्य स्वयंपूर्ण करावयाचें आहे, आणि शेवटीं शासनमुक्त समाज निर्मावयाचा आहे. त्यामुळे जमीन मिळतांच तिचें प्रथम वाटप करणें आणि जास्तींत जास्त उत्पादनवाढ हें उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून सर्व प्रयत्न करणें हें त्यांच्या हिशेबांत बसत नाही. मानवाच्या गरजा कमी करणें आणि त्याचा आध्यात्मिक विकास करणें यांकडे आंदोलनाचें लक्ष जास्त आहे. दुर्दैव असें की, उत्पादनवाढींत एकपट अपयश आलें असलें तर मानवांतील ईश्वर जागृत करण्यांत आंदोलनाला दसपट अपयश आलें आहे. कोरापूट जिह्यांतील भूदानाचें कार्य म्हणजे या आध्यात्मिक विकासाची दु:खद कहाणी आहे. तेथे आदिवासींच्या हृदयांतला परमेश्वर जागा होणें दूरच राहिलें, पण कार्यकर्त्यांच्या चित्तांतच मुळांत परमेश्वरी अंश आहे कीं नाही याची शंका निर्माण व्हावी अशी स्थिति झाली. या कार्यकर्त्यांपुढे निश्चित उद्दिष्ट नव्हतें. त्यामुळे सारखीं उद्दिष्टें बदलत व त्यामुळे गोंधळ होई. यांतूनच अनेक भिन्न मतप्रवाह निर्माण होऊन ग्रामराज्यें संघटित करण्यास गेलेल्या या कार्यकर्त्यांतच संघटितपणा राहूं शकला नाही. 'ग्रामदान'च्या फेब्रुवारी १९५८ च्या अंकांत श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे म्हणतात, "बाहेरील जनतेचें सहकार्य मिळविण्याचा आम्हीं कांहीच प्रयत्न केला नाही, ही फार मोठी चूक झाली. सरकारी नोकर व कॉंग्रेस कार्यकर्ते हे निकृष्ट आहेत आणि आपण मात्र एका मोठ्या आंदोलनाचे प्रवर्तक आहोंत असा अहंभाव आमच्या ठायीं होता. जनतेशीं घनिष्ठ संबंध मीं निर्माण केले नाहीत हा सर्वांत मोठा प्रमाद झाला. विपुल आर्थिक मदंत मिळाल्यामुळे आपलीं मनें भ्रष्ट झालीं. कार्यकर्त्यांत एकात्मता नाही, संघटनेविषयी आस्था नाही, निश्चित ध्येयाची कल्पना नाही. विकासकार्याविषयी बहुतेकांना पूर्ण अज्ञान होतें, पण हा दोष घालविण्याचा प्रयत्नहि कोणीं केला नाही." हें झालें कार्यकर्त्यांचें चारित्र्य. आदिवासींचें तर कांही विचारावयासच नको. अगदी जंगलांत निसर्गाच्या सान्निध्यांत राहणारे लोक सत्त्वशील, निरागस, पुण्यवान्,

निष्पाप असे असतात हा भ्रम कायमचा मनांत बाळगणें हें गांधीवाद व सर्वोदय यांचें एक प्रधान लक्षण आहे. कोरापुटने तो भ्रमाचा भोपळा फोडून टाकला. येथील आदिवासी लोकांत सर्व प्रकारचीं व्यसनें आहेत, जमिनीवरून होणारीं भांडणें आहेत, उच्चनीचता आहे, हेवेदावे आहेत, सत्तेचा, पुढारीपणाचा आणि धनदौलतीचा लोभ आहे. तेथे कार्यकर्ते जमिनीचें वाटप करण्यास गेले तेव्हा त्यांना अतिशय विषम वाटप करावें लागलें, कारण त्या आदिवासींमधले नायक, त्यांच्यांतले श्रेष्ठी यांनी तसा बनाव जमवूनच आणला. त्यांनी गटबाजी केली आणि लोकांकडूनच विषम वाटपाला मान्यता मिळविली. वाटपाच्या वेळीं समाईक म्हणून दहा टक्के जमीन ठेवावी अशी योजना होती, पण प्रत्यक्षांत दोन टक्के जमीनच ठेवतां आली, आणि तिच्या कसणुकीकडे कोणीच लक्ष देत नाही. कारण ती समाईक ! म्हणजे वैयक्तिक भावना, स्वामित्वभाव हा तेथे इतरांप्रमाणेच आहे. एक दोन वर्षांनी तर केलेलें भूदान आणि ग्रामदान रद्द करून घेण्याची आदिवासी लोकांत अहमहमिका लागली. यावरून हें स्पष्ट आहे कीं, कोरापूटमध्ये कसलेंहि हृदय-परिवर्तन झालेलें नाही, मानवांतील परमेश्वरी अंश जागा झाला नाही, आणि अहिंसक जनशक्ति निर्माण झाली नाही. सर्वोदय संमेलन भरलें म्हणजे तेथे ज्या गांवांची विशेष प्रगति झाली असेल तेथल्या रम्य वार्ता तपशिलाने सांगण्यांत येतात. खानदेशांतील अक्राणी महाल व अक्कलकुवा तालुका येथील ग्रामराज्यें, चांदा जिह्यांतील वरोडा येथील आनंदवन मंगलधाम, बिहारमधील वेराई, घटप्रभेजवळचें बिजूर आणि कोल्हापुरांतील गवसें येथील ग्रामपरिवार या गांवच्या हकीकती खरोखरच अत्यंत स्फूर्तिदायक व उद्बोधक आहेत. त्यांचीं वर्णनें वाचतांना मनाला आल्हाद होतो. श्री. जयप्रकाश नारायण हीं वर्णनें करून मग म्हणतात की, 'लोक निराश कां होतात हें मला समजत नाही.' अशीं ग्रामराज्यें पांच लाख खेड्यांत झालीं तर ! असा आशावाद ते व्यक्त करतात. खरोखर अशीं ग्रामराज्यें पांच लाख खेड्यांत झालीं तर भारतांतलेच काय, पण सर्व जगांतले सर्वच प्रश्न सुटतील. पण असा आशावाद बऱ्याच बाबतींत बोलून दाखविण्याजोगा आहे. विनोबांनी पंधरा वीस दरोडेखोरांचें हृदय-परिवर्तन केलें तसें भारतांतल्या सर्व दरोडेखोरांचें केलें

तर! त्यांचें जें आध्यात्मिक तेज त्याचा स्रोत त्यांनी काळाबाजारवाले, करचुकवे, न्यायांत विक्षेप करणारे राजकारणी, दंगली करणारे विद्यार्थी यांच्याकडे वळविला तर! आणि १९५१ सालीं त्यांनी संकल्प केला त्याप्रमाणे ५ कोटी एकर जमीन भूदानांत मिळाली असती तर! जयप्रकाश नारायण व विनोबा भावे हे शांतिसेना घेऊन नेफा प्रदेशांत चीनशीं लढा करण्यास गेले असते तर! तात्पर्य असें की, भारताचा अन्नधान्याचा, आर्थिक पुनर्रचनेचा, औद्योगिक उत्पादनाचा – थोडक्यांत म्हणजे लोकशाहीला अवश्य ती समृद्धि निर्माण करण्याचा प्रश्न भूदान किंवा सर्वोदय यांनी शतांशाने, सहस्रांशानेहि सोडविलेला नाही, किंवा इतक्या अंशाने तो या आंदोलनांतून सोडविला जाईल असा विसारहि त्यांनी दिलेला नाही. भूदान चळवळीचें मूल्यमापन करणें हा येथे हेतु नाही. भारतांतील मानवाच्या हृदयांतील ईश्वरी अंशाला आवाहन करून लोकशाही यशस्वी होण्यास अवश्य तें कर्तृत्व, ती कार्यक्षमता, तो त्याग, ती राष्ट्रहितबुद्धि येथे भूदान आंदोलकांना निर्माण करतां येईल काय हें पाहण्यासाठी हा प्रपंच केलेला आहे. पण काँग्रेस किंवा इतर पक्ष यांच्याहून कांही निराळीं सामाजिक मूल्यें निर्माण करण्यांत त्यांना यश आलें आहे किंवा भारताचें भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने कांही निराळा मार्ग यांना सांपडला आहे, असें भूदानाच्या दहा वर्षांच्या आंदोलनावरून दिसत नाही.

## उत्पादित धनाची विषम वाटणी

काँग्रेसने सत्ता हातीं घेतल्यापासून गेल्या बारा-तेरा वर्षांत उत्पादनवाढीचे जे प्रयत्न केले त्याचा थोडासा आढावा घेऊन लोकशाही यशस्वी होण्याच्या दृष्टीने त्याचें फलित काय आहे याचाहि विचार येथे होणें अवश्य आहे. गेल्या बारा वर्षांत आपलें राष्ट्रीय उत्पन्न शे. ३२ या प्रमाणांत वाढलें आहे. भारतांत अनेक ठिकाणीं कारखाने निघाले आहेत. त्यांतून इंजिनें निघत आहेत, खतांचें उत्पादन होत आहे, पोलाद तयार होत आहे, निरनिराळ्या ठिकाणीं तेलाचीं कुंडें सापडलीं आहेत, दगडी कोळशासारखाच लिग्नाइट हा पदार्थ विपुल सापडला आहे. टेलिफोन, सायकली, विजेचे दिवे यांची निर्मिति निर्यात करण्याइतकी होऊं लागली आहे, अणुभट्ट्या

कल्पनेपेक्षा लवकर कार्यक्षम होत आहेत, निरनिराळ्या रसायनांचे कारखाने निघत आहेत, निघाले आहेत. पिंपरीचा पेनिसिलीनचा कारखाना तर आशिया खंडांत अद्वितीय आहे. तेथेच आता इतर तत्सम औषधें तयार होऊं लागलीं आहेत. विजगापट्टमला आपण आपलीं स्वतःचीं जहाजें बांधूं लागलों आहों. थोड्याच दिवसांत मोठीं विमानें बांधण्यास प्रारंभ होईल. साखरेच्या कारखान्यांचें तर जाळेंच सर्व देशभर झालें आहे. कोयना, भाक्रा नानगल, दामोदर, महानदी, तुंगभद्रा येथील धरणांतून प्रचंड प्रमाणांत वीज निर्माण व्हावयास लवकरच सुरुवात होईल. या कारखान्यांची हीं वर्णनें वाचून मन संतुष्ट होऊन जातें. त्यांतील अमाप भांडवल, प्रचंड यंत्रसामग्री, तेथील निपुण शास्त्रज्ञ, कसबी कामगारवर्ग, निष्णात व्यवस्थापक आणि त्यांतून निर्माण होणारा माल यांचीं वर्णनें वाचतांना आपण दारिद्र्यांतून समृद्धींत प्रवेश करीत आहोंत असें वाटूं लागतें. हें सर्व कर्तृत्व कौतुकास्पद आहे यांत शंकाच नाही.

पण आपला मूळ प्रश्न आहे तो निराळा आहे. दण्डसत्तेने जें आपल्या लोकसत्तेवर आक्रमण केलें आहे – (नुसतें आव्हान नव्हे, तर आक्रमण) तें मोडून काढण्यास आणि भावी काळांत देशाच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास भारत समर्थ होण्याच्या दृष्टीने या सर्व औद्योगिक प्रगतीचा हिशेब काय आहे तें आपण पाहिलें तर हें उत्पादन म्हणजे ' दर्यामें खसखस ' असें आहे. नुसत्या खतांचा विचार केला तरी काय दिसतें पाहा. आपण सध्या एकरी एक दीड पौंड खत सरासरीने वापरतों. जपानमध्ये १९३ पौंड वापरतात. सिमेंट आपण खूप निर्माण करतों, पण पाटबंधाऱ्यांचीं सरकारी कामेंसुद्धा सिमेंटच्या तुटीमुळे अडून राहतात. इंजिनें आणि पेनिसिलीन आपण लवकरच निर्यात करणार आहोंत असें म्हणतात, पण आपला सर्वांत जुना, शंभर वर्षांचा जो कापडाचा धंदा त्याची निर्यात गेल्या आठ वर्षांत कशी घटत चालली आहे याचा हिशेब मागे एकदा दिला आहे. त्यावरून या निर्यातीबद्दल किती निश्चिति धरावी हा प्रश्न आहे. जहाजें तयार होऊं लागलीं हें खरें, पण दरसाल आपण झोळी पसरून जें धान्य मिळवितों तें वाहून आणण्याइतकीसुद्धा शक्ति अजून आपणाजवळ नाही. हे कारखाने अवाढव्य असले तर भारत, त्याची लोकसंख्या व तिच्या गरजा – जीवनाच्या

आणि संरक्षणाच्या – या त्यांच्या शतपटीने अवाढव्य आहेत. सध्याच्या गतीने दोन-तीनशे वर्षांत आपण ब्रिटनसारखी प्रगति करूंहि, पण हीच तर मुख्य समस्या आहे. दण्डसत्ता ज्या द्रुत गतीने प्रगति करते त्या गतीने धावणें लोकसत्तेला शक्य होईल काय, असा प्रश्न आहे. तसें जर धावता आलें नाही तर आपल्याला दण्डसत्तांचें आव्हान कधीच स्वीकारतां येणार नाही.

पण याहीपेक्षा लोकशाहीच्या यशाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असा की, गेल्या दहा वर्षांत जें राष्ट्रीय उत्पादन वाढलें तें कोणाच्या खिशांत गेलें? त्या धनामुळे आर्थिक विषमता कांही कमी झाली काय? या नव्या धनांतील सुखाचा कांही वांटा कष्टकरी, दरिद्री जनतेला मिळाला काय? म्हणजेच महागाई कमी झाली काय? रोजगार वाढला काय? शेतकरी बरें अन्न खाऊं लागला काय? असें कांही झालें तरच योजना आपल्यासाठी आहेत, राष्ट्रविकास म्हणजे आपला विकास होय, असें वाटून जनता या योजना यशस्वी करण्यासाठी जिवापाड कष्ट करण्यास तयार होईल. या बाबतींत अर्थशास्त्रज्ञ एकमताने सांगत आहेत की, कष्टकरी जनतेचें जीवनमान गेल्या ८।१० वर्षांत सारखें खालावत आहे. राष्ट्राचें उत्पादन वाढत आहे, कामगारांचा पगार वाढत आहे; पण भाववाढ अनेकपटीने होत असल्यामुळे भांडवलदार, व्यापारी, सावकार यांखेरीज सर्व वर्गांची स्थिति खालावत आहे. प्रा. धनंजयराव गाडगीळ 'योजना – उद्दिष्टें आणि व्यवहार' या आपल्या लेखांत म्हणतात, 'सामान्यतः सर्वच मजूरवर्गाची स्थिति, विशेषतः १९५७ सालानंतर खालावली आहे, नोकरी पेशाच्या वर्गाची स्थितिहि अशीच आहे.' 'उत्पादनांत आणि दरडोई सरासरी उत्पन्नांत जरी वाढ झाली असली तरी सामान्य माणसाच्या उत्पन्नाची पातळी वाढलेली नाही.' 'एकंदर लोकसंख्येच्या मानाने अशा प्रकारचा (नव्या योजनांतून) फायदा झालेले लोक मूठभरच निघतील.' 'राष्ट्रीय उत्पादनांत जी वाढ झाली तिच्यामुळे आर्थिक विषमतेचेंच पोषण झालें आहे. मजूर व नोकरी पेशाच्या लोकांची स्थिति सुधारली नाही. याउलट व्यापारी व उद्योगपति यांनी मात्र अखंड फायदा उठविला आहे.' 'हिंदुस्थानांत एका बाजूला अति नियंत्रणाबाबत तक्रारी ऐकू येतात, तर दुसऱ्या बाजूला खाजगी उद्योगपति

विकासकार्याचा बेसुमार फायदा उठवत असल्याचें दिसून येतें.' (साधना, १५ ऑगस्ट १९६०) आपल्या आजच्या करपद्धतीचें विवेचन करतांना प्रि. डॉ. त्र्यं. म. जोशी हे म्हणतात की, 'भांडवलाची गुंतवणूक व चालू खर्च यांसाठी पैसा उभारणें, भाववाढीला आळा घालणें, व आर्थिक विषमता नष्ट करणें या दृष्टीने सध्याची करपद्धति जवळजवळ कुचकामी आहे.' (साधना : १५–८–६०) दिल्लीचे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव 'उद्दिष्ट स्वच्छ व प्रोत्साहक हवें' या आपल्या लेखांत म्हणतात की, 'दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राष्ट्राचें उत्पन्न दरडोई निश्चित वाढलें आहे; पण त्याच्या जोडीला भावांची अशी चढती कमान राहिली आहे की, कमी उत्पन्नांच्या बहुसंख्य लोकांची प्रत्यक्ष मिळकत मुळीच वाढलेली नाही.' त्यांचें म्हणणें असें की, 'दरडोई सरासरी उत्पन्नाच्या आकडयाच्या जोडीला, तिसऱ्या योजनेच्या शिल्पकारांनी, सर्वत्र देण्यांत येणाऱ्या किमान वेतनाचा आंकडाहि द्यावा. असें केलें तर कांही प्रमाणांत तरी योजनेला लोकांचें सहकार्य मिळण्याची शक्यता आहे.' डॉ. राव यांच्या मतें तिसऱ्या योजनेच्या कर्त्यांनी आंकडेबाजीने सामान्य माणसाचे डोळे दिपविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, आणि सरासरीच्या साहृयाने त्याची दिशाभूल करण्याऐवजी, त्याचें जीवन या योजनांनी कसें सुधारेल हें त्यास दाखवून दिलें पाहिजे.' (साधना, १५–८–६०) धनाची वाढ होत आहे हें खरें असलें तरी त्याची वाटणी कशी होत आहे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यांतून विषमताच पोसत असेल तर भारतांत लोकशाही यशस्वी होणें कठीण आहे, आणि दुर्दैवाने नेमकें तेंच घडत आहे. उद्योगपति, व्यापारी, काळाबाजारवाले हे अमाप धनाचें शोषण करीत आहेत, आणि सरकार याला पायबंद घालण्यास असमर्थ आहे. असल्या दुबळ्या सरकारने लोकशाहीच्या वल्गना कशाला कराव्या ?

## अमेरिकेचा संदेश

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आपण लोकशाहीच्या घोषणा करीत आहोंत आणि स्वातंत्र्यानंतर आपण प्रत्यक्ष लोकसत्ताकाची स्थापनाहि केली आहे, पण या लोकसत्ताकाचा पाया म्हणजे जीं लोकशाहीचीं मूल्यें त्यांची जोपासना करण्याची चिंता मात्र आपण यत्किंचित्‌हि वाहिली नाही. शिवाय

पाश्चात्य देशांत, ब्रिटन-अमेरिकेंत लोकशाहीसंबंधी आणखी जीं नवीं नवीं उदात्त व अति उदात्त तत्त्वें निर्माण होत आहेत त्यांचाहि भराभर आपण स्वीकार करीत आहोंत. पण त्याग, राष्ट्रनिष्ठा, समाजहितबुद्धि, विवेकनिष्ठा, धर्मनिष्ठा यांच्या अभावीं हीं तत्त्वें समाजाला अत्यंत घातक होतात हें अमेरिकन तत्त्ववेत्त्यांच्या ध्यानीं येऊं लागलें आहे. अमेरिका हा देश धनवैभवाने किती समृद्ध आहे हें सर्वश्रुतच आहे. आपल्या अखिल भारतीय अर्थसंकल्पाइतका मोठा अर्थसंकल्प तेथील एका जनरल मोटर्स या कंपनीचा आहे आणि अमेरिकन नागरिक तितकाच पैसा म्हणजे १६०० कोटी रुपये दरसाल नुसत्या सिगरेटवर खर्च करतात, पण असें असूनहि आज अमेरिकेच्या लोकशाहीचा पाया पोखरत चाललेला आहे. कारण वरील अगदी सामान्य सद्‌गुण तेथील जनतेंतून नाहीसे होत चालले आहेत. अमेरिकेंत गुन्हेगारी, दरवडेखोरी, संघटित लूटमार, यांचें प्रमाण किती वाढलें आहे तें मागे एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्याला पायबंद घालण्यासाठी अमेरिकन तत्त्ववेत्ते, कार्यकर्ते, समाजधुरीण काय करीत आहेत तें येथे थोडें सविस्तर सांगण्याचा विचार आहे. त्या सर्वांचें सूत्र एकच आहे की, समाजजीवनावर जास्त कडक नियंत्रण ठेवणें हाच लोकशाहीच्या रक्षणाचा मार्ग आहे, तोच तरणोपाय आहे. अलीकडच्या काळांत मानसशास्त्राच्या खोल अभ्यासामुळे अमेरिकनांची दृष्टि जास्त व्यापक व उदार झाली आहे. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याच्या जपणुकीविषयी ते पराकाष्ठेचे हळवे झाले आहेत. त्याचप्रमाणे उदार दृष्टीमुळे गुन्हेगारांना तुरुंगांत प्रेमळ वागणूक द्यावी, त्यांना शिक्षाहि सौम्य कराव्या याविषयी तेथे अट्टाहास चालू आहे. विद्यार्थी हे तर सर्वत्र समाजाचे लाडकेच असतात. तेव्हा शाळांतून छडी, शिक्षा, इ. रानटी प्रकार काढून टाकून बेशिस्त विद्यार्थ्यांच्या मनाचें अवगाहन करावें असें तत्त्व तेथे जारी झालें आहे. पण गेलीं पन्नास वर्षे हे प्रयोग झाल्यानंतरहि अमेरिकेंत गुन्हेगारी, दरवडेखोरी, खून, अत्याचार, बलात्कार, जाळपोळ, विध्वंस, दुष्ट प्रवृत्ति, यांना आळा तर बसलेला नाहीच; उलट त्यांची भयंकर प्रमाणांत वाढ झाली आहे, म्हणून आज आता तेथे प्रतिक्रिया सुरू झाली आहे; आणि तेथील विचारवेत्ते आता कडक कायदे, कठोर शासन, नियंत्रण, दण्डन यांची मागणी करीत आहेत. त्यावांचून अमेरिकेंत लोकसत्ता टिकून

राहणार नाही, व्यक्तिस्वातंत्र्य, समता यांचें रक्षण होणार नाही अशी त्यांची खात्री झाली आहे. भारतांत गेल्या दहा-बारा वर्षांत राष्ट्रीय उत्पादन शे. ३२ ने वाढलें आहे, पण याच्या लक्षपट समृद्धि अमेरिकेंत गेलीं पन्नास वर्षे नांदत आहे, तरी नैतिक मूल्यें, धर्मनिष्ठा यांचा ऱ्हास होत गेल्यामुळे एवढी समृद्धि असूनहि, ती नित्य वाढत असूनहि, तेथील नेत्यांना अमेरिकन लोकशाहीच्या रक्षणाची चिंता निर्माण झाली आहे. त्यांच्या मानाने आपण अत्यंत दरिद्री आहों आणि आपली नैतिक पातळी मात्र त्यांच्यापेक्षा जास्त खाली आहे. अशा स्थितींत तेथील पंडितांचे विचार आपल्याला उद्बोधक होतील असें वाटतें.

अमेरिकेंत अफू, चरस, गांजा इ. मादक द्रव्यांच्या व्यसनांचा प्रसार पराकोटीला गेला आहे. त्याच्या शोधासाठी अमेरिकन सीनेटने एक समिति नेमली होती. तिचा अहवाल वाचून कोणीहि माणूस सर्द होईल, थिजून जाईल. या व्यसनांचा प्रसार बहुंशीं तीस वर्षांच्या खालच्या तरुण लोकांत असतो. एकवीसच्या आंतलीं मुलेंहि कांही कमी नाहीत. एकदा व्यसन लागलें की, त्याचा खर्च हळूहळू वाढत जातो. पुढे हा खर्च रोज शंभर रुपयांपर्यंत जातो. अर्थात् अफीण मनुष्य चोऱ्या करूं लागतो, दरवडे घालतो, स्त्रिया शरीर-विक्रय करूं लागतात. अमेरिकेंतील गुन्हेगारीपैकी एकचतुर्थांश गुन्हेगारी या व्यसनांतून निर्माण झाली आहे. एकट्या न्यूयार्क शहरांत अफीण लोक रोज आठ लाखांच्या चोऱ्या करतात. १९५५ सालीं मादक द्रव्याच्या भोक्त्यांनी एका हेरोन या द्रव्यापायीं १५० कोट रु. खर्च केले. या द्रव्याचा व्यापार आंतरराष्ट्रीय प्रमाणावर चालतो. इटली, फ्रान्स येथून हें द्रव्य आणणाऱ्या मोठ्या संघटना अमेरिकेंत आहेत. त्यांतल्या एकेका एजंटाला महिना दोन ते तीन लाख रुपयांची प्राप्ति होते. त्यामुळे व्यसनांचा प्रसार करण्यासाठी ते पराकाष्ठा करतात, आणि स्वतःच्या व्यापाराच्या रक्षणासाठी राजकारणी लोकांना वश करतात. या संघटनांची शिस्त कमालीची कडक असते. सरकारला यांतला कोणी फितूर झाल्यास त्याचा तत्काळ खून होतो. त्यांतील एक अत्यंत विलक्षण आणि उद्बोधक (आणि अप्रत्यक्षपणें तितकीच उद्वेगजनक) गोष्ट अशी की, या मादकद्रव्यसंघटनेंतील मनुष्याला स्वतःला व्यसन असतां कामा नये असा त्यांतील श्रेष्ठींचा दण्डक

आहे. तसा नुसता संशय आला तरी त्याची हकालपट्टी होते. म्हणजे कोणताहि धंदा करावयाचा तर मनुष्याला संयम, निग्रह अवश्य आहे. यांतील उद्वेगजनक गोष्ट अशी की, हीं दुष्ट माणसें, हीं अत्याचारी, गुन्हेगार माणसें आपल्या अनैतिक उद्दिष्टासाठी जितक्या मजबूत संघटना बांधूं शकतात तितक्या सज्जन माणसें आपल्या ध्येयसिद्धीसाठी बांधूं शकत नाहीत! कारण त्यांना प्रचंड वैयक्तिक विलोभन आहे, आणि यांना समाजकल्याण, आणि आत्मसंतोष एवढेंच विलोभन आहे. अमेरिकेंत आज बाल व प्रौढ गुन्हेगारी इतकी वाढली आहे की, दुसऱ्या प्रकारच्या सात्त्विक विलोभनांचा प्रभाव तेथे पुरेसा पडत नाही असें दिसतें. लोकशाहीचा नाश यांतच आहे. दण्डसत्तेकडे विचारवंत पाहूं लागतात ते याच वेळीं. रशियाने सर्व प्रकारचीं व्यसनें आपल्या समाजांतून खणून काढलीं आहेत. चीन हा अफीणांचा देश म्हणूनच प्रसिद्ध होता, पण कम्युनिस्टांनी, हातीं सत्ता येतांच, अल्पावधींतच त्या व्यसनाचा नायनाट करून टाकला. दारूबंदीचा कायदा करून उत्तरोत्तर तें व्यसन वर्धिष्णु करीत नेणाऱ्या लोकांनी दण्डसत्तेचें आव्हान स्वीकारण्याचें सामर्थ्य आपल्या ठायीं आहे कीं नाहीं याचा फार गंभीरपणें विचार केला पाहिजे. असो. अमेरिकन विचारवंत आज दण्डसत्ता असावी असें म्हणत नाहीत; पण कायदे कडक केले पाहिजेत व शिक्षा जबरदस्त ठेविल्या पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे. मादक द्रव्याच्या खात्याचे कमिशनर हॅरी ॲन्स्लिगर आणि सीनेटर प्राइस डॅनियल यांनी या-संबंधीच्या अमेरिकन कायद्यावर कडक टीका केल्या आहेत. त्यांच्या मतें या व्यसनांच्या प्रसाराला विधिमंडळें, न्यायालयें हींच बऱ्याच अंशीं जबाबदार आहेत. कारण त्यांनी केलेले कायदे अत्यंत ढिले आहेत. त्यांतून गुन्हेगार सहज सुटून जातो. प्रत्यक्ष हातांत वारंट असल्यावांचून पोलिसांनी कोणालाहि पकडतां कामा नये असा कायद्याचा अर्थ १९१४ सालीं एका न्यायाधीशाने लावला आणि तेव्हापासून तेथे अगदी अनर्थ चालू आहे. गुन्हेगाराविरुद्ध गुन्हा शाबीत झाला तरी, ज्यूरीने दोषी म्हणून निकाल दिला तरी, न्यायाधीश गुन्हेगाराला या कलमाखाली सोडून देतात. गुन्हेगार गुन्हा करतांना दिसला तरी पोलिसांनी तेथे त्याला पकडावयाचें नाही. प्रथम मॅजिस्ट्रेटकडे जाऊन वारंट मिळवावयाचें, मग त्याला पकडावयाचें. तोपर्यंत

गुन्हेगाराने थांबलें पाहिजे असा मात्र कायदा नाही. शे. ५० गुन्हेगार या रीतीने सुटून जातात. व्यक्तिस्वातंत्र्य, नागरिक हक्क यांच्या कल्पना अमेरिकेंत इतक्या तीव्र झाल्या आहेत की, गुन्हेगाराविरुद्ध पुरावा गोळा करण्यासाठी पोलिसांनी त्यांचे टेलिफोन संदेश गुप्तपणें ऐकले तरी तेवढ्या-वरून, गुन्हा सिद्ध झाला तरी. गुन्हेगार निर्दोष ठरतो. १९५० सालीं ज्युडिथ कॉपलन या बाईने एका रशियन हेराला कांही गुप्त कागदपत्रें दिलीं. तिचा गुन्हा न्यायालयांत सिद्ध झाला; पण पोलिसांनी वारंटावांचून तिला पकडलें होतें, आणि पाळत ठेवतांना तिचे टेलिफोन संदेश पकडले होते. त्यामुळे खालच्या कोर्टीत तिला पंधरा वर्षांची शिक्षा झाली असूनहि वरिष्ठ कोर्टाने तिला सोडून दिलें, हें सांगून जॉन बार्करवेट हे कायद्याचे प्राध्यापक म्हणतात की, त्या दिवशीं हा प्रकार पाहून मॉस्कोला हसू आलें असेल. राष्ट्राच्या संरक्षणाला धोका निर्माण झाला तरी अमेरिकन न्यायालयें तंत्रनिष्ठ आहेत. केसाकेसाचें विच्छेदन करून, कायद्याचे अर्थ लावीत आहेत आणि फितूर, राष्ट्रद्रोही लोकांना निर्दोषी म्हणून सोडीत आहेत. लोकशाहीचीं मूल्यें दृढमूल न करतां लोकशाही स्वीकारली की, समाजाचा नाश ठरलेलाच आहे. जॉन बार्करवेट यांनी अमेरिकन न्यायपद्धतीची अतिशय निर्भर्त्सना केली आहे. ते म्हणतात, " आज या पद्धतीने, गुन्हेगारांना संरक्षण मिळत आहे, उत्तेजन मिळत आहे आणि समाजाचें स्वास्थ्य, त्याचा योगक्षेम, त्याचें हित हें मात्र धोक्यांत आहे. जनतेने जागृत होऊन याला आळा घातला पाहिजे " असेंहि ते म्हणतात. कमिशनर अर्नास्लिगर यांनीं न्यू ऑर्लिन्स, फिलाडेल्फिया या संस्थानांत व्यसनी लोकांना, गुन्हेगाराला दहादहा वर्षांच्या शिक्षा ठेवून त्याची कडक बजावणी केल्याबरोबर गुन्हेगारीचें प्रमाण कसें घटलें हें सप्रमाण दाखवून सर्वत्र कडक बजावणीची मागणी केली आहे.

बालगुन्हेगारीचा विचार करतांना डॉ. रूथ अलेक्झँडर यांनी असेच विचार प्रगट केले आहेत. 'नॅशनल शेरीफस् असोसिएशन 'पुढें त्यांचें भाषण झालें. बालगुन्हेगारांना मायाळूपणें वागवावें, त्यांना गुन्हेगार न मानतां रोगी मानावें, त्यांच्या मनोव्यापारांचें मानसशास्त्रीय अवगाहन करावें, या विचारसरणीमुळे समाजांत कसे अनर्थ घडत आहेत हें त्यांनी दाखवून दिलें आहे. शास्त्रज्ञांची कल्पना अशी की, त्या बालगुन्हेगारांतला

मानव, त्याच्यांतील दैवी अंश जागा केल्याने सुधारेल. प्रत्यक्ष परिणाम मात्र असा की, आपल्याला कसलीहि शिक्षा होत नाही हें ध्यानांत आल्यामुळे त्यांच्यांतला पशु फक्त जागा होतो, आणि तो जास्त जास्त हिंस्र अत्याचार करतो. कांही कारण नसतांना बागेंत उभ्या असलेल्या दहापांच मोटरींचीं रबरी चाकें फोडणें, मुलींच्या वसतिगृहांत शंभरांच्या टोळीने जबरीने शिरून त्यांच्या चड्ड्या व चोळ्या पळविणें, वाटेंत दिसतील त्या घरांच्या काचा फोडणें, आगगाडीच्या डब्यांचा विध्वंस करणें, बसमधील गाद्या फाडून टाकणें, गमतीने दोनतीन झोपड्यांना आगी लावणें या गुन्ह्यांना अमेरिकेंत ऊत आला आहे. हे गुन्हे सर्व विद्यार्थी — बाल, तरुण विद्यार्थी करतात. यावर डॉ. अलेक्झांडर म्हणतात की, "आपल्या अमेरिकेंत राहणीचें मान सर्वांत उच्च आहे आणि गुन्ह्यांचें प्रमाणहि सर्वांत उच्च आहे ?" या बाल-गुन्हेगारांत सधन घरांतलीं मुलेंहि पुष्कळ प्रमाणांत असतात. हल्ली आई काम करून पैसे मिळविते आणि राहणीचें मान वाढविते, पण त्याचबरोबर मातृहीन घरांत गुन्हेगारीचें प्रमाणहि वाढत आहे. यासंबंधीं बोलतांना न्यायमूर्ति विल्फ्रेड वॉल्टमेड म्हणाले की, सध्या गुन्हेगारी वाढली आहे तिचें कारण शाळांतली नवी शिक्षणपद्धति हें आहे. मुलांचें लालन करावें, त्यांना स्वातंत्र्य द्यावें, त्यांचें मानसशास्त्र पाहावें हें आज अनेक वर्षें चाललें आहे. त्याचीं फळें आपण भोगतों आहोंत. शिस्त गेली व तेथे बालकाचा आत्माविष्कार आला. धर्म गेला व तेथे मानसशास्त्र आलें. याने गुन्हेगारी वाढत चालली आहे. डॉ. अलेक्झांडर म्हणतात की, घरीं, शाळेंत व समाजांत मुलांत अपप्रवृत्ति दिसतांच त्यांना कडक शिक्षा झालीच पाहिजे. स्टोव्हवर मुलाचा हात एकदा भाजला की, तो पुन्हा त्यावर हात ठेवणार नाही. तेवढी अक्कल त्याला असते. तेंच गुन्हेगारीविषयी खरें आहे. नव्या उपपत्तीमुळे आपण गुन्हेगारीला उत्तेजन देऊन समाजाचा नाश मात्र करीत आहोंत.

स्लोअन विल्सन हे शिक्षणाधिकारी आहेत. त्यांनी 'इट् इज् टाइम टु क्लोज अवर कार्निव्हल' या नांवाचा 'लाईफ' मध्ये एक लेख लिहिला आहे. (मार्च १९५८). मुलांचे लाड करावे, कौतुक करावें, त्यांच्या वृत्तीची मानस-शास्त्रीय चिकित्सा करावी, शिक्षणाला मनोरंजनाचें रूप द्यावें, मुलांची

निर्भर्त्सना करूं नये, त्यांना कडक बोलूं नये, त्यांचें लालन करावें या नव्या तत्त्वज्ञानावर त्यांत त्यांनी प्रखर टीका केली आहे. आपल्या शाळा म्हणजे केवळ उरूस आहेत, तमाशे (कार्निव्हल) आहेत असें ते म्हणतात, आणि पदोपदीं रशियांतील शिक्षणाशीं अमेरिकन शिक्षणाची तुलना करतात. अमेरिकेंत बहुजनसमाजाला शिक्षण द्यावयाचें ठरतांच जनतेला वर आणण्याऐवजी शिक्षणाचा दर्जाच खाली आणला गेला आणि यामुळे समाजाचा अधःपात झाला असें ते म्हणतात. कडक शिस्त, नियंत्रण, कठोर बंधनें, शासनें याऐवजीं शाळांमध्ये सर्वत्र लाडीक, प्रेमळ, शिथिल, स्वैर वातावरण आलें आहे. मुलांना गणित, फिजिक्स, परकी भाषा, प्राचीन भाषा नको असतात. ठीक आहे. त्याऐवजी त्यांना सोपे, गोड, त्यांना आवडणारे, त्यांच्या आहारांतले विषय विकल्प म्हणून द्या. सक्तीने पहिले विषय त्यांच्यावर लादून, चोपून त्यांच्याकडून अभ्यास करून घ्यावा, हें धोरण युक्त नाही. सक्ती आणि लादणें हा रानटीपणा आहे. त्यांनी बालकाचा मनोविकास होत नाही. पण रशियांत मात्र तो होतो! स्लोअन म्हणतात, "आज रशियांत १ कोटी विद्यार्थी इंग्रजी शिकतात. पण अमेरिकेंत रशियन भाषा शिकणारे विद्यार्थी जेमतेम ८ हजार आहेत." रशियांत शिक्षणाचा दर्जा नेत्यांनी खाली आणला नाही. विद्यार्थ्यांना निग्रह, कष्ट, कणखर वृत्ति, अखंड अभ्यास हें शिकवलें. ज्यांना वर जावयाचें आहे त्यांनी अमके विषय घेतलेच पाहिजेत अशी सक्ती केली. त्यामुळे सोव्हिएट रशियांत विद्येला जो मान आहे तो आज अमेरिकेंत नाही. बहुजनांना शिक्षण देऊं नये असें विल्सन यांना मुळीच म्हणावयाचें नाही. शिक्षणाची पातळी कमी करूं नये असें त्यांचें म्हणणें आहे. नाहीतर बुद्धिमान् विद्यार्थ्यांना स्पर्धेचा अंकुश राहणार नाही, विद्येंत रग राहणार नाही आणि शिक्षण सगळें फिदफिदून जाईल असें त्यांना वाटतें. आज प्रत्येक विचारी अमेरिकनाच्या मनांत सोव्हिएट दण्डसत्तेने अमेरिकेच्या लोकसत्तेला दिलेल्या आव्हानाचा विचार अखंड जागा असतो. म्हणूनच लेखाच्या शेवटीं विल्सन म्हणतात की, शस्त्रनिर्मितीच्या व सामर्थ्याच्या स्पर्धेंत शेवटीं कोण विजयी होणार हें या दोन देशांतल्या शालेय शिक्षणावर अवलंबून आहे. जगांत शांततावाद किंवा सहजीवन यशस्वी व्हावयाचें कीं नाही हेंहि येथल्या शाळांवरच अवलंबून आहे. तेव्हा शाळांतील उत्सव,

तमाशे बंद करून आपण तेथे अभ्यास, मेहनत, कष्ट यांची शिकवण देणें अवश्य आहे.

सॅम्युएल लिबोविट्झ हे ब्रुकलिनच्या वरिष्ठ न्यायालयांतील एक ज्येष्ठ न्यायाधीश आहेत. अमेरिकेंतील बालगुन्हेगारीने त्यांचें मन हबकून गेलें आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांतील शेकडा १३ गुन्हे १८ वर्षांच्या आंतील मुलें करतात आणि खुनांपैकी शे. ९ खून या मुलांच्या हातून होतात. आज अनेक वर्षें ते या भयानक आपत्तीची मीमांसा करीत आहेत. त्यांच्या मतें या अनर्थांतून समाजाला मुक्त करावयाचें असेल तर एकच उपाय आहे. "कुटुंबामध्ये पिता हा पूर्वीप्रमाणे नियंता झाला पाहिजे." आज त्याचें हें स्थान नाहीसें झालें आहे. ते म्हणतात, आज्ञापालन हें घरांत आज राहिलेंच नाही. मध्यमवर्गीय घरांत स्वच्छंदवादी मानसशास्त्राचें भूत शिरलें आहे. (परमिसिव्ह सायकॉलजी) त्यामुळे नियंत्रण, बंधन असें राहिलेंच नाही. मी सोळा वर्षांचा असतांना वडील सांगत असत की, रात्रीं साताच्या आंत घरीं आलें पाहिजे आणि मी येत असें. आज मुलगा किंवा मुलगी मध्यरात्रीं घरीं आली, आणि कुठे गेली होतीस, एवढें जरी वडिलांनी विचारलें, तरी तो रानटीपणा ठरतो. आता स्त्रियांना अधिकार आल्यामुळे त्यांनाहि मुलांचीच बाजू घ्यावीशी वाटते. अशा रीतीने पिता पदच्युत झाला आहे. त्यामुळें मुलांना वळण नाही, धाक नाही, भीति नाही आणि सर्व गुन्हेगारी यामुळे वाढली आहे. पिता नियंता झाला तर हा सर्व अनर्थ थांबेल. अमेरिकेंतील मिचिगन संस्थानाने तर १९५३ सालीं 'पेरेंटल रिस्पॉन्सिबिलिटी ॲक्ट' असा कायदा करून मुलांच्या गुन्ह्यांसाठी मातापित्यांना दीडदोन हजार रुपयांपर्यंत दण्ड करण्याचें ठरविलें. त्याबरोबर बालगुन्हेगारीचें प्रमाण सपाट्याने कमी होऊं लागलें. त्याच्या आधी तेथे अगदी अनर्थ झाला होता. ज्यांनी हा प्रस्ताव मांडला ते सीनेटर हॅरोल्ड रायन यासंबंधी बोलतांना म्हणाले की, 'मातापित्यांना दण्ड बसूं लागला म्हणजे ते मुलांकडे जास्त लक्ष देतील, त्यांची जास्त काळजी घेतील असें मला वाटलें, म्हणून हा कायदा केला आहे.' सुदैवाने त्यांचा अजमास खरा ठरला. याचा अर्थ काय होतो ? आपल्या मुलांची काळजी घेतली पाहिजे, त्यांना वाममार्गी होऊं देतां कामा नये, ही मातापित्यांची जबाबदारी त्यांना, अमेरिकेसारख्या प्रगत लोकसत्ताक राष्ट्रांत दण्ड करून शिकवावी लागली. स्वतःची जबाबदारी स्वतः होऊन जाणणें याला

लोकशाही म्हणतात. दण्ड करून ती न्यायालयाने लोकांना शिकविणें याला दण्डसत्ता म्हणतात, आणि मुलाच्या अपराधासाठी पित्याला दण्ड हें तर लोकशाहीच्या उदार तत्त्वांत कोठेच बसणार नाही. तो रानटीपणा होय. पण समाजरक्षणासाठी, मुलांना सुधारण्यासाठी अमेरिकेने त्याचा आश्रय केला.

## मध्यम मार्ग

-लोकसत्ताकांक्षी भारताने अमेरिकेंतील या सर्व घटनांचा आणि त्यासंबंधी तेथील विचारवंतांनी प्रकट केलेल्या विचारांचा बारकाईने परामर्श घेतला पाहिजे. समृद्धि ही लोकशाहीला अत्यंत अवश्य हें खरें; समृद्धीवांचून लोकशाही कधीहि शक्य होणार नाही. पण उच्च नैतिक मूल्यें नसतील, लोकशाहीला अवश्य त्या विवेक संयमादि गुणांनी समाज संपन्न नसेल, तर समृद्धि असूनहि समाजाचा अधःपात टळत नाही. हीं नैतिक मूल्यें त्यागी, चारित्र्यसंपन्न, निःस्पृह, निःस्वार्थी नेतेच समाजांत निर्माण करूं शकतात. दुर्दैव असें की, सत्ताप्राप्तीनंतरच्या काळांत भारतांतून हें चारित्र्य हळूहळू लोप पावत चाललें आणि आता तें नाहीसेंच झालें आहे. अशा स्थितींत आपली लोकशाही यशस्वी होणें शक्य आहे काय, याचा प्रत्येक भारतीयाने विचार केला पाहिजे. सध्याच्या पद्धतीनेच भारताचा राज्यकारभार चालू राहिला तर आपली लोक-सत्ता कोसळून पडेल, तिला राष्ट्राचें रक्षण करण्याचेंहि सामर्थ्य राहणार नाही अशी मला भीति वाटते. आहे हा राज्यकारभार सुधारणें हा त्यावर उपाय आहे, असें सहजच मनांत येईल. पण त्याची स्वप्नांत सुद्धा आशा वाटत नाही. सध्याचे जे या देशाचे नेते आहेत, भाग्यविधाते आहेत, ते आता वृद्ध झाले आहेत. त्यांच्या जीवनाची, विचाराची, तत्त्वज्ञानाची व आचाराची पठडी ठरून गेली आहे. तीतून बाहेर पडून नवा मार्ग आखावा हें त्यांच्या शक्तीबाहेरचें आहे. तेव्हा नेत्यांची नवी पिढी भारतांत निर्माण झाली तरच आपलें भवितव्य कांही बदलू शकेल. सध्याच्या नेत्यांच्या पिढीला वंदन करून, अत्यंत आदराने पण कठोर निश्चयाने यज्ञांतील अग्नीचें विसर्जन करतात तसें तिचें विसर्जन करण्याचें सामर्थ्य ज्यांच्या ठायीं आहे असे तरुण नेतेच भारताचें भवितव्य घडवू शकतील. 'रिफ्लेक्शन्स् ऑन दि रेव्होल्यूशन ऑफ अवर ओन टाइम्स' या ग्रंथांत लास्कीने असेंच म्हटलें आहे. "चर्चिलच्या विजयेच्छेबद्दल वाद नाही. ब्रिटनच्या विजयेच्छेचें तो प्रतीक आहे. पण तो एका तत्त्वज्ञानाचा,

एका विचारसरणीचा वारस आहे. ती नष्ट झाल्यावांचून ब्रिटनच्या लोकशाहीचा उत्कर्ष व्हावयाचा नाही." सध्याच्या नेत्यांच्याबद्दल हाच विचार भारतीयांनी केला पाहिजे. हे सर्व लोक देशभक्त होते, राष्ट्रकार्यासाठी यांनी आपला देह एके काळीं झिजविला होता यांत शंका नाही, पण मागील एक दोन प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे अत्यंत भ्रान्त असें तत्त्वज्ञान ते उराशीं धरून बसल्यामुळे भारताचा अधःपात होत आहे, नाश होत आहे. तो टाळून भारताची लोकशाही यशस्वी करणें हें नेत्यांच्या नव्या पिढीचें कर्तव्य आहे.

आपण भारतीय जास्त वास्तववादी, जास्त व्यवहारी झालों तरच चालू असलेल्या जागतिक संघर्षांत आपला निभाव लागेल. अत्यंत उच्च तत्वांच्या आहारीं जाऊन व्यवहारशून्य व्हावयाचें आणि आत्मघात करून घ्यावयाचा हा आपल्या रक्तांत भिनलेला दोष आपण समूळ नष्ट केला पाहिजे. उदात्त विचार आणि हीन आचार हें आपलें लक्षणच होऊन बसलें आहे. अंतर्मुख होऊन, आत्मनिरीक्षण करून आपण किती अवास्तव, अव्यवहारी झालों आहों हें आपण जाणून घेतलें तर आपलें मार्गक्रमण सुकर होईल, आणि संपूर्ण परिणत अशी लोकशाही येथे एकदम अवतरणें अशक्य आहे हें आपल्या ध्यानीं येईल. नेत्यांची नवी पिढी उदयाला आली तर तिला मध्यम मार्गच स्वीकारावा लागेल. चीन-रशिया यांच्याप्रमाणे दण्डसत्तेचा आपल्याला आश्रय करावा लागेल असें वाटत नाही. पण ब्रिटन-अमेरिकेप्रमाणे पूर्ण लोकशाही आपल्याला झेपेल हेंहि शक्य नाही. याचें कारण एकच की, लोकशाही मूल्यें आपल्या समाजांत रुजलेलीं नाहीत. बहुसंख्य कॉंग्रेसजन पंचवीस तीस वर्षे महात्माजींच्या सहवासांत स्वातंत्र्यसंग्रामाच्या आघाडीवर होते, पण त्यांच्या ठायीं सुद्धा लोकशाही वृत्ति रुजूं शकली नाही. सत्ताधिष्ठित होतांच तेहि भ्रष्ट झाले, हें कठोर सत्य भारतीयांनी ध्यानी घेतलें पाहिजे. समाजवादी, प्रजासमाजवादी इ. पक्षांची हीच स्थिति आहे. स्वार्थ, दुही, गटबाजी, जातीयता या दुर्गुणांत ते रेसभरहि कमी नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत प्रजासमाजवादी लोकांच्या हातीं कोठे कोठे स्थानिक सत्ता आली होती, तेवढ्या अल्प अवधींत त्यांनी जे दिवे लावले ते पाहून संपूर्ण लोकशाहीचा अंगीकार करण्यापूर्वी आपण दहा वेळां विचार केला पाहिजे हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. भारतीय जनता, कॉंग्रेसला शह देईल असा, अखिल भारतीय पक्ष निर्माण करूं शकत नाही, यांतच आपल्या लोकशाहीचें

भवितव्य निश्चित झालें आहे. सत्तेने माणूस भ्रष्ट होतो आणि अमर्याद सत्तेने तो अमर्याद भ्रष्ट होतो हें अक्षरशः खरें आहे. तेव्हा सत्ताधारी पक्षाला पदच्युतीच्या भयाने मर्यादेंत टेवील असा विरोधी पक्ष जो समाज निर्माण करूं शकत नाही तो त्या सत्ताधारी पक्षाच्या हातीं दण्डसत्ताच देत असतो. भारतांत सर्व प्रदेश व केन्द्र मिळून जे दोन हजार प्रतिनिधि विधिमंडळासाठी निवडावयाचे असतात, तेवढे उभे करण्याचेंसुद्धा सामर्थ्य सध्याच्या तथाकथित विरोधी पक्षांना नाही. अशा स्थितींत येथे अमर्याद, अनियंत्रित सत्ता, म्हणजेच दण्डसत्ता अटळ होऊन बसते. मात्र ही दण्ड-सत्ता तत्त्वज्ञानपूर्वक, विचारपूर्वक, योजनापूर्वक न स्वीकारल्यामुळे ती भ्रष्ट आणि हीन होऊन धड लोकसत्ता नाही व धड दण्डसत्ता नाही असें विकृत रूप तिला प्राप्त होतें, पण न पेलणाऱ्या उदात्त तत्त्वांचा अंगीकार केला की, हा परिणाम अटळच होऊन बसतो. सध्याचे भारतीय नेते अति-उदात्त लोकशाहीच्या घोषणा करतात आणि व्यवहारांत मात्र पदोपदीं दण्ड-सत्तेचा आश्रय करतात. दुःख एवढेंच की, भारतांत लोकसत्ता आहे ती उद्योगपति, काळाबाजारवाले, इन्कमटॅक्स चुकविणारे, राजकारणी यांच्या-साठी आहे आणि दण्डसत्ता आहे ती सामान्य जनांसाठी, शेतकरी, कामकरी, मध्यमवर्ग यांच्यासाठी आहे. त्यांचें स्वातंत्र्य मर्यादित करण्यासाठी सरकार झटकन् वटहुकूम काढतें, पण वरील धनपतींना मात्र स्वातंत्र्य, समता, बंधुता या थोर तत्त्वाअन्वयें वागवितें. नव्या नेत्यांनी याचा अर्थ जाणला पाहिजे. जेथे लोकशाही मूल्यें दृढमूल झालेलीं नाहीत तेथे लोकशाही प्रस्थापित केली की, एकपक्षी, भ्रष्ट, नीतिहीन दण्डसत्ता अपरिहार्य होऊन बसते, हा याचा अर्थ आहे. मग आधीच सावध होऊन वास्तव दृष्टि ठेवून, योजनापूर्वक, तत्त्वज्ञानपूर्वक जर आपण मध्यम मार्ग म्हणून कांही मर्यादेंतच लोकशाही तत्त्वांचा अंगीकार करावयाचा असें ठरविलें तर तें किती तरी शहाणपणाचें व हिताचें होईल! जपान व जर्मनी या देशांनी गेल्या शंभर वर्षांत आपली प्रगति करून घेतली ती मध्यम मार्गाने, मर्यादित लोकशाहीनेच घेतली आहे. लोकांच्या ठायीं जी राजभक्तीची भावना त्या देशांत होती तिचा तेथील नेत्यांनी मोठ्या कुशलतेने उपयोग करून घेतला आणि त्या बळावर समाजांत सामाजिक, धार्मिक व प्रचंड मानसिक क्रान्ति घडवून आणली. समाजहितबुद्धि, राष्ट्रनिष्ठा, अहोरात्र कष्ट करण्याची

वृत्ति, परिवर्तनक्षमता हे सद्‌गुण त्यांनी जनतेंत रुजविले. त्यामुळे तीं राष्ट्रें आज बलाढ्य झालीं आहेत आणि लोकशाही पेलण्यास समर्थ होत आहेत. नव्या पिढीने असा मध्यममार्ग स्वीकारला तरच भारताचा उत्कर्ष होईल. नाही तर आपल्या लोकशाहीचा तर बळी पडेलच, पण दण्डसत्तेच्या आक्रमणाला बळी पडून आपलें स्वातंत्र्यहि नष्ट होईल, आणि अशा रीतीने लोकशाही मूल्यें समाजांत नसतांना लोकशाही प्रस्थापित केल्याचें प्रायश्चित्त आपल्याला भोगावें लागेल.

'लोकसत्तेला दण्डसत्तेचें आव्हान' या विषयाचें विवेचन संपलें. येथवर मांडलेल्या विचारांचा निष्कर्ष सांगून आता समारोप करावयाचा आहे.

## निष्कर्ष

पहिली गोष्ट आपण अशी ध्यानांत ठेवली पाहिजे की, आपल्या मनांत दण्डसत्तेचा कितीहि तिटकारा असला तरी तिच्याविषयीच्या भ्रान्त कल्पना आपण करून घेतां कामा नये. तिच्या स्वरूपाविषयी सम्यक् ज्ञान नसलें तर तिचें आव्हान आपल्याला कधीहि स्वीकारतां येणार नाही. चीन-रशियाच्या दण्डसत्तांविषयी पहिला भ्रम असा प्रसृत झालेला आहे की, त्या देशांतील जनता तेथील शास्त्यांच्या विरोधी आहे. पारतंत्र्यांतल्या जनतेला परकी शासनाविषयी जसा द्वेष असतो, त्याच्याविरुद्ध बंड करून उठण्यास ती जशी नेहमी उत्सुक असते तशीच ही जनता आहे असा समज सर्व देशांत पसरलेला आहे. युजीन लिऑन्स या अमेरिकन पत्रपंडिताने 'अवर सीक्रेट अलाइज्' या नांवाचा एक ग्रंथ लिहून हें मत हिरीरीने मांडलें आहे. त्याच्या मतें रशियन जनता हीच खरी आपली – लोकसत्तावाद्यांची – मित्र आहे. सोव्हिएट सरकारविषयी तिच्या मनांत जळता द्वेष आहे, आणि कोटयवधि रशियन लोक बंडाला उत्सुक झालेले आहेत. १९५३ सालीं त्याने हा ग्रंथ लिहिला. पण गेल्या सात वर्षांत तसा कांही एक प्रकार घडलेला नाही. कारण मुळांतच तसें कांही नाही. वॉल्टर लिपमन हा प्रसिद्ध अमेरिकन ग्रंथकार १९५८ च्या अखेरीस रशियांत गेला होता. परत आल्यावर 'दि कम्युनिस्ट वर्ल्ड अँड अवर्स' हें पुस्तक लिहून त्यांत त्याने रशियाविषयींचीं आपलीं मतें मांडलीं आहेत. 'रशियांत प्रतिक्रान्ति होईल ही अपेक्षा अगदी वेडेपणाची आहे' असें त्याने स्पष्टपणें म्हटलें

आहे. दण्डसत्तेमुळे सोव्हिएट जनता अगदी गुलामी वृत्तीची होऊन गेली आहे, तिच्या ठायीं स्वतंत्र कर्तृत्वाची प्रेरणा नाही, तिचा बुद्धिविकास होणें शक्य नाही हा दुसरा भ्रम प्रचलित आहे. आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे की, या दण्डसत्ता आपल्याकडच्या जुन्या संस्थानाप्रमाणे सरंजामी सत्ता नाहीत. जनतेचें सर्व प्रकारचें कर्तृत्व उदयास आणावयाचें अशी या सत्तांची प्रतिज्ञा आहे आणि ती त्यांनी खरी करून दाखविली आहे. बुद्धिविकास व बलविकास या दृष्टीने त्यांनी श्रेष्ठ लोकसत्तांवरहि मात केली आहे. रशियन शास्त्रज्ञ आज विज्ञानाच्या तात्त्विक आणि व्यावहारिक अशा सर्व शाखांत जगाच्या आघाडीवर आहेत हें सर्वश्रुतच आहे. ऑलिंपिक सामन्यांतील रशियनांचा विक्रम पाहिला म्हणजे बलविकासांतहि लवकरच ते मात करणार हें निश्चित आहे असें दिसेल. म्हणजे या सत्तांनी केवळ लष्करी सामर्थ्याचा विकास केला आहे असें नाही, तर त्या आपल्या राष्ट्राचा सर्वांगीण विकास करीत आहेत. सध्याच्या काळांत केवळ लष्करी सामर्थ्याचा विकास करणें शक्यच नाही हें पहिल्या प्रकरणांत स्पष्ट केलेंच आहे.

या दण्डसत्तांनी मानवतेचीं मूल्यें पायदळीं तुडविलीं आहेत असा त्यांच्यावर आरोप आहे. तो आरोप अक्षरशः खरा आहे. पण यासाठी त्यांचा अधिक्षेप करण्यापूर्वी सध्याच्या लोकसत्तांनी गेल्या शतकांत काय केलें आहे त्याचा आठव आपण करावा, आणि त्यावांचून एखाद्या देशाने प्रगति केली आहे काय, संस्कृतीची वाढ केली आहे काय, हें पाहण्यासाठी इतिहास चाळीत बसावें. गेल्या शतकांतलें सोडून द्या. आज अमेरिकेंत मानवतेच्या मूल्यांची किती किंमत आहे तेंहि आपण पाहावें. तेथली बालगुन्हेगारी, प्रौढ गुन्हेगारी, संघटित दरवडेखोरी, जुगारी, मादक व्यसनें, वेश्याव्यवसाय, कुटुंबविध्वंस आणि तेथले लाचार राजकारणी यांचा विचार आपण करावा. तेथली अनीति, भ्रष्टता, विषमता ही अत्यंत भयावह पातळीला गेली आहे, असें गेल्या दहा वर्षांतल्या या प्रकारांचें संशोधन करण्यासाठी नेमलेल्या पन्नास समित्यांनी तरी सांगितलें आहे; आणि हें सर्व पराकाष्ठेची समृद्धि असतांना ! अमेरिकेंत असें आहे म्हणून सोव्हिएट रशियांतील प्रकार समर्थनीय आहे असें मला मुळीच म्हणावयाचें नाही. पण इतक्या वर्षांचे लोकशाहीचे संस्कार झाल्यानंतरहि मानवांतला पशु इतका बेताल होत असला, लोकशाहींतील स्वातंत्र्याचा दुष्ट उपयोग करून तो अनन्वित

अत्याचार, बीभत्स, ओंगळ, हिडीस अनाचार करीत असला, तर तो लोकसत्तेला पात्र आहे असें म्हणतां येईल काय? मग प्रथमपासूनच या पशूची दखल घ्यावयाची व त्याला जेरबंद करावयाचें असें सोव्हिएट नेत्यांनी ठरविलें तर त्यांचा अमेरिका कोणत्या तोंडाने धिक्कार करणार? मूळ लोकशाहीच्या मूल्यांचीच येथे मी अवहेलना करीत आहें असें कोणी समजूं नये. पण हीं मूल्यें दण्डसत्तेच्या मार्गाने प्राप्त करून घेतां येतात असें सोव्हिएट रशिया म्हणत असला तर, तीं जवळ नसतांना लोकशाहीच्या घोषणा करून, मानवांतल्या पशूला नंगा नाच घालण्याचें स्वातंत्र्य देऊन राष्ट्रनाश करून घेणाऱ्या लोकांना त्याच्या म्हणण्याचा अधिक्षेप कसा करतां येईल? भ्रमाने, अज्ञानाने किंवा उच्च तत्वांच्या कैफाने लोकवादी लोक तसें करीत राहिले तर त्यांचे समाज दण्डसत्तांपुढे नामोहरम झाल्यावांचून राहणार नाहीत.

आणि विवेचनाच्या अखेरीस मला स्वजनांना हेंच सांगावयाचें आहे. उदात्त तत्त्वांच्या कैफांत राहण्याची आपल्याला हौस आहे. प्रचंड योजना, उच्च घोषणा यांचें आपल्याला व्यसनच आहे आणि त्या बेहोषींत त्या उदात्त तत्त्वांचा प्रत्यक्ष आचार होतो कीं नाही याचा काडीमात्र विचार आपण करीत नाही. त्यामुळे थोर उद्गार आणि हीन आचार हें आपलें लक्षण होऊन बसलें आहे. आचार्य विनोबा, जयप्रकाश नारायण हे शांतिसेनेचा रोज घोष करतात, पण चीनच्या आघाडीवर तसला एकहि सैनिक त्यांनी धाडलेला नाही, आणि स्वतः आत्मिक सामर्थ्याने संपन्न असून स्वतः आपणहि तिकडे गेले नाहीत. स्वदेशांतले, आसमंतांतल्यासारखे अत्याचार थांबविण्यासाठी सुद्धा त्यांनी शांतिसेना उभारलेली नाही. घोषणांचा मात्र त्यांना कधी कंटाळा नाही. थोड्याफार फरकाने कॉंग्रेसचे व इतर राजकीय पक्षांचें हेंच लक्षण आहे. राष्ट्रनिष्ठा ही फार मोठी शक्ति आहे. परंपराभक्ति आणि शत्रुद्वेष या प्रेरणांमुळे समाजाचा उत्कर्ष होतो. पण आज जगांतले मानवतावादी पंडित राष्ट्रनिष्ठेचा अधिक्षेप करतात, विश्वराष्ट्राची भाषा बोलतात. असल्या उदात्त तत्त्वांचें काय करावयाचें हें जगांतले व्यवहारी शास्ते चांगलें जाणतात. पण भारतीयांना हें जाणतां येणार नाही. कारण मानवता, विश्वराष्ट्र या शब्दांच्या उच्चाराबरोबर त्यांना कैफ चढलाच पाहिजे आणि त्यांना भेटायला ते अंतराळांत गेलेच पाहिजेत.

मग प्रत्यक्ष आचरणांत कमालीची जातीयता, प्रांतीयता, कमालीचा पक्षीय स्वार्थ या कर्दमांत आपण कसे रुतून बसलों आहों हें त्यांच्या ध्यानीं येणार नाही. हें ध्यानीं येण्याची ऐपतच त्यांच्या ठायीं उरत नाही. अशी आपली राष्ट्रीय प्रकृति होऊन बसली आहे. तिच्यांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणलें पाहिजे, आपण वास्तववादी झालें पाहिजे; आपण अंतराळांत न भटकतां भूमीवर उतरलें पाहिजे.

तसें होतांच मानव कसा आहे, त्याच्यांत स्वार्थ किती प्रभावी असतो, त्याच्या हीन वृत्ति थोडा अवसर मिळतांच कशा जाग्या होतात, त्यांतून त्याला वर उचलावयाचें तर ध्येयवादाचा उपयोग किती होईल, कोणाच्या ध्येयवादाचा प्रभाव जास्त पडेल, राष्ट्रनिष्ठा, मानवता, विश्वकल्याण, सर्वभूतहित यांपैकी कशाचें आवाहन जास्त प्रबळ ठरेल, हें सर्व मग आपल्याला सहज कळून येईल. त्याचप्रमाणे दण्ड, नियंत्रण, शिक्षा यांचेंहि समाजपरिवर्तनांत स्थान कोणतें याचाहि अवगम आपल्याला होईल. आणि मग सध्याचें अत्यंत भ्रान्त, प्रमादपूरित, विपरीत तत्त्वज्ञान टाकून देऊन राष्ट्रीय उत्कर्षासाठी अवश्य असें वास्तववादी जगांतलें, राष्ट्रनिष्ठेचें, मर्यादित लोकसत्तेचें, मध्यम मार्गाचें, राष्ट्रीय स्वार्थाची दक्षतेने जपणूक करणारें तत्त्वज्ञान स्वीकारण्याची सुबुद्धि आपल्याला प्राप्त होईल. तसें होतांच समाजोन्नतीच्या महाप्रेरणा येथे कार्य करूं लागतील आणि सध्या विशीर्ण, विगलित, विकल होऊन गेलेला आपला समाज संघटित होईल, ध्येयवादी होईल, संपन्न होईल, बलाढ्य होईल. लोकशाही येथे खऱ्या अर्थाने अवतीर्ण होईल, आणि खऱ्या अर्थाने पूर्ण विकसित झालेल्या, स्वयंतेजाने प्रकाशमान होणाऱ्या, विवेकी, निग्रही, संयमी लोकशाहीपुढे कोणतीहि दण्डसत्ता क्षणमात्र टिकाव धरूं शकणार नाही हें ब्रह्मदेवानेच लिहून ठेविलें आहे.

✦ ✦ ✦

## काही संग्राह्य पुस्तके

माझे चिंतन, महाराष्ट्र संस्कृती : पु. ग. सहस्रबुद्धे

भारताचा राष्ट्रवाद, हिंदुसमाज : पु. ग. सहस्रबुद्धे

लोकसत्तेला दंडसत्तेचें आव्हान : पु. ग. सहस्रबुद्धे

भारतीय लोकसत्ता, भारतीय तत्त्वज्ञान : पु. ग. सहस्रबुद्धे

पु. ग. सहस्रबुद्धे चरित्र आणि साहित्य : व. ग. सहस्रबुद्धे

अदृश्य शिडी आत्मविश्वासाची : सरश्री तेजपारखी

संतांची सामाजिक दृष्टी : शंकरराव खरात

श्रीरामदासस्वामींचे प्रपंच विज्ञान : श्री. म. माटे

भारतीय परंपरा आणि कबीर : पद्मिनीराजे पटवर्धन

अंधारातील प्रकाशवाटा : जगन्नाथ वाणी

मनाचे श्लोक : एस्. के. कुलकर्णी

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

२१५९/२, विजयानगर, पुणे ४११०३०.